पीएच्. डी. प्रबंध

विषय
संस्कृत – प्राकृत

शीर्षक
जैन दर्शनातील भावना संकल्पना – आशय आणि अभिव्यक्ती

भाग २

संशोधक विद्यार्थिनी
साध्वी पुण्यशीला

मार्गदर्शक
ज. र. जोशी

संशोधन केंद्र
संस्कृत प्रगत अध्ययन केंद्र,
पुणे विद्यापीठ, पुणे
२००४

Dr. R. P. Poddar
(Pune)

Ph. D./ M. Phil Unit
Inward No. 1489
Date 9/3/04

forwarded
9/3/2004

Director
Centre of Advanced Study
in Sanskrit
University of Pune
Pune - 411 007.

पीएच्. डी. प्रबंध

"आनंद मंगल" नवा आडगाव रोड, इंगतपुरी,
नाशिक.

❖ विषय ❖

संस्कृत – प्राकृत

❖ शीर्षक ❖

जैन दर्शनातील भावना संकल्पना– आशय आणि अभिव्यक्ती

भाग – 1

❖ संशोधक विद्यार्थिनी ❖

साध्वी पुण्यशीला

❖ मार्गदर्शक ❖

ज. र. जोशी

❖ संशोधन स्थल ❖

संस्कृत प्रगत अध्ययन केंद्र,
पुणे विद्यापीठ, पुणे

२००४

भाग १

Date :

CERTIFICATE

Certified that the work incorporated in the thesis **"Concept of Bhavana in Jainism : Content and expression"** was carried out by the candidate **Sadhvi Punyasheela** under my supervision. Such material as obtained from others sources, has been duly acknowledged in the thesis.

(Dr. J. R. Joshi)

DECLARATION

I do declare that this thesis entitled

" Concept of Bhavana in Jainism : Content and Expression "

is an original work prepared by me under the supervision of **Dr. J. R. Joshi.** I also declare that this was not submitted for the degree of Ph. D. or any other degree in this or any other form.

जैन साध्वी पुण्यशीलाजी

Place – Pune
Date : February 2004.

(Sadhvi Punyasheela)

-: ऋणनिर्देश :-

ऋणनिर्देश हा प्रबंधाचा केवळ औपचारिक भाग कधीच नसतो, .विद्यावाचस्पती (Ph.D) या पदवी पर्यत पोहोचण्यापूर्वी व पोहोचण्यासाठी अनेक व्यक्तीची, संस्थांची व ग्रंथालयाची बहुमोल मदत झालेली असते. या सर्वाविषयीचा आदरभाव मी या ऋणनिर्देशात व्यक्त करीत आहे.

* दिक्षेनंतर स्वाध्यायाच्या निमित्ताने प्राकृतची आवड निर्माण करणाऱ्या माझ्या गुरुणीजी बा. ब्र. डॉ. पू. श्री धर्मशीलाजी म.सा. (M. A. Ph.D) वेळोवेळी उत्तेजन देणारे माझे चरित्रशीलाजी म.सा. विवेकशीलाजी म.सा. भक्तीशीलाजी म.सा.

* प्रबंध लेखनाच्या काळी वेळोवेळी बहुमोल सूचना देणारे माझे पुणे विद्यापीठातील मार्गदर्शक –

डॉ. ज. र. जोशी.

* प्राकृत भाषेची ओळख करुन देण्यापासून प्रंबध पुर्ण होईपर्यत सतत सहाय्य करणारे श्री. महेश भोगीलाल दोशी, पुणे.

* या सर्वांचे ऋण मी आज कृतज्ञातापूर्वक नमूद करीत आहे. *

अनुक्रमणिका

प्रस्तावना १-१२

प्रकरण पहिले : जैन संस्कृती धर्म आणि वाङ्मय १३-७८

मानव-जीवन आणि धर्म

भारत वर्षात धर्माचा अजस्त्र स्रोत

जैन परंपरेचा अनादी स्रोत

अवसर्पिणी काळ

उत्सर्पिणी काळ

भारतीय संस्कृतीच्या दोन धारा

ब्राह्मण संस्कृती आणि साहित्य

श्रमण संस्कृती

श्रमण संस्कृतीच्या मुख्य दोन धारा

श्रमण परंपरेचे अन्य संप्रदाय

जैन परंपरेचे सात निह्नव

वर्तमान अवसर्पिणी काळातील चोवीस तीर्थंकर

२४ वे तीर्थंकर श्रमण भगवान महावीर

भगवान महावीरांचा उपदेश आणि श्रुतपरंपरा

आगम संकलनाच्या तीन वाचना

आगमाचे अनुयोगामध्ये विभाजन

आगमांचे महत्त्व

जैन आगम साहित्याचे दोन विभाग

आगम अंगाचे संक्षिप्त विश्लेषण

बारा उपांगांचा संक्षिप्त परिचय

चार मूळ सूत्र

छेद सूत्र

आश्यक सूत्र

प्रकीर्णक आगम साहित्य

प्रकरण दुसरे : भावना विचार आणि मन ७९-१२३

भावना शब्दाचे महत्त्व आणि उत्पत्ती

योग शब्दाचा भावनेबरोबर संयोग

भावनेचे स्वरूप, उपलब्धी आणि परिभाषा
अनुपेक्षेची परिभाषा
द्वादश भावनेचा संक्षिप्त परिचर
मैत्री इत्यादी चार भावना : एक परिचय

प्रकरण तिसरे : अर्धमागधी आगमामध्ये भावनेचे विवेचन १२४-१६९
आचारांग सूत्रात भावना
अहिंसा महाव्रताच्या पाच भावना
सत्य महाव्रताच्या पाच भावना
अचौर्य महाव्रताच्या पाच भावना
चतुर्थ महाव्रताच्या पाच भावना
अपरिग्रह महाव्रताच्या पाच भावना
सूत्रकृतांग सूत्र
स्थानांग सूत्र
समवायांग सूत्र
व्याख्याप्रज्ञप्ती (भगवती) सूत्र
ज्ञाताधर्मकथा
प्रश्नव्यापकरण
औपपातिक सूत्र
उत्तराध्ययन सूत्र
उत्तराध्ययन सूत्रामध्ये अप्रशस्त भावना
दशवैकालिक सूत्र
आवश्यक सूत्र
बृहत्कल्प भाष्यामध्ये भावना
प्रकीर्णकामध्ये भावना

प्रकरण चौथे : भावना विषयक साहित्यकारांचा परिचय आणि अकल्याणकारी अशुभ भावना १७०-२७६
भावनेचे प्रतिपादन करणाऱ्या आगमोत्तर काळच्या
काही साहित्यकारांचा परिचय
अवधूत योगींचे जीवन दर्शन
अकल्याणकारी अशुभभावनेचे विवेचन
हिंसानुबंधी भावना

मृषानुबंधी भावना
स्तेयानुबंधी भावना
मैथुन संबंधी भावना
परिग्रह संबंधी भावना
चार कषायानुबंधी अशुभभावना
क्रोधानुबंधी भावना
मानानुबंधी भावना
मायानुबंधी भावना
लोभानुबंधी भावना
कंदर्पादि संक्लिष्ट भावना
कांदर्पि भावना
देव किल्विषी भावना
अभियोगी भावना
आसूरी भावना
संमोही भावना

प्रकरण पाचवे : आगमोत्तर कालीन आणि आधुनिक जैन साहित्यात भावनेचे निरूपण २७७-५८१

भावनेबरोबर योग शब्दाची उपयोगिता
भावनेचे महत्त्व
बारा वैराग्य भावना-अनित्य भावना
अशरण भावना
संसार भावना
एकत्व भावना
अन्यत्व भावना
अशुची भावना
आस्रव भावना
संवर भावना
निर्जरा भावना
लोक भावना
बोधिदुर्लभ भावना
बारा भावनांची फलश्रुती

प्रकरण सहावे : वैराग्यातून योग भावनेच्या दिशेने साधकाचा विकास ५८२-६५८

मैत्री इत्यादी चार भावना
मैत्री भावना
प्रमोद भावना
करुणा भावना
सम्यग्दर्शनाची धडकन जाणण्याचे धर्मामीटर - करुणा
करुणा किंवा दया भावनाच्या प्रसाराचे क्रांतिपूर्ण पाऊल
माध्यस्थ भावना
चार योगभावनांचा सार
मैत्री भावनेने क्रोधावर विजय
प्रमोद भावनेने मानावर विजय
करुणा भावनेने मायावर विजय
माध्यस्थ्य भावनेने लोभावर विजय

प्रकरण सातवे : अशुभाकडून शुभ आणि शुद्धाकडे जाण्याचा राजमार्ग ६५९-७१२
आगमामध्ये आत्मभावना
आगमोत्तर काळात आत्मभावना
व्यवहार आणि निश्चयाची कसोटी

प्रकरण आठवे : उपसंहार ७१३-७३९

संदर्भग्रंथसूची ७४०-७५४

प्रस्तावना

प्रस्तावना

परमशांती अथवा परमआनंद जीवनाचे अंतिम लक्ष्य आहे. त्याला प्राप्त करण्याची साधकाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आकांक्षा असते. पण त्याची पूर्तता भौतिक पदार्थ, सुख, समृद्धी अथवा वैभवाने होऊ शकत नाही. कारण हे सर्व नश्वर आहेत. यात परिणाम सरसता नाही विरसता आहे. भौतिक सुखाच्यामागे दुःख, संयोगाच्या मागे वियोग लागलेलेच आहे आणि म्हणूनच प्रज्ञाशील पुरुष चिरंतर सुखाच्या शोधात सतत प्रयत्नशील असतात. त्याच्या फलस्वरूपी अध्यात्मदर्शनाचा विकास झाला आहे. परमानंदाचा स्रोत बाह्य जगात नसून अंतर्जगातच आहे. ह्या दिशेने जैन दर्शनाचे आपले विशिष्ट महत्त्व आहे.

जैन धर्माने आणि जैन तत्त्वज्ञानाने विश्वाला आणि विश्वाच्या अध्यात्मिक जगाला अनेक महत्त्वाच्या देणग्या दिल्या आहेत. जैन दर्शनाचा प्रत्येक विचार विश्वाच्या दार्शनिकासाठी विशेष अभ्यास आणि उत्तम जिज्ञासारूप आहे. जैन दर्शन स्थळ, काळ आणि सांप्रदायिकतेच्या सीमेत बद्ध नाही. विश्वाच्या लहानात लहान जीवाच्या कल्याणाची, मांगल्याची शुभभावना जैन दार्शनिकांनी व्यक्त केली आहे. मात्र व्यक्तिगत सुखच नाही तर विश्वाच्या कोणत्याही क्षेत्रात रहाणाऱ्या मानवाच्या परम सुखाची मंगल भावना ही जैन धर्माची जगत् धर्माला दिलेली अजोड संपत्ती आहे. जैन धर्मात दुःखमुक्ती व आनंदप्राप्तीचा जो मार्ग सांगितला आहे तो ज्ञान आणि क्रियामूलक आहे. म्हणूनच ''ज्ञान क्रियाभ्यांमोक्षः'' असे म्हटले गेले आहे. ज्ञान आणि क्रियेच्या साधनेसाठी जैनागम ग्रंथात आणि तत्संबधित शास्त्रात विस्तृत विवेचन प्राप्त होते.

देव, गुरू आणि धर्माच्या कृपेने संसाराच्या त्याग करून, वैराग्य मार्गावर वीतरागदेवाच्या आज्ञेत विचरण करण्याची आणि संयमी जीवन जगण्याची प्रतिज्ञा केली तेव्हापासून सम्यग्ज्ञानाच्या क्षेत्रात कोणते न कोणते ठोस अध्ययन व्हावे अशी माझी भावना होती. कारण 'सम्यग्दर्शन ज्ञान चारित्राणि मोक्षमार्गः' अर्थात सम्यग्दर्शन, सम्यक्ज्ञान व सम्यक् चारित्र हे तीन मोक्षाचे मार्ग आहेत आणि साधकाचे लक्ष्य मोक्ष-प्राप्तीचे असणारच. त्याच दिशेने जास्तीतजास्त प्रगती कशी होईल असे चिंतन करीत असताना संसाराच्या असारतेचा तसेच आत्म्याच्या शाश्वततेचा व अमरतेचा

परिचय मिळवण्याच्या भावनेने साधनेच्या अनुकूल मनोभूमी तयार करण्यासाठी प्रयत्नशील होते.

'डुबते को तिनके का सहारा' ह्या म्हणीप्रमाणे माझ्यासारख्या अल्पज्ञ साध्वीला संसार सागरातून पार करण्यासाठी गुरू भगवंतांची असीम कृपा प्राप्त झाली. ज्या संप्रदायात माझी दीक्षा झाली त्या श्रमणसंघाचे आचार्य सम्राट पूज्य श्री. आनंदऋषीजी महाराजांद्वारा लिखित 'भावनायोग एक विश्लेषण' हा ग्रंथ वाचण्याचा सुवर्णयोग आला. तेव्हा माझा एम. ए. चा अभ्यास चालला होता. या ग्रंथात आलेल्या आलेखनाचे चिंतन करतानाच मनात निर्णय केला की जर भविष्यात पीएच. डी. करण्याची संधी मिळाली तर 'भावना' या विषयावरच पूर्णपणे कार्य करेल व जैन दर्शनामध्ये भावनेविषयी विविधदृष्टीने प्राकृत, संस्कृत तसेच अन्य भाषेत जे लेखन झाले आहे त्याचा रसास्वाद घेऊन तात्त्विक विचारांचे समीक्षात्मक अध्ययन करण्याचा निर्णय केला.

'याहशी भावना यस्य सिद्धिर्भवति ताहशी ।।'

या सुविचाराप्रमाणे माझ्या मनात उत्पन्न झालेल्या भावनेला सिद्धी मिळाली आणि एम. ए. पास झाल्यानंतर पीएच. डी. करण्याचा योग मिळाला. योगायोगाने पुणे विद्यापीठाने पण या विषयासाठी मान्यता स्वीकृती दिली. ह्याला मी माझ्या परम वंदनीय परमउपकारी गुरुदेव आणि गुरुणीमैयांचा असीम कृपाप्रसाद समजते.

जैन साधुचर्येत समर्पित जीवनात वीतरागप्रभूच्या आज्ञेत राहून आचारधर्माचे पालन करता करता संयम आणि वैराग्याला उत्तरोत्तर विशुद्ध करणे, मोक्ष मार्गाची उपासना करणे, तसेच स्व-पर कल्याणाच्या प्रवृत्तीचा विकास करणे हा माझा अनिवार्य धर्म आहे. आणि म्हणूनच भावनांविषयी विस्तृत अभ्यास करण्याचा माझा मनोरथ जास्त सुदृढ झाला.

मानवाच्या चित्तात उठणारे विविधभाव जेव्हा भावनेत परिवर्तित होतात तेव्हा मानव खऱ्या अर्थात कल्याणाच्या मार्गात प्रगती करण्यासाठी पुरुषार्थ करतो. गणधर भगवान यांनी आगम ग्रंथात आणि आगमोत्तर काळात समर्थ आचार्य भगवान आणि मुनी भगवंतांनी भावना या विषयी खूप मन खोलून आलेखन केले आहे. जैन दर्शनात भावनेसंबंधी आणि त्यांच्या प्रकारसंबंधी व मानव कल्याणासाठी, त्याच्या उपयोगितेसंबंधी खूप विस्तृत आलेखन झाले आहे.

'भावना भव नाशिनी' या प्रसिद्ध उक्तीत भावनेसंबंधी जितके काही सांगितले जाऊ शकते ते साररूपात या सूत्रात सामावलेले आहे. भावनेचा महिमा या पेक्षा जास्त काय असू शकणार ? की ती भवपरंपरेचा अर्थात जन्म मरणाचा नाश करून अजर अमररूपामध्ये अवस्थित होण्याचे एक अनन्यतम साधन आहे. म्हणूनच माझ्या मनमंदिरात भावनेचे सुदृढ स्थान जमले व मला अभ्यास करण्यासाठी प्रेरणा मिळाली.

गुरुणीमैया डॉ. धर्मशीलाजी महाराजांच्या असीम कृपेणे ज्ञानवृद्धीसाठी लागणाऱ्या सर्व सुविधा सहजतेने प्राप्त झाल्या. गुरुभगवंतांच्या आशीर्वादाने आणि जैनसंघांच्या सहकार्याने अभ्यासाचा माझा उत्साह उत्तरोत्तर वाढत गेला.

विषय निर्धारित झाल्यानंतर सर्वप्रथम जैन आगम साहित्यात भावनेसंबंधी संपूर्णपणे अथवा प्रासंगिक रूपात जे काही विवेचन झाले आहे त्याचे संशोधन सुरू केले. त्यात अंग, उपांग, मूळ छेद प्रकीर्णक इत्यादी आगम वाङ्मय आणि त्याच्या आधारावर प्राकृत, संस्कृत, अपभ्रंश इत्यादी प्राचीन भाषेत रचलेले दर्शन साहित्य आणि योग याचा अभ्यास केला. त्यातील काही ग्रंथांची नावे खालील प्रमाणे आहे-

वारसाणुवेक्खा - आचार्य कुन्दकुन्द
तत्त्वार्थसूत्र व प्रशनरति प्रकरण - आचार्य उमास्वाती
भगवती आराधना - आचार्य शीवार्य
कार्तिकेयानुप्रेक्षा - स्वामी कार्तीकेय
योगशास्त्र - आचार्य हेमचंद्र
ज्ञानार्णव - आचार्य शुभचंद्र
शान्तसुधारस भावना - उपाध्याय विनयविजय
यशस्तिलक चम्पु - आचार्य सोमदेव
बृहद्द्रव्य संग्रह टीका - श्री ब्रह्मदेव आणि श्री पुट्टय्या स्वामी
रुइधू ग्रंथावली - मुनी रइधू
भावना शतक - मुनी रत्नचंद्रजी
भावनायोग : एक विश्लेषण - आचार्य श्री आनंदऋषीजी
अमूर्त चिंतन - आचार्य महाप्रज्ञजी
भावना भवनाशिनी - मुनी श्री अरुणविजयजी, राजेंद्रमुनी शास्त्री, श्री राजशेखर सूरी, रसिकलाला शाह

भावनाबोध पाठमाळा - श्रीमद् राजचंद्रजी

बारह भावना - हुकुमचन्द भारिल्ल इत्यादी.

यांच्या अतिरिक्त पण अन्यान्य अनेक आचार्य मुनी आणि विद्वानांच्या रचनेचे अनुसंधानात्मक वृत्तीने अध्ययन केले. हिंदी, मराठी, गुजराती, राजस्थानी इत्यादी आधुनिक भाषांतही जैन सिद्धांत तसेच आचार या संबंधी जे विविध साहित्य प्राप्त झाले त्याचे पण मी व्यापकतेने अवलोकन केले. त्यात भावनेच्या संदर्भात जी सामग्री प्राप्त झाली तिला यथास्थान संयोजित करण्याचा मी प्रयत्न केला.

विद्या आणि साधना कोणत्याही धर्म अथवा संप्रदायाच्या मर्यादित बांधलेली नसते. हा तर एक सर्वव्यापी, सर्वग्राही आणि सर्वोपयोगी उपक्रम आहे. त्याला विविध परंपरेने संलग्न ज्ञानीजन आणि साधकगण समृद्ध करतात. जैन दर्शन, अनेकांतवादावर आधारित समन्वयात्मक दर्शन आहे. त्या दृष्टीने कोणत्याही प्रकारे सांप्रदायिकतेची संकीर्ण भावना न ठेवता भावना विषयावर जे लेखनकार्य सुरू केले ते प्रस्तुत शोधप्रबंधाच्या रूपात उपस्थित आहे. ते विषय व्यवस्थित मांडण्याच्या दृष्टीने आठ प्रकरणात विभक्त केले आहे. ही आठ प्रकरणे कर्म नष्ट करून सिद्ध, बुद्ध, मुक्त होण्यासाठी साधकाला उपयुक्त ठरावित अशी भावना आहे.

प्रकरण १ : 'जैन संस्कृती धर्म आणि वाङ्मय'

या प्रकरणात मानव जीवन, धर्म, भारतीय संस्कृती वैदिक व श्रमण संस्कृतीच्या दोन धारा, त्यांचे साहित्य, तत्त्वदर्शन, आचार इत्यादींचे विवेचन करून जैन परंपरेचे वर्तमान काळाचे शेवटचे तीर्थंकर श्रमणभगवान महावीरांद्वारा प्ररूपित द्वादशांग आणि तत्संबधित उपांग इत्यादी व प्रकीर्णक आगमाचा थोडक्यात परिचय दिला आहे, जे शोधकार्याच्या पृष्ठभूमीच्या मुख्य अंग रूपात प्रयुक्त झाले आहे.

सर्व प्रथम मानवी जीवनाचे वर्णन केले आहे. कारण मनुष्य ह्या सृष्टीची सर्वोत्तम रचना आहे. या सर्वोत्कृष्टतेचा मूळ आधार आहे त्याची विचारशीलता व विवेकशीलता. प्राण्यांचे वैशिष्टच आहे 'चैतन्य'. प्राण्याच्या सहस्राधिक वर्गात मानवजाती सर्वश्रेष्ठ आहे. सदसद् आणि हिताहिताचा विवेक मनुष्यात आहे. त्याच्याबरोबर अन्य कोणताच प्राणी स्पर्धा करू शकत नाही. प्रेम, करुणा, दया, ममत्व, साहचर्य बंधुत्व, संवेदना, क्षमा इत्यादी असंख्य भावना मनुष्याच्या हृदयातच निवास करतात. अशा भावना अन्य प्राण्यात दिसून येत नाही आणि असल्या तरी त्या एकदम

विरळ आणि अविकसित अवस्थेत आहेत. अव्यक्त रूपात आहेत. चिंतन, मनन, विवेक हा निर्णयाच्या क्षमतेचे वरदान तर मात्र मानवालाच मिळाले आहे. हीच विचारशीलता व भावना मनुष्याच्या श्रेष्ठत्वाची आधारशिला आहे.

मनुष्य मनाचा ईश्वर, मनाचा स्वामी आहे. त्याच्या उत्थान-पतनाचे कारण भावना आहे. अशुभ भावनेने पतन व शुभभावनेने उत्थान हे मनुष्याच्या मनाचे व्यक्त रूप आहे. भावना मनुष्य जीवनाचे निर्माण करणारी आहे. हीच मानव-जीवन महलाची मजबूत आधारशिला आहे.

धर्म- वस्तूचा स्वभाव धर्म आहे. दुर्गतीत पडणाऱ्या जीवांना वाचवणारा धर्म आहे. मनावर विजय मिळविणे धर्म आहे. पाच इंद्रियांना वश करणे धर्म आहे. त्याग, व्रत, नियमांचे पालन करणे धर्म आहे. कषाय जिंकणे धर्म आहे. मोह, ममत्व नष्ट केले तरच जीवाचा अंतर्बाह्य विकास होतो. मोह न सोडता फक्त धार्मिक क्रिया केल्या तर आत्म्याचा विकास होत नाही आणि संसार परिभ्रमण कमी होत नाही. म्हणून धर्माच्या स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करणे आवश्यक आहे.

वाङ्मय अर्थात आगमग्रंथ जैन साहित्यात आगमग्रंथाचे असाधारण महत्त्व आहे. आगम ग्रंथांच्या अभ्यासाने अष्टकर्म नष्ट होतात. आगम ग्रंथाचे चिंतन, मनन करणे हा खरा स्वाध्याय आहे. स्व-आत्मा अध्याय-अभ्यास, निरीक्षण, परीक्षण करणे, स्वतःच्या आत्म्याचे ज्ञान प्राप्त करणे स्वाध्याय आहे. त्या स्वाध्यायाचा एक प्रकार अनुप्रेक्षा आहे. अनुप्रेक्षा, भावना, चिंतन इत्यादी एक प्रकारचे आत्मशुद्धीसाठी असलेले निर्मळ जल आहे. आणि म्हणूनच प्रस्तुत प्रबंधात आत्मशुद्धी, आत्मविकास, आत्मावलोकन करण्यासाठी भावना-अनुप्रेक्षा यांचा समीक्षात्मक अभ्यास करून माझ्या क्षयोपशमाप्रमाणे आलेखन केले आहे.

प्रकरण २ : 'भावनेचा आशय, महत्त्व व थोडक्यात परिचय'

भावनाअनुप्रेक्षा इत्यादी शब्दांची परिभाषा, व्युत्पत्ती आणि मतितार्थ ह्या प्रकरणात व्यक्त करून सोळा भावनांचा थोडक्यात परिचय दिला आहे.

अनादीकाळापासून जीवात्मा संसाराचे चिंतन करत आहे. पण त्याला भावना सांगता येणार नाही, हे तर कर्मबंधाचे कारण आहे. त्यांना अशुभ भावना म्हणू शकू. विचाराचे, विकसित आणि परिपुष्ट रूप भावना आहे. चिंतन अनुचिन्तनाच्या मनोमन्थनाद्वारा प्राप्त नवनीत भावना आहे. विचार भावनेचे प्रारंभिक रूप आहे.

भावना मनुष्याची सर्वात मोठी संपत्ती आहे. भावनेत भव-भयाने मुक्त करण्याचे अपार सामर्थ्य असल्याने मनुष्याची परम हितैषिणी म्हटली जाते. मनुष्यजन्मात प्राणिजन्म मरणाच्या चक्राला स्थगित करण्याची जी क्षमता ठेवतो त्या क्षमतेच्या मागे भावनेचे मुख्य बळ आहे. आणि म्हणूनच भावनेला भवनाशिनी म्हटले आहे.

आपल्या ह्याच विशिष्टतेच्या आधारावर भावनेला 'योग'च्या श्रेणीत घेतले जाते. 'योग'चा सामान्य अर्थ 'मिलन' आहे. आणि विशेष अर्थ 'आत्म्याचा परमात्म्याबरोबर मिलन करून देणाचे साधन'. मोक्षप्रद योग अनेक प्रकारचे आहे. त्यात भावनायोगाला सर्वोत्कृष्ट स्थान मिळाले आहे. सूत्रकृतांग सूत्रानुसार ज्या साधकाचा अन्तरात्मा भावनायोगाने विशुद्ध होतो तो आत्मा पाण्यात तरंगणाऱ्या नौकेप्रमाणे संसारसागराला पार करून सर्व दुःखातून मुक्त होऊन परम सुखाला प्राप्त करतो.

वास्तविक भावनायोगाचे लक्ष्य वैराग्य आहे आणि वैराग्यच मोक्ष रूपात फलिभूत होतो. इथे हे विशेष ध्यानात ठेवण्यासारखे आहे की भावनेने साधित वैराग्य ज्ञानाधारित असते. म्हणून ते अटळ आणि स्थिर असते. भावनेच्या पुढची पायरी ध्यान आणि समाधी आहे.

अन्तरात्म्याच्या भावनेप्रमाणेच मनुष्याचा सर्व बाह्य व्यवहार आकार ग्रहण करतो. अशा प्रकारे भावना जीवनाची निर्मात्री आहे अशुभ भावना मनुष्याला दुर्जन, अन्यायी व दुराचारी बनवते. शुभ भावना त्याला सज्जन, धर्मप्रिय आणि सदाचारी बनवते, तर शुद्ध भावना जीवत्म्याला परमात्मस्वरूप बनवते.

अशा 'भावनायोग' सारख्या आध्यात्मिक विषयाच्या वेगवेगळ्या ग्रंथात अनेक परिभाषा प्राप्त होतात. त्याचे समीक्षण करून प्रस्तुत प्रकरणात देण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकरण ३: 'अर्धमागधि आगमात भावनेचे विवेचन'

आचारांग सूत्र हे आगम ग्रंथाचे सर्व प्रथम अंग ग्रंथ आहे. ह्याच्या पंधराव्या अध्ययनात पाच महाव्रतांच्या पंचवीस भावनांचे विस्तृत विवेचन आहे. ह्या पंचवीस भावना पाच महाव्रतांच्या रक्षणासाठी आहेत. प्रत्येक महाव्रतरूपी रत्नाच्या रक्षणासाठी भावनारूपी पाच रक्षक नियोजित केले गेले आहेत. जर पहारेकरी सावधान असतील तर असंयमरूपी चोर साधकाच्या आचरण कोषातून ह्या रत्नांची चोरी करू शकणार नाहीत. अशा प्रकारे आगमग्रंथात अनित्यादी बारा भावना आणि मैत्री इत्यादी चार

भावनांचे कोठे-कोठे वर्णन दिसून येते. त्याचा संशोधनात्मकतेने अभ्यास करून तिसऱ्या प्रकरणात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकरण ४ : 'अकल्याणकारी अशुभ भावना'

आगमोत्तर काळात ज्यात लेखक कवी आणि संतांनी भावनेविषयी गद्य, पद्य अथवा मिश्र रूपात रचना केल्या आहेत, त्यांचा थोडक्यात परिचय व अशुभ भावनेच्या हेयतेचे विवेचन प्रस्तृत प्रकरणात केले आहे.

शुभ भावनेच्या पूर्वीच अशुभ भावनेचे वर्णन करणे आवश्यक वाटले कारण अशुभला जाणल्याशिवाय शुभ अथवा शुद्ध भावना हृदयंगम करणे अशक्य आहे. अशुभ भावना इतक्या भयानक आहेत की मनात त्याची मात्र उपस्थिती पण दुष्परिणाम घडविण्यासाठी पर्याप्त आहे. दुष्कर्मात प्रवृत्त न होता मात्र भावनेनेपण जीवात्म्याची अधोगती होते, अशा हिंसा इत्यादींच्या पाच, कषायच्या चार आणि कांदर्पी आदी पाच भावनांचे पंचवीस असे एकंदरीत ३४ अशुभ भावनांचे वर्णन प्रस्तुत प्रकरणात केले आहे.

प्रकरण ५ 'आगमोत्तरकाळच्या जैन साहित्यात भावनेचे निरूपण'

या प्रकरणात वैराग्य भावनेचे विवेचन केले आहे. आगम ग्रंथात वैराग्य भावना विखुरलेल्या अवस्थेत मिळतात. पण आगमोत्तर काळाच्या ग्रंथात त्यांना क्रमबद्ध केले गेले आहे. ह्या सर्व भावना अनासक्ती अथवा वैराग्याचा मूळ आधाररूप आहेत. म्हणून यांना 'द्वादश वैराग्य भावना', 'बारह भावना' इत्यादी नावांनी ओळखले जाते.

मनात निर्वेद-वैराग्य उत्पन्न करणाऱ्या सर्व भावनांना वैराग्य भावनेच्या अंतर्गत मानले जाते. त्या दृष्टीने भावनेची कोणतीच निश्चित संख्या सांगता येत नसली तरी विद्वज्जनांनी असंख्य चिंतनधारा आणि भावतरंगाचे वर्गीकरण बारा भावनांच्या रूपात केले आहे.

ह्या भावना क्रमशः उच्चपासून उच्चतम स्थितीपर्यंत साधकाला नेतात. भावनांचे महत्त्व असाधारण आहे. भावनायोगाची साधना करणाऱ्या संत, योगी आणि सर्व साधकांना स्वतःच्या अंतरिक ऐश्वर्याचे, तप-जप संयमाचे भावात्मक सुख प्राप्त होते.

भावनायोग हा व्यवधानरहित मोक्षाचा राजमार्ग आहे.

भावनायोग हे परमसुख आणि शांती देणारा आहे.

भावनायोगाने आत्म्याची शुद्ध अवस्था प्राप्त होते.

भावनायोगाने शुद्ध चेतनेची अनुभूती होते.

भावना योग हा भवरोगाला दूर करण्याचा रामबाण उपाय (औषध) आहे.

शुद्ध भावनेचा एक क्षण अमृत बिंदूसारखा आहे.

आत्मकल्याण करण्यासाठी आत्मस्वरूपाच्या चिंतनाची आणि शरीर, धन, परिजनांच्या अनित्यत्व, अशरणत्व इत्यादींच्या चिंतनाची अत्यंत आवश्यकता आहे. ह्या चिंतनात प्रमाद केला तर जन्म-मरण दुःख इत्यादी भयंकर शत्रू आक्रमण करतील. झोपलेला सैनिक एखाद्या वेळेस शत्रूच्या शस्त्रातून वाचू शकतो. पण अध्यात्मभावनेत, धर्मयुद्धात क्षणाचा प्रमाद केला तर आंतरिक्ष शत्रू आत्म्याला घेरून टाकतात. मिळवलेले आत्मधनपण शत्रूच्या ताब्यात जाते. म्हणून आत्म्याला सतत जागृत ठेवण्यासाठी ह्या भावना अत्यंत चिंतन करण्यायोग्य आहेत.

मोहाधीन बुद्धीने जे काही घडते ते प्रमाद आहे, आणि मोहाविहिन बुद्धीने जे काही घडते ते अप्रमाद आहे. क्षणाचा प्रमाद न करता सतत शुभ आणि शुद्धभावनेचे चिंतन करण्यासाठी बारा भावना आलंबनरूप आहेत. प्रस्तुत प्रकरणात बारा भावनांचे विवेचन केले आहे.

प्रकरण ६ : 'वैराग्यातून योग भावनेच्या दिशेने साधकाचा विकास'

सहाव्या प्रकरणात मैत्री इत्यादी चार योग भावनांचे विवेचन आहे. वैराग्यवर्धक बारा भावनांच्या व्यतिरिक्त साधकाला परमशांती परमसुखाचा उत्तम अनुभव करून देणाऱ्या आणि योग अथवा ध्यानाचा उत्कर्ष साधणाऱ्या अशा चार महत्त्वाच्या भावनांचे निरूपण केले आहे.

ह्या चार भावनांच्या चिंतनाचा मुख्य उद्देश्य हा आहे की व्यक्तीमध्ये मात्र वैराग्यभावना जागृत होणे इतकेच पर्याप्त नाही, परंतु त्या भावना आचरणात याच्यात इंद्रियसंयमाबरोबर मनाचा संयम घडावा आणि देहासक्तीतून मुक्त होऊन योग आणि ध्यानाद्वारा चित्तनिरोध करून परमशांती प्राप्त करावी. अशा उत्तम आदर्शाने वैरग्य आणि योगपोषक चार भावनांचे विवेचन केले आहे.

अनित्यादी भावनांच्या चिंतनाने स्वरूपबोध झाल्यावर निर्वेदभाव अर्थात संसारावर अनादी काळापासून जो राग आहे त्याच्या वर उद्वेग येतो, उदासिनता येते.

संसाराप्रती असलेला राग आणि संसारी पदार्थांच्या आसक्ती त्यात सुखबुद्धी ठेवणे राग आहे. राग जन्ममरणाच्या चक्रात जीवाला फिरवतो. म्हणून सर्व प्रथम रागरहित होणे आवश्यक आहे. वैराग्यभाव साधनेचा प्रथम पाया आहे. वैराग्यसहित साधनाच सफळ होते. प्रथम संसाराची हेयता, उदासिनता, अरुचिता झाल्यावर साधना सफळ होते. वैराग्य आल्यावर त्या वैराग्याला सतत टिकवून ठेवण्यासाठी चार योग भावनांचे चिंतन आवश्यक आहे. काही लेखकांनी बारा भावनांबरोबरच चार भावनांना जोडले आहे, तर काही लेखकांनी स्वतंत्र विवेचन केले आहे.

मैत्री, प्रमोद, करुणा व माध्यस्थ्य ह्या चार योगभावना धर्माला आत्म्याबरोबर जोडतात, दृढ करतात. म्हणून त्यांना योग भावना म्हणतात. या योग भावनांचे अध्यात्मिक महत्त्व तर आहेच, त्याचबरोबर यांच्या चिंतनाने मानवात खरी मानवता विकसित होते. ह्या भावना दृढ झाल्या तर ईर्ष्या, द्वेष आणि कलहासाठी काही स्थानच रहात नाही. राग-द्वेष, अभिमान आणि स्वार्थानेच जगात मोठ्या समस्या निर्माण होतात. ह्या भावना त्यांचे निर्मूलन करून पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करू शकतात. पण आवश्कयता आहे याचे निष्ठेने चिंतन करण्याची. समाज, राष्ट्र आणि धर्मासाठी उपयुक्त अशा चार योग भावनांचे या प्रकरणात वर्णन केले आहे. त्यामुळे आत्मशांती बरोबर विश्वशांतीपण निर्माण होऊ शकते इतक्या या भावना महत्त्वपूर्ण आहेत.

प्रकरण ७ 'अशुभापासून शुभ आणि शुभापासून शुद्धाची भावयात्रा'

या प्रकरणात अशुभ आणि शुभाचे पाप-पुण्य बंधात्मक स्वरूप आणि शुद्धभावना, शुद्धोपयोग कर्मनिर्जरा, कृत्स्न कर्मक्षय तथा मोक्षाचे तात्त्विक दृष्टीने निरूपण केले आहे. 'आत्मा' धर्म आणि दर्शन हे जगात चिंतनाचे महत्त्वपूर्ण विषय आहेत. आत्मा-अनात्मा, जड, चेतनाचे चिंतन करून आत्मा शुद्ध चैतन्यस्वरूपी आहे असे चिंतन केले पाहिजे.

आत्मा अनादीकाळापासून आहे. कर्मपण अनादी काळापासून आहे आणि दृश्य विश्वपण अनादी आहे. आत्म्याची उत्पत्ती पण नाही व नाश पण नाही. आत्मा त्रिकाळी शाश्वत आहे. असे अनंत आत्मे विश्वात आहेत. प्रत्येक आत्म्याचे मौलिक मूळ स्वरूप सारखेच आहे.

आत्मा जसा अनादी आहे तसा आत्म्याचा संसारपण अनादी आहे. संसाराला कारणभूत असणारा कर्मसंयोगाला अनादी आहे.

जीवनात जितकी सरळता तितकी ज्ञानाची निर्मळता आणि ज्ञानाची निर्मळता जितकी जास्त तितके आत्मकल्याण जास्त होते. प्रस्तुत प्रकरणात अशुभ वृत्तीच्या नाशासाठी शुभ प्रवृत्तीची आवश्यकता आणि शुभ प्रवृत्तीमुळे शुद्धोपयोग किंवा शुद्ध भावनेच्या विकासाचा अभ्यास क्रमाक्रमाने कसा केला जातो त्याचे विवेचन केले गेले आहे.

प्रकरण ८ : 'उपसंहार'

प्रस्तुत शोधप्रबंधात भावनेच्या संदर्भात केलेल्या समीक्षात्मक विवेचनाचा ह्या प्रकरणात उपसंहार केला आहे. 'उप' म्हणजे समीप, जवळ आणि 'संहार' म्हणजे नाश करणे विध्वंस करणे. अर्थात मुमुक्षू जीवाच्या दोषांचे अत्यंत निकटतेने संपूर्णपणे छेदन करणारा उपसंहार आहे. भावनायोग ग्रंथरूपी प्रासादाचे निर्माण झाल्यावर ह्या दिव्य प्रासादाच्या शिखरावर उपसंहाररूपी कळस ह्या प्रकरणात चढवला जाईल.

ही आठ प्रकरणे आठ कर्म नष्ट करण्यासाठी सहाय्यभूत व्हावीत अशी भावना आहे. ह्या भावनेचे चिंतन, मनन प्रत्येक मुमुक्षू आत्म्यासाठी कल्याणकारी, आध्यात्म-रसाच्या रसिकासाठी आनंदरसाने सराबोर करणारे, आंतरिक तृप्ती देणारे असावे हीच अभिलाषा !

प्रबंध लेखनाचा उद्देश मुमुक्षू साधकांना आणि जैन दर्शनानुसार उपासना करणाऱ्या साधकांना एक बौद्धिक पातळीवर साधन उपलब्ध करून देणे हा आहे. भावना या निराकार संकल्पनेला साकार करण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. जो परीक्षकाला सम्मत होईल असा विश्वास आहे.

कृतज्ञता अभिव्यक्ति -

प्रस्तुत शोधग्रंथाच्या लेखन कार्यात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रूपात अनेक पूज्यनीय, वंदनीय, स्मरनीय गुरुवर्यांचे आशीर्वाद कृपादृष्टी आणि सत्प्रेरणा आहेत. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे.

माझ्या प्रगुरुवर्य अध्यात्म जगाची दिव्य ज्योती अमृतमय वाणीद्वारा जनतेसाठी धर्मसुधेची वृष्टी करणाऱ्या, पवित्र हृदयाविश्वसंत स्वरूपा, स्वर्गीय महासतीजी श्री उज्ज्वलकुमारीजी ज्या संपूर्ण साध्वी समुदायसाठी, नेहमी प्रेरणेची दिव्य स्रोतस्वीनी

होत्या. त्यांचा स्रोत परंपरेने माझ्या शैक्षणिक, साहित्यिक आणि ह्या शोधकार्यात परोक्षरूपाने स्फूर्तीदायक बनला आहे. अशा महान प्रभाविका पवित्रात्म्यांच्या प्रती मी शतशत श्रद्धाविनता आणि कृतज्ञ आहे.

माझ्या आराध्य गुरुवर्या अध्यात्मयोगी, प्रवचन प्रभाविका विश्वशांतीरतन डॉ. पू. धर्मशीलाजी महासतीजी ज्यांच्या आध्यात्मिक छत्रछायेत आणि सत्सान्निध्यात मी आपल्या विद्या, संयम, आणि साधनामय जीवनात नित्य प्रेरणा आणि मार्गदर्शन प्राप्त करीत आहे, त्यांचेपण मी आभार व्यक्त करते.

माझ्या ह्या शोधयात्रेच्या शुभकार्यात सद्भावना ठेवणाऱ्या पू. चारित्रशीलाजी म. विवेकशीलाजी म. आणि भक्तिशीलाजींच्या प्रती मी आपला आभार व्यक्त करीत आहे.

ह्या शोधकार्याच्या महप्रयत्नात विविध समस्यांचे समाधान करून कुशलतेपूर्वक मार्गदर्शन करणारे संस्कृत, प्राकृत, पाली इत्यादी प्राच्य भाषांचे ज्ञानी आणि भारतीय दर्शनाच्या विविध पक्षाचे मनिषी, प्राकृत शोधसंपन्न वैशाली आणि मद्रास विश्वविद्यालयाचे पूर्व प्राध्यापक डॉ. छगनलालजी शास्त्रीद्वारा अविस्मरणीय मार्गदर्शन प्राप्त झाले, मी त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करते. त्याचे शिष्य रिसर्च स्कॉलर धर्मबंधू श्री महेन्द्रकुमार रांकावत यांनी दिलेल्या सहयोगाबद्दल त्यांना साधुवाद देते.

जैन विद्या अनुसंधान प्रतिष्ठान मद्रासचे प्रेसिडेंट आणि अहिंसा रिसर्च फाऊडेशनचे निर्देशक, तत्त्वनिष्ठ, उदारहृदयी, प्रबुद्ध समाजसेवी, पितृतुल्य श्रावकवर्य-श्री. सुरेन्द्रभाई एम. मेहता यांची विद्या विनियोगाची अभिरुची व संतसेवेची पुनित भावना श्लाघनीय आहे. त्यांच्या अपूर्व सहकार्याच्या प्रती धन्यवाद देत आहे.

घाटकोपरचे प्राध्यापक डॉ. रसिकभाई शाह यांच्या सहयोगाबद्दल त्यांचे पण आभार व्यक्त करते.

मुंबईतील घाटकोपर संघ आणि सोलापूर, पुणे, चेन्नईच्या श्रमणोपासक आणि श्रमणोपासिकांच्या प्रती मी आभार व्यक्त करते ज्यांनी सहृदयता आणि भक्तिभावनेने अध्ययनविषयी अपेक्षित सामग्री मिळवून देण्यात सहयोग दिला.

पुण्याचे श्री. महेश भोगीलाल दोशी तसेच श्री. दीपक मेहता यांनी प्रबंध पूर्ण होईपर्यंत सतत सहाय्य केले.

प्रकरण पहिले

जैन संस्कृती, धर्म आणि वाङ्मय

१. मानव-जीवन आणि धर्म

संपूर्ण जगाच्या जीवनसृष्टीमध्ये एकमेव मानवच मननशील प्राणी आहे. तो विश्वाचा शृंगार आहे, त्याच्यापेक्षा श्रेष्ठ आणि ज्येष्ठ असा दुसरा कोणताही प्राणी या विश्वात नाही. असीम सुखात निमग्न राहणारे देवसुद्धा मानवाबरोबर स्पर्धा करू शकत नाहीत. मानवाने आपल्या प्रतिभेच्या बळावर ज्या संस्कृती आणि विज्ञानाची नवनिर्मिती केली आहे ती केवळ अद्‌भूत आहे.

मानवाचा मेंदू पशूप्रमाणे अविकसित नाही. परंतु दिव्याच्या ज्योतीप्रमाणे उज्ज्वल, विकसित व उन्नत आहे. कारण त्याचे विचार अनंत आकाशाप्रमाणे विशाल आहेत, सूर्याप्रमाणे तेजस्वी आहेत, चंद्राप्रमाणे सौम्य आहेल, नक्षत्राप्रमाणे सुखदायी आहेत. त्याची इच्छी असेल तर तो पृथ्वीवरसुद्धा आपल्या निर्मल विचाराने आणि पवित्र आचरणाने स्वर्ग आणू शकतो.

आजचा मानव विकासाच्या नव्या वळणावर आहे. त्याच्या मनात सतत ही आकांक्षा असते की आपण नेहमी सुखमय जीवन जगावे, आपल्यावर कधीच दुःखे येऊ नयेत. सुखाच्या शोधात त्याने वेगवेगळी साधने एकत्र केली, शरीर आणि इंद्रियांच्या परितृप्तीसाठी त्याने जे काही अपेक्षित समजले त्या सर्व साधनांना पृथ्वी, समुद्र, पर्वत-शिखरे, आकाशपाताळ येथे एकत्रित केले. परंतु सुखाची त्याच्या मनात जी कल्पना होती ती तो साध्य करू शकला नाही कारण भौतिक पदार्थांपासून मिळणारे सुख नेहमीच सुखरूपात राहत नाही.

ती क्षणिक सुखे चिरकाळापर्यंत दुःखे देणारी असतात.[१]

भौतिक सुखे जितकी भोगली जातात त्याचा परिणाम दुःखदच होतो. म्हणून विद्वानांनी त्याला परिणामविरस सांगितले आहे. वास्तविक जे भूत, भविष्य आणि वर्तमान-त्रिकाळी सरस परिणामयुक्त असते तेच सुख असते.

मानवी मनाची जिज्ञासा पुढे वाढत जाते व मानव भौतिक, निरपेक्ष सुखाच्या शोधासाठी अग्रेसर होतो.

२. भारत वर्षात धर्माचा अजस्र स्रोत

भारत धार्मिक चेतना, चिंतन, मनन आणि साधनेच्या दृष्टीने विश्वातील एक महत्त्वपूर्ण देश आहे. जेव्हा जगातील इतर देश केवळ जीवनाच्या भौतिक पक्षाबरोबरच जुळलेले होते, संस्कृतीचा थोडाही विकास झाला नव्हता, तेव्हासुद्धा भारतात संस्कृती आणि धर्माचा अजस्र स्रोत वाहत होता. मोहेंजोदडो, हडप्पा, राजमहल, कालीबंगा इत्यादींच्या उत्खननाने हे सिद्ध होते की हजारो वर्षांपूर्वी येथे विभिन्न क्षेत्रात स्पृहणीय उन्नती झाली होती. भवननिर्मिती, वस्त्रे विणण्याची कला इत्यादी बाह्य विकासाबरोबर येथे परलोकाच्या चिंतनाकडेही लोकांची उन्मुखता होती. केवळ खाऊन पिऊन मौज मानण्यातच मनुष्याचे चिंतन आणि कार्यक्षेत्र सिमीत नव्हते.

म्हणूनच मनूने खूपच प्रेरक शब्दात सांगितले होते की ह्या जगात उत्पन्न होणाऱ्या ज्ञानीजनांपासून जगातील सर्व मानवांनी आपापल्या चारित्र्याची शिकवण ग्रहण करावी.[२]

भारतामध्ये धार्मिक दृष्टीने प्राचीन काळात जो विकास झाला तो जगाच्या अन्य देशांसाठी वस्तुतः प्रेरक होता. येथे असे ज्ञानी आणि उच्च चारित्रवान पुरुषही होऊन गेले, ज्यांनी सांसारिक वासनेचा त्याग करून ज्ञान आणि साधनेचा मार्ग अंगिकारीला. भौतिक आकर्षणापासून मुक्त राहून स्वतःला चिंतन, मनन आणि आत्मसंशोधनामध्ये लीन ठेवले. त्याच्या परिणाम म्हणून येथे ज्ञानाचा जो विविध रूपात विकास झाला त्यामुळे आगामी काळातही भारतीय जीवनाला फार मोठा आधार ठरला. त्याचे जीवन-चिंतन आचरणयुक्त होते. चिंतन दर्शन आहे आणि चर्या चारित्र्य अथवा क्रिया आहे. थोडक्यात येथील धर्म व अध्यात्माचा स्रोत मंद किंवा तीव्र राहिला परंतु संपूर्णपणे कधीच थांबला नाही.

३. जैन परंपरेचा अनादी स्रोत

परंपरेनुसार जैन धर्माला शाश्वत मानले गेले आहे म्हणजे वेळोवेळी जैन धर्माचा कोणत्याही क्षेत्राच्या दृष्टीने जरी लोप झाला असेल तरी तो पूर्णपणे कधी नष्ट झाला नाही. तो अनादी काळापासून चालला आहे आणि चालत राहील.

जम्बुद्वीपप्रज्ञप्ती सूत्रात कालचक्राचे विस्तृत विवेचन आहे. गणधर

गौतमस्वामींच्या जिज्ञासेचे समाधान करताना श्रमण भगवान महावीरांनी जे काळाचे वर्णन केले आहे ते पठनीय आहे.[३]

भरतक्षेत्रात काळ दोन प्रकारचा आहे

(१) अवसर्पिणी काळ (२) उत्सर्पिणी काळ

'अवसर्पण' काळ शब्दाचा अर्थ उत्तरोत्तर न्यून होणे, कमी होणे असा आहे. 'उत्सर्पण' या शब्दाचा अर्थ उत्तरोत्तर वाढणे अथवा उन्नत होणे असा आहे.

अवसर्पिणी काळाचे सहा प्रकार आहेत : (१) सुषम-सुषमा, (२) सुषमा, (३) सुषम-दुःषमा (४) दुःषम-सुषमा (५) दुःषमा (६) दुःषम-दुःषमा

उत्सर्पिणी काळही सहा प्रकारचा आहे : (१) दुःषम-दुःषमा (२) दुषमा (३) दुःषम-सुषमा (४) सुषम-दुःषमा (५) सुषमा (६) सुषम-सुषमा

अवसर्पिणी काळात वर्ण, गंध, रस, स्पर्श, संहनन, संस्थान, आयुष्य, शरीर, सुख इत्यादी पर्यायांची क्रमशः अवनती होते. उत्सर्पिणीमध्ये उपरोक्त पर्यायांची क्रमशः उन्नती होते. अवसर्पिणीची चरम सीमा म्हणजे उत्सर्पिणी काळाचा आरंभ आहे आणि उत्सर्पिणीची अंत म्हणजे अवसर्पिणीचा जन्म आहे.

कालचक्र बैलगाडीच्या चाकाच्या आऱ्याप्रमाणे खालून वर आणि वरून खाली फिरत राहते.[४] दोन्ही काळात तीर्थंकरांचा जन्म होतो. ज्यांची संख्या प्रत्येक विभागात चोवीस-चोवीस असते.

आजकाल अवसर्पिणी काळाचा दुःषम नावाचा पाचवा आरा चालला आहे. ह्या युगाचा जीवनक्रम सुषम-सुषमाने सुरू होतो.

४. अवसर्पिणी काळ

सुषम-सुषमा नावाच्या प्रथम आऱ्यामध्ये मानवी जीवन अत्यंत सुखमय होते. त्याच्यावर निसर्गाचा अपार अनुग्रह होता. मानवाच्या इच्छा अल्प होत्या. त्या इच्छा कल्पवृक्षाच्या माध्यमाने पूर्ण होत होत्या. मानव पूर्ण निरोगी आणि प्रसन्न राहात होता. पृथ्वी सर्व रसांनी परिपूर्ण होती. मानवाला तीन दिवसानंतर एकदा आहार घेण्याची इच्छा होत होती. आणि तो आहार त्यांना कल्पवृक्षानेच प्राप्त होत होता. मानव वृक्षाखालीच राहत होते. ते विपुल सावली देणारे वृक्ष त्यांना भव्य भवनांप्रमाणेच वाटत होते. त्या युगात मनुष्याचे आयुष्य तीन पल्योपमाचे होते.

प्रथम आऱ्यापेक्षा दुसऱ्या आऱ्यामध्ये वर्ण, गंध, रस स्पर्श इत्यादी प्राकृतिक गुणांमध्ये हळूहळू हीनता येऊ लागली. दुसऱ्या आऱ्याला मनुष्याचे आयुष्य तीन पल्योपमापेक्षा कमी होत होत दोन पल्योपमाचे होते.

तिसऱ्या आऱ्यामध्ये हीनतेचा क्रम हळूहळू अधिक प्रबळ होत जातो. आयुष्य दोन पल्योपमाहून कमी होत होत, एक पल्योपमचे होते. मानवाच्या जीवनात अशांतीचा प्रादुर्भाव होतो. गरजा वाढत जातात. एक दिवसा आड आहार घेण्याची इच्छा होते.

पहिल्या तीन आऱ्यांमध्ये 'युगलिक व्यवस्था' चालते. याच्यात युगल म्हणजे पती-पत्नीची जोडी असते. ते मृत्यूच्या सहा महिन्यांपूर्वी एका युगलाला जन्म देतात. अर्थात पुत्र आणि कन्या बरोबरच जन्म घेतात. ते भाऊ-बहीण मोठे झाल्यावर पति-पत्नीच्या रूपात परिणत होतात. असा क्रम तिसऱ्या आऱ्यापर्यंत चालू राहतो. ते युगल आपल्या बालक आणि बालिकेचे प्रतिपालन, प्रथम आऱ्यातील युगलिक एकोणपन्नास दिवसांपर्यंत करतात; दुसऱ्या आऱ्यातील युगलिक चौसष्ट दिवसांपर्यंत करतात; आणि तिसऱ्या आऱ्याचे युगलिक एकोणांशी दिवसापर्यंत करतात. तिन्ही आऱ्यांच्या युगलिकांचा अंतः शिंक आणि जांभईने होतो.

तिसऱ्या आऱ्याचे, चौऱ्यांशी लाख पूर्व, तीन वर्ष आणि साडेआठ महिने बाकी राहतात, तेव्हा प्रथम तीर्थंकरांचा जन्म होतो.

काळाच्या प्रभावाने भूमीचे रस व भूमीचा कस कमी-कमी होत जातो. कल्पवृक्षांपासून पुरेशा वस्तू प्राप्त होत नाहीत, तेव्हा क्षुधेने पीडित मनुष्यांची व्याकुळता पाहून गृहस्थ अवस्थेत असलेले तीर्थंकर दयाभावनेने स्वभावतः उत्पन्न झालेले चोवीस प्रकारचे धान्य, मेवा इत्यादी मनुष्याला दाखवतात. परंतु कच्चे अन्न खाल्याने त्यांच्या पोटात पीडा उत्पन्न होते. त्यांना अरणीकाष्टद्वारा अग्नी उत्पन्न करून अन्न शिजवून खाण्याचे अथवा भाजून खाण्यास सांगतात. पण भोळी माणसे अग्नीमध्ये अन्न टाकतात आणि अन्न जळताना पाहून सांगतात की अग्नीचेच पोट भरत नाही तर हे आम्हाला काय तृप्ती देतील? तेव्हा गृहस्थ आश्रमात स्थित तीर्थंकर कुंभकार वर्ग म्हणजे मातीपासून भांडे बनविणाऱ्या वर्गाची स्थापना करतात आणि भांड्यात अन्न शिजवणे शिकवतात.

त्यानंतर स्वर्गातून इंद्र येऊन प्रथम भावी तीर्थंकरांचा अत्यंत आनंदाने व उत्साहाने राज्याभिषेक करतात. ते राज्य संचालनासाठी नगर बनवतात. चार कुळे,

अठरा श्रेणी आणि अठरा प्रश्रेणी अशा प्रकारे छत्तीस जातींची स्थापना करतात. त्या विविध कर्मांवर आश्रित असतात. नंतर ते पुरुषांसाठी बहात्तर कला आणि स्त्रियांसाठी चौसष्ट कलांचा उपदेश देतात. असाधू लोकांवर नियंत्रण आणि साधू लोकांसाठी मंत्रिमंडळ तयार केले जाते. साम, दाम, दण्ड, भेद-नीती यांची स्थापना होते.

युगलांची बरोबर जन्म घेण्याची व मरण्याची जी सहज व्यवस्था होती ती शिथिल होत जाते. अकाली मृत्यू होऊ लागतात. म्हणून विवाहपद्धतीचा उदय होतो. त्यानंतर लोक आपल्या सहोदराला सोडून दुसऱ्या कन्येबरोबरसुद्धा विवाह करू लागतात. जसजशी मानव समुदायाची वृद्धी होते तसतसा नगरादींचा विकास होऊ लागतो. अशा प्रकारे भरतक्षेत्राची लोकसंख्याही वाढत जाते.

जीवनाच्या अंतिम भागात दीर्घकाळापर्यंत राज्य करणारे भावी तीर्थंकार संसाराचा परित्याग करून दीक्षा घेतात. तपश्चर्या आणि आत्मसाधनेद्वारा चार घाती कर्मांची निर्जरा करतात. केवलज्ञान व केवलदर्शनाची प्राप्ती होते. केवलज्ञान प्राप्त झाल्यावर ते साधू, साध्वी, श्रावक, श्राविका अशा चतुर्विध धर्मतीर्थाची स्थापना करतात. मुनिधर्मातील पाच महाव्रतांचा आणि गृहस्थ धर्मातील बारा व्रतांचा उपदेश देतात. आयुष्य पूर्ण झाल्यावर सिद्ध, बुद्ध, मुक्त होतात.

तिसरा आरा पूर्ण झाल्यावर एका सागरोपमाला बेचाळीस हजार वर्षे न्यून दुःषम-सुषमा नावाचा चौथा आरा सुरू होतो. ह्या आऱ्यामध्ये मनुष्याचे आयुष्य एकपल्योपमापेक्षा कमी होत होत एक कोटी पूर्वांचे राहते. दिवसात एकदा आहार करण्याची इच्छा होते.

चौथ्या आऱ्याचे तीन वर्ष, साडेआठ महिने बाकी राहतात तेव्हा चोविसावे तीर्थंकर मोक्षास जातात.

चौथा आरा पूर्ण झाल्यावर एकवीस हजार वर्षांचा दुःषम नावाचा पाचवा आरा सुरू होतो. तेव्हा पूर्वीपेक्षा वर्ण, गंध, इत्यादी पर्यायांमध्ये अनंतपटीने हीनता येते. दिवसातून दोन वेळा आहार करण्याची इच्छा होते. अशाप्रकारे क्रमशः ऱ्हास होत होत पाचव्या आऱ्याच्या अंतिम दिवशी शक्रेंद्राचे आसन चलायमान होते, तेव्हा ते प्राण्यांना संबोधून सांगतात, "उद्या सहावा आरा सुरू होणार आहे, म्हणून सावधान रहा, जे धर्मकार्य करायचे आहे ते करून घ्या, पुढे वेळ फार विषम येणार आहे." शक्रेंद्रवाणी श्रवण करून उत्तम धर्मनिष्ठ मानव ममत्वाचा त्याग करून अनशनव्रत

स्वीकारतात आणि समाधिस्थ होतात.

त्यानंतर महासंवर्तक वाऱ्यांचा प्रवाह सुरू होतो. त्या भयंकर वाऱ्यांमुळे वैताढ्य पर्वत, ऋषभकूट, लवणसमुद्राची खाडी, गंगा आणि सिंधू नदी सोडून सगळे पर्वत, किल्ले, महाल, घरे उद्ध्वस्त होतात.

पाचवा आरा पूर्ण झाल्यावर एकवीस हजार वर्षांचा सुषम-दुःषमा नावाचा सहावा आरा सुरू होतो. त्यावेळी भरतक्षेत्राचे अधिष्ठायक देव पाचव्या आऱ्याच्या नष्ट होणाऱ्या मनुष्यांमधून बीजरूपात काही मनुष्यांना उचलून गंगा सिंधूच्या जवळच्या गुंफेत ठेवतात.

उत्तर आणि दक्षिण विभागामध्ये गंगा-सिंधू नदींच्या समोरासमोरील किनाऱ्यावर ह्या गुफा आहेत, त्या संख्येने एकूण बहात्तर आहेत आणि एकेका गुंफेमध्ये तीन-तीन मजले असतात. त्या गुंफांमध्ये त्या बीजरूप मनुष्यांना सोडून देतात.

पाचव्या आऱ्यापेक्षा सहाव्या आऱ्यामध्ये वर्ण, गंध इत्यादी पुद्गल पर्यायांच्या उत्तमतेमध्ये अनंतपटीने ऱ्हास होत जातो. आहाराची इच्छा अमर्यादित होते. कितीही खाल्ले तरी तृप्ती होत नाही.

सहाव्या आऱ्यामध्ये दिवसा सूर्याच्या उष्णतेने आणि रात्री प्रचंड थंडीमुळे माणसे गुंफेच्या बाहेर पडू शकत नाहीत, परंतु सकाळी व संध्याकाळी सूर्योदय आणि सूर्यास्ताच्यावेळी बाहेर पडतात. आणि गंगा सिंधू नदीच्या मच्छ-कच्छ इत्यादी जलचर प्राण्यांना पकडून नदीच्या वाळूत गाडून गुंफेत निघून जातात. ते जलचर जीव सूर्याच्या भयंकर उष्णतेत भाजून निघतात. नंतर दुसऱ्यांदा ती माणसे गुंफेच्या बाहेर येऊन ते मच्छ-कच्छ एक दुसऱ्यांच्या हातातून ओढून घेऊन खाऊन टाकतात. मृतांच्या कवट्यांमध्ये पाणी भरून ते पाणी प्राशन करतात. अशाप्रकारे धर्मशून्य सुखरहित जीवन पूर्ण करून नरक अथवा तिर्यञ्चगतीत जातात.

अशाप्रकारे दहा क्रोडाक्रोडि सागरोपम प्रमाण अवसर्पिणी काळ पूर्ण होतो.

५. उत्सर्पिणी काळ

उत्सर्पिणी काळाचा दुःषम-दुषमा नावाचा पहिला आरा आषाढ कृष्ण प्रतिपदेच्या दिवशी सुरू होतो. तो अवसर्पिणी काळाच्या सहाव्या आऱ्यासारखाच असतो, इतकाच फरक आहे की ह्या प्रथम आऱ्यामध्ये प्रतिक्षण आयुष्य, देहमान

इत्यादींची क्रमशः वृद्धी होत जाते.

त्यानंतर उत्सर्पिणी काळाचा 'दुःषम' नामक दुसरा आरा आषाढ कृष्ण प्रतिपदेच्या दिवशी सुरू होतो, तो एकवीस हजार वर्षांचा, अवसर्पिणी काळाच्या पाचव्या आऱ्यासारखा असतो.

जेव्हा दुसरा आरा सुरू होतो तेव्हा भरतक्षेत्रामध्ये सर्वत्र पाच प्रकारची वृष्टी होते. त्या वृष्टीमुळे वनस्पतींमध्ये पाच प्रकारच्या रसांची उत्पत्ती होते. त्यावेळी गुंफेत राहणारी माणसे निसर्गाचे सौंदर्य पाहून आश्चर्यचकित होतात. आधी तर ते झाडापानांच्या हालचालीनेही घाबरतात आणि गुंफेत पळून जातात. गुंफेतील दुर्गंध त्यांना सहन होत नाही. त्या दुर्गंधाने घाबरून ते पुन्हा बाहेर येतात आणि नंतर निर्भय होऊन वृक्षाजवळ जातात. फळांचा आहार करतात. हा आहार त्यांना अत्यंत स्वादिष्ट लागतो. ते क्रमशः मांसाहार सोडू लागतात. त्यांच्यातून अनेकजण एकत्रित होऊन निश्चय करतात की आता आम्ही भविष्यात कधीच मांसाहार करणार नाही. इतकेच नाही तर त्यांना मांसाहाराविषयी इतकी घृणा उत्पन्न होते की ते सांगतात - आता मांसाहारी लोकांची सावलीसुद्धा आमच्यावर पडू देणार नाही. त्यांच्यापासून दूरच राहू. अशाप्रकारे जातीय विभाग होतात आणि सगळे रीतीरिवाज वर्तमानकाळाच्या पाचव्या आऱ्याप्रमाणे होतात.

उत्सर्पिणी काळाचा हा दुसरा आरा पूर्ण झाल्यानंतर दुःषम-सुषमा नावाचा तिसरा आरा सुरू होतो. तो एक क्रोडाक्रोडि सागरोपमाला बेचाळीस हजार वर्षे न्यून असतो. तो अवसर्पिणी काळाच्या चौथ्या आऱ्याप्रमाणे असतो. तिसऱ्या आऱ्याचे तीन वर्षे साडे आठ महिने पूर्ण झाल्यावर प्रथम तीर्थंकरांचा जन्म होतो. ह्या आऱ्यामध्ये तेवीस तीर्थंकर, अकरा चक्रवर्ती, नऊ बलदेव, नऊ वासुदेव, नऊ प्रतिवासुदेव होतात. वर्ण, गंध, रस इत्यादी शुभ पर्यायांमध्ये दिवसेंदिवस वृद्धी होत जाते.

नंतर सुषमा नावाचा चौथा आरा सुरू होतो. तो दोन क्रोडाक्रोडि सागरोपमाचा असतो. त्याचे चौऱ्यांशी लक्ष पूर्व, तीन वर्ष, साडे आठ महिने पूर्ण झाल्यावर चोवीसावे तीर्थंकर सिद्ध होतात- मोक्षास जातात. बाराव्या चक्रवर्तीचा आयुष्यकालही पूर्ण होतो. त्यानंतर एक कोटी पूर्व काळ व्यतीत झाल्यावर कल्पवृक्षांची उत्पत्ती होऊ लागते. त्यामुळे मानवाच्या आवश्यकतेची पूर्ती होते. लोकांना काम करावे लागत नाही. युगलिक युगाची सुरुवात होते. बादर (बाह्य) अग्नीचा आणि धर्माचा विच्छेद होतो. सगळे अकर्मण्य होतात. वर्ण, गंध इत्यादी शुभ पर्यायांमध्ये वृद्धी होते.

चौथा आरा पूर्ण झाल्यावर तीन क्रोडानुक्रोडि सागरोपमाचा सुषमा नावाचा पाचवा आरा सुरू होतो. तो अवसर्पिणी काळाच्या दुसऱ्या आऱ्याप्रमाणेच असतो. फरक इतकाच की उत्सर्पिणी काळात वर्ण इत्यादी शुभ पर्यायांची वृद्धी होत जाते.

त्यानंतर चार क्रोडाक्रोडि सागरोपमाचा सुषम-सुषमा नावाचा सहावा आरा सुरू होतो. तो अवसर्पिणी काळाच्या प्रथम आऱ्याप्रमाणे असतो.

अशाप्रकारे दहा क्रोडाक्रोडि सागरोपमाचा उत्सर्पिणी काळ पूर्ण झाल्यावर पुन्हा अवसर्पिणी काळ येतो. असा वीस क्रोडाक्रोडि सागरोपमीच एक काळचक्र भरतक्षेत्र आणि ऐरावत क्षेत्रात अनादी काळापासून फिरत आहे आणि अनंत काळापर्यंत फिरत राहील.

काळचक्राचे हे निरूपण साधकाच्या ज्ञानवृद्धीसाठी तर आहेच परंतु त्याच्याबरोबर मानवाच्या अंतःकरणात ही भावना उत्पन्न करतो की - 'मी ह्या काळचक्रात अनंतकाळापासून विविध योनींत परिभ्रमण करत आहे. आता मला अशी साधना केली पाहिजे की ज्याच्यायोगे भवभ्रमणातून माझी कायमची मुक्तता होईल - '

६. भारतीय संस्कृतीच्या दोन धारा

भारतीय संस्कृतीच्या प्रमुख दोन धारा आहेत.

(१) ब्राह्मण संस्कृती

(२) श्रमण संस्कृती

आर्य संस्कृतीमध्ये मानवी व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी ह्या दोन प्राचीन परंपरा अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. ह्या दोन्ही संस्कृतीचे उगमस्थान भारतातच आहे. ह्या पवित्र भूमीवर दोन्ही संस्कृती विकसित होत राहिल्या आहेत. त्या समकालीन असल्याने एका संस्कृतीचा दुसऱ्या संस्कृतीवर प्रभाव पडणे स्वाभाविकच आहे.

भारतीय संस्कृती किती श्रेष्ठ आहे, हे भारत शब्दानेच स्पष्ट होते. भा-प्रकाश, रत-दत्तचित्त अर्थात प्रकाशाच्या मार्गात दत्तचित्त होऊन अनुष्ठान केल्याने जे संस्कार मानवाच्या मनावर घडतात, ती भारतीय संस्कृती होय. भारतीय संस्कृतीचा उपासक संसारातील इतर कार्य जरी करत असला तरी त्याची दृष्टी आत्म्यावर केंद्रीत असते. तो कमळाप्रमाणे चिखलात जरी उत्पन्न झालेला असला तरी त्या चिखलाने कधीही लिप्त होत नाही.

७. ब्राह्मण संस्कृती आणि साहित्य

ब्राह्मण संस्कृतीचा आधार वेद आहे. वेद शब्द संस्कृतमधील 'विद्' धातूपासून बनला आहे. जो 'ज्ञान' या अर्थाचा द्योतक आहे. वेद उत्कृष्ट ज्ञानाचे प्रतीक आहेत. वैदिक परंपरेचा श्री गणेश वेदानेच होतो.

१) ऋग्वेद २) सामवेद ३) यजुर्वेद ४) अथर्ववेद यांच्या रूपात वेद चार आहेत. अथर्ववेद परवर्ती कालीन मानला जातो. म्हणून वेदत्रयीच्या रूपात वेदांना अत्याधिक प्रमाणित मानले जाते. हिंदूधर्माच्या मान्यतेनुसार वेद सर्व संसाराच्या रचनेमध्ये सर्वात प्राचीन आहे. वेदांची भाषा संस्कृत आहे. संस्कृतची दोन रूपे आहेत. (१) वैदिक संस्कृत (२) लौकिक संस्कृत.

लौकिक संस्कृत वैदिक संस्कृताचे विकसित रूप आहे. वेदात सूर्य, अग्नी, मरुत, वरुण, पृथ्वी इत्यादींना देवतेच्या रूपात स्वीकारले आहे. त्यांची स्तुती करण्यासाठी सूक्तांची रचना करण्यात आली आहे. वेद 'श्रुत' या नावाने प्रसिद्ध आहेत. विद्वान ब्राह्मण आपल्या मुलांना लहानपणापासूनच वेद कंठस्थ करायला लावत होते. वेदांची रचना स्वरप्रधान आहे. उच्चारणाच्या उच्च, मध्यम आणि मंद आधारावर उदात्त, अनुदात्त व स्वरित हे तीन स्वर मानले आहेत. वेद स्वरबद्ध असल्याने स्मरणात ठेवणे सोपे आहे. दक्षिण भारतात आजसुद्धा ब्राह्मण कुटुंबात वेदाच्या अध्ययनाची परंपरा कायम आहे.

संहिता, ब्राह्मण, आरण्यक आणि उपनिषद् हे वेदांचे चार उपविभाग आहेत. तसेच सूत्र, स्मृती, रामायण, महाभारत, गीता, पुराण, इत्यादी वैदिक परंपरेचे प्रमुख ग्रंथ आहेत.

संहिता - वेदातील ऋचा आणि मंत्राना संहिता म्हटले जाते.

ब्राह्मण - ज्या ग्रंथात वेदवर्णित यज्ञाच्या विधिविधानाचे विवेचन आहे त्यांना ब्राह्मण ग्रंथ म्हणतात. वेदांतील यज्ञपरक मंत्र समजण्यासाठी ब्राह्मणग्रंथांची रचना झाली. त्यांच्या आधाराशिवाय वेदांचा अर्थ समजणे कठीण आहे. हा वेदाचा कर्मकांड नावाचा विभाग आहे.

आरण्यक - आरण्यक ते ग्रंथ आहेत जे वानप्रस्थांसाठी रचले आहेत. वानप्रस्थासंबंधी धर्माचरण आणि साधनेच्या नियमांचे त्यात वर्णन आहे. आरण्यक शब्द 'अरण्य' यांना बनला आहे. 'अरण्य' मनाचा वाचक आहे. वानप्रस्थाश्रमी अरण्यात

राहत होते म्हणून या ग्रंथाला 'आरण्यक' असे नाव पडले.

उपनिषद् - उपनिषदाला 'वेदांत' सुद्धा म्हणतात. कारण हे वेदांचे अंतिम भाग मानले जातात. त्यांची संख्या एकशे आठ मानली जाते. त्यातील ईशावास्योपनिषद्, केनोपनिषद्, कठोपनिषद्, प्रश्नोपनिषद्, मुण्डकोपनिषद्, माण्डूक्योपनिषद्, ऐतरेयोपनिषद्, तैत्तिरीयोपनिषद्, श्वेताश्वतरोपनिषद्, कौषितकी, महानारायण, बृहदारण्यक, छांदोग्य इत्यादी अनेक मुख्य उपनिषदे मानली जातात. उपनिषदाने ज्ञानकांडाला विशेष महत्त्व दिले आहे. सांसारिक सुख-सुविधांपेक्षा उपनिषद् काळातील लोकांनी मोक्षावर अधिक भर दिला आहे. त्याच्यात अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, तप, दान, आत्मसंयम, दया, शांती इत्यादी अनेक मुक्तिमूलक विषयांचे वर्णन केलेले आहे.

सूत्र - सूत्राचे चार विभाग आहेत.

(१) श्रौतसूत्र (२) गृह्यसूत्र (३) धर्मसूत्र (४) शुल्वसूत्र

स्मृती - स्मृतींची रचना अनेक ऋषिमहर्षींनी केलेली आहे. स्मृतींमध्ये सामाजिक रीतीरिवाज, व्यवस्था, नियम, उपनियम वर्णिलेले आहेत. विवाहसंस्कार, संपत्तीचे विभाजन, अधिकार, लोकांचे कर्तव्य इत्यादींवर ह्याच्यात विवेचन केलेले आहे.

ह्याच्यात मनुस्मृती, याज्ञवल्क्य, पाराशरस्मृती इत्यादी मुख्य आहेत. याज्ञवल्क्य स्मृतीवर एक प्रसिद्ध टीका आहे. त्याचे नाव 'मिताक्षरा' आहे. त्यात उपरोक्त विषयाचे स्पष्ट विश्लेषण आहे.

'हिंदू लॉ' च्या निर्मितीत स्मृतींची खूप मदत झाली आहे. जेव्हा भारतात 'ईस्ट इंडिया कंपनी' चे शासन होते तेव्हा भारताची राजधानी 'कलकत्ता' होती. 'सर विलियम जोन्स' नावाचे सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश होते. यांनी 'हिंदू लॉ' तयार करताना विशेषत्वाने संस्कृतचा अभ्यास केला. स्मृतिग्रंथांचा आणि अन्य साहित्याचा त्यांनी गाढा अभ्यास केला. त्यामुळे 'हिंदू लॉ' ची निर्मिती झाली.

मनुस्मृती ही वैदिक धर्मातील ब्राह्मण परंपरेचे मार्गदर्शन करते. राधा कुमुद मुखर्जींच्या मते तैत्तिरीय आणि मैत्रायणी संहितेत तसेच छांदोग्योपनिषदात मनुचा उल्लेख नियम निर्धारित करणाऱ्याच्या रूपात केलेला आहे.[५]

रामायण - महर्षी वाल्मिकींनी रचलेले असल्याने हे महाकाव्य 'वाल्मिकी रामायण' या नावाने प्रसिद्ध आहे. हे संस्कृत साहित्यातील एक अत्यंत प्रसिद्ध महाकाव्य आहे. ह्याला लौकिक साहित्याचे 'आदि काव्य' मानलेले आहे. ब्राह्मण धर्म आणि

संस्कृतीमध्ये ह्याला एक उच्चस्थान प्राप्त झालेले आहे. कर्मांची शुद्धी इत्यादींना रामायणामध्ये आचरणाची प्रमुख अंगे मानलेले आहे.

या ग्रंथात अयोध्यापती दशरथांचा पुत्र, रामाला चरित्रनायक मानून वाल्मिकींनी जीवनाच्या विविध भागांवर सुंदर प्रकाश टाकला आहे. तो आज सुद्धा जनतेसाठी प्रेरणेचा स्रोत आहे. रामाला मर्यादा पुरुषोत्तमाच्या रूपात चित्रित केलेले आहे. एका अत्यंत न्यायप्रिय राजाच्या रूपात त्याचे चित्रण केलेले आहे. म्हणूनच महात्मा गांधींनी जेव्हा अहिंसेने स्वातंत्र्याची चळवळ सुरू केली तेव्हा त्यांनी 'रामराज्य' आणण्याची कल्पना केलेली होती. त्यांचे लक्ष्य असे होते की भारतात न्यायनीतियुक्त, सुखशांतिदायक, नैतिक नियमांवर आधारित असे राज्य असावे जसे रामाचे होते.

महाभारत - हे भारतीय साहित्यातील एक अद्‌भूत संस्कृत महाकाव्य आहे. ह्याच्यात जवळजवळ लाखांपेक्षा अधिक श्लोक आहेत. ह्या महाकाव्याचा नायक अर्जुन आहे. ह्याची रचना महर्षी वेदव्यास त्यांनी केलेली आहे. त्यांनी मोठ्या गर्वाने सांगितले आहे की,

'जे या ग्रंथात आहे ते सर्वत्र (धार्मिक साहित्यात) आहे. जे यात नाही ते कुठेही नाही.'

पुढे त्यांनी लिहिले आहे की, 'यद् भारते, तद् भारते, यद् न भारते, तद् न भारते'

म्हणजे जे महाभारतात आहे तेच ह्या भारतवर्षात आहे आणि जे महाभारतात नाही ते भारतवर्षात सुद्धा नाही. ह्याचे तात्पर्य असे की महाभारतात ते सर्व काही आहे जे भारतीय साहित्यात आहे. व्यासांची ही दंभोक्ती नाही. महाभारत वास्तविक हिंदू धर्माचा विश्वकोश आहे.

पुराण - पुराणांमध्ये हिंदू धर्माच्या ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक इत्यादी सर्व सिद्धांतांचा समावेश आहे. सामान्यतः वायुपुराणाला सर्व पुराणात प्राचीन मानले जाते.

वायुपुराण, विष्णुपुराण, अग्निपुराण, मत्स्यपुराण, ब्रह्मपुराण, नारदपुराण, शिवपुराण, कर्मपुराण, भागवतपुराण, गरुडपुराण, ब्रह्मवैवर्त पुराण, इत्यादी विशाल पुराण साहित्य आहे. यात वैदिक पारंपरिक जीवनावर प्रकाश टाकला आहे.

वैदिक काळात मनुष्य जीवन चार भागात विभागलेले होते. त्यालाच 'आश्रम' अशी संज्ञा आहे.

(१) ब्रह्मचर्याश्रम (२) गृहस्थाश्रम (३) वानप्रस्थाश्रम (४) संन्यासाश्रम.

मानव समाज ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार भागात विभागलेला होता. वर्ण अथवा जाती जन्मावर आधारलेल्या होत्या. उपनिषद् काळापूर्वी वैदिक धर्मात ब्राह्मणांचे प्रभुत्व स्पष्ट रूपात जाणवत होते.

८. श्रमण संस्कृती

वैदिक संस्कृतीप्रमाणे श्रमण संस्कृतीच्या रूपात एका प्रमुख संस्कृतीचा विकास आणि विस्तार झाला. ज्याच्यात बौद्ध आणि जैन धर्माचा समावेश आहे. ही संस्कृती समतामूलक असल्याने हिला श्रमण संस्कृती म्हणतात. श्रमण शब्दाचा मूळ प्राकृत शब्द 'समण' आहे, त्याची तीन संस्कृत रूपांतरे होतात.

समन, श्रमण आणि शमन.

समन - हा शब्द समतेचे प्रतीक आहे.

श्रमण - ह्या शब्दाचा अर्थ पुरुषार्थ, उद्यम, पराक्रम, परिश्रम अथवा मेहनत असा आहे.

शमन - हा शब्द 'वैराग्य' अथवा 'निर्वेद' यांचा द्योतक आहे.

जो सर्व जीवांना स्वतःप्रमाणेच समजतो, ज्याची भावना 'आत्मवत् सर्वभूतेषु' अशी असते, तो श्रमण होय. श्रमण संस्कृती तपप्रधान असल्याने श्रममूलक आहे. तेथे सांसारिक भोगाला महत्त्व नाही. तो समतेवर आधारित आहे. तेथे जाती, वर्ण, वर्ग व लिंग इत्यादी भेदाला कोणतेही स्थान नाही.

श्रमण भगवान महावीरांनी सांगितले आहे की, ''जन्माने कोणीच उच्च-नीच होत नाही तर कर्माने होतो.'' मनुष्य समभावाने श्रमण होतो, ब्रह्मचर्य पाळल्याने ब्राह्मण होतो, ज्ञान प्राप्त केल्याने मुक्त होतो, आणि तप केल्याने तापस होतो.[६]

जो चांगले कर्म करतो तो उत्तम आणि जो नीच कर्म करतो तो अधम अशी ही जैन संस्कृती आहे.

महात्मा बुद्धांनीसुद्धा असे सांगितले आहे की, ''जो व्रतयुक्त आहे, सत्यभाषी

आहे, इच्छा व लोभाने रहित आहे, तो लहान मोठ्या पापाचे शमन करतो तो श्रमण आहे.[७]

९. श्रमण संस्कृतीच्या मुख्य दोन धारा

श्रमण संस्कृतीच्या मुख्य दोन धारा आहेत - अ) जैन संस्कृती, ब) बौद्ध संस्कृती

९ अ) जैन संस्कृती

श्रमण संस्कृतीची एक शाखा जैन धर्माच्या रूपात विकसित झाली. जैन धर्माचा ऐतिहासिक दृष्टीने जितका पाहिजे तितका खोलवर अभ्यास अजून झालेला नाही. म्हणून त्यासंदर्भात अनेक भ्रामक कल्पना दृढ झाल्या आहेत. काहीजण तर असे मानतात की, ज्याप्रमाणे बौद्ध धर्माची संस्थापना बुद्धांनी केली, त्याचप्रमाणे जैन धर्माचे प्रवर्तन भगवान महावीरांनी केले. काही विद्वान भगवान पार्श्वनाथांच्या कालखंडापर्यंत पोहोचले. परंतु त्याच्यापूर्वी जैन धर्माचे अस्तित्व त्यांनी मानलेले नाही. ह्या संदर्भात डॉ. हर्मन जेकोबी इत्यादी पाश्चात्य विद्वानांनी विशेष संशोधन केले, आगम ग्रंथांचा अभ्यास केला. भारतीय विद्वानांनीसुद्धा तटस्थ भावनेने जेव्हा सूक्ष्मरूपात अध्ययन केले तेव्हा त्यांनी हे स्वीकारले की, जैन धर्मात भगवान पार्श्वनाथांच्या अगोदर बावीस तीर्थंकर होऊन गेले. त्यांपैकी पहिले तीर्थंकर ऋषभदेव होत.

जैन परंपरा तर ह्याच्यासुद्धा पुढे जाते. ह्या चोवीस तीर्थंकरांप्रमाणे त्यांच्या अगोदरसुद्धा अनेक वेळा चोवीस तीर्थंकर होऊन गेले. यावरून हे सिद्ध होते की, जैन धर्म अनादी आहे. त्याचा आरंभ आपल्याला सांगता येणार नाही. परंतु भगवान महावीर ह्या युगाचे अंतिम तीर्थंकर होते. साधू, साध्वी, श्रावक, श्राविकारूप संघाला तीर्थ म्हणतात आणि या चार तीर्थांची स्थापना जे करतात त्यांना तीर्थंकर म्हणतात. जेव्हा साधना परिपक्व होते तेव्हा ज्ञानावरणीय, दर्शनावरणीय, मोहनीय आणि अंतराय कर्माचा क्षय झाल्याने ते वीतराग, सर्वज्ञ, केवली होतात तेव्हा ते धर्मोपदेश देतात.

असे म्हटले जाते की भगवान महावीरांची देशना अर्धमागधी प्राकृतमध्ये होत होती. त्यांची वाणी आर्य-अनार्य, द्विपद, चतुष्पद, मृग, पशू, पक्षी, सरीसृप इत्यादी सर्व प्राण्यांसाठी आपल्या आपल्या हितकारी, कल्याणकारी सुखद भाषेत परिणत होत होती. तीर्थंकरांच्या चौतीस अतिशयामधील भाषेचा एक अतिशय आहे.[८] अतिशय म्हणजे विशेषता.

'जिना'च्या वाणीला अथवा उपदेशाला 'आगम' म्हणतात. जिन त्यांना म्हणतात- जे राग, द्वेषांना जिंकतात. 'राग-द्वेषं जयति इति जिनः', ज्यांना कुणाच्याही प्रती राग, द्वेष वाटत नसतो ते 'जिन' होत आणि त्यांच्याद्वारे प्रतिपादित मार्गाचे नाव 'जैन' आहे.

जर ऐतिहासिक दृष्टीने पाहिले तर जैन धर्म पूर्वी ह्याच नावाने प्रचलित नव्हता तर जैन धर्मासाठी 'निर्ग्रन्थ प्रवचन' शब्दाचा उपयोग केला जात होता. जैन आगमात 'निग्गंथ' शब्द प्रसिद्ध आहे. निग्गंथ शब्दाचे संस्कृत रूप निर्ग्रन्थ आहे. 'निर्ग्रन्थ' म्हणजे (धन, धान्य इत्यादी) बाह्यग्रंथी आणि (मिथ्यात्व, अविरति आणि क्रोध, मान, माया, लोभ इत्यादी) आंतर-ग्रंथी अर्थात बाह्यांतर परिग्रहाने रहित संयमी साधूला 'निर्ग्रंथ' म्हटले जात होते. त्यांनी सांगितलेल्या सिद्धांताला 'निग्रंथ प्रवचन' म्हटले जाते.

आवश्यक सूत्रात 'निग्गंथं पावयणं' शब्द आला आहे.[९] पावयणं शब्दाचा अर्थ 'प्रवचन' होतो. ज्यात जीवाजीव इत्यादी पदार्थांचे आणि ज्ञान, दर्शन इत्यादी रत्नत्रयाच्या साधनेचे यथार्थ रूपात निरूपण केले जाते. शास्त्रानुसार बिंदुसारापूर्वीपर्यंतचे ज्ञान निर्ग्रंथ प्रवचनामध्ये समाविष्ट झाले आहे.[१०]

'निर्ग्रंथ' आणि 'जिन' शब्दाचा अर्थ सारखाच आहे. 'प्रवचन' शब्दाचा अर्थ 'उपदेश' आहे. 'निर्ग्रंथ प्रवचन' म्हणजे 'वीतराग वाणी' असा अर्थ होतो. निर्ग्रन्थ प्रवचनच पुढे जाऊन जैन धर्माच्या नावाने प्रसिद्ध झाले आहे.

जैन आगम प्राचीन ग्रंथ आहेत, त्यात वर्तमान अवसर्पिणी काळाचे अंतिम तीर्थंकर श्रमण भगवान महावीरांचा उपदेश समाविष्ट आहे. भगवान महावीरांच्या आचार-विचारांचा संग्रह ज्याच्यात आहे त्याला द्वादशांगी वाणी म्हणतात. ज्याचे संकलन, आकलन गणधरांनी केले आहे ते अंगसूत्राच्या रूपात व्यवस्थित आहे. 'अंगसूत्राला' समवायांग सूत्रात 'गणिपिटक' म्हटले आहे. ज्यांच्यामध्ये गुणांचा समुदाय असतो अशा आचार्यांना 'गणि' म्हणतात आणि पिटक म्हणजे पेटी, मंजूषा, पेटारा असा अर्थ होतो. अशाप्रकारे श्रुतरत्नांच्या पेटीला गणिपिटक म्हणतात.[११]

अकरा अंग, बारा उपांग, चार मूळ, चार छेद आणि एक आवश्यक सूत्र अशाप्रकारे बत्तीस आगमांना स्थानकवासी आणि तेरापंथी परंपरेचे अनुयायी मानतात. श्वेतांबर मूर्तिपुजक 'निर्युक्ति आणि प्रकीर्णक' या ग्रंथांना मिळवून पंचेचाळीस आगम मानतात. दिगंबर समाजाची अशी मान्यता आहे की सगळ्या आगमांचा विच्छेद झाला

आहे; मूळ आगम ग्रंथ नष्ट झालेले आहेत.

९ब. बौद्ध संस्कृती आणि साहित्य

बौद्ध धर्माचे संस्थापक कपिलवस्तूचे राजकुमार तथागत बुद्ध होते. जे भगवान महावीरांचे समकालीन होते. जन्म, जरा (वृद्धत्व), मृत्यू यांपासून मुक्ती मिळवण्याच्या शोधात त्यांनी संसाराचा त्याग केला. जेव्हा त्यांना ज्ञान प्राप्त झाले तेव्हा 'बुद्ध' नावाने प्रसिद्ध झाले.

गौतम बुद्धांनी आपला उपदेश त्या काळातील लोकभाषा- पालीमध्ये दिला. पालीभाषा मागधी प्राकृतचे विकसित रूप आहे. त्यांचा उपदेश तीन पिटकामध्ये संग्रहित आहे. ते (१) विनयपिटक (२) सुत्तपिटक (३) अभिधम्म पिटक नावाने प्रख्यात आहेत.

(१) विनय पिटकामध्ये भिक्षू आणि भिक्षुणींच्या आचरणाचे वर्णन आहे. बौद्ध धर्मात आचाराला 'विनय' म्हणतात.

(२) सुत्तपिटकामध्ये बौद्ध धर्माचे सिद्धांत संक्षिप्त रूपात वर्णिलेले आहेत.

(३) अभिधम्मपिटकामध्ये तत्त्वाचे दार्शनिक व गूढ विवेचन आहे. त्याचे तात्त्विकदृष्टीने फार महत्त्व आहे. जे भिक्षू अभिधम्मपिटकाचे शिक्षक होते त्यांचा संघात फार सन्मान होत असे. त्यांचा सत्संग आणि चातुर्मास प्राप्त होणे हे मोठ्या भाग्याचे मानले जात असे.

उपरोक्त तीनही पिटकांवर आचार्यांनी व्याख्येची रचना केली आहे.

बौद्ध धर्माचे हीनयान आणि महायान असे मुख्यतः दोन संप्रदाय आहेत. हीनयान प्राचीन आहे, महायानाच्या रूपात पुढे त्याचा विकास झाला. हीनयान संप्रदायात स्वकल्याणावर अधिक भर दिलेला आहे. ह्याच्यात साधकाच्या तीन भूमिका मानलेल्या आहेत.

(१) स्रोतापन्न (२) सकृत आगामी (३) अनागामी

स्रोतापन्न त्याला म्हणतात, 'जो धर्माच्या प्रवाहात प्रवेश करतो अर्थात धार्मिक श्रद्धा स्वीकरतो. जो स्रोतापन्न होऊ शकत नाही त्याला बौद्ध धर्मात 'पृथक् जन' म्हणतात.

जो साधक साधनेद्वारा अशा स्थितीला प्राप्त होतो, त्याला केवळ एकदाच

या भवसागरात यावे लागते, त्यानंतर त्याला निर्वाण प्राप्त होतो त्याला 'सकृत आगामी' म्हणतात.

जो साधक आपल्या साधनेत इतक्या उच्च पातळीवर चढतो की तो त्याच जन्मी मुक्त होतो, ज्याला पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही त्याला 'अनागामी' म्हणतात.

महायानामध्ये स्वकल्याणबरोबरच परकल्याण अथवा करुणेवर जास्त भर दिला आहे. त्यांच्यामते करुणेशिवाय कोणी निर्वाण प्राप्त करू शकत नाही. प्राण्यांवर दया करण्यासाठी तथागत बुद्ध अनेक रूपात जन्म घेतात. जातककथेत याचे विस्तृत वर्णन आहे.

महायानामध्ये महाकरुणेबरोबर महाशून्य तत्त्वाचा स्वीकार केला गेला आहे. ही ज्ञानाची परमोच्च दशा आहे. महायानामध्ये अनेक संस्कृत ग्रंथांची रचना झालेली आहे. ह्यात दार्शनिक दृष्टीने अनेक वादांचा उद्‌भव आणि विस्तार झाला. दिङ्नाग, नागार्जुन, धर्मकीर्ती, वसुबन्धू इत्यादी अनेक विद्वान आचार्य झाले, ज्यांना भारतीय साहित्यात फार महत्त्व आहे.

हीनयान नाव पूर्वी नव्हते. महायान पंथातील लोकांनी केवळ स्वकल्याणासंबंधी साधना पद्धतीला महायान म्हटले. त्यांनी त्यांना आपल्यापेक्षा हीन अथवा न्यून दाखवले. पुढे हेच नाव रूढ झाले. महायानी पाली तिपिटकावर विश्वास ठेवतात.

बौद्ध धर्मात आराधनेच्या दृष्टीने मध्यम प्रतिपदेला स्वीकारले गेले आहे. त्याचा अर्थ- मध्यम म्हणजे मधला मार्ग. बुद्धांनी अधिक भोग किंवा अधिक त्याग न करता मध्यम मार्गाचा स्वीकार केला. त्यांच्याद्वारे उपदिष्ट मार्गाला 'अष्टांगिक मार्ग' म्हणतात.

करुणा, दया, सेवाभाव इत्यादींचा बौद्धधर्मात उत्तरोत्तर विकास होत गेला. धर्मसाधनेच्या सरलतेमुळे बौद्ध संघाचे सांसारिक सदस्य धार्मिक पुरोहितापासून वेगळे राहिले.

१०. श्रमण परंपरेचे अन्य संप्रदाय

जैनपरंपरा आणि बौद्धपरंपरा यांच्याशी मिळता-जुळत्या श्रमण धर्माच्या अनेक शाखा भूतकाळात होत्या, ज्या भगवान महावीर आणि बुद्धांच्या वेळी प्रचलित होत्या. त्यांचे सिद्धांत महावीर आणि बुद्धांच्या सिद्धांतांबरोबर जुळत नव्हते. परंतु जीवनचर्या आणि तपाचरण इत्यादींची अशी विशेषता होती की त्याच्यामुळे त्यांचा समावेश

श्रमण परंपरेत होत होता.

त्या परंपरेतल्या काही आचार्यांचा इथे निर्देश केलेला आहे.

आचार्य पुरणकश्यप - जे सैद्धांतिकवादी होते. सैद्धातिकवाद 'सूत्रकृतांग' सूत्रात वर्णित अक्रियावाद, अकारकवाद इत्यादी बरोबर जुळणार आहे. त्यांचे मत असे आहे की शुभ कार्याने पुण्य आणि अशुभकार्याने पाप घडते असे काही नाही.

आचार्य मंखली गोशालक - यांचे वर्णन भगवती सूत्राच्या पंधराव्या शतकात विस्तृत रूपात आले आहे. तो काही काळापर्यंत भ. महावीरांचे शिष्य बनून राहिला. परंतु नंतर स्वतंत्रपणे विचरण करू लागला. तो स्वतःला तीर्थंकर म्हणत होता. भ. महावीरांच्याबरोबर संघर्ष करत होता, आणि नियतिवादाला मानत होता. तो उत्थान, कर्म, बल, वीर्य, पौरुष आणि पराक्रमाचे अस्तित्व मानत नव्हता. त्याचे मत होते की जे काही होत आहे ते सर्व तेच होते जशी नियती आहे.

आचार्य अजीत केसकंबली - दानादिंना हे आचार्य वेडेपणा समजत होते. आत्म्याच्या आस्तित्वाला सुद्धा ते स्वीकारत नव्हते.

पकुध कच्चायन नावाचे एक आचार्य होते. ते अज्ञेयवादी होते.

संजय वेलट्ठीपुत्र हे विक्षेपवादी होते.

उपरोक्त सर्व धर्माचार्य - धर्मनायक स्वतःला 'अर्हत' म्हणवत होते. परंतु त्यांचे सिद्धांत अव्यवस्थित आणि असंतुलित होते.

इथे एक प्रश्न उपस्थित होतो की जर हे जैन किंवा बौद्ध दोन्ही संप्रदायात समाविष्ट होत नाहीत तर त्यांना श्रमण परंपरेत का घेतले ? इथे हे समजण्यासारखे आहे की श्रमण शब्दात 'श्रम' शब्द महत्त्वपूर्ण आहे. तो उद्योगी, अध्यवसाय अथवा परिश्रमाचा वाचक आहे, ज्याच्या अंतर्गत वैराग्य, तितिक्षा, तपस्या इत्यादींचा सहज समावेश होतो. उपरोक्त श्रमणांचे जीवन घोर तपमय होते. ते बाह्य सुखसुविधेच्या आकर्षणापासून खूप लांब होते. स्वतः प्रयत्नपूर्वक कष्ट सहन करत होते. म्हणून ते श्रमणपरंपरेच्या अंतर्गत समाविष्ट होतात. त्यांना इतर कोणत्याही परंपरेबरोबर जोडता येणार नाही. ते बाह्य शुद्धी, कर्मकांड इत्यादींना महत्त्व देत नव्हते. तपस्येत अग्रगण्य राहत होते. निर्भयपणे कष्ट करत होते.

ह्या संप्रदायाच्या संबंधी विशिष्ट शोध करण्याची फार आवश्यकता आहे.

प्राचीन इतिहास, धर्म आणि दर्शनांच्या संशोधकाने ह्या विषयावर जर काही प्रयत्न केला तर सारस्वत क्षेत्रामध्ये फार मोठी उपलब्धी होऊ शकते.

११. जैन परंपरेचे सात निह्नव

श्रमण भगवान महावीरांच्या काळात जैन, श्रमण परंपरेमध्येही अनेक निह्नव होते. ह्यात सात निह्नव मुख्य आहेत, जे यत्किंचित सैद्धांतिक भेदामुळे जैन संप्रदायातून वेगळे झाले. त्यांना निह्नव म्हटलेले आहे. श्रमण भगवान महावीरांच्या तीर्थामध्ये सात प्रवचन निह्नव होते असे मानले जाते.[१२]

बहुतरवाद

ह्या वादाचे संस्थापक 'जमाली' मानले जातात. ते भगवान महावीरांचे जावई होते, ज्यांनी पाचशे पुरुषांसमवेत दीक्षा घेतली. त्यांनी ध्यान आणि तपाची उत्कृष्ट आराधना केली. परंतु त्यांचा भगवान महावीरांच्या 'चलयमाने चलीये, उदीर्यमाने उदिरिये' या वचनाबरोबर विरोध झाला. जमालीचे मत होते की भगवान जे क्रियमानाला 'कृत' म्हणतात ते बरोबर नाही, क्रियमान अकृत आहे. कार्य केले जात आहे पण केलेले नाही हा सिद्धांत बरोबर आहे. भगवान क्रियमानाला कृत म्हणत होते हा सिद्धांत जमलिला बरोबर वाटला नाही. जमलीच्या सिद्धांताला बहुतरवाद म्हटले गेले कारण ते बहु म्हणजे फार वेळा नंतर अर्थात कार्याची निष्पत्ती कार्य पूर्ण झाल्यानंतर मानत होते.

जीव प्रादेशिक वाद

ह्या वादाचे संस्थापक 'तिष्यगुप्त' दुसरे निह्नव मानलेले आहेत. त्यांचे गुरू 'आचार्य वसु' चतुर्दश पूर्वधर होते. तिष्यगुप्त गुरूजवळ आत्मप्रवाद पूर्व वाचत होते. त्यात भगवान महावीर आणि गणधर गौतमस्वामींचा वार्तालाप आलेला आहे. गौतमस्वामीने भगवान महावीरांना विचारले की, ''जीवाच्या एक प्रदेशाला जीव म्हणतात का ?'' भगवान महावीरांनी उत्तर दिले, ''नाही.'' तेव्हा गौतमस्वामींनी पुन्हा विचारले, ''दोन, तीन अथवा संख्यात कमी जीवाच्या प्रदेशाला जीव म्हटले जाते का ?'' भगवान म्हणाले, ''गौतम, तसे म्हणता येणार नाही. एक प्रदेश जरी कमी असला तरी जीव म्हणता येणार नाही परंतु असंख्यात प्रदेशमय चैतन्य पदार्थाला 'जीव' म्हणणे योग्य आहे.'' हे ऐकून तिष्यगुप्तांना शंका येते. त्यांनी हा सिद्धांत मान्य केला की, शेवटच्या प्रदेशाशिवाय जीवाचे बाकीचे प्रदेश जीव नाही म्हणजे शेवटचा प्रदेशच वास्तविक

जीव आहे. आचार्यांनी त्याला समजाविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना ते समजले नाही. त्यांना संघातून वेगळे केले गेले. तिष्यगुप्तांचा हा सिद्धांत 'जीव प्रादेशिक वाद' म्हणून ओळखला गेला. परंतु मित्रश्री श्रमणोपासकांनी समजवल्यानंतर त्यांना आपली चूक समजली व ते पुन्हा महावीरांच्या संप्रदायात संमिलित झाले.

अव्यक्त वाद

'आषाढ' नावाचे आचार्य होते. त्यांच्या शिष्यांचा योगसाधनेचा अभ्यास चालू होता. आचार्यांना अचानक मृत्यू झाला. देवरूपात ह्यांनी विचार केला, आपल्या शिष्यांची साधना अपूर्ण राहिल. म्हणून त्यांनी पुन्हा स्वतःच्या शरीरात प्रवेश केला. शिष्यांच्या योगसाधनेचा अभ्यास पूर्ण झाल्यावर आचार्य देवरूपात प्रकट झाले आणि सांगितले की, ''श्रमणांनो मी असंयमी असतानाही संयमी जनांचे वंदन (नमस्कार) स्वीकारले म्हणून मला क्षमा करा.'' इतके सांगून देव स्वस्थानी निघून गेले. साधूंना ही शंका आली की कोण साधू आहे, कोण देव आहे, काहीच निश्चितपणे सांगता येत नाही. सर्व काही अव्यक्त आहे. ह्या सिद्धांताला 'अव्यक्तवाद' म्हटले गेले.

हा वाद अथवा सिद्धांत आचार्य आषाढांमुळे पसरला म्हणून काही लोकांच्या मतानुसार आषाढ ह्याचे प्रवर्तक आहेत. परंतु तसे पाहिले तर ह्या वादाचे प्रवर्तक त्यांचे शिष्य होते.

सामुच्छेदिक वाद

'कौडिन्य' नावाचे एक आचार्य होते. त्यांचे शिष्य अश्वमित्र त्यांच्याजवळ 'पूर्वा'चे ज्ञान शिकत होते. त्यात पर्यायवादाचा विषय आला. त्यात असे वर्णन आलेले आहे की क्षणाक्षणात पर्याय बदलतात. अश्वमित्राला हे योग्य वाटले नाही. त्यांनी एकांत सामुच्छेदाला स्वीकारले. समजावूनही जेव्हा त्यांना समजले नाही तेव्हा त्यांना संघातून बाहेर काढले. त्यांचा सिद्धांत 'सामुच्छेद' नावाने ओळखला गेला.

द्वैक्रियावाद

'धनगुप्त' नावाचे आचार्य होते. त्यांचे शिष्य गंगमुनी होते. ते शरदऋतूत स्वतःच्या गुरूला वंदन करण्यासाठी जात होते. रस्त्यात उल्लुका नावाची नदी होती. ती पार करत असताना डोक्यावर सूर्याच्या उष्णतेचा अनुभव होत होता आणि पायाला नदीच्या पाण्याची शीतलता प्रतीत होत होती. गंगमुनींनी विचार केला की आगमात सांगितले आहे की एकाच वेळी दोन क्रियेचा अनुभव होत नसतो, परंतु मी हे प्रत्यक्षात

पहात आहे की एकाच वेळी उष्णता आणि शीतलता दोघांचा अनुभव येत आहे. ते आपल्या गुरूंजवळ गेले. गुरूंनी त्यांना व्यवस्थित समजावून सांगितले की वास्तविक एकदा एकच क्रिया होते परंतु मनाची गती अत्यंत सूक्ष्म असल्याने दोन क्रियेमध्ये वेगळेपण असूनही त्याचे आपल्याला ज्ञान होऊ शकत नाही. गुरूंच्या मताशी गंगमुनी सहमत झाले नाहीत आणि ते संघातून वेगळे झाले. त्यांनी द्वैक्रियावादाचा प्रसार केला.

त्रिराशिवाद (त्रैराशिकवाद)

'श्रीगुप्त' नावाचे आचार्य होते ते अंतरंजिका नगरीच्या 'भूतगृह' नामक चैत्याच्या नगरीत थांबले होते. त्यांचा रोहगुप्त नावाचा शिष्य त्यांना वंदन करण्यासाठी जात होता. तेथे पोट्टशाल नावाचा एक संन्यासी आपली विद्या दाखवून लोकांना आश्चर्यचकित करत होता. तो दुसऱ्यांना चर्चेसाठी आव्हाने देत होता. आचार्यांनी रोहगुप्ताला आज्ञा केली की, पोट्टशाल परिव्राजकाचे आव्हान स्वीकार. आचार्यांनी त्याला अनेक विद्या शिकविल्या. राजसभेत पोट्टशालाबरोबर रोहगुप्ताचा शास्त्रार्थ झाला. पोट्टशालाने जीव आणि अजीव दोन राशी स्थापन केल्या. रोहगुप्ताने त्याला हारविण्यासाठी जीव, अजीव आणि निर्जीव अशा तीन राशी स्थापल्या आणि पोट्टशालाला पराजित केले. नंतर ते गुरूंजवळ आले. घडलेला वृत्तांत सांगितला. गुरूंनी सांगितले की तुम्ही तीन राशींची चुकीची स्थापना केली आहे. राशी दोनच आहेत. पुन्हा राजसभेत जा आणि ह्या गोष्टीचा प्रतिवाद करा. रोहगुप्त आपल्या गोष्टीवर अडून बसला. गुरूंची आज्ञा मानली नाही. रोहगुप्ताचे गुरू श्रीगुप्त राजसभेत गेले आणि सांगितले. रोहगुप्ताची तीन राशींची स्थापना चुकीची आहे, तरी रोहगुप्ताने स्वतःचा हट्ट सोडला नाही. त्यांना संघातून वेगळे केले. त्यांनी त्रैराशिवादाचा प्रचार केला.

अबद्धिक वाद

'गोष्ठामाहिल' नावाचे सातवे निह्नव होते. 'आर्यरक्षित' नावाचे त्यांचे उत्तराधिकारी दुर्बलिका पुण्यमित्र झाले. एकदा ते आपले शिष्य विंध्यमुनींना कर्मप्रवादचा पाठ देत होते. त्यात दोन प्रकारच्या कर्मांचे वर्णन आलेले आहे ते असे की काही कर्म अशी असतात की जे ओल्या भिंतीवर माती चिकटते तसे चिकटून जातात, संश्लिष्ट अथवा एकरूप होतात. काही कर्म अशी असतात की जे सुकलेल्या भिंतीवर मातीप्रमाणे केवळ आत्म्याला स्पर्श करून विरून जातात, खाली पडतात, कर्म आत्म्याने पृथक् होतात.

गोष्ठामाहिलने हे ऐकले. त्यांनी आचार्यांना सांगितले की आत्मा आणि कर्म जेव्हा एकरूप होतात, तेव्हा ते कधीच पृथक् होत नाहीत, म्हणून हेच मानणे योग्य आहे की कर्म आत्म्याला केवळ स्पर्श करतात, त्याच्याबरोबर एकरूप होत नाहीत. अर्थात त्यांचा आत्म्याशी बंध होत नाही. आचार्यांनी त्यांना दोन्ही स्थितीचे रहस्य समजावून सांगितले, पण गोष्ठामाहिल आपल्या आग्रहावर दृढ राहिले. त्यांना संघातून वेगळे केले गेले. त्यांनी अबद्धिकवादाचा प्रचार केला.

जमालि, रोहगुप्त आणि गोष्ठामाहिल पुन्हा संघात आले नाहीत पण बाकीचे निह्नव प्रायश्चित्त करून जैन संघात सामील झाले. जे जैन संघात सामील झाले नाहीत त्यांचे आस्तित्व जैन संघात कोठेही उल्लेखित नाही. त्यांची कोणतीही परंपरा प्रचलित नाही.[१३]

जे जैन संघात पुन्हा आले त्यांना कशाप्रकारे समजावले गेले, कोणी समजावले इ. सगळे वर्णन उत्तराध्ययन सूत्राच्या विवेचनात प्राप्त होते.[१४]

१२. वर्तमान अवसर्पिणी काळातील चोवीस तीर्थंकर

भारतवर्ष अध्यात्म्याची जन्मभूमी आहे. चोवीस तीर्थंकरांनी ह्या अधात्म प्रधान भूमीवर जन्म घेतलेला आहे. जैन परंपरेत तीर्थंकरांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. 'नमस्कार' महामंत्रात सिद्ध गुणांनी मोठे असतानासुद्धा प्रथम 'अरिहंत' तीर्थंकरांना नमस्कार केलेला आहे. तीर्थंकर सूर्याप्रमाणे तेजस्वी असतात. ते आपल्या ज्ञानाने विश्वाच्या आत्म्याला प्रकाशित करतात. ते मानवतेचे श्रेष्ठ संस्थापक आहेत. ते साक्षात् ज्ञाते, दृष्टे, आत्मनिर्भर आहेत. ते केवलज्ञान व केवलदर्शन प्राप्त झाल्यावरच जनतेला उपदेश देतात.

ऋषभदेव - वर्तमान अवसर्पिणी काळात ह्या पवित्र भूमीवर पहिले तीर्थंकर ऋषभदेव झाले. जैन संस्कृती यांना ह्या अवसर्पिणी काळातील प्रथम राजा, प्रथम साधू, प्रथम जिन-केवली आणि प्रथम धर्मचक्रवर्ती मानते.[१५]

ते नाभिराज कुलकर आणि मरुदेवी महाराणीचे पुत्र होते. त्यांना शंभर पुत्र आणि ब्राह्मी व सुंदरी अशा दोन कन्या होत्या. त्यांनी आपली मोठी मुलगी ब्राह्मीला लिपी ज्ञानाची शिक्षा दिली, म्हणूनच ब्राह्मी लिपीला प्राचीन लिपी मानले आहे. दुसरी कन्या-सुंदरी हिला गणित विद्येचे ज्ञान दिले. मुलगा भरत याला स्थापत्य कला आणि बाहुबलीला चित्रकर्म इत्यादी शिकवले. राजसिंहासनावर बसल्यानंतर त्यांनी गणांची

स्थापना केली. स्त्रियांना चौसष्ठ कला आणि पुरुषांच्या बहात्तर कलांचे प्रतिपादन केले.[१६]

वैदिक साहित्यातही भगवान ऋषभदेवांचा उल्लेख मिळतो ऋग्वेदामध्ये त्यांना युद्धात अजय, महापराक्रमी म्हणून संबोधिले आहे. त्यांना इंद्राने रथ आणि युद्धसाम्रगी भेटस्वरूप दिली होती.[१७]

हठयोगामध्ये हठयोग विद्येचे उपदेष्टाच्या रूपात आदिनाथ प्रभूला नमस्कार केलेला आहे.[१८]

बौद्धांच्या धम्मपदात ऋषभ आणि महावीर ही दोन्ही नावे एकाचवेळी आल्याने असे प्रतीत होते की हे नाव जैन परंपरेच्या प्रथम आणि अंतिम तीर्थंकरांचा सांकेतिक रूपात येथे नामनिर्देश करत आहे.[१९]

भगवान ऋषभदेव संस्कृतीच्या निर्मितीचे सूत्रधार होते. त्यांच्या पूर्वी युगलिक जीवन होते, भोगमूलक दृष्टीची प्रधानता होती, कल्पवृक्षाच्या आधारावर जीवन चालत होते. ह्यांनी कर्म आणि कर्तव्याची सुषुप्त भावना जागृत केली. सामाजिक चेतना आणि लोकदायित्वाच्या भावनेचा उद्‌भव केला. भोगमूलक संस्कृतीच्या ठिकाणी कर्ममूलक संस्कृतीची स्थापना केली. वृक्षवेलीवर अवलंबून राहणाऱ्या लोकांना शेती करणे शिकविले. जड अशा संस्कृतीला कर्माची चेतना दिली. कौटुंबिक जीवनाचा पाया मजबूत केला. विवाहप्रथेचा प्रारंभ केला. कला कौशल्य आणि उद्योगधंद्याची व्यवस्था करून निष्क्रिय जीवनाला सक्रिय व सक्षम बनवले. म्हणूनच वेदामध्येसुद्धा त्यांच्या गुणगौरवाचे गायन केलेले आहे. वेदात त्यांना मानव संस्कृतीच्या उद्धारकाच्या रूपात पूज्य मानले आहे. प्राचीन वैदिकऋषी त्यांच्या महान उपकाराला विसरले नाहीत. त्यांनी मोकळ्या मनाने ऋषभदेवांची स्तुती केली आहे.

'अनर्वाणं वृषभं मन्द्राजिह्व बृहस्पतिं वर्धया नव्यमर्के'[२०]

अर्थात - मितभाषी, ज्ञानी, स्तुत्य, ऋषभाला पूजासाधक मंत्राद्वारे वृद्धिंगत करा, सन्मानित करा.

भगवान ऋषभदेवांना आपल्या सर्वतोमुखी प्रतिभासंपन्नतेने आणि अलौकिक व्यक्तिमत्वामुळे सर्व क्षेत्रात आदर आणि सन्मान प्राप्त झाला. पूर्वायुष्यात आपल्या संसारी कर्तव्यातून निवृत्त होऊन त्यांनी दीक्षा घेतली. त्यांच्याबरोबर चार हजार व्यक्तींनी सुद्धा दीक्षा घेतली. ते जनकल्याणासाठी आणि जीवांच्या रक्षणासाठी पदयात्रा करत

होते. त्यांनी निर्ग्रन्थ-निर्ग्रन्थीणी, श्रमण-श्रमणीला पाच महाव्रत आणि त्यांच्या भावनेचा उपदेश दिला.[२१]

भगवान ऋषभदेवांच्या नंतर तेवीस तीर्थंकार झाले ज्याच्यात १) अजितनाथ २) संभवनाथ ३) अभिनंदन ४) सुमतिनाथ ५) पद्मप्रभू ६) सुपार्श्वनाथ ७) चंद्रप्रभू ८) सुविधिनाथ ९) शीतलनाथ १०) श्रेयांसनाथ ११) वासुपुज्य १२) विमलनाथ १३) अनंतनाथ १४) धर्मनाथ १५) शांतिनाथ १६) कुन्थुनाथ १७) अरहनाथ १८) मल्लिनाथ १९) मुनिसुव्रत २०) नमिनाथ २१) अरिष्टनेमी २२) पार्श्वनाथ २३) महावीरस्वामी आहेत.

ज्यांनी निर्ग्रन्थ प्रवचनाची अथवा जैन धर्माची आपल्या आपल्या काळात देशना दिली - उपदेश दिला. त्याचे वर्णन निरनिराळ्या ग्रंथात प्राप्त होते. विस्तारभयाने इथे ते दिलेले नाही. इथे मात्र भगवान ऋषभदेव, जे वर्तमान युगाचे आदी धर्मप्रवर्तक होते. त्यांचे थोडक्यात विवेचन केले आहे, आणि अंतिम तीर्थंकर भगवान महावीर होते, ज्यांच्याद्वारे समुद्बोधित धर्म आणि संप्रतिष्ठापित चतुर्विध धर्मतीर्थ आजही विद्यमान आहे. त्यांचे संक्षिप्त वर्णन इथे केले जाईल.

१३. २४ वे तीर्थंकर श्रमण भगवान महावीर

वर्तमान जैन संप्रदाय श्रमण भगवान महावीरांबरोबर जोडलेला आहे. श्रमण भ. महावीरांच्या विशेषतेचा आगमसाहित्यात अनेक ठिकाणी उल्लेख झालेला आहे. आगमात त्यांना स्वयंसंबुद्ध, पुरुषोत्तम, पुरुषसिंह, पुरुषांमध्ये पुंडरिक, पुरुषांमध्ये गंधहस्ती, अभयप्रद, चक्षुप्रद आणि शरणप्रद इत्यादी अनेक उपमांनी अलंकृत केले आहे.[२२] त्यांच्या संघात अकरा गणधर आणि अनेक प्रतिभासंपन्न, तेजस्वी, मनस्वी यशस्वी श्रमण होते.

महावीर कालीन सामाजिक स्थिती - भगवान महावीर ज्या काळात होऊन गेले त्याकाळात संस्कृतीच्या विशाल सागरामध्ये विविध विचारधारेचे संमिश्रण झाले होते. संस्कृती कुत्सित आणि बिभत्स स्वरूपाची झाली होती. त्यांच्या अंतःकरणातील लोककल्याणाची भावना विकृत झाली होती. धर्माच्या नावावर कर्मकांड वाढले होते. यज्ञाच्या नावावर मूक पशूंचा बळी दिला जाता होता. वर्णाश्रमव्यवस्था विस्कळीत झाली होती. स्त्रियांना निम्न कोटीचे मानले जात होते. त्यांना सामाजिक प्रतिष्ठेचा कोणताच अधिकार नव्हता. अपरिग्रह आणि अनेकांत भावनेचे स्थान परिग्रह आणि

स्वार्थपरायणतेने घेतले होते. त्याग, तप, संयमाची भावना कमी झाली होती. भोग आणि ऐश्वर्य यांनाच सर्वस्व मानले जात होते. अशाप्रकारे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचे पतन चहूबाजूंनी दिसत होते. अशा परिस्थितीत माणूसकीला जागृत करणे अत्यंत आवश्यकच नव्हे तर अनिवार्य झाले होते.

भगवान महावीरांना सामाजिक परिस्थिती समजली. त्यांनी दीक्षा घेतली. नंतर बारा वर्षापर्यंत कठोर साधना केली आणि अज्ञानाच्या घोर अंधकारात बुडलेल्या मानवांना ज्ञानाद्वारे आलौकित करण्यासाठी 'जगा आणि जगू द्या' याची घोषणा केली.

भगवान महावीरांनी सर्वांना संदेश दिला की सर्व जीव जगण्याची इच्छा ठेवतात. मरण्याची कुणालाही इच्छा नसते, यज्ञाच्या नावाने चालणारी हिंसा आणि त्या हिंसेने घडणारे पाप जनतेला दाखवून खरा यज्ञ आत्म्याला पवित्र करण्यात आहे आणि आत्मा पवित्र करण्यासाठी क्रोध, मान, माया, लोभ इत्यादी कषायांचा परित्याग करणे आवश्यक आहे असा बोध त्यांनी दिला.

सांस्कृतिक विषमता आणि वर्णाश्रमाचा विस्कळीतपणा दूर करण्यासाठी त्यांनी सांगितले की जन्माच्या आधारावर उच्चनीचतेचा निर्णय होऊ शकत नाही, कर्मानेच व्यक्तीची ओळख होते. ह्याचे उदाहरण देताना त्यांनी हरिकेशी चाण्डाळ [२३]आणि सकडालपुत्र कुंभकार[२४] यांसारख्या आत्मसाधना करणाऱ्यांचा उल्लेख केला आहे.

नारी जागरण - नारी जातीच्या उत्थानासाठीसुद्धा त्यांनी जनतेमध्ये नारीच्या प्रती आत्मसन्मान आणि गौरवाची भावना जागृत केली. नारी अबला नसून सबला आहे. ती प्रत्येक कामात समर्थ आणि सक्षम असल्याची जाणीव करून दिली. नारीला त्यांनी केवळ धर्मग्रंथ वाचण्याचा अधिकार प्राप्त करून दिला नाही तर परमोच्च अशा मोक्षाच्या अधिकारी आहेत असे सुद्धा सांगितले. साध्वी चंदनबाला हिला त्यांनी छत्तीस हजार श्रमणींचे नेतृत्व प्रदान केले.

भगवान महावीरांनी स्त्री आणि पुरुषाचे आत्मसामर्थ्य सारखेच आहे असे दाखवून साधनेच्या क्षेत्रात उच्च स्थान प्राप्त करणाऱ्या साधिकेच्या रूपात नारीला उच्च स्थानी प्रस्तुत केले. इतकेच नाही तर स्त्री ही पतित पुरुषाला प्रेमळ उपदेशाने संयम मार्गावर आणणारी, संयमात दृढ करणारी, प्रेरक शक्तीच्या रूपात पुरुषांपेक्षा सुद्धा श्रेष्ठ आहे असे प्रत्यक्ष दाखवून दिले. सती राजिमतिने (राजुल) संयमापासून विचलित झालेल्या रथनेमीला उद्‌बोधित करून आत्मशक्तीचा परिचय दिला, आणि संयमात

त्यांना स्थिर केले. त्यांना तत्त्वज्ञानाचे अमृत पाजून मोक्ष प्राप्तीचे निमित्त बनली.

अनेकान्त दर्शन - भगवान महावीरांनी समन्वय आणि एकतेच्या भावनेला प्रबळ करण्यासाठी अनेकान्त दर्शनाचा उपदेश दिला. कोणत्याही गोष्टीला अथवा सिद्धांताला एकाच दृष्टिकोनातून न पाहणे, अनेकांतवाद होय. भगवान महावीरांनी सांगितले की, 'एक मीच सत्य आहे असा विचार करू नका पण मी जे सांगतो ते सुद्धा सत्य असेल, दुसरे जे सांगतात ते सुद्धा सत्य असेल. त्यामुळे शांत चित्ताने व्यक्तीच्या दृष्टिकोनाचा विचार करा.'

आज विश्वामध्ये जी ओढाताण आणि द्वंद्व आहे ती दृष्टिकोन न समजल्यामुळे आहे. जर भगवान महावीरांच्या अनेकान्त सिद्धांताचे संपूर्ण राष्ट्राने आणि व्यक्तिव्यक्तीने चिंतन केले तर कलहाचे मूळच नष्ट होईल. संस्कृतीच्या रक्षणासाठी आणि सुदृढ बनविण्यासाठी जैन धर्माची ही अत्यंत महत्त्वपूर्ण देणगी आहे.

सदाचाराच्या दृष्टीने भ. महावीरांनी श्रावकांसाठी गृहस्थ धर्म आणि श्रमणांसाठी मुनी धर्माचा उपदेश दिला. प्रवृत्ती आणि निवृत्तीचे सामंजस्य स्थापित केले. ज्ञान आणि क्रिया, स्वाध्याय आणि सामाजिक संतुलन म्हणूनच आवश्यक मानलेले आहे. जैन धर्म एकांत निवृत्तिमूलक नाही, परंतु प्रवृत्तीमूलक सुद्धा आहे असे स्पष्ट केले.

भगवान महावीरांनी संप्रदायवाद, जातिवाद, प्रान्तीयवाद इ. सगळ्या वादांना बाधित करून ''वसुधैव कुटुम्बकम्'' अशी राष्ट्रभावना आणि अनेकात भावनेचा उदारतेने आणि आदराने स्वीकार केला.

प्रत्येक धर्माच्या विकासाचे एखादे विशिष्ट क्षेत्र असते परंतु जैन धर्माची अशी कोणतीही क्षेत्रमर्यादा नाही. तो संपूर्ण विश्वात पसरला आहे. 'विश्वची माझे घर' ही उदात्त भावना जैन धर्माच्या अनेकांत सिद्धांताला पुष्टी देते. म्हणूनच जैन लोक संख्येने जरी कमी असले, त्यांनी धर्मप्रचाराला विशेष महत्त्व दिलेले नसले तरी सुद्धा जैन मत आजही भारतात जिवंत आहे. ह्याच्या ऐतिहासिक तथ्याची व्याख्या करताना श्रीमती स्टीवेन्सनने 'द हार्ट ऑफ जैनिज्म' मध्ये सांगितले आहे की जैनमताचे स्वरूप असे होते की ज्यामुळे आवश्यकता पडल्यावर, आपल्या आवश्यक अंगाद्वारे भयंकर संकटाच्यावेळी आपले रक्षण करण्यात ते सक्षम होते. जैन मताचे अनुसरण करणाऱ्यांनी कधीही स्वतःला त्यावेळी प्रचलित असलेल्या मतापासून वेगळे ठेवले नाही. त्यांनी

नेहमी ब्राह्मणांना आपल्या कौटुंबिक पुरोहिताच्या स्थानी नियुक्त केले. जन्माच्यावेळी सर्व संस्कार करणाऱ्या पुरोहिताला अध्यक्ष रूपात त्यांनी स्वीकारले आणि शुभाशुभ प्रसंगात सुद्धा पुरोहिताकडूनच विधी करण्यासाठी सहकार्य घेतले. पुजा इत्यादींसाठी सुद्धा हे धर्माध्यक्ष रूपात असत. इतकेच नसून त्यांनी आपल्या प्रमुख चरित्रनायकांमध्ये हिंदू देवता राम, कृष्ण इत्यादींसाठी सुद्धा काही स्थान सुरक्षित ठेवले.

जेव्हा संपूर्ण देशावर अत्याचाराचे वादळ आले तेव्हा जैन लोकांना हिंदू धर्माने सहज स्थान दिले. हिंदू धर्माने जैनांचे विशाल हृदयाने सहर्ष स्वागत केले.

असा घनिष्ट संबंध असल्याने विजेत्याला, जैनमत आणि हिंदुधर्मात फारसा फरक दिसून येत नाही.[२५]

भाषा आणि सहित्याच्या दृष्टीने सुद्धा जैन धर्मात समन्वय प्रकट होतो. जैन विद्वानांनी आणि संतांनी प्राकृत आणि संस्कृत भाषेलाच नव्हे तर सर्व भाषांचा स्वीकार करून त्यांना उचित मान दिला.

भगवान महावीरांनी ईश्वराच्या रूपाला एकाधिकार क्षेत्रात न मानता सर्व प्राण्यांच्या आत्म्यामध्ये परमात्म्याचे स्वरूप पाहिले. त्यामुळे सर्व जीव साधनापथावर पुढे जाऊ शकतात. साधनापथाच्या बंधनाला महावीरांनी सोडून टाकले. मोक्षप्राप्तीचा अधिकार स्त्री, पुरुष, उच्च-नीच, सर्वांना समान आहे आणि तो पुरुषार्थाने प्राप्त होतो असा संदेश दिला. त्यांनी भाग्याला विशिष्ट स्थान न देता कर्माची प्रधानता स्वीकारली.

भगवान महावीरांनी संसाराचे स्वरूप दुःखमय दाखवून संयम आणि वीतरागावर भर दिला. याचा अर्थ असा नव्हे की त्यांनी जगात निराशावादाची भावना पसरवून कलाप्रेम कुंठित केले, तर संसार दुःखमय आहे असे दाखविण्यामागे हाच उद्देश होता की जीवात्म्याने अखंड सुख आणि शाश्वत आनंदाच्या प्राप्तीसाठी प्रयत्नशील बनावे. जर केवळ दुःखमय संसाराचे स्वरूप दाखवूनच थांबले असते खऱ्या सुखाचा मार्ग दाखविला नसता तर आम्ही याला निराशावाद म्हटले असते. परंतु महावीरांनी तर मानवाला महामानव, आत्म्याला परमात्मा, जीवाला शिव, नराला नारायण बनविणाऱ्या शक्तीला प्रकट केले.

१४. भगवान महावीरांचा उपदेश आणि श्रुत परंपरा

भगवान महावीरांनी भवसागरातील जीवांच्या उद्‌बोधनार्थ उपदेश दिला. त्यात धार्मिक तत्त्व आणि आचारांचे विवेचन केले. गणधरांनी त्याला सूत्ररूपात संकलित

केले, जे आज आपल्याला आगमांच्या रूपात उपलब्ध आहे. सद्यःस्थितीत भगवान महावीरांचा उपदेशच प्रमाणभूत मानला जातो.

'विशेषावश्यक' भाष्यामध्ये महावीरांच्या देशने संबंधी विशेषरूपाने चर्चा केली आहे. जिनभद्रगणि क्षमाश्रमण लिहितात की, तप, नियम आणि ज्ञानरूपी वृक्षावर आरूढ झालेले अनंतज्ञानसंपन्न केवलज्ञानी, जीवांना बोध देण्यासाठी ज्ञानपुष्पाची वृष्टी करतात. त्याला गणधर बुद्धीरूपी पटलात ग्रहण करतात. त्याचे प्रवचनाच्या रूपात ग्रथन करतात. गणधर तीक्ष्ण बुद्धियुक्त असल्याने आणि बीज बुद्धी इ. ऐश्वर्यसंपन्न असल्याने तीर्थंकरांच्या वाणीला पुष्पवृष्टीच्या रूपात पूर्णपणे ग्रहण करून रंगीबेरंगी पुष्पमाळेप्रमाणे प्रवचनाच्या सूत्र माळेचे गुंफण करतात. पसरलेल्या फुलांना ग्रहण करणे खूप कठीण आहे. परंतु गुंफलेली माळ ग्रहण करणे सोपे असते ते कार्य गणधर सोपे करून देतात.[२६]

तीर्थंकर अर्थरूपात उपदेश देतात म्हणून अर्थागम, गणधर त्याच्या आधारावर सूत्राची रचना करतात. म्हणूनच सूत्रागम आणि ह्या दोन्हींच्या संमिलित रूपाला 'तदुभयागम' म्हणतात. अशाप्रकारे आगमाचे तीन भेद आहेत. गणधर श्रुतकेवली आणि आचार्यांनी ह्या श्रुतपरंपरेचे खूपच प्रयत्नपूर्वक संरक्षण केले आहे.

जवळजवळ दोन हजार पाचशेपेक्षा सुद्धा जास्त वर्षांपूर्वी जिज्ञासू साधक आपापल्या काळातल्या श्रुत साहित्याला आपल्या गुरूच्या मुखातून ऐकून आकलन करत होते. त्यांच्या कंठस्थ पाठांना पुन्हा पुन्हा स्मरण करून लक्षात ठेवत होते. कोठेही मात्रा, अनुस्वार, इत्यादी निरर्थकपणे समाविष्ट होऊ नये अथवा राहून जाऊ नये ह्याची पूर्णपणे दक्षता बाळगत होते कारण त्यावेळी आगमाच्या लेखनाची परंपरा नव्हती. सगळे ध्यानात ठेवणे आवश्यक मानले जात होते.

श्रुतपरंपरा - श्रवणाने जे ज्ञान प्राप्त झालेले असते त्याला 'श्रुत' म्हणतात.

अशाप्रकारे शुद्ध रीतीने संचित श्रुत संपत्ती गुरू आपल्या शिष्यांना, शिष्य पुन्हा आपल्या परंपरेतील शिष्यांना प्रदान करत होते. ही मौखिक श्रुत परंपरा भगवान महावीरांच्या निर्वाणानंतर जवळजवळ हजारवर्षापर्यंत चालत राहिली.

१५. आगम संकलनाच्या तीन वाचना

आगम संकलनाचा प्रथम प्रयत्न - भगवान महावीरांच्या निर्वाणाच्या १६० वर्षानंतर चंद्रगुप्त मौर्याच्या काळात मगध देशामध्ये भयंकर दुष्काळ पडला, त्यामुळे

जैन श्रमण आपल्या सुविधेनुसार इकडे तिकडे निघून गेले. ह्या कारणाने आगम शास्त्राची दुर्दशा झाली. आगमज्ञानाची साखळी विस्कळीत होऊ लागली. दुष्काळ संपल्यावर आ. स्थूलभद्रांनी पाटलीपुत्रामध्ये जैन श्रमणांचे एक संमेलन भरवले. ज्याच्यात विशिष्ट आचार्य आणि बहुश्रुत मुनी एकत्रित झाले. अकरा अंग शास्त्रांचे व्यवस्थित संकलन केले गेले. बाराव्या दृष्टिवादाचे ज्ञाता एकमात्र भद्रबाहु स्वामी होते. ते त्यावेळी नेपाळमध्ये महाप्राण ध्यानाची साधना करत होते.

पूर्वांचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी जैन संघाद्वारे कित्येक साधूंना स्थूलभद्रावरोबर नेपाळमध्ये पाठवले गेले. संघाच्या विनंतीला मान्य करून भद्रबाहूंनी बाराव्या अंगाची वाचना देणे स्वीकारले. मुनी स्थूलभद्रांनी दहा पूर्वापर्यंत अर्थसहित वाचना घेतली. अकराव्या पूर्वाची वाचना चाललेली असताना स्थूलभद्र मुनींनी सिंहाचे रूप घेतले आणि आपल्या साध्वी भगिनीला चमत्कार दाखवले. भद्रबाहू स्वामींना जेव्हा हे माहीत पडले तेव्हा त्यांनी पुढे वाचना देणे बंद केले. परंतु संघ आणि स्थूलभद्र मुनींच्या अत्यंत आग्रहाने आणि पुन्हा पुन्हा विनवणी केल्यावर भद्रबाहूंनी मूळ रूपात शेवटच्या चार पूर्वांची वाचना दिली.[२७]

सारांश हा आहे की प्रथम वाचनेच्यावेळी चार पूर्व वगळता बारा अंग श्रमण संघाच्या हाती लागले कारण स्थूलभद्र जरी सूत्ररूपात चौदा पूर्वाचे ज्ञाता होते परंतु त्यांना चार पूर्वांची वाचना दुसऱ्यांना देण्याची आज्ञा नव्हती. म्हणून स्थूलभद्र पाठाच्या दृष्टीने अंतिम श्रुत केवली होत, अर्थाच्या दृष्टीने अंतिम श्रुतकेवली भद्रबाहूच होते. पाटलीपुत्राच्या संमेलनामध्ये हे आगम संकलनाचे कार्य झाले म्हणून ह्याला ''पाटलीपुत्र वाचना'' म्हटले जाते.

उत्तरोत्तर पूर्वाच्या विशेष पाठकांचा ऱ्हास होऊ लागला. ग्रहण करणे, मनन करणे आणि अनुप्रेक्षा करणे ह्याच्या अभावाने सूत्राचे ज्ञान लुप्त होऊ लागले. लुप्त होण्याचा हा क्रम पुढे वाढतच गेला.

आगम संकलनाचा दुसरा प्रयत्न - वीर निर्वाण ८२७ ते ८४० मध्ये आगमाला सुव्यवस्थित करण्यासाठी एक प्रयत्न झाला. आर्य स्कंदिलच्या नेतृत्वामध्ये मथुरेमध्ये दुसरे संमेलन झाले. ह्याकाळात सुद्धा पहिल्यासारखा भीषण दुष्काळ पडल्याने आगमाची फार क्षती झाली. या संमेलनामध्ये ज्याने जे स्मृतीत होते त्याच्या आधारावर कालिक श्रुताच्यारूपात संकलन केले. हे कार्य मथुरेत झाले म्हणून याला 'माथुरी वाचना'

म्हटले आहे.

जवळ जवळ ह्याचवेळी सौराष्ट्राच्या अंतर्गत वल्लभीमध्ये नागार्जुन सूरींच्या नेतृत्वातसुद्धा श्रमणांचे आगम संकलनाच्या हेतूने संमेलन झाले. असा प्रश्न उपस्थित होतो की एकाचवेळी दोन संमेलने का झाली ? ह्याचे कारण हे असावे की जैन साधू संपूर्ण भारतात पसरले होते. सगळ्यांचे मथुरेपर्यंत पोहचणे शक्य नसेल कारण जैन साधू पादचारी असतात. म्हणून वल्लभीमध्ये सुद्धा वाचना झाली असेल असे वाटते. ह्या संमेलनात ज्या सूत्राचे विस्मरण झाले होते त्याचे उद्धरण केले गेले. विस्मृत स्थानी पूर्व संदर्भानुसार वाचना दिली गेली. ह्याचे नेतृत्व नागार्जुनांनी केले म्हणून ह्या वाचनेला "नागार्जुनिय वाचना' सुद्धा म्हणतात.

उपरोक्त वाचनेला जवळजवळ दिडशे वर्षांपेक्षा जास्त काळ व्यतीत झाला होता. त्यावेळी वल्लभीमध्ये देवर्धिगणि क्षमाश्रमणच्या नेतृत्वात संमेलन बोलावले गेले. श्रमणसंघ एकत्रित झाला.

आगम संकलनाचा अंतिम प्रयत्न लिपीबद्धता - ह्या अंतिम वाचनेमध्ये बहुश्रुतज्ञ श्रमणांनी असे चिंतन केले की आता लोकांची स्मरणशक्ती इतकी चांगली राहिली नाही म्हणून आगम कंठस्थ ठेवणे कठीण आहे. त्यामुळे विशाल ज्ञान सागराला स्मृतीत ठेवणे कठीणच वाटत आहे. आगमांचा त्यामुळे लोप होत आहे. महावीर निर्वाणांच्या हजार वर्षांपर्यंत आगमज्ञान श्रुती परंपरेच्या आधाराने होते परंतु त्यानंतर स्मृती दुर्बलता, गुरुपरंपरेचा विच्छेद, अनावृष्टिचा प्रभाव इत्यादी अनेक कारणामुळे आगम ज्ञानमहासागराचे जल कमी झाले.

श्रुतज्ञान निधीच्या संरक्षणासाठी महानश्रुतज्ञानी 'देवर्धिगणि क्षमा' श्रमणांच्या अद्यक्षतेमध्ये श्रमणसंघ एकत्रित झाला. पूर्वीच्या दोन्ही वाचनांच्या आधाराने आगमाचे संकलन करून त्यात वेगळेपणा म्हणजे पाठांतर आणि वाचनाभेद होते त्यांना व्यवस्थित करून दोन्ही वाचनांच्या सिद्धांताचा परस्पर समन्वय केला गेला. पाठभेद मिटवून एकरूप करण्याचा आटोकाय प्रयत्न केला गेला. जे महत्त्वपूर्ण होते ते पाठांतराच्या रूपात टीका, चूर्णिमध्ये संग्रहित केले. प्रकीर्णक ग्रंथ जे केवल एका वाचनेतच होते ते तसेच्या तसे प्रमाण मानले गेले म्हणूनच मूळ आणि टिकांमध्ये आपल्याला 'वायणंतरे पुण' अथवा 'नागार्जुनीयास्तु पठन्ति'[२८] असा उल्लेख मिळतो.

अशाप्रकारे ह्या संमेलनात आगमज्ञान सुरक्षित आणि संग्रहित करण्यासाठी

सर्व संमतीने आगम लिपीबद्ध केले गेले. हे कार्य 'वीर निर्वाण' सं. ९८० मध्ये झाले (वाचनान्तरानुसार वि. सं. ९९३ मध्ये झाले.)

जिनवाणीला ग्रंथबद्ध करण्याचे हे ऐतिहासिक कार्य वास्तविक आजच्या समग्र ज्ञानपिपासू जनतेसाठी एक अवर्णनीय उपकार आहे. आत्मज्ञानाची प्राचीन ज्ञानधारा प्रवाहित ठेवण्याचा हा उपक्रम वल्लभीच्या प्राचीन नगरीत संपन्न झाला.

१६. आगमाचे अनुयोगामध्ये विभाजन

आचार्य आर्यरक्षितसूरींनी अंग, उपांग, छेद, मूल इ. आगमांचे विषय विश्लेषणाच्या दृष्टीने-

१) चरणकरणानुयोग २) धर्मकथानुयोग ३) गणितानुयोग ४) द्रव्यानुयोग या रूपात चार विभाग केले आहे.

अनुयोग म्हणजे अर्थाबरोबर सूत्राची जी अनुकूल योजना केली जाते ती अथवा सूत्राचा आपल्या अभिधेयात जो व्यापार होतो त्याला अनुयोग म्हणतात.[२९]

१) चरणकरणानुयोग - यामध्ये आत्मविकासाचे मूळ गुण, आचारव्रत, ज्ञान, दर्शन, चारित्र्य, तप, संयम, सेवा (वैयावच्च), ब्रह्मचर्य, कषाय निग्रह इत्यादी आणि उत्तरगुण पिण्डविशुद्धी, समिती, गुप्ती, भावना, प्रतिमा, अभिग्रह, इंद्रियनिग्रह, प्रतिलेखना इत्यादीचे विवेचन आहे.

चरणकरणानुयोगाच्या अंतर्गत आचारांग आणि प्रश्नव्याकरण ही दोन अंगसूत्रे, दशवैकालिक हे एक मूळ सूत्र, निशीथ, व्यवहार, बृहत्कल्प आणि दशाश्रुतस्कंध ही चार छेद सूत्रे आणि आवश्यक सूत्र अशा एकूण आठ सूत्रांचा समावेश होतो.

२) धर्मकथानुयोग - यात कथा, आख्यान, उपाख्यानांद्वारे धार्मिक सिद्धांताचे विवेचन केले आहे. तसेच दया, दान, क्षमा, आर्जव, मार्दव इ. धर्मांच्या अंगाचे विवेचन आहे.

ज्ञाता धर्मकथा, उपासकदशा, अन्तकृतदशा, अनुत्तरौपपातिक दशा आणि विपाक ही पाच अंगसूत्रे, औपपातिक राजप्रश्नीय, निरियावलीका, कल्पावतंसिका, पुष्पिका, पुष्पचूलिका आणि वृष्णीदशा ही सात उपांगसूत्रे, उत्तराध्ययन हे एक मूळ सूत्र अशाप्रकारे एकूण तेरा सूत्रांचा ह्यात समावेश होतो.

३) गणितानुयोग - यामध्ये भूगोल, खगोल इत्यादी विषयांचा आणि

ग्रहांच्या गतीच्या गणिती पद्धतीने विवेचन आहे.

जम्बूद्वीप-प्रज्ञप्ति, चंद्रप्रज्ञप्ति आणि सूर्यप्रज्ञप्ति ह्या तीन उपांगसूत्राचा ह्याच्या अंतर्गत समावेश होतो.

४) **द्रव्यानुयोग** - यामध्ये जीव, अजीव इ. सहा द्रव्ये, नऊ तत्त्वे, यांचे विस्तृत आणि सूक्ष्म विवेचन आहे. याच्या अंतर्गत सूत्रकृतांग, स्थानांग, समवायांग व्याख्या प्रज्ञप्ति ही चार अंगसूत्रे, जीवाजीवाभिगम, प्रज्ञापना ही दोन उपांग सूत्रे आणि नंदीसूत्र व अनुयोगद्वार ही दोन मूळ सूत्रे अशा एकूण आठ सूत्रे येतात.

हे उपरोक्त वर्गिकरण विषय सादृश्याच्या दृष्टीने केलेले आहे. परंतु निश्चित रूपाने हे सांगता येणार नाही की अन्य आगमात इतर अनुयोगाचे वर्णन नाही. उदा. उत्तराध्ययन सूत्रात धर्मकथेबरोबर दार्शनिक तथ्याचे सुद्धा विवेचन आहे. भगवती सूत्र तर अनेक विषयांचा महासागरच आहे. आचारांग यामध्ये सुद्धा वेगवेगळ्या विषयांची चर्चा आहे.

अर्थात काही आगमांना सोडून अन्य आगमात चारही अनुयोगांचे संमिश्रण दिसून येते. येथे जे वर्गीकरण केले आहे ते स्थूलदृष्टीने केलेले आहे.

हे कार्य आगम व्यवस्थेला सरळ बनविण्यासाठी आर्यरक्षित याच्याकडून वीर निर्वाण सं ५९२ वि. सं. १२२ च्या जवळपास संपन्न झाले.

१७. आगमांचे महत्त्व

प्राचीन भारतीय साहित्यात आगम साहित्याचे एक विशिष्ट आणि गौरवपूर्ण स्थान आहे. आगम केवळ अक्षररूपी देहानेच विशाल आणि व्यापक नाहीत तर ज्ञान आणि विज्ञानाचे, न्याय आणि नीतीचे, आचार आणि विचाराचे धर्म आणि दर्शनांचे अध्यात्म आणि अनुभवांचे अनुपम आणि अक्षय कोश आहे. जर आपण भारतीय चिंतनातून काही क्षणासाठी जरी जैन आगम साहित्याला वेगळे करण्याची कल्पना केली तरी भारतीय साहित्याची जी आध्यात्मिक गरिमा आणि दिव्य ज्ञानाची जी उज्ज्वलता, निर्मलता आहे ती निस्तेज वाटू लागेल आणि असे वाटू लागेल की आपण फार मोठ्या ज्ञानकोषापासून वंचित झालो आहोत.

वैदिक परंपरेत जे स्थान वेदाचे आहे, बौद्ध परंपरेत जे स्थान त्रिपिटकाचे आहे. ईसाई धर्मात जे स्थान बायबलचे आहे, ईस्लाम धर्मात जे स्थान कुराणाचे आहे, पारसी धर्मात जे स्थान अवेस्ताचे आहे तेच स्थान जैन परंपरेत आगम साहित्याचे

आहे.

आगमामध्ये वर्णित विषय - जैन आगम साहित्यात जैन श्रमणाचे आचार विचार, व्रत-संयम, तप-त्याग गमन-आगमन, उपवास, प्रायश्चित्त, जीवाजीव इत्यादी नवतत्त्व, कर्म, पुनर्जन्म, आत्मा संसार, मोक्ष इ. विषयाचे वर्णन आहे तसेच लोककथा, धर्मोपदेशाची पद्धती, तत्कालिन राजे-महाराजे इत्यादींचे विवेचन प्राप्त होते.

तीर्थंकरांचा जन्म, दीक्षा इ. पंचकल्याणात्मक त्यांची कठोर साधना, संतजीवन त्यांचे मूळ उपदेश, त्यांची विहारचर्या, शिष्यपरंपरा, आगार धर्म, अनगार धर्म, आर्यक्षेत्राची सीमा, अन्य तार्किक व त्यांची मतमतांतरे इत्यादी संबंध माहिती प्राप्त होते.

वास्तुशास्त्र, ज्योतिषविद्या, भूगोल-खगोल, संगीत, नाट्य, वेगवेगळ्या कला, प्राणीविज्ञान, वनस्पतीविज्ञान इ. अनेक विषयांचे आगमात विस्तृत विश्लेषण केलेले आहे. ह्या सर्व विषयांच्या अध्ययनाने तत्कालिन सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजनैतिक परिस्थितीवर प्रकाश पडतो.

शिक्षणक्षेत्रात अध्यापक आणि विद्यार्थी, विनित-अविनित शिष्य, विद्यार्थी जीवन, लिपी, रितीरिवाज, धार्मिकव्यवस्था, लौकिक देवीदेवता इत्यादींचे वर्णन सुद्धा केलेले आहे.

शेतकरी, गाडीवान, मजूर, व्यापारी, राजा, राजकीय अधिकारी इत्यादींचा सुद्धा प्रसंगानुसार उल्लेख प्राप्त होतो. ह्यावरून हजारो वर्षांपूर्वीच्या भारतीय समाज आणि प्राचीन इतिहास समजण्यासाठी आगम फारच महत्त्वपूर्ण आहेत.

१८. जैन आगमसाहित्याचे दोन विभाग

जैन आगमसाहित्याचे दोन भाग केले जाऊ शकतात.

१) महावीरांच्या पूर्वीचे साहित्य

२) महावीरांच्या नंतरचे साहित्य

महावीरांच्या पूर्वीचे साहित्य आज उपलब्ध नाही परंतु त्याचे प्रमाण प्राप्त होते. कारण महावीरांच्या पूर्वीसुद्धा तीर्थंकर झाले आहेत आणि त्यांच्या विचारांनी सुद्धा आपण जाणतो. महावीरांच्या पूर्वी साहित्य निर्माण झाले म्हणूनच तर 'पूर्व' या नावाने संबोधित झाले आणि त्याचा समावेश 'दृष्टिवाद' नावाच्या बाराव्या अंगसूत्रात झाला. पूर्व चौदा होते.[३०]

महावीरांच्या नंतरचे साहित्य - ज्यात महावीरांचे प्रवचन अथवा सिद्धांत प्रस्तुत केले आहेत हे महावीरांच्या नंतरचे साहित्य होय. महावीरांनी आपल्या धार्मिक व दार्शनिक सिद्धांताचे संकलन केले नाही की त्याला साहित्यिकरूप दिले नाही परंतु त्यांच्या प्रमुख शिष्यांनी तसेच अन्य आचार्यांनी त्यांच्या उपदेशाचे संकलन करून त्याला साहित्यिक रूप दिले आणि त्या आधारावरच त्या साहित्याला दोन भागांमध्ये विभागले गेले.

१) अंग प्रविष्ट - ज्याची रचना (संकलन) गणधर म्हणजे महावीरांच्या प्रमुख शिष्यांनी केली.

२) अंग बाह्य - ज्याची रचना आचार्यांनी केली.

आगम शब्द 'आ' उपसर्ग आणि 'गम्' धातूने निर्मित आहे. 'आ' उपसर्गाचा अर्थ 'समंतात' म्हणजे पूर्ण आणि 'गम्' धातूचा अर्थगती प्राप्ती आहे. वस्तुतत्वाचे पूर्णपणे ज्ञान होते ते आगम आहे.[३१]

जैन आगम साहित्याचे अंग, उपांग, मूळ, छेद प्रकीर्णक इत्यादी विभिन्न भाग आहेत. ज्यात जैन विचारधारा दार्शनिक, धार्मिक, नैतिक इ. भिन्न रूपात प्रवाहीत होते. जैनाचार संपूर्ण जैन साहित्यात पल्लवित आणि पुष्पित होतात. परंतु मूळ स्रोत अंगसूत्र आहे, त्याचे संक्षिप्त विवेचन पुढे केले जात आहे.

१९. आगम अंगांचे संक्षिप्त विश्लेषण

आचारांग सूत्र - आचारांग सूत्राचे अंगसाहित्यात अग्रस्थान आहे. कारण आध्यात्मिक साधना आणि संघ-व्यवस्थेसाठी आचार-व्यवस्थेची अत्यंत आवश्यकता आहे. आचारांगामध्ये श्रमण जीवनाच्या साधनेचे मार्मिक विवेचन आहे. आचारांगनिर्युक्तीमध्ये आचार्य भद्रबाहूंनी स्पष्ट सांगितले आहे की, ''मुक्तीचे निर्व्याध सुख प्राप्त करण्याचे मूळ आचारातच आहे, अंगशास्त्राचे सार, तत्त्व आचारामध्येच आहे.[३२] मोक्षाचे प्रत्यक्ष कारण असल्याने आचार संपूर्ण आगमांची आधारशिला आहे. आचारांग सूत्राच्या प्रथम श्रुतस्कंधात नऊ आणि द्वितीय श्रुतस्कंधात सोळा अध्याय आहेत.

आचारांग चूर्णी आणि वृत्तीमध्ये सांगितलेले आहे की, ''भूतकाळात जे तीर्थंकर होऊन गेले त्या सर्वांनी सर्वप्रथम आचारांग सूत्राचाच उपदेश दिला. वर्तमानकाळात जे तीर्थंकर 'महाविदेह' क्षेत्रात आहेत ते सुद्धा सर्वजण प्रथम

आचारांगाचाच उपदेश देतात. आणि भविष्यकाळात जे तीर्थंकर होतील ते सर्वप्रथम आचारांगाचाच उपदेश देतील. त्यानंतर दुसऱ्या अंगाचा उपदेश दिला जातो गणधर ह्या क्रमानुसारच द्वादशांगीचे गुंफण करतात.[३३]

आचारांगाच्या महानतेचे मुख्य कारण हे सुद्धा आहे की हा सर्वात प्राचीन ग्रंथ आहे. जर्मनीचे डॉ. हर्मन जेकोबी यांनी आपल्या जीवनाचा अधिक काळ प्राकृतभाषा, जैनागम आणि साहित्याच्या गहन अध्ययन यामध्येच घालविला. त्यांनी असे लिहिले आहे की, आचारांग सूत्रात प्राकृतचा जो प्रयोग मिळतो तो प्राचीनतम प्राकृतचे रूप आहे. आचारांग सूत्राला त्यांनी फार महत्त्वपूर्ण मानले आहे.

आचारांगामध्ये असलेले महावीरांच्या जीवनाचे आणि तपाचे वर्णन इतिहासकारांसाठी खूपच उपयोगी आणि प्रामाणिक असे सिद्ध झालेले आहे. ह्याच्या आधारावर आजच्या युगात जैन धर्म आणि महावीरांची ऐतिहासिकता व प्रामाणिकता प्रतिष्ठित झाली आहे. आचारांगसूत्राचे गूढ रहस्य स्पष्ट करण्यासाठी वेळोवेळी व्याख्या करणारे साहित्य निर्माण झालेले आहे. त्या व्याख्या साहित्याला पाच भागात विभक्त केले आहे- १) निर्युक्ति २) भाष्य ३) चूर्णी ४) संस्कृतटीका ५) लोकभाषेत लिहिलेले व्याख्यासाहित्य.

दर्शन अध्यात्म व आचाराची त्रिपुटी म्हणजे आचारांग सूत्र म्हणूनच आगम ग्रंथात सर्वप्रथम स्थान भूषवित आहे.

सूत्रकृतांग सूत्र - हे द्वितीय अंगशास्त्र आहे. ह्याचे दोन श्रुतस्कंध आहेत. पहिल्या श्रुतस्कंधात सोळा व दुसऱ्या श्रुतस्कंधात सात अध्ययने आहेत. दार्शनिक साहित्याच्या ऐतिहासिक दृष्टीने ह्यांचे स्थान आचारांगापेक्षाही महत्त्वाचे आहे. ह्यात महावीरकालीन मतमतांतराचे वर्णन आहे.

सूत्रकृतांग सूत्रात ज्या मतांचा उल्लेख केलेले आहे त्याचा संबंध आचार आणि तत्त्ववाद म्हणजे दर्शनशास्त्राबरोबर आहे. ह्या मतांचे वर्णन विशिष्ट पद्धतीने केलेले आहे. ज्यात पूर्व पक्षाचे मत मांडून नंतर त्याचे खंडन केले आहे. बौद्ध परंपरेच्या अभिधम्म पिटकाची रचनाशैली अशा प्रकारची आहे.

नवीनच दीक्षा घेतलेल्या श्रमणांना संयमात स्थिर ठेवण्यासाठी, त्यांचा आचारपक्ष शुद्ध करण्यासाठी ह्या अंगशास्त्रात जैन सिद्धांताचे विस्तृत वर्णन केलेले आहे. प्राचीन बौद्धिक विचार-दर्शन, जैन-अजैन दर्शन समजण्याच्या दृष्टीने सुद्धा हे आगम

महत्त्वपूर्ण आहे.

ह्या आगमात जीव, अजीव, लोक, अलोक, पुण्य, पाप, आस्रव, संवर, निर्जरा, बंध आणि मोक्षाचे विस्तृत वर्णन आहे. भगवान महावीरांच्या पूर्वीचे आणि महावीर कालीन भारतीय प्रमुख दार्शनिक सिद्धांताचा विचार जसे पंचभूतवाद एकात्मवाद, तद्जीवतद्शरीरवाद, क्षणिकवाद, अक्रियावाद इ. साठी हा ग्रंथ फार उपयोगी आहे.

भाषेच्या दृष्टीने आचारांगाप्रमाणे ह्यातसुद्धा अर्धमागधी प्राकृतच्या प्राचीन रूपाचा प्रयोग केलेला आहे. ह्या आधारावर डॉ. हर्मन जेकोबी इत्यादी विद्वानांनी ह्या आगमाला प्राचीन मानले आहे.

स्थानांग सूत्र - आगम द्वादशांगामध्ये ह्याचे तृतीय स्थान आहे. 'स्थानांग' शब्द 'स्थान' आणि 'अंग' ह्या दोन शब्दांच्या संयोगाने बनला आहे. ह्यात दहा स्थान आहेत. इथे 'स्थान' या शब्दाचा अर्थ 'अध्ययन' असा आहे. ह्या आगमात संख्येच्या क्रमाने पदार्थ आणि तत्त्वांचा उल्लेख आहे उपदेश अथवा सिद्धांताचे विवेचन नाही.

प्रत्येक स्थानाचा आधार तेथे उल्लेखिलेल्या विषयांची संख्या आहे. जसे संसारात जे पदार्थ अथवा तत्त्व आहेत ते पहिल्या स्थानावर आहेत. तसेच दोन, तीन, चार असे दहापर्यंत वर्णन आहे. दहा स्थानामध्ये एकूण ७८३ सूत्रे आहेत.

ह्या सूत्रात एक श्रुतस्कंध आणि दहा अध्ययने आहेत. ह्याची रचना बौद्धांच्या 'अंगुत्तरनिकाय' सारखी आहे. पदार्थाचे गुण, द्रव्य, क्षेत्र, काल आणि पर्याय इत्यादींच्या उल्लेख यात मिळतो. त्याचप्रमाणे पर्वत, नदी, समुद्र, सूर्य, भवन, विमान, निधी, पुरुषांचे प्रकार, स्वर इत्यादींचा संकेत प्राप्त होतो.

आत्मा, पुद्गलज्ञान, नय-प्रमाण इत्यादी दार्शनिक विषयांना सुद्धा ह्यात समाविष्ट केले आहे. भगवान महावीरांच्या शासनकाळात झालेल्या सात विह्नवांचा उल्लेख सुद्धा ह्यात समाविष्ट आहे.

समवायांग सूत्र - हे चतुर्थ अंगसूत्र आहे. स्थानांगाप्रमाणेच समवायांग सूत्राची कोश शैली 'अंगुत्तरनिकाय' सारखी आहे. ह्या आगमात एका सूत्राचा दुसऱ्या सूत्राशी संबंध अवश्य असला पाहिजे असे न समजता संख्यांच्या दृष्टीने जो विषय समोर आला त्याचे संकलन केलेले आहे. समवाय शब्दाचा अर्थ 'संग्रह' असा आहे.

समवायांगामध्ये एक पासून शंभर पर्यंतची संख्या असलेल्या पदार्थांचे वर्णन आहे आणि पुढे कोटी संख्यापर्यंत सुद्धा पदार्थांचे वर्णन आहे. स्थानांगापेक्षा

समवायांगाचे वर्णन संक्षिप्त आहे. स्थानांगामध्ये एका प्रकारच्या पदार्थाचे वर्णन करण्यासाठी अनेक सूत्रे आहेत आणि समवायांगामध्ये एका प्रकारच्या पदार्थाचे वर्णन एकाच सूत्रात आहे. ह्यात जंबूद्विप, घातकी खंड द्विप, पुष्करार्धद्विप आणि पर्वतांचा विस्तार उंची व प्रकार इत्यादींचे वर्णन आहे.

समवायांगामध्ये द्रव्य, क्षेत्र, कल, भाव अशा चतुर्विध दृष्टीने वर्णन केलेले आहे.

द्रव्याच्या दृष्टीने - जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश इत्यादींचे निरूपण आहे.

क्षेत्राच्या दृष्टीने - लोक, अलोक, सिद्धशिला इत्यादींवर प्रकाश टाकला आहे.

काळाच्या दृष्टीने - समय, अवलिका, मुहूर्त इत्यादींपासून पल्योपम, सागरोपम उत्सर्पिणी, अवसर्पिणी, पुद्गलपरावर्तन तसेच चार गतींच्या जीवांची स्थिती इत्यादींचे वर्णन आहे.

भावाच्या दृष्टीने - वर्ण, गंध, रस, स्पर्श, संस्थान इ. अजीव भावाचे वर्णन आहे.

व्याख्याप्रज्ञप्ति (भगवती सूत्र) - द्वादशांगीमध्ये व्याख्याज्ञप्तिचे पाचवे स्थान आहे. प्रस्तुत अंग प्रश्नोत्तर शैलीत आहे. प्रश्नकर्ता गणधर गौतम आणि उत्तर देणारे स्वतः 'भगवान महावीर' आहेत. प्रश्नोत्तर शैलीत ह्या सूत्राची रचना असल्याने ह्याचे नाव 'व्याख्याप्रज्ञप्ति' आहे. ह्यात एक श्रुतस्कंध आणि दहा अध्ययने आहेत. अन्य आगमग्रंथांपेक्षा प्रस्तुत आगम विशाल आहे. विषयवस्तुच्या दृष्टीने सुद्धा ह्यात विविधता आहे. ह्या सूत्रात श्रमण भगवान महावीरांच्या जीवनाचे, त्यांचे शिष्य भक्त, गृहस्थ, उपासक अन्य तीर्थिक आणि त्यांच्या मान्यतेचे विस्तृत वर्णन आहे. तसेच जैन सिद्धांत, इतिहास, भूगोल, समाज आणि संस्कृती इत्यादींचे अत्यंत सुंदर विश्लेषण आहे.

दर्शन, आचार, लोक, परलोक इत्यादी सर्व विषयांची चर्चा ह्या आगमात आहे. क्वचितच असा विषय असेल की ज्याची चर्चा ह्यात नसेल म्हणूनच ह्याला 'ज्ञानाचा महासागर' म्हटले आहे.

ह्या अंगसूत्राची एक विशेषता अशी आहे की ह्या सूत्राच्या सुरुवातीला मंगलाचरण आहे. ह्याच्या अतिरिक्त अन्य कोणत्याही अंग किंवा अंगबाह्य ग्रंथात

मंगलाचरणाचा विशेष पाठ मिळत नाही शेवटी 'श्रुत' देवाचे सुद्धा स्मरण केलेले आहे.

महामंत्र 'नवकार' सर्व प्रथम ह्या अंगसूत्रातच लिपीबद्ध मिळतो. ह्याची रचना बौद्ध 'सुत्तपिटका' सारखी आहे. सुत्तपिटकामध्ये सुद्धा महात्मा बुद्धांना विचारलेले प्रश्न व त्याचे उत्तर संग्रहित आहे. 'गोशालक' जो भगवान महावीरांचा शिष्य होता. परंतु नंतर तो महावीरांच्या सिद्धांताचा विरोधी झाला त्याचे विशेष रूपात वर्णन आहे. भगवान महावीरांकडून गोशालकाला तेजोलेश्येच्या उपद्रवापासून वाचविले जाणे, त्याचे भगवंतांच्या संघातून वेगळे होणे, नियतिवाद सिद्धांताचा प्रचार करणे, भगवान महावीरांवर तेजोलेशी सोडणे, तेजोलेश्या परत फिरून त्याच्या जवळच जाणे व त्याचाच मृत्यू होणे ह्याचे संपूर्ण वर्णन ह्या आगमाच्या पंधराव्या शतकात आहे.

ज्ञाताधर्मकथा - हा धर्मकथा प्रधान सहावा अंगसूत्र आहे. ह्याचे दोन श्रुतस्कंध आहेत प्रथम श्रुतस्कंधामध्ये १९ अध्ययने आहेत आणि दुसऱ्या श्रुतस्कंधामध्ये १० वर्ग आहेत.

पहिल्या श्रुतस्कंधात दृष्टांताच्या आधार अहिंसा, श्रद्धा, इंद्रियविजय इत्यादी अध्यात्मिक तत्त्वाचे सोप्या शैलीत निरूपण केलेले आहे.

दुसऱ्या श्रुतस्कंधात वर्णिलेल्या अधिकांश कुमारीका भगवान पार्श्वनाथांच्या शासनामध्ये दीक्षा घेऊन उत्तरगुणांची भावना केल्याने देवांच्या रूपात उत्पन्न झाल्या परंतु त्यांची विशेषता ही आहे की देव्यांच्या रूपात सुद्धा त्यांचे नाव त्यांच्या मनुष्यजन्मातीलच होते.

उपासकदशांक सूत्र - हे आगम द्वादशांगीचे सातवे अंग सूत्र आहे. ह्यात भगवान महावीर कालिन दहा उपासकांचे पवित्र चरित्र आहे. उपासक शब्द जैन गृहस्थांसाठी वापरला जातो. 'दशा' शब्द दहा संख्येचा वाचक आहे. प्रस्तुत आगमात दहा उपासक आणि दहा अध्ययने असल्याने प्रस्तुत आगमाचे नाव उपासक दशांग आहे. त्यात एक श्रुतस्कंध आहे.

अन्य अंगसूत्रात श्रमण-श्रमणिच्या आचारांचे वर्णन आहे. परंतु प्रस्तुत आगमात श्रावकधर्माचे वर्णन आहे.

श्रमण, श्रमणी, श्रावक, श्राविका हे तीर्थांचे चार स्तंभ आहेत. एका दृष्टीने श्रावक-श्राविकाच, श्रमण श्रमणिच्या आस्तित्वाचे आधार आहेत. श्रावक धर्माचा पाया जितका मजबूत असेल, सत्य, शील, सदाचार, न्याय नीतीवर आधारलेला असेल

तितकाच श्रमण धर्माचा पाया प्रतिष्ठित होईल. त्या दृष्टीने श्रावकांसाठी हे आगम मार्गदर्शन करणारे असल्याने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ह्यात श्रावकाने केलेल्या त्यागाचे, श्रावकव्रताचे, श्रुतग्रहण, तप, शीलव्रत, अणुव्रत, गुणव्रत, प्रतिमा, उपसर्ग, संलेखना, पादोपगमन, देवलोकगमन, पुन्हा मनुष्यलोकात उत्तम कुळाची प्राप्ती, सम्यकत्व धर्माची प्राप्ती आणि अंतक्रिया इत्यादींचे वर्णन आलेले आहे.

ह्याच्या सहाव्या अध्ययनात कुंडकौलिक श्रमणोपासकाचे वर्णन आहे. तेथे मंखलिपुत्र गोशालकाची धर्मप्रज्ञप्ति आणि महावीरांच्या धर्मप्रज्ञप्तिंचे वर्णन आहे. कुंडकौलिकाने दोघांची तुलना करून महावीरांच्या धर्माला स्वीकारले.

सातव्या अध्ययनात शकडालपुत्र कुंभकाराचे जीवनचरित्र आहे. तो गोशालकाचा अनुयायी होता नंतर गोशालकाच्या 'आजीवक' संप्रदायाचा त्याग करून महावीरांच्या सिद्धांताला स्वीकारले.

भगवतीसूत्र व उपासकदशांग सूत्र ह्या दोन आगमातच गोशालकाची चर्चा आहे. ती, भगवान महावीर कालिन धार्मिक स्थितीचा अभ्यास करणाऱ्यांना पठनीय आहे.

अंतकृतदशांग सूत्र - हे आठवे अंगसूत्र आहे. 'अंतकृतदशा' शब्दाचा अर्थ 'अंत करणारे' असा आहे. ज्यांनी जन्ममरणाचा, अंत केला आणि केवलज्ञान प्राप्त करून, मोक्षाप्राप्त केला त्यांना 'अंतकृत केवली' म्हणतात. आणि ज्याच्यामध्ये संसाराचा अंत करणाऱ्या व्यक्तींचे वर्णन केलेले आहे ते 'अंतकृतदशांगसूत्र' होय. ह्यात एक श्रुतस्कंध, आठ वर्ग आणि नव्वद अध्ययने आहेत. हा संपूर्ण आगम भौतिकतेवर आध्यात्मिक विजयाचा संदेश देतो. सर्वत्र तप आणि ध्यान यांचेच वर्णन आहे. ह्यात ज्या कथा आहेत त्या जवळ जवळ सारख्याच शैलीत आहेत. प्रत्येक कथेच्या काही भागांचे वर्णन करून राहिलेला सर्व भाग पूर्ववत म्हणजे पूर्वी प्रमाणेच घेण्याचा संकेत केलेला आहे.

अनुत्तरोपपातिक दशासूत्र - प्रस्तुत आगम द्वादशांगीचे नववे अंगसूत्र आहे. ह्या आगमात एक श्रुतस्कंध आणि तीन वर्ग आहेत. ह्या आगमात अशा साधकांचे वर्णन आहे ज्यांनी अनुत्तर विमानात जन्म घेतला आणि नंतर मनुष्यजन्म घेऊन मोक्ष प्राप्त केला.

भगवान महावीरकालीन उग्र तपस्वींचे ह्यात वर्णन आहे. ते सर्व तपस्वी

तपस्या करून अनुत्तर विमानात उत्पन्न झाले. तपस्वींच्या जीवनाबरोबरच महावीरकालीन सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीचेसुद्धा दर्शन ह्यात असल्याने हे अंगसूत्र महत्त्वाचे आहे.

प्रश्नव्याकरण सूत्र - हे दहावे अंगसूत्र आहे. ह्यात दोन श्रुतस्कंध आहेत. पहिले श्रुतस्कंध 'आश्रवद्वार' आणि दुसरे श्रुतस्कंध 'संवरद्वार' आहे. दोन्ही श्रुतस्कंधात पाच-पाच अध्ययने आहेत. हिंसा, असत्य, अदत्त, अब्रह्मचर्य आणि परिग्रह हे पाच आश्रवद्वार आहेत, ज्यामुळे आत्म्यात अशुभ कर्मांचे आगमन होत राहते. ह्याचे पहिल्या श्रुतस्कंधात विस्तृत वर्णन आहे.

अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह यांच्याद्वारे आश्रवाचा निरोध होतो. हे संवररूप आहेत. यांचे दुसऱ्या श्रुतस्कंधात विस्ताराने विवेचन केलेले आहे.

प्रश्नव्याकरणासंबंधी एक प्रश्न आहे. स्थानांग सूत्राच्या दहाव्या अध्ययनात जेथे दहा संख्यात्मक पदार्थांचे विवेचन आहे तेथे प्रश्नव्याकरणाच्या दहा अध्ययनांचा उल्लेख आलेला आहे - १) उपमा, २) संख्या ३) ऋषीभाषित ४) आचार्यभाषित ५) महावीर भाषित ६) क्षौमक प्रश्न ७) कोमल प्रश्न ८) आदर्शप्रश्न ९) अंगुष्ठप्रश्न १०) बाहुप्रश्न.

समवायांग जे संख्यामूलक आगम आहे. त्यात असा उल्लेख आहे. की प्रश्नव्याकरणामध्ये एकशे आठ प्रश्न, एकशे आठ अप्रश्न, एकशे आठ प्रश्नाप्रश्न आहेत. ते मंत्रविद्या, अंगुष्ठप्रश्न, बाहुप्रश्न, दर्पणप्रश्न इत्यादी विद्येबरोबर संबंधित आहेत. ह्या सूत्राची पंचेचाळीस अध्ययने आहेत.

नंदीसूत्रात सुद्धा जवळ जवळ अशाच प्रकारचे वर्णन आहे. दिगंबर परंपरेच्या षटखंडागमाची टिका धवला इत्यादींमध्ये प्रश्नव्याकरणाची चर्चा आलेली आहे. त्यात सांगितले आहे की ह्या आगमात चार प्रकारच्या कथेचे वर्णन आहे - अक्षेपणी, विक्षेपणी, संवेदणी, निर्वेदणी.

उपरोक्त विषय ज्योतिष अथवा निमित्तशास्त्राबरोबर संबंधित आहेत. ज्याच्या आधारे विशिष्ट अभ्यासक तशा प्रश्नांचे उत्तर देत होते. प्रश्नव्याकरणांचे जे वर्तमान रूप आहे त्याचा ह्या विषयाबरोबर काहीच संबंध नाही. तरीही असे का झाले ? ह्याचे कोणतेही समाधानकारक उत्तर मिळत नाही.

नवांगी टिकाकार 'आचार्य अभयदेव सूरिंनी' ह्याविषयी आपल्या वृत्तीमध्ये

काही चर्चा अवश्य केलेली आहे. त्याचा आशय हा आहे की प्रश्नव्याकरण यामध्ये जो विषय होता तो चमत्कारिक विद्येशी संबंधित होता. कोणत्याही अनधिकारी किंवा अयोग्य व्यक्तींच्या हातात आले तर त्याचा दुरुपयोग होऊ नये म्हणून ह्या विद्यविद्वानांनी काढून टाकल्या, आणि त्याठिकाणी साधक जीवनोपयोगी आश्रवद्वार आणि संवरद्वार विषयांना स्थापन केले.[३४] प्रश्नव्याकरणाचे एक टिकाकार आचार्य ज्ञानविमल होते त्यांनी सुद्धा अशाच प्रकारचा संकेत केलेला आहे. ह्या दोन्ही टिकाकारांच्या वर्णनाने प्रश्नाचे खरे समाधान होत नाही. परंपरेने चालणाऱ्या आगमग्रंथांतीत विद्यांना अनिष्टाच्या शंकेने कोणीतरी काढून टाकणे हे कदापि संभवत नाही. कारण आगमाच्या एका अक्षराला जरी बदलेले तरी ते कार्य दोषयुक्त मानले जाते तर संपूर्ण पाठ काढून दुसरे पाठ त्या जागी घालणे हे कार्य निंदनीयच आहे.

आचार्य श्री देवेंद्रमुनीं म. सा. यांनी प्रश्नव्याकरणसूत्राच्या प्रस्तावनेमध्ये लिहिले आहे की वर्तमान प्रश्नव्याकरण भगवान महावीरांच्या प्रश्नाच्या उत्तराचा आंशिक भाग आहे.[३५]

विपाक सूत्र - प्रस्तुत आगम द्वादशांगीचे अकरावे अंगसूत्र आहे. ह्या आगमात शुभाशुभ कर्माच्या विपाकाचे सुखदुःखात्मक परिणाम आणि फळाचे वर्णन केले. म्हणून ह्याचे नाव विपाकसूत्र आहे. अशुभ प्रवृत्तीचा परिणाम पाप विपाक आहे. आणि शुभ प्रवृत्तीचा परिणाम पुण्यविपाक आहे. ह्यात दोन श्रुतस्कंध आणि वीस अध्ययने आहेत.

'कर्मसिद्धांत' हा जैन दर्शनाचा मुख्य सिद्धांत आहे. त्याचे दार्शनिक विश्लेषण उदाहरणांद्वारे ह्या आगमात केलेले आहे.

पहिल्या विभागात दुष्कर्म करणाऱ्या व्यक्तिंच्या जीवनाचे वर्णन आहे. काही हिंसा, चोरी, अब्रह्मचर्य इ. दुर्भावनेने भयंकर अपराध करतात. आपल्या दुष्कर्मामुळे त्यांना अनेक यातना भोगाव्या लागतात. ह्यात पापाचे कटू परिणाम दाखवून जगाला संदेश दिला आहे की पापाचे परिणाम समजून घेऊन त्यांचा त्याग करा.

विपाकसूत्राच्या दुसऱ्या विभागात सत्कृत्य करणाऱ्या व्यक्तींच्या जीवनाचे वर्णन आहे. सुबाहुकुमार इत्यादी राजकुमारांनी पूर्वभवामध्ये पवित्र आणि उदार भावनेने महान तपस्वी मुनींना आहार दान दिले होते. त्यामुळे अपार सुख, ऐश्वर्य, रूप इत्यादी

प्राप्त झाले. नंतर उत्तमकुळात जन्म घेऊन, साधना करून सुबाहुकुमारादि पंधरा भवानंतर सिद्ध झाले. काही जीवांनी तर त्याच भवामध्ये मोक्ष प्राप्त केला.

हिंसा, अस्तेय आणि ब्रह्मचर्य ह्या अशुभ भावनेचे ह्यात वर्णन केलेले आहे.

स्थानांग सूत्राच्या दहाव्या स्थानामध्ये, विपाक सूत्राच्या पहिल्या श्रुतस्कंधातील दहा अध्ययनांची नावे खालीलप्रमाणे आली आहेत - १) मृगापुत्र २) गोत्रास ३) अंड ४) शकट ५) ब्राह्मण ६) नंदीषेण ७) शौरीक ८) उदुम्बर ९) सहस्रोद्वह अभरक १०) कुमारलिच्छाई.

आज जे विपाक सूत्र आस्तित्वात आहे त्याच्या प्रथम श्रुतस्कंधाच्या दहा अध्ययनाचे नावे - १) मृगापुत्र, २) उज्झितक ३) अभग्न सेन ४) शकट ५) बृहस्पतिदत्त ६) नंदीवर्धन ७) उंबरदत्त ८) शौरीकदत्त ९) देवदत्त १०) अंपु. अशी आहेत. दोघांमध्ये नावांचा फरक दिसून येतो.

दृष्टिवाद - हे बारावे अंगसूत्र आहे दृष्टीचा अर्थ 'दर्शन' आहे. आणि 'वाद' या शब्दाचा अर्थ 'चर्चा' असा आहे. अशाप्रकारे दृष्टिवादाचा शब्दार्थ दर्शनाची चर्चा असा होतो. ह्या सूत्रात प्राधान्याने दार्शनिक चर्चा असेल असे ह्या ग्रंथाच्या नावावरून प्रतीत होते.

दृष्टिवाद कोणत्या भाषेत रचलेले होते हा विषय चिंतनीय आहे. ह्याची रचना संस्कृतमध्ये होती असे म्हटले जाते. परंतु येथे सुद्धा असा प्रश्न उपस्थित होतो की, तीर्थंकरांच्या देशनेनुसार आगमाचे संकलन झाले. तीर्थंकर अर्धमागधीमध्ये देशना देतात असे असतांनाही बारावे 'दृष्टिवादाचे अंग' संस्कृतमध्ये कसे संकलित झाले ? तीर्थंकर तर लोकभाषेमध्येच प्रवचन देतात.

जैन वाङ्मयाबरोबर संस्कृतचा उपयोग व्याख्याग्रंथ अथवा टीकाग्रंथाच्या रूपातच विशेषत्वाने झालेला आहे. त्याचबरोबर व्याकरण, न्यायदर्शन, ज्योतिष इ. विषयांवर संस्कृत भाषेत रचना झाल्या ह्याचे एक कारण असेही आहे की ह्या शताब्दीमध्ये जे साहित्य रचले गेले तेव्हा वैदिक, बौद्ध इ. परंपरेच्या विद्वानांनी संस्कृत भाषेचाच अधिक प्रयोग केला. प्रमाणशास्त्राची अधिकांशरीत्या संस्कृतमध्येच रचना झाली. दिगंबर आणि श्वेतांबर दोन्ही परंपरेच्या विद्वानांकडून संस्कृतमध्येच संशोधनात्मक आणि महत्त्वपूर्ण ग्रंथरचना झाली.

२०. बारा उपांगांचा संक्षिप्त परिचय

जैन आगम साहित्यामध्ये अकरा अंगांप्रमाणे बारा उपांगांचाही समावेश होतो. उपांग शब्दाचा प्रयोग आगमात मिळत नाही. नंदीसूत्रामध्ये आगमग्रंथांचे वर्गीकरण प्राप्त होते. तेथे 'अंगबाह्य' आणि 'अंगप्रविष्ट' च्या रूपात आगमांना दोन रूपात विभागलेले आहे. 'उपांग' शब्दाचा प्रयोग केव्हापासून सुरू झाला हे निश्चितपणे सांगता येणार नाही. परंतु 'आचार्य उमास्वाती' विरचित 'तत्त्वार्थ भाषा'मध्ये अंग आणि उपांग शब्दांचा प्रयोग केलेला आढळतो. त्यात उपांग शब्दाचा अर्थ 'अंगबाह्य आगम' असा आहे. उत्तरकालीन आचार्य सुद्धा उपांगाचा असाच अर्थ करतात.

आचार्य श्री देवेंद्रमुनी महाराजांनी बाराव्या शताब्दीच्या पूर्वी झालेले आचार्य श्रीचंद आणि तेराव्या शताब्दीच्या उत्तरार्धात आणि चौदाव्या शताब्दीच्या प्रथम चरणात झालेल्या आचार्य जिनप्रभांचा उल्लेख करताना लिहिले आहे की, ह्यांना अंगबाह्याला उपांगांच्या स्वरूपात स्वीकारले.[३६]

'उपांग' शब्द 'अंग' शब्दाच्या पूर्वी 'उप' हा उपसर्ग लागून बनतो. 'उप' उपसर्ग 'समीपता', 'जवळ' या अर्थाने प्रचलित आहे. त्याचा मथितार्थ असा आहे की जो अंगाच्या जवळ असतो किंवा जे विषय विवेचनाच्या दृष्टीने अंगाबरोबर जुळलेले असतात ते उपांग होय.

जैन आणि इतर साहित्यामध्ये अंग आणि उपांगांचा अभिप्राय सारखा नाही. केवळ शाब्दिक साम्य आहे. कारण जैन आगमाची जी उपांगे आहेत त्याचे विषय जरी अंगांच्या विषयाशी जुळत नसले तरी अंग आणि उपांगांच्या विषयांमधील जैन धर्माचे सिद्धांत आणि आचार याविषयी एकमत किंवा साम्य आहे. परंतु उपांगांचा तीर्थंकर वाणीबरोबर सरळ संबंध नसतो. ते स्थविर रचित आहेत.

बारा उपांगांची नावे -

१) औपपातिक २) राजप्रश्नीय ३) जीवाजीवाभिगम ४) प्रज्ञापना ५) जम्बुद्वीपप्रज्ञप्ति ६) सूर्यप्रज्ञप्ति ७) चंद्रपज्ञप्ति ८) निरयावलिया किंवा कल्पिका ९) कल्पावतंसिका १०) पुष्पिका ११) पुष्पचूला १२) वृष्णिदशा ही बारा उपांगे आहेत.

औपपातिक सूत्र - हे जैन वाङ्मयाचे प्रथम उपांग सूत्र आहे. 'उपपात'चा अर्थ 'जन्म घेणे' अथवा 'प्रकट होणे' असा होतो. त्यापासून औपपातिक शब्द बनला

आहे. ह्याची 'समवसरण' आणि 'उपपात' नावाची दोन अध्ययने आहेत. देवता आणि नारकांच्या जन्म व च्यवनाचे ह्या उपांगामध्ये वर्णन आहे. म्हणून ह्याचे नाव 'औपपतिक' हे विषयानुरूप आहे.

ह्यात राजनैतिक, सामाजिक आणि नागरीकतथ्याची चर्चा केलेली आहे. त्याचबरोबर धार्मिक, दार्शनिक आणि सांस्कृतिक तथ्याचे सुद्धा सुंदर प्रतिपादन केलेले आहे. भगवान महावीरांच्या शरीर संपदेचे आणि समवसरणाचे जितके विस्तृत आणि सुंदर विश्लेषण येथे केलेले आहे तितके दुसरीकडे कोठेच उपलब्ध होत नसल्याचे हा आगम अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

चंपा नगरीचे वर्णन सर्वप्रथम ह्या आगमामध्ये केलेले आहे. चैत्य, राजा राणी इत्यादींचे विस्तृत विवेचन येथे आहे. ह्यात कित्येक धर्मसंप्रदायांचा सुद्धा उल्लेख मिळतो. हा ब्राह्मण आणि श्रमण यांच्यामधला संप्रदाय होता ज्यांना 'तापस' सुद्धा म्हटले जात होते. भारत वर्षात भिन्न भिन्न धर्मसंप्रदायांच्या उत्पत्ती आणि विकासाच्या विश्लेषणाच्या दृष्टीने ह्याचे अध्ययन अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ह्याविषयी अजून खोलवर अभ्यास झालेला नाही. ह्यात अजीवकांचे सुद्धा वर्णन आहे, जे मंखली गोशालकाचे अनुयायी होते.

(रायप्पसेणिय) राजप्रश्नीय सूत्र - हे द्वितीय उपांगसूत्र आहे. 'राजप्रश्नीय' शब्दाचा अर्थ असा आहे की राजाने केलेल्या प्रश्नाचे वर्णन ज्यात आलेले आहे ते. ह्याचा अर्थ असा आहे की, ह्या सूत्रात मुख्यत्वाने 'राजाप्रदेशी' कडून केलेले प्रश्न आहेत, जो अनात्मवादी होता. तसेच कुमार केशीश्रमणाने दिलेले उत्तर असे ह्याचे विशेष रूपात वर्णन आहे. हे वर्णन आत्म्याच्या अजर, अमर, शाश्वत स्वरूप, स्वर्ग, नरक इत्यादीचे स्वरूप समजण्यासाठी हे प्रश्नोत्तर फारच उपयोगी आहे.

ह्याचे दोन विभाग आहेत. प्रथम विभागामध्ये सूर्याभदेव भगवान महावीरांच्या समोर उपस्थित होऊन विविध प्रकराच्या नाटकाची रचना करतो. दुसऱ्या बिभागामध्ये 'राजप्रदेशी' आणि 'पार्श्वपत्य स्वामी केशीश्रमण' यांचे संवाद आहेत.

जीवाजीवाभिगम सूत्र - हे तृतीय उपांगसूत्र आहे. जीव, अजीव आणि अभिगम या तीन शब्दांच्या मिश्रणाने 'जीवाजीवाभिगम' शब्द बनलेला आहे. जीव म्हणजे 'आत्मा, अजीव म्हणजे 'पुद्गल' इत्यादी आणि अभिगम म्हणजे 'ज्ञान' ह्यामधून जीवतत्त्व आणि अजीवतत्त्वाचे विशेषरूपाने ज्ञान मिळू शकते. ह्या दोन्ही तत्त्वांमधून

जीव तत्त्वाचे ह्यात विस्तृत विवेचन आहे आणि अजीवतत्त्वाचे संक्षिप्त विवेचन आहे. जीवाची मुख्यता असल्याने ह्याला जीवाभिगम सुद्धा म्हणतात.

प्रस्तुत आगमामध्ये गणधर गौतम आणि भ. महावीरांच्या प्रश्नोत्तर रूपात जीव आणि अजीव यांच्या भेद-प्रभेदाचे विस्तृत वर्णन आहे. परंपरेच्या दृष्टीने ह्यात बीस उद्देशक होते, विसाव्या उद्देशकाची व्याख्या 'श्री शालिभद्रसूरी' यांचे शिष्य श्री चंद्रसूरींनी केली होती. अभयदेव सूरींनी ह्याच्या तिसऱ्या पदावर संग्रहणी लिहिली होती. परंतु सध्या ह्या सूत्रात केवळ नऊ प्रकरणे आहेत, जी दोनशे बहात्तर सूत्रामध्ये विभक्त आहेत. अशी शक्यता आहे की ह्या आगमाचा महत्त्वपूर्ण भाग लुप्त झाल्याने उरलेल्या भागाला नऊ प्रकरणाच्या रूपात संकलित केले असेल. उपलब्ध आगमामध्ये नऊ प्रकरणे, एक अध्ययन, अठरा उद्देशक आणि चार हजार सातशे पन्नास श्लोक प्रमाण पाठ आहेत. दोनशे बहात्तर गद्यसूत्र आणि एक्यांशी पद्य गाथा आहेत. ह्याचे दोन भागात निरूपण केले आहे. प्रथम विभागामध्ये अजीवाचे आणि संसारी जीवाचे निरूपण आले आहे आणि दुसऱ्या विभागामध्ये संसारी आणि सिद्ध दोन्ही प्रकारच्या जीवांचा समावेश होतो. ह्यात द्वीप आणि सागराचे सुद्धा विस्तृत विवेचन आहे.

ह्यात सांस्कृतिक सामग्रीची प्रचुरता आहे आणि कलेच्या दृष्टीने विपुल सामग्रीचे वर्णन केले. प्रश्नोत्तर प्रणालीचे ह्यामध्ये विकसित रूप प्राप्त होते.

प्रज्ञापना सूत्र - हे जैन आगम साहित्याचे चौथे उपांग सूत्र आहे. ह्याची रचना शामाचार्यांनी केली आहे. ह्या आगमाच्या पदांति ''पण्णवणाए भगवईए'' असा पाठ मिळतो. त्यामुळे हे स्पष्ट होते की अंग साहित्यामध्ये जे स्थान भगवती सूत्राचे आहे तेच स्थान उपांगामध्ये प्रज्ञापना सूत्राचे आहे. ह्यात छत्तीस परिच्छेद आहेत. ज्यात जीवासंबंधी प्रज्ञापना, स्थान, बहुवक्तव्य, स्थिती, कषाय, इंद्रिय, लेश्या, कर्म, उपयोग, वेदन आणि समुद्‌घात इ. विषयांचे सुंदर निरूपण केलेले आहे.

प्रज्ञापना एकप्रकारे ज्ञानविज्ञानाच्या कोशच आहे. साहित्य, धर्म, दर्शन इतिहास आणि भूगोलाचे अनेक महत्त्वपूर्ण उल्लेख ह्यामध्ये उपलब्ध होतात.

ह्या उपांगामध्ये साडेपंचवीस आर्य देशाचा उल्लेख आहे. मगध, अंग बेंग इ. पंचवीस देशांना पूर्ण देश आणि केकय (श्वेतिका) याला अर्धा आर्यदेश मानले आहे. ह्यात कर्म आर्य, शिल्प आर्य, भाषा आर्य या रूपात आर्यभेदाचा उल्लेख केला आहे म्हणजे जे शिल्पआर्य, भाषा आर्य इत्यादींमध्ये प्रविण आणि उत्कृष्ट असतील त्यांना

त्या त्या नावाने संबोधिले जात होते. पशुपक्ष्यांच्या अनेक प्रकारांचे ह्यात वर्णन येते. ह्यात जरी अलंकारांचा प्रयोग कमी दिसत असला तरी जैन पारिभाषिक शब्दावलीचा प्रयोग विशेषत्वाने झालेला दिसतो.

'प्रज्ञापना' शब्दाचा अर्थ प्रकृष्ट अथवा विशिष्ट ज्ञान करून देणे असा होतो. ह्या सूत्रामध्ये वेगवेगळ्या विषयांचे विस्तृत ज्ञान उपरोक्त वर्णनाप्रमाणेच प्राप्त होते.

जम्बुद्विप प्रज्ञप्ति सूत्र - ह्या सूत्राला कोठे पाचवे उपांग मानले आहे तर कोठे सहावे.

'जम्बुद्विप प्रज्ञप्ति' दोन भागात विभक्त आहे. पूर्वार्धामध्ये चार आणि उत्तरार्धामध्ये तीन वक्षस्कार आहेत. एकूण एकशे शहात्तर सूत्रे आहेत. प्रथम चार परिच्छेदामध्ये जम्बूद्विप, भरतक्षेत्र तसेच तेथील पर्वत, नद्या आणि उत्सर्पिणी, अवसर्पिणी काळाचे निरूपण केलेले आहे. ह्याउपांगामध्ये कुलकरांचे कथन आहे तसेच ऋषभदेव भगवंताच्या चरित्राचे विस्तृत विवेचन आहे.

तीर्थंकराचा जन्मोत्सव, भरतचक्रवर्तीचा दिग्विजय, भरताच्या निर्वाण प्राप्तीचे प्रतिपादन यामध्ये केलेले आहे.

यात प्राचीन भूगोलाचे महत्त्वपूर्ण संकलन आहे. भरत आणि किरात यांच्या युद्धाच्या वर्णनाने प्राचीन युद्धशैलीचे स्मरण होते.

सूर्यप्रज्ञप्ति चंद्रप्रज्ञप्ति - ह्यात सूर्य, चंद्र आणि नक्षत्रांची गती, विस्तारादींचे विस्तृत वर्णन येते. द्विप आणि सागराचे सुद्धा प्रसंगतः वर्णन आलेले आहे. ह्या ज्योतिष विषयासंबंधीचे विश्लेषण आहे. दोन सूर्य आणि दोन चंद्राचा सिद्धांत ह्यात वर्णिलेला आहे. ह्या दोघांचे भ्रमण एकानंतर एक एकांतर रूपात होते. म्हणून पाहणाऱ्या लोकांना सूर्य आणि चंद्र एकच एक दिसतात. ह्यात उत्तरायन व दक्षिणायनाचे सुद्धा वर्णन आहे.

एक आश्चर्याची गोष्ट अशी आहे की जरी हे दोन आगम असले तरी ह्या दोघांमध्ये सुरुवातीपासून शेवटपर्यंत अक्षरशः एक सारख्याच पाठ आहे. असे असतांनाही त्यांना दोन आगमांच्या स्वरूपात का स्वीकारले आहे हा एक प्रश्नच आहे. आजही ह्याची गणना दोन वेगवेगळ्या आगमाच्या रूपातच होते.

'प्रज्ञप्ति' याचा अर्थ 'ज्ञान करून देणे' असा आहे. त्याप्रमाणे सूर्यप्रज्ञप्ति ही सूर्याची गती, विस्तारादीशी संबंधित आहे. चंद्रप्रज्ञप्ति चंद्राशी संबंधित असली

पाहिजे. जर हे दोन वेगवेगळे ग्रंथ आहेत तर त्यांच्यामध्ये साम्य कसे असू शकेल ? आणि सूर्याची व चंद्राची गती सारखीच आहे काय ? जर सारखीच आहे तर दोन आगमांना वेगवेगळे करण्याची काय आवश्यकता होती ? एकाच आगमाने काम झाले असते असे प्रश्न साहजिकच उत्पन्न होतात. दोन्हींमध्ये मात्र किंचित फरक आहे. सूर्यप्रज्ञप्तिच्या प्रारंभी प्राकृतच्या चार गाथांमध्ये मंगलाचरण आहे. मंगलाचरणानंतर ''तेणं कालेणं तेणं समयेणं मिहिला नाम नयरी होत्था वण्णओ'' ह्या वाक्याने आगमाची सुरुवात होते.

चंद्रप्रज्ञप्तिमध्ये मंगलाचरणाच्या चार गाथा नाहीत तेथे 'तेणं कालेणं' ह्या वाक्यानेच आगमाची सुरुवात होते. नंतर दोघांमध्ये थोडासुद्धा फरक नाही. विद्वानांनी ह्यावर खूप संशोधन केले की पाठ एक असताना दोन्ही आगम वेगळे का मानले जातात?

काही विद्वानांच्या मते ह्या दोन्ही आगमामधून एकाच असेल परंतु एखाद्या प्राचीन ग्रंथभांडारामधे सूर्यप्रज्ञप्तिच्या दोन प्रती असतील, एक प्रत मंगलाचरणासहित असेल आणि दुसऱ्या प्रतीतील मंगलाचरणाचे पृष्ठ हरवले असेल. 'तेण कालेणं' पासूनच सरळ पाठ चालला असेल.

ग्रंथभांडाराची देखरेख करणाऱ्या कोण्या साधारण व्यक्तीने केवळ सुरुवातीचीच पाने पाहिली असतील पुढे पाहिले नसेल. ज्या प्रतीवर सूर्यप्रज्ञप्ति नाव लिहिलेले असेल आणि मंगलाचरण नसेल त्याला त्याने सूर्यप्रज्ञप्ति समजले असेल आणि दुसऱ्या प्रतीला चंद्रप्रज्ञप्ति मानून त्याच्यावर ते नाव लिहून टाकले असेल क़ारण सूर्यचंद्र नावे बरोबरच येतात.

ह्या चुकीचा परिणाम असा झाला असावा की ह्यांना सूर्यप्रज्ञप्ति आणि चंद्रप्रज्ञप्तिच्या रूपात वेगवेगळे मानले गेले असेल. एखाद्या विद्वानाच्या ध्यानात ही गोष्ट आलीही असेल व त्याने दोन्ही आगम भिन्न नसून एकच आहेत असेही सांगितले असेल. परंतु श्रद्धाळू लोकांना आगमाच्या संख्येमध्ये एक आगम कमी होणे कसे पटेल? म्हणून दोन्ही आगम सारखे असताना सुद्धा वेगवेगळे मानण्याची धारणा पुढे तशीच चालत राहिली.

काही विद्वानांच्या मते ह्यात शब्दांची समानता असली तरी अर्थाची भिन्नता आहे. बहुश्रुत आचार्यच ह्यातील भेद जाणत होते आणि ते आपल्या शिष्यांना समजावत होते. सर्वांनाच समजावून सांगणे ते योग्य मानत नव्हते. नरंतु ह्या म्हणण्यात काहीच

तथ्य असल्याचे वाटत नाही. हे कथन काल्पनिक वाटते.

निरयावलिका - ह्याच्या अंतर्गत कल्पावतंसिका, पुष्पिका, पुष्पचूला आणि विष्णुदशा ही पाच उपांगे येतात. विद्वानांच्या मते ही पाच उपांगे पूर्वी एका निरयावलिकाच्या नावाने एकाच ग्रंथाच्या रूपात प्रसिद्ध होती परंतु असे झाले तर उपांगांची संख्या बारा होत नाही. अंगांप्रमाणे उपांगांची संख्या सुद्धा बारा करण्यासाठी निरयावलिकाच्या अंतर्गत असलेले कल्पावतंसिका इ. वेगवेगळ्या उपांगांच्या रूपात परिणत केले असावे.[३७]

ह्या पाच उपांगांचा संक्षिप्त परिचय असा आहे.

निरयावलिका अथवा कल्पिका - ह्यात दहा अध्ययने आहेत. 'निरय' चा प्राकृत अर्थ 'नरक' असा होतो. ह्यातच नरकातील जीवांचे वर्णन असल्याने हे उपांग निरयावलिका नावाने प्रसिद्ध आहे. ह्यात मगधदेशाच्या प्राचीन इतिहासाचे वर्णन आहे. पिता-पुत्रांच्या मनातील कलुषिता आणि संपत्तीसाठी भावांचे होणारे युद्ध इ. वर्णन वाचले तर संसाराच्या विचित्रतेचे ह्यात स्पष्ट दर्शन होते.

कल्पावतंसिका - ह्यात दहा अध्ययने आहेत. ज्यात राजाश्रेणिकेच्या दहा नातवांची कथा आहे, ज्यांनी श्रमण दीक्षा घेतली आणि आत्मसाधनेद्वारा आयुष्य पूर्ण करून देवलोकामध्ये गेले. तेथून मनुष्य जन्म घेऊन मोक्षास जातील अशाप्रकारे व्रताचरणाद्वारे जीवनशुद्धीवर अधिक प्रकाश टाकला आहे.

पिता जेथे क्रोधादि कषायांच्या वशीभूत होऊन नरकात जातात तेथे पुत्र सत्कर्मामुळे स्वर्ग प्राप्त करतात. म्हणजे उत्थान आणि पतन ह्यांचे दायित्व मानवाच्या स्वकर्मावर आधारलेले आहे. मानव साधनेद्वारा देवत्वसुद्धा प्राप्त करू शकतो. परंतु विराधनेद्वारे भिकारी सुद्धा बनतो. कर्माची दशा समजण्यासाठी हे आगम अत्यंत महत्त्वाचे आहे.

पुष्पिका - ह्यात सुद्धा दहा अध्ययने आहेत. ह्याच्या तिसऱ्या अध्ययनात सोमील ब्राह्मणाची कथा आहे. तो विविध शास्त्रांचा पंडित होता. भ. पार्श्वनाथांचे उपदेश ऐकून तो श्रावक बनला. त्यानंतर त्याच्या विचाराचे परिवर्तन झाले आणि तो सम्यक्त्वाने विचलित झाला. त्याने पुन्हा स्वतःचे ब्राह्मण धर्मोचित जीवन स्वीकारले. आंब्याच्या झाडाचे बगीचे लावले. नंतर त्यांनी आपल्या मोठ्या पुत्राला कुटुंबाचे उत्तरदायित्व सोपवून तापसव्रत स्वीकारले. अनशन, आतापना इ. तपाचरण करत करत

तापस धर्माच्या विधि विधानाचे पालन केले. शेवटी आपल्या धर्मानुसार महाप्रस्थान करून देह सोडण्याचा निश्चय केला.

पुष्पचूला - ह्यात दहा अध्ययने आहेत. सौधर्म कल्पामध्ये निवास करणाऱ्या श्रीदेवी, ही देवी इत्यादींचे कथानक यात आहे. ज्या आपल्या पूर्वभवामध्ये भ.पार्श्वनाथांच्या शिष्या होत्या. ज्यांनी पुष्पचूलिकाजवळ दीक्षा घेतली होती. परंतु त्या बाह्यशुचित्व आणि शारीरिक शुद्धी इत्यादींमध्ये आसक्त होत्या, जे साध्वी जीवनाच्या दृष्टीने योग्य नव्हते. ह्या आगमात लिहिल्याप्रमाणे सर्व देवी देवलोकातील आयुष्य पूर्ण करून महाविदेह क्षेत्रात जन्म घेऊन संयमाची आराधना करून सिद्धी प्राप्त करतील.

वृष्णिदशा - नंदीसूत्राच्या चूर्णीमध्ये ह्या उपांगांचे नाव 'अंधकवृष्णि' लिहिले आहे. कालांतराने 'अंधक' शब्द नष्ट होऊन 'वृष्णिदशा' एवढाच शब्द राहिला. ह्यात बारा अध्ययने आहेत. ज्यात वृष्णिवंशीय अथवा यादवकुलोत्पन्न बारा राजकुमारांचे वर्णन आहे. ज्यांनी दीक्षा घेतली होती.

द्वारका नगरीचा राजा श्रीकृष्ण आणि बावीसावे तीर्थंकर भ. अरिष्टनेमीचे सुद्धा ह्या आगमामध्ये विशेषरूपात वर्णन झाले आहे. ते वाचनीय आहे. ह्यात यदुवंशीय राजाचे जे इतिवृत्त लिहिलेले आहे ते भागवतामध्ये वर्णिलेल्या चरित्राबरोबर तुलनीय आहे.

उपांगांचे सारांश - येथे वर्णिलेले अंग, उपांग, सध्याच्या अवसर्पिणी काळाचे तीर्थंकर भ. महावीरांच्या देशनेशी संबंधित मानले जातात. वाचनेच्या वर्णनामध्ये हे दाखवलेले आहे की, 'श्रुत' ची परंपरा श्रुतिच्या आधारावर चालत होती, स्मृति दुर्बलतेमुळे आगमाचे लेखन झाले. येथे असा प्रश्न उपस्थित होतो की भगवान महावीरांनी आपल्या जीवनामध्ये जो धर्मोपदेश दिला तो सर्व अंग, उपांग आगमात संकलित केलेला आहे ? ह्याच्यावर विद्वान चिंतक, विचार विमर्श करत राहिले. गणधरांनी जे काही संकलित केलेले होते ते उत्तरवर्ती मुनींच्या स्मृतीत जसेच्या तसे राहण्याबाबत संशय निर्माण झाला. परंतु त्याचा आगमांच्या रूपात जेवढा भाग उपलब्ध आहे तो अवश्य महत्त्वपूर्ण आहे.

नवांगी टीकाकार आचार्य अभयदेवसूरींनी आगमाच्यासंबंधी पाठभेदाचा उल्लेख केला आहे. वेगवेगळ्या वाचनेमध्ये सुद्धा काही ठिकाणी पाठभेद आहे. प्रश्नव्याकरणसूत्राविषयी नंदीसूत्रामध्ये जसे वर्णन आलेले आहे तसे त्याचे सध्या स्वरूप

नाही. चंद्रप्रज्ञप्ति आणि सूर्यप्रज्ञप्ति यांच्याबाबत सुद्धा हाच प्रश्न आहे. त्या प्रश्नाचे अजून समाधान होऊ शकलेले नाही. कारण आगमांवर दीर्घ काळाचा प्रभाव अवश्य पडला असावा. तरी जी सामग्री प्राप्त आहे ती महावीरांच्या सिद्धांताला समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

चार मूळ सूत्र - तेराव्या शताब्दीपर्यंत मूळसूत्र असा विभाग झाला नव्हता. आचार्य श्री प्रभाचंद्र यांनी 'प्रभावक' चरित्रामध्ये सर्व प्रथम अंग, उपांग, मूळ, छेद असे विभाग केलेले मिळतात. त्यानंतर उपाध्याय समयसुंदरजी यांनी 'समाचारी शतक' यामध्ये ह्याचा उल्लेख केलेला आहे. यावरून असेच कळते की, 'मूळसूत्र' विभागाची सुरुवात तेराव्या शताब्दीच्या उत्तरार्धात झाली.

ह्या आगमामध्ये मुख्यरूपाने श्रमणांच्या आचारासंबंधी मूळगुण, महाव्रत, समिती, गुप्ती इत्यादींचे निरूपण केलेले आहे. आणि जे श्रमण जीवनचर्येमध्ये मूळरूपाने सहायक होतात, ज्या आगमांचे अध्ययन श्रमणासाठी सर्वप्रथम अपेक्षित आहे त्याला 'मूळ सूत्र' म्हणतात.

पूर्वी आगमाचे अध्ययन आचारागापासून सुरू होत असे. परंतु जेव्हा आचार्य शय्यंभव यांनी दशवैकालिक सूत्राची रचना केली तेव्हापासून सर्वप्रथम दशवैकालिकाचे अध्ययन करण्याची परंपरा सुरू झाली आणि त्यानंतर उत्तराध्ययन सूत्र इ. शिकविले जाते.[३८]

स्थानकवासी व तेरापंथी परंपरेमध्ये उत्तराध्ययन, दशवैकालिक, नंदीसूत्र आणि अनुयोगद्वार यांना मूळ सूत्र मानले गेले.

उत्तराध्ययन सूत्र - हे सर्वमान्य प्रथम मूळसूत्र आहे. काव्याप्रमाणे ह्यातही उपमा, दृष्टांत, उत्प्रेक्षा, रूपक इ. अलंकारांचा प्रयोग झालेला आहे. काव्यात्मक शैलीमध्ये संवाद आणि कथोपकथनातून वैराग्य, तितिक्षा, धृती, समता आणि संयत आचरणाचा उपदेश केला आहे.

सुप्रसिद्ध पाश्चात्य विद्वान डॉ. विंटरनीज यांनी ह्या आगमला 'श्रमणकाव्याची' संज्ञा दिली आहे.

आचार्य भद्रबाहू यांनी ह्यावर निर्युक्तीची रचना केली आहे आणि जिनदासगणी महत्तर यांनी ह्यावर चूर्णी लिहिलेली आहे.

विषयाची विविधता सुरेखपणे प्रतिपादन केलेली असल्याने याचे आगम

साहित्यामध्ये खूप महत्त्व आहे. ह्यात छत्तीस अध्ययने आहेत, ज्यात अनेक महत्त्वपूर्ण चरित्रे, कथा आणि सिद्धांतांचे वर्णन आहे. त्यामधील मृगापुत्र, रथनेमी आणि राजमती यांचा संवाद तसेच पार्श्वपरंपरेचे श्रमण केशीकुमार आणि गौतम यांचा वार्तालाप महत्त्वाचा मानलेला आहे.

दशवैकालिक - 'विकाल' याचा अर्थ संध्या आहे. संध्याकाळी अध्ययन केल्याने ह्या आगमाचे नाव दशवैकालिक पडले आहे. ह्याची रचना 'शयंभव' नावाच्या आचार्यांनी केली. त्यांच्या जीवनचरित्राविषयी असे सांगितले जाते की ते ब्राह्मण कुळात जन्मलेले असून मोठे विद्वान होते. ते जैन सिद्धांताने प्रभावित झाले. आणि त्यांनी दीक्षा घेतली. जेव्हा त्यांनी दीक्षा घेतली तेव्हा त्यांची पत्नी गर्भवती होती. त्यांची दीक्षा झाल्यानंतर काही काळानंतर त्यांना पुत्ररत्न प्राप्त झाले. त्याचे नाव 'मनक' ठेवले. मनक मोठा झाल्यावर, त्याला आपल्या वडिलांनी दीक्षा घेतल्याचे समजले आणि तो पित्याला शोधत शोधत चंपानगरीला गेला. शयंभव दिव्यज्ञानी होय. त्यांना दिव्यदृष्टीने असे कळले की आपल्या पुत्राचे आयुष्य केवळ सहा महिन्याचे आहे. त्याला थोडक्यात आगमज्ञान देण्यासाठी त्यांनी दहा अध्ययनामध्ये दशवैकालिक सूत्राची रचना केली. ह्यात अत्यंत सरलतेने जैन आचार आणि सिद्धांताची थोडक्यात चर्चा आहे.

जर्मनीमध्ये डॉ. पिशल नावाचे फार मोठे प्राकृतचे विद्वान ह्याच शताब्दीत होऊन गेले त्यांनी दशवैकालिक आणि उत्तराध्ययनाला भाषाशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले आहे.

नंदीसूत्र - विद्वानांच्या मते नंदीसूत्र आणि अनुयोगद्वार ही सूत्रे अन्य आगमांपेक्षा अर्वाचीन आहेत. 'पट्टावली'मध्ये 'दूष्यगणी'चे नाव आलेले आहे. त्यांचे शिष्य 'देववाचक' होते. त्यांनी या सूत्राची रचना केली असे मानले जाते. काही विद्वान अंतिम आगम वाचनेचे निर्देशक आचार्य देवर्धिगणी क्षमाश्रमण आणि देववाचक यांना एकच मानतात. परंतु इतरत्र मिळणाऱ्या माहितीवरून ही मान्यता सिद्ध होत नाही. कारण हे दोघेही वेगवेगळ्या संप्रदायाशी संबंधित होते असे लिहिले आहे. ह्या सूत्रावर आचार्य हरीभद्र आणि आचार्य मलयगिरी यांनी टिकेची रचना केली. ह्यात ज्ञानाचे पाच भेद सांगून त्यांचे वर्णन केलेले आहे.

'श्रुत' याचे अंगबाह्य व अंगप्रविष्ट असे दोन भेद केलेले आहेत.

अनुयोगद्वार - ह्या मूळ सूत्राची रचना 'आर्यरक्षित' यांनी केलेली आहे.

भाषा आणि विषयाच्या दृष्टीने विद्वानांच्या मतानुसार हे अर्वाचीन मानले गेले आहे. ह्याच्यावर 'जीनदासगणी महत्तर' यांनी 'चुर्णी'ची रचना केली आणि आचार्य हरीभद्र सूरी यांनी त्याचप्रमाणे मलधारी हेमचंद्रांनी टिकेची रचना केलेली आहे. मलधारी हेमचंद्राचार्य अभयदेवसूरीचे शिष्य होते अशी मान्यता आहे. ह्या आगमामध्ये प्रश्नोत्तरशैलीत पल्योपम, सागरोपम इत्यादींचे आणि प्रमाण, नय निक्षेप, नऊ काव्यरस यांचा उल्लेख आहे. तसेच संगीतशास्त्राच्या स्वर, ग्राम, मूर्च्छना इत्यादींचे सुद्धा वर्णन आहे.

ह्यात व्याकरणसंबंधी सुद्धा चर्चा आलेली आहे. धातू, निर्युक्ति, समास, तद्धित इत्यादींचे विस्तृत विवेचन केलेले आहे.

प्रमाणाच्या विवेचनांतर्गत त्याचे प्रत्यक्ष, अनुमान, उपमान आणि आगम हे चार भेद दाखविले आहेत. अनुमानाचे सुद्धा पूर्ववत्, शेषवत् आणि दृष्टसाधर्म्य हे तीन भेद सांगितले आहेत.

छेदसूत्र - 'छेद' शब्दाचा अर्थ छिन्नविच्छिन्न करणे, कापून टाकणे, नष्ट करणे असा आहे. संन्यासी जीवनात सुद्धा दोष लागणे शक्य आहे कारण साधू सुद्धा एक छद्मस्थ मानव आहे. परंतु दोष लागल्यानंतर तिकडे दुर्लक्ष करणे, असावधपणे राहणे त्यामुळे दोषपरंपरा वाढत जाऊन साधू आपल्या स्थानापासून च्यूत होत जातो. अशाप्रकारे त्याचे पतन होऊ लागते. साधूने आपल्या संयमाच्या मार्गावर स्थिर राहण्यासाठी प्रायश्चित घेऊन आपल्या दोषांना छिन्न करून टाकणे किंवा कापून टाकणे अत्यंत आवश्यक असते. छेदसूत्रामध्ये ह्याच संदर्भात विविध विधिक्रमाचे प्रतिपादन केलेले आहे.

दशाश्रुतस्कंध - 'आचार्य भद्रबाहू' यांनी या आगमाची रचना केली असे मानले जाते. येथे एक प्रश्न उपस्थित होतो की 'निर्युक्तिकार' भद्रबाहु आणि 'दशाश्रुतस्कंधाचे' रचयिता एकच होते की वेगवेगळे ? विद्वानांच्या मते हे दोन्ही वेगवेगळे होते. भद्रबाहू नावाचे अनेक आचार्य होऊन गेले म्हणून ऐतिहासिक दृष्टीने ह्यासंबंधी काही सांगता येत नाही. ह्यावर ब्रह्मर्षी पार्श्वचंद्रिय यांनी संस्कृतमध्ये वृत्तीची रचना केलेली आहे.

ह्या आगमाचे दुसरे नाव 'आचार दशा' असे सुद्धा आहे. ह्यात दहा विभाग आहेत. त्यातील आठव्या व दहाव्या विभागाला 'अध्ययन' असे नाव दिले असून

बाकीच्या विभागाला 'दशा' म्हटले आहे.

ह्या सूत्राच्या प्रारंभीच अब्रह्मचर्य विषयक कर्म, रात्री भोजन, राजपिंडग्रहण ह्यासाठी आणि एका महिन्यामध्ये एका गणाचा परित्याग करून दुसऱ्या गणामध्ये जाणाऱ्यांसाठी कोणकोणते प्रायश्चित आहे त्याचा उल्लेख यात आलेला आहे. ह्याच्या चौथ्या दशेत आचार्यांशी संबंधित आठ संपदेची चर्चा केलेली आहे, ज्यात आचार, श्रुत, शरीर, वाणी, वाचन, मती, प्रयोगमती आणि संग्रह या संपदेचा समावेश आहे.[३९] ह्याचे विस्तृत वर्णन ह्या आगमात प्राप्त होते. आठव्या अध्ययनात भगवान महावीरांच्या पंचकल्याणकाचे व त्यांच्या जीवनचरित्राचे वर्णन आहे. ह्या अध्ययनामध्ये भाषेची प्रौढता व शैलीची काव्यात्मकता दिसून येते. ह्यात क्रियावाद, अक्रियावाद इ. मिथ्या संप्रदायाचे वर्णन आहे. ह्यातच पुढे भ. ऋषभदेव, अरिष्टनेमी आणि भ. पार्श्वनाथांच्या चरित्राचा संकेत केलेला आहे.

बृहत्कल्पसूत्र - ह्या सूत्रात जैन साधूंच्या आचारसंहितेचे व आचारशास्त्राचे विवेचन आहे. भाषेच्या दृष्टीने हे शास्त्र प्राचीन मानलेले आहे. ह्यात सहा उद्देशक आहेत, ज्यात त्या त्या स्थानाचे वस्त्र आणि पात्र इत्यादींचे वर्णन केलेले आहे, जे साधु-साध्वीच्या संयमपालनात सहायक आणि बाधक ठरले आहे. साधू व साध्वी यांनी कोणत्या ठिकाणी निवास केला पाहिजे, ह्याचे विस्तृत वर्णन येथे केलेले आहे. ह्यात विहार संबंधी नियमसुद्धा सांगितले आहेत. कोणत्या परिस्थितीत साधुसाध्वी यांनी परस्परांना मदत करावी हेसुद्धा सांगितलेले आहे. ह्याचे रचनाकार आचार्य भद्रबाहु मानले जातात, जे दशाश्रुतस्कंधाचे रचयिता आहेत.

व्यवहार सूत्र - याची रचना चतुर्दशपूर्वधारी आचार्य भद्रबाहूंनी केली अशी मान्यता आहे. ह्यावर भाष्य आणि निर्युक्तिची सुद्धा रचना झालेली आहे. हे सूत्र दहा उद्देशकामध्ये विभक्त आहे. ह्यात सांगितलेले आहे की अज्ञानवश अथवा प्रमादवश कोणतेही पाप घडले तर आलोचना आणि प्रायश्चित केले पाहिजे. अनेक प्रकारच्या क्रिया होतात. ज्या निंद्यनीय आहेत त्यांचे कसे प्रायश्चित घ्यावे यासंबंधी प्रतिपादन केले आहे. साधुसाध्वीच्या भिक्षाव्यवहारासंबंधी, अनेक नियम ह्यात वर्णिलेले आहेत.

आचार्यांचे चार प्रकार, अंतेवासी शिष्यांचे चार भेद, स्थविरांचे तीन भेद इत्यादींचेही वर्णन केलेले आहे. स्वाध्याय करण्याची विशेषत्वाने प्रेरणा दिलेली आहे. परंतु स्वाध्याय योग्य काळातच व्हायला पाहिजे, अयोग्य काळात होणार नाही ह्याबद्दल

दक्ष राहण्याचा संकेत केलेला आहे. आलोचना आणि प्रायश्चित विधानाचे आणि संघ व्यवस्थेच्या नियम, उपनियमाचे ह्यात विस्तृत विवेचन आहे. तसेच दहा प्रकारच्या वैयावृत्य सेवाकार्याचा सुद्धा ह्यात उल्लेख आहे.

साधूंचे निवासस्थान, शास्त्राध्ययन, चर्या, उपधान इ. तपस्येचे विस्ताराने वर्णन झालेले आहे.

निशीथ सूत्र - 'निशीथ' म्हणजे अर्थरात्र, जी अतिशय अंधकारमय असते. अर्ती अंधकार म्हणजे प्रकाशापासून अंधाराकडे जाणे. साधुसाध्वी जेव्हा नियम तोडतात तेव्हा त्यांचे हे कार्य अंधकाराच्या दिशेने जाण्यासारखे आहे. प्रकाश ज्ञानाचे प्रतिक आहे. साधुसाध्वींचे जीवन नेहमी पवित्र राहावे, त्यांच्यात क्षणोक्षणी जागरुकता राहावी हे अपेक्षितच आहे.

निशीथ सूत्राला आचारांग सूत्राच्या द्वितीय चूलेच्या रूपात स्वीकारले जाते. ह्याचे एक नाव 'आचार कल्प' असेही आहे. ह्यात साधुसाध्वींच्या आचाराविषयी नियमसुद्धा सांगितलेले आहेत. त्याचबरोबर त्यांच्या उत्सर्ग आणि अपवादमार्ग यांचेही वर्णन आहे. साधुसाध्वींनी कशाप्रकारे व्यवहार करावा याची उत्सर्गमार्ग अपवादमार्गाच्या दृष्टीने चर्चा आहे. त्याचप्रमाणे येथे आचारांचा नियमभंग झाल्यावर त्यानुसार कसे प्रायश्चित दिले पाहिजे ह्याचेही विवेचन केलेले आहे. हे सूत्र वीस उद्देशकामध्ये विभक्त आहे. ह्याच्या प्रथम उद्देशकामध्ये ब्रह्मचर्य पाळण्याच्या दृष्टीने साधकांना विशेषरूपाने जागृत केले आहे. कुकर्मांपासून दूर राहण्यास सांगितले आहे, ज्यामुळे संयमी जीवनाचा नाश होतो. अशा विविध प्रायश्चित्ताच्या विधिक्रमांचा उल्लेख आहे. ह्या सूत्राचे अध्ययन प्रायश्चित देणाऱ्या आचार्यासाठी आवश्यक आहे. याच्या अध्ययनामुळे कोणत्या प्रायश्चित्तासाठी कसा व किती दंड द्यावा हे त्यांच्या लक्षात येईल.

आवश्यक सूत्र - जैन आगमामध्ये आवश्यकसूत्राचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. जीवनामध्ये संयमाचे चांगल्याप्रकारे पालन करण्यासाठी श्रमणाला नेहमी जागरूक राहण्याची आवश्यकता असते. जरी त्याने संसाराचा त्याग केलेला असला तरी मन चंचल असल्याने कोणत्याही स्थितीत तो मार्गच्यूत होण्याचीच शक्यता अधिक असते. जीवनात अनुकूल आणि प्रतिकूल परिस्थिती येतच राहते, म्हणून श्रमण आणि श्रमणोपासकांसाठी दररोज करण्याचे सहा आवश्यक निर्देश दिलेले आहेत. ते असे-

१) सामायिक २) चतुर्विंशतिस्तव ३) वंदना ४) प्रतिक्रमण ५) कायोत्सर्ग

६) प्रत्याख्यान.

ह्या सूत्रामध्ये सांगितलेले निर्देश नित्य आणि अवश्य (नित्यमेव अवश्यमेव) करावयाचे असल्याने ह्या सूत्राला 'आवश्यक सूत्र' असे नाव दिलेले आहे.

सामायिक - सामायिक प्रथम आवश्यक आहे. हे सावद्ययोग, प्रत्याख्यान, त्याग आणि वैराग्य प्राप्त करण्याचे प्रतिज्ञासूत्र आहे. सामायिकामध्ये साधू विषम भावनेचा त्याग करतो आणि समभावनेचा अंगीकार करतो. राग आणि द्वेष आत्मस्वरूपाचे विपरीत भाव आहेत. त्यामुळे साधक सावद्यप्रवृत्तीशी (पापयुक्त प्रवृत्तीशी) संयुक्त होतो. सामायिकामध्ये त्यागाचा आंतरिक संकल्प असल्याने साधकामध्ये आत्मबळाचा संचार होतो आणि समानतेची भावना दृढ होते.

चतुर्विंशतिस्तव - चोवीस तीर्थंकर हे साधकांसाठी आदर्श आहेत. त्यांची स्तुती केल्याने, त्यांचे स्तवन केल्याने त्यांच्या ठिकाणी असलेले गुण आपल्या जीवनात उतरवून उच्च स्थानावर किंवा मार्गावर जाण्याची प्रेरणा मिळते.

वंदना - साधकांच्या जीवनात तीर्थंकरानंतर आपल्या गुरुंचे स्थान महत्त्वाचे आहे. तिसऱ्या आवश्यकामध्ये गुरू वंदनेचे विधान केलेले आहे. साधकाच्या मनात गुरुभक्तीची भावना, सद्गुरुंविषयी आदराची भावना इ. वंदनेच्या अंतर्गत आहे.

प्रतिक्रमण - हा जैन परंपरेतील अत्यंत महत्त्वपूर्ण शब्द आहे. 'स्वभावापासून विभाव दशेत जाणाऱ्या आत्म्याला पुन्हा स्वतःच्या म्हणजे 'स्व' मध्ये आणणे स्वतःजवळ वळवणे, आपल्या स्वरूपामध्ये येणे म्हणजेच प्रतिक्रमण होय. हे केवळ वाह्य शब्दातच सीमित नसून अंतर्भावामध्ये ही एक अशी अवस्था आहे, ज्यात मन वाह्यात्मभावाला सोडून अंतरात्मभावामध्ये येण्यासाठी उद्विग्न होते. कुमार्गावरून सन्मार्गावर येण्यासाठी उद्युक्त होते. हे आत्माविष्काराचे अत्यंत सार्थ रूप आहे.

कायोत्सर्ग - 'काया' आणि 'उत्सर्ग' हे दोन शब्द मिळून 'कायोत्सर्ग' असा शब्द बनलेला आहे. उत्सर्ग शब्दाचा अर्थ 'त्याग' असा आहे. शरीराचा कोणीच त्याग करू शकत नाही. मनुष्याचे जितके आयुष्य निर्धारित असते तोपर्यंत शरीर हे त्याच्याबरोबर असणारच. परंतु शरीराबद्दल जी ममत्व भावना किंवा आसक्ती असते, ती साधकाला साधना पथावरून विचलित करत असते, तिचा त्याग (म्हणजे उत्सर्ग) करणे म्हणजेच कायोत्सर्ग होय. दैहिक आणि आत्मिक अशी दोन प्रकारची बुद्धी असते. दैहिक भावनेचा त्याग आणि आत्मभावनेत लीन होण्याचे बळ मिळविण्यासाठी साधक

कायोत्सर्गामध्ये समाधिस्थ होतो. अंतरात्मभावनेत स्थिर होतो. 'मी शरीर नाही, मी आत्मा आहे' असे चिंतन, अनुचिंतन, अनुभावन करतो. कायोत्सर्गाचे अनेक प्रकार आहेत. त्यांचे त्या विषयांच्या ग्रंथांमध्ये विस्तृत विवेचन झालेले आहे.

प्रत्याख्यान - हा सहावा आवश्यक निर्देश आहे. प्रत्याख्यान म्हणजे 'त्याग', म्हणजे मिथ्यात्व, अज्ञान, असंयममूलक भावनेचा त्याग करणे होय. तसेच बाह्य भोग्य पदार्थांचा त्याग करणे असाही आहे. यांनाच क्रमशः भाव प्रत्याख्यान आणि द्रव्य प्रत्याख्यान म्हटले जाते. प्रत्याख्यान म्हणजे गुणांचे ग्रहण करणे. हे व्रतरूपी गुणांचे संमार्जन आहे. ह्याचे प्रयोजन दुष्प्रवृत्तींचा निरोध आणि सत्प्रवृत्तींचा स्वीकार करणे आहे. त्यामुळे इच्छानिरोध, तृष्णात्याग इ. गुणांची वृद्धी होते.

प्रकीर्णक आगम साहित्य - श्वेतांबर मूर्तिपूजक संप्रदायामध्ये पंचेचाळीस आगम स्वीकारलेले आहेत. श्वेतांबर स्थानकवासी आणि तेरापंथी संप्रदायामध्ये पूर्वी ज्यांचे विवेचन केलेले आहे अशी अकरा अंग, बारा उपांग, चार छेद, चार मूळ आणि एक आवश्यकसूत्र असे बत्तीस आगम प्रमाणरूपाने स्वीकारले जातात. ह्या बत्तीस आगमांना मूर्तिपूजक संप्रदायही मानतो. पण ते मूळ सूत्रामध्ये 'पिण्डनिर्युक्ति याचे दूसरे नाव ओघनिर्युक्ति आहे, छेदसूत्रात, महानिशीथ, पंचकल्प आणि दहा प्रकीर्णक असे तेरा आगम मिळविले असता पंचेचाळीस आगम मानतात.

नंदीसूत्राचे टीकाकार आचार्य मलयगिरी ह्यांच्या मतानुसार तीर्थंकरांद्वारे उपदिष्ट 'श्रुत'चे अनुकरण करून श्रमण प्रकीर्णकांची रचना करतात. प्रकीर्णक इतस्ततः विखुरलेल्या सामग्रीचा अथवा विविध विषयांचा संग्रह होय.

श्रमण भगवान महावीरांच्या तीर्थामध्ये चौदा हजार प्रकीर्णक मानले जात होते, परंतु आज त्यांची संख्या दहा आहे. ते खालीलप्रमाणे-

१) चतुःशरण २) आतुरप्रत्याख्यान ३) महाप्रत्याख्यान ४) भक्त परिज्ञा ५) तंदुलवैचारिक ६) संस्तारक ७) गच्छाचार ८) गणविद्या ९) देवेंद्रस्तव १०) मरण समाधी. (अन्यत्र ह्याचे 'वीरत्थओ' असेही नाव आहे.)

परंतु ह्या नावांमध्ये समानता दिसून येत नाही. काही ठिकाणी तर 'मरणसमाधी' आणि 'गच्छाचार' यांच्या जागी 'चंद्रवेध्यक' आणि 'वीरस्तव' घेतले आहे, तर कोठे 'देवेंद्रस्तव' आणि 'वीरस्तव' घेतले आहे. परंतु काही ठिकाणी 'संस्तारक' याच्या जागी 'गच्छाचार' किंवा 'मरणसमाधी' याचा उल्लेख आलेला आहे.[४०]

जैन पारिभाषिक दृष्टीने तीर्थंकरांचे जे शिष्य आपल्या उपजतबुद्धीनुसार श्रमणाद्वारे अध्यात्मासंबंधी विविध विषयावर ग्रंथ रचत होते त्यांना 'प्रकीर्णक' असे म्हटले जाते.

असे म्हटले जाते की ज्या तीर्थंकरांचे औत्पातिकी, वैनयिकी, कार्मिकी आणि पारिणामिकी ह्या चार प्रकारच्या बुद्धीने युक्त जेवढे शिष्य होतात त्यांचे तितकेच सहस्र प्रकीर्णक असतात. जितके प्रत्येकबुद्ध होतात त्यांचेही तितकेच प्रकीर्णक ग्रंथ असतात.

प्रत्येकबुद्ध प्रव्रज्या देणाऱ्यांच्या दृष्टीने कोणाचे शिष्य होत नाही. परंतु तीर्थंकरांद्वारे उपदिष्ट धर्मशासनाची प्ररुपणा करण्याच्या अपेक्षेने अथवा त्यांच्या शासनात राहत असल्याने त्यांना औपचारीकतेने तीर्थंकरांचे शिष्य म्हटले जाते म्हणून प्रत्येकबुद्धांद्वारे प्रकीर्णकाची रचना मानणे युक्तिसंगत आहे.

वर्तमानकाळात सर्वमान्य दहा प्रकीर्णकामधील एकेका प्रकीर्णकाचा येथे थोडक्यात परिचय दिला जाईल.

१) **चउसरण - चतुःशरण प्रकीर्णक** - जैन परंपरेमध्ये अरिहंत, सिद्ध, साधू आणि सर्वज्ञ निरूपित धर्माला शरणरूप मानलेले आहे. ह्या चार शरणांच्या आधारावर ह्या प्रकीर्णकाचे नाव चतुःशरण ठेवले आहे.

ह्या प्रकीर्णकाच्या प्रारंभी 'षडावश्यक' यावर प्रकाश टाकलेला आहे. त्यात लिहिले आहे:

१) सामायिक आवश्यकाने चारित्र्याची शुद्धी होते.

२) चतुर्विंशती जिनस्तवनाने दर्शनशुद्धी होते.

३) वंदना केल्याने ज्ञानामध्ये निर्मळता येते.

४) प्रतिक्रमण केल्याने ज्ञान, दर्शन, इत्यादी रत्नत्रयाची शुद्धी होते.

५) कायोत्सर्गाने तपाची शुद्धी होते आणि प्रतिक्रमण केल्यानेही जर चारित्र्याची शुद्धी झाली नसेल तर त्याची सुद्धा शुद्धी कायोत्सर्गाने होते.

६) पच्चक्खाण केल्याने वीर्य शुद्धी होते.

यानंतर तीर्थंकरांची माता ज्या चौदा स्वप्नांना पाहते त्याचा उल्लेख करून महावीर स्वामींना वंदन करून चार शरणांचे विस्तृत विवेचन केले आहे. त्यात

अरिहंत, सिद्ध, साधू आणि धर्माची महानता दाखवून त्याचे गुण किर्तन पूर्वी केलेल्या पापाची निंदा आणि सत्कृत्याचे अनुमोदन केले आहे.

२) **आउर पच्चक्खाण** - आतुर प्रत्याख्यान प्रकीर्णक - हे प्रकीर्णक मृत्यूशी संबंधित आहे. म्हणून ह्याला 'अंतकाळ प्रकीर्णक' असेही म्हणतात. ह्यात बालमरण आणि पंडित मरण यांचे विवेचन आहे. ज्याची स्थिती जवळ जवळ आतुरावस्थेत होते. आतुर शब्द सामान्यपणे 'रोग' वाचक आहे. म्हणूनच ह्या प्रकीर्णकाचे नाव 'आतुर प्रत्याख्यान' असे ठेले असावे.[४२]

ह्यात लिहिले आहे की, जे मृत्यूच्यावेळी धीट बनून प्रत्याख्यान करतात ते मृत्यूनंतर उत्तम स्थानाला प्राप्त करतात.[४३] ह्यात प्रत्याख्यानाला शाश्वत गतीचे साधन सांगितले आहे.

३) **महापच्चक्खाण महाप्रत्याख्यान प्रकीर्णक** - ह्या प्रकीर्णकामध्ये पाप आणि वाईट चारित्र्याची निंदा करून त्याच्या प्रत्याख्यानावर जोर दिलेला आहे. त्याग अथवा प्रत्याख्यानाला जीवनाच्या यथार्थ सफलतेचे परिपोषक मानले आहे. ह्याच्या आधारावरच धर्माचरण टिकून आहे. त्यागाच्या महान आदर्शाचा ह्यात विशेषरूपाने उल्लेख झाला आहे. म्हणून ह्याचे नाव महाप्रत्याख्यान ठेवले असावे असे वाटते.

पौद्गलिक भोगाचा मोह मनुष्याला संयमित जीवन स्वीकारू देत नाही. पौद्गलिक भोगाने प्राणी कधीच तृप्त होत नाही, परंतु संसाराची वृद्धी होते. ह्याविषयी ह्यात विवेचन केले आहे आणि मायेचा त्याग, तितिक्षा आणि वैराग्याचे हेतू, पाच महाव्रते, आराधना इत्यादी विषयांचेही वर्णन केलेले आहे.

४) **भत्त परिण्णा-भक्त परिज्ञा प्रकीर्णक** - जैन धर्मामध्ये भक्तपरिज्ञा अनशनपूर्वक मरणाच्या प्रकारातला एक प्रकार आहे. आतुरप्रत्याख्यानामध्ये साधक रुणाववस्थेमध्ये आमरण अनशन स्वीकारून पंडित मरण प्राप्त करतो. भक्त परिज्ञेची स्थिती ह्यापेक्षा थोडी वेगळी आहे. ह्यामध्ये शारीरिक अस्वस्थतेचा विशेष संबंध नाही. सदसद्विवेकपूर्वक साधक आमरण अनशनाद्वारे देहत्याग करतो.

ह्या प्रकीर्णकामध्ये अन्य अनेक विषयांबरोबर भक्त परिज्ञेचे विशेषरूपाने वर्णन आहे म्हणून ह्याचे नाव भक्तपरिज्ञा ठेवले आहे. ह्यात 'इंगित' आणि 'पादोपगमन' मृत्यूचे सुद्धा विवेचन आहे; जे भक्तपरिज्ञेप्रमाणे विवेकपूर्वक अशन त्यागाद्वारे प्राप्त होणाऱ्या मरणाचे भेद आहेत. अशा कोटीच्या पंडितमरणाचे तीन प्रकार मानलेले आहेत.

दर्शनशुद्धीला सुद्धा ह्यात अत्यंत महत्त्वपूर्ण सांगितले आहे. साधनेच्या स्थिरतेसाठी मनोनिग्रहच्या आवश्यकतेचेही ह्यात वर्णन आहे.

५) **तंदुलवेयालिय-तन्दुलवैचारिक** - 'तंदुल' याचा अर्थ 'तांदुळ' असा होतो. या प्रकीर्णकात एका दिवसात शंभर वर्षाचा एक पुरुष जितके तांदुळ खातो त्या संख्येला उद्देशून हे नामकरण झालेले आहे.

ह्याच्यात जीवाचे गर्भातील आहार, स्वरूप, श्वासोच्छवासाचे परिणाम, शरीरामध्ये सांध्याची स्थिती आणि स्वरूप, नाड्यांचे परिमाण, रोमछिद्र, पित्त, रुधिर, शुक्र इत्यादींचे वर्णन आहे. त्याचबरोबर गर्भकाळ, आई वडिलांचे अंग, जीवाची बालक्रीडा, मंदा इत्यादी दहा अवस्था आणि धर्माचा अध्यवसाय इत्यादी संलग्न विषयांचे सुद्धा ह्यात विवेचन आहे.

ह्या प्रकीर्णकामध्ये स्त्रीचे हीन चित्रही रेखांकित केलेले आहे. अनेक विचित्र व्युत्पत्तींद्वारे स्त्रीला कुत्सित आणि बिभत्स पदार्थाच्या रूपात चित्रित करण्यामागे असा हेतू असावा की मनुष्याला काम आणि कामिनी या दोघांचेही भय वाटून तो त्यापासून दूर जावा. त्याला त्यांच्याविषयी विरक्तीची भावना निर्माण व्हावी.

पुरुषांकरिता स्त्रिया जशा त्याज्य म्हणून सांगितल्या आहेत त्याचप्रमाणे स्त्रियांसाठी पुरुष सुद्धा त्याज्य आहेत.

शेवटी सांगितले आहे की जन्म, जरा, मृत्यू आणि वेदनेने युक्त असलेले हे शरीर एकप्रकारे शकट म्हणजे गाडी आहे. म्हणून ह्याद्वारे असे कार्य केले पाहिजे की ज्यामुळे संपूर्ण दुःखातून मुक्ती मिळू शकेल.

६) **संथारग-संस्तारक** - जैन साधनापद्धतीमध्ये संथारा-संस्तारकाचे अत्याधिक महत्त्व आहे. संपूर्ण जीवनामध्ये जो काही चांगली अथवा वाईट कृत्ये केली असतील त्याच्या हिशोब होतो. आणि अंतिम वेळी सर्व दुष्प्रवृत्तींच्या परित्याग करणे, मन, वचन आणि शरीराला संयमात ठेवणे, ममतेला मनातून काढून समतेमध्ये रममाण करणे, आत्मचिंतन करणे, आहार इत्यादी सर्व उपाधींचा त्याग करून आत्म्याला निर्द्वन्द्व आणि निःस्पृह बनविणे हा संथाऱ्याचा अर्थात संस्तारकाचा आदर्श आहे.

मृत्यूने भयभीत होऊन त्याच्यापासून वाचण्यासाठी पापपूर्ण प्रवृत्ती जोपासणे, रडणे आणि उदास होणे योग्य नाही. जैन धर्माचा हा पवित्र आदर्श आहे की जोपर्यंत जगावे तोपर्यंत आनंदाने जगावे आणि जेव्हा मृत्यू येईल तेव्हा विवेकपूर्वक आनंदाने

मरावे. संयम, साधना, तप, आराधना करता करता अधिक जगण्याचा प्रयत्न करा आणि जेव्हा जीवनाच्या लालसेमध्ये धर्मापासून च्यूत व्हावे लागेल असे वाटले तर धर्म आणि संयमामध्ये दृढ राहून समाधीमरणासाठी हसता हसता तयार व्हावे. मृत्यू कशाप्रकारेही टाळता येत नाही पण संथाऱ्याच्या साधनेद्वारा मृत्यूला सफल करू शकतो.

ह्या प्रकीर्णकामध्ये संस्तारकाच्या प्रशस्ततेचे अत्यंत सुंदर शब्दात वर्णन केले गेले आहे. ज्यांनी संथारायुक्त पंडित मरण प्राप्त केले त्यांचे वर्णन ह्या प्रकीर्णकात आहे.

जे देहत्याग करू इच्छितात ते भूमीवर दर्भ (घास) इत्यादींनी संस्तारक अर्थात झोपण्याचे अंथरुण तयार करून त्याच्यावर झोपतात. त्या अंथरुणावर स्थिर होऊन साधक साधनेद्वारा संसार सागर पार करतो.

संथाऱ्यामध्ये साधक सगळ्यांकडे क्षमायाचना करून कर्माचा क्षय करतो आणि तीन भवामध्ये मोक्ष प्राप्त करू शकतो.

७) गच्छायार - गच्छचार - ह्यांच्यामध्ये गच्छ अर्थात समूहात राहण्याच्या श्रमणांच्या आचाराचे वर्णन आहे. हे प्रकीर्णक महानिशिथ, बृहत्कल्प आणि व्यवहार सूत्राच्या आधारे लिहिलेले आहेत. असदाचारी श्रमण गच्छामध्ये राहतो आणि तो संसारपरिभ्रमण वाढवतो. पण जो सदाचारी श्रमण गच्छामध्ये राहतो तो धर्मानुष्ठानाची प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढवत जातो जो आध्यात्मिक साधनेमध्ये उत्कर्ष करण्याचा इच्छुक आहे त्याने जिवंत असेपर्यंत गच्छामध्येच राहिले पाहिजे कारण गच्छामध्ये राहिल्याने साधनेत अडचण येत नाही.

ह्यांच्यामध्ये 'गच्छ, गच्छातील साधू, साध्वी, आचार्य यांचे परस्पर व्यवहार नियम, इत्यादींचे विस्तृत वर्णन आहे. ब्रह्मचर्यचे पालन करताना श्रमणवृंदाला नेहमी जागृत राहण्यासाठी प्रेरित केलेले आहे. हा विषय अधिक स्पष्ट करण्यासाठी सांगितले आहे की स्थविरांच्या चित्तामध्ये दृढता असते तरी सुद्धा ज्याप्रमाणे तूप अग्नीजवळ असल्यावर द्रवित होते त्याचप्रमाणे स्थविरांच्या संपर्कने साध्वीचे चित्त द्रवित होण्याची शंका टाळता येणार नाही.

'चंदोवज्झय' हा गच्छाचाराचा दुसरा भाग आहे. ह्याच्यामध्ये विनय, आचार्य गुण, शिष्य गुण, विनयनिग्रह गुण अशा सात विषयांचे विस्तृत झाले आहे.

८) **गणिविज्जा -गणिविद्या** - हा ज्योतिष विषयक एक महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. "गणि" शब्द गणाचे अधिपती अथवा आचार्याच्या अर्थी आहे. संस्कृतमध्ये सुद्धा गणिन् शब्द ह्याच अर्थाने घेतला आहे. ह्या प्रकीर्णकाच्या नावाच्या पूर्वार्धात जो 'गणि' शब्द आहे तो गणनायकाच्या अर्थाने घेतलेला नाही. 'गणि' शब्दाची दुसरी व्युत्पत्ती सुद्धा आहे. 'गण्' धातूला 'इन्' प्रत्यय लावल्याने गणनाच्या अर्थी 'गणि' शब्द येतो. येथे तोच अर्थ अभिप्रेत आहे. कारण प्रस्तुत प्रकीर्णकामध्ये गणना संबंधी विषय वर्णित आहे.

ह्याच्यात दिवस तिथी, नक्षत्र, करण, ग्रहदिवस, मुहूर्त, शकुनबळ, लग्नबळ निमित्तबळ इत्यादी ज्योतिष संबंधी विषयांचे विवेचन आहे.

९) **देविंदथव-देवेंद्रस्तव** - ह्याच्यामध्ये बत्तीस देवेंद्राचे विस्तृत वर्णन आहे. ग्रंथांच्या सुरुवातीला कोणी श्रावक भगवान ऋषभदेवापासून चोवीसाव्या महावीर स्वामी तीर्थंकरांपर्यंत सगळ्यांची स्तुती करताना सांगतो. तीर्थंकर बत्तीस इंद्रांकडून पूजिलेले आहेत.' श्रावकाची पत्नी हे ऐकून जिज्ञासा प्रस्तुत करते की बत्तीस इंद्र कोणकोणते आहेत ? कसे आहेत ? कोठे राहतात ? कोणाची स्थिती कशी आहे ? भवन परिग्रह अर्थात त्यांच्या अधिकारात भवन अथवा विमान किती आहेत ? नगर किती आहेत? तिथल्या पृथ्वीची लांबी आणि रुंदी किती आहे ? त्या विमानाचे रंग कसे आहेत ? आहाराचा काळ किती आहे ? श्वासोच्छवास कसे आहेत ? अवधीज्ञानाचे क्षेत्र किती आहे ? इत्यादीविषयी मला सांगा.

श्रावकाने तिच्या शंकेचे निरसन करताना देवता इत्यादींचे जे वर्णन केलेले आहे तोच ह्या प्रकीर्णकाचा वर्ण्य विषय आहे.

ह्याच्यात बत्तीस इंद्राचा उल्लेख करण्यास सांगितले आहे. परंतु त्यापेक्षा अधिक प्रमाणात इंद्राविषयी येथे चर्चा केलेली आहे.

१०) **वीरत्थओ वीरस्तुती** - ह्या प्रकीर्णकाऐवजी डॉ. मुनी नगराज आणि आचार्य देवेंद्रमुनी महाराजांनी मरणसमाधी प्रकीर्णकाचा उल्लेख केला आहे. ज्याचे विवेचन पुढे करण्यात येईल.

आगमदीप प्रकाशनाद्वारे प्रकाशित झालेल्या पंचेचाळीस आगमांच्या गुर्जर छायेमध्ये वीरत्थओ प्रकीर्णक घेतले आहे. त्याच्या त्रेचाळीस गाथा आहेत. सुरवातीला वीर जिनेश्वराला नमस्कार करून त्याच्या नावाने त्याची स्तुती केलेली आणि त्या त्या

वर्णन केलेले आहे. सहाव्या अध्ययनामध्ये आलोचनाच्या दहा भेदांचे आणि प्रायश्चित्ताच्या चार भेदाचे सुद्धा वर्णन आहे. ह्या सूत्रांची भाषा आणि विषयवस्तू पाहता ह्यांची रचना अर्वाचीन आहे असे वाटते.

जीयकल्प - जीतकल्प सूत्र - ह्याचे रचनाकार सुप्रसिद्ध भाष्यकार जिनभद्रगणी क्षमाश्रमण मानले जातात. ह्या सूत्रामध्ये जैन श्रमणांच्या आचारासंबंधी प्रायश्चित्ताचे विधान आहे. प्रायश्चित्ताचे महत्त्व, आत्मशुद्धी अथवा अंतःपरिष्काराची उपादेयता ह्या विषयांचे ह्यात प्रतिपादन केले आहे.

'प्रायश्चित्त' समास दोन शब्दांच्या योगाने निष्पन्न होतो. प्रायः चा अर्थ 'पाप' आहे आणि 'चित्त' याचा अर्थ 'विशोधन करणे' असा आहे.

'प्रायस्य पापस्य चितं विशोधनं' अर्थात पाप शुद्ध करण्याच्या क्रियेचे नाव प्रायश्चित आहे. ''प्रायः नाम तपः प्रोक्तं चित्तं निश्चय उच्येत, तेंपोनिश्चय संयोगात् प्रायश्चित्तमितीर्यते''[४४] (रघु. १२/१९)

ह्याच्यात प्रायश्चिताच्या दहा भेदांचे विवेचन आहे. १) आलोचना २) प्रतिक्रमण ३) मिश्र-आलोचना-प्रतिक्रमण ४) विवेक ५) व्यूत्सर्ग ६) तप ७) छेद ८) मूळ ९) अनवस्थाप्य १०) पारांचिक

पिंडनिज्जुत्ति, ओहनिज्जुत्ति पिण्डनिर्युक्ती, ओघनिर्युक्ती

'पिंड' शब्द जैन पारिभाषिक दृष्टीने भोजनाचा वाचक आहे. प्रस्तुत ग्रंथामध्ये आहार एषणीयता, अनेषणीयता इत्यादी संदर्भात उद्गम इत्यादी दोष आणि श्रमण जीवनाच्या आहार, भिक्षा इत्यादी गोष्टींबद्दल विस्तृत विवेचन आहे.

दशवैकालिकाच्या पाचव्या अध्ययनाचे नाव 'पिण्डैषणा' आहे. ह्या अद्ययनांवर आचार्य भद्रबाहु यांची निर्युक्ती अत्यंत विस्तृतपणे झाली आहे. त्यामुळे ह्याला 'पिंडनिर्युक्ती' नावाने स्वतंत्र आगमाच्या रूपात स्वीकारले आहे.

ओघनिर्युक्ती 'ओघ'चा अर्थ प्रवाह, सातत्य, आणि ओघनिर्युक्ती' म्हणजे 'परंपरेने प्राप्त उपदेश' असा अर्थ होतो. जसे पिंडनिर्युक्तीमध्ये साधूच्या आहाराविषयी विवेचन आहे त्याचप्रमाणे ह्यात साधूच्या जीवनाशी संबंधित आचार व्यवहार याविषयी थोडक्यात विवेचन आहे.

पिंडनिर्युक्ती ज्याप्रमाणे दशवैकालिक निर्युक्तीचा अंश मानला जातो

त्याचप्रमाणे 'ओघनिर्युक्तीला' आवश्यक निर्युक्तीचा' एक अंश मानला जातो, ज्याची रचना आचार्य भद्रबाहुंनी केली आहे.

ओघनिर्युक्ती हे प्रतिलेखनाद्वार, आलोचनाद्वार आणि विशुद्धीद्वार यामध्ये विभक्त आहे. प्रकरणाच्या नावावरूनच हे स्पष्ट होते की साधुजीवन चर्येचा ह्याच्यात समावेश आहे.[४५]

पिंडनिर्युक्ती आणि ओघनिर्युक्ती ह्या दोन निर्युक्तीचा पंचेचाळीस आगमामध्ये समावेश का केला असावा ? असा प्रश्न उपस्थित होतो. आणि दोन्ही वेगवेगळ्या आगम अंशाच्या निर्युक्त्या असताना सुद्धा दोन्ही नावे बरोबर का दिली ? हे सुद्धा चिंतनीय आहे. वस्तुतः दोन्ही विषय साधुजीवनाशी संबंधित असल्याने एकत्र दिले असावे असे वाटते.

परंतु निर्युक्त्या अजूनही आहेत. त्यांचा आगमामध्ये समावेश केला जात नाही. ह्या निर्युक्ती न मिळविल्यास आगमांची संख्या पंचेचाळीस होणार नाही आणि दोन्ही वेगवेगळ्या मानल्या तर आगमांची संख्या सेहेचाळीस होईल. म्हणून दोन्हींचे विवेचन बरोबर केले असावे असे अनुमान केले जाऊ शकते. हा विषयही विचार करण्यासारखा आहे.

अशाप्रकारे श्वेतांबर स्थानकवासी आणि तेरापंथी परंपरेद्वारा मान्य बत्तीस आगम आणि हे बत्तीस तसेच दुसरे तेरा आगम, जे श्वेतांबर मूर्तीपूजक संप्रदायाला सुद्धा मान्य आहेत, अशा पंचेचाळीस आगमांच्या विषयवस्तूचे थोडक्यात इथे प्रतिपादन केले आहे कारण आगमांच्या आधारावर जैन सिद्धांताची इमारत उभी आहे म्हणून सर्वप्रथम आगमांचे विवेचन केलेले आहे.

उपरोक्त आगम वाङ्मयाच्या उत्तरवर्ती काळात निरनिराळ्या आचार्य मुनी आणि विद्वानांनी जैन सिद्धांताच्या आधारावर प्राकृत आणि संस्कृतमध्ये अनेक ग्रंथांची रचना केली. ज्यात गद्यात्मक व पद्यात्मक शैलीतच लिहिले गेले. ते प्रबंध काव्य, चरित्र काव्य, सिद्धांत ग्रंथ, कथा इ. रूपात प्राप्त होते. हे सर्व साहित्य भारतीय विद्येची (Indology) अमूल्य निधी आहे.

या आगम वाङ्मयाच्या आधारावरच आजही जैन सिद्धांत जिवंत आहेत. ह्या विशाल वाङ्मयात धर्माचे अनेक विषय प्रतिपादिले आहेत.

भावनेच्या ह्या मूळ स्रोताने आगमातून प्रवाहित होत होत उत्तरवर्ती साहित्यामध्ये विशाल नदीचेच रूप धारण केले. याचे विभिन्न प्रसंगी कोठे सांकेतिक, कोठे संक्षिप्त तर कोठे विस्तृत रूपात वर्णन झालेले आहे. पुढील प्रकरणात या विषयाबाबत विस्तृत विवेचन केले जाईल.

संदर्भ

१. उत्तरा. सू. १४/१३ पृ. २२७ 'खणमित्त सोक्खा बहुकाल-दुक्खा ।'

२. एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्व मानवाः ॥
मनुस्मृती अ. २ श्लो. २० पृ. ७०

३. जम्बू प्र. सू. २/२४ पृ. २७

४. स्था. सू. ६/२३-२४ पृ. ५४०

५. Hindu civillzation - Radha Kumud Mookerji p. 159

६. उत्तरा सू. २५/३२-३३ पृ. ४३०

७. धम्मपद धम्मट्ठ वग्ग ९-१० पृ. ११८

८. सम. सू. ३४/२२-२३ पृ. १०१

९. आव. सू. अ. ४ पृ. ७०

१०. आव. सू. अ. ४ पृ. ७३

११. सम. सू. १२-५११ पृ. १७१

१२. स्था. सू. ७/१४० पृ. ६१३

१३. उत्तरा. सू. ७/१४२ पृ. ६१३ ते ६१९; जै. द. म. और मि. ले. मुनी नथमलजी पृ. ६४ ते पृ. ७०

१४. उत्तरा. सू. ३/९ पृ. ६४ ते ६७

१५. कल्प सूत्र १९४ पृ. २५६

१६. जै. आ. सा. मे. भा. स. पृ. ३ ले जगदिशचंद्र

१७. ऋग्वेद ६/२६/४

१८. 'हठयोग प्रदीपिका' श्री आदिनाथय नमोऽस्तु तस्मै येनोपादिष्य हठयोगविद्या श्लोक. १ पृ. १

१९. धम्मपद 'ब्राह्मणवग्गो' गा. ४० पृ. १३१ ''उसमभं पवरं वीरं मेहसि विजिताविन ।''

२०. ऋग्वेद मं. १ सू. १९०

२१. जम्बू प्र. सू. २/३८ पृ. ६२-६३

२२. उपा. सू. १/९ पृ. १३

२३. उत्तरा. सू. अध्य. १२ पृ. १८७

२४. उपा. सू. ७ अध्य पृ. १४१
२५. भारतीय दर्शन भा. १ ले. डॉ. राधाकृष्णन
२६. विशे. भा. ले. जिनभद्रगाणि क्षमाश्रमण गा. १०९४-१९९५ पृ. २८५
२७. क - आ. यु. जै. द. पृ. १५, १६
ख - जै. आ. सा. भा. स. पृ. २९
ग - उपा. सू. प्रस्ता. पृ. ४
घ - जै. आ. सा. म. मि. पृ. ३५
२८. आ. यु. जै. द. ले. दलसुख मालवणिया पृ. २०
२९. जैन लक्षणावली भा. १ पृ. ७९
३०. भा. स. मे. जै. ध. का. यो. ले. डॉ. हिरालाल जैन पृ. ५१-५२
३१. 'साहित्य और संस्कृती' ले. आ. देवेंद्रमुनी शास्त्री पृ. २
३२. आचा. नि. गा. ९ आ. भद्रबाहुस्वामी
३३. आचा. चुर्णी पृ. ३
सत्व तित्थयरा विय आयारस्स अत्थं पढमं उइक्खंति ततो सेसंगाणं
एक्कारसन्हं अंगाणं ताए चेव परिवाडीए गणधरा वी सुत्तं गुथंति
३४. प्रश्नव्याकरण - वृत्तींच्या प्रारंभी आ. अभयदेव सूर
३५. प्रश्नव्या. सू. प्रस्तावना पृ. १९-२०
३६. औप. सू. प्रस्तावना आ. देवेंद्रमुनी म. पृ. १६
३७. जैन आगम सा. म. मि. ले. देवेंद्रमुनी शास्त्री पृ. २७१
३८. व्यवहार भाष्य - उदे ३ गाथा १७६
३९. दशा. सू. ४/१ पृ. २०
४०. जैन आगमसाहित्य मनन और मीमांसा ले. आचार्य देवेंद्रमुनी शास्त्री
पृ. ३८८
४१. जैन आगम दिग्दर्शन - ले. डॉ. मुनी नगराज पृ. १७०
४२. जैन आगम दिग्दर्शन - ले. डॉ. मुनी नगराज पृ. १७१
४३. आउर पच्चक्खाण पइण्णयं - गा. ७० पृ. २३ (पुस्तक 'आगम दीप')
४४. संस्कृत हिन्दी कोश - वामन शिवराम आपटे, पृ. ६९१
४५. जैन आगम दिग्दर्शन. डॉ. नगराज पृ. १४५ ते १४८

❊ ❊ ❊

प्रकरण २ रे

भावना विचार आणि मन

प्रकरण २ रे

भावना विचार आणि मन

प्रकरण २ रे

भावना विचार आणि मन

भारतीय साहित्यामध्ये 'भावना' शब्द अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. भावना मानवी जीवनाची अद्भूत शक्ती आहे. हृदयातील लोकजगताला 'भाव लोकजगत' म्हटले आहे. दुःख, वेदना, व्यथा, सहानुभूती, प्रेम, रसास्वादन, संवेदन, आसक्ती विरक्ती, राग-वैराग्य, विनय, भक्ती हे हृदयाचे भाव आहेत. आत्म्याच्या पतनाचा अथवा उत्थानाचा आधार भावच आहे. म्हणूनच आचार्य श्री सिद्धसेन दिवाकर यांनी सांगितले आहे की, -

यस्माक्रियाः प्रतिफलन्ति न भावशून्याः॥१

साधनेचा प्राण भावना आहे. ज्या साधनेच्या आणि क्रियेच्या मागे भावना आहे, भक्ती आहे, हृदय आहे त्याच सफल होतात. अन्यथा भावशून्यतेने अथवा हृदयशून्यतेने होणाऱ्या सर्व क्रिया व्यर्थ आहेत. ते केवळ अवडंबरच असते. त्याचे परिणामही विपरीत होतात. म्हणून साधकाची साधना भावयुक्त असली पाहिजे.

अंतरंगामध्ये उत्पन्न होणाऱ्या विचार लहरी ज्या विशेष रूपाने स्फुरण पावलेल्या असतात त्यांना सुद्धा 'भावना' म्हटले जाते.

विचार हा जीवनाचा पाया आहे, पाया मजबूत नसेल तर मजबूत घर बनू शकत नाही. जीवनामध्ये विवेकयुक्त आचरण आणि भाव नसेल तर ते जीवन केवळ पशूसारखेच असते. तसे पाहिले तर मनुष्य विचारशील प्राणी आहे. नरकातले जीव दुःखी आणि दीन आहेत, स्वर्गातले जीव सुखामध्ये लीन आहेत, तिर्यंच पशुपक्षी इत्यादी विचारशून्य प्राणी आहेत. त्यांच्यामध्ये विचारशीलता, बुद्धी, भावना आणि विवेक यासारखी शक्ती नाही. एक मनुष्यप्राणीच असा आहे ज्याला विचारक्षमता, बुद्धीची प्रेरणा व योग्यता आहे. आजच्या ह्या विज्ञानयुगात तर मानवाची जिज्ञासा दिवसेंदिवस वाढत चालली आहे. तो जे काही पाहतो, ऐकतो त्या सगळ्यांचे रहस्य जाणण्यामध्ये आणि त्यांच्यातील भेद समजून घेण्यामध्ये इतका व्यस्त झाला आहे की तो स्वतःला विसरला आहे. आज मानव चंद्रावर पोहचून निरीक्षण करून आला आहे. परंतु किती आश्चर्याची गोष्ट आहे की तो आपल्या आंतरीक भूमीचे निरीक्षण करू शकला नाही. तो बाह्यद्रष्टा बनला. परंतु आंतरीक

द्रष्टयाची भूमिका थोडी सुद्धा बजावू शकत नाही. त्याने थोडा विचार केला पाहिजे की केवळ बाह्य दर्शनाने काय साध्य होईल ? काय अपरिमित भौतिक साधने त्याला शांती देऊ शकतील ? कधीच नाही. जे क्षणिक आहे, नाशवंत आहे ते जरी सुखदायक वाटत असले तरी तो केवळ सुखाभास आहे. खरे सुख अंतरात्म्यामध्ये आहे, जे शाश्वत आहे, अजर, अमर, अविनाशी आहे. परंतु दुःखाची गोष्ट अशी आहे की, मी कोण आहे ? कोऽहं ? हा सर्वात प्रथम, सोपा परंतु महत्त्वपूर्ण प्रश्न मनुष्याच्या मनामध्ये उठत नाही. विश्वदर्शनाचा जिज्ञासू आत्मदर्शन करणेच विसरला. उघड्या डोळ्यांनी ज्या देहाला तो पाहतो त्यालाच 'मी, मी' म्हणत राहतो. हा त्याचा सर्वात मोठा भ्रम आहे. ह्या खोट्या भ्रमासाठी कोण उत्तरदायी आहे ?

भौतिकतेच्या भीषण अंधकारामध्ये निमग्न मानवाला अध्यात्मरसाचा दिव्यप्रकाश देण्यासाठी आणि अज्ञानाच्या घोर निद्रेतून जागे होऊन आत्मविकासाच्या मार्गावर अग्रेसर होण्यासाठी ज्ञानी पुरुषांनी अनेक मार्ग दाखवले आहेत. त्यामध्ये भावना शुभ आणि शुद्ध ठेवणे हे सुद्धा एक आध्यात्मिक अनुष्ठान आहे.

"ज्या साधकाचा आत्मा भावनायोगाने विशुद्ध झाला आहे तो आत्मा पाण्यात स्थिर असलेल्या नौकेप्रमाणे संसारसागराला पार करून सर्व दुःखापासून मुक्त होऊन सुख प्राप्त करू शकतो."[२]

किनाऱ्यावर पोहचलेली नाव ज्याप्रमाणे विश्राम करते त्याचप्रमाणे भावनायोगाची साधना करणारे साधक सुद्धा संसार सागराच्या किनाऱ्यावर पोहचून सर्व दुःखापासून मुक्त होतात. त्यांच्या आत्म्याला भवभ्रमणापासून शांती मिळते.

असा प्रश्न उद्‌भवतो की विचार अथवा चिंतनाचे भावोद्वेलन आणि भावना ह्यात काय फरक आहे. बाह्यरूपाने पाहिले तर ते सारखेच दिसतात परंतु सूक्ष्म दृष्टीने चिंतन केले तर भावनेचे काही विशेष तात्पर्य आहे. कोणत्याही एका तत्त्वावर, विषयावर अथवा पक्षावर निरंतर विचार करणे, ते मनात ठेवणे त्याच्याबरोबर सातत्याने संयुक्त राहणे म्हणजे भावना होय. विचारांचे जीवन घडविण्याच्या दृष्टीने फार महत्त्व आहे. ते चिंतन आणि भावनेच्या रूपातच आहे. सद्‌विचार अथवा सुविचार किंवा चिंतन, मनन हेच भावनेचे रूप घेतात.

जोपर्यंत हे शरीर, मन आणि इंद्रिये आहेत तोपर्यंत जीवनामध्ये चंचलता विद्यमान असते. मनाची चंचलता अधिक असेल तर तो प्रत्येकवेळी काही ना काही विचार करतच

राहतो. त्याच्यामध्ये वेगवेगळे भाव उमटतच राहतात. इतकेच काय, जेव्हा तो इंद्रिये सक्रिय नसतात तेव्हाही मन अक्रिय राहत नाही. कोणतेही कार्य करायचे असेल तर प्रथम त्याचे भावमय आणि विचारात्मक रूप मनात निर्माण होते. जसे ते निर्माण होते त्यांची बाह्यपरिणती सुद्धा त्याचप्रमाणे बदलते म्हणून सर्वप्रथम मनाला वश करणे अत्यंत आवश्यक आहे.

"मनुष्याचे मनच बंधन आणि मोक्षाचे कारण आहे. इंद्रिय विषयभोगामध्ये आसक्त झालेले मन बंधन करणारे आहे आणि विषयभोगापासून मन जेव्हा अनासक्त होते तेव्हा तेच मन मोक्षाचा हेतू बनतो. ज्यांनी मनाला वश केले असेल त्यांच्यासाठी मन सर्वश्रेष्ठ बंधु आहे आणि ज्यांनी मनाला वश केले नाही त्यांचे मनच त्यांचा परम शत्रू आहे."[३]

ह्या मनासंबंधी श्री मुनीसुंदर सूरी यांनी फार सुंदर सांगितले आहे, "जप केल्याने मोक्ष मिळत नाही किंवा बाह्य व आभ्यंतर अशा दोन प्रकारचे तप केल्याने मोक्ष मिळत नाही, तसेच संयम, दमन आणि मौन धारण केल्यानेही मोक्ष मिळत नाही आणि पवन इत्यादींची साधना केल्याने सुद्धा मोक्ष मिळत नाही. परंतु चांगल्याप्रकारे वश केलेले मनच मोक्षाचे कारण आहे."[४] म्हणून मनामध्ये जे अशुभ संकल्प-विकल्प उठतात ते दूर केले पाहिजेत. मनोनिग्रहाशिवाय सर्व बाह्य अनुष्ठान व्यर्थ आहे.

संसारी मनुष्याचे जीवन बहिर्मुखच असते. तो बहिरात्मभावातच निमग्न राहतो. म्हणून त्याच्या अंतःकरणाचा भाव विकृत आणि दूषित राहतो. ते विकार आणि दूषण त्याला कुमार्गावर घेऊन जातात. म्हणून भाव शुद्धीवर जैनशास्त्रात जास्त जोर दिला आहे. उत्तराध्ययन सूत्रामध्ये भावाचे महत्त्व सांगताना श्रमण भगवान महावीर स्वामी सांगतात की, "भाव सत्याने जीवात्मा भावशुद्धी-भावनेची शुद्धता प्राप्त करतो आणि भावशुद्धी झाल्यावर तो सर्वज्ञ निरूपित धर्माची आराधना करण्यासाठी तत्पर होतो. सर्वज्ञभाषित धर्माची आराधना करण्यामध्ये उद्युक्त व्यक्ती परलोकधर्माचा आराधक होतो."[५]

जेव्हा भावनेमध्ये शुद्धता येते तेव्हा साधक अध्यात्मविकासाच्या मार्गाचा अवलंब करतो.

आचार आणि विचार ह्या जीवनाच्या दोन बाजू आहेत. विचारांचा संबंध ज्ञानाबरोबर आहे आणि आचाराचा संबंध क्रियेबरोबर आहे. जैन धर्मात ज्ञान आणि क्रिया याद्वारे मोक्षाची प्राप्ती स्वीकारलेली आहे.

'पढमं णाणं तओ दया'[६] ही आगमोक्ती ज्ञानाच्या महत्त्वाला प्रकट करते.

''नाणेन विणा न हुंति चरण गुणा''[७] ज्ञानाशिवाय चारित्र्यगुणांचा विकास होत नाही. ज्ञान आणि चारित्र्यमय जीवनाला सुदृढ बनविण्यासाठी जैन धर्मात भावाच्या परिष्कारावर, परिमार्जनावर जोर दिला आहे. जर भाव पवित्र आणि निर्मळ असतील तर मनुष्य सद्ज्ञान आणि सत्कर्माच्या दिशेत पुढे जाण्याची प्रेरणा प्राप्त करू शकेल. ज्ञानाराधनेचा मार्ग मानव तेव्हाच स्वीकारतो जेव्हा त्याच्या अंत:करणात तद्रूप भावनेची सुरसरीता प्रवाहित होऊ लागते म्हणून जैन साधनेमध्ये भावनायोगाचे अत्यंत महत्त्व आहे. भावना योगाबरोबर तेव्हा संयुक्त होते जेव्हा आत्म्याला परमात्म्याशी जोडण्याची त्याच्या अंत:करणामध्ये उभारी येते, भावनेमध्ये तो वेग ती तीव्रता येते ज्याच्याद्वारे साधक अंतरात्मभावाने परमात्म भावाच्या दिशेकडे गतिशील होण्याची प्रेरणा प्राप्त करतो. अध्यात्माबरोबर संयुक्त होणे हाच भावनायोग आहे.

भावना आणि अनुप्रेक्षा शब्दाची उत्पत्ती, परिभाषा आणि आशय

'भावना' शब्द संस्कृतच्या 'भू' धातूपासून बनला आहे. ह्याचे अनेक अर्थ होतात.[८]

'भावयति इति भावना' ह्या व्युत्पत्तीनुसार ज्यात भाव व्यक्त केला जातो त्याला भावना म्हणतात.

'योग' शब्द संस्कृतमधील 'युज्' धातूपासून बनला आहे. जो जोडतो त्याला 'योग' म्हणतात. भावनेबरोबर जेव्हा योग शब्दाचा संयोग होतो तेव्हा त्याचा 'आत्म्याचे आत्म्याबरोबर मिलन' असा अर्थ होतो. 'भावना' आत्म्याला परमात्म्याशी जोडण्याचे सर्वोत्तम साधन आहे.

भावना अशुद्धीच्या आवरणाने आच्छादिलेल्या आत्म्याला शुद्धत्वाबरोबर जोडते.

जैन शास्त्रामध्ये ह्यासंदर्भात म्हटले आहे की मनाला भाव प्रकर्षतापूर्वक शुद्धत्वाबरोबर संयुक्त करणे म्हणजे भावना होय.

आगम ग्रंथाच्या टीकाकारांनी त्याचप्रमाणे अन्य आचार्य आणि विद्वानांनी भावनेचे वेगवेगळे स्वरूप, उपलब्धी आणि परिभाषा इत्यादींवर विस्तृत विचार केला आहे. त्यातल्या अनेक परिभाषांचा उल्लेख येथे केला जाईल.

चित्ताचा अभिप्राय भाव अथवा भावना आहे.[९] ह्यामध्ये भावनेच्या अभिप्राय

पक्षाकडे संकेत केला आहे. अभिप्राय वास्तविक चित्ताची आंतरिक वृत्ती आहे, ज्याचे प्रकटीकरण जीवाच्या वचन आणि शरीराच्या संकेताद्वारे होते. कोणत्याही विशेष पदार्थाविषयी अथवा लक्ष्याप्रती जेव्हा मनामध्ये काही विचार उठतात तेव्हा त्यांना अभिप्राय म्हटले जाते. त्याला चित्ताची भावात्मक स्थिती सुद्धा म्हणू शकतो. अभिप्राय जेव्हा प्रबळ बनतो तेव्हा तो संबंधित पदार्थ आणि क्रियेबरोबर इंद्रियांच्या माध्यमाने संयुक्त होतो म्हणजे तो भावमूलक आहे.

भावनेला 'अध्यवसाय' सुद्धा म्हणतात.[१०] जेव्हा मन एखाद्या कार्याप्रती उत्सुक होते आणि मनामध्ये त्या कार्याविषयी पुन्हा पुन्हा चिंतन चालू राहते, त्या विचार तरंगांना 'अध्यवसाय' म्हणतात. मनातील विचाररूपी तरंगाद्वारे हिंसारूपी पाप नष्ट करून आत्म्याला विशुद्ध करण्याचे कार्य केले जाते. म्हणून भावनेला deep and constant reflection म्हणजे आत्म्यातील विचार तरंगांचे, शुभविचारांचे सूक्ष्मतेने निरीक्षण करणे त्या विचारांना स्थायी रूप देणे. जेव्हा कोणतेही काम करण्याचा उत्साह असतो तेव्हाच अशी स्थिती बनते, उत्साहाने जी कार्ये केली जातात ती सजीव होतात, त्या कार्यांमध्ये ओजस्विता येते. ज्ञानपूर्वक कार्यामध्ये संलग्न आणि समुद्यत राहणे अध्यवसाय आहे.

"भावना शब्द अंतःकरणाची वृत्ती आणि भेदाच्या अर्थात आहे."[१२] अंतःकरण म्हणजे इंद्रिये. ही दोन प्रकारची आहेत - बाह्य आणि आंतरिक. नेत्र, नासिका इत्यादी बाह्य इंद्रिये आहेत. मन हे आंतरेंद्रिय आहे. म्हणूनच मनाला अंतःकरण म्हणतात. बाह्येंद्रिये स्थूलरूपात कार्य निष्पन्न करतात. मन हे चिंतन आणि विचाराच्या रूपामध्ये मग्न राहते, हे त्या कार्याचे सूक्ष्मरूप आहे. मन किंवा अंतःकरणाची वृत्ती आणि त्याची वेगवेगळी रूपे भावात्मक असतात. मन हेच भावात्मक कर्माला इंद्रियापर्यंत पाठवते, ज्यांना इंद्रिये स्थूलरूप प्रदान करतात."

"अंतःकरणाची परिणती विशेष म्हणजचे भाव होय."[१३]

"भावनेचे तात्पर्य आलोचना आहे."[१४]

आलोचना हा शब्द 'आ' उपसर्गपूर्वक 'लोचन' शब्दापासून बनला आहे. त्याचा अर्थ 'आ'- समन्तात - चारहीबाजूने, पूर्णपणे आणि 'लोचन' म्हणजे 'बघणे' अर्थात 'चारहीबाजूने, पूर्णपणे पाहणे म्हणजे 'आलोचना' होय. येथे बघण्याचा अर्थ 'बाह्य चक्षूने बघणे' असा नाही. परंतु कोणत्याही विषयावर अथवा वस्तुवर समग्ररूपाने चिंतन करणे, मनोभावात त्याच्या स्वरूपाला अंकीत करणे असा अर्थ आहे.

'आवश्यक' सूत्राचे प्रसिद्ध टीकाकार आचार्य हरीभद्र यांनी भावनेची परिभाषा करताना लिहिले आहे की, 'भाव्यतेऽनयेति भावना'[१५] ही भावनेची शाब्दिक व्युत्पत्ती आहे. ह्याचा आशय हा आहे की, ज्याच्याद्वारे मनाला भावान्वीत केले जाते ती भावना आहे. अथवा ज्याच्याद्वारा मनाला भावित केले जाते त्याला 'भावना' म्हणतात. भावान्वित होणे म्हणजे भावनेने भरून जाणे, ओतप्रोत परिपूर्ण होणे. जेव्हा मनामध्ये उत्तरोत्तर भावशृंखला वाढत जाते तेव्हा मन तितकेच भावनेने द्रवित होत जाते.

'विशुद्धभाव म्हणजे पवित्र विचार, ही जीवनाची सुगंध आहे.'[१६] 'भावना' शब्द अभ्यास आणि क्रियेचाही सूचक आहे.[१७] अभ्यास शब्दाचा मतितार्थ 'कोणत्याही कार्याला पुन्हा पुन्हा करणे.' असे केल्याने कार्यामध्ये परिपक्वता आणि दृढता येते. अभ्यासाशिवाय कोणतीही गोष्ट जास्त काळापर्यंत टिकत नाही. मनुष्य विसरून जातो म्हणून विद्या, साधना, क्रिया सगळ्यांच्या विकासासाठी अभ्यास आवश्यक आहे. तो अभ्यास सुद्धा सम्यक् असला पाहिजे.

"क्रियेचा सम्यक् अभ्यास भावना आहे."[१८]

येथे अभ्यासाबरोबर सम्यक् शब्द जोडलेला आहे. तो अभ्यासाच्या विशेषतेला प्रकट करतो. खऱ्या भावोद्रेकाने अभ्यास केला जातो तो फारच व्यवस्थित आणि उत्तम होतो. त्या अभ्यासाबरोबर आंतरीक वृत्ती जोडलेली असते.

'अभ्यास आणि भावना एकार्थक आहेत'[१९] जसे -

अभ्यास कोणत्याही कार्याला पुन्हा पुन्हा करण्याच्या अर्थाने आहे. तसाच भावनेचा अर्थ सुद्धा सतत अभ्यास, चिंतन, मनन, अनुप्रेक्षण करण्यात आहे. तो अभ्यासच हळूहळू भावनेच्या रूपात परिणत होतो. "ज्या विशुद्ध प्रयत्नाने जीव भावित होतो, त्याला भावना म्हणतात.[२०] ज्याचे अंतःकरण भावात्मक होते, भावनेने तरल होते. आत्मवृत्तीने परिपूर्ण होते. तेव्हा भावनेचा उद्रेक सत्वोन्मुखी होत जातो बहिरात्मभाव सुटत जातो आणि अंतरात्मभाव जागृत होतो. ह्या परिभाषेनुसार भावना असंख्य प्रकारच्या होऊ शकतात. भावनेची विभिन्न रूपे आहेत. प्रत्येक क्रियेबरोबर कोणती ना कोणती तरी भावना असल्याने भावनेचा अनेक दृष्टिकोनातून अनेक अर्थाने प्रयोग केला आहे.

'भावनेचा आशय परिकर्म सुद्धा आहे.'[२१]

'परिकर्म' शब्द 'शारीरिक सजावट' या अर्थाने सुद्धा उपयोजितात. ज्याप्रमाणे

शरीराला अलंकृत केले जाते, अंगराग, तेल, अत्तर इत्यादींनी सुगंधित केले जाते त्याचप्रमाणे मनाच्या विचारधारेला अथवा चिंतनधारेला भावनेने शुद्ध करणे, पवित्र करणे, सजविणे म्हणजे परिकर्म होय. शारीरिक परिकर्माचा विषय बाह्य सौंदर्य आहे, तेव्हा आंतरीक परिकर्माचे लक्ष्य आंतरीक सौंदर्य आहे जे जीवनाच्या पवित्रतेसाठी आहे.

चित्तामध्ये पुन्हा पुन्हा भावांचा उद्‌भव होणे, येणे, स्थिर होणे म्हणजे भावना आहे.[२३] जसे लोक एखाद्या ठिकाणी जाऊन पडाव टाकतात आणि तिथेच टिकून राहतात, धर्मशाळेतल्या लोकांप्रमाणे एक दिवस राहून निघून जात नाहीत. त्याचप्रमाणे मनात भावनेचा असा प्रवेश अवथा उद्‌भव होतो की ज्या सातत्याने टिकून राहतात आणि संस्काराचे रूप धारण करतात त्यांना भावना म्हणतात.

ज्यांच्यामध्ये पूर्वीचे संस्कार अखंड आहेत तरीही त्याच्या पुन्हा पुन्हा अनुष्ठानाला सुद्धा 'भावना' म्हणतात.[२३] ह्यात पूर्व संस्कार आणि पुन्हा पुन्हा चिंतनधारांना भावना रूप दिले आहे. वास्तविक ज्या विचाराच्या सतत चिंतनाने, संघर्षाने मन त्या अनुरूप भावित होत जाते त्या विचारांना 'भावना' म्हणतात.

अध्यात्म अनुर्वतनामध्ये स्थित होणे म्हणजे भावना आहे.[२४] याचा अर्थ असा की मनुष्य आत्मभावामध्ये निमग्न राहतो. आणि जो आत्मभावामध्ये लीन राहतो त्याचा बहिरात्मभाव आपोआप सुटतो. आचार्य सिद्धसेन दिवाकरांनी 'द्वात्रिंशिका' यामध्ये अत्यंत सुंदर विचार माडले आहेत - ''अभ्यासाने भावनेची वृद्धी होते. कारण भावना बुद्धीसंगत आहे असे केल्याने अशुभभावनेपासून मन निवृत्त होते. त्याच्या फलस्वरूपी प्रशस्त भावाची उत्तरोत्तर वृद्धी होते.[२५]

मुमुक्षुद्वारे अनित्यादी चिंतनांचा अभ्यास केला जातो, पुन्हा पुन्हा ज्याचे अनुभावन केले जाते त्याला भावना म्हणतात. [२६]

ज्यांच्या जीवनाचे लक्ष्य मोक्षप्राप्ती आहे, त्यांच्या मनामध्ये ज्या विचारधारा चालू असतात त्या आत्मोन्मुख असतात अशा चिंतनाने भावित होत राहणे त्या दृष्टीने अभ्यास करत राहणे भावना आहे.

भावनेचा आशय आत्म्याला प्रशस्त भावाने भावित करणे आहे. ज्याप्रमाणे शिलाजिताला लोहाची भावना देऊन त्याला शुद्ध आणि शरीर हितकारी रसायनांच्या रूपात उपयुक्त केले जाते त्याचप्रमाणे भावनेद्वारा व्रत आणि विचारांना शुद्ध, विशुद्ध आणि आत्महितकारी रसायनरूप बनवले जाते. अनादिकालापासून आत्म्याबरोबर संयुक्त झालेल्या

अशुभ भावांना शुद्ध करणे तेथे शुभ आणि शुद्ध भावाची प्रतिस्थापना करणे ही भावनेची विशेष उपयोगिता आहे.

छद्मस्थ साधकाचे ध्यान अंतर्मुहूर्त काळापर्यंत अवस्थित राहते. त्यानंतर ध्यानांतर होते तेव्हा चंचल चित्ताला स्थिर करून ध्यान साधनेमध्ये प्रवेश करण्यासाठी 'भावना' योग्य बनविते. भावना ही भ्रष्ट झालेल्या ध्यानाला पुन्हा जोडण्यासाठी माध्यम बनते. एक प्रकारे भावना चित्ताला समतोल बनविते, ज्याच्यावर ध्यानरूपीभवन निर्माण होते.[२७]

आचार्य कुंदकुदांनी 'बारस अणुवेक्खा' याचा उपसंहार करताना अत्यंत मार्मिक गोष्ट सांगितली आहे की, ''अनादि काळापासून आजपर्यंत जे पुरुष मोक्षाप्रत पोहचले आहेत ते बारा भावनांच्या चिंतनानेच निर्वाण-मोक्षाला पोहचले.[२८]

आचार्य हेमन्द्रांनी आपल्या योगशास्त्रामध्ये सांगितले आहे की, समभावाच्या प्राप्तीसाठी निर्ममत्वाची भावना आणि निर्ममत्वाची भावना जागृत करण्यासाठी द्वादश भावनेचा आश्रय घेतला पाहिजे.[२९]

आत्मस्वरूपाची भावना नसेल तर कोट्यावधी जन्म घेऊन, बाहू उंचावून आणि वस्त्राचा त्याग करून जीवाने जरी तपाचरण केले तरी त्याला मोक्षाची प्राप्ती होत नाही इतके भावनेचे महत्त्व आहे.[३०]

वैराग्यवर्धक भावना मुक्तीपथाचा आधार आहे. लौकिक जीवनामध्येही भावना अत्यंत उपयुक्त आहे. इष्ट वियोग आणि अनिष्ट संयोगाने उत्पन्न होणाऱ्या उद्वेगाला ह्या भावना शांत करतात. भावना व्यक्तीला विपत्तीत धैर्य आणि समृद्धीत विनम्रता शिकवते विषयांपासून विरक्त करते आणि धर्मामध्ये अनुरक्त करते. मृत्यू आणि मोहाच्या भयाला कमी करते. जीवनाचा क्षण आणि क्षण आत्महितामध्ये लावून जीवन सार्थक करण्याची प्रेरणा देते. जीवन निर्माण करण्यामध्ये भावनेची उपयोगिता असंदिग्ध आहे.

'भावना' हे नाव आत्म्याच्या गुणविशेषाचे आहे, ज्या ज्ञानाद्वारे आत्मपर बोध उत्पन्न होतो. भावना उत्तम ज्ञानाचा हेतू आहे. अर्थात ज्यांना बघितले आहे, ज्यांचा अनुभव घेतला आहे, 'श्रुत' ज्यांनी ऐकले आहे अशा स्मृती प्रत्यभिज्ञानात प्रज्ञा जोडल्याने त्यात चिंतनोन्मुख झाल्याने ज्यांचा प्रादुर्भाव होतो त्यांना भावना म्हणतात.[३१]

पुन्हा पुन्हा अनित्यता इत्यादींचे ज्ञान झाल्याने सांसारीक पदार्थांमध्ये निर्गुणतेची, असारतेची परिभावना होते.[३२]

संसाराची अनित्यता, अशरणता इत्यादींचे ज्याला ज्ञान होते, त्याचे जो निरंतर

चिंतन करतो, तो वैराग्यभावनेत रममाण होतो. आणि जो काया, वाचा, मनाद्वारे वैराग्य भावनेत लीन होतो तो वीतरागी बनतो. त्याच्यासाठी मोक्ष दूर नाही. भावनेचा, मोक्षमार्गाचा आपसी जवळचा संबंध असल्याने अनेक आचार्यांनी याच्या अनेक परिभाषा केल्या आहेत. सर्व परिभाषा सतत अभ्यास, चिंतन, अनुभावनेच्या दिशेने संकेत करतात.

अनुप्रेक्षा -- भावनेसाठी 'अनुप्रेक्षा' शब्दाचा प्रयोग सुद्धा ह्याच अर्थाने होतो. आगमग्रंथात आगमाच्या टीकाग्रंथात आणि अन्य ग्रंथामध्ये 'अनुप्रेक्षा' शब्दाच्याही प्रसंगानुरूप परिभाषा केल्या आहेत. त्याच्या अभिप्रायावर प्रकाश टाकला आहे. त्यातल्या काही परिभाषांचा येथे उल्लेख केला जाईल.

'अनुप्रेक्षा' शब्द 'अनु + प्र + ईक्ष्' याच्या योगाने बनला आहे. 'अनु' आणि 'प्र' हे उपसर्ग आहेत. 'ईक्षा' शब्द 'ईक्ष्' धातूपासून बनला आहे. 'ईक्ष्' याचा अर्थ पाहणे, आलोचना करणे, अवलोकन करणे असा आहे.[३३] 'प्र+ईक्ष्' याच्यापासून 'प्रेक्ष' बनतो ज्याचा अर्थ पाहणे, दृष्टी टाकणे असा होतो.[३४] 'अनु' चा अर्थ पुन्हा, पुन्हा, मागे, मागे पाहणे असा होतो.[३५] अशाप्रकारे अनुप्रेक्षा शब्दाचा अर्थ वारंवार पाहणे, चिंतन करणे, त्यात तन्मय होते असा होतो.

अनुप्रेक्षा शब्दाचा अर्थ चिंतन, ग्रंथचिंतन आणि सूत्राच्या अनुचिंतनाच्या अर्थाने घेतलेला आहे.[३६]

धर्मरत्न प्रकरणामध्ये सांगितले आहे की जिनेश्वराच्या प्रवचनाने गुरुजनांच्या वाणीने जे पूर्वी ऐकले आहे त्याला अत्यंत एकाग्रचित्ताने श्रुतविचाराचे चिंतन करणे म्हणजे अनुप्रेक्षा आहे.[३७]

ए. एन. उपाध्ये यांनी सांगितले आहे की ज्या ज्या विषयाचे चिंतन केले जाते त्याच्या अनुसार अनुप्रेक्षेचे सुद्धा तेच नाव होते. म्हणजे शरीर, पदार्थ इत्यादीच्या अनित्यतेचे चिंतन अनित्यानुप्रेक्षा नावाने अभिहित केले जाते. त्याच्या अशुचितेचे चिंतन 'अशुची अनुप्रेक्षा' या नावाने अभिहित केले जाते. अनु म्हणजे सूक्ष्मतेने पुन्हा पुन्हा पाहणे, चिंतन करणे, स्मरण करणे, अनुप्रेक्षा आहे.[३८]

आचार्य जिनदास गणि महत्तर यांनी सांगितले आहे की, ''वाचलेल्या श्रुतज्ञानाचे व अर्थाचे मनाने चिंतन करणे, वाणीने नाही, अनुप्रेक्षेमध्ये मानसिक चिंतनाची विशेषता आहे. शब्दांचे वाणीद्वारे उच्चारण झाल्यावर ती परावर्तना होईल.[३९]

वाणीपेक्षा मनाची शक्ती अधिक आहे. मानसिक शक्तीने तर कल्पनिवासी देवांचे

आसन सुद्धा डळमळू लागते. जपामध्येही अजपा, जाप (मानसिक जाप) यांचे महत्त्व अधिक आहे. अशाप्रकारे अनुप्रेक्षेमध्ये मानसिक चिंतनाचे महत्त्व आहे. वाचिक शब्द उच्चारणाचे नाही.

उत्तराध्ययन सूत्रामध्ये स्वाध्यायाच्या अंतर्गत अनुप्रेक्षेला घेतले आहे. 'स्वाध्याय' याचा अर्थ (स्व-आपला, अध्याय - अभ्यास करणे) स्वतःचा अभ्यास करणे की मी कोण आहे ? कोठून आलो आहे ? कोठे जायचे आहे इत्यादींचे सातत्याने चिंतन करणे म्हणजे स्वाध्याय होय. ज्यामध्ये अनुप्रेक्षेचे चौथे स्थान आहे.[४१]

अनुप्रेक्षेचा संबंध ध्यान आणि स्वाध्याय या दोघांबरोबर आहे. औपपातिक सूत्रामध्ये 'धर्मध्यान' आणि 'शुक्ल ध्यान' यांच्या चार चार अनुप्रेक्षा आत्मोन्मुखता प्राप्त करण्यासाठी आणि विचार उत्कर्षाचा अभ्यास करण्यासाठी निरुपित केल्या आहेत.[४२]

अनुप्रेक्षा एक 'स्वाध्याय विशेष' आहे. तो मनाला त्याच्यातच लावल्याने, नियोजित केल्याने होतो.[४३]

अनित्यादि भावनेच्या चिंतनाने भावित चित्तामध्ये ज्या शांती आणि समधींचे अवतरण होते ते स्वाध्यायाच्या महत्तेचे प्रतीक आहे. 'स्वाध्याय' बारा प्रकारच्या तपांमधील एक प्रकारचे अभ्यंतर तप आहे, ज्याने कर्म क्षीण होते.

अनुप्रेक्षेने जीव आयुष्यकर्माला सोडून बाकी ज्ञानावरणीय इत्यादि सात कर्मांच्या प्रकृतींचे गाढ बंधन शिथील करतो. दीर्घकालीन स्थितीला अल्पकालीन करतो. त्याच्या तीव्र रसानुभावाला मंदरसानुभावामध्ये परिवर्तित करतो. बहुकर्म प्रदेशाला अल्पकर्म प्रदेशामध्ये बदलतो. आयुष्यकर्माचा बंध क्वचित करतो अथवा करत सुद्धा नाही. कारण आयुष्यकर्माचा बंध जीवनाच्या तिसऱ्या भागात एकदाच होतो. जसे एखाद्याचे आयुष्य नव्वद वर्षांचे आहे, तर साठ वर्षानंतर तीस वर्षांच्या भागात आयुष्यकर्माचा बंध होतो. अशाप्रकारे तीस वर्षांचा तिसरा भाग अथवा जितके आयुष्य राहिले असेल त्याच्या तिसऱ्या भागात आयुष्य कर्माचा बंध होतो. जर अंतिम काळापर्यंत सुद्धा आयुष्याचा बंध झाला नाही तर आयुष्य समाप्तीच्या अंतर्मूहूर्तापूर्वी (दोन घडी ४८ मिनिटांपूर्वी) तो अवश्य पुढच्या गतीचा बंध करतोच. आयुष्याचा बंध केल्याशिवाय जीवात्मा प्राण सोडत नाही. परंतु जर जीवाचे त्याच भवामध्ये मोक्षगमन होणार असेल तर तो आयुष्यकर्माचा बंध करत नाही अथवा पूर्वी बंध झाला असेल तर पुन्हा आयुष्यकर्माचा बंध करत नाही. परंतु जर आयुष्य कर्माचा बंध अजून झाला नसेल तर अनुप्रेक्षेच्या शुभ अध्यवसायाच्यावेळी

जीवात्मा शुभ आयुष्यकर्माचा बंध करतो. अनुप्रेक्षेमध्ये भावधारा इतकी एकाग्र होते की त्यात प्रचंड विद्युतशक्तीसारखी शक्ती निर्माण होते.

उत्तराध्ययन सूत्रामध्ये संसाराची तीन विशेषणे दाखवली आहेत.

१) अणाइयं - अर्थात अनादि; २) अणवदग्गं - अग्र म्हणजे अंत, ज्याला कधी अंत नाही, असा अनंत, ३) दीहमग्गं - दीर्घ मार्ग असलेला, संसारबनाचा खूप लांब आणि दीर्घ मार्ग ज्याला पार करणे कठीण आहे. परंतु अनुप्रेक्षेद्वारे तो त्याला शीघ्रतेने पार करू शकतो इतकी अनुप्रेक्षेची प्रचंड शक्ती आहे.[४३]

अनुप्रेक्षेची साधना करणारा साधक पुन्हा पुन्हा असातावेदनीय कर्माचा उपचय करीत नाही. असाता सातोवदनीयाच्या रूपात संक्रमित होते. त्यांचे कर्म लवकर क्षीण होऊन नष्ट होतात. ते कशाप्रकारे कर्म शीघ्रतेने नष्ट करतात हे समजण्यासाठी व्यवहारातील उदाहरणे घेता येतील.

लोखंड कितीही वर्षे पडून राहिले तरी गंजत नाही पण जर त्याला पाणी अथवा मातीचा संपर्क झाला तर ते गंज लागून गंजून जाते, मातीसारखे पसरू लागते.

ज्या काचांना चाकू, सुरी कापू शकत नाही त्या काचा हिरकणीद्वारे लगेचच कापल्या जातात. त्याच्यापेक्षाही अनुप्रेक्षेचा, भावनेचा प्रवाह तीव्रतेने शरीरावर प्रहार करतो. जे कर्म आत्म्याबरोबर हजारो लाखो वर्षापर्यंत चिटकून राहणाऱ्या स्थितीचे असते त्यांची शक्ती कमी होते आणि ते थोड्याच काळात नष्ट होण्याच्या स्थितीपर्यंत पोहचते. अनुप्रेक्षेने कर्माचे स्थिती खंडन, स्थिती घात अथवा अपकर्ष होतो.

भावना आणि अनुप्रेक्षा जवळ जवळ समानार्थी शब्द आहेत. ज्याच्यावर चिंतन करायचे असेल त्याला 'भावना' म्हणतात. म्हणून अनुप्रेक्षेलाही एका अर्थाने भावनेचा समानार्थी शब्द मानला आहे. दोघांच्या परिभाषेमध्ये काही विशेष फरक नाही.

पुराणामध्ये तीन प्रकारच्या भावना मानल्या आहेत - १) ब्रह्मभावना २) कर्म भावना आणि ३) उभयात्मक भावना. जसे मनुष्याचे चित्त असेल तशा भावना होतात. ज्याचे चित्त निर्मळ असते त्याची ब्रह्मभावना असते आणि ज्याचे चित्त विषयवासनेने मलिन असेल त्यांच्या भावना विषयवासनेच्याच असतात.

योगशास्त्रानुसार अन्य विषयाला सोडून पुन्हा पुन्हा केवळ ध्येय वस्तूचे ध्यान करण्याला 'भावना' म्हणतात.

अशाप्रकारे भावनेचे महत्त्व सगळ्या धर्मामध्ये आणि देशामध्ये सारखेच आहे. परंतु जैन दर्शनाचा 'भावना' हा आत्माच आहे. भावनारहित साधना साधकाच्या उन्नति ऐवजी पतनाचाच हेतू आहे. म्हणून प्रत्येक साधनेबरोबर भावनेची प्रधानता अपेक्षित आहे.

दान, शील, तप इत्यादींबरोबर भावना नसली तर सर्व क्रिया निष्फळ आहेत. मंत्र, तंत्र, यंत्राच्या जितक्या सिद्धी प्राप्त होतात त्या सर्वांच्या मुळाशी भावना राहते. पाण्याशिवाय जसे रोपटे सुकून जाते तसे भावनेशिवाय सर्व कर्मकांड निष्फळ होते. भावशुद्धी शिवाय धर्मसाधना होऊ शकत नाही.[४४] म्हणून जीवनामध्ये भावनेचे अत्यंत महत्त्व आहे. अर्धमागधी जैन आगमामध्ये भावनेचे संकेत अंशिक आणि प्रासंगिक रूपामध्ये दृष्टीगोचर होतात, ज्यांच्यावर पुढे समीक्षात्मक दृष्टीने विचार केला जाईल.

उत्तरवर्ती श्वेतांबर आणि दिगंबर जैन ग्रंथामध्ये ह्याचा उल्लेख आणि विस्तृत विवेचन अनेक ठिकाणी प्राप्त होतो.

तत्त्वार्थसूत्र, प्रशमरतिप्रकरण, कार्तिकेयानुप्रेक्षा, वारसाणुवेक्खा, मूलाचार, ज्ञानार्णव योगशास्त्र, यशस्तिलक, शांतसुधारस, भगवती आराधना इत्यादी अनेक ग्रंथामध्ये भावनेचे अथवा अनुप्रेक्षेचे विस्तृत विवेचन प्राप्त होते.[४५]

बृहद्द्रव्य संग्रहाच्या टीकेमध्ये भावसंवराच्या अंतर्गतसुद्धा भावनेचा उल्लेख झाला आहे.[४६]

भावना आणि क्रियेचा संबंध घनिष्ठ आहे. कोणता पण व्यक्ती कोणते ही काम करण्यासाठी उद्युत होतो तेव्हा सर्व प्रथम त्याच्या अंतःकरणात त्या कार्याचे एक भावात्मक चित्र त्याविषयी भावना उत्पन्न होतात. भावना म्हणजे पुन्हा पुन्हा पाहाणे. भावना परिपक्व होऊन क्रियेच्या रूपात बदलते. परिपक्वतापूर्वक जे कार्य होते ते सुस्थिर होते. त्याचे उत्तम फळ प्राप्त होतात, ते सार्थक होते म्हणून भावनेचे आध्यात्मिक साधनामध्ये अत्यधिक महत्त्व आहे.

जैन शासनाचे महान साधक आणि कवी, उपाध्याय विनय विजय यांनी आपल्या 'शांतसुधारस भावना' नावाच्या काव्यामध्ये भावनेचे महत्त्व सांगतांना प्रेरणापूर्ण शब्दात लिहिले आहे की,

यदि भवभ्रमखेद पराङ्मुखं, यदि य चित्तमनन्त सुखोन्मुखम्।
शृणुत तत्सुधियः शुभ भावनामृतरसं मम शान्तसुधारसम् ॥[४७]

अर्थ - हे विद्वानांनो ! जर तुमचे मन, चित्त भवभ्रमणाने संसारात पुन्हा पुन्हा आवागमनाच्या दुःखाने पराङ्मुख झाले असेल, सुटण्याची इच्छा ठेवत असेल आणि जर तो मोक्षाच्या अनंत सुखाला अव्याबाध आनंदाला मिळविण्याची इच्छा ठेवत असेल तर निर्वेदमय उत्तम भावनारसाने परिपूर्ण माझ्या शांतसुधारस काव्याचे सेवन करावे.

वास्तविक ह्या श्लोकाचा अर्थ फारच गंभीर आहे. भावनेच्या सम्यक् आराधनेने त्यांना चांगल्याप्रकारे आत्मसात केल्याने जीवनधारेमध्ये अशाप्रकारचे वळण येते की तो अशुभापासून शुभाकडे, अप्रशस्तापासून प्रशस्ताकडे, भोगापासून त्यागाकडे उन्मुख होतो. असे झाले तर मनुष्य सहजपणे आत्मसाधनेच्या मार्गावर आरूढ होतो. त्या मार्गावर उत्तरोत्तर पुढे वाढत राहतो व शुभोपयोगापासून शुद्धोपयोगामध्ये प्रविष्ट होत जातो. परिणाम आपल्या कर्माचे बंधन तोडत जातो. नव्या कर्माचा बंध होऊ देत नाही आणि एक दिवस असा येतो की तो सर्व कर्मांच्या बंधनाला तोडून कर्मक्षय करून मुक्त होतो. सिद्ध, बुद्ध व मुक्त होतो. मोक्ष प्राप्त करतो, ज्याचा आनंद सागराप्रमाणे अमर्याद आहे. ही आत्मभावनेने परमात्म्याला प्राप्त करण्याची अवस्था आहे.

भावनेच्या अभ्यासाने जीवनामध्ये किती मोठी कार्ये होतात. वास्तविक जीवनाचे लक्ष्यपूर्ण होते. म्हणूनच विनयविजयजी महाराजांनी ह्या उपरोक्त श्लोकामध्ये ह्या गोष्टीचे सुंदर स्पष्टीकरण केले आहे.

वेगवेगळ्या आचार्यांनी आणि विद्वानांनी भावनेवर आपल्या आपल्या शैलीने अत्यंत विस्तृत विवेचन केले आहे.

ह्या पृष्ठभूमीवर प्रस्तुत शोधग्रंथामध्ये भावनेचे बहुमुखी चिंतन, विवेचन आणि समीक्षात्मक दृष्टीने परिशीलन करणे हा माझा अभिप्राय आहे.

द्वादश भावनांची नावे आणि परिचय

१) अनित्य २) अशरण ३) संसार ४) एकत्व ५) अन्यत्व ६) अशुची ७) आश्रव ८) संवर ९) निर्जरा १०) धर्म ११) लोक १२) बोधिदुर्लभ. ह्या बारा भावना आहेत. ह्यांना अनुप्रेक्षा सुद्धा म्हणतात.

अनित्य भावना - जगात जे काही उत्पन्न होते त्यांचा नाश निश्चित आहे. अनादी काळापासून हा जीव सांसारीक पौद्गलिक वस्तूमध्ये आणि भोगविलासामध्ये सुख आणि आनंद मानत आहे. परंतु ही फार मोठी चूक आहे. कारण ह्या जगातल्या सर्व वस्तू अनित्य आहेत.

ह्या जीवाने पूर्वायुष्यात अनंतवेळा अनंत शरीरे धारण केली आहेत आणि त्यागिली आहेत. पण शरीर कधीच स्थिर राहिले नाही. शरीरातून जुने परमाणू गळून जातात आणि नवे परमाणू येतात. जगात असा एकही परमाणू नसेल की ज्याने मागच्या अनेक युगात ह्या शरीरात प्रवेश केला नसेल. अशाप्रकारे शरीर अस्थिर, अनित्य आणि विनाशी आहे.

मृत्यूनंतर पशुपक्ष्यांच्या शरीराचे भाग तरी उपयुक्त आहेत परंतु मनुष्य शरीराचा कधीच उपयोग होत नाही. ज्याला तर जाळून भस्म केले जाते अशा शरीरात सार मानणे हे अज्ञान आहे.

ज्याप्रमाणे नदीच्या लहरी निघून गेल्यावर पुन्हा येऊ शकत नाही त्याप्रमाणे जीवाची सुंदरता, लावण्य, रूप, बळ इत्यादी नष्ट झाल्यावर पुन्हा प्राप्त होत नाही.

साधक जेव्हा ध्यानाद्वारे आत्मपरीक्षण करतो तेव्हा अनुभव करतो की, ह्या जगात जसे सर्व पदार्थ बदलतात तसेच शरीरातील प्रत्येक अणूमध्ये आणि संवेदनेत प्रतिक्षणाने बदल घडत असतो. पाहता पाहता संवेदना उत्पन्न होतात आणि नष्ट होतात. संसारात दृश्य असणारा कोणताच पदार्थ नित्य नाही.

सुख, दुःख, परिस्थिती, अवस्था, धन, तन, मन, स्वजन, परिजन, मित्र, भूमी भवन सर्व काही अनित्य आहे. राजा, राणी, सम्राट, चक्रवर्ती, सेठ, सावकार विद्वान, धनवान सत्तावान, शक्तिवान सर्वजण शेवटी मेल्यानंतर मातीत मिसळतात.

पदार्थांची स्थिती हत्तीच्या कानासारखी, संध्याकालीन सूर्यासारखी, दवबिंदूसारखी, मेघाकृतीसारखी अस्थिर आहे. म्हणून अनित्य पदार्थांची इच्छा, त्याचा संग्रह, त्यांचा उपभोग घेणे म्हणजे शक्ती क्षीण करण्यासारखे आहे. असा अनुभव करून समतेमध्ये स्थिर राहणे, त्याच्याबद्दल राग द्वेष न करणे म्हणजे अनित्यानुप्रेक्षा आहे.

शरीराच्या अनित्यतेबरोबर आत्म्याच्या नित्यतेचे चिंतन केले पाहिजे की हा आत्मा सुर, असुर, मनुष्य, राजा इत्यादी विकल्पाने रहित आहे. आत्मा ज्ञानस्वरूप आहे आणि नेहमी स्थिर राहणारा आहे.

भगवान ऋषभदेव - प्रथम तीर्थंकराचे पुत्र भरतमहाराजांनी सहा खंड साधून चक्रवर्ती पद मिळविले. एकदा आरसे महालात बसले होते. त्यांच्या बोटातून अंगठी खाली पडली तेव्हा बोटाचे सौंदर्य जणू अंगठीशिवाय निस्तेज झाले. ते चिंतन करू लागले.

बोटामुळे अंगठीची शोभा आहे की अंगठीमुळे बोटाची ? विचार करता करता शेवटी निर्णयास पोहचले की अंगठी सुद्धा जड पुद्गल आहे आणि शरीरही पुद्गल आहे. सर्व काही अनित्य आहे. 'मी' तर शरीरात बसलेला नित्य असा आत्मा आहे. माझी शोभा काय ? अशाप्रकारे चिंतन करता करता स्थिर झाले. शुद्धोपयोग स्वभावात रमून गेले आणि शुक्लध्यानाच्या धारेमध्ये घातीकर्माचा पडदा तुटला केवलज्ञानाची ज्योत चमकू लागली हा अनित्य भावनेचा प्रभाव आहे.

जो अनित्य भावनेचे चिंतन करतो त्याची शरीरादींची आसक्ती सुटते व संयोग आणि वियोगामध्ये हर्ष किंवा शोक होत नाही. मोहाचा त्याग केला जातो, मन विषयसुखापासून विरक्त होते व त्यामुळे उत्तम सुखाची प्राप्ती होते.

अशरण भावना – अनित्यतेचा प्रत्यक्ष अनुभव आल्यानंतर त्याला शरण जाणे, त्याचा आश्रय घेणे, त्याच्या आधारावर जीवनाचे अस्तित्व मानणे हा मनुष्यांचा भ्रम आहे. कारण जे पदार्थ स्वतःच अनित्य आहेत, त्यांचा आश्रय अथवा आधार नित्य राहू शकणार नाही. जेव्हा स्वतःचे शरीरच शरणयोग्य नाही तर धन, सेवक इत्यादी कसे शरणरूप होऊ शकतील ?

आपल्याला दुसऱ्यांची शरण घेण्याची काहीच आवश्यकता नाही. जो दुसऱ्यांना शरण जातो तो रिक्त हस्ताने परत फिरतो. परंतु ह्या संसारात चहूकडे दुःखाच्या ज्वाला पसरल्या आहेत. झोपडीत राहणारे कष्टामुळे उद्विग्न आहेत तर स्वर्णमहालात राहणारे सुद्धा दुःखाने त्रस्त आहेत. मानवी हृदय दुःखाच्या ज्वालांमध्ये जळत आहे. मनुष्य असहाय आहे. त्याने कोणाला शरण जावे हा प्रश्नच आहे.

विपरीत परिस्थितीमध्ये व्यक्तीच्या मनात सहजच अशी भावना निर्माण होते की त्यांना कोणीतरी वाचवावे, तो कोणाचा तरी आश्रय घेऊ इच्छितो म्हणूनच तो आपल्या कुटुंबाचे मोठ्या आसक्तीने पालनपोषण करतो. तो विचार करतो की पुत्र, मित्र, स्वजनांना सहायता केली तर माझ्या वृद्धावस्थेत हे मला सहयोग देतील. परंतु वार्धक्य, रोग आणि मृत्यू या अशा अवस्था आहेत, की ज्यात व्यक्ती स्वतःला असहाय आणि दुःखी अनुभवतो. कुटुंबातील लोक प्रेमभावनेने प्रयत्नपूर्वक औषधोपचार करून दुःख दूर करण्याचा प्रयत्न करतात. परंतु रोग दोन प्रकारचे असतात १) दोषज आणि २) कर्मज. आयुर्वेदात वात, पित्त, कफ हे तीन दोष मानले आहेत. 'दोषसाम्यमरोगिता' ह्या तीन दोषांची साम्यता स्वस्थतेचा हेतू आहे. जेव्हा हे विषम होतात तेव्हा व्यक्ती रुग्ण होतो. हे दोषज रोग तर

औषधोपचाराने बरे होतात. परंतु 'कर्मज' रोग ते होत, जे पूर्वजन्मात केलेल्या कर्मामुळे त्यांचा उदय होतो. ते औषधोपचाराने शांत होत नाहीत. ते रोग नष्ट करण्यासाठी त्याच्या मूळाशी असलेल्या कर्माचा नाश करणे आवश्यक आहे. आणि त्याच्यासाठी एकमात्र तेच शरणरूप आहे, ज्याने कर्म क्षीण होते. जैन परंपरेमध्ये चार शरण अत्यंत प्रसिद्ध आहेत-

अरिहंते शरणं पवज्जामि, सिद्धे शरणं पवज्जामि,

साहु शरणं पवज्जामि, केवली पण्णवतं धम्मं शरणं पवज्जामि ।

अरिहंत, सिद्ध, साधू आणि सर्वज्ञ निरुपित धर्माची शरण घेणे अत्यंत आवश्यक आहे. जीवनाची दिशा बदलली तरच दशा बदलते. भौतिकतेपासून तोंड फिरवून अध्यात्माकडे जाण्याची आवश्यकता आहे. कारण हे भौतिक पदार्थ मर्यादित सहयोग देऊ शकतात. जेव्हा मृत्यू येतो तेव्हा संपत्ती तिजोरीतच राहते. पशुधन वाड्यात बंद राहते, स्त्री दारापर्यंत आणि सेवक स्मशानापर्यंत पोहचविण्यासाठी येतात आणि यापुढे जशी करणी तशी भरणी, जशी मती तशी गती होते.

जगाच्या मोहजालाला शरण जाणारा कधीही जिंकत नाही आणि जिनेश्वरांन शरण जाणारा कधी हारत नाही. ही गोष्ट ज्यांच्या हृदयात कोरली गेली आहे ते कधीच धनाच्या, स्वजनांच्या अधीन राहून आनंदी होत नाहीत, मात्र जिनेश्वरांचे शरणच त्याला अत्यंत प्राणप्रिय वाटते.

जगातील सर्व शरण अशरणात परिवर्तित होणार आहे. परंतु अरिहंत देव, निर्ग्रन्थ गुरू आणि केवली निरूपित धर्म ह्यांचे शरण असे आहेत की जो रोगामध्ये, गरिबीमध्ये श्रीमंतीमध्ये इहलोक आणि परलोकामध्ये आपल्या आत्म्याचे रक्षण करते.

'अर्जुनमाळी' सारख्या हत्याऱ्याने, रोहिणी या चोराने प्रभुमहावीरांचे शरण घेतले तेर त्याचाही उद्धार झाला. शालीभद्र आणि जम्बुकुमारासारखे पुण्यवान जीव संसारी सुखाची सर्व अनुकूलता असताना सुद्धा प्रभूंना शरण गेले तेव्हा अद्‌भूत चमत्कार झाला.

ह्या सर्व शरणागतीपासून जर पुढे जायचे असेल तर 'अप्पाणं शरणं गच्छामि' - मी माझ्या आत्म्याचे शरण ग्रहण करतो. त्याच्यासाठी व्यक्तीला अंतरात्म्यामध्ये निरीक्षण करण्याची जरूरी आहे. आत्माच परमात्मा आहे. ''आदाहु मे सरणं''४८ आत्मा माझा शरणरूप आहे.

आपल्या आत्म्यामध्ये अनंतशक्ती आहे. त्याला जागृत करण्याची आवश्यकता आहे.

आपल्या आत्मस्वरूपाला प्राप्त करणे हेच प्रत्येक साधकाचे लक्ष्य आहे. जेव्हा भौतिक पदार्थांपासून सुखप्राप्तीची भ्रांती मिटते तेव्हा तो आपल्या आत्म्याला शरणरूप मानतो. असे मानल्याने आत्मपुरुषार्थ जागृत होतो. शक्ती निर्माण होते, ऊर्जा प्रकट होते.

म्हणून मानवाने अशरण भावनेचे पुन्हा पुन्हा चिंतन केले पाहिजे. अभ्यास केला पाहिजे. कारण एकदा-दोनदा विचार केल्याने कोणतीच गोष्ट मनात स्थिर होत नाही. म्हणून जगात अशरण काय आहे व कोणाला शरण जावे, ही भावना निरंतर करीत राहिल्याने अशरण भावनेचे संस्कार बरोबर दृढ होतात. भौतिक पदार्थाची ममता दूर होते व साधक सर्वज्ञ प्रणित मार्गावर प्रयत्नशील होतो.

संसार भावना

जीव दोन प्रकारचे आहेत. संसारी व मुक्त. मुक्तजीवन त्यांना म्हणतात जे संवर आणि निर्जरामूलक साधनेद्वारे समस्त कर्माचा क्षय करून जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतात आणि आध्यात्मिक अनंत आनंदात तन्मय राहतात. त्यांच्या आत्म्याच्या शुद्ध स्वरूपाच्या ह्या स्थितीला परमात्मदशा अथवा परमात्मभाव म्हणतात.

संसारी जीव ते आहेत जे कर्मबद्ध आहेत. कर्मामुळे ते विविध योनीत जन्म घेतात. आयुष्य पूर्ण झाल्यावर मृत्यू पावतात. पुन्हा दुसऱ्या योनीत जन्म घेतात.

संसार शब्द संस्कृतच्या 'सम्' उपसर्ग युक्त 'सृ' धातूपासून बनला आहे. 'संसरति इति संसारः' जो संसरणशील, गतीशील, परिवर्तनशील आहे त्याला 'संसार' म्हणतात.

कर्मरूपी कलंकाने जो लिप्त आहे, 'स्व' स्वभावाला ज्याने प्राप्त केले नाही, ज्याच्या गुणांची श्रेणीवर खाली होत राहते ते 'संसारी जीव' आहेत. ते अशुद्धोपयोगाने युक्त असतात.

अनादिकाळातील मिथ्यात्वाच्या उदयाने सर्वज्ञ वीतरागीद्वारा निरूपित धर्माला प्राप्त करीत असल्याने जीव चार गतींमध्ये भ्रमण करीत राहतो.

पूर्वजन्मातील कर्मविपाकानुसार संसारी जीव संसाराच्या रंगभूमीवर नटाप्रमाणे माता-पिता, बंधु-सखा, दास-स्वामी इत्यादी विविध प्रकारच्या भूमिका करत करत एका भवातून दुसऱ्या भवामध्ये परिभ्रमण करतो. ह्या संसाराच्या विचित्रतेचे कोठपर्यंत वर्णन करावे. जी व्यक्ती आपल्या रूपसौंदर्यावर गर्व करते, तीच युवावस्थेमध्ये अकाळी मृत्यू पावून स्वतःच्या मृत शरीरात (कलेवरात) किड्याच्या रूपात जन्म घेते, स्वतःचा पुत्र

असतो. अशाप्रकारे संसाराच्या स्वभावाचा विचार करणे, 'संसार भावना' आहे. अशा भावनेचे पुन्हा पुन्हा चिंतन केल्याने मनुष्य संसाराच्या भयाने उद्विग्न होतो. आणि संसारातून विरक्त होण्याचा प्रयत्न करतो.

जीवाबरोबर कर्माचा संबंध अनादी काळापासून आहे. पण ते सांत आहे, अनंत नाही. ह्या अपेक्षेने व्यक्तिगत दृष्टीने जीवाच्या संसाराचा अंत होतो. जो जीव तप, संयम आदि साधनेद्वारे कर्म क्षीण करतो. अर्थात आत्म्याबरोबर संलग्न सर्व कर्म नष्ट करतो, तेव्हा तो मुक्त होतो. तो संसरणातून, अवागमनातून, जीवन आणि मृत्यूतून मुक्त होतो. त्याचा संसार कायमचा नष्ट होतो.

वैयक्तिक दृष्टीने प्राण्याच्या संसाराचा अंत होतो. परंतु प्रवाहरूपात जो संसार चालत आहे ते कधीच नष्ट होत नाही. कारण संसारातील सर्व जीव मुक्त होणे संभवत नाही. ह्या प्रवाहाच्या दृष्टीने संसार चालत राहिल पण साधकाच्या आत्म्याने हे चिंतन अवश्य केले पाहिजे की मला ह्या चतुर्गतीरूप संसारातून मुक्त व्हायचे आहे. त्या दिशेने प्रयत्न करायला पाहिजे. ह्या दार्शनिक पृष्ठभूमीवर संसारभावना उपस्थित आहे.

संसाराच्या सत्यस्वरूपाला समजून ते ग्राह्य आहे की परिहेय ह्याचे चिंतन केले पाहिजे.

तसे पाहिले तर मानवाच्या मोहाचे बंध इतके घट्ट आहेत की त्याला हर्ष-शोक, सुख-दुःखाच्या कोणत्याही परिस्थितीत संपूर्णपणे वैराग्य येत नाही. परंतु निरंतर अभ्यास केल्याने ह्याच्यातून सुटका होऊ शकते. संसाराच्या सत्य स्वरूपाचे ज्ञान होण्यासाठी त्याचे पुन्हा पुन्हा चिंतन, मनन केले तर जीवनाची दिशा बदलते. भौतिकवादींचे जीवन अध्यात्मवादाकडे वळते. आणि तो आत्मसाधनेचा मार्ग स्वीकार करतो. ज्यांनी संसार सागर पार केला आहे. त्यांचे जीवन उपादेय म्हणजे आचरण्यायोग्य आहे आणि जो संसाराच्या दुःखाने ग्रस्त आहे त्यांचे जीवन 'हेय म्हणजे त्याज्य' आहे असे चिंतन केले पाहिजे. सम्यक् व्रत, नियम, ध्यान इत्यादी अनेक उपाय करून, मोहांचा त्याग करून आपल्या शुद्धज्ञानमय स्वरूपाचे ध्यान केल्याने संसार परिभ्रमणाचा नाश होतो आणि मोक्षपदाची प्राप्ती होते.

एकत्व भावना

ह्या जगात मनुष्य एकटाच येतो आणि ज्यांना जीवनात आपले मानतो शेवटी त्या सर्वांना सोडून एकटाच परलोकात निघून जातो. ह्या जगात माझे कोणी नाही किंवा

की कोणाचा नाही.

हा संसार एक विशाल महासागर आहे. त्यात मानव स्वतःच्या पूर्वजन्माच्या ऋणानुसार येथे एकत्रित येतात आणि ऋणानुबंध पूर्ण झाले की आपल्या आपल्या वाटेने निघून जातात.

मोह, माया आणि आसक्तीमुळे संसारी व्यक्ती असे समजते की जगात मी एकटाच नाही माझे कुटुंब, नातेवाईक, मित्र सर्वजण माझ्याबरोबर आहेत. परस्परांच्या सुखदुःखात सहयोग देणारे आणि बरोबर राहणारे आम्ही एकटे कसे असणार ? अशाप्रकारे मोहामध्ये व्यक्ती संसारी संबंधांना अधिकाधिक घनिष्ट करत जात आहे. पण तो हे विसरतो की हे सर्वजण स्वार्थवश माझ्याकडे येतात. जर त्यांचा स्वार्थ पूर्ण झाला नाही आणि माझी परिस्थिती बिकट झाली तर मला कोणीही विचारणार नाही.

संसारामध्ये सर्वजण सुखाचे साथी आहेत, दुःखात कोणी कोणाचा नाही. वास्तविक पाहिले तर प्रत्येकजण एकटाच आहे. एकत्व भावनेचा हा निष्कर्ष आहे.

एकत्व भावना आत्मत्त्वावर आधारीत आहे. ह्याचा अभ्यास सातत्याने केल्याने तो भाव मनामध्ये दृढ होतो आणि व्यक्तीला स्वार्थावर आधारलेल्या संबंधाची सत्यता समजल्याने त्याची दृष्टी बदलते. त्याची दृष्टी जी 'पर' पदार्थावर होती ती स्वतःवरच स्थिर होते. असे झाल्याने दिवसरात्र ज्या सांसारिक इच्छा पूर्ण करण्यामध्ये धावपळ होत होती ती थांबते. तो आत्मोन्नतीचे चिंतन करू लागतो आणि त्या दिशेने पुढे जाण्यासाठी तत्पर बनतो. अशाप्रकारे योग्य मार्गावर आल्याने मनुष्याचे जीवन उज्ज्वल बनते.

एकत्व भावनेचा अभ्यास करण्यासाठी व्यक्तीला अनेक प्रयत्न करावे लागतात. जनसमूहापासून दूर राहावे लागते. संसारात घडणाऱ्या घटनांवर विशेषरूपाने ध्यान द्यावे लागते. स्वार्थी संसाराला सर्वजण पाहतात. परंतु त्याच्याकडे विशेष लक्ष देत नाहीत. तो या गोष्टीकडे तेव्हाच लक्ष देऊ लागतो, जेव्हा मनुष्याला ही गोष्ट कळते की तो या जगात एकटाच आहे, त्याचे येथे कोणीच नाही. आपलेपणा दाखविणारे, सत्यतः आपल्यापासून खूप लांब आहेत.

ज्ञान, दर्शन, लक्षणेने युक्त एक आत्माच शाश्वत आहे. बाकीसर्व संयोगजन्य बाह्य भाव आहेत.४९

स्वजन परिजनच काय ? परंतु हे शरीरही माझे नाही हे सर्व विनाशी आहे. ह्या सर्वांची जातीय एकता आहे, मी अविनाशी आहे म्हणून माझे ह्या विनाशी वस्तूंबरोबर

एकत्व कसे संभवणार ? ते सर्व 'पर' आहेत. अशाप्रकारे 'पर' वस्तूपासून स्वतःला भिन्न समजून आपल्या स्वरूपात स्थिर होणे, अविनाशी आत्म्याबरोबर एकत्वाचा अनुभव करणे ही एकत्व अनुप्रेक्षा आहे.

अशाप्रकारे चिंतन केल्याने स्वजनांबरोबर प्रेम आणि परजनांबरोबर द्वेषाचा बंध होत नाही. साधक वैराग्यभावनेला प्राप्त होतो आणि मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्नशील बनतो. एकांतात राहून एकत्वभावनेद्वारे धर्माची आराधना, उपासना करणे हेच एकत्व भावनेचे लक्ष्य आहे. परंतु एकत्व भावनेच्या चिंतनाने पूर्णपणे फळाची प्राप्ती होत नाही.

अन्यत्व भावना

एकत्व भावनेमध्ये मी एकटाच आहे असे चिंतन केले जाते. अन्यत्व भावनेमध्ये आत्म्याशिवाय दुसरे सगळे 'पर' आहेत, 'अन्य' आहेत असे चिंतन केले जाते. 'मी एकटा आहे' हे विधिरूप व्याख्यान आहे आणि 'देह इत्यादी पदार्थ माझ्यापासून वेगळे आहेत', 'हे माझे नाही' इत्यादी निषेधरूप वर्णन आहे. अशाप्रकारे ह्या दोन्ही भावनांमध्ये विधी निषेधरूप फरक आहे.

एकत्व भावनेमध्ये आत्मनिरीक्षण आहे आणि अन्यत्व भावनेमध्ये बाह्य जगाचे स्पष्ट परीक्षण आहे. एकत्व भावनेमध्ये 'मी कोण ? आणि माझे काय ? इत्यादी आत्मस्वरूपाचे चिंतन होते तेव्हा अन्यत्वभावनेमध्ये मी काय नाही आणि माझे काही नाही याचे भेदज्ञान होते.

बहिरात्मभाव तोडण्यासाठी अन्यत्व भावनेचे चिंतन केले पाहिजे. अन्यत्व भावना भेदज्ञानाची गुरुकिल्ली आहे. ही आध्यात्मिक विकासाची पहिली पायरी आहे. अन्यत्व भावना ही जीवात्म्याला अन्य पदार्थांची आसक्ती सोडून अंतरात्मभावात स्थिर करते आणि परमात्मभावापर्यंत पोहचवते.

संसारात मुख्यत्वे संबंधांच्या दृष्टीने पदार्थांना दोन भागात विभाजित केले जाते. एक 'स्व' आणि दुसरा 'अन्य'. 'स्व' म्हणजे आत्मा. आत्म्याला सोडून दुसरे जे काही आहे ते सर्व 'अन्य' आहे.

जैन दर्शनामध्ये अनंत आत्मे आहेत असे मानतात. प्रत्येक शरीरात वेगळा वेगळा आत्मा आहे. संसारी आत्मा सशरीरी आहे. आत्म्याला शरीर कर्मामुळे प्राप्त होते. जेथे शरीर आहे तेथे शरीरासाठी सुखकारक, अपेक्षित आणि आवश्यक पदार्थ सुद्धा आहेत.

तात्त्विक दृष्टीने पाहिले तर आत्मा आणि अन्य पदार्थ एकदम वेगवेगळे आहेत.

अज्ञानामुळे प्राणी, देह इत्यादी पदार्थांना आपले मानतो. ज्यांना आपले मानले जाते त्यांच्याबद्दल स्वाभाविकच प्रेम उत्पन्न होते. आणि अशा पदार्थात जर काही अडथळा निर्माण झाला तर मनुष्य दुःखी होतो, कष्टी होतो, क्रोधाविष्ट होतो. त्याचे संतुलन बिघडते. संतुलन बिघडल्यावर अशी व्यक्ती धर्माराधना करू शकत नाही. धर्माराधना अथवा आत्मसाधनेत तर मनाची स्थिरता अत्यंत आवश्यक आहे.

अन्यत्वभावनेमध्ये सांसारीक पदार्थ आणि आत्मा ह्या दोघांची भिन्नता जाणण्या-वर अधिक जोर दिला आहे. बाह्य पदार्थ आपले नाहीत. जी वस्तू आपली असते ती आपल्यापासून कधीच 'पृथक' होत नाही किंवा आपल्याला सोडत नाही. कोणत्याच व्यक्तीची ही इच्छा नसते की त्याचे हे शरीर सुटावे परंतु कधी ना कधी सर्वांनाच ह्या शरीराचा त्याग करावा लागतो.

अशाप्रकारे जितके भोग्यपदार्थ आहेत ते सुद्धा नेहमी आपल्याबरोबर राहत नाहीत. धन, संपत्ती, इतकेच काय परंतु ज्यांना आपले मानले जाते ते सगेसोयरे व स्वजनही मृत्युप्रसंगी 'परके' होतात. कोणी कोणाच्या संकटात उपयोगी पडत नाही, म्हणून ममत्व भावना मिथ्या आहे, भ्रांत आहे, असे समजणे आवश्यक आहे.

ह्या भावनेचे पुन्हा पुन्हा चिंतन, मनन केल्याने शरीर इत्यादींची आसक्ती कमी होते. आत्मस्वरूपाचे यथार्थ ज्ञान झाल्यावर साधकाला शरीर आणि आत्मा दोन्ही भिन्न आहेत असे ज्ञान होते व आत्मध्यानामध्ये साधक लीन होतो. वैराग्याची वृद्धी होते व मोक्षसुखाची प्राप्ती होते.

अशुचि भावना

धर्म आराधना अथवा आध्यात्मिक साधना करताना शरीराचे ममत्व अत्यंत विघ्न आणणारे आहे. म्हणूनच अनित्यादी भावनेचे चिंतन करता करता पण काही उरलेले ममत्व कमी करण्यासाठी अशुचिभावनेचे चिंतन करणे आवश्यक आहे. हे शरीर रस, रक्त, मांस, चरबी, मज्जा, अस्थी आणि चमड्याने निष्पन्न झाले आहे. वरच्या चमडीचा पर्दापण सुंदर, शोभिवंत दिसतो. पण जर चमडीच्या आंतरिक भागाला पाहिले तर मनात तत्क्षणी घृणा उत्पन्न होते. ते एकदम कुरूप वाटते.

चांगल्यात चांगले स्वादिष्ट पदार्थ मनुष्य खातो. मधुर पेयपदार्थपान करतो. त्याचे शरीरात जाऊन कसे रूपांतरण होते हे सर्व विदित आहे. पदार्थाचा सार संपूर्ण शरीरात व्याप्त होतो आणि उरलेला भाग मलमूत्राच्या रूपात परिवर्तित होतो. रोज मनुष्य जे काही

खातो-पीतो त्याला मलमूत्राच्या रूपाने बाहेर टाकतो. हे मलमूत्र ज्या शरीराच्या सुंदरतेचा आणि सुपुष्टतेचा मनुष्य अभिमान करतो त्यातच राहतात. मलमुत्राच्या अतिरिक्त नाक कान इत्यादि शरीराच्या नऊद्वारांमधून प्रतिक्षण अशुचिमय पदार्थ वहात रहातात. ते श्लेष्म, कफ इत्यादी पदार्थ पण अत्यंत घृणित व घाणेरडे आहेत. मनुष्य फक्त बाह्य भाग पाहातो. आत पहात नाही म्हणूनच शरीरावर फार प्रेम करतो. त्याने देहाच्या वास्तविक स्वरूपाला समजले पाहिजे. अशुचिभावनेत ह्याच सत्याचा उद्घाटन करण्याचा प्रयत्न केला आहे.

जेव्हा मानव देहाच्या घृणिततेचा अनुभव करतो. मात्र सांगण्यापुरते नाही पण त्याची वास्तविकता समजतो. शरीराबरोबर अनादिकाळापासून असलेले ममत्वाचे बंधन शिथिल होतात.

अशुचिभावना मनुष्याला आत्मकेन्द्रित बनण्यासाठी फारच हितकारक आहे. कारण मनुष्य अध्यात्माची खूप चर्चा करतो पण त्याची दृष्टी नेहमी देहावर लागलेली असते. तो आत्म्यावर लागणाऱ्या विकाराने भीत नाही पण शरीरात होणाऱ्या विपरीत परिणामाने घाबरून जातो आणि सावधान होतो.

अशुचिभावनेचे चिंतन पुन्हा पुन्हा केल्याने मनुष्यात आत्मचेतनेचा संचार होतो. व तो जड पासून चैतन्याकडे उन्मुख होतो. तो स्वतःच्या शरीराचा राग करत नाही आणि दुसऱ्यांच्या शरीराने पण विरक्त होतो आणि आत्मभावात लीन राहतो. ज्याची शरीराबरोबर एकत्वबुद्धी असते तो सुखदुःखाने सुटू शकत नाही. आणि जो आत्मभावनेत लीन राहतो त्याला सुखदुःख स्पर्श पण करू शकत नाही.

आस्रव भावना

ह्या संसाराचा प्रवाह कर्मावर आधारीत आहे. जीव अनादी काळापासून कर्मानि आवृत्त आहे. आणि कर्माचे बंधन दिवसेंदिवस बांधतच राहतो, संसारात आवागमनाचा क्रम चालूच राहतो. अशाप्रकारे कर्माचा आत्म्यामध्ये जो प्रवाह चालू राहतो त्याला 'आस्रव' म्हणतात. जैन परंपरेमध्ये एक प्रसिद्ध श्लोक आहे.

आस्रव बंध हेतुः स्यात् संवरो मोक्षकारणम् ।
इतियमार्हती दृष्टिरण्यत् सर्व प्रपंचनम् ॥

अर्थ - 'आस्रव' बंधाचे कारण आहे तर संवर मोक्षाचे कारण आहे. हा जैन दर्शनाचा दृष्टिकोन आहे. बाकी सर्व काही केवळ प्रपंच आहे.

आत्मवान पुरुषाला सर्वप्रथम ह्या गोष्टीवर लक्ष दिले पाहिजे की मन, वचन आणि शरीराच्या प्रवृत्तीला 'योग' म्हणतात. ''शुभ योग युक्त प्रवृत्ती'' शुभयोगास्रव आहे आणि ''अशुभ योग युक्त प्रवृत्ती'' अशुभयोगास्रव आहे. शुभयोगाने पुण्याचा बंध होतो व अशुभयोगाने पापाचा बंध होतो. मुमुक्षू पुरुषासाठी हे दोन्हीही त्याज्य आहेत. कारण जोपर्यंत कर्मबंध होत राहतील तोपर्यंत मोक्ष प्राप्त होणार नाही. परंतु साधकासाठी पुण्य-पाप दोघांचा एकाचवेळी त्याग करणे संभवत नाही म्हणून सर्वप्रथम अशुभयोगाच्या त्यागाचे विशिष्ट ध्यान ठेवले पाहिजे.

साधकाने स्वतःला पापयुक्त प्रवृत्तीपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे तो जसा साधनेच्या मार्गावर पुढे जातो तसा शुभयोगास्रवाचाही निरोध करत जातो. पुढे जाता आत्मसाधनेमध्ये एकाग्र राहणारा साधक अशा स्थितीला प्राप्त होतो की तो शुभ योगापासूनही निवृत्त होतो आणि आत्म्याच्या शुद्धभावाच्या दिशेनेही पुढे जातो. परंतु प्रत्येक साधकाने आपला मूळ हेतू 'आस्रव' त्यागण्याचा ठेवला पाहिजे. मग ते शुभ असो अथवा अशुभ. अशुभास्रव जर लोखंडाची बेडी आहे तर शुभ योगास्रव सोन्याची बेडी आहे. बेडी सोन्याची असो किंवा लोखंडाची परंतु त्यांच्याद्वारे बंदिस्त झाले तर कष्ट होणारच.

आस्रवभावना आत्म्याच्या आस्रवभावाला सोडण्याची प्रेरणा देते. ह्याचे निरंतर चिंतन केल्याने मनुष्याचे मन प्रवृत्तीकडून निवृत्तीकडे जाते व निवृत्तीतच खरा मोक्षाचा मार्ग आहे, खरा धर्म आहे.

जो कर्माचा आस्रव होणाऱ्या क्रिया करीत जातो त्यालाच चतुर्गतिरूप संसारात भ्रमण करावे लागते. आस्रव इहलोक, परलोक या दोन्ही लोकात दुःखरूप आहे. पाच इंद्रिये, चार कषाय, पाच अव्रत आणि पंचवीस क्रियारूप आस्रवांद्वारे कर्मरूपी मळाचा प्रवेश झाल्यावर संसार सागरात पतन होते आणि मुक्ती प्राप्त होऊ शकत नाही. अशाप्रकारे आस्रवाच्या दोषाचे पुन्हा पुन्हा चिंतन करणे ही आस्रवानुप्रेक्षा आहे.

जो साधक साम्यभावामध्ये लीन राहतो आणि मोह कर्माच्या उदयाने होणाऱ्या पूर्वोक्त आस्रवभावांना त्याज्य समजून त्याचा त्याग करतो त्यांची आस्रव भावना सार्थक होते.

संवर भावना

संवर शब्द संस्कृत भाषेतील आहे. ह्याचा अर्थ 'आवृत्त करणे, झाकणे अडविणे'

असतो.[५०]

संवर आत्म्याची ती शुद्ध स्थिती आहे जी कर्माच्या येणाऱ्या प्रवाहाला अथवा आस्रवाला अडविते.

आचार्य उमास्वातींनी 'तत्त्वार्थसूत्रा'मध्ये ह्याची परिभाषा व लक्षण यांचे वर्णन करताना लिहिले आहे की 'आस्रव निरोध संवरः' अर्थात आस्रवाचा निरोध करणे म्हणजे संवर आहे.[५२]

जसे पूर्वी एका श्लोकामध्ये सूचित केलेले आहे की आस्रव आणि संवर हीच दोन मुख्य तत्त्वे आहेत, ज्याच्यावर जैन दर्शनाचा साधना मार्ग उभा आहे. मोक्षमार्गाची समस्या अथवा अडथळा आस्रव आहे. आणि त्याचे समाधान संवर आहे.

'कृत्स्न कर्मक्षयो मोक्षः'[५२] अर्थात सर्व कर्म क्षीण होणे अथवा क्षय होणे म्हणजे मोक्ष आहे. तत्त्वार्थसूत्रामध्ये हा जो उल्लेख झाला आहे त्याचे तात्पर्य हे आहे की जेव्हा सर्व कर्मांचा क्षय होतो तेव्हा संसारी जीव संसारातून, जन्ममृत्यूच्या चक्रातून, सर्व भौतिक सुखदुःखापासून मुक्त होतो. त्याचे अनादी काळाचे बंधन तुटते.

ज्याप्रमाणे तुरुंगात बंद असलेला पुरुष सुटल्यावर जसा प्रसन्न होतो त्याचप्रमाणे आत्मा कर्मबंधनातून सुटल्यावर आपल्या शुद्ध स्वरूपात येतो. तो अनंत, असीम आणि अव्याबाध आनंदात मग्न होतो. साधकाने सर्वप्रथम अशुभ संवरण केले पाहिजे. क्रोध, घृणा, ईर्ष्या, काम, राग, द्वेष, संग्रह इत्यादींचा निरोध करणे आवश्यक आहे, त्याचबरोबर 'शुभ'चा सुद्धा अवरोध केला पाहिजे. जसे आस्रवभावनेमध्ये सांगितले आहे की, हे सर्व संवराद्वारे सिद्ध होते. संवर ही आत्म्याची शुद्ध प्रवृत्ती आहे, ज्याच्यात निवृत्तीचा समावेश आहे. येथे एक प्रश्न निर्माण होतो की संवर तर निरोध आहे त्याला प्रवृत्ती कसे म्हणता येईल ? येथे हे जाणण्यायोग्य आहे की प्रवृत्तीला थांबविण्यासाठी जो प्रयत्न करावा लागतो, उद्यम करावा लागतो त्याला आंतरीक दृष्टीने प्रवृत्ती म्हटले तर अयोग्य वाटत नाही.

संवराच्या ह्या स्वरूपाचे पुन्हा पुन्हा चिंतन, मनन करणे, अभ्यास करणे ही संवर भावना आहे. आत्म्याच्या शुद्ध स्वरूपाकडे जाण्याचा हा एक महत्त्वपूर्ण मार्ग आहे.

समुद्रातले जहाज छिद्र बंद असल्याने, पाणी आत न घुसल्याने निर्विघ्नपणे सागर पार करते त्याचप्रमाणे जीवरूप जहाज आपल्या शुद्ध आत्मज्ञानाच्या बळावर इंद्रिय इत्यादी आस्रवरूपी छिद्रांना बंद केल्यानंतर कर्मरूपी जल न घुसल्याने केवलज्ञान इत्यादी अनेक गुणरत्नाने संपूर्ण मुक्ती स्वरूप किनाऱ्याला निर्विघ्नपणे प्राप्त होते. अशा संवरभावनेच्या

तत्त्वांचे पुन्हा पुन्हा चिंतन केल्याने मोक्षपदाची प्राप्ती होते.

निर्जरा भावना

आत्मा जोपर्यंत कर्मयुक्त आहे तोपर्यंत मोक्षप्राप्तीचे ध्येय पूर्ण होत नाही. कर्मरहित होण्यासाठी संवर भावनेवर आपण चिंतन केले पाहिजे ज्यामुळे नवीन कर्म आत्म्यामध्ये प्रवेश करीत नाही. इतक्यानेच काम पूर्ण होत नाही. ज्याप्रमाणे सरोवराचे नाळे बंद केल्याने नवे पाणी येण्याचे बंद होते परंतु अगोदर जे पाणी साठले आहे ते तर तसेच राहते, त्याला उपसून बाहेर फेकल्याने तलाव एकदम रिकामा होतो, त्याचप्रमाणे आत्म्यावर अनादी काळापासून लागलेल्या कर्मांना नष्ट करायचे असेल तर संवराद्वारे येत्या कर्मांना थांबवून पूर्वी जो आत्म्याला कर्माचा बंध झाला आहे त्याला दूर केले पाहिजे. त्यासंबंधी तत्त्वार्थसूत्रात सांगितले आहे - ''तपसा निर्जरा च ।''[५३] निर्जरा तपाद्वारे होते. त्याने कर्मे जीर्ण होतात, झडतात.[५४] निर्जरेचे दोन प्रकार आहेत- सकाम निर्जरा, अकाम निर्जरा.[५५] ह्यांना सविपाक आणि अविपाक निर्जरा सुद्धा म्हणतात. 'सकाम निर्जरा' म्हणजे आत्मकल्याणाच्या ध्येयाने संकल्पपूर्वक जे तप केले जाते, त्याने जी कर्मे निर्जरीत होतात ती सकाम निर्जरा आहे आणि व्रत प्रत्याख्यान केल्याशिवाय, असेच कष्ट सहन केल्याने जी कर्मे नष्ट होतात त्याला अकामनिर्जरा म्हणतात.

कर्माला प्रतिबंध करण्यासाठी ज्याप्रमाणे संवराची आवश्यकता आहे त्याचप्रमाणे कर्म नष्ट करण्यासाठी निर्जरेची आवश्यकता आहे. संवर साधना केली पण जर निर्जरा करण्याची साधना केली नाही तर मोक्षाची लक्ष्यपूर्ती होत नाही. कारण की संचित कर्माच्या बळावर संसार परिभ्रमण चालतच राहील. तो समाप्त होणार नाही. संवर आणि निर्जरा दोन्हींची आराधना केल्याने आत्म्याला लक्ष्यसिद्धी प्राप्त होऊ शकते.

निर्जरा भावनेमध्ये निर्जरेच्या स्वरूपाचे चिंतन केले जाते. अनंतकाळच्या संचित कर्मांमुळे जीव ह्या संसारचक्रामध्ये भ्रमण करत राहतो. जोपर्यंत संचित कर्म नष्ट होत नाही तोपर्यंत ह्या संसारचक्रातून सुटका होत नाही. निर्जरा अथवा तपश्चर्येद्वाराच संसार चक्रातून सुटका होईल. संवर भावनेने तर येथे केवळ कर्मास प्रतिबंध होतो म्हणून साधकाने हे चिंतन केले पाहिजे की त्याला कर्माला अडविण्याबरोबर कर्मबंध तोडायचे सुद्धा आहे, निर्जीर्ण करायचे आहे. पुन्हा पुन्हा तसा अभ्यास केल्याने त्याच्या मनामध्ये तपभावना जागृत होते आणि जेव्हा भावना परिपक्व होते तेव्हा ती आचरणाचे - चर्येचे रूप घेते. जीवनामध्ये कार्यान्वित होते. तसे होणे आत्मसाधनेसाठी अत्यंत सहायक आहे.

कर्म निर्जरा करणे हाच तपाचा उद्देश असतो. परमशांती, सुख मिळविण्यासाठी आत्म्याला कर्मबंधापासून मुक्त करावेच लागेल आणि कर्मबंध तोडण्याचे अपूर्व साधन तप आहे. जसे संसाराचे सर्वात प्रिय तत्त्व पैसा आहे तसा आत्मार्थी साधकाचे सर्वात प्रिय तत्त्व परमात्मा आहे. त्या परमतत्त्वाला प्राप्त करण्यासाठी जे काही सहन केले जाते ते तप आहे, ज्याने कर्म निर्जरा होते. भवभ्रमणाचे मूळ कारण कर्म आहे आणि त्याला आत्म्यापासून दूर करणे निर्जरा आहे. ह्या भावनेचे पुन्हा पुन्हा चिंतन केल्याने अर्जुनमाळी सारख्या हत्याराही आपल्या आत्म्याला भावित करून शुद्ध झाला. सुदर्शन श्रावकाच्या संयोगाने अर्जुनमाळीला भगवान महावीरांचे दर्शन झाले व त्यांची देशना ऐकूनच अर्जुनमालीचे हृदय पश्चातापामुळे द्रवित झाले व त्याने भगवान महावीरांच्या चरणी दीक्षा घेतली. दीक्षा घेतल्यानंतर दोन दोन उपवासाची तपसाधना सुरू केली, पारण्याच्या दिवशी भिक्षेसाठी गेले तर आपल्या स्वजनांची हत्या करणाऱ्याला समोर पाहून त्यांच्या तपाला आदर देण्याऐवजी लोक त्यांना शिव्या देत होते, मारत होते. परंतु अर्जुनमाळी समजत होता की हे माझे केलेल्या कर्माचे फळ आहे. ते समभावाने सर्व काही सहन करत होते. आणि कर्माची निर्जरा करीत होते. सहनशीलता, समभाव आणि तपाचा प्रचंड पुरुषार्थ यामुळे सहा महिन्यांमध्ये ते कर्मबंधातून मुक्त झाले आणि आत्मा विशुद्ध झाला व ते लोकाग्रावर अर्थात सिद्धशीलेपर्यंत पोहचले, मोक्षास गेले. हा निर्जरा भावनेचा प्रभाव आहे.

लोक भावना

'लोक' शब्द संस्कृतच्या 'लोक' धातूपासून निष्पन्न झाला आहे.[५६] त्याचा अर्थ बघणे, पाहणे असा आहे. 'लोक्यते इति लोकः' - जो बघितला जातो, ज्याची अनुभूती येते, तो लोक आहे. किंवा 'लोक्यन्ते पदार्था यस्मिन लोकः' ज्याच्यात पदार्थ दिसतात त्याला 'लोक' म्हणतात.

'भगवती' सूत्रामध्ये 'लोक' शब्दाची उत्पत्ती अशाच प्रकारे केलेली आहे. ''जे लोकइ से लोए'' अर्थात प्रमाणाद्वारे ज्याचे अवलोकन केले जाते त्याला 'लोक' म्हणतात. लोक म्हणजे 'समस्त विश्व' आहे.[५७]

लोक दोन प्रकारचा आहे. लोकाकाश आणि अलोकाकाश. जितक्या जागेत धर्म आणि अधर्म द्रव्याच्या निमित्ताने जीव आणि पुद्गलाची स्थिती, गती होते आणि जो षद्रव्यांनी युक्त आहे तो लोकाकाश आहे, आणि जेथे केवळ आकाश आहे ते अलोकाकाश आहे.[५८]

'लोक'चे अधः, मध्य आणि उर्ध्व असे तीन भाग आहेत. मध्यबिंदू मेरू पर्वताच्या मूळामध्ये आहे. मेरूपर्वताच्या समतलाच्या खाली एक हजार योजनांमध्ये नऊशे योजनांच्या खाली अधोलोकाची सुरुवात होते आणि सातव्या नरकापर्यंतच्या लोकक्षेत्राला 'अधोलोक' म्हणतात, जो उलट्या पणतीसारखा अर्थात खालचा भाग विस्तृत आणि वरचा भाग आखुड असा आहे.

मेरू पर्वताच्या नऊशे योजनेखाली आणि नऊशे योजनेवर एकूण अठराशे योजने उंचीचा मध्यलोक आहे, ज्याचा आकार झालरीसारखा आहे. ज्याची लांबी आणि रूंदी सारखीच आहे म्हणजे प्रथम उलट्या पणतीसारखा वरचा भाग लहान आणि दुसऱ्या सुलट ठेवलेल्या पणतीसारखा तळाचा भाग लहान असा मध्यलोक आहे ह्याचा विस्तार एक रज्जू प्रमाण आहे.

उर्ध्वलोकाचा आकार मृदुंगासारखा आहे. मेरूपर्वताच्या समतलापासून नऊशे योजनांच्या वरचे संपूर्ण क्षेत्र मुक्तीस्थान अर्थात सिद्धशिलेपर्यंतच्या क्षेत्राला 'उर्ध्वलोक' म्हणतात. भगवती सूत्रामध्ये लोकाच्या आकाराला सुप्रतिष्ठ संस्थानिक म्हटले आहे. अर्थात जमिनीवर एक पणती उलटी त्याच्यावर दुसरी पणती सुलटी आणि त्याच्यावर तिसरी पणती उलटी ठेवल्याने जो आकार बनतो तोच आकार लोकाचा आहे.[५९]

लोकाचा एकदम खालचा भाग जेथे सातवा नरक आहे. तो सात रज्जु रुंद आहे आणि तेथून कमी होत होत सात रज्जू उंचीवर जेथे दोन पंत्याचे संधीस्थान आहे तेथे मध्यलोक आहे, त्याची रुंदी एक रज्जू आहे. तेथून पुढे क्रमाने वाढत वाढत पाचव्या देवलोकाजवळ जो मध्यलोकापासून जवळ जवळ तीन रज्जू उंच आणि पाच रज्जू रुंद आहे. नंतर क्रमाने कमी होत होत साडेतीन रज्जू उंचीवर जेथे तिसऱ्या पणतीचा शेवटचा भाग म्हणजे सिद्धशीला आहे तेथे एक रज्जू रुंदी आहे. अशाप्रकारे ह्या संपूर्ण लोकाची उंची चौदा रज्जू आहे. आणि रुंदी जास्तीत जास्त सात रज्जु आणि कमीत कमी एक रज्जू आहे.

जैन धर्मग्रंथात लोकाच्या स्वरूपाचे आकार, लांबी, रुंदी इत्यादींचे विस्तृत विवेचन प्राप्त होते.

बारा वैराग्य भावनेमध्ये लोकभावना अत्यंत महत्त्वपूर्ण आहे कारण ज्यांची आपल्या आत्म्यावर श्रद्धा आहे तो लोकावर श्रद्धा ठेवतो. आणि लोकस्वरूपाचे चिंतन आपल्याला आत्मस्वरूपाच्या चिंतनाकडे वळविते.

ह्या लोकामध्ये कोठे तर स्वर्गशिखरयुक्त मेरू पर्वत आहे आणि कोठे भयंकर खड्डे तर काही ठिकाणी देवाची रत्नखचित मंदिरे आहेत, काही ठिकाणी अंधकारमय नरक इत्यादी अत्यंत भयंकर स्थळे आहेत. कोठे जयजयकार आहे तर कोठे हाहाकार[६०] परंतु ज्यांना एकांतसुख प्राप्त करायचे आहे त्याने चिंतन केले पाहिजे की हा संपूर्ण लोक आपल्या आत्म्यासारखा दुसऱ्या जीवात्म्याने भरलेला आहे. हा जीव कर्मानुसार चतुर्गतीमध्ये भ्रमण करतो. आत्मस्वरूपाचे ज्ञान नसल्याने ह्या अनंत यात्रेचा अजून अंत आलेला नाही.

लोकस्वरूपाचे ध्यान करणारा साधक असे चिंतन करतो की हा लोक असे स्थान आहे जेथे अनादी काळापासून सर्व प्राणी भ्रमण करतात. ज्यांनी आपल्या स्वरूपाला ओळखलेले नाही तो इतक्या विशाल लोकामध्ये भटकतो. ह्या जीवाचे अस्तित्व किती सूक्ष्म आहे. त्याने चिंतन केले पाहिजे की इतक्या मोठ्या लोकात माझे स्थान काय आहे ?

तो आपल्या चिंतनामध्ये अजून पुढे जातो आणि विचार करतो की जोपर्यंत हा जीवात्मा कर्मबंधनातून सुटणार नाही तोपर्यंत ह्या लोकामध्ये भटकत राहील. विभिन्न योनीत संसरण चालू राहते. भीषण नरकाच्या दुःखाविषयी केवळ ऐकल्यानेही कंप सुटतो, भयाच्यामुळे रोमारोमामध्ये स्पंदन होते ते सहन करावे लागते. संसारामध्ये प्रियातीप्रिय व्यक्तीचा वियोग सहन करावा लागेल. दुःखद भयंकर परिस्थितींना तोंड द्यावे लागेल. ह्या लोकामध्ये अनादी काळापासून असे चालत आहे. स्वर्गसुख बाहेरून अत्यंत मोहक वाटते परंतु ते सुद्धा एक ना एक दिवस नष्ट होते. बाहेरून दिसणाऱ्या सुखाबरोबर भयंकर दुःख जोडलेले आहे. भोगाच्या बरोबर अशी परंपरा संलग्न आहे.

जर थोडक्यात सांगायचे असेल तर लोक आत्म्यासाठी भयंकर दुःखाचे घर आहे. ह्याच्यातून सुटल्यानेच आत्मकल्याण होईल. परंतु जोपर्यंत ममत्व आणि अज्ञानाच्या जाळ्यात जीवात्मा अडकला आहे तोपर्यंत मुक्त होऊ शकणार नाही.

ह्या लोकभावनेचे पुन्हा पुन्हा चिंतन केल्याने मनामध्ये लोकासंबंधी लौकिक भाव आणि सुखाच्या प्रती विरक्ती उत्पन्न होते. आत्मा खऱ्या सुखाच्या शोधात अथवा आध्यात्मिक आनंदाकडे उद्युक्त होतो, ती जीवनाची खरी दिशा आहे.

बोधीदुर्लभ भावना

मनुष्य संसारात भटकत राहतो. सांसारिक सुखामध्ये तो इतका वेडा झाला आहे की हे सर्व काही सोडून जावे लागेल असे कळत असतानाही तो पौद्गलिक सुखामध्ये लीन असतो. असे का ?

जर ह्यावर खोलवर विचार केला तर असे प्रतीत होईल की त्याला सत्याचा, वस्तुस्थितीचा बोध नाही.

मनुष्य जन्म अत्यंत पुण्याने प्राप्त होतो. एक मानवच कर्मयोगी आहे. देव केवळ सुख भोगतात. नरक योनीतील जीव दुःख सहन करतात, तीर्यंच सुद्धा अनेक प्रकारचे दुःख भोगतात. एकमात्र मनुष्य योनीच अशी आहे की जेथे सुख दुःख सहन करता करता साधना, आराधनाद्वारे अनादी काळापासून चालणाऱ्या संसारभ्रमणाचा अंत होऊ शकतो. परंतु केवळ मनुष्य जन्म प्राप्त झाल्यानेच काम भागणार नाही. ते तेव्हाच शक्य होईल जेव्हा त्याला असा बोध होईल की देवांच्या सुंदर, आकर्षक सुखाने आत्मकल्याण होणार नाही. सांसारीक वैभव, संपत्ती, सत्ता यांद्वाराही मनुष्य आपले हित साधू शकणार नाही. वास्तविक कल्याण तर आपल्या आत्मस्वरूपाला समजल्याने होईल. तसे ज्ञान व तशी अनुभूती प्राप्त झाली तर जीवनाच्या जास्तीत जास्त समस्यांचे समाधान निश्चित होईल, परंतु असे ज्ञान प्राप्त होणे, बोधी मिळणे अत्यंत दुर्लभ आहे, कठीण आहे. परंतु मानवाने जर प्रयत्न केला तर त्याला जगातील दुर्लभ गोष्टही सुलभ होते.

असा विचार करून मनुष्याने आपल्या चिंतनधारेला अजून पुढे वाढवायला पाहिजे आणि दुर्लभ बोधी सुद्धा प्राप्त करण्याचा संकल्प केला पाहिजे. जर बोधी प्राप्त झाली नाही तर पुन्हा पुन्हा चौऱ्यांशी लाख योनीत भ्रमण करावे लागेल. असे ज्ञान प्राप्त केले पाहिजे की ज्याने भवभ्रमणाचा अंत होईल.

बोधीचा अर्थ 'सम्यक्दर्शन' आहे. सम्यक्दर्शन प्राप्त झाल्याशिवाय धर्माराधना आध्यात्मिक साधना काहीच सम्यक् म्हणजे योग्य तऱ्हेने होऊ शकत नाही. मानवाने ह्याचा पुन्हा पुन्हा विचार केला पाहिजे. ह्याने मिथ्यात्व, मोहनीय कर्म क्षीण होण्यात सहायता मिळते.

बोधीला रत्नाची उपमा दिली आहे. रत्न संसारातील एक बहुमूल्य वस्तू आहे. ज्याप्रमाणे संसारी लोकांना रत्नप्राप्ती अत्यंत दुर्लभ आहे तरी त्याला मिळविण्यासाठी रात्रंदिवसच प्रयत्न करतात, त्याचप्रमाणे बोधिरत्नाचे महत्त्व समजले पाहिजे. रत्नापेक्षाही बोधिरत्नाची दुर्लभता अनंत गुणांनी अधिक आहे. कारण ते प्राप्त झाल्यावर जीवनधारा बदलून जाते. म्हणून आगमामध्ये चार दुर्लभ पदार्थात सम्यक् बोधी मिळणे दुर्लभ आहे असे सांगितले आहे.६१

मोक्षमार्गाचा सत्यमार्ग जाणणारे लोकही कधी कधी मार्गच्यूत होतात, श्रद्धाभ्रष्ट होतात कारण लोकांची तत्त्वरूची कमी झाली आहे. तत्त्वरूची निर्माण होणे ही अत्यंत

दुर्लभ गोष्ट आहे. त्या दुर्लभ गोष्टीला सुलभ करण्यासाठी आणि बोधी सम्यक्त्वाची प्राप्ती करण्यासाठी पुरुषार्थ साध्य केला पाहिजे.

प्रथम तीर्थंकार भगवान ऋषभदेव यांनी जेव्हा दीक्षा घेतली तेव्हा भरताला राज्यगादीवर बसवून बाहुबली आणि अन्य अठ्ठ्याण्णव पुत्रांना राज्याचे भाग दिले. नंतर भरत महाराजांच्या राज्यात चक्ररत्न उत्पन्न झाले ते घेऊन ते सर्व देशांवर विजय संपादन करण्यासाठी निघाले. विजय प्राप्त करून पुन्हा आले तेव्हा आपल्या बांधवांना स्वतःच्या आज्ञेमध्ये राहण्याचे सांगितले. तेव्हा त्या सर्वांनी भगवान ऋषभदेवांच्या जवळ जाऊन सांगितले की, हे प्रभू ! भरत जरी आमचा मोठा भाऊ असला तरी तुम्ही दिलेले आमचे राज्य तो आमच्याकडून पुन्हा का घेत आहे ? आणि त्यांच्या आज्ञेत आम्ही का राहावे? आम्हीसुद्धा तुमचेच पुत्र आहोत. आम्हालाही स्वतःचा काही स्वाभिमान आहे. तेव्हा भगवान ऋषभदेवांनी त्यांना उपदेश दिला - 'संबुज्झह किं न बुज्झह'- अरे भव्य जीवांनो, समजा, बोध प्राप्त करा. ही बोधी फक्त मानवी जीवनातच होणे शक्य आहे. जगाचे राजपाट, मानसन्मान, सत्ता, पदवी आणि प्रतिष्ठा सर्वकाही अस्थिर आहे, नाशवंत आहे, लक्ष्मी चंचल आहे. सर्वकाही सोडून शेवटी आयुष्य पूर्ण झाल्यावर जावेच लागेल अथवा पुण्य क्षीण झाले तर सत्ता, संपत्ती, कुटुंब तुमच्या देखत नष्ट होतील. खरी लक्ष्मी तर आत्मगुणांची आहे, आणि खरे साम्राज्य मोक्षाचे आहे, आंतरिक शत्रूंवर विजय प्राप्त करण्याचा प्रयत्न करा, पुरुषार्थ साध्य करा, हेच खरे राज्य आहे. तेथे तुमच्या अखंड सुखात भाग घेण्यासाठी कोणताच भरत येणार नाही म्हणून देवांनाही दुर्लभ अशा या मनुष्य जन्मात वैराग्य भावना जागवून बोधी प्राप्त करा.

ऋषभदेव भगवंताच्या उपदेश ऐकून अठ्ठ्याण्णव भावांचे हृदय परिवर्तित झाले, आणि त्यांचे अंतकरण वैराग्यभावनेने भरून गेले. तेथेच संसाराचा त्याग करून ते सर्वजण 'संयमी अणगार' झाले. बोधीला सुलभ बनवून आराधनेमध्ये लीन झाले. तप, संयमाद्वारे आत्म्याला उज्ज्वल बनवून सर्व कर्मांचा क्षय करून परम पदाला प्राप्त झाले.[६२]

अशाप्रकारे बोधिदुर्लभ भावनेमध्ये रममाण होणाऱ्या साधकाची 'पर' द्रव्यातून आसक्ती नष्ट होते, अज्ञान दूर होते व हृदयात ज्ञानदीप प्रकाशित होऊ लागतो.

धर्मभावना

धर्मस्वाख्यात भावना अथवा धर्मभावना आचार्य श्री उमास्वातीच्या अनुसार ही शेवटची अथवा बारावी भावना आहे. ह्या अगोदर अकरा भावनांमध्ये जे प्रतिपादन केलेले

आहे त्याचा आशय मानवाला 'असत्' पासून दूर करून 'सत्'मध्ये लावणे आहे. मानवाने आपल्या सत्य स्वरूपाला समजून असा अनुभव करायला पाहिजे की तो स्वतः एकमात्र स्वतःचे हित करू शकतो. दुसरे जितके सांसारिक लोक त्याचा हितचिंतक असल्याचे ढोंग करतात ते सर्व मिथ्या आहे - खोटे आहे. त्याला कर्मप्रवाहरूपी आस्रवाने स्वतःला वेगळे करून संवर आणि निर्जरेची साधना केली पाहिजे, ज्याने ह्या अनादी, अनंत संसारात तो आवागमनातून मुक्त होईल. ह्या अकरा भावनांच्या अभ्यासाने भावित होऊन मनुष्य धर्मभावनेच्या भूमिकेवर येतो. कारण धर्म असे साधन आहे की ज्यामुळे 'पर'भाव सोडून मनुष्य 'स्व' भावात येतो.

विभिन्न आचार्यांनी धर्माच्या अनेक प्रकारे व्याख्या केलेल्या आहेत. ''धारणात् धर्मः इत्याह धर्मात् धारयते प्रजा''[६३] मनुस्मृतीचे हे कथन अत्यंत मार्मिक आहे. धर्म शब्द 'धृञ्' धातूपासून बनला आहे. त्यामुळे तो संसाराला धारण करतो, संसार त्याच्या बळावर टिकून राहिला आहे. म्हणूनच त्याला 'धर्म' म्हणतात. धर्माच्या नियमिततेमुळे तो सत्य, शील, विश्वास आणि सद्भावावर टिकून आहे. सांसारिक सर्व कार्ये त्याच्याद्वारे चालतात. ''जो धर्माचे पालन करतो, त्याचे रक्षण करतो, धर्म त्यांचे रक्षण करतो.''[६२] हे मनूचे प्रसिद्ध वाक्य आहे. अर्थात धार्मिक व्यक्तींचे जीवन सुरक्षित आहे. त्याला कधी भय, धोका राहत नाही. धर्म आत्मशुद्धी, आत्मपरिमार्जन अथवा अंतःपरिष्कारावर टिकून आहे. आत्मशुद्धीचे साधन धर्म आहे. धर्माच्या ज्या परिभाषा केल्या आहेत त्या ह्याच्याच आधाराने केलेल्या आहेत. त्या संवर निर्जरामूलक आहेत. कारण की आस्रव निरोध आणि तपश्चर्येने आत्मशुद्धी होते.

आचार्य कुंदकुंद यांनी आत्मस्वभावाला 'धर्म' म्हटले आहे.[६५] धर्मभावनेमध्ये धर्माच्या स्वरूपाचे, धर्माच्या माहात्म्याचे आणि धर्मने होणाऱ्या फायद्याचे चिंतन केले पाहिजे.

'वत्थुसहवो धम्मो' वस्तूचा स्वभाव धर्म आहे. 'धर्म' शब्दाचा पर्यायवाची शब्द 'स्वभाव' होऊ शकतो. वस्तूची प्रकृती म्हणजे स्वभाव आपण त्याला वस्तूचा गुणधर्मही म्हणू शकतो. ज्याप्रमाणे हवेचा गुणधर्म संचरणाचा आहे, पाण्याचा गुणधर्म प्रवाहित राहण्याचा आहे, अग्नीचा उष्णता देण्याचा आहे तसाच आत्म्याचा धर्म ''चैतन्य'' आहे. ह्या चैतन्यतेने सजीव आणि निर्जीव असे दोन भेद होतात. स्वभाव व्यक्तीला अथवा वस्तूला कधीच सोडत नाही. धर्माचा संबंध बाह्य जगाबरोबर नाही हा तर आत्म्याचा गुणधर्म आहे. एक श्लोक प्रसिद्ध आहे -

दुर्गतौ पततन् जन्तोः धारणाद् धर्म उच्यते ।
धत्ते चैतान् शुभे स्थाने, तस्माद् धर्म इति स्मृतः ॥

जो दुर्गतीमध्ये पडत्या जीवांना धारण करतो, अडवितो त्याला धर्म म्हणतात. आत्म्याला मुक्त करून शाश्वत स्थानी पोहचवणारा धर्मच आहे.

धर्म आत्मिक आणि लौकिक दोन्ही प्रकारचा आहे. ज्या आराधना केल्याने जीव आत्माभिमुख होतो अशा संवर, सामायिक, पौषध, त्याग, तप, उपवास इत्यादी आराधना म्हणजे आत्मिक धर्म आहे. आणि लोक, सामाजिक, सदाचार, नीती, प्रामाणिकता इत्यादी लौकिक धर्म आहेत.

जो आत्मधर्म साधूसाठी आहे त्याला 'अणगार धर्म' म्हणतात. जो धर्म श्रावक-उपासकासाठी आहे त्याला 'आगार धर्म' म्हणतात. सर्व तीर्थंकरांनी धर्माचे सारखेच निरूपण केले आहे. कोणत्याही जीवाला मारू नका. अहिंसा, संयम आणि तपरूपी साधनाच जीवनासाठी कल्याणकारी आहे. सर्व जीवांना जगण्याची इच्छा आहे. कोणालाही मरण्याची इच्छा नाही. त्यांची दया करणे हा धर्म आहे म्हणूनच म्हणतात, ''दया धर्म का मूल है ।''

जैन ग्रंथांतील एक प्रसिद्ध उदाहरण आहे. तपस्वी धर्मघोष मुनींचे शिष्य धर्मरूची यांना नागश्री नावाच्या ब्राह्मण स्त्रीने कडू भोपळ्याची भाजी भिक्षेत दिली, त्याच्या वासानेही जीवजंतू मृत्युमुखी पडतात. तेव्हा मुनींनी विचार केला की भाजीचा एक थेंब जमिनीवर टाकला तर अनेक जीव मरतात, जर ही संपूर्ण भाजी भूमिवर टाकली तर किती जीव मरतील. माझा धर्म जीवांची रक्षा करणे आहे. अशाप्रकारे धर्मभावनेने हृदय द्रवित करून कडू तुंबड्याच्या भाजीचा आहार केला आणि विषाच्या प्रभावाने मृत्यू निश्चित होईलच हे समजून शेवटी समाधीपूर्वक 'संथारा' व्रत करून आयुष्य पूर्ण करून सर्वार्थसिद्ध विमानामध्ये उत्पन्न झाले. हे धर्मभावनेचे अपूर्व उदाहरण आहे. त्याच्यामध्ये अहिंसा धर्माचा परम विजय आहे.

वेगवेगळ्या ग्रंथांमध्ये वेगवेगळ्या आचार्यांनी जसे - हरीभद्र हेमचंद्र, शुभचंद्र इत्यादी विद्वान आचार्यांनी धर्माचे जे सुंदर प्रेरणादायी विवेचन केले आहे त्याचे साधकाने आपल्या मनात सतत चिंतन करीत राहिले पाहिजे. त्यामुळे त्याचे धर्माच्या प्रती आकर्षण वाढेल. धर्मसिद्धांतांप्रती जिज्ञासा उत्पन्न होईल आणि जेव्हा मानवात खरी जिज्ञासा जागृत होते तेव्हा तो त्या संदर्भात शोध करतो. मनाची पृष्ठभूमी पवित्र असेल तर तो तसा

बाधना प्रयत्नही करतो. म्हणूनच धर्मभावनेचे दररोज चिंतन केले पाहिजे. त्याने मनामध्ये धर्मप्रती दृढता निर्माण होते. मानव धार्मिक जीवन जगण्यासाठी तत्पर होतो.

बारा भावनांचे येथे थोडक्यात विवेचन केलेले आहे. ते केवळ संकेतमात्र आहे. हा विषय तर इतका महत्त्वपूर्ण आणि विस्तृत आहे की ह्याच्या एकेका भावनेवर एकेक शोधग्रंथ होऊ शकेल. येथे हे समजण्यासारखे आहे की ह्या बारा भावनांच्या केंद्रस्थानी आत्मा आहे. आत्म्याबरोबर जुळलेले विविध चिंतन पक्ष ह्यात स्पष्ट होतात. जेथे आत्म्याचे स्वतःच्या दृष्टीने भावनात्मक चिंतन आहे तेथे एकत्वभावना निर्माण होते. जेथे आत्म्यापेक्षा 'अन्य'च्या वास्तविक स्वरूपाचे दिग्दर्शन आहे त्याच्याद्वारे आत्माभिमूखता प्राप्त करण्याची प्रेरणा मिळते ती अन्यत्वभावना आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त अन्य सर्व भावना आत्मारुपी केंद्राच्या परिधीमध्येच फिरत राहतात.

मैत्री इत्यादी चार भावना : एक परिचय

अनित्यादी बारा भावनांबरोबर चार भावनांचे वर्णन अनेक आचार्यांनी केलेले आहे. ह्या चार भावना साधकाच्या जीवनाला सरळ, सौम्य, करुणाशील बनविण्यासाठी सहायक आहेत. वाचक उमास्वाती यांनी मैत्री, प्रमोद, कारुण्य आणि माध्यस्थ[६६] ह्या चार भावनांच्या नावाचा संकेत केला आहे. ह्या भावना चित्ताला धर्मध्यानामध्ये स्थिर करतात. "धर्मध्यानाला पुष्ट करण्यासाठी भावना हे रसायन आहे.[६७] जसे औषधी रसायनाने शरीराचे रोग नष्ट होतात तसेच ह्या चार भावना भवरोग मिटवून आत्म्याला पुष्ट करतात. पातंजल योगसूत्रामध्ये सांगितले आहे की ह्या भावनेच्या आधारावर सुख-दुःख, पाप-पुण्य इत्यादी विषयांचे चिंतन केल्याने चित्तामध्ये प्रसन्नता आणि आल्हादाची अनुभूती होते.[६८]

हरीभद्रसूरी यांनी 'योगशतका'मध्ये सांगितले आहे की सर्व प्राण्यांप्रती मैत्री भाव गुणाधिकांच्या प्रती अर्थात गुणांची ज्यामध्ये विशिष्टता आहे, जे पुरुष सद्गुणी आहेत त्यांच्याप्रती प्रमोदभाव, दुःखी जीवांच्या प्रती करुणाभाव, आणि जे उर्मट, उद्धट अथवा अविनीत आहेत त्यांच्याप्रती उदासीन भाव ठेवला पाहिजे.[६९]

ह्या भावनेचे चिंतन मनुष्याला माणुसकीच्या श्रेष्ठतम शिखरावर पोहचविते. आज जनजीवनामध्ये द्वेष, ईर्ष्या, संघर्ष आणि कलह दिवसेंदिवस वाढत चालला आहे. ह्या चार भावनांच्या चिंतनाने ह्या दोषांचे आपोआप निर्मूलन होते. म्हणून आध्यात्मिकतेबरोबर मानवीय शांतीसाठी ह्या भावनेचे चिंतन आवश्यक आहे.

मैत्री भावना

प्रेमभाव, मित्रभाव, शुभचिंतन, सख्यता, सद्भावना, सहयोग, हितैषिता इत्यादी मैत्रीचे समानार्थक शब्द आहेत.[७०]

हा जीव अनंत काळापासून चतुर्गतिमय संसारामध्ये परिभ्रमण करत आहे. ह्याने एकेका योनीमध्ये अनेक वेळा जन्ममरण केले आहे, त्यामुळे संसारात जितके प्राणी आहेत त्या सर्वांच्या बरोबर कोणत्या ना कोणत्या रूपात त्याचे संबंध जुळलेले आहेत. सर्वांनी ह्याच्यावर उपकार केले आहेत म्हणून सर्व ह्याचे कुटुंबी आणि उपकारी आहेत. ह्या जगात कोणीही परके नाही. अशाप्रकारे विचार केल्याने जगात जितके जीव आहेत ते आपले संबंधी असो अथवा नसो मग ते मनुष्य असो अथवा पशुपक्षी अथवा नारक आणि देव असो इतकेच काय त्रस अथवा स्थावर जीव असेल तरी सर्वांप्रती माझा मैत्री भाव आहे, कोणीच माझा शत्रू नाही, कोणाच्या बरोबर माझे वैर नाही, सर्व प्राणी माझ्या आत्म्यासारखे आहेत, जसे मला सुख प्रिय आणि दुःख अप्रिय आहे तसेच त्या जीवांना सुद्धा सुख प्रिय आणि दुःख अप्रिय आहे.[७१] अशाप्रकारे चिंतन करणे 'मैत्री भावना' आहे.

''मैत्री परेषां हितचिन्तनं यद्''[७२]

दुसऱ्यांच्या हिताची चिंता करणे दुसऱ्यांसाठी मंगलकामना करणे ही मैत्री आहे. जीव आपल्या स्वजनांसंबंधी आणि परिचित लोकांच्या हिताचे चिंतन तर करतोच परंतु प्रत्युपकाराची आशा ठेवल्याशिवाय सर्वच प्राण्यांच्या हिताचे चिंतन करणे 'मैत्रीभावना' आहे.

आचार्य हेमचंद्रांनी मैत्री भावनेचे महत्त्व दाखवताना सांगितले आहे की, कोणीच पाप करू नये. कोणताच जीव दुःखी होऊ नये, सर्व जीव मुक्त व्हावे, सुखाचा अनुभव करावा अशाप्रकारची बुद्धी ठेवणे मैत्री भावना आहे.[७३] आपल्यामुळे दुसऱ्यांना दुःख होऊ नये अशी इच्छा ठेवणे ही सुद्धा मैत्री भावना आहे.

चार भावनांमध्ये मैत्रीचे स्थान प्रथम आहे. कारण अन्य तीन भावनांचा मैत्री भावनेमध्ये समावेश होतो. जसे प्रमोद अर्थात गुणीजनांच्या प्रती मैत्री बहुमानयुक्त चित्त, करुणा अर्थात दीन हीन जीवांच्या प्रती दयाभावरूपी मैत्री, अनुकंपायुक्त चित्त, आणि माध्यस्थ अर्थात निर्गुणी आणि दोषयुक्त अविनीत जीवांच्या प्रती मैत्री उपेक्षायुक्त चित्त, अशाप्रकारे मैत्री भावना अत्यंत व्यापक आहे.

मैत्री भावनेचा झरा ज्यांच्या हृदयात वाहत राहतो. त्यांचे परस्पर वैर, शोक

कलह, भांडणे मिटतात आणि सर्वत्र सुख, शांती, आनंद प्रस्थापित होतो. मैत्री भावनेने स्वतःच्या आणि दुसऱ्यांच्या जीवनात अभयाचा संचार होतो. 'आत्मवत् सर्वभूतेषु' ही भावना दृढ बनते. अहंकार नष्ट होतो.

तीर्थंकर भगवंतांचा जीवसुद्धा पूर्वीच्या तिसऱ्या भवामध्ये अशी अनुपम भावना ठेवतो की, ''सवी जीव करू शासन रसी'' सर्व जीव धर्ममार्गामध्ये लागावेत, सर्व जीवांना मुक्ती मिळावी, संसाराची अधिव्याधी आणि उपाधी दूर करण्याचा मार्ग जो त्यांना मिळाला आहे तो सर्व जीवांना मिळावा अशाप्रकारे प्राणी मात्रांच्या उत्थानासाठी हितासाठी, मैत्री ठेवणे हीच मैत्री भावना आहे.

ह्या मैत्री भावनेने अहिंसा धर्माची स्थापना होते. जगातल्या सर्व जीवांचे राग, द्वेष नष्ट व्हावे अशी शुभ भावना मैत्री भावनेने प्रकट होते. जो सतत मैत्री भावनेचे चिंतन करतो त्याच्या चित्तामध्ये शुभभाव उत्पन्न होतात आणि शुभभावरूपी जळाने आत्म्याचा द्वेषाग्नी शांत होतो.

मैत्री भावना सम्यक्त्वांचा आधार आहे. कारण अमैत्री भावना असणाऱ्या जीवामध्ये अनंतानुबंधी कषायाचा सद्भाव राहतो.

मैत्री भावनेशिवाय मोक्षाची प्राप्ती संभवत नाही कारण एका जीवाबद्दल सुद्धा जर वैरभाव राहिला असेल तर मुक्ती संभवत नाही.

धार्मिक अनुष्ठान, सामायिक, प्रतिक्रमण, तप, जप, पूजा, पाठ इत्यादींबरोबर सुद्धा मैत्री भावनेचा संयोग आवश्यक आहे. अन्यथा अशा धार्मिक क्रियेमध्ये पुण्यार्जन होते परंतु आत्मधर्माची आराधना होऊ शकत नाही.

संसारामध्ये सुख, शांती, आनंद आणि प्रेमाचे साम्राज्य स्थापन करण्यासाठी मैत्री भावना अत्यंत आवश्यक आहे. वाढत्या सुख-सुविधा आणि भौतिक उन्नतीच्या प्रतिस्पर्धेने एकमेकांत ईर्षा, द्वेष, वैर, निंदा, मात्सर्य, स्वार्थीपणा इत्यादी दोषही वाढत आहेत. त्यांना नष्ट करण्यासाठी मैत्री भावनेचे चिंतन हाच सर्वश्रेष्ठ उपाय आहे. चिंतनाने संपूर्ण विश्वामध्ये सुख शांती आणि आनंदाचा स्रोत वाहू शकतो.

प्रमोदभावना

सद्गुणांची आराधना प्रमोदभावनेचा मूळ मंत्र आहे. गुणीजनांच्या गुणांचा विचार करणे, त्यांच्या गुणवत्तेने प्रसन्न होणे, त्यांचे गुणगान करणे, मुख आणि नेत्राने हर्ष अथवा प्रसन्नता प्रकट करणे, आपल्या हृदयात गुणी लोकांबद्दल भक्ती प्रकट करणे, अनुराग व्यक्त

करणे म्हणजे प्रमोद भावना होय.[७४]

ह्या जगात अनेक प्राणी निवास करतात. पदप्रतिष्ठेमध्ये कोणी लहान आहे तर कोणी मोठे, कोणी गुणी आहेत तर कोणी अवगुणी. पंडित-मूर्ख, संपन्न-विपन्न, सरळ-वक्र, ज्ञानी-अज्ञानी, स्वार्थी-परमार्थी इत्यादी अनेक प्रकारची विविधता मानव समाजामध्ये विद्यमान आहे. ज्यांना गुणी बनायचे आहे त्याने दुसऱ्याची हीनता पाहून स्वतःला श्रेष्ठ मानणे योग्य नव्हे आणि दुसऱ्यांची उन्नती पाहून त्याची ईर्षा करीत राहणे हे सुद्धा योग्य नाही. म्हणूनच प्रसिद्ध प्रार्थना 'मेरी भावना' यामध्ये सांगितले आहे -

''गुणी जनों को देख हृदय में मेरे प्रेम उमड आवे''

गुणी, ज्ञानी, ध्यानी, दानी, तपस्वी, योगी इत्यादींना आदर देणे त्यांचा सत्कार, सन्मान करणे ही ह्या भावनेची फलश्रुती आहे. जेथे गुणीजनांच्या प्रती आदर नाही, प्रमोदभाव नाही तेथे धर्माचा नामनिर्देशसुद्धा नाही असे समजावे.

उपाध्यायविनयविजय यांनी 'शांतसुधारस' काव्यात लिहिले आहे -

'भवेत् प्रमोदो गुणपक्षपातः'[७५]

गुणांच्या प्रती प्रमोदभाव ठेवणे, अनुराग ठेवणे म्हणजे प्रमोदभावना आहे. गुणवान कोणत्याही जातीचा, कुळाचा अथवा धर्माचा असो, कोणत्याही लिंगाचा असो आणि कोणत्याही वयाचा असो त्याच्या गुणांबद्दल प्रमोदभाव, पूज्यभाव असलाच पाहिजे. मानवी स्वभावाचे जर सूक्ष्म दृष्टीने निरीक्षण केले तर स्पष्टपणे समजेल की, मनुष्याला स्वतःच्या लहानश्या गोष्टींची मोठी अनुभूती होते आणि दुसऱ्यांच्या मोठ्या कार्याचे काहीसुद्धा वाटत नाही, उलट ते त्याला लहानच भासते. जो निर्गुणी असतो तो दुसऱ्यांचे गुण पाहत नाही, ज्या बाबतीत प्रसन्न व्हावयास पाहिजे तेथे तो खिन्नतेचा अनुभव करतो अशा व्यक्ती वस्तुतः गुणग्राहक नसतात. त्या बेळ बघून गुणीजनांचाही अपमान करतात, त्यांच्यातील उणीवा शोधतात, दोषदर्शन करतात.

काही व्यक्ती अशा असतात की त्या एखाद्या व्यक्तीमध्ये गुण नसतानाही त्याचा मोठेपणा दाखवितात. परंतु ही प्रमोदभावना सुद्धा गुणग्राहक दृष्टीची द्योतक नाही. तर चाटुकारिता आहे. स्वतःचा स्वार्थ साधणे हाच त्यांचा उद्देश असतो.

ईर्षा दूर करण्यासाठी प्रमोद भावनेचे चिंतन अत्यंत आवश्यक आहे. ज्यांना गुणवान बनायचे आहे त्यांचे पहिले कर्तव्य हे आहे की गुण आणि गुणींची प्रशंसा करणे. गुणीजनांच्या गुणांची प्रशंसा केल्याने कोणत्याच प्रकारचे नुकसान होत नाही. गुणी सुद्धा

स्वतःच्या प्रशंसेमुळे आपल्या गुणांमध्ये दृढ होतो आणि गुणांची वृद्धी करतो आणि ते दुसऱ्यांच्या गुण वृद्धीचे कारण होते. अशाप्रकारे प्रमोद भावनेने स्व-पर उपकार साध्य होतो.

हा संसार फुले आणि काटे यांचे संग्रहालय आहे, मानवाने भुंग्याप्रमाणे काट्यांची चिंता न करता केवळ गुणग्राही बनले पाहिजे. प्रमोद भावनेच्या चिंतनाने मनुष्य गुणग्राही बनतो, त्याचे आर्तध्यान, रौद्रध्यान सुटते. ईर्षा, द्वेष वृत्ती सुटते आणि गुणीजनांची कृपादृष्टी सहज प्राप्त होते.

आत्मविकास आणि सद्गुणांच्या संग्रहासाठी प्रमोद भावनेचे चिंतन अवश्य करावे. श्रावकाच्या एकवीस गुणांमध्ये एक गुण 'गुणानुरागी' असल्याने श्रावकासाठी सुद्धा गुणीजनांप्रती प्रमोदभाव ठेवणे आवश्यक आहे. ह्याच्याने कर्म निर्जरा होते आणि उत्कृष्ट गुणांची प्राप्ती होते. ''तीर्थंकर गोत्र उपार्जनाच्या वीस बोलांच्या सुरुवातीचे बोल परमेष्ठी व ज्ञानी, ध्यानी, तपस्वीचे प्रमोदभावाने गुण कीर्तनाचे आहेत.''[७६]

हे मनोवैज्ञानिक सत्य आहे की जो जसे चिंतन करतो कालांतराने तो तसाच बनतो. म्हणून प्रत्येक मोक्षार्थीने प्रमोद भावनेचे स्वरूप समजून गुणीजनांच्याप्रती यथायोग्य प्रमोदभाव ठेवला पाहिजे.

करुणा भावना

करुणा भावनेचे स्थान जगातील प्रत्येक प्राण्यासाठी आणि विशेषतः दीन, हीन, दुःखित, पीडित, दरिद्र लोकांच्यासाठी दया अथवा अनुकंपा यांच्या रूपात राहते. ''अनुकूलं कंपनं अनुकम्पा'' जेव्हा कोणत्याही दुःखी, पीडित जीवाला बघून मनामध्ये अनुकूल कंपन अथवा त्याची अनुभूती येऊन त्याचे दुःख दूर करण्याचा जो उपक्रम केला जातो ती अनुकंपा आहे. दुःखी लोकांचे दुःख दूर करणे म्हणजे दया आहे आणि दया धर्माचे मूळ आहे, पाया आहे.

जीवाला शारीरिक, मानसिक इत्यादी असह्य दुःखराशी उद्विग्न करतात. ह्या दुःखाचे मुख्य कारण मिथ्यात्व, प्रमाद, कषाय आणि अशुभयोगाने केलेले कर्म आहे ते कर्म उदयास आल्याने दुःखे भोगावी लागतात. अशा दुःखी लोकांना बघून दुःखी होणे आणि लवकरात लवकर त्या दुःखातून त्यांची मुक्तता व्हावी असा विचार करणे, अशा प्रकारच्या करुण भावनेने द्रवित होणे ही करुणाभावना आहे, अनुकंपा आहे.[७७]

ज्यांच्या हृदयात करुणा आहे, त्यांना दुसऱ्या दुःखी मनुष्यांना विचारण्याची जरूरी

दहत नाही की तुला काय दुःख आहे. याउलट ते स्वतःच त्याच्या दुःखाने दुःखी होतात. त्याची वेदना ते स्वतःच अनुभवतात. परंतु ज्या मनुष्याच्या हृदयातील करुणेचा स्रोत सुकून गेला आहे तो ज्योतिहीन दिव्याप्रमाणे केवळ मातीचे एक भांडे आहे असे समजावे. त्याचे हृदय दुःखी लोकांना पाहूनही विरघळत नाही.

तसे पाहता करुणा हा एक दैवी गुण आहे, आत्म्याचा प्रकाश आहे. निर्मळ भावनेमध्ये करुणा भावना सर्वोत्कृष्ट आहे. करुणा भावनेचा हृदयात उद्‌भव होताच अंतःकरणातून अभिमान, काम, क्रोध, मद, मोह, लोभ इत्यादी दुष्ट भाव त्वरितच नष्ट होतात आणि मनुष्याचे हृदय पवित्र होते. जो भावुक आणि विनम्र असतो त्याच्याच हृदयात करुणाभावना जागृत होते.

हृदय करुणाशील असणे ही सम्यक्त्वाची निशाणी आहे. ज्याच्याद्वारे जीव मोक्षापर्यंत पोहचतो.

खरी करुणाशील व्यक्ती परतफेडीची इच्छा ठेवित नाही. कोणाचेही दुःख दूर केल्याने त्यामुळे मिळणारे मानसिक समाधान, आत्मसंतोष, प्रसन्नता एवढेच त्याला पुरेसे असते. आत्म्यामध्ये करुणा उत्पन्न होणे हाच लाभ काय कमी आहे.

लोक म्हणतात संसारात भयंकर दुःख आहेत, कष्ट आहेत परंतु जरी पृथ्वी जल-रहित झाली तरी जोपर्यंत मनुष्याच्या हृदयात करुणेचा स्रोत वाहत आहे, डोळ्यात दयाभाव आणि वाणी प्रेमपूर्ण व मन सहानुभूतीने युक्त आहे तोपर्यंत भूमी कधीच उजाड होणार नाही.

करुणाभावना अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. करुणा जीवाची उत्तमवृत्ती आहे. धर्माचा प्रथम पाया आहे. सम्यक्त्वाचे चिन्ह आहे.

माध्यस्थ्य भावना

राग आणि द्वेष यांच्यामध्ये जो उभा असतो तो मध्यस्थ आहे आणि कोणत्याच प्रसंगी राग-द्वेष उत्पन्न होऊ नये यासाठी पुन्हा पुन्हा चिंतन करणे, ही माध्यस्थ्य भावना आहे.

स्वपक्षाचा राग आणि परपक्षाचा द्वेष यांचा त्याग करणे, हर्ष अथवा शोकाचा, सत्कार, सन्मान अथवा अपमानाचा प्रसंग असेल, अनुकूलता अथवा प्रतिकूलता असली तरी प्रत्येक परिस्थितीत समभाव ठेवणे ही माध्यस्थ भावना आहे. ह्याला उदासीनता अथवा उपेक्षाभावही म्हणतात.

माध्यस्थ्य भावना ही समता धर्माची द्योतक आहे, जेथे राग, द्वेष आहे तेथे क्लेश आहेत आणि उदासीनतेने अथवा माध्यस्थ्यतेने दु:ख आणि क्लेशाचा नाश होतो. व्यावहारिक जीवनाच्या सर्व समस्यांचे निराकरण करण्याचा सर्वश्रेष्ठ उपाय माध्यस्थ भावना आहे.

पापी जीवांना पाप करू नका असे कितीही वेळा सांगितले तरी ते पाप करत राहत असतील तर त्यावेळी त्यांच्याबद्दल माध्यस्थ्य भाव ठेवला पाहिजे. चित्ताला क्रोधादी कषायांनी कलंकित करू नये. पापी माणसांचाही तिरस्कार करू नये कारण पापी व्यक्तीचा तिरस्कार केल्याने तो आपला द्वेषी बनतो आणि जसे म्हटलेच आहे - ''वेरं वेरेण वड्ढई' अर्थात वैराने वैर वाढते. परंतु माध्यस्थ्य राहिल्याने आपल्याबद्दल त्यांच्या हृदयात सद्भाव टिकून राहतो आणि त्यामुळे भविष्यात त्याला सुधारण्याची संधी आपल्या हातात राहते.

सात व्यसनांमध्ये आसक्त राहणारा, अठरा प्रकारच्या पापांचे सेवन करणारा, क्रूर कर्मे करणारा, देव, गुरू, धर्म यांच्या निमित्ताने हिंसा करणारा, हिंसेमध्ये धर्म मानणारा, कुदेव, कुगुरू, कुधर्माची प्रतिष्ठा वाढविणारा, दुसऱ्यांची निंदा आणि स्वत:ची प्रशंसा करण्यात मग्न राहणारा, जीवांना पाहून राग, द्वेष न ठेवता माध्यस्थ्य भाव ठेवला पाहिजे.[७८]

पापी लोकांना पाहून असा विचार केला पाहिजे की अरे पहा, ह्या बिचाऱ्या जीवांची कशी विषम कर्मगती आहे. चतुर्गतीरूप अशा या संसारात परिभ्रमण करता करता अत्यंत कष्ट सहन करता करता अनंत पुण्याच्या योगाने, अनंत कष्टाने मुक्ती देणारा मनुष्य जन्म इत्यादी उत्तम साधन सामग्री मिळाली असतानाही हा अज्ञानतेने व्यर्थ ती सामग्री नष्ट करीत आहे. सुखाच्या इच्छेने दु:खाचे उपार्जन करीत आहे, दगड खरेदी करण्यासाठी चिंतामणी रत्न देत आहे सुधारण्याऐवजी बिघडत आहे. हे प्रभू ! ह्या अज्ञानी जीवांची कुकर्माचे फळ भोगताना काय अवस्था होईल ? हे प्रायश्चित्त कसे करतील ? परंतु ह्या मूढ जीवांचा काय दोष ? अज्ञान आणि अशुभ कर्मामुळे ह्यांना सद्बुद्धीची प्राप्ती झाली नाही. जसे भवितव्य असेल तसाच संयोग त्यांना प्राप्त होईल. अशा प्रकारच्या विचाराने त्यांच्याबद्दल राग, द्वेष न करता माध्यस्थ्य भावनेने त्यांची उपेक्षा करणे म्हणजेच माध्यस्थ्य भावना आहे.

माध्यस्थ्य भावना ढालीसारखी आहे, ती आपल्या आत्म्याचे रक्षण करते. दुर्भाव आणि राग, द्वेषाच्या प्रसंगी समभाव ठेवल्याने फायदाच होतो कर्मबंध होत नाही.

ह्या मैत्री इत्यादी चार भावना आत्म्याच्या शुद्ध स्वरूपाशी संयुक्त आहेत.

आत्म्याला यथार्थ भावापर्यंत पोहचण्यासाठी दुसऱ्या शब्दात आपले शुद्ध आस्तित्व समजण्यासाठी आणि स्वीकारण्यासाठी ह्या भावना आधारस्तंभ आहेत. ज्याप्रमाणे एखाद्या नदीला पार करण्यासाठी पुलाची आवश्यकता असते त्याचप्रमाणे आत्मविकासात अवरोध उत्पन्न करणारे राग आणि द्वेष यांना पार करण्यासाठी ह्या भावनेची आवश्यकता आहे. ह्या चार भावनांनी भावित होण्याची तर गोष्टच काय ? जर एखाद्या व्यक्तीने एक मैत्री भावना साध्य केली तर त्याचे जीवन वासना, आकांक्षा आणि राग, मोह या भावनांपासून बनू शकते. त्यांचे हृदय निर्विकार आणि निर्मळ बनू शकते.

मानवेच्या चिंतनाची पृष्ठभूमी या रूपात अनित्यादी बारा भावना आणि मैत्री इत्यादी चार भावनांचे येथे थोडक्यात विवेचन केलेले आहे. ज्यांना लक्षात ठेवून प्रस्तुत शोधग्रंथाच्या पुढील अध्ययनात योग्यवेळी विविध अपेक्षेने जैन आगम शास्त्रात आणि अन्य धर्मग्रंथात आलेल्या निरूपणाचे आणि विद्वानांच्या चिंतनाच्या संदर्भात समीक्षात्मक दृष्टीने परिशीलन आणि विस्तृत विश्लेषण केले जाईल.

संदर्भ

१. कल्याणमन्दिर सोत्र गा. ३८ पृ. ५८ संपा. अमरमुनिजी म. सं. २

२. भावना जोग सुद्धप्पा जले नावा व आहिया ।
नावा व तीर सम्पन्ना सव्व दुक्खा ति अइइ ॥ सूत्र. सू. १।१५।५ पृ. ४४२

३. मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः ।
बंधाय विषयासंगो मुक्त निर्विषयं मनः ॥५॥
बन्धुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥६॥ श्रीमद्भगवत्गीता अ. ६
गा. ५.६ पृ. २२२

४. जणो न मुक्ते न तपो द्विभेदं न संयमो नापि दमो न मौनम् ।
न साधनाद्यं पवनादि कस्य किं त्वेकमन्तःकरणं सुदान्तम् ॥
अध्या. कल्प. ९/७ पृ. १६९ ले. श्री. मुनीसुंदरसूरी

५. उत्तरा. सू. २९/५० पृ. ५१२

६. दशवै. सू. ४/६४ पृ. १३१

७. उत्तरा. सू. २८/३०

८. सं. हि. कोश. ले. वामन आपटे पृ. ७३७

९. सं. हि. कोश. ले. वामन आपटे पृ. ९३९

१०. आचा. सू. टी. १/२/५ पृ. १५४ ''भावश्चित्ताभिप्रायः''

११. आचा. सू. टी. २/८/६ पृ. ३७५ ''भावना अध्यवसाये''

१२. सूत्र. सू. टीका १/३/१ 'अंतःकरणवृत्ति भेदेच ।'

१३. सूत्र. सू. टीका १/१५ 'भावोऽन्तःकरणस्य परिणति विशेषः'

१४. प्रश्न. व्या. सू. ५ वा संवरद्वार 'आलोचनायाम् ।'

१५. आवश्य. टी. ४ ले. आ. हरिभद्रसूरि

१६. नन्दी सू. २/१३

१७. आवश्य टी. अध्य ४ 'अभ्यास क्रियायाम् ।'

१८. उत्तरा. सू. बृ. अ. १२ वृत्त 'सम्यक् क्रियाऽभ्यासे'

१९. बृह. क. भा. वृ. २/१२९० - ''अभ्यास इति वा भावनेति वा एकार्थम''

२०. पासणाह चरियं पृ. ४६०
"भाविज्जइ वासिज्जइ जी ए जीवो विसुद्ध चेटठाए सा भावणत्ति वुच्चइ ।"

२१. बृहत क. भा. २/१२८५ व वृत्ती २।१२८५ पृ. ३९७ "परिकर्मेति वा भावनेति वा"

२२. अभि. रा. को. भा. ५ पृ. १५०६ पुनः पुनश्चेतसि निवेषणं भावना ।

२३. अभि. रा. को. भा. ५ पृ. १५०६ अव्यवच्छिन्न पूर्व-पूर्वतर संस्कारस्य पुनः पुनस्तदनुष्ठानरूपा भावनेति ।

२४. अभि. रा. को. भा. ५ पृ. १५०६ 'अध्यात्मानुवर्तने ।'

२५. अभि. रा. को. भा. ५ पृ. १५०६ अभ्यासौ वृद्धिमानस्य भावना वृद्धि संगतः । निवृत्तिरशुभाभ्यासा भ्दाववृद्धिश्च तत्फलम् ॥ (द्वा. द्वा. १८)

२६. अभि. रा. को. भा. ५ पृ. १५०६ भाव्यन्ते मुमुक्षुभिरभ्यस्यन्ते इति भावनाः । अनित्वाऽदिके ।

२७. ध्यान. श. गा. ३१ पृ. १६

२८. वारसाणुवेक्खा गा. ८९ पृ. ८९ 'मोक्ख गया जे पुरिसा अणाइ कालेण वारसाणुवेक्खं'

२९. यो. शा. ४/५५ 'साम्यं स्यान्निर्ममत्वेन तत्कृते भावनाः श्रयेत'

३०. कु. कु. प्रा. ८/४ पृ. ११५
"भाव रहिओ ण सिज्झइ जइ वि तवं चरइ कोडिकोडिओ ।
जन्मंतराइ बहुसो लंबिय हत्थो गलिय वत्थो ॥४॥

३१. अभि. रा. को. भा. ५ पृ. १५०६
भावनासंज्ञ पुनरात्मगुणो ज्ञान जो ज्ञान हेतुश्च दृष्टानुभूतश्रुतेण्वर्येषु । स्मृति प्रत्यभिज्ञान कार्योन्नीयमान सद्भावः । (सन्मति तर्क प्रकरण तिसरे कांड ले. सिद्धसेन दिवाकर)

३२. अभि. रा. को. भा. ५ पृ. १५०६ पौनः पुन्येनातित्यत्वाऽऽदि प्रकारतो भावनैर्गुण्य परिभावनायाम् । (विशे. भा.)

३३. सं. हि. कोश. वामन आपटे पृ. १७८

३४. सं. हि. कोश. वामन आपटे पृ. १६५

३५. सं. हि. कोश. वामन आपटे पृ. ३५

३६. अभि. रा. कोश. भा. १ पृ. ३८९ 'अर्थ चिन्तने, ग्रंथानुचिन्तने,

सूत्रानुचिन्तनिकायाम्'

३७. अभि. रा. कोश. भा. १ पृ. ३८९
"जिणवरपवयणपायम् पायउण गुरुवयपाओ सुणियपुण्ये ।
एगग्गमणो धणियं चित्ते चिंतेइ सुय वियारे ॥१॥ (ध. र. प्र.)

३८. कार्ति अ. टी. पृ. १
'अनु पुनः पुनः प्रेक्षणं चितनं, स्मरणं अनित्यादि रुपाणां इति अनुप्रेक्षा ।'

३९. दशवै. चू. पृ. २९ 'अनुप्पेहा नाम मनसा परियट्टइ नो वायाए ।

४०. उत्तरा. अ. २९/२३ पृ. ४९९

४१. औ. सू. सू. ३० पृ. ५०

४२. अभि. रा. को. भा. १ पृ. ३८९ अनुप्रेक्षा स्वाध्यायविशेषः । सतु मनस्तत्रेव नियोजनाद् भवति ॥

४३. उत्तरा. सू. अ. २९/२३ पृ. ४९९

४४. पंचरत्नराशि संपा कल्याणऋषीजी म. भावकुलक पृ. ८०-८२

४५. क - त. सू. ९/७ पृ. २११ ले. उमास्वाती वि. पं. सुखलालसंघवी
ख - प्र. प्र. ८/१४९-१५० पृ. १०३ ले उमास्वाती वि. पं. राजकुमारजी
ग - कार्ति. अ. संपूर्ण
घ - वा. अ. संपूर्ण ले. आचार्य कुन्दकुन्द
च - मू. चा. ६९४ उत्तरार्ध पृ.२ ले. श्री. वट्टेकेराचार्य
छ - ज्ञाना. २/संपूर्ण पृ. १६ ते ५५. ले. शुभचंद्राचार्य
ज - यो. शा. ४/५५-५६ पृ. १२७ ले. आ. हेमचंद्रजी
झ - य. ति. पूर्व खण्ड १०५ ते १५७ पृ. २५५ ते २७९ श्री सोमदेवसूरी
ट - शां. सुधा. संपूर्ण ले. श्री. विनयविजयजी म.
ठ - भ. आ. गा. १७१० ते १८६७ पृ. ७६१ से ८३३ ले. शिवार्याचार्य

४६. बृह. द्र. सं. अधिकार २, पृ. ८१ ले. श्री नेमीचंद्र सिद्धांतीदेव

४७. श्री. शां. सुधा. प्रस्तावना गाथा ३ पृ. १२

४८. मोक्ष पाहुड १०५

४९. आगम स्वाध्याय पाठमाला सुभाषित गा. १६ पृ. २९४

एगो मे सासओ अप्पा नाण दंसण संजुओ । सेसा मे बाहिरा भावा सव्वसंजोग लख्खणा ।

५०. सं. हि. को. आपटे पृ. १०४६
५१. त. सू. ९/१ पृ. २०६ वि. पं. सुखलाल संघवी
५२. त. सू. १०/३ पृ. २३५
५३. त. सू. ९/३ पृ. २०६ पं. सुखलाल संघवी
५४. जै. सि. को. भा. २ पृ. ६२०
५५. ज्ञान को. खं. १ पृ. १०१
५६. सं. हि. को. ले. आपटे पृ. ८८३
५७. भग. सू. १/५/९ पृ. ५१८
५८. जै. ज्ञा. को. खं ४ पृ. ६६
५९. भग. सू. २/७/१/५ पृ. ११०
६०. शांत सु. ले. विनयविजयजी पृ. ३२७
६१. उत्तरा. सू. ३/१ पृ. ५९
६२. श्री. त्रिषष्टि शलाका पुरुष चरित्र, पर्व १ पृ. १५०, १५१
६३. मनुस्मृती
६४. मनुस्मृती 'धर्मो रक्षति रक्षितः'
६५. प्र. सा.
६६. त. सू. ७/६ पृ. १७० विवे - सुखलाल संघवी
६७. शांत. सुधा १३/१ पृ. ३७४
६८. पातं. यो. ४/११७ पृ. १४४
६९. जै. यो. ग्र. च. योगशतक गा. ७९ पृ. २५५
७०. समांतर कोश हिंदी थिसारस संदर्भ खंड पृ. ३७५-३७६; अनुक्रम खंड पृ. १४३७
७१. यो. शा. २/२० पृ. २६
७२. शां. सुधा. १३/३ पृ. ३७४
७३. यो. शा. ४/११८ पृ. १४५
७४. स. सि. ७/११/३४९

३५. ज्ञा. सुधा १३/३ पृ. ३७४
३६. ज्ञाता धर्म कथा १/८/१४ पृ. २१७
३७. जै. सि. को. खंड २ पृ. १४-१५
३८. यो. शा. ४/१२१ पृ. १२४

* * *

प्रकरण तिसरे

अर्धमागधी आगमामध्ये भावनेचे विवेचन

प्रकरण तिसरे

अर्धमागधी आगमामध्ये भावनेचे विवेचन

भगवान महावीरांद्वारे उपदिष्ट आगमांना 'अंग आगम' म्हणतात. ते बारा आहेत. परंतु बारावे 'दृष्टिवाद' नावाचे अंग उपलब्ध नाही. अकरा अंगसूत्रांमध्ये भावनेचे क्रमाने विवेचन प्राप्त होत नाही. परंतु अंशिक रूपात वेगवेगळ्या प्रसंगी भावना अथवा अनुप्रेक्षा ह्यांच्या रूपात वर्णन प्राप्त होते.

अंग आणि उपांग आगमांमध्ये भावनेचा अथवा अनुप्रेक्षेचा उल्लेख झाला आहे, ही येथे थोडक्यात दिला आहे.

आचारांग सूत्रामध्ये भावना

आचारांग सूत्राच्या प्रथम श्रुतस्कंधात अनित्यभावनेचे भाव व्यक्त करताना लिहिले आहे, 'धीर पुरुषाने मुहुर्तभरपण प्रमाद करू नये, अवस्था व्यतित होत आहे, यौवन निघून जात आहे.'[१] ह्याच श्रुतस्कंधात दुसऱ्या अधययनात अशरण भावनेचा उल्लेख झाला आहे. याचा आशय असा आहे की, 'जे स्वजनाच्या स्नेहामध्ये बद्ध आहेत, अडकलेले आहेत ते त्राण अथवा शरण देऊ शकत नाहीत आणि त्यांनीही आपण शरण देण्यास समर्थ नाही.'[२] प्रत्येक जण आपल्या कर्मानेच दुःखी होत आहे.

ह्या अध्ययनाच्या पाचव्या उद्देशकामध्ये एके ठिकाणी लोकभावनेचा संकेत प्राप्त होतो. तेथे 'लोक'ची विपश्यना करणाऱ्या साधकाला 'आयतचक्षू अर्थात चिंतनशील साधक' म्हटले आहे, जो लोकदर्शी आहे तो लोकाच्या उर्ध्व भागाला जाणतो, अधोलोकाला जाणतो, तिर्यग् (तिरक्या-मध्य) भागाला जाणतो.[३]

ह्याच्या चतुर्थ अधययनाच्या दुसऱ्या उद्देशकामध्ये आस्रवामध्ये पडलेले कसे परिस्रवामध्ये प्रवृत्त होतात आणि परिस्रवाच्या वेळीही लोक कसे फसतात ह्याचे वर्णन आहे.[४] अर्थात जे आस्रव आहे ते कर्मबंधाला कारण आहे. तेच भावनेच्या पवित्रतेमुळे परिस्रव अर्थात कर्मनिर्जरेला कारण होते. जेवढी कारणे संसारबंधाची आहेत, ती सर्व कारणे भावना बदलल्या की संसारमुक्तीला कारण होतात. परंतु कित्येकवेळा असे घडते की जे

दीपन म्हणजे जे कर्मनिर्जरेला कारण आहे तेच भावनेच्या अशुद्धीमुळे आस्रवांचे म्हणजे कर्मबंधाचे कारण होते.

चतुर्थ अधययनाच्या उद्देशकामध्ये अन्यत्व भावनेचा संकेत प्राप्त होतो. 'एगप्पाणं संपेहाए'[५] ह्या वाक्यात एकत्व आणि अन्यत्व अनुप्रेक्षेचा उल्लेख स्पष्ट दिसून येतो. येथे आगमकाराचे मन्तव्य असे आहे की, 'जो शरीर आणि आत्म्याच्या भेदज्ञानात निपुण आहे त्यालाच पंडित म्हणतात. असा वीतराग निरूपित धर्माज्ञेचा आकांक्षी पंडित एकमात्र आत्मपरीक्षण करता-करता कर्माला कंपित करतो.'

आचारांग सूत्राच्या पंधराव्या अध्ययनाचे नाव 'भावना' आहे. परंतु ह्यात योजलेला 'भावना' शब्द बारा भावनांच्या अर्थामध्ये येत नाही. परंतु व्रतांचे अखंडपणे पालन करण्यासाठी हा शब्द आला आहे. मनामध्ये दृढता आणि स्थिरतेची अत्यंत आवश्यकता आहे कारण त्याचा मार्ग अत्यंत कठीण आहे. तसेच व्रताचे अत्यंत चांगल्या प्रकारे अनुसरण करणेही कठीण आहे.

व्रताच्या मार्गावर सतत चालण्याची शक्ती प्राप्त करण्यासाठी प्रत्येक व्रताच्या पाच-पाच भावना सांगितल्या आहेत. त्यामध्ये त्या त्या व्रताच्या स्वरूपाचा आणि आचरणाचा भाव वेगवेगळ्या रूपात प्रकट केलेला आहे.

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रहाबरोबर जोडलेल्या तथ्यांचे ह्यात जे आकलन झालेले आहे ते पठनीय आहे. व्रतांशी संबंधित ह्या भावनांबद्दल चिंतन केल्यास, पुन्हा पुन्हा त्यांचा अभ्यास केल्यास मनात स्थिरतेचा अणि दृढतेचा संचार होतो. साधक चांगल्या प्रकारे व्रताचे पालन करू शकतो आणि आपल्या लक्ष्याच्या दिशेने पुढे पुढे मार्गक्रमण करतो.

अशा प्रकारे आचारांग सूत्रामध्ये वर्णित पाच महाव्रतांच्या पंचवीस भावनांचे यामध्ये विवेचन केले जात आहे.

अहिंसा महाव्रताच्या पाच भावना

१) ईर्या समिती भावना - ईर्या म्हणजे चर्या. चर्येमध्ये गमनक्रियेमध्ये समिती अर्थात सम्यक् प्रकारे प्रवृत्ती करणे, आपल्या कार्यासाठी प्राणी, भूत, जीव आणि सत्त्वाचे हनन करू नये, त्यांना धूळ इत्यादीने झाकू नये, संताप देऊ नये, भय उत्पन्न करू नये अशाप्रकारे संयमाच्या गमनाची सम्यक् प्रवृत्ती ईर्या समिती आहे.[६]

ईर्या समितीमध्ये संयमशील व्रतपरायण साधूच्या गमनागमन प्रवृत्तीचा पूर्णपणे समावेश होतो. 'इंद्रियांच्या बाह्य चेष्टा' म्हणजेच 'चर्या' होय. चर्येमध्ये प्रवृत्त होण्यापूर्वी सावधानी बाळगणे अत्यंत आवश्यक आहे. ईर्या समितीच्या पालनासाठी साधूने मनामध्ये ही भावना ठेवली पाहिजे की, मी नेहमी ह्या प्रवृत्तीमध्ये जागृत राहीन.

ह्या भावनेसंबंधी साधकाने पुन्हा पुन्हा मानसिक अभ्यास केला पाहिजे. असे केल्याने ईर्या समितीची प्रवृत्ती दूषित होणार नाही. त्यात सावधानी बाळगण्यात त्याला मदत मिळेल.

ज्ञान, दर्शन, चारित्र्य यांची वृद्धी किंवा रक्षण होत असेल तेव्हाच गमन इत्यादी क्रियेत प्रवृत्ती केली पाहिजे.

अशाप्रकारे चिंतन आणि प्रयोगाने साधकाच्या जीवनात अहिंसा साकार होते. तो आपल्या गती-प्रवृत्तीमध्ये इष्ट सिद्धी प्राप्त करतो.

२) **मन परीज्ञा भावना अथवा मन समिती भावना** - मनाला चांगल्याप्रकारे समजून पापकारी, हिंसाकारी, परपीडाकारी, छेदन-भेदनकारी, क्लेश-द्वेषकारी, परितापकारी, त्याच्यामुळे इतर प्राण्यांचे प्राण घेण्याचे विचार येतील अशा विचारांना मनात आणू नये. मनाला वाईट विचारांपासून दूर ठेवणे म्हणजे 'मन समिती भावना' आहे.[७]

मन खूप चंचल आहे. त्याला सन्मार्गी लावणे अत्यंत कठीण आहे. परंतु वैराग्य आणि अभ्यासाद्वारे मनाला नियंत्रित केले जाऊ शकते. मन परिज्ञा भावनेचा हाच संकेत आहे. मनाच्या चंचलतेचे आणि अस्थिरतेचे पुन्हा पुन्हा चिंतन केल्याने आणि त्याला नियंत्रित करण्याच्या भावनेचा अभ्यास केल्याने मनाची स्थिती सुधारू शकते. गणधर गौतम स्वामींनी केशीकुमार श्रमणाला मनाची स्थिती आणि मनाला वश करण्यासाठी उपाय सांगताना सांगितले आहे की, मन साहसी, भयंकर व दुष्ट अश्वासारखे चहूकडे धावत असते. परंतु मी त्याला धर्म आणि अभ्यासाद्वारे वश करतो. तेव्हा ते चांगल्या अश्वाप्रमाणे सन्मार्गी लागते.[८]

'मन परिज्ञा भावना' मनाला सम्यक् चर्येमध्ये लावते. अशुभ, अनिष्टकारी, आर्त, रौद्र ध्यानयुक्त विचारांना संधी न देता परतावून लावले पाहिजे. तसेच स्वतःला आणि दुसऱ्यांना आनंददायी अशा शुभकारक विचारांना मनामध्ये आणणे हे मनःसमिती भावनेचे स्वरूप आहे. गतीची शुद्धता ईर्यासमितीने फलित होते व मनाची शुद्धता मनःसमितीने

[illegible] मन हे शरीराचे संचालक आहे. म्हणून मनःसमिती भावनेने प्रेरित होणे हे अत्यंत [illegible] आहे.

३) **वचन समिती भावना अथवा वचन परिज्ञा भावना** - जे वचन पापकारी, [illegible]-इंद्रियाधुरत, कर्मचे आस्रवजनक, छेदनभेदकारी, क्लेश-द्वेषकारी आहे, संतापकारक आहे, ज्याने प्राण्यांच्या जिविताची हिंसा होईल असे वचन न बोलणे ही 'वचन प्ररिज्ञा' [illegible] आहे.[९] असे वचन पुन्हा पुन्हा बोलण्याने चिंतन केल्याने वाणी नियंत्रित होते [illegible] वाचिक हिंसेपासून साधक सावधान होतो. वचनविधीचा ज्ञाताच खरा निर्ग्रन्थ आहे [illegible] म्हटले जाते.

वचन एखादा धारदार शस्त्राप्रमाणे आहे. याचा चुकीचा प्रयोग अत्यंत घातक [illegible]. तीर आणि तलवारीचे घाव भरून येतात, परंतु दुर्वचनरूपी जे काटे आहेत ते [illegible] शूलापेक्षाही अधिक पीडाकारी असतात. ते मनातून काढणे अत्यंत कठीण आहे. [illegible] जन्मोजन्मीच्या वैराने मनुष्य बांधला जातो.

वचन समिती भावनेने प्रेरित झाल्यावर साधकावर असे संस्कार होतात की त्याच्या तोंडातून अकस्मात जरी एखादे वचन बाहेर पडले तरी ते शुद्ध, प्रिय आणि हितकारी असते कारण भावनेमुळे संस्कार दृढ होतात. याप्रमाणे वचनविधी पूर्णपणे जाणारा साधक वचन समिती भावनेचा आराधक असतो. ह्या कर्मप्रधान जीवनामध्ये वचन अथवा वाणीचे फारच महत्त्व आहे. मनुष्य जे काही मनन, चिंतन करतो, तेच वाणीद्वारे प्रकट करण्याची त्याची इच्छा असते. कारण तसे केल्याशिवाय त्याला शांती मिळत नाही. मनात जे आले ते प्रकट केल्याने त्याचे एकप्रकारे वैचारिक विरेचन होते. त्यामुळे त्याला स्वतःला हलकेपणाचा अनुभव येतो.

शास्त्रामध्ये वाणीच्या नियंत्रणावर खूपच जोर दिला आहे, असे ह्या भावनेत दिसून आले. हिंसात्मक पापवर्धक वाणी बोलणारा स्वतः तर पतित होतोच, परंतु त्याची वाणी ऐकून दुसरेही दुष्प्रेरित होतात म्हणून वचन समितीभावनेच्या चिंतनाची फारच आवश्यकता आहे.

४) **आदान भांड मात्र निक्षेपना समिती भावना** - 'आदान' म्हणजे 'ग्रहण करणे' आणि 'निक्षेप' म्हणजे 'ठेवणे'. ज्ञान आणि संयमाचे उपकरण प्रयत्नपूर्वक, सावधानपणे घेणे आणि ठेवणे. आदान भांड मात्र निक्षेपना समिती आहे.[११]

ह्याच्यात साधक असा विचार करतो की, कोणतेही कार्य करताना प्राण्यांच्या

कुणाची हिंसा करू नये. त्यासाठी सतत जागृत राहिले पाहिजे. जसे आहार शरीराच्या पोषणासाठी नसून संयमाच्या पुष्टीसाठी आहे, त्याचप्रमाणे उपकरण ठेवण्याचे विधानसुद्धा शरीराच्या पोषणासाठी आहे. त्याची देखरेख करण्याचे कारण हेच आहे की त्यात कोणत्याही जिवितांची हिंसा होऊ नये. असे चिंतन सतत केल्याने आणि अशी भावना सतत ठेवल्याने घेण्याठेवण्याची प्रवृत्ती हिंसाजनक होत नाही.

५) **आलोकित पान भोजन भावना** - अनालोकित म्हणजे न पाहता आहार-पाणी घेतल्याने हिंसा होते. म्हणून अहिंसेचे आराधक, साधक नीट निरीक्षण करून आहार-पाणी घेतात.[१२]

अन्न-पाणी घेतल्याशिवाय देहयात्रा चालत नाही. हे दैनंदिन होणारे कार्य आहे. साधकाने चांगल्याप्रकारे निरीक्षण, परीक्षण करून आशनपान केले पाहिजे. तसे केल्याने तो पापकर्मापासून दूर राहतो. असे चिंतन साधकाच्या मनामध्ये निरंतर चालत राहिले पाहिजे की अन्न-पाणी घेतांनाही कोणत्याही प्रकारे हिंसा होऊ नये, म्हणजे साधक त्यात आसक्त होत नाही कारण खाण्यासाठी जीवन नाही. हे जीवन जगण्यासाठी आहे. असा विचार केला तर औद्देशियिक इत्यादी दोष आणि स्वादलोलुपता या सारख्या हलक्या वृत्ती सुटतात. साधकाने ह्या विचाराने मनामध्ये पुन्हा पुन्हा चिंतन केले तर तो हिंसेपासून वाचू शकतो.

अशाप्रकारे जो साधक अहिंसामहाव्रताच्या पाच भावनांना स्पर्श करतो, त्यांचे पालन करतो, तीर्णता करतो अर्थात कितीही संकटे अथवा प्रलोभने आली तरी जो त्यांचे पालन करतो, स्वतःच्या निश्चयापासून ढळत नाही, किर्तना म्हणजे महाव्रतामध्ये दृढ रहातो, विचलित होत नाही तोच खरा निर्ग्रन्थ आहे असे केवली भगवानांनी सांगितले आहे.

ह्या भावना जैनांच्या ''अहिंसा परमोधर्मः'' या सिद्धातांची पुष्टी करतात, म्हणून अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

सत्य महाव्रताच्या पाच भावना

१) **अनुविची भावना** - चिंतन करून बोलावे योग्य असे बोलावे, विचार न करताच बोलणाऱ्या साधकाला मिथ्या भाषेचा दोष लागतो म्हणून चिंतन करून बोलणाऱ्या साधकाला निर्ग्रन्थ म्हणतात.[१३]

सत्य वचनाचा संबंध वाणीबरोबर आहे. निरंतर सत्य भाषेचा प्रयोग करणे साधूसाठी आवश्यक आहे. परंतु तसे करणे सोपे नाही. वाणीमध्ये तशी दृढता आणण्यासाठी

ही भावनेचे पुन्हा पुन्हा चिंतन करणे, अनुशीलन करणे आवश्यक आहे.

"सच्चस्स आणाए से उवट्ठिए मेहावी मार तरति"[१४]

सत्याच्या आज्ञेत राहणारा मेधावी (बुद्धिमानी) मार म्हणजे मृत्यू तरून जातो. दुस्तूर विजय प्राप्त करतो. अशाप्रकारे सत्याच्या महत्त्वाला समजून सत्यावर खरी निष्ठा ठेवली पाहिजे आणि त्यासंबंधी सतत चिंतन केले पाहिजे तरच सत्य महाव्रत दृढ होते.

अनुविची म्हणजे सत्याच्या विविध पक्षांवर पुन्हा पुन्हा चिंतन करून बोलणे. भाषेच्या गुणदोषांचा विचार करून जे दोष आहेत त्यांना सोडून देऊन गुणात्मक भाषेचा प्रयोग करावा.

२) **क्रोध निग्रहरूप क्षमाभावना** - क्रोधाच्या कटू फळाला जाणून त्याचा त्याग करावा कारण क्रोधावेशामध्ये असत्याचा प्रयोग होऊ शकतो. जो क्रोधाचा त्याग करतो तोच निर्ग्रन्थ आहे.[१५] कारण क्रोध पापवृत्तीमध्ये मुख्य आहे म्हणून त्याज्य आहे. परंतु जोपर्यंत हे शरीर आणि संसार आहे तोपर्यंत मानवामध्ये अशा अनेक कमतरता राहतात, ज्या त्याला पापमार्गाकडे प्रवृत्त करतात. सर्वांची इच्छा क्रोधाचा त्याग करण्याची असते, परंतु जेव्हा प्रतिकूल परिस्थिती निर्माण होते तेव्हा कित्येक लोक क्रोधामुळे आपले संतुलन गमावून बसतात. अशा परिस्थितीतून वाचण्यासाठी साधकाने आपल्या मनात असा दृढ संकल्प करावा की, ज्यामुळे प्रतिकूल परिस्थितीतही क्रोधाधीन न होता क्षमा धारण करू शकेल, पराभूत होणार नाही. मन हे क्षमाभावनेने युक्त असावे. क्रोधावर विजय मिळविण्यासाठी त्याच्या अनिष्ट परिणामांचे नेहमी चिंतन करणे आवश्यक आहे. क्रोधाचा त्याग करून क्रोध निग्रहरूप क्षमा भावनेचे चिंतन केले पाहिजे.

३) **लोभ निग्रहरूप निर्लोभ भावना** - जो साधक लोभाच्या दुष्परिणामाला समजून त्याचा परित्याग करतो तो निर्ग्रन्थ आहे. कारण केवली भगवान सांगतात की, लोभी व्यक्ती लोभाच्या भरात असत्य बोलते. परंतु सत्याचा आराधक त्याच्या स्वरूपाला जाणून त्याचा त्याग करतो.[१६]

'लोभ' ही मनुष्याची दुर्बल, हीनवृत्ती आहे. ती मनुष्याला सत्यापासून दूर करते. येथे असा प्रश्न उपस्थित होतो की, महाव्रती साधकालासुद्धा लोभ असू शकतो का ? याचे समाधान अत्यंत सोपे आहे. लोभ तत्त्वतः पदार्थात नाही. मनोगत आहे. तो केवळ अनुकूल खान-पान, स्थान, वस्त्र इत्यादींच्या प्राप्तीवरच सीमित नाही. तो मुख्यतः एषणेशी संबंधित आहे.

लोकेषणेवर विजय मिळविणे खूपच कठीण आहे. लोकेषणेचासुद्धा लोभ असतो. त्याचे भान सहणाऱ्याला दुसरे काहीच दिसत नाही. तो लोभांध होतो, त्याला एकच छंद लागतो की, लोकांनी माझी स्तुती करावी. मग त्याला खऱ्या खोट्याचेदेखील भान राहत नाही. त्याने वाणीची पवित्रता नष्ट होते. त्याच्यासाठी अनित्यतेचे पुन्हा पुन्हा चिंतन केले पाहिजे. पद व पदार्थाच्या अनित्यतेचा भावनात्मक अभ्यास केला पाहिजे. असे चिंतन केल्याने आत्म्यामध्ये वीतराग भाव जागृत होतो व लोभ क्षीण होतो व सत्याची आराधना सरळ होते.

४) **भयवर्जरूप धैर्ययुक्त अभयभावना** - भित्रा मनुष्य भयग्रस्त होऊन असत्य बोलतो म्हणून साधकाने भयाच्या अनिष्ट परिणामाला जाणून त्याचा त्याग केला पाहिजे.[७]

लोभाप्रमाणेच भय वाणीच्या पवित्रतेला नष्ट करते आणि असत्याचा आश्रय देते. वास्तविक महाव्रतीसाठी कोणतेच भय नाही, महाव्रती जगण्याची कामना करत नाही किंवा मृत्यूने घाबरतसुद्धा नाहीत. तो सर्व आसक्तीपासून मुक्त राहून निर्भय राहतो.

भित्रा मनुष्य कधीही सत्य बोलू शकत नाही. भीतीपोटी असत्य बोलतो आणि त्या भयाच्या चक्रव्यूहामध्ये फसत जातो. कारण भित्र्या माणसाजवळच भय जाते; आणि जो स्वतः भितो तो दुसऱ्यांनाही भयभीत करतो. भयाच्या ह्या कुपरिणामाचा विचार करून साधकाने निर्भास्त झाले पाहिजे, तर सर्वत्र भयरहित वातावरण होईल. ज्याचे मनोबळ मजबूत आहे ते पुरुष राक्षसांनाही भीत नाहीत आणि दुर्बल मन असलेले भयाच्या आशंकेनेच प्राण सोडतात.

भय अज्ञानामुळे उत्पन्न होते. त्याच्या निवारणासाठी साधकाने नेहमी अभय भावनेचे चिंतन केले पाहिजे. भय केवळ शरीरापर्यंत सीमित आहे. आत्म्याला त्याने काहीच हानी होत नाही. आत्म्याचा कधीच नाश होत नाही. तर मग भय का असावे ? ज्याचा नाश होतो, त्याला भय असते. म्हणून साधकाने चिंतन केले पाहिजे की, 'मी आत्मा आहे. हा शस्त्राने कापला जात नाही किंवा अग्नी त्याला जाळू शकत नाही, पाणी त्याला भिजवू शकत नाही. मग भय कसले ? अशाप्रकारे चिंतन, मनन केल्याने निर्भयतेचे संस्कार दृढ होतात, भय दूर होते आणि साधक भयरहित अशा अभय भावनेने आत्म्याला संस्कारित करतो.

५) **हास्य मुक्ती वचन संयमरूप भावना** - साधक चेष्टामस्करी करणारा

असतो. कारण चेष्टा करणारी व्यक्ती असत्यही बोलते. म्हणून हास्याचे अनिष्ट स्वरूप समजून त्याचा त्याग करणाराच निर्ग्रन्थ आहे.[१८]

साधूसुद्धा एक मनुष्यच आहे. कधी कधी तेसुद्धा चेष्टामस्करी करू लागतात. हास्य-परिहास्यामध्ये बोलण्याचे ध्यान राहत नाही, तेव्हा असत्य बोलण्याचीही चूक होऊ शकते. त्यापासून वाचण्यासाठी नेहमी असे चिंतन केले पाहिजे की, हास्य परिहास्याच्या दोषामुळे माझे सत्यव्रत भग्न होऊ शकते. म्हणून तसे न होण्यासाठी नेहमी जागृत राहिले पाहिजे. नेहमी वाणीला संयमित आणि गंभीर ठेवली पाहिजे. असे संस्कार झाल्याने साधकाच्या जीवनामध्ये सत्य महाव्रत साकार होते. तो निर्दोष आणि अखंडरूपाने सत्याची आराधना करता करता जिनवाणीची खरी उपासना करू शकतो. आपल्या जीवनाच्या खऱ्या ध्येयापर्यंत पोहचू शकतो. सर्वात अंतिम ध्येय 'मोक्ष' हे सुद्धा प्राप्त करू शकतो.

अचौर्य महाव्रताच्या पाच भावना

१) **अनुवीची मितावग्रह याचना** - जो साधक प्रथम विचार करून परिमित अवग्रहाची याचना करतो तो निर्ग्रन्थ आहे. जो विचार केल्याशिवाय अवग्रह ग्रहण करतो, तो अदत्त ग्रहण करतो, अशाप्रकारे चिंतन करून साधकाने परिमित अवग्रहाची याचना केली पाहिजे.[१९]

तसे पाहिले तर साधू अपरिग्रही असतात. परंतु जोपर्यंत आत्मा आणि शरीराचा संबंध आहे तोपर्यंत शरीरासाठी अनिवार्य रूपात आवश्यक वस्तूंचा त्यांना संग्रह करावा लागतो. त्यात देहरक्षण आणि लोकलज्जेच्या दृष्टीने वस्त्राची आवश्यकता राहते. परंतु आचार संहितेनुसार साधकाने परिमित म्हणजे आगमामध्ये सांगितलेले निश्चित परिमाणयुक्त वस्त्र जवळ बाळगले पाहिजे. जर मनात काही अधिक सुविधेचे भाव आले तर साधकाकडून चूक होऊ शकते. असे होता कामा नये कारण थोडी सुट अथवा थोडे पतन पुढे पुढे एषणेची आणि सुखसुविधेची भावना वाढवत जाते. म्हणून साधूने नेहमी ह्या भावनेच्या चिंतनामध्ये मग्न राहिले पाहिजे. असे चिंतन केल्याने साधकाची वस्त्रेषणा आणि त्याचप्रमाणे इतर एषणा कमी होतात.

२) **अनुज्ञापित पान भोजन** - याचा अर्थ असा आहे की, गुरुजनांच्या आज्ञेनुसार आहारपाणी घेणे. असे करणारा निर्ग्रन्थ असतो.[२०]

आहारपाणी हे शरीरासाठी आवश्यक आहे. त्या संबंधी आगमामध्ये विस्तृत चर्चा आहे. त्याच्यासाठी जे नियम निर्धारित केलेले आहेत त्यांची मर्यादा किती आहे

झालाही उल्लेख आहे. त्याचे पालन तर साधू करतातच पण ते करत असतानाही त्याने ज्येष्ठ गुरूची आहारपाणी घेण्यासाठी आज्ञा घेतली पाहिजे म्हणजे दोष लागण्याची कोणत्याच प्रकारची शक्यता राहत नाही. ह्या भावनेच्या चिंतनाने साधू नियंत्रित, व्यवस्थित आणि मर्यादित राहू शकेल. म्हणून शास्त्रानुसार शुद्ध भिक्षाग्रहण केली पाहिजे.

३) **अवग्रहाची अवधारणा** - निर्ग्रन्थ साधकाने क्षेत्र आणि काळाच्या प्रमाणाने अवग्रहाची याचना केली पाहिजे.[२१]

ह्या भावनेमध्ये साधूला स्थान आणि काळाच्या मर्यादित राहून अवग्रह अनुग्रहाचा निर्देश केला आहे. साधूने आवश्यक पदार्थ घेताना मनात निश्चय केला पाहिजे की अमुक स्थान व अमुक काळाच्या मयदित घेईन. अशा प्रकारे मर्यादा घातल्याने मनाची वृत्ती नियंत्रित राहते. स्थान आणि वेळेचे जीवनामध्ये अत्यंत महत्त्व आहे. क्षणोक्षणी जागृत राहिल्याने एषणा वाढत नाही आणि तन व मन यांची वृत्ती नियंत्रित राहते. जीवन पदार्थ अथवा वस्तूसाठी नाही. पदार्थ अथवा वस्तू जीवनासाठी आहे. म्हणून जीवनाचा पदार्थांबरोबर एवढाच संबंध राहिला पाहिजे, ज्यामुळे आत्मा गौण होता कामा नये. ह्या भावनेच्या चिंतनाने साधू अवग्रहात्मक एषणेपासून मुक्त राहतो.

४) **अभिक्ष्ण अवग्रह याचना** - साधूने एकदा अवग्रहाची आज्ञा घेतल्यानंतर पुन्हा पुन्हा अवग्रह अनुज्ञा ग्रहण केली पाहिजे. असे केल्याने साधकाला अदत्तदानाचा दोष लागत नाही.[२२]

दुसऱ्या भावनेमध्येही अवग्रह ग्रहण करण्याविषयी उल्लेख आहे की, साधूने गुरुजनांची आज्ञा घेऊन अवग्रह स्वीकार करावा. त्यालाच अधिक दृढ करण्याचा आशय ह्या भावनेबरोबर जोडलेला आहे. साधूने अनेकवेळा आज्ञा घ्यावी आणि तसाच त्याचा प्रयत्नसुद्धा असावा कारण त्यामुळे साधकाकडून व्रतामध्ये चूक होण्याची आशंका राहत नाही. यासाठी या भावनेचे पुन्हा पुन्हा चिंतन आवश्यक आहे. या भावनेला जर गुरुजनांच्या आज्ञेचा भाव जोडलेला असेल तर त्याच्याकडून शास्त्रमर्यादेचे उल्लंघन होत नाही.

५) **साधार्मिकाकडून अवग्रह याचना** - जो साधक साधार्मिकाकडे अर्थात स्वतःसारखेच आचरण करणाऱ्या साधूंकडे विचारपूर्वक मर्यादित अवग्रहाची याचना करतो तो निर्ग्रन्थ आहे.[२३]

अदत्तदान महाव्रताचे निर्विघ्नपणे परिपालन व्हावे, यासाठी अन्य आवश्यक आचार व क्रियेबरोबर परिमित आणि सीमित अवग्रहाचा - अपेक्षित वस्तूचा

साधर्मिकाकडून परिग्रहण करणे आवश्यक आहे. साधू तर आपल्या चर्येमध्येच राहतात. परंतु त्यासाठी तसेच वातावरणसुद्धा प्राप्त व्हावयास हवे, ज्यामुळे त्यांची चर्या पवित्र राहील. देणारा आणि देणारा जेव्हा जागृत असतो तेव्हा प्रमाद होण्याची शक्यता नसते. साधकाच्या मनामध्ये अशाप्रकारे कर्तव्यबोध असणे आवश्यक आहे. तसेच ह्या भावनेने मुक्त राहण्याचा अभ्यास केला पाहिजे. त्यामुळे अदत्तदान महाव्रतामध्ये दोष लागण्याची शंकाच राहणार नाही.

आत्मा बाह्य पदार्थाने सर्वथा निर्लिप्त राहावा हे संयमी जीवनाठी अत्यंत आवश्यक आहे. साधूने पदोपदी जागृत राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आत्मेतर पदार्थांबद्दल त्याच्या मनामध्ये कधीच आसक्ती उत्पन्न होऊ नये यासाठी अचौर्य महाव्रताच्या पाच भावनांमध्ये विशिष्ट जोर देऊन सांगितले आहे की साधूला जेथे अवग्रह स्वीकारण्याची जरूरी असेल तेथे सावधानपणे अवग्रह ग्रहण करावे. जैन धर्मामध्ये आचरणाची पवित्रता आणि भावनेची शुद्धता यावरच भर दिलेला आहे.

चतुर्थ महाव्रताच्या पाच भावना

१) स्त्री कथा वर्जनरूप भावना - ह्या भावनेमध्ये निर्ग्रन्थ साधू स्त्रियांविषयी कथा न ऐकण्याचे चिंतन करतो. कारण पुन्हा पुन्हा स्त्रीकथा करणारा साधू शांतीरूपी चरित्राचा आणि ब्रह्मचर्याचा भंग करणारा होतो. तो केवळी प्ररूपित सर्वज्ञदेवाने सांगितलेल्या धर्मापासून भ्रष्ट होतो.[२४]

म्हणून स्त्रीराग कथेचे श्रवण, चिंतन आणि कीर्तन ब्रह्मचारी साधकाने कधीच करू नये. परिणामतः वासनेचे विष त्याच्या मनामध्ये पसरत नाही व तो कामविजयी बनतो.

२) स्त्री मनोहर अंग अवलोकन त्यागरूपभावना - निर्ग्रन्थ साधूने कामभावनेने स्त्रियांच्या मनोहर इंद्रियांचे सामान्यपणे अथवा विशेषतेने निरीक्षण करू नये, किंवा कामपूर्ण दृष्टिक्षेप सुद्धा टाकू नये. सर्वज्ञ प्रभू सांगतात की, जो साधक अशाप्रकारे कामपूर्ण दृष्टीने स्त्रियांच्या शरीराचे निरीक्षण करतो तो शांतीरूपी चरित्राचा, ब्रह्मचर्येचा नाश करतो.[२५] म्हणून कामावर विजयी होण्यासाठी साधकाने आपल्या इंद्रियांवर नियंत्रण ठेवले पाहिजे.

कामविजयी बनणे फार कठीण आहे. मनात विकार नसतानाही प्रत्यक्ष तशी स्थिती उत्पन्न झाल्यावर मन विकारयुक्त होऊ शकते. म्हणून साधूने स्त्रियांच्या शरीराकडे पाहून आपले चारित्र्य दूषित करू नये. साधूच्या मनात सहसा विकृती उत्पन्न होत नाही.

परंतु तरीही मन अत्यंत चंचल आहे. इंद्रिये बलवान आहेत. ती ज्ञानी लोकांनासुद्धा आपल्याकडे आकर्षित करतात. स्थिरपणे योगामध्ये लीन राहणाऱ्याला सुद्धा चंचल करून टाकतात. मनामध्ये ब्रह्मचर्याचे संस्कार दृढ करण्यासाठी स्त्रियांचे सौंदर्य, स्त्रियांच्या अंगप्रत्यंगादीकडे मन जाऊ देऊ नये त्यासाठी ब्रह्माचार्याचे मन ह्या भावनेने युक्त असावे. ह्या भावनेचा पुन्हा पुन्हा अभ्यास केला पाहिजे.

३) **पूर्वभुक्त भोगस्मृतीचे वर्जन** - निर्ग्रन्थ साधूने पूर्वी गृहस्थाश्रमात उपभोगिलेल्या अशा कामक्रिडेचे स्मरण करू नये की ज्यामुळे शांतीरूप ब्रह्मचर्याचा नाश होईल.[२६]

पुष्कळदा असे होते की समोर प्रत्यक्षात विकाराचे काहीच कारण नसताना सुद्धा मन विकाग्रस्त होते. ह्याचे कारण पूर्वभुक्त भोगाचे स्मरण, चिंतन केल्याने तो पापरूपी चिखलात मग्न होतो. अशी कुत्सित वेळ जीवनात येऊ नये म्हणून आपल्या मनाला शुभ भावनेने युक्त ठेवणे आवश्यक आहे. जर मन शुभ भावनेने परिपूर्ण असेल तर अशुभ भावनेला स्थान मिळणारच नाही. म्हणून साधकाने ब्रह्मचर्याच्या शक्तीचे पुन्हा पुन्हा चिंतन केले पाहिजे.

श्रमण भगवान महावीरांनी सूत्रकृतांग सूत्रात सांगितले आहे की, ''तवेसुवा उत्तम बंभचेर''[२७] सर्व तपामध्ये ब्रह्मचर्य उत्तम आहे. त्याचे पालन करणारा साधूच निर्ग्रन्थ आहे.

४) **अतिमात्रा आणि प्रणीत पानभोजन वर्जन** - निर्ग्रन्थ साधूने अपेक्षेपेक्षा जास्त आहारपाण्याचे अथवा रसयुक्त, स्निग्ध, स्वादयुक्त पदार्थांचे सेवन करू नये.[२८] आहार आणि मनाच्या विचाराचा घनिष्ठ संबंध आहे. म्हणूनच म्हटले आहे, 'आहारशुद्धी सत्त्वशुद्धी:' अर्थात जर आहार शुद्ध असेल तर अंत:करणाचे भावसुद्धा शुद्ध होतील. इथे हे समजून घेणे आवश्यक आहे की जीवन केवळ चांगले, स्वादिष्ट, मधुर, प्रिय भोजनपान करण्यासाठी नाही तर हे पौदग्लिक अथवा भौतिक शरीर आत्मसाधनेसाठी उपयुक्त आहे. म्हणून ह्याचे रक्षण करणे आवश्यक आहे. आणि त्याच्या रक्षणासाठी पथ्यपूर्ण जरुरीपुरते आहारपाणी घेणे अपेक्षित आहे. साधूने स्वादिष्ट, मधूर, घृत, दुग्धशर्करायुक्त स्निग्ध आहाराच्या लालसेच्या भावनेने घेऊ नये. हे दुग्धादी पदार्थ साधूसाठी सर्वथा वर्जनीय नाहीत. शारीरिक आवश्यकेनुसार अनासक्तपणे ते घेऊ शकतात. स्वादवर्जन, विलास वर्जनरूप भावनेचे चिंतन, मनन, निदिध्यासन करणे साधूसाठी अत्यंत आवश्यक आहे.

वस्तुंची आणि ब्रह्मचर्यामध्ये दृढ राहण्यासाठी आहारपाणी वर्जनरूप भावनेचे चिंतन करणे पाहिजे.

५) **स्त्री इत्यादीने संसक्त शयनासन वर्जनरूप भावना** - निर्ग्रन्थाने स्त्री, पशु, नपुंसक इत्यादींनी रहित स्थान भोगावे. केवली प्रभूंनी निरूपित केले की, जो मुनि अठाप्रकारे ब्रह्मचर्य व्रताच्या भावनेचे सम्यक् प्रकारे पालन करतो तो निर्ग्रन्थ आहे.[२९]

ही भावना ब्रह्मचर्याच्या दिशेने साधकाला नेहमी जागृत ठेवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. स्त्रियांच्या दृष्ट-अदृष्ट दोन्ही प्रकारच्या संपर्कापासून लांब राहणे साधूसाठी अपेक्षित आहे. त्यांच्यापासून उपभोगिल्या गेलेल्या आसनाचासुद्धा साधूने उपभोग घेऊ नये. हा दृष्टिकोन वैज्ञानिकसुद्धा आहे कारण देहाशी संबंधित सूक्ष्म परमाणू आसनादी वस्तूंवर संसक्त होतात. त्यामुळे त्याचे सेवन केल्याने त्याचा दुष्प्रभाव होणे शक्य आहे. म्हणून साधकाने नेहमी त्याचा त्यागच करावा. तशी मनःस्थिती बनविण्यासाठी उपरोक्त भावनेचे सतत चिंतन करणे आवश्यक आहे.

साधकाच्या जीवनामध्ये ब्रह्मचर्याचे फार महत्त्व आहे. ब्रह्मचर्याचा अर्थ व्यापक आहे. ब्रह्म म्हणजे परमात्मा आणि चर्य म्हणजे चरण, गमन. आत्मा-परमात्मभावाला प्राप्त करण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहणे. त्या दिशेने जाण्याचा प्रयत्न करणे म्हणजे 'ब्रह्मचर्य' आहे. परमात्म्याचे दर्शन होण्यामध्ये सर्वात मोठी विघ्नरूप विषयभोगाची भावना आहे. ही प्राण्याची अशी दुर्बलता आहे की ज्यामुळे मोठे मोठे साधकसुद्धा संयम आणि त्यागाच्या मार्गापासून विचलित होतात. ह्या दुर्बलतेवर विजय मिळविणे अत्यंत कठीण आहे. त्यासाठी सदैव आध्यात्मिक अध्यव्यवसायाने मन युक्त असणे आवश्यक आहे. ब्रह्मचर्य व्रताच्या पाच भावना साधकाला कामभावनेने आसक्त होऊ देत नाहीत.

ज्यामुळे विकार उत्पन्न होतात अशा गप्पागोष्टी करणे, अनावश्यक संपर्क ठेवणे अत्यंत चुकीचे आहे. त्याचा पहिल्या भावनेत निषेध केला आहे.

बाह्य अंग-प्रत्यंगाच्या निरीक्षणाने, पाहण्याऱ्याच्या मनाला वाईट भावना येतात. म्हणून दुसऱ्या भावनेमध्ये त्याच्या त्यागाचे विवेचन केले आहे.

स्मृती ही जीवनात अत्यंत महत्त्वाचे कार्य करते. पवित्रकार्याचे स्मरण केल्याने व्यक्तीच्या मनात पवित्र भावना निर्माण होतात आणि अपवित्र, वाईट कार्याच्या स्मरणाने मनात विकार उत्पन्न होतात. म्हणून तिसऱ्या भावनेमध्ये साधकाला जागृत केलेले आहे

की तो वर्तमानामध्ये तर ब्रह्मचारी आहे. परंतु पूर्व भुक्त भोगाच्या स्मरणापासून दूर राहिला का त्याच्या मनात दोष उत्पन्न होणार नाही.

आहार-पाण्याचासुद्धा भावनेवर खूप प्रभाव पडतो. गरिष्ट आणि आवश्यकतेपेक्षा अधिक भोजन केल्याने मनामध्ये विकार आणि उन्माद उत्पन्न होतात. आहार शुद्ध असेल तर भावना शुद्ध होतात म्हणून ब्रह्मचर्याची आराधना करणाऱ्या साधकाने सात्त्विक, साधे आणि पथ्य असणारा आहार घेतला पाहिजे, तसेच चिंतन केले पाहिजे की देह धारणविण्यासाठी अन्नाची आवश्यकता आहे, स्वादपोषणासाठी नाही.

ब्रह्मचारी व्यक्तीने नेहमी विपरीत लिंगाच्या संसर्गाचा त्याग केला पाहिजे. तशा स्थान आणि आसनाचासुद्धा उपभोग घेऊ नये. ब्रह्मचर्य व्रत पालन करताना अतिशय दक्ष आणि प्रयत्नशील राहणयासाठी ह्या भावनेने प्रेरणा मिळते. तसेच साधकाचे जीवन पवित्र, शुद्ध आणि मुक्त होते. जे त्याचे ध्येय आहे ते पूर्ण होते.

अपरिग्रह महाव्रताच्या पाच भावना

अपरिग्रह भावनेचा संबंध मुख्यरूपाने धनधान्यादींबरोबर आहे, ज्यांच्या संग्रहाच्या मागे मुख्य कारण रागात्मक वृत्ती किंवा आसक्ती आहे. आसक्ती पुढे लोभाच्या रूपात परिवर्तित होते. रागात्मक वृत्तीवर सरळ प्रहार करण्यासाठी आणि साधकाला ह्यामध्ये आसक्त न होऊ देण्यासाठी ह्या महाव्रताच्या पाच भावनांचे चिंतन अत्यंत महत्त्वाचे आहे.

१) **श्रोत्रेन्द्रिय संवर भावना** - 'श्रोत्रेन्द्रिय'चा अर्थ 'कान' असा आहे. याचा स्वभाव 'शब्द ग्रहण करणे' हा आहे. श्रोत्रेन्द्रियांच्या मनोज्ञ आणि अमनोज्ञ विषयामध्ये राग, द्वेष न करणे, मोहित न होणे, आसक्त न होणे म्हणजे श्रोत्रेन्द्रिय संवर भावना आहे. जो साधू ह्यामध्ये आसक्त होतो तो चारित्र्याचा नाश करतो म्हणून शांती भंग न होण्यासाठी आणि चारित्र्य निष्कलंक राहण्यासाठी श्रोत्रेन्द्रिय संवर करणे आवश्यक आहे.३०

श्रोत्रेन्द्रियांद्वारे प्रिय शब्द ऐकण्याची आसक्ती न ठेवणे आणि अप्रिय शब्द श्रवणाने खिन्न न होणे हा श्रोत्रेन्द्रिय संवराचा अभिप्राय आहे. ह्याला मनोज्ञ आणि अमनोज्ञ शब्दामध्ये 'समभाव' हे नाव सुद्धा देता येते. श्रोत्रेन्द्रियांच्या माध्यमाने अंतःकरणामध्ये 'प्रेयस' आणि 'अप्रेयस' पदार्थांचे अथवा वस्तूचे आणि कार्याचे भाव पोहचतात. परंतु

तो साधक ह्या भावनेच्या अभ्यासाद्वारे श्रोत्रेन्द्रियांना संस्कारित करतो तो अनुकूल, भौतिक, सुखमय, प्रिय शब्द ऐकण्याची लालसा नष्ट करतो, प्रतिकूल अप्रिय शब्द ऐकून तो विचलित होत नाही आणि परिग्रहमय जगामध्ये आसक्त न राहता अपरिग्रहाच्या साधनेमध्ये सफल होतो.

२) **चक्षुरिन्द्रिय संवर भावना** - चक्षुरिन्द्रियांच्या मनोज्ञ आणि अमनोज्ञ विषयामध्ये राग, द्वेष न करणे अशी दुसरी भावना आहे.[३१] 'चक्षु' म्हणजे 'डोळा'. याचा संबंध मूर्त पदार्थांबरोबर आहे. जे पदार्थ प्राण्यांच्या आकांक्षाना पूर्ण करतात ते त्यांना प्रिय वाटत वाटतात आणि ज्या पदार्थांनी त्यांची अभिलाषा पूर्ण होत नाही किंवा जे त्यांच्या इच्छापूर्तीमध्ये अवरोधक बनतात त्यांना ते अप्रिय मानतात. दोन्ही प्रकारचे पदार्थ जेव्हा त्यांच्या डोळ्यासमोर येतात तेव्हा त्यांची प्रतिक्रिया आकर्षण, राग, द्वेषाचे रूप धारण करते. आकर्षणाचे फळ त्या पदार्थामध्ये आसक्त होण्याचे आहे. असे झाले असता परिणामतः त्याचे ध्यान स्वतःच्या वस्तू सोडून दुसऱ्यांच्या वस्तूंकडे वेधले जाते. तसे होऊ नये म्हणून ह्या भावनेचा निरंतर अभ्यास करणे आवश्यक आहे. परिणामतः साधकाची मूर्त पदार्थमय जगात आसक्ती राहत नाही व पदार्थांचे आकर्षण नष्ट होते.

३) **घ्राणेन्द्रिय संवर भावना** - 'घ्राणेन्द्रिय' अर्थात 'नाक'. त्याचा स्वभाव सुगंध, दुर्गंधाचे ज्ञान ग्रहण करणे हे आहे. घ्राणेन्द्रियांच्या मनोज्ञ, अमनोज्ञ विषयामध्ये राग, द्वेष न करता निर्ग्रन्थाने समभाव ठेवला पाहिजे. निर्ग्रन्थ भिक्षूने मनोज्ञ गंध प्राप्त होता आसक्त होता कामा नये. त्यांच्यात गुरफटणारा साधक आत्मभावापासून भ्रष्ट होतो. तो शांतीरूप चारित्र्याचा नाश करतो. शांतीरूप चारित्र्याचा भंग होऊ नये आणि केवली भाषित धर्मापासून भ्रष्ट होऊ नये म्हणून घ्राणेन्द्रिय संवर भावनेचे पुन्हा पुन्हा चिंतन केले पाहिजे.[३२]

जसे शब्द, रूप यांच्या आकर्षणाशी अथवा मोहाशी परिग्रह जोडलेला आहे, तसेच घ्राणेन्द्रियांद्वारे ग्रहित सूरभी, असूरभी पदार्थांनेही मानवाच्या मनात बाह्यरूपाने प्रिय वाटणाऱ्या पदार्थांच्या प्रती ममत्व भावना वाढते. म्हणून अशा पदार्थांपासून अप्रभावित - अनाकृष्ट राहण्याच्या भावनेचा निरंतर अभ्यास केल्याने अपरिग्रह महाव्रताच्या आराधनेला बळ प्राप्त होते.

४) **रसनेन्द्रिय संवर भावना** - जीभेद्वारे मनोज्ञ रसाच्या आस्वादनाने जो असक्त होऊन रागाविष्ट होतो आणि अमनोज्ञ रसास्वादाने दुःखी होऊन द्वेषाविष्ट होतो,

असा निर्ग्रन्थ आपल्या शांतीमय चारित्र्याला नष्ट करतो. असे होऊ नये म्हणून निर्ग्रन्थाने चौथी रसनेन्द्रिय संवर भावनेचे चिंतन केले पाहिजे.[३३]

आस्वादेन्द्रिय अथवा जिव्हा अशी आहे की ती साधकाला आध्यात्मिक आनंदापासून विन्मुख करते. जो स्वादिष्ट पदार्थांच्याप्रती मोहासक्त रहातो त्याचे मन शिथिलसुस्त बनते. तशा पदार्थांप्रती असलेली त्याची आसक्ती त्याला पवित्र चर्येपासून दूर करते. तो सुखप्रद, पुष्टिप्रद, खाद्य, पेय इत्यादी पदार्थांनी मोहित होतो. साधनेच्या मार्गात हे सर्वाधिक मोठे विघ्न आहे. ह्याला नष्ट केल्याशिवाय जीवनामधील मोठा अडथळा दूर होणार नाही. आपल्या व्रतमय मार्गापासून विचलित होण्याची शंका उत्पन्न होते. म्हणून साधकाने ही भावना अंगिकारली पाहिजे. वारंवार असा विचार केला पाहिजे की जीभेचा स्वाद आध्यात्मिक उन्नतीमध्ये बाधक आहे. परिग्रहाचा हेतू आहे म्हणून स्वादत्यागाच्या भावनेचे वारंवार चिंतन करणे लाभदायक आहे.

५) स्पर्शेन्द्रिय संवर भावना - स्पर्शेन्द्रियाद्वारे जीव मनोज्ञ, अमनोज्ञ स्पर्शाचा अनुभव करतो. पण निर्ग्रन्थ भिक्षू त्या स्पर्शामध्ये आसक्त, मोहित न होता आणि राग, द्वेष न करता आत्मभावामध्ये लीन राहतो. परंतु जो भिक्षू ह्या विषयामध्ये आसक्त होतो तो निर्ग्रन्थ नाही असे सर्वज्ञ प्रभू म्हणतात.[३४]

स्पर्शेन्द्रियाद्वारेही अंतःकरणामध्ये शुभाशुभ भाव येतात. मोह आणि राग उत्पन्न होतो. भौतिक अनुकूल आणि प्रिय स्पर्शामुळे मनामध्ये असे भाव उठतात ज्यामुळे व्रतमय जीवनाची स्थिरता नष्ट होते. कारण मोह, माया भौतिक कामनेला पूरक आहेत. त्या दिशेने साधकाच्या मनात आसक्ती भाव उत्पन्न होतो. म्हणून प्रिय-अप्रिय स्पर्शांनि समत्वयुक्त बनणे साधकासाठी आवश्यक आहे.

जसे प्रारंभी सांगितले आहे की पाच महाव्रतांचे अखंडरूपाने पालन करण्यासाठी अपेक्षित शक्ती ह्या भावनेमुळे वाढते. साधकाचे मनोबळ वाढते. त्याच्यात अभिनव आत्मस्फूर्ती जागृत होते.

पाच महाव्रते म्हणजे आत्मशुद्धीची साधना. हा हिमगिरीचा उंच, सरळ चढाचा आहे. संपूर्ण उत्साहपूर्वक आणि अत्यंत सावधान होऊन चढणाराही कधी कधी खाली पडू लागतो. परंतु घायाळ झालेला आरोहक जर पुन्हा उत्साहाने चढण्याचा पुरुषार्थ करत असेल तर आत्मशुद्धीच्या भावनेच्या पर्वतावर चढता चढता पडणाऱ्या साधकाने निराश न होता पुन्हा आरोहण सुरू केले पाहिजे.

समजा, एखाद्या महाव्रतीचे मन दुर्बल झाले आणि तो विचार करू लागला की, आजन्म महाव्रतांचे पालन होऊ शकणार नाही म्हणून माझ्या साधुव्रताच्या पालनाचा कुणत्या अर्थ? मी गृहस्थ होऊन जातो ....'' तर त्याचे उत्थान होणे शक्य नाही. पण जर तो असा विचार करीत असेल की, ''मी किती दुर्बळ आहे की मी साधुजीवनाचा स्वीकार करूनही साधुजीवनातील महाव्रतांचे पालन करू शकत नाही, माझ्या आत्म्याची आता काय स्थिती होईल? मला विशुद्धी कशी मिळेल ? काय मी पुन्हा या भवसागरात बुडून जाईल? नाही, नाही. मी काही झाले तरी व्रताच्या भावना पुन्हा प्राप्त करेन. तपाने शरीर तापवून ज्ञानाद्वारे मनाला बांधून ठेवीन. चारित्र्याची प्रत्येक क्रिया पाळीन, दुष्ट विचारांना प्रवेश करू देणार नाही. अशाप्रकारे संकल्प करून जर साधू जीवन जगू लागले तर पुन्हा व्रताच्या पवित्र भावनेत रममाण होतील.

शुभ भावनारूपी बंधन तोडून अशुभ भावनारूपी पशूने जर आत्मारूपी नंदनवनात प्रवेश केला तर शुद्ध भावरूपी फल नष्ट करतील. महाव्रताच्या सुरक्षिततेसाठी अनंतज्ञानी जिनेश्वरदेवाने महाव्रताच्या भावनेचे निरूपण केले आहे.

आचारांग सूत्राच्या सोळाव्या अध्ययनाचे नाव 'विमुक्ती' आहे. विमुक्तीचा साधारण अर्थ 'बंधनातून मुक्त होणे, सुटणे' असा आहे. बेडीतून मुक्त होणे तर द्रव्य विमुक्ती आहे. पण ह्या अध्ययनामध्ये तर भावबंधनातून मुक्त होण्याचा संकेत केला आहे. भावमुक्ती अष्टकर्मांच्या बंधनाला तोडल्याने प्राप्त होते आणि अष्टकर्म अनित्यादी भावनेच्या चिंतनाने, भावनेमुळे नष्ट होतात. म्हणून ह्या अध्ययनामध्ये अनित्य भावनेचा बोध देण्यासाठी लिहिले आहे की, प्राण्यांचे निवासस्थान, जे शरीर आहे, ज्यात संसारातील सर्व प्राणी जन्म घेतात, ज्यात आत्मा राहतो ते शरीर अनित्य आहे. ह्या अनित्यतेला समजून विज्ञपुरुषाने गृहस्थबंधनाचा मोह सोडला पाहिजे. आरंभ परिग्रहाचा त्याग केला पाहिजे.३५

अशाप्रकारे आचारांग सूत्रामध्ये २५ चारित्र्य भावनांचे विस्तृत विवेचन प्राप्त होते, जे अत्यंत सरस व जीवनस्पर्शी आहे.

सूत्रकृतांग सूत्र

द्वितीय अंग सूत्रकृतांग सूत्रामध्येही भावनेच्या प्रसंगाचा उल्लेख झाला आहे. जसे दूसऱ्या अध्ययनाचा प्रथम उद्देश बोधिदुर्लभ भावनेचा उद्घोषाने सुरू झाला आहे. यात साधकाला संबोधून सांगितले आहे की, तुम्ही संबुद्ध बना, सम्यक् बोधी प्राप्त करा.

तुम्ही बोधी का प्राप्त करीत नाही ? जो वर्तमानात बोधी प्राप्त करीत नाही त्याला पुढच्या जन्मातसुद्धा बोधी सुलभ होत नाही. जर जीवनाची दोरी तुटली किंवा जीवन असेच व्यतीत होते तर त्याला पुन्हा प्राप्त करणे सुलभ नाही.[३६]

म्हणून क्षणाक्षणाचा विचार करा. समजा, हा क्षण बोधी प्राप्त करण्याचा आहे. अर्थात वेळ वाया जाऊ देऊ नका.[३७] जीवन अनित्य आहे. ह्या संसारात बाल, वृद्ध आणि गर्भस्थ शिशुदेखील मृत्यूच्या अधीन होतात. हा काळ बहिरी ससाण्याप्रमाणे प्राण्यावर झडप घालतो. त्याला नष्ट करतो. तसेच आयुष्य क्षीण झाल्यावर मृत्यूसुद्धा प्राण्याचे प्राण हरण करतो. जीवन नष्ट करून टाकतो.[३८]

ह्याच संदर्भात आठव्या अध्ययनामध्ये उल्लेख आहे की जीवात्मा संसारातील कोणत्याही उच्च स्थानी असला, मग तो देवलोकाचा इंद्र किंवा मनुष्य लोकातील चक्रवर्ती, बलदेव अथवा वासुदेव असला तरी सर्वांना एके दिवशी हे जग आणि आपल्या स्वजनांना सोडून जावेच लागते कारण स्वजनांचा सहवास अनित्य आहे.[३९]

जो साधक मेधावी, प्राज्ञ आहे त्याने अनित्यतेचा विचार करून आसक्ती दूर करावी आणि तीर्थंकरांद्वारे सांगितल्या गेलेल्या सम्यगदर्शन, ज्ञान, चारित्र्यात्मक मोक्षमार्गाचा स्वीकार करावा.[४०]

ह्याच्या नवव्या अध्ययनात सांगितले आहे की, संसारी जीव पापकर्माने दुःखी होतो. त्यांचे रक्षण करण्यासाठी त्यांचे आई-वडिल, बांधव, पुत्र, पत्नी यांपैकी कोणीच समर्थ नाही.[४१] अशाप्रकारे अशरण भावनेचे विवेचन आले आहे. पुढे असेही सांगितले आहे की, ह्या सर्वांना अशरणरूप मानून असा विचार करावा की आपल्या पापकर्मामुळे दुःख भोगणाऱ्या प्राण्याचे रक्षण कोणीही करू शकत नाही. म्हणून एकमेव आश्रय सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान, सम्यक् चारित्र्यादी आहे. हे योग्यप्रकारे समजून ममत्वरहित आणि निरहंकारी बनून साधकाने जिनेंद्र भगवानांनी सांगितलेल्या धर्माचे आचरण करावे.[४२]

ह्याच्या दहाव्या अध्ययनात साधूने एकत्व भावनेचे चिंतन केले पाहिजे, असा निर्देश केलेला आहे. असे केल्याने साधक संगमुक्त होतो. त्याला सांसारिक बंधन स्पर्श करू शकत नाही. अर्थात तो मुक्त होतो. ही भावना संगमुक्तीचे कारण आहे. हीच भावना समाधीचा मुख्य हेतू आहे.[४३]

ह्याच्या दूसऱ्या अध्ययनामध्ये अशरणतेचा उल्लेख करताना म्हटले आहे की अज्ञानी मनुष्याला असे वाटते की धन, संपत्ती, पशू, ज्ञानीजन हे सर्व रक्षण करणारे आहेत.

कुटुंबी ते माझे आहेत व मी त्यांचा आहे. परंतु कोणीच कोणाचा रक्षणकर्ता नाही आणि कुणालाही नाही. दुःख आल्यावर मनुष्य एकाटाच ते भोगतो, मृत्यू आल्यावर जीव एकटाच परलोकामध्ये जातो. म्हणून ज्ञानी पुरुष कोणालाच शरण मानत नाही.[४४]

अज्ञानी जीव मूढतेमुळे, ममत्वामुळे व्यर्थच ह्यांना शरणरूप मानतात. या श्लोकामध्ये एकत्व आणि अशरण अशा दोन भावनांचा उल्लेख आला आहे.

पंधराव्या अध्ययनामध्ये बोधिदुर्लभतेचे वर्णन करताना लिहिले आहे की, जो जीव हा मनुष्य जन्मात भ्रष्ट होतो त्याला पुन्हा जन्मजन्मांतरात मनुष्यजन्म लवकर मिळत नाही आणि मनुष्य जन्माशिवाय संबोधी म्हणजे सम्यक् दृष्टीची प्राप्ती होणे अत्यंत दुर्लभ आहे. अशी लेश्या किंवा चित्तवृत्ती किंवा भावसुद्धा मिळणे दुर्लभ आहेत, जे व्यक्तीला धर्माराधनेबरोबर जोडतात.[४५]

सांगण्याचे तात्पर्य हे आहे की, जो मनुष्य जन्म मिळाल्यानंतरही व्यर्थ घालवितो, जो मनुष्य जन्मात धर्माचे बी पेरत नाही त्यांना मोक्षप्राप्ती सुलभ नाही. जे सम्यक् दृष्टी संपन्न होऊन धर्माचरण करतात त्यांनाच मोक्ष प्राप्त होतो. अन्यत्वभावनेचे भाव पण ह्यात दिसून येतात. "त्यात लिहिले आहे" कामभोग माझ्यापासून भिन्न आहे आणि मी कामभोगाने भिन्न आहे, पदार्थ भिन्न आहे व मी त्याच्याने भिन्न आहे.[४६]

स्थानांग सूत्र

स्थानांग सूत्राच्या चतुर्थ स्थानामध्ये जेथे चार ध्यानांचे विवेचन आहे, तेथे (१) एकत्वानुप्रेक्षा (२) अनित्यानुप्रेक्षा (३) अशरणानुप्रेक्षा (४) संसारानुप्रेक्षा यांच्या रूपात चार अनुप्रेक्षेचा उल्लेख झाला आहे. ह्या अनुप्रेक्षेच्या अभ्यासाने धर्मध्यानामध्ये स्थिरता येते. द्वादश भावनेतल्या एकत्व, अनित्य, अशरण आणि संसार भावनेबरोबर ह्यांची तुलनीयता आहे.[४७]

स्थानांग सूत्रामध्ये संसाराचे चार प्रकार सांगितले आहेत - द्रव्यसंसार, क्षेत्रसंसार, कालसंसार आणि भावसंसार.[४८]

द्रव्यसंसार चतुर्गतिरूप आहे. आगमामध्ये 'चाउरंत संसार कंतोर' शब्द पुन्हा पुन्हा आला आहे. ज्याचा अर्थ असा आहे की ज्या संसाररूपी अरण्याचे चतुर्गतिरूपी चार अंतिम किनारे आहेत तो संसार 'कंतार' आहे.

स्थानांग सूत्रामध्ये त्यानंतरच्या दूसऱ्या उद्देशकामध्ये नरकसंसार, तिर्यंच संसार,

मनुष्य संसार आणि देव संसार असे चार प्रकारचे संसार सांगितले आहेत.[४९] ह्या चार गती आत्म्याच्या परिभ्रमणाच्या चार स्थिती आहेत. आत्मा जसे शुभाशुभ कर्म करतो त्यानुसार शुभाशुभ गतीमध्ये जन्म घेतो.

नंतर चतुर्गतीमध्ये परिभ्रमण करविणाऱ्या कर्मबंधनाची प्रत्येकी चार चार कारणे दिली आहेत.[५०]

जसे 'नरकगती योग्य कर्मबंधन' याची चार कारणे (१) महाआरंभ, (२) महापरिग्रह; (३) पंचेंद्रिय प्राणीवध; (४) मांसाहार.

तिर्यंच गतीला हेतुभूत चार कर्मे - (१) मायाचार (२) शठता (३) असत्य इत्यादि (४)कूट-तोल-माप (खोटे तोलमाप करणे)

मनुष्य गतीला हेतुभूत चार कर्मे (१) प्रकृतीची भद्रता (२) प्रकृतीची विनीतता (३) अनुकंपा (४) ईर्ष्येचा अभाव.

देवगतीला हेतुभूत चार कर्मे - (१) सराग संयम, (२) संयमासंयम, (३) बालतप आणि (४) अकाम निर्जरा

ह्या संसार परिभ्रमणाच्या सोळा कारणांपैकी काही शब्द ऐकण्यास प्रिय वाटतात. जसे मनुष्यगतीची चार कारणे तर चार गुणच आहेत. परंतु त्यांच्याबरोबर अज्ञान आणि मिथ्यात्व असल्याने ते संसार भ्रमणाला कारण होतात.

जर हीच कारणे सम्यक् दर्शनाशी संलग्न असतील तर ती मनुष्यगतीच काय तर मोक्षगतीची सुद्धा कारणे होऊ शकतात. परंतु ह्या गुणांमध्ये राग, अज्ञान, इत्यादी असल्याने ह्यांची फलशक्ती कमी होते. म्हणून दयाळुता, सरलता ह्या गुणांचा त्याग करू नये, पण त्याचबरोबर असलेल्या अज्ञान आणि आसक्तीचा भाव सोडून देणे म्हणजे त्या गतीच्या कारणांचा त्याग समजावा.

ह्या सोळा कारणांचा त्याग करणे थोडक्यात आस्रवाच्या पाच कारणांचा अर्थात मिथ्यात्व, अव्रत, प्रमाद, कषाय आणि अशुभ योगाचा त्याग करणे आहे. तसेच पुढे विचार केला तर राग आणि द्वेषाच्या त्यागामध्ये सुद्धा ह्याचा समावेश होऊन जातो. कारण राग आणि द्वेषच चतुर्गतीमध्ये परिभ्रमणाचे कारण आहे म्हणून ह्याचा त्यागच संसार परिभ्रमणाचा अंत आहे.

अशाप्रकारे चिंतन केल्याने, चिंतनात सतत राहिल्याने आत्मा परिणामतः संसारातून मुक्त होतो.

धर्मा चे दोन भेद ह्यात सांगितले आहे-

दुविहे धम्मे - सुयधम्मे चेव चरित्तधम्मे चेव ५१

श्रुत धर्म आणि चारित्र धर्म असे धर्माचे दोन प्रकार आहेत. श्रुतचा अर्थ ज्ञान आहे आणि चारित्रचा अर्थ आचार आहे. आचाराच्या अगोदर विचार, क्रियेच्या अगोदर ज्ञान असणे जरूर आहे. जीवनामध्ये कोणता आचार पाळावा कशी क्रिया करावी याचे प्रथम ज्ञान झाले पाहिजे म्हणजे प्रथम श्रुत धर्म अर्थात ज्ञान धर्म, वस्तुतत्त्वाचे सम्यग्ज्ञान प्राप्त करणे हा धर्म आहे, तर प्राप्त केलेल्या ज्ञानाचे आचरण करणे दुसऱ्या प्रकारचा धर्म आहे. ह्या दोन चरणांमध्ये धर्माचे समग्र रूप येते. लक्षात ठेवावे एका चरणाने चालता येणार नाही. 'न हु एगचक्केण रहो पयाइ' - एका चाकाने रथ चालणार नाही म्हणून धर्माचे हे द्वितत्त्वात्मक स्वरूप सांगितले आहे श्रुत धर्म आणि चारित्र धर्म.

समवायांग सूत्र

ह्याच्या पंचविसाव्या समवायाच्या सुरुवातीलाच उल्लेख झाला आहे की, प्रथम आणि अंतिम तीर्थंकरांनी सांगितलेल्या 'पंचयाम धर्मा'च्या अथवा 'पाच महाव्रताच्या' पंचवीस भावना आहेत. तेथे प्रत्येक व्रताच्या भावनेचे वेगवेगळे नामोल्लेख केलेले आहेत. जसे -

(१) अहिंसा महाव्रताच्या पाच भावना - १) इर्यासमिती २) मनगुप्ती ३) वचनगुप्ती ४)आलोकित पान भोजन ५) आदानभांड - मात्र निक्षेपणासमिती

(२) सत्य महाव्रताच्या पाच भावना - १) अनुवीची भावना २) क्रोधविवेक ३) लोभ विवेक ४) भय विवेक ५) हास्य विवेक

(३) अचौर्य महाव्रताच्या पाच भावना - १) अवग्रह अनुज्ञापनता २) अवग्रह सीमा ज्ञापनता ३) स्वयमेव अवग्रह - अनुग्रहणता ४) साधार्मिक अवग्रह अनुज्ञापनता ५) साधारण भक्तपान अनुज्ञाप्य परिभाजनता

(४) ब्रह्मचर्य महाव्रताच्या पाच भावना - १) स्त्री, पशू, नपुंसक, संसक्त शयनासन वर्जनता २) स्त्री कथा विवर्जनता ३) स्त्री इंद्रिय अवलोकन वर्जनता ४) पूर्वभुक्त आणि पूर्वक्रिडित कामभोगाचे स्मरण न करणे ५) प्रणीत आहार विवर्जनता

(५) अपरिग्रह महाव्रताच्या पाच भावना - १) श्रोत्रेन्द्रिय रागोपरती २) चक्षुरिन्द्रिय रागोपरती ३) घ्राणेन्द्रिय रागोपरती ४) रसनेन्द्रिय रागोपरती ५) स्पर्शनेन्द्रिय रागोपरती. ५२

ह्या पूर्वी आचारांग सूत्रामध्ये पाच महाव्रतांच्या पंचवीस भावनांचे वर्णन आपण पाहिले. आचारांग आणि समवायांग दोन्हीत उल्लेखिलेल्या भावनांचे जर तुलनात्मक दृष्टीने अवलोकन केले तर तत्त्वतः ह्यांच्यात विशेष फरक दिसत नाही. क्रम आणि शब्दावलीमध्ये थोडाफार फरक अवश्य आहे.

महाव्रतातील भावनेच्या उल्लेखावरून असे वाटते की व्रताच्या सम्यक् परिपालनाच्या दिशेत अत्यंत जागृतता ठेवण्यात आली आहे. व्रतांच्या कठोर मार्गावर चालणारा साधक कधीही विचलित होऊ नये म्हणून त्याची मानसिक पृष्ठभूमी सुदृढ बनविण्यासाठी भावनेची विविध रूपाने चर्चा केली आहे.

ह्या पाच महाव्रतांच्या पंचवीस भावनांचे केवळ चिंतन पुरेसे नाही तर त्याचे आचरण करणे सुद्धा आवश्यक आहे. ह्यांना आपण अनुष्ठानात्मक भावनासुद्धा म्हणू शकतो. कारण साधकाच्या जीवनामध्ये ह्या भावनेच्या चिंतनाबरोबर अनुष्ठान करणेसुद्धा अत्यंत आवश्यक आहे.

व्याख्याप्रज्ञप्ती (भगवती) सूत्र

ह्याच्या पंचविसाव्या शतकामध्ये धर्मध्यानाच्या चार अनुप्रेक्षेचा नामनिर्देश झाला आहे, जो स्थानांग सूत्रासारखाच आहे.[५३]

ज्ञाताधर्मकथा

ह्याच्या प्रथम अध्ययनामध्ये मेघकुमार जेव्हा गृहस्थाश्रमाचा त्याग करून संयमाचा अंगीकार करण्याची भावना आपल्या आई-वडिलांसमोर व्यक्त करतो तेव्हा ते त्याला समजवण्याचा प्रयत्न करतात की परिपक्व वय झाल्यानंतर दीक्षा घे. परंतु मेघकुमार सांगतो की, हा मनुष्य जन्म पुन्हा मिळत नाही. हे जीवन क्षणोक्षणी बदलतच राहते, हे अशाश्वत आहे, क्षणभंगुर आहे आणि शोकडो व्यसनांनी आणि उपद्रवांनी व्याप्त आहे, वीजेच्या चमकण्याप्रमाणे चंचल आहे. पाण्याच्या बुडबुड्यासारखा तसेच गवताच्या अग्रभागावर लटकणाऱ्या जलबिंदूसारखा, संध्याकाळच्या इंद्रधनुष्याच्या लालिमेसारखा आणि स्वप्नदृश्यासारखा क्षणात नष्ट होणारा आहे. कुष्ट इत्यादी रोगाने सडणारा, तलवार इत्यादी शस्त्राने कापला जाणारा आणि क्षीण होण्याचा ज्याचा स्वभाव आहे, जे आज किंवा उद्या सोडावे लागणार आहे. त्याची आसक्ती का धरावी ? अशाप्रकारे अनित्य भावनेचे वर्णन ह्या आगमात आले आहे. ५४

प्रश्नव्याकरण सूत्र

आचारांग आणि समवायांग सूत्राप्रमाणे ह्याच्या संवरद्वारामध्ये पाच महाव्रतांच्या पच्चीस भावनांचे वर्णन आहे. ह्या तिन्ही आगमांमध्ये ह्या भावना जवळ-जवल सारख्याच आहेत. थोडाफार क्रम मागे पुढे आहे आणि शाब्दिक भेदही आहे, पण प्रतिपाद्य विषयात कोही विशेष फरक नाही.[५५]

औपपत्तिक सूत्र

ह्याच्या चतुर्थ 'ध्यान'नामक अध्ययनामध्ये स्थानांक आणि भगवतीप्रमाणे धर्मध्यानाच्या चार अनुप्रेक्षांचे वर्णन आहे.[५६] वैषयिक सुख किंपाक फळाप्रमाणे असार आहे. जीवन पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे अथवा कुशाग्रावर असलेल्या जलबिंदूप्रमाणे चंचल आहे, असे जाणून ज्ञानी जन संसारातील हिरण्य, सुवर्ण इ. बहुमूल्य पदार्थ आणि वैभवादीला झाडयावर लागलेल्या धुळीप्रमाणे झटकून अर्थात परित्याग करून प्रव्रजित होत राहतात.[५७]

उत्तराध्यन सूत्र

उत्तराध्यन सूत्रातील चतुर्थ अध्ययनाची सुरूवात अनित्य आणि अशरण भावनेच्या उद्घोषाने झाली आहे. त्यात लिहिले आहे, हे जीवन संस्काररहित आहे. म्हणजे एकदा तुटल्यावर पुन्हा जोडले जात नाही. म्हणून प्रमाद करू नका. कारण वार्धक्य प्राप्त झाल्यावर व्यक्तीचा निश्चितच कोणीही रक्षणकर्ता नसतो. अशाप्रकारे विचार केला पाहिजे की हिंसा करणारे, पापस्थानापासून निवृत्त न होणारे प्रमादी पुरुष शेवटी कोणाला शरण जातील?[५८]

ह्या गाथेमध्ये आयुष्याची दोरी तुटल्यावर त्याला कोणीही जोडू शकत नाही आणि जन्म, जरा, मृत्यूमध्ये कोणीच शरणरूप होऊ शकत नाही, या संदर्भात स्पष्ट विवेचन आले आहे.

सहाव्या अध्ययनामध्ये साधकाला उपदेश करताना सांगितले आहे की, जर तुम्ही पंडित असाल तर पाशाची-बंधनाची समीक्षा करून सत्याचा शोध करा आणि जगातल्या सर्व प्राण्यांबरोबर मैत्री भावनेचा संकल्प करा. इथे मैत्री भावनेचे वर्णन आहे.[५९]

परंतु कुटुंबियांबरोबर मैत्री करून इतका लाभ होत नाही. येथे विश्वप्रेमाची जरुरी आहे. मनुष्य स्वार्थांधतेने स्वजनांशी प्रेम करतो. शास्त्रकार पुढे असे सांगतात की, 'जो पंडित आहे तो सतत चिंतन करतो की दुःख प्राप्त झाल्यावर आई-वडिल इत्यादी कुटुंबातील

कोणतीही व्यक्ती रक्षण करण्यात समर्थ नाही.६०

ह्याच्या आठव्या अध्ययनामध्ये कपिलमुनी चोरांना उपदेश देताना सांगतात की, हा संसार अध्रुव, अशाश्वत आणि प्रचुर दुःखाने भरलेला आहे. आधी-व्याधी-उपाधीरूपी दुःखाची अत्यधिक प्रचुरता आहे. संसाराचे कोणते कर्म असे आहे की ज्यामुळे जीव, नरक इत्यादी दुर्गतीमध्ये जात नाही ? अर्थात संसारातील सर्वच अनुष्ठाने दुर्गतिदायक आहेत. अनित्य आणि अशाश्वत आहेत.६१

या अध्ययनात पुढे बोधी दुर्लभतेचे वर्णन प्रस्तुत केलेले आहे. 'बोधी' अर्थात दुसऱ्या जन्मातही सम्यक् ज्ञान, दर्शन आणि चारित्र्यरूपी धर्माची प्राप्ती होणे.'६२

उत्तराध्ययनसूत्र भगवान महावीरांची अंतिम देशना आहे. ह्याच्या अंतर्गत साधकाला मोक्षमार्ग दाखविण्याच्या हेतूने तत्त्वज्ञान दृष्टांतादींद्वारे सुद्धा भावनेचे सरळ भाषेमध्ये निरूपण झाले आहे. ह्याच्या नवव्या अध्ययनामध्ये नमीराजाद्वारे एकत्व भावनेच्या चिंतनाचे अत्यंत सुंदर वर्णन आहे. ''जो साधक सर्व प्रकारच्या बाह्य आणि आभ्यंतर बंधनातून मुक्त होऊन मी एकटाच आहे, माझे कोणीच नाही अशाप्रकारे चिंतन करतो आणि भिक्षेद्वारा जीवननिर्वाह करतो त्या गृहत्यागी साधूचे जीवन निश्चितच कल्याणकारी व सुखप्रद आहे.६३

एकत्व भावनेचा चिंतक विचार करतो की प्राणी एकटाच जन्म घेतो, एकटाच मरतो. नमीराजाला सांसारिक पदार्थांविषयी किंचितही मोह, ममत्व नव्हते. त्याच्यामुळे त्यांचे आत्मचिंतन व एकत्व भावनेचे चिंतन इतके उत्कृष्ट होते की परीक्षा घेण्यासाठी देवलोकामधून आलेले इंद्रदेखील त्याच्या त्यागासमोर नतमस्तक झाले.

नमीराजाला ज्या घटनेने एकत्व चिंतनाची प्रेरणा मिळाली तो प्रसंग थोडक्यात असा - एकदा नमीराजाच्या शरीरामध्ये दाहज्वर उत्पन्न झाला. अनेक वैद्यांनी औषधोपचार केले. तेव्हा एका वैद्याने नमीराजाच्या शरीरावर चंदनाचा लेप लावण्याचे सूचित केले. नमीराजाच्या हजार राण्या चंदन घासू लागल्या. चंदन घासले जात होते. परंतु राण्यांच्या हातातल्या कंकणाच्या आवाजाने नमीराजा उद्विग्न झाला. त्याने मंत्र्याकडून आवाज बंद करण्याची सूचना दिली. राण्यांनी सौभाग्यरूप एक-एक कंकण हातात ठेऊन बाकीची सर्व कंकणे काढून टाकली. आवाज बंद झाला. नमी राजाने मंत्र्याला विचारले, 'काय चंदन घासणे बंद केले का ?' त्यावर मंत्री म्हणाला, 'राजेश्वर, चंदन घासले जात आहे. पण तुमच्या समजुतदार राण्यांनी सौभाग्य चिन्ह म्हणून केवळ एक कंकण हातात ठेऊन

बहिणीची सर्व कंकणे काढून टाकली आहेत. एका कंकणाचा आवाज कसा बरे होईल ?' अर्थात् 'सुखेषु किं बहुना' त्यांना प्रबुद्ध करण्यासाठी इतकीच घटना पुरेशी होती.

नमीराजा विचार करू लागला, जेथे एक आहे तेथे शांती आहे, जेथे अनेक आहेत तेथे अशांती आहे, गोंगाट आहे. जर मी स्वस्थ झालो तर एकटाच संयमाचा अवलंब करीत आत्मचिंतनात गढून जाईन. असा विचार करत करत नमीराजाला झोप लागली. जेव्हा ते उठले तेव्हा एकदम स्वस्थ झाले होते. त्यांनी जो संकल्प केला होता की स्वस्थ झालो तर दीक्षा घेईन, त्या निश्चयावर ते दृढ राहिले आणि हजार राण्यांचा मोह-माया सोडून नमीराजाने महाभिनिष्क्रमणाचा मार्ग स्वीकारला. स्वर्गातून इंद्र त्यांच्या वैराग्याची परीक्षा घेण्यासाठी आले. परंतु राजाने किंचितही विचलित न होता सर्व प्रश्नांची उत्तरे व्यवस्थित दिली. इंद्राच्या परीक्षेत राजा उत्तीर्ण झाला आणि संसाराचा सर्वप्रकारे त्याग केला.

ही घटना एकत्व भावनेचे स्पष्ट उदाहरण आहे, जी साधकासाठी प्रेरणारूप आहे. उत्तराध्ययन सूत्राच्या दहाव्या अधययनाचे नाव 'द्रुमपत्रक' आहे. 'द्रुम' म्हणजे 'वृक्ष' आणि 'पत्र' म्हणजे 'पान'.

ज्याप्रमाणे पिकलेले पान झाडावरून गळून पडते त्याचप्रमाणे मनुष्याचे जीवनही नष्ट होते. भगवान महावीर, गणधर गौतमाला संबोधून प्राणिमात्रांना धर्मानुसरणरूपी कर्तव्यबोध देताना सांगतात की, जीवनाची नश्वरता पाहून धर्माचरणात आळस करू नका. जोपर्यंत जीवनाची दोरी हातात आहे तोपर्यंत आपली कार्ये सिद्ध करा. भगवान महावीरांनी अनेकप्रकारे मानव समुदायाला समजावून सांगितले की, धर्ममार्गावर गतीशील होण्यामध्ये थोडाही विलंब, आळस, असावधानी बाळगू नका. कारण कुशाग्रावर लोंबणारा दवबिंदू काही क्षण थांबून लगेचच नष्ट होतो. मनुष्याचे जीवनही तसेच क्षणिक आहे.[६४] काळे केस वार्धक्यामुळे पांढरे होत आहेत आणि स्मरणशक्तीसुद्धा क्षीण होत चालली आहे. हे सर्व पुढे येणाऱ्या मृत्यूचे लक्षण आहे.[६५]

फोड, कॉलऱ्यासारख्या व्याधी शरीराला आक्रांत करीत आहेत, शरीर विपत्तिग्रस्त होत आहे. हे सर्वकाही पाहता, क्षणाचाही विलंब करू नका. कमळ ज्याप्रमाणे पाण्याने लिप्त होत नाही, त्याचप्रमाणे तुम्हीसुद्धा सांसारिक, भौतिक पदार्थांमध्ये लिप्त होऊ नका, त्याविषयी आसक्तीचा, ममत्वाचा त्याग करा.[६६]

हे गौतमा, काटेरी मार्ग- सांसारिक भोगवासनामय जीवनाला सोडून तू महामार्ग

... मनुष्यांद्वारे अवलंबिलेल्या मार्गावर आरुढ झाला आहेस. म्हणून निश्चयपूर्वक ह्या मार्गावर चालत राहा, थोडाही प्रमाद करू नको. ज्याप्रमाणे दुर्बळ भारवाहक विषम मार्गावर चढून जातो, परंतु नंतर किंकर्तव्यमूढ होऊन त्यालाही पश्चाताप करावा लागतो.[६७]

देहाची, जीवनाची आणि सांसारिक भोगाची नश्वरता स्पष्टपणे या अधययनामध्ये आलेली आहे. आगमकारांनी आपल्या वास्तविकतेकडे ध्यान देण्यासाठी ज्या प्रेरक गाथांमध्ये उपदेश दिला आहे, तो वास्तविक साधनापथावर गतीशील मुमुक्षूसाठी एक असा मार्ग आहे जो केवळ परिश्रांतीच मिटवतो. इतकेच नव्हे तर अभिनव चेतना अथवा शक्तीचा संचारही करतो.

ह्या आगमाच्या तेराव्या अध्ययनामध्ये चित्तमुनी आणि संभूतीराजाचा वार्तालाप आहे. चित्तमुनी राजा संभूताला बोध देताना सांगतात की, हे मानव जीवन अशाश्वत, अनित्य आहे. हे जाणूनही जो धर्मपुण्य करत नाही तो मृत्युमुखी पडल्यावर पश्चाताप करतो. धर्माचरण न केल्याने तो परलोकातही पश्चाताप करतो. ज्याप्रमाणे सिंह मृगाला पकडून नेतो त्याचप्रमाणे अंतःकाळी मृत्यू मनुष्याला घेऊन जातो. तेव्हा त्याचे आई-वडिल इत्यादी कोणीही त्याला मृत्यूच्या पाशातून वाचवू शकत नाहीत, त्याचे दुःख वाटून घेऊ शकत नाहीत. तो एकटाच दुःख भोगतो. कर्म जीवनाला मृत्यूकडे नेत आहे. वृद्धावस्था मनुष्याच्या शारीरिक वर्ण आणि कांतीचे हरण करत आहे. म्हणून कर्म करू नका.[६८] कर्मबंधनाने आत्माचे क्षणोक्षणी पतन होत आहे. म्हणून जागृत करण्यासाठी या गाथेमध्ये सुंदर उपदेश दिला आहे.

अशाप्रकारे अनित्य, एकत्व आणि अशरण भावनेचे विस्तृत वर्णन आले आहे. पुढे म्हटले आहे, रात्री मागून रात्र पसार होत आहे, मनुष्याचे भोग पण नित्य नाहीत. ते मनुष्याला मिळाले तरी असे सोडतात जसे फळरहित वृक्षाला पक्षी सोडतात.[६९]

ह्या सूत्राच्या चौदाव्या अध्ययनामध्ये सांसारिक कामभोगांच्या क्षणिकतेचे वर्णन आहे. कारण हे जीवात्म्याला क्षणभर सुखदायी वाटतात. परंतु नंतर ते दुःखदायी ठरतात.[७०] मनुष्य उपभोग घेताना हे विसरतो की हे सर्व भोग क्षणभरच आनंद देणारे असून जीवात्म्याला अनंतकाळपर्यंत संसारचक्रामध्ये भ्रमण करवतील आणि अमूल्य असा मनुष्यजन्म व्यर्थ जाईल.

कारण ज्या रात्री व्यतीत होतात त्या पुन्हा परत येत नाहीत. अधर्म करणाऱ्यांच्या रात्री निष्फळ होतात आणि धर्म करणाऱ्यांच्या रात्री सफळ होतात.[७१] धर्मभावना मनुष्याला

असक्तीकडे नेते. अन्यथा हे संपूर्ण जग आणि ह्या जगाची सर्व संपत्ती जरी स्वतःची झाली तरी ती जीवाला अपर्याप्त वाटू लागेल आणि स्वतःचे रक्षण करण्यासाठी ती उपयोगी पडत नाही.७२

ह्या चौदाव्या अध्ययनामध्ये सांसारिक सुखाची क्षणिकता, अशरणता इत्यादींचे वर्णन करून धर्माच्या सार्थकतेचे सुंदर विवेचन केलेले आहे. एक धर्मच ध्रुव, नित्य व शाश्वत आहे.७३

अठराव्या अध्ययनामध्ये संयति राजाला गर्दभालमुनी म्हणतात की, 'अणिच्चे जीवलोगम्मि किं रज्जम्मि पसिज्जसि'७४ हे राजन ! ह्या जगात जीवन अनित्य आहे, क्षरभंगूर आहे, तू ह्या राज्यामध्ये का आसक्ती धरत आहेस ? कारण जीवन आणि रूप वीजेच्या चमकण्याप्रमाणे चंचल आहे.

ह्या आगमाच्या एकोणिसाव्या अध्ययनामध्ये 'मृगापुत्र' संसाराच्या चतुर्गतीमध्ये भ्रमण करता करता कसे दुःख भोगावे लागले त्याचे विवरण स्वतःच्या आईवडिलांना सांगत आहे आणि वैराग्यप्रधान विचार व्यक्त करताना सांगतो की, हे शरीर अनित्य आहे, अपवित्र आहे, अशुचिमय पदार्थापासूनच उत्पन्न झालेले आहे. इथला आवास अशाश्वत आहे. दुःख आणि क्लेशाचे घर आहे, हे शरीर पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे क्षणिक आहे. ह्याला कधी ना कधी तरी सोडावेच लागणार आहे. म्हणून अशाप्रकारे अशाश्वत शरीरामध्ये मला आनंद मिळत नाही. मृगापुत्र संसाराची असारता स्पष्ट करण्यासाठी पुढे सांगतो की, ह्या जीवनात जन्म, जरा, रोग, मरण हे सर्व दुःखरूपी आहेत. हा संसारसुद्धा दुःखरूपी आहे, ज्यामध्ये प्राणी दुःख आणि क्लेशच प्राप्त करतात. अशाप्रकारे शरीराची अनित्यता, अशुचिता व संसाराच्या विचित्रतेचे अत्यंत सुंदर चित्रण ह्या अध्ययनामध्ये केले आहे.७५ आणि पुढे सांगितले आहे की, जो मनुष्य धर्माचरण केल्याशिवाय परभवामध्ये प्रवेश करतो तो व्याधी आणि रोगाने पीडित आणि दुःखी होतो. त्या अधर्मीला अनेक अप्रिय संयोग होतात आणि अनेक प्रिय गोष्टींच्या वियोगाचे दुःख भोगावे लागते.७६

उत्तराध्ययनाच्या विसाव्या अध्ययनामध्ये 'अनाथी मुनीं'ची कथा आहे. ते मुनी ध्यानस्थ असताना योगायोगाने राजगृही नरेश श्रेणिकमहाराज तेथून निघाले. ते मुनींच्या तेजस्वी आणि मोहक व्यक्तिमत्त्वाने अत्यंत प्रभावित झाले आणि त्यांना विचारले, 'हे मुनिराज, अशा भर यौवनामध्ये आपण हे त्यागमय जीवन का स्वीकारले ? हे वय तर सांसारिक सुख भोगण्याचे आहे.' मुनी म्हणाले, 'राजन, मी अनाथ होतो. माझा कोणीच

कोणताच नव्हता. म्हणून मला ह्या जीवनातच त्राण दिसला.' राजा म्हणाला, 'मुनिवर, मी तुमचा नाथ बनतो. हे कष्टमय जीवन सोडा आणि माझ्या छत्रछायेखाली सांसारिक सुखाचा उपभोग घ्या.' मुनी म्हणाले, 'हे राजन, थोडा विचार करा. अरे, तुम्ही स्वतः अनाथ आहात. तेव्हा माझे नाथ कसे होणार ?' राजा आश्चर्याने पाहतच राहिले. तेव्हा मुनी म्हणाले, 'हे राजा, काय तुम्हाला कोणी व्याधी, वृद्धत्व अथवा मृत्यूपासून वाचविण्यास समर्थ आहे? तरी, 'अनाथ-सनाथ' याचा अर्थ समजून घे.' मुनींच्या सांगण्याचा आशय हा होता की ह्या संसारामध्ये जो केवल धर्माचा आश्रय घेतो तोच केवल सनाथ आहे. अन्य सर्वजण अनाथ आहेत. मुनींचे हे वचन ऐकून राजा त्यांच्या चरणी नतमस्तक झाला. ह्या कथेमध्ये अशरण भावनेचे विवेचन झाले आहे.[७७] जरा आणि मृत्यूच्या महाप्रवाहामध्ये बुडणाऱ्या जीवासाठी धर्मच द्वीपाचे कार्य करतो. तोच प्रतिष्ठान आहे, आधार आहे, उत्तम गती आणि शरण आहे.[७८]

जो तपरूपी धर्माचरण करतो, त्याच्या सहस्रावधी जन्मांच्या संचित कर्माची निर्जरा होते.[७९]

ह्या गाथेमध्ये तपाद्वारे निर्जरेचा स्पष्ट उल्लेख आहे. निर्जरा भावना सर्वात महत्त्वपूर्ण आहे, जी मनुष्याला मोक्षाप्रत नेते.

संवर भावनेचे वर्णन करताना लिहिले आहे की, नाळे बंद केले असता पाण्याचा प्रवाह थांबतो, त्याचप्रमाणे समभावाच्या साधनेने सावद्ययोग अर्थात पापकारी कार्याची विरती होते, त्याग होतो, प्राणिवध, मृषावाद, अदत्तग्रहण, मैथुन, परिग्रह व रात्रीभोजनत्याग केल्याने जीव अनास्रव होतो म्हणजे संवृत होतो. पाच समिती, तीन गुप्तींच्या आचरणाने व अकषाय, जितेन्द्रिय, गर्वरहित आणि निशल्य झाल्यानेसुद्धा जीव अनास्रव होतो.[८०]

तसेच तलावात भरलेल्या पाण्याला उपसून बाहेर टाकल्याने जसा तलाव सुकून जातो त्याचप्रमाणे पूर्व संचित करोडो भवाच्या कर्माची तपस्येद्वारा निर्जरा केल्याने आत्मा कर्म मुक्त होतो.[८१]

मन, वाणी आणि शरीराच्या संवराला योग म्हटले आहे.[८२]

उपरोक्त गाथेमध्ये आस्रव रोखण्याचे उपाय म्हणजे जीवाने संवराची आराधना कशाप्रकारे करावी आणि पूर्वी आलेल्या कर्मांची निर्जरा कशी करावी ह्याच्यासाठी सुंदर उदाहरण देऊन विवेचन केले आहे. जेव्हा ह्या सर्व क्रिया जीवात्मा करतो त्या धर्मक्रियेला योग म्हटले आहे. आस्रव, संवर आणि निर्जरा ही तीन तत्त्वे आहेत आणि भावनाही

आहेत. आपण भावनेचा अभ्यास करण्यासाठी ह्या त्रितत्त्वांचे चिंतन, मनन, अभ्यास करणे आवश्यक आहे.

धर्मभावनेच्या चिंतनासाठी म्हटले आहे की, धर्म जीवनाची शिदोरी (पाथेय) आहे. वाटेजवळ शिदोरी असली तर त्याची यात्रा सुखपूर्वक संपन्न होते. त्याचप्रमाणे ज्याच्याजवळ शिदोरी ज्याच्याजवळ आहे त्याची जीवनयात्राही सुखपूर्वक संपन्न होते.[८३]

मैत्र्यादी चारही भावनांचे भाव ह्या शास्त्रात इस्ततः दिसून येतात. उदाहरणार्थ उत्तराध्ययनाप्पये हे सहाव्या अध्ययनात आपण पाहिले ही मैत्री भावना आहे. नमिराजर्षीची इन्द्र प्रशंसा करताना म्हणतात - तुमची आर्जवता - सरलता आश्चर्यकारी आहे, मार्दव-मृदुता धन्यवाद देण्यासारखी आहे. तुमची क्षमा उत्तम आहे आणि मुक्तीपण उत्तम आहे.[८४] (मुक्तीचा अर्थ निर्लोभतापण होतो.) अशाप्रकारे इन्द्र नमिराजर्षीची प्रमोदभावनेने स्तुती करतात.

ह्या सूत्राच्या तेवीसाव्या अध्ययनामध्ये केशीकुमारद्वारा गोतमस्वामीची प्रशंसा केली आहे ती प्रमोद भावनेने ओतप्रोत आहे.

केशीस्वामी म्हणतात, 'हे गौतम, आपली प्रज्ञा श्रेष्ठ आहे. तुम्ही माझे सर्व संशय दूर केले. हे संशयातीत! हे सर्वश्रुत महोदधी, तुम्हाला माझा नमस्कार आहे.'

जेव्हा केशीस्वामींच्या संशयाचे समाधान झाले तेव्हा ते खूप संतुष्ट झाले आणि गौतमस्वामींना 'संशयातीत, सर्वसिद्धान्त समृद्ध' या शब्दांनी संबोधित केले आहे. गुणीजनांचे गुणगान करणे म्हणजे प्रमोदभावना आहे, त्याचा इथे स्पष्टपणे उल्लेख मिळतो.

केशी आणि गौतम दोन्ही वेगवेळ्या परंपरांचे सूत्रधार होते. दोन्ही खूप ज्ञानी होते. पण ते एकमेकांच्या गुणांचा आदर करीत होते. गुणीजनांचा आदर करणे म्हणजे प्रमोदित होणे प्रमोदभावना आहे.[८५] करुणा भावनेचे वर्णनसुद्धा यात आहे.

भगवान अरिष्टनेमी मूक पशूंचा करुण आवाज ऐकून करुणेने द्रवित झाले. ते विचार करु लागले-

जर माझ्या निमित्ताने ह्या मूक प्राण्यांचा वध होत आहे तर हे माझ्या परलोकासाठी श्रेष्ठ नाही. ह्या करुणामय चिंतनाने द्रवित होऊन ते लग्नमंडपातून मागे फिरले. हातात वरमाला घेऊन उभ्या असलेल्या राजमती सुंदरीचा त्याग केला पण करुणा सोडली नाही.[८६]

उत्तराध्ययन सूत्राच्या बत्तिसाव्या अधययनामध्ये सर्व दुःखाने मुक्त होण्याचे

[illegible] सांगितले आहेत. त्या अध्ययनाचा सारांश कोणत्याही परिस्थितीत राग, द्वेष न [illegible] मध्यस्थ राहण्याचा आहे.

जो मनोज्ञ भावात आसक्त होतो तो प्रतिकूल भावाचा द्वेषपण करतो. तो अज्ञानी [illegible] राग करून तर कधी द्वेष करून दोन्ही स्थितीत दुःखी होतो आणि राग, द्वेष न [illegible] दोन्ही स्थितीत जे आसक्त होत नाहीत ते वीतरागी नेहमी सुखी राहतात.[८७] शब्द, [illegible] रस, गंध स्पर्श हे मनोज्ञ असो अथवा अमनोज्ञ त्यात रागद्वेष रहित राहणे माध्यस्थ [illegible] आहे. अशाप्रकारे ह्या शास्त्रात अनेक भावनांचा थोडक्यात उल्लेख आहे.

उत्तराध्यन सूत्रामध्ये अप्रशस्त भावना

उत्तराध्ययन सूत्राच्या जीवाजीव विभक्ती नामक छत्तीसाव्या अध्ययनामध्ये चार [illegible] भावनांचा उल्लेख आहे, ज्या अप्रशस्त अथवा अशुभ आहेत. सूत्रकाराचे हे मंतव्य [illegible] आहे की, साधकाने अशा अशुभ भावनेपासून नेहमी दूर राहिले पाहिजे. कारण हा संसार [illegible] दैहिक वासनेने घेरला गेला आहे. ज्याप्रमाणे काजळाच्या कोठारात जाऊन कालुष्यापासून [illegible] अत्यंत कठीण आहे, त्याचप्रमाणे संसारात राहूनही संसाराच्या कालुष्यापासून वाचणे [illegible] अत्यंत कठीण आहे. म्हणूनच शास्त्रकाराने इथे अशुभ भावनेचे विवेचन केले आहे. त्याच्या [illegible] दुष्परिणामापासून साधकाने नेहमी जागृत राहिले पाहिजे.

कांदर्पिक भावना - 'कंदर्प' अर्थात 'काम', जो विषयवासनेचा सूचक आहे. [illegible] येथे असे सांगितले आहे की जो कामविषयक कथा, चर्चा इत्यादींमध्ये संलग्न राहतो तो [illegible] हास्य-परिहास्यमूलक कुत्सित चेष्टा करतो आणि तसेच प्रदर्शन करतो, निम्नस्तराचा [illegible] उपहास करतो आणि त्याच्याद्वारे लोकांचे मनोरंजन करतो,[८८] हे सर्व अशुभ, अप्रशस्त [illegible] आहे. असे केल्याने मन कलुषित आणि दुःखी होते.

संसारामध्ये कामवासना सर्वाधिक अजिंक्य आहे. तिला उत्तेजित करणे खूप सरळ [illegible] आहे. परंतु नियंत्रण करणे अत्यंत कठीण आहे.

अभियोगी भावना - 'अभियोग' शब्दाचा येथे एका विशिष्टार्थाने प्रयोग झालेला [illegible] आहे. सांसारिक विषयवासनामय सुखाला प्राप्त करण्यासाठी रसायन घृतादी स्निग्ध पदार्थांद्वारे [illegible] तयार केलेली विशिष्ट औषधी आणि विषयवासनारूपी सुखाला सिद्ध करण्यासाठी मंत्रप्रयोग, [illegible] दूषित योगाभ्यास, ध्यान, तांत्रिक प्रयोग, भूतीकर्म - अभिमंत्रित भस्म इत्यादींचा प्रयोग [illegible] करणे यालाच 'अभियोग' म्हटले आहे. तसे करण्याचे भाव मनात ठेवणे त्याचेच चिंतन [illegible] करणे म्हणजे अभियोग भावना आहे. ही जीवात्म्याला पतनाच्या मार्गाकडे घेऊन जाते.[८९]

किल्विषिक भावना - 'किल्विष' शब्द निंदा, अवहेलना अथवा अवर्णवाद इत्यादींबरोबर जोडलेला आहे. ज्ञानी, सर्वज्ञ, धर्माचार्य, धर्मसंघ, साधू या पाचांची जो द्वेष करतो, अवर्णवाद बोलतो, मायापूर्ण आचरण करतो तो किल्विषिकी भावनेचे आचरण करतो.९० ज्याच्या मनामध्ये असे विकृत चिंतन चालते तो पापाचारी आहे.

किल्विषिक भावनेची काही अन्य कारणे दशवैकालिक सूत्रामध्ये सांगितली आहेत. जसे- तपाची चोरी, व्रतस्वरूपी आचारांची चोरी करणारा किल्विषी देवामध्ये उत्पन्न होतो.९१

तपाची चोरी म्हणजे स्वतः तर तप करावयाचे नाही परंतु दुसऱ्या तपस्वींच्या माध्यमातून तपस्वीच्या रूपात स्वतःची प्रशंसा करून घेणे अथवा कोणी विचारले की आपल्यामध्ये तपस्वी साधू कोण आहे ? तर अशा प्रश्नांवर मौन राहणे अथवा साधू तर तपस्वी असतातच असे भ्रमपूर्ण उत्तर देऊन तपस्वी नसतानादेखील लोकांमध्ये 'तपस्वी' नाव मिळविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे तपाची चोरी करणे होय. याचप्रमाणे उत्कृष्ट व्रतादींचे आचरण न करूनदेखील उत्कृष्ट व्रती म्हणविऱ्याचे ढोंग करणे, विशिष्ट आचारसंपन्न नसताना देखील लोकांमध्ये उत्कृष्ट आचारसंपन्न विद्वान, उत्कृष्ट सेवाभावी असण्याचा अभिनय करणे म्हणजे मायाचार आहे. माया कपट करणाऱ्यालादेखील किल्विषिक भावनेच्या अंतर्गत मानले आहे.

आसुरी भावना - 'आसुरी'चा अर्थ 'राक्षस' आहे. ज्यांच्यात प्रशस्त, उत्तम कर्म, गुण आणि आचार नसतात अशा दुष्ट लोकांमध्ये राक्षसी भाव असतो. सदैव क्रोधाविष्ट राहणे आणि क्षुद्र स्वार्थासाठी निमित्त-ज्योतिषादी विद्येचा दुष्प्रयोग करणे म्हणजे आसुरी भावना आहे.

तसे करणारे मानवच आहेत. परंतु त्यांची कार्ये असुर अर्थात राक्षसांसारखी असतात. तसे चिंतन केल्याने पापाच्या खोल खड्ड्यात पडण्याची वेळ येते.

जो शांत झालेल्या विवादाला पुन्हा भडकावतो आणि अधर्मामध्ये आपली बुद्धी नष्ट करतो (कारण कलहामुळे शांती आणि सौम्यता नष्ट होते) अशा विग्रह, कलह करणाऱ्याला पापश्रमण म्हणतात. म्हणून क्रोध करू नये.

ह्या चार भावनांच्या उल्लेखानंतर ह्या अध्ययनामध्ये आणखी एक गाथा अशी आहे, जी विशेषत्वाने मोहाचे भाव प्रकट करते. ह्या अध्ययनामध्ये 'मोह' शब्द तर आलेला नाही. परंतु मोहाचे भाव त्यात असल्याने व्याख्याकाराने ह्याचे 'संमोह भावने'च्या रूपात

व्यक्त केले आहे. ह्या गाथेच्या पूर्वार्धात आत्महत्येचे वर्णन आलेले आहे. तलवार इत्यादी शस्त्राने, विषादीच्या प्रयोगाने किंवा पाण्यात बुडून आत्महत्या करणे अत्यंत दुर्बलतेचे प्रतीक आहे. व्यक्ती आत्महत्या तेव्हाच करते जेव्हा तिला जगामध्ये कोणताच आश्रय दिसत नाही. ही अत्यंत हीन भावनेची द्योतक प्रवृत्ती आहे. मोहमूढ व्यक्तीच असे काम करते.

गाथेच्या उत्तरार्धामध्ये साधूच्या चर्येविपरित उपकरण इत्यादी ठेवणे हे सुद्धा मोहत्वेच प्रतीक आहे. आत्महत्येचे चिंतन केल्याने आत्मविश्वास नष्ट होतो आणि घोर पापाचा बंध होतो.[९४]

या अप्रशस्त भावनेच्या वर्णनानंतर हे अध्ययन समाप्त होते. ह्याच्या शब्दामध्ये या अशुभ भावनेच्या त्यागाची किंवा परिहाराची चर्चा आलेली नाही. परंतु संदर्भावरून सहजच लक्षात येते की साधनेत गढलेल्या व्यक्तीने यांच्यापासून दूर राहिले पाहिजे. संमोह भावनेमध्ये जी आत्महत्येची चर्चा आली आहे ती अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मनुष्य जीवनामध्ये जेव्हा निराश होतो किंवा अशा समस्येने चहुबाजूंनी गुरफटून जातो, ज्याचे समाधान त्याला जगामध्ये दिसत नाही, सर्वत्र त्याला दुःखच दिसते, तेव्हा तो आत्महत्येचा विचार करतो. परंतु त्याचे ते विचार सर्वथैव चुकीचे आहेत. कर्म, पुरुषार्थ आणि आत्मबळाचा जो आश्रय घेतो त्याच्या मनात असे वाईट विचार कधीही येत नाहीत. आणि जरी असे विचार आले तरी ते निघून जातात. त्याच्या चिंतनाची दिशा सत् चिंतनाकडे वळली तर त्याच्या मनात अशी दुर्बलता कधीही येत नाही.

ही गाथा वास्तविकपणे वर्तमान जीवनात निराश झालेल्या लोकांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

ह्या पाच अशुभ भावांचा येथे उल्लेख करणे महत्त्वाचे आहे कारण अशा कर्मानी लिप्त होण्यापूर्वी मनात तसे विकार येतात, त्या विकारांना प्रथमच विकाररूप समजले पाहिजे. दुःखदायक मानले पाहिजे. ह्याच्या विक्राळ, भयानक परिणामांची कल्पना केली तर तसे कर्म करण्याचे भाव केव्हाही त्याच्या मनात येणार नाहीत.

दशवैकालिक सूत्र

दशवैकालिक सूत्राच्या प्रथम गाथेमध्ये 'आचार्य श्री शयंभव' यांनी धर्मासंबंधी लिहिले आहे की, धर्म उत्कृष्ट, मंगल आहे. तो अहिंसा, संयम आणि तपामध्ये समाविष्ट आहे.

जो पुरुष नेहमी आपले मन धर्मात लावतो, धर्माचे मनामध्ये चिंतन, अनुचिंतन करतो तो इतक्या उच्च पातळीवर जातो की देवतासुद्धा त्याला नमस्कार करतात.९५

ह्या गाथेमध्ये धर्माचे महत्त्व दाखवून त्याच्या सतत चिंतन, मननाच्या दिशेने जो संकेत केला आहे तो धर्मभावनेच्या रूपात दृष्टिगत होतो. धर्माचे उत्कृष्ट, परमोत्तम मंगल स्वरूप सांगून सूत्रकाराने जनमानसाला त्याकडे प्रवृत्त करण्याचा जो उपक्रम केला आहे तो सर्वथा स्तुत्य आहे. थोडक्यात धर्माचे स्वरूप हिंसा त्याग, संयमी जीवन आणि तपस्येशी संलग्न आहे असे स्पष्ट केले आहे. ह्या गाथेचा चौथा चरण अत्यंत मार्मिक आहे. जो सदैव मनामध्ये धर्मभावनेचे चिंतन, मनन करतो त्याच्या जीवनात असे परिवर्तन होते की त्याचे सर्व विकार नष्ट होतात आणि त्याच्यावर सुसंस्कार होतात. तो केवळ मानव समुहाद्वारेच नव्हे तर देवगणांसाठीही वंदनीय, पूजनीय, सन्माननीय बनतो. सांगण्याचे तात्पर्य हे आहे की, सूत्रकाराने धर्माचे लक्षण सांगून ह्यात अत्यंत कमी शब्दांमध्ये धर्मभावनेने प्रेरित करण्याचा खूप सुंदर प्रयत्न केला आहे.

या आगमात एक प्रसंग असा आहे की जेथे हे दाखवले आहे की मुनींनी महान आचार्यांच्या वचनाला 'अमोघ' म्हणजे सार्थक करावे. म्हणजे त्यांच्या वचनानुसार कार्य करून त्याला सफळ करावे.९६ मुनींच्या हृदयामध्ये ह्या भावनेला दृढ करण्यासाठी आचार्यांनी जीवनाची नश्वरता आणि अनिश्चिततेकडे साधकाचे लक्ष वेधून घेऊन सांगितले आहे की जो साधक मोक्षपथावर गतीशील आहे तो विचार करतो की हे जीवन अस्थिर, अध्रुव आहे. आयुष्य सिमित आहे. त्याला एक निश्चित काळानंतर ह्या जगाचा त्याग करून जावे लागणार आहे. म्हणून त्याने जीवनाच्या परमसिद्धीच्या मार्गाचे ज्ञान करून स्वतःला विषयवासनेपासून दूर ठेवावे.९७

शरीराच्या अनित्यतेवर प्रकाश टाकताना सूत्रकार पुन्हा सांगतात की, जोपर्यंत व्याधीरोगाची वृद्धी होत नाही, जोपर्यंत इंद्रियांची शक्ती क्षीण होत नाही तोपर्यंत प्राण्याने धर्माचे चांगल्या प्रकारे पालन केले पाहिजे.९८

उपरोक्त दोन गाथांमध्ये आचार्यांनी सांसारिक जीवन, यौवन, स्वस्थता आणि इंद्रियबलाची अध्रुवता, अस्थिरता किंवा नश्वरतेकडे संकेत केला आहे. ह्या भावनेने मनुष्याला हे समजून येते की ज्याला शाश्वत समजून तो उन्मत्त होतो. ते सर्व काही नष्ट होणारे आहे.

बारा भावनांतील 'अनित्य' नामक भावनेची परिभाषा यामध्ये येते. ह्या

आगमामध्ये एके ठिकाणी भिक्षूला मूर्च्छा आणि गृद्धीपासून दूर राहून संयमामध्ये नेहमी आसक्त राहण्याचा संदेश दिलेला आहे. त्या संदर्भात सांगितले आहे की, भिक्षू अशुचितेने युक्त असणाऱ्या, अशाश्वत असणाऱ्या, शरीराचा नेहमीसाठी त्याग करतो. तो जन्ममृत्यूच्या बंधनाला तोडून जेथून पुन्हा परत यावे लागत नाही अशा सिद्ध स्थानाला प्राप्त करतो.९९

ह्या गाथेमध्ये सूत्रकाराने देहाची आसक्ती सोडण्यासाठी देहाची अशुचिता अथवा अशुचितून उत्पन्न, अशाश्वत, अनित्य अशा घृणास्पद शरीराची आसक्ती धरणे कितपत योग्य आहे ? हे भाव व्यक्त केलेले आहेत. 'अशुची'शब्द वाचताच मनामध्ये हे भाव आंदोलित होऊ लागतात की हा शब्द बारा भावनेच्या अंतर्गत असलेल्या अशुची भावनेकडे संकेत करीत आहे. सूत्रकाराने ह्या शब्दाचा येथे विशेषत्वाने उल्लेख केला आहे. ज्याचा भावार्थ असा आहे की हा जीवात्मा घृणास्पद मलमूत्रयुक्त देहामध्ये का आसक्त होत आहे ? ह्या गाथेत 'अशुची' भावनेचे स्पष्ट चित्रण झालेले आहे.

आगमांवर रचलेल्या व्याख्यासाहित्यामध्ये चूर्णीचे अत्यंत महत्त्व आहे. आगमामध्ये प्रतिपादित तथ्याचे चूर्णीमध्ये विश्लेषण आहे.

जीवनाच्या अनित्यतेचा चूर्णीमध्ये ठिकठिकाणी उल्लेख झाला आहे. दशवैकालिक चूर्णीमध्ये सांगितले आहे की, मनुष्यजीवन निश्चितच अनित्य आहे. ते गवताच्या टोकावर पडलेल्या जलबिंदूप्रमाणे चंचल आहे. कारण ते थेंब केव्हा नष्ट होतील ते सांगता येत नाही.१००

जीवनाच्या क्षणिकतेचे सुंदर, सजीव चित्रण करून चूर्णीकारांनी मनुष्यजातीला धर्मकर्म करण्यासाठी जागृत होणयाचा दिव्य संदेश दिला आहे.

निर्जरेचे वर्णन करताना शास्त्रकारांनी लिहिले आहे की, सकाम निर्जरेचे फळ अत्यंत महान आहे. करोडो वर्षांपर्यंत केलेल्या अकाम निर्जरेपेक्षा एका घडीची सकाम निर्जरा अधिक फलदायी आहे हे भगवान महावीरांचे कथन आहे. अकाम निर्जरा अविवेकपूर्वक केलेली गती आहे व सकाम निर्जरा विवेकपूर्वकची गती आहे. म्हणून कोणतीही क्रिया तप कसे करावे त्याच्यासाठी सांगितले आहे की -

नो इह लोगट्ठचाए तवमहिट्ठिज्जा, न परलोगट्ठचाए तवमहिट्ठिज्जा नो कित्ति वण्ण सद्द - सिलोगट्ठचाए तवमहिट्ठिज्जा

ननत्थ निज्जरट्ठचाए तवमहिट्ठिज्जा ।१०१

न इहलौकिक सुखासाठी, न पारलौकिक सुखासाठी, न कीर्ती, यश, प्रतिष्ठा इत्यादीसाठी पण एकमात्र निर्जरेसाठी तप करा. कर्मनिर्जरेसाठी केलेली क्रिया सर्वार्थदायिनी होते.

ह्या निर्जरा भावनेचे अत्यंत सुंदर वर्णन केले आहे. ज्या क्रिया, धर्म, तप, करायचे असेल त्याच्यामागे कोणत्याही प्रकारची अपेक्षा न बाळगता मात्र कर्मनिर्जरेसाठीच तप केल्याने अनन्त पटीने त्याचा लाभ होतो. गहू पेरले तर घास सहजतेने मिळतो. घासासाठी कोणी गहू पेरत नाही. तसेच निर्जरेसाठी तप केले तर भौतिक वस्तू तर घासाप्रमाणे मिळून जातात. त्याच्यासाठी अमूल्य कर्म निर्जरेचा लाभ सोडणे योग्य नाही. हेच शास्त्रकाराचे सांगणे आहे.

आवश्यक सूत्र

मनुष्य या संसारामध्ये ज्या लोकांना तसेच धनादी भौतिक साधनांना 'त्राणरूप' अथवा 'शरणरूप' मानतो ते वस्तुतः शरणरूप नाहीत. संकट, दुःख, रोग आणि मृत्यूपासून आत्मविश्वास कोणीही समर्थ नाही. द्वादश भावनेमधील 'अशरण भावना' ह्याच वैचारिक पृष्ठभूमीवर आधारित आहे. जेव्हा कोणीच शरणरूप नाही, तेव्हा मानवाने काय करावे ? कोणाचा आश्रय घ्यावा ? हे प्रश्न सहजच उपस्थित होतात. परंतु संसारी पदार्थ आणि संसारी लोक कोणीच त्राण देण्याचे साधन किंवा आश्रयरूप होऊ शकत नाही. कारण संसारातील सर्व प्राणी स्वतःच शरणशून्य प्राणरहित आहेत तर ते दुसऱ्यांना कसे शरण देऊ शकतील ? पदार्थ अशरण आहेत तर शरणरूप काय आहे ? ह्याचे अत्यंत सुंदर उत्तर आवश्यक सूत्रांमध्ये प्राप्त होते. तेथे स्पष्ट लिहिले आहे-

चत्तारि सरणं पवज्जामि अरिहंते सरणं पवज्जामि
सिद्धे सरणं पवज्जामि साहु सरणं पवज्जामि
केवली पण्णतं धम्मं सरणं पवज्जामि [१०२]

येथे 'शरण चतुष्टय' याचा उल्लेख आहे. अर्हत, सिद्ध, साधू आणि सर्वज्ञ प्ररूपित धर्माला प्राणिमात्रांसाठी शरणरूप सांगितले आहे. अर्हत तत्त्वदर्शक अथवा जीवन दर्शनाचे प्ररूपक आणि उपदेशक आहेत. त्याचा आधार घेऊन प्राणी धर्माच्या मार्गावर चालण्यासाठी सक्षम होतो. सिद्ध म्हणजे ज्यांनी समस्त कर्माचा क्षय करून परमशुद्ध आत्मस्वरूपाला परमात्मभावाला स्वायत्त केले आहे ते विमुक्तीच्या दिशेमध्ये गमन करण्यासाठी प्रोत्साहित

आधार, म्हणून ते शरणरूप आहेत. तिसरे साधुपद 'शरणरूप' अथवा 'आलंबनरूप' म्हटले आहे. हे पद फारच महत्त्वपूर्ण आहे. साधुत्व तथाकथित वेशभूषेमध्ये कर्मकांडमूलक क्रियेमध्ये समाविष्ट नाही. ते तेव्हाच साध्य होते जेव्हा जेव्हा प्राण्यामध्ये परविन्मुखता, आत्मोन्मुखता किंवा स्वन्मुखतेचा भाव जागृत होतो. साधू स्वतः साधक असतातच. परंतु त्याबरोबर ते दुसऱ्यांनाही आत्मोपलब्धिच्या दिशेत प्रेरित करतात. म्हणून ते 'स्व-पर कल्याणक विधायक' मानले जातात. सांसारिक दुःखाने, विषमतेने आणि समस्यांनी ग्रासलेला मनुष्य साधूच्या सान्निध्यात शांतीचा अनुभव करतो. त्याला एक असे आश्रयस्थान मिळते की जेथे त्याचा थकवा दूर होऊन त्याला एक मानसिक शांती प्राप्त होते. म्हणून ते वस्तुतः शरणरूपच आहेत.

ह्या तीन शरणांनंतर केवली, सर्वज्ञदेव वीतराग प्रभुंद्वारे प्रतिपादित धर्माचा जो त्यानंतरच्या जो उल्लेख झाला आहे तोसुद्धा महत्त्वपूर्ण आहे. कारण धर्मच असे तत्त्व आहे, तत्त्वार्थ आहे ज्यांचा आधार घेऊन मनुष्य साधुत्वाचे सन्मानीय जीवन स्वीकारतो त्याची साधना करता करता तो प्रमाद, मोह, लोभ इत्यादींवर विजय मिळवून अर्हत बनतो. ज्याची अंतिम सर्वोत्कृष्ट परिणती मुक्तता किंवा सिद्धत्वाच्या रूपात निष्पन्न होते म्हणून धर्म शरण आहे, आदेय आहे, उपादेय आहे, सर्वोत्कृष्ट आहे.

अशाप्रकारे हे चार शरण, शरणरहित प्राण्यांसाठी निसंदेह, शांतीप्रद, श्रेयस्कर आश्रयाच्या रूपात सिद्ध होतात. जसजसे मानव ह्या चतुष्पदींचे चिंतन करतो, शरण-स्वरूपात ह्यांना स्वीकारण्याची भावना ठेवतो तसतशी त्याच्यात एक आत्मस्फूर्ती आणि संचेतनेची जागृती होते. तो हे विसरतो की मी शरणरहित आहे, आश्रयरहित आहे. मनामध्ये अशाप्रकारे विश्वास उत्पन्न झाला तर साधनेच्या मार्गावर चालण्यासाठी काय अडचण असणार ? तसे करण्यात त्याला एका अनिर्वचनीय अर्थात शब्दातीत आनंदाची अनुभूती होईल.

ह्याच सूत्रामध्ये एके ठिकाणी शास्त्रकाराने पंचवीस भावनांचा संकेत केला आहे. (१) तेथे त्यांचा आशय महाव्रतांच्या पंचवीस भावनांशी निगडित आहे. त्यासंबंधी पूर्व पृष्ठामध्ये प्रसंगानुसार विवेचन केले गेले आहे. विशेषरूपाने आचारांग सूत्रामध्ये जेथे भावनेचे विश्लेषण केले आहे तेथे हा विषय वर्णिलेला आहे.

द्वादश भावनेच्या अतिरिक्त मैत्री इत्यादी चार भावनासुद्धा स्वीकृत आहेत. त्यात मैत्री भावनेचे आपले एक विशिष्ट स्थान आहे कारण ह्या जगामध्ये कटुता, कलह, विसंवाद,

द्वेष, शत्रुता इत्यादींमुळे सांसारिक जीवन नरकासारखे झाले आहे. त्याचा नाश करण्यासाठी मैत्री भावना ही एक संजीवनी आहे. मैत्रीभावनेला विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे. मानवाच्या मनात क्रोध, अहंकार, उच्चता, नीचता इत्यादींच्या अनेक गाठी असतात. त्यामुळे मनुष्य समता, वात्सल्यता, सहृदयता यांसारख्या कोमल भावनांना प्रकट करू शकत नाही. त्याचा परिणाम असा होतो की मनुष्याला धन, वैभव, परिवार, सामर्थ्य इत्यादी सर्वकाही प्राप्त होऊनही जीवनामध्ये शांती मिळत नाही. जैन धर्माने ह्या अशांतीचे मूळ असलेल्या लोहशृंखलेला तोडण्याचा जो मार्ग प्रस्तुत केला आहे तो अत्यंत विलक्षण आहे. 'आवश्यक सूत्रां'च्या एका गाथेत असा जीवनाचा संदेश दिला आहे ज्याचे अनुसरण केल्याने मानव अशांतीच्या भयंकर अरण्यातून निघून शांतीच्या देवोपम साम्राज्याला प्राप्त करू शकतो.

खामेमि सव्वेजीवा, सव्वे जीवा खमंतु मे ।
मित्ती मे सव्वभूएसु, वेरं मज्झं न केणइ ॥[१०३]

भावार्थ - एक मुमुक्षू स्वतःला निर्भार आणि निर्द्वन्द्व करण्यासाठी अत्यंत भावपूर्ण शब्दांमध्ये सांगतो की, "मी त्या सर्व जीवांना क्षमा करतो, जे माझ्याबरोबर कटू व्यवहार करतात. जर कोणी माझ्याबरोबर कटुपणे वागले तर ते सर्व मी विसरतो आणि मनातल्या सर्व दुर्भावनासुद्धा काढून टाकतो." न मागता क्षमा करण्याची भावना खरोखर एक आंतरिक निर्मलतेचे विलक्षण उदाहरण आहे. आज जगामध्ये अशी परिस्थिती आहे की दुर्भावनाग्रस्त व्यक्ती क्षमा मागितल्यावरसुद्धा क्षमा करीत नाही. याउलट प्रतिशोध घेण्यास उत्सुक असते. तेव्हा स्वतःच क्षमा करण्याची भावना किती उच्चकोटीची किंवा उच्च मानसिकतेची द्योतक आहे !

ह्यानंतर मुमुक्षूचे पुढचे पाऊल सर्व जीवांकडून क्षमा मागण्यासाठी पुढे जाते. तो सर्वांकडे याचना करतो की त्याच्याकडून जाणते किंवा अजाणतेपणी झालेल्या चुकांसाठी क्षमा करावी.

मानवी मन अत्यंत दुर्बल आहे. कोणाच्या हातून केव्हा, कोणती चूक घडेल त्याचे ध्यान राहत नाही. म्हणून फारशा चुका अज्ञानतेमध्येच होतात. कोणाच्या बाबतीत कोठे, केव्हा चूक झाली हे लक्षात न आल्याने तो प्राण्यांकडून क्षमा मागतो. हे जीवनमात्र वर्तमानकाळाच्या सीमेमध्ये बद्ध नाही. भूतकाळ आणि भविष्यकाळाच्या शृंखलासुद्धा ह्याच्यावरोवर जखडलेल्या आहेत. ह्या क्षमायाचनेबरोबर त्या सर्वांचा परिष्कार होतो.

किती उच्च, सात्त्विक आणि निर्मळ असे हे विचार आहेत ! शत्रुभावनेच्या विषवृक्षाचे बीज ह्यात सम्यक् प्रकाराने पेरले गेले आहे.

क्षमा देण्याची आणि घेण्याची खरी प्रक्रिया साधल्यानंतर 'सर्व प्राणिमात्रांबरोबर माझी मैत्री आहे' ह्या शब्दांद्वारे जीव आपली मैत्री भावना प्रकट करतो.

पुन्हा आपल्या चित्तामध्ये अधिक निर्मलता आणि समुज्ज्वलता आणण्यासाठी तो सहृदयतेने अशी भावना ठेवतो की माझा कोणाच्याहीबरोबर वैरभाव अथवा शत्रुत्व नाही. मी सर्वथा निर्वैर आहे.

जर प्रस्तुत गाथेमध्ये आलेले उदात्त विचार केवळ शाब्दिक उच्चारणापर्यंतच सीमित न राहता दैनिक जीवनामध्ये व्याप्त झाले तर हा संसार स्वर्ग होऊ शकेल परंतु अत्यंत दुःखाचा विषय असा आहे की आज मानवाच्या वचन आणि कर्मामध्ये खूप विसंगति झालेला आहे. तो जे वाणीद्वारे उच्चारतो ते कितपत कृतीमध्ये उतरवतो हे सांगता येत नाही.

ही एक फार मोठी विडंबना आहे की आदर्श आणि सिद्धांताला एक प्रथा अथवा रूढीचे रूप दिले आहे. परंतु त्यात निहित साध्याचा लोप झाला आहे असे दिसते. म्हणूनच हा उच्च कोटीच्या सिद्धांताद्वारे जीवनामध्ये जे साध्य केले पाहिजे ते साध्य होत नाही.

धार्मिक जगाने ह्यावर अत्यंत खोलवर विचार केला पाहिजे. धर्मसाधना म्हणजे रूढी रूढी अथवा प्रथा नाही. ही तर जीवनाची एक जागृत प्रक्रिया आहे. परंतु वाईट याचे वाटते की धर्मसाधना आज मूर्छितासारखी झाली आहे. त्या मूर्च्छेला नष्ट करावी लागेल तरच धर्मसाधना सिद्ध होईल. मैत्रीभावनेबरोबर ह्या विचारांना जोडले तर किती बरे होईल. मनुष्य दान आणि क्षमा ग्रहणाच्या रहस्याला समजू लागेल आणि स्वतःमध्ये मैत्रीभावनेची अमृतवेल लावेल.

बृहत्कल्पभाष्यामध्ये भावना

जिनकल्पी भावना

बृहत्कल्पभाष्यामध्ये प्रतिपादित जिनकल्पीच्या संदर्भात पाच तुलनांचा उल्लेख केला आहे. संस्कृत वृत्तीमध्ये लिहिले आहे-

"तपसा, सत्त्वेण, सूत्रेण, एकत्वेन, बलेन च एवं तुलना
भावना पंचधा प्रोक्ता जिनकल्प प्रतिपाद्यमानस्य" इति[१०४]

जिनकल्पाची साधना, तप आणि वैराग्याच्या दृष्टीने अत्यंत कठोर आणि उग्र साधना आहे. त्यासाठी अत्यंत दृढ मनोभूमी आवश्यक आहे. तशी मानसिक स्थिती बनविण्यासाठी ह्या भावनेचा अभ्यास आवश्यक मानला गेला आहे. त्याचे थोडक्यात वर्णन खालीलप्रमाणे आहे.

तप भावना - तपाची महत्ता, गौरव, तप मार्गामध्ये येणारे विघ्न, तपाचा क्रम, तपाद्वारे होणारी आत्मशुद्धी इत्यादी भावांचे चिंतन करणे, 'तप भावनेच्या' अंतर्गत येते. ह्याने मनामध्ये दृढता आणि उर्जेचा संचार होतो. ही तप भावना अनित्यादी बारा भावनांच्या अंतर्गत आलेल्या निर्जरा भावनेसारखी आहे. कारण निर्जरा भावनेचा संबंधसुद्धा तपपूर्वक कर्मक्षयाबरोबर जोडलेला आहे.

सत्त्वभावना - सत्त्व अथवा आत्मबळाला जागृत करण्याचा आंतरीक अभ्यास म्हणजे 'सत्त्वभावना' आहे. सकारण उत्पन्न झालेले भय तसेच निष्कारण भयाला जिंकणे, साप, चोर, दैत्य इत्यादींच्या भयापासून मुक्त राहणे, नेहमी निर्भय राहण्याचा अभ्यास करणे, सत्त्वभावनेच्या अंतर्गत येते. ह्याचा पुन्हा पुन्हा अभ्यास करण्याची साधना केली पाहिजे. भाष्यामध्ये ह्या पाच भूमिका अथवा प्रतिमा वर्णिलेल्या आहेत. अर्थात विभिन्न ठिकाणी ध्यानस्थ राहून ह्याचा अभ्यास करण्याचा उल्लेख आहे. पहिल्या प्रतिमेच्या भूमिकेमध्ये साधक उपाश्रयामध्ये साधनेचा अभ्यास करतो. दुसऱ्या प्रतिमेमध्ये उपाश्रयाच्या बाहेर अभ्यास करतो, तिसऱ्या प्रतिमेमध्ये चौकामध्ये अभ्यास करतो, चौथ्या प्रतिमेत स्मशानामध्ये ह्या भावनेचा अभ्यास करतो.[१०५]

उपरोक्त स्थाने अशी आहे की, जेथे निश्चयपूर्वक ध्यान आणि अभ्यास करण्यासाठी आपल्या आंतरिक बळाचा आणि पराक्रमाचा प्रयोग करावा लागतो. कारण शून्यघर, स्मशान इत्यादी तर अत्यंत भयावह असतात. त्यांच्यामध्ये कायोत्सर्ग ध्यानात स्थिर होणे, भयावर विजय मिळविणे ही आत्मशक्तीची वृद्धी करण्यास सहाय्यक आहे. भाष्यकाराने ह्या पाच प्रतिमांचे वेगवेगळे वर्णन केले आहे.

एकत्व भावना

ह्या संदर्भामध्ये भाष्यकारांनी लिहिले आहे की साधू गृहस्थ काळात स्त्री, पुत्र इत्यादींबरोबर जो संबंध होता तो तर सोडूनच देतो. परंतु प्रव्रज्येच्या पर्याय काळात आचार्य इत्यादींच्या प्रती त्यांच्या मनात ममत्व निर्माण होऊ शकते. सहयोगी साधूबरोबर आपलेपणाचा भाव निर्माण होऊ शकतो. असे होणे बंधनाला कारण आहे. ह्यामुळे

साधनेमध्ये, व्रताराधनेमध्ये यत्किंचित मंदता येण्याची शंका राहते कारण शेवटी ते सुद्धा शेवटी मानवच आहेत. लौकिक, शारीरिक, मानसिक इत्यादी दुर्बलता येऊ शकतात.

तप आराधक उग्रसाधनाशील मुनींनी अशा भावनेपासून मुक्त राहणे आवश्यक आहे. त्या सर्वांतून मुक्त राहण्यासाठी त्यांनी सतत असे चिंतन केले पाहिजे की, त्यासाठी हे सर्व काही निरर्थक आहे. माझा ह्यांच्याबरोबर काहीच संबंध नाही, मी एकटाच आहे, मीच माझ्या सुखाचा, कल्याणाचा सहचर आहे, सहयोगी आहे. प्रिय, अप्रिय दिसणाऱ्या ह्या पदार्थांबरोबर लोकांबरोबर माझा काहीच संभव नाही.

एकत्व भावनेच्या अभ्यासाने साधक आचार्य गुरू, सातिथ्य (गुरुबंधू) सर्वांबरोबर निर्माण होणाऱ्या आसक्तीपासून मुक्त होतो. तो सतत असे चिंतन करतो की, मी नितांत एकाटाच आहे. माझ्याशिवाय अन्य कोणीही माझे नाही.[१०६]

बारा भावनांमध्ये एकत्वभावनेचे जे वर्णन आले आहे तसेच वर्णन तत्त्वतः ह्या एकत्व भावनेचे आहे.

सूत्र भावना

भाष्यकारांनी सूत्र भावनेचे वर्णन करताना लिहिले आहे की, ह्याचा अभ्यास केल्याने आत्मा, ज्ञान, दर्शन आणि तप प्रधान संयमामध्ये सम्यक् प्रकारे परिणत होतो. अर्थात असे करणाऱ्या साधकाचे ज्ञान निर्मल असते, श्रद्धा दृढ असते आणि सम्यक्त्वाची योग्यप्रकारे आराधना करत करत साधना मार्गावर पुढे जातो. तपश्चर्येद्वारा आपल्या संयमाला अधिक उज्ज्वल बनवितो. तो 'उपयोग परिज्ञ' बनतो, म्हणजे श्रुतज्ञानामध्ये निष्णात होतो. दुसऱ्या शब्दात त्याचे जीवन ज्ञानमय प्रकाशाने प्रकाशित होते. त्याच्या प्रभावामुळे तो काल परिज्ञाता होतो. अर्थात त्याला भूत, भविष्य, वर्तमानाचे विशेष ज्ञान उत्पन्न होते. आणि ते सूत्रभावनेमध्ये स्थिर राहून जीवनाचे परमसाध्य असणाऱ्या मोक्षाची प्राप्ती करतो.

प्रकीर्णकामध्ये भावना

श्वेतांबर मूर्तीपूजकाच्या मान्यतेनुसार प्रकीर्णकांना सुद्धा 'आगम' म्हटले जाते. ती दहा आहेत. त्यातील पहिल्या प्रकीर्णकाचे नाव 'चतुःशरण' (चउसरण) आहे. ह्यामध्ये अरिहंत, सिद्ध, साधू आणि केवली भगवंतांनी निरूपित केलेल्या धर्माचे शरण चार गतींचा नाश करणारे आहे, असे सुंदर विवेचन केले आहे. त्यात अरिहंत इत्यादींच्या गुणांचे

विस्तृत वर्णन केलेले आहे. तसेच विशेषरूपाने हे सांगितले आहे की ह्या चारांचे शरण ज्यांनाही पुरुषालाच प्राप्त होते. यापुढे असेही सांगितले आहे की, ज्यांनी ह्या चारांचे शरण घेतले नाही, दान, शील, तप भावनारूप धर्माचा स्वीकार केला नाही, चतुर्गतिरूप संसाराचा विच्छेद केला नाही ते पुरुष मनुष्यजन्म प्राप्त करूनसुद्धा अयशस्वी झाले आहेत, त्यांचे जीवन व्यर्थ गेले आहे.[१०७]

बारा भावनांमध्ये दुसरी 'अशरण भावना' आहे. त्यात असे सांगितले आहे की अर्हंत सोडून तीच वस्तू शरणरूप नाही. फक्त उपरोक्त चार शरणच शरणरूप आहेत.

दुसऱ्या 'आतुरप्रत्याख्यान' प्रकीर्णकामध्ये एकत्व भावनेचा उल्लेख झाला आहे. त्यात असे लिहिले आहे की जीव एकटाच जातो, निश्चितपणे एकटाच उत्पन्न होतो, एकटाच मरतो आणि कर्मरहित झाल्यावर एकटाच सिद्ध होतो. ज्ञानदर्शनासहित माझा आत्मा शाश्वत आहे. अन्य सर्व बाह्य पदार्थ केवल संबंधमात्र आहेत.[१०८]

तिसऱ्या महाप्रत्याख्यान प्रकीर्णकामध्येसुद्धा एकत्व भावनेचे असेच वर्णन केलेले आहे.[१०९]

चौथ्या 'तंदुलवैचारीक' प्रकीर्णकामध्ये अनित्य भावना आणि अशुची भावना यांचे वर्णन प्राप्त होते. त्याचे विवेचन करताना लिहिले आहे की हे शरीर अध्रुव, अनित्य, अशाश्वत, वृद्धी आणि क्षती प्राप्त होणारे विनाशशील आहे. त्याला आधी किंवा नंतर अवश्यच सोडावे लागणार आहे.

त्यानंतर ह्यातच शरीराच्या संरचनेचे विस्तृत विवेचन केलेले आहे. शरीराच्या अशुचितेचे वर्णन करताना लिहिले आहे की, जर शरीराच्या आतील मांस परिवर्तित करून बाहेर काढले तर त्याची अशुची पाहून मातासुद्धा घृणा करू लागेल. मनुष्यशरीर मांस, रक्त, हाडे, इत्यादींनी व्याप्त असल्याने अपवित्र आहे. परंतु वस्त्र, गंध आणि माल्यादीने आच्छादित असल्याने सुशोभित दिसते. हे शरीर कवटी, चरबी, मांस, हाडे, रक्त, चामडे, केश, नाकाचा मळ आणि विष्ठा इत्यादींचे घर आहे. ओठांच्या चहुकडे लाळेचा चिकटपणा, मुख घामाने व्याप्त असून, दात मलिन आहेत.

ह्या शरीराच्या खांद्याची नस, अनेक शिरा आणि अनेक सांध्यानी बद्ध आहे. केसाने आच्छादित अशोभनीय कटीप्रदेश, रोमकूपातून स्वभावतः अपवित्र आणि दुर्गंधयुक्त निघणारा घाम, त्यातील काळीज, आतडे, पित्ताशय, हृदय, फुप्फुसे प्लिहा इत्यादी मलस्रोवक नऊ छिद्रे आहेत. ती दुर्गंधयुक्त पित्त, कफ, मूत्र इत्यादींचे निवासस्थान आहे.

अशुद्धता दुर्गंधयुक्त अपवित्र आणि नश्वर आहे. अशाप्रकारे विचार केल्याने आणि त्याचे खरे रूप पाहून हे जाणले पाहिजे की हे शरीर अध्रुव, अनित्य, अशाश्वत आणि विनाशशील आहे. अशाप्रकारे एकशेदोन सूत्रांपासून एकशे बेचाळीस सूत्रांपर्यंत शरीराच्या अशुचिते, अनित्यतेचे आणि अशुचितेचे विस्तृत विवेचन केले आहे.[११०]

आगम वाङ्मयामध्ये भावनेसंबंधी वेगवेगळ्या प्रसंगी जे वर्णन आले आहे त्याचे दोन वर्गात विवेचन केले आहे. ह्या वर्णनामध्ये मुख्यरूपाने दोन गोष्टी आपल्या समोर येतात. एकतर बारा भावनेच्या रूपात जसे सुव्यवस्थित, क्रमबद्ध विवेचन आपल्याला प्राप्त होते तसेच आगमामध्ये क्रमबद्ध विस्तृत विवेचन नाही. जे काही प्राप्त होते ते सांकेतिक रूपात आहे. म्हणून अनित्यत्व, अशरणत्व इत्यादींच्या अतिरिक्त अन्य भावना प्रकट रूपात व्यवस्थित दृष्टिगोचर होत नाहीत. अन्य वेगवेगळ्या प्रसंगी आलेल्या वर्णनामध्ये त्याचे सांकेतिक भावरूपात आपण वर्णन करू शकतो.

दुसरी गोष्ट ही आहे की अशुभ अथवा अप्रशस्त आणि शुभ अथवा प्रशस्त भावाच्या आधारे भावनेचे वर्णन केलेले आहे तेथे चिंतनमूलक मुख्य अशुभ आणि शुभ भावाला स्वीकारले आहे. साधकाने प्रथम अशुभाचे चिंतन करून त्याचा परित्याग केला पाहिजे. त्यानंतर शुभाचे चिंतन करून त्याचे ग्रहण केले पाहिजे.

म्हणून ह्याच्या पुढच्या प्रकरणात अशुभ भावनेचे विवेचन केले जाईल. अशुभला जाणून त्याचा परित्याग केल्याशिवाय शुभ भावनेने ओतप्रोत होऊ शकणार नाही. जर शुभ भावनेने भावित व्हायचे असेल तर सर्व प्रथम अशुभ भावनेला साफ करावे लागेल. कोऱ्या पाटीवर लिहिले जाते भरलेल्या पाटीवर कसे लिहू शकणार ? त्याचप्रमाणे अंतरात्मा कोरा स्वच्छ असला तरच शुभ अथवा शुद्ध भावना त्यात राहू शकते त्याच्यासाठी प्रथम अशुभ भावनेचे वर्णन केले जाईल. त्याची परिहेयता, त्याचे फळ इत्यादीचे विवेचन केले जाईल.

संदर्भ

१. आचा. सू. १।२।१।१०-१२

२. (अ) आचा. सू. १।२।१।६६ पृ. ४३ (ब) आचा. सू. १।२।१।२०-२१

३. आचा. सू. १।२।५।९१ पृ. ६५

४. आचा. सू. १।४।२।१३४ पृ. १२४ - 'जे आसवा ते परिस्सवा, जेपरिस्सवा ते आसवा'

५. आचा. सू. १।४।३।१४१ पृ. १३२ "इह आणाकंखी पंडिते आणिऽहे एगमप्पाणं संपेहाए धुणे शरीरं।"

६. आचा. सू. २।१५।७७८ पृ. ४००

७. आचा. सू. २।१५।१।७७८ पृ. ४०१

८. उत्तरा. सू. २३।५८ पृ. ३९९
मणो साहसिओ भीमो, दुट्ठस्सो परिधावई, तं सम्मं निगिण्हामि धम्मसिक्खाए कन्थगं॥

९. आचा. सू. २।१५।१।७७८ पृ. ४०१

१०. दशवैकालिक सू. ९।३।७ मुहुत्त दुक्खाहु... महब्भयाणि ।

११. आचा. सू. २।१५।१।७७८ पृ. ४०२

१२. आचा. सू. २।१५।१।७७८ पृ. ४०२

१३. आचा. सू. २।१५।१।७८१ पृ. ४०४

१४. आचा. सू. २।३।३।१२७ पृ. ११०

१५. आचा. सू. २।१५।१।७८१ पृ. ४०४

१६. आचा. सू. २।१५।१।७८१ पृ. ४०४

१७. आचा. सू. २।१५।१।७८१ पृ. ४०४

१८. आचा सू. २।१५।१।७८१ पृ. ४०४

१९. आचा. सू. २।१५।१।७८४ पृ. ४०८

२०. आचा. सू. २।१५।१।७८४ पृ. ४०८

२१. आचा. सू. २।१५।१।७८४ पृ. ४०८
२२. आचा. सू. २।१५।१।७८४ पृ. ४०८
२३. आचा. सू. २।१५।१।७८४ पृ. ४१६
२४. आचा. सू. २।१५।१।७८७ पृ. ४१२
२५. आचा. सू. २।१५।१।७८७ पृ. ४१२
२६. आचा. सू. २।१५।१।७८७ पृ. ४१२
२७. आचा. सू. ६।२३ पृ. ३२४
२८. आचा. सू. २।१५।१।७८७ पृ. ४१२
२९. आचा. सू. २।१५।१।७८७ पृ. ४१३
३०. आचा. सू. २।१५।१।७९० पृ. ४१६
३१. आचा. सू. २।१५।१।७९० पृ. ४१६
३२. आचा. सू. २।१५।१।७९० पृ. ४१६
३३. आचा. सू. २।१५।१।७९० पृ. ४१७
३४. आचा. सू. २।१५।१।७९० पृ. ४१७
३५. आचा. सू. २।१६।१।७९३ पृ. ४२३
३६. सूत्र. सू. १।२।१।१ पृ. १११
३७. सूत्र. सू. १।२।३।१९ पृ. १७६
३८. सूत्र. सू. १।२।१।२ पृ. १११
३९. सूत्र. सू. १।८।१।१२ पृ. ३४८
४०. सूत्र. सू. १।८।१।१३ पृ. ३४८
४१. सूत्र. सू. १।९।१।५ पृ. ३६०
४२. सूत्र. सू. १।९।१।६ पृ. ३६०
४३. सूत्र. सू. १।१०।१।१२ पृ. ३७७
४४. सूत्र. सू. १।२।३।१६-१७ पृ. १७२
४५. सूत्र. सू. १।१५।१८ पृ. ४४७

४६. सूत्र. सू. २।१।१३

४७. स्था. सू. १।४।१।६८ पृ. २२४

४८. "चउविहे संसारे पण्णत्ते तंजहा दव्व संसारे, खेत्तसंसारे, कालसंसारे भावसंसारे"
स्थानांग. ४।१।३० पृ. २४१

४९. स्थानांग ४।२।२८५ पृ. २९४

५०. स्थानांग ४।४।६२८ पृ. ४३८

५१. स्थानांग ४।४।३१८

५२. सम. सू. २५।१६६ पृ. ७०-७१

५३. भग. सू. भा. ४।२५।७।२४५ पृ. ५०८

५४. ज्ञाता. सू. १।१२२ पृ. ५९-६०

५५. प्रश्न. सू. २।५।९५ पृ. १४६

५६. औप. सू. ३० पृ. ५०

५७. औप. सू. २३ पृ. २३

५८. उत्तरा. सू. ४।१ पृ. ७५

५९. उत्तरा. सू. ६।२ पृ. १०१

६०. उत्तरा. सू. ६।३ पृ. १०१

६१. उत्तरा. सू. ८।१ पृ. १२५

६२. उत्तरा. सू. ८।१५ पृ. १३०

६३. उत्तरा. सू. ९।१६ पृ. ९४ अमोलऋषिजी म.

६४. उत्तरा. सू. १०।१,२, पृ. १६२

६५. उत्तरा. सू. १०।२१ पृ. १६७

६६. उत्तरा. सू. १०।२७, २८ पृ. १६८, १६९

६७. उत्तरा. सू. १०।३२, ३३ पृ. १७०

६८. उत्तरा. सू. १३।२१ ते २६ पृ. २१६ ते २१७

६९. उत्तरा. सू. १३।३१

७०. उत्तरा. सू. १४।१३ पृ. २२७
७१. उत्तरा. सू. १४।२४-२५ पृ. २२८
७२. उत्तरा. सू. १४।३९ पृ. २३६
७३. उत्तरा. सू. १६।१७ पृ. २६६
७४. उत्तरा. सू. १८।११-१२-१३ पृ. २७८-२७९
७५. उत्तरा. सू. १९।१३-१४ पृ. ३०९
७६. उत्तरा. सू. १९।४० पृ. ३०९
७७. उत्तरा. सू. २०। सार पृ. ३३१
७८. उत्तरा. सू. २३।६८ पृ. ४०१
७९. उत्तरा. सू. अ ३० पृ. ५२६
८०. उत्तराध्ययन सूत्र ३०/२-३ पृ. ५२६
८१. उत्तराध्ययन सूत्र ३०/५-६ पृ. ५२६
८२. उत्तराध्ययन सूत्र २९/५३ पृ. ५१२
८३. उत्तराध्ययन सूत्र १९/१९ ते २२ पृ. ३०९-३१०
८४. उत्तराध्ययन सूत्र ९/५७ पृ. १५६
८५. उत्तराध्ययन सूत्र २३/८५ पृ. ४०६
८६. उत्तराध्ययन सूत्र २२/१९ पृ. ३६९
८७. उत्तराध्ययन सूत्र ३०/९१ पृ. ५९२
८८. उत्तराध्ययन सूत्र ३६/२६३ पृ. ६८४
८९. उत्तराध्ययन सूत्र ३६/२६४ पृ. ६८४
९०. उत्तराध्ययन सूत्र ३६/२६५ पृ. ६८४
९१. दशवै. सू. ५।२।४६ पृ. २२३
९२. उत्तरा. सू. ३६।२६६ पृ. ६८५
९३. उत्तरा. सू. १७।१२ पृ. २७०
९४. उत्तरा. सू. ३६।२६७ पृ. ६८५

९५. धम्मो मंगल मुक्किट्ठं अहिंसा संजमो तवो। देवावितं नमंसन्ति जस्स धम्मे सया मणो॥ दशवै. सू. १।१ पृ. ८

९६. अमोहं वयणं कुज्जा, आयरियस्स महप्पणो। तं परिगिज्झ वायाए कम्मुणा उववायाए॥ दशवै. सू. ८।३३ पृ. ३११

९७. अधुवं जिविअं नच्चा, सिद्धि मग्गं विआणिया। विणियट्टिज्जभोगेसु, आउं परिमियमप्पणो। दशवै. ८।३४ पृ. ११

९८. जरा जाव न पीलेई, वाही जाव न वड्ढई ।
जाविंदिया न हायंति, ताव धम्मं समायर॥३५ दशवै. ४-३६ पृ. ३११

९९. न देह वासं असुइं असासयं, सया चये निच्चहिय ठियप्पा । छिंदित्तु जाई मरणस्स बंधणं, उवेइ भिक्खू अपुणरागमं गइं॥ दशवै. १०-२१ पृ. ३८५

१००. दशवै. चूर्णि १/।१६

१०१. दशवैकालिक सूत्र ९/४

१०२. आवश्यक सूत्र -अध्ययन १ मंगलसूत्र पृ. ८-९-१०

१०३. आवश्यक सूत्र अध्य. ४ क्षमणासूत्र गा. ४ पृ. ९१

१०४. बृहत्कल्पभाष्य गा. १३२८ ते १३३२ पृ. ४०७

१०५. बृहत्कल्पभाष्य गा. १३३३ ते १३३९ पृ. ४०८

१०६. बृहत्कल्पभाष्य गा. १३४५ ते १३५२ पृ. ४१०, ४११

१०७. चउसरणं प्रकीर्णक गाथा ११ पृ. १४

१०८. आउरपच्चक्खाण प्रकीर्णक गा. २६ पृ. २०

१०९. महापच्चक्खाण प्रकीर्णक गा. १३ ते १६ पृ. २४, २५

११०. तंदुलवैचारीक प्रकीर्णक सू. १०२ ते १४२ पृ. ५० ते ५४

* * *

प्रकरण चवथे

भावना विषयक साहित्यकारांचा परिचय आणि अकल्याणकारी अशुभ भावना

१) भावनेचे प्रतिपादन करणाऱ्या आगमोत्तर काळच्या काही साहित्यकारांचा परिचय

जैन आचार्य, संत आणि विद्वानांद्वारे प्राकृत आणि संस्कृतमध्ये जेथे जेथे भावनेच्या रचना किंवा साहित्य प्राप्त झाले आहे त्याचे विश्लेषणात्मक आणि तुलनात्मक रूपात ह्या शोधग्रंथात प्रस्तुतीकरण करण्याची भावना आहे. त्याचबरोबर जैन धर्मात जैन कवी, लेखक आणि उपदेशकांची सुद्धा नेहमी ही भावना असते की, लोकभाषेत सुद्धा धार्मिक साहित्याची रचना करावी, ज्यामुळे ती रचना सामान्य जनतेला सुद्धा सहजपणे आकलन होईल आणि जनता ते आत्मसात करेल. प्राकृत आणि संस्कृत तर सामान्य लोकांना समजत नाही. भगवान महावीरांच्या काळात तर प्राकृतचे स्थान अपभ्रंशाने घेतले आणि नंतर उत्तरवर्ती काळात अपभ्रंशापासून आधुनिक आर्यभाषेचा विकास झाला. ज्याच्यात हिंदी, गुजराती, राजस्थानी, मराठी इत्यादी अनेक भाषेच्या क्षेत्रात जैन धर्माचा विशेषरूपाने प्रसार झाला, म्हणून त्या त्या भाषेच्या कवी आणि लेखकांनी आपल्या आपल्या भाषेत साहित्य रचना केली. त्यातही अनेक लेखकांनी बारा भावनांवर विशेषतः पद्यात्मक शैलीत रचना केल्या. त्यामुळे भावनांचे धार्मिक साधनेमध्ये नेहमी महत्त्व राहिले आहे. हेच ह्या रचनेने सिद्ध होते.

१९ व्या शतकाच्या शेवटपर्यंत प्राकृत संस्कृत, हिंदी, गुजराती, राजस्थानी आणि मराठी मधील रचनेचे पद्यमय आणि गद्यमय पुस्तके प्राप्त होतात. वर्तमान शताब्दीच्यासुद्धा अनेक रचना आहेत. प्रथम त्या लेखकांचा परिचय संक्षिप्त रूपात ह्या प्रकरणात दिला जात आहे. तद्नंतर संक्लिष्ट अर्थात अशुभ, भावनेचे वर्णन केले आहे कारण अशुभच्या हेयतेला समजून त्याचा त्याग केला तरच शुभ अथवा शुद्धतेपर्यंत जाण्याचा मार्ग प्रशस्त होईल.

२) अवधूत योगींचे जीवनदर्शन

पूर्वाचार्यांच्या, संतांच्या जीवनदर्शनाविषयी सामग्री उपलब्ध होत नाही कारण अध्यात्मयोगी महापुरुषांचे अधिकांश जीवन अध्यात्माच्या उपलब्धितच व्यतीत होत होते. त्यांना आपल्या प्रसिद्धीची कोणत्याही प्रकारे इच्छा नव्हती किंवा त्या संदर्भात त्यांची कोणतीच प्रवृत्ती नव्हती. ख्याती, प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा यांच्या व्यामोहातून मुक्त असणाऱ्या ह्या योगी महापुरुषांना एकमात्र अध्यात्माचेच चिंतन असायचे, जगाच्या मानापमानापासून ते सर्वथा अलिप्त राहत होते. लोकेषणेचा अजगर, जो आज बहुतांश लोकांना गिळंकृत करीत आहे त्याच्यापासून ते खूप दूर राहत होते. त्यांच्या रचनेमध्येही विशिष्ट घटनेचा किंवा नावाचा उल्लेख प्राप्त होत नाही की ज्यामुळे त्यांच्या जीवनाची थोडी फार माहिती आपणास प्राप्त होऊ शकेल. तरीसुद्धा कोणत्या तरी म्हणीच्या अथवा अन्य सामग्रीच्या आधारे आपण त्यांच्या बाह्य-आंतरिक व्यक्तिमत्त्वाचे थोडेफार दर्शन करू शकतो.

अधिकांश संतांचे जीवन सखोलपणे पाहिले तर ते मोठे अवधूत योगी दिसून येतात. अवधूत योगी अशा लोकांना म्हणतात ज्यांना आत्म्याशिवाय अन्य कोणत्याच बाह्यवस्तूचे ध्यान राहत नाही. आणि म्हणूनच अशा लोकांचा परिचय प्राप्त करण्यासाठी अनेक लेखकांना दिव्य पुरुषार्थ करावे लागले. तरीही मोठमोठ्या महत्त्वपूर्ण ग्रंथांचे रचनाकार कोण होते, त्यांची रचना केव्हा झाली ह्याविषयी अजूनपर्यंत विशेष माहिती मिळालेली नाही.

शिलालेख पट्टावली आणि टिकाकारांच्या व्याख्येवरून त्यांच्या जीवनाविषयी अंदाज केला आहे. ह्यामुळेच यांचा काळ 'हा मानला जात आहे' किंवा 'मानला आहे' अशी विधाने करावी लागतात.

भावनेसंबंधी ज्या ज्या आचार्यांनी, संतांनी, विद्वानांनी थोडक्यात किंवा विस्तृतपणे गद्यमय, पद्यमय आणि गद्यपद्यात्मक शैलीत ज्या रचना केल्या आहेत त्यातील काही ग्रंथकारांचा, लेखकांचा आणि कवींचा इथे थोडक्यात परिचय दिला जात आहे.

आचार्य कुंदकुंद - हे दिंगबर संप्रदायाचे सर्वाधिक सन्मानित आचार्य होते. इसवी सनाचे पहिले आणि विक्रमसंवत्सराचे तिसरे शतक असा यांचा काळ मानला जातो. ह्याचे नाव प्रथम 'पद्मनंदी' होते. परंतु 'कोंडाकुंदपुरात' राहणारे असल्याने पुढे ते 'कोंडकुंदाचार्य' या नावाने प्रसिद्ध झाले. त्याचेच श्रुतिमधुर नाव 'कुंदकुंदाचार्य' असे झाले.

ह्यांचे 'समयसार', 'प्रवचनसार' आणि 'पंचस्तिकाय' हे तीन ग्रंथ अत्यंत प्रसिद्ध आहेत. यांनी प्राभृतांची सुद्धा रचना केली. परंतु त्यातील केवळ आठ प्राभृतेच आज उपलब्ध आहेत.

त्यातील 'भाव प्राभृत' आणि 'चारित्रप्राभृतामध्ये भावनेचे सुंदर वर्णन झालेले आहे. बारा भावनांविषयी ''बारसाणुवेक्खा'' नामक स्वतंत्र ग्रंथाची रचना, ही त्यांची एक महत्त्वपूर्ण कृती आहे. त्यात 'एक्कयाणव' गाथा आहेत.

कुंदकुंदाचार्यांची पूजनीयता आणि गौरवपूर्ण स्थानाचे माहात्म्य खालील मंगलमय श्लोकातून सिद्ध होते.

मंगलं भगवान वीरो, मंगलं गौतम गणी
मंगलं कुंदकुंदार्यो जैन धर्मोऽस्तु मंगलं ॥

ह्या श्लोकानुसार गणधर गौतमस्वामींनंतर कुंदकुंदाचार्यांचे स्थान मानले आहे. ह्यांची कुंदकुंद, वक्रग्रीव, एलाचार्य, गृद्धपृच्छ आणि पद्मनंदी अशी पाच नावे होती. असे सांगितले जाते की हे महाविदेह क्षेत्रात सीमंधरस्वामींच्या समवसरणामध्ये सुद्धा गेले होते. ह्यांच्या साहित्यातून साधकाला आत्मबोधाची प्रेरणा मिळते.

आचार्य उमास्वाती - महान श्रुतधर, जैन शासनाचे पवित्र स्तंभ, विद्वानशिरोमणी 'आचार्य उमास्वाती' यांचा काळ विक्रम संवत्सर प्रथम शताब्दी ते तिसरी शताब्दी यांच्या दरम्यान मानला जातो. यांनी सर्वप्रथम जैन वाङ्मयाला संस्कृत सूत्रामध्ये निबद्ध करून सूत्रात्मक शैलीमध्ये 'तत्त्वार्थसूत्र' याची रचना केली. जैन साहित्यात ह्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. ह्यात जैनधर्माच्या मौलिक सिद्धांतांचे थोडक्यात निरूपण केलेले आहे.

अन्य धर्मांमध्ये गीता, कुराण आणि बायबल यांचे जे स्थान आहे तेच स्थान जैन धर्मात तत्त्वार्थसूत्राचे आहे. आचार्य उमास्वाती यांच्या 'तत्त्वार्थसूत्राची' ही विशेषता आहे की दिगंबर आणि श्वेतांबर हे दोन्ही पंथ ह्याचा सारखाच आदर करतात. दोन्ही परंपरेच्या आचार्यांनी ह्यावर टीका रचल्या आहेत. त्यात आचार्य पूज्यपाद यांची 'सर्वार्थसिद्धी' अकलंकदेव यांचे 'तत्त्वार्थराजवार्तिक' आणि विद्यानंदींचे 'तत्त्वार्थश्लोक वार्तिक' उल्लेखनीय आहे. स्वतः उमास्वाती यांनी 'तत्त्वार्थभाष्य' लिहिले आहे. ज्याचा उद्देश सूत्रात वर्णित सिद्धांतांचे स्पष्टीकरण करण्याचा आहे. स्वतः ग्रंथकाराने केलेल्या व्याख्येची एक वेगळीच विशेषता असते कारण त्या तत्त्वांचा त्यांना साक्षात परिचय असतो.

जैन शास्त्राचार्य, सुप्रसिद्ध विद्वान मुनी 'पूज्य घासीलालजी महाराज' यांनी बत्तीस आगमांवर संस्कृत, हिंदी आणि गुजराती टीका लिहिल्या. यांनी तत्त्वार्थसूत्रावर सुद्धा टीका रचली आहे. ह्या ग्रंथाचे सर्व धर्मावलंबी पठन करतात. आजही ह्यावर अनेक संत, विद्वान, विवेचनात्मक पुस्तके लिहित आहेत. ह्यावरूनच ह्या ग्रंथाची महानता सिद्ध होते. ह्यात तत्त्वज्ञान, आचार, भूगोल, खगोल, आत्मविद्या पदार्थविज्ञान, कर्मशास्त्र इ. अनेक विषयांचे सुंदरपणे निरूपण केलेले आहे.

ह्यात संवर तत्त्वाच्या अंतर्गत बारा अनुप्रेक्षांचा उल्लेख झाला आहे. आणि पाच महाव्रताच्या पंचवीस भावना, मैत्री इत्यादी चार योगभावनांचा सुद्धा उल्लेख झाला आहे. तत्त्वार्थसूत्रामध्ये बारा भावनांचे विस्तृत विवेचन न करण्याचे कारण हेच असावे की आचार्य उमास्वातींद्वारे रचलेल्या 'प्रशमरति' प्रकरणामध्ये ह्या भावनेचे विस्तृतपणे विवेचन केलेले आहे. आणि ते अत्यंत प्रभावी आहे.

आचार्य वट्टकेर - 'मूलाचार' नामक ग्रंथाच्या रचनाकालासंबंधी श्री कैलाशचंद्रशास्त्री यांसारख्या प्रौढ शास्त्रज्ञ विद्वानांचे असे म्हणणे आहे की हा ग्रंथ कुंदकुंदकालीन (८ इ. पू. ४४ ई.) अर्थात इसवीसनाच्या प्रारंभीच्या काळात रचलेला आहे.

ह्या ग्रंथाच्या कर्त्याविषयी वाद आहे. कोणी या ग्रंथाला कुंदकुंदाचार्य रचित मानतात, तर कोणी 'वट्टकेराचार्य' रचित मानतात. परंतु पंडित नाथुराम प्रेमी मुख्तारच्या मतानुसार 'वट्टकेर' नामक कन्नडींग दिगंबर आचार्य हे ह्या ग्रंथाचे रचनाकार आहेत.

मूलाचाराच्या १२४३ या गाथेमध्ये गणधर रचित प्रथम अंगसूत्र आचारांगाचा, अल्पज्ञ शिष्यांसाठी सरळ भाषेत बारा अधिकारामध्ये उपसंहार केला आहे. ह्यात मूळगुण, बृहत्प्रत्याख्यान, संक्षिप्त प्रत्याख्यान, समयाचार, पंचाचार, पिंडशुद्धी षडावश्यक, द्वादशानुप्रेक्षा, अणगार भावना, समयसार, शीलगुणप्रस्तार आणि पर्याप्ती हे अधिकार प्रतिपादिले आहेत.

मूलाचारामध्ये अनित्यादी बारा भावना आणि मैत्री इत्यादी चार भावना यांच्या अतिरिक्त अशुभ भावनेचे सुद्धा वर्णन झाले आहे.

आचार्य श्रीशिवार्य - 'मूलाचार' आणि शिवार्यद्वारां विरचित 'भगवती आराधनेचा' रचनाकाळ जवळ जवळ सारखाच असावा असे मानले जाते. अर्थात शिवार्य, वट्टकेर आणि कुंदकुंदाचार्यांचा काळ इसवीसनाच्या प्रारंभीचा काळ असावा असे मानले जाते.

भगवती आराधनेमध्ये सम्यग्दर्शन, ज्ञान, चारित्र, तप ह्या चार गोष्टींच्या आराधनेचे विस्तृत विवेचन आहे. ह्या ग्रंथावर जितक्या टीका लिहिल्या गेल्या आहेत तितक्या क्वचितच कोणत्या दुसऱ्या ग्रंथावर लिहिल्या गेल्या असतील. ह्यावरून ह्या ग्रंथाचे महत्त्व कळते.

ह्यात कंदर्प इत्यादी पाच संक्लिष्ट भावना, तप इत्यादी पाच जिनकल्पी भावना, मैत्री इत्यादी चार योगभावना, अनित्यादी बारा वैराग्य भावना, पाच महाव्रताच्या पंचीवस भावना अशाप्रकारे जवळ जवळ सर्व मुख्य भावनेचे प्रतिपादन झालेले आहे. भगवती आराधनेवर अपराजित सूरी त्यांनी संस्कृतमध्ये टीका लिहिली आहे.

आचार्य समंतभद्र - हे विक्रम संवत्सराच्या तिसऱ्या शतकात होऊन गेले. जैन संस्कृतीच्या प्रभावी आचार्यांमध्ये समंतभद्र यांचे स्थान अत्युच्च आहे. ह्यांचे 'रत्नकरंड श्रावकाचार' नामक ग्रंथ अत्यंत प्रसिद्ध आहे.

त्यातील भावना अधिकारामध्ये द्वादश भावनांचे अत्यंत साध्या, सोप्या भाषेत वर्णन आहे आणि षोडशकारण भावनेचे सुद्धा वर्णन आहे. ह्यांनी आप्तमीमांसा, युक्त्यानुशासन स्वयंभूस्तोत्र, जिनस्तुतीशतक, जीवसिद्धी इत्यादींचीही रचना केली आहे.

आचार्य पूज्यापाद - हे इसवीसनाच्या पाचव्या, सहाव्या शतकात होऊन गेले. ह्यांचे नाव प्रथम 'देवनंदी' होते. देवांकडून त्यांच्या चरणाची पूजा झाली म्हणून त्यांचे नाव देवनंदी पडले अशी अनुश्रुती आहे. ह्यांचे सर्वार्थसिद्धी, समाधीतंत्र (समाधी शतक) इष्टोपदेश, सिद्धभुक्ती इत्यादी ग्रंथ आणि जैनेंद्र व्याकरण जैन जगामध्ये अत्यंत प्रसिद्ध आहे.

'सर्वार्थसिद्धी' मध्ये बारा भावनांचे आणि 'समाधीशतक' यामध्ये शुद्धात्मभावाचे वर्णन अत्यंत हृदयस्पर्शी झाले आहे.

समाधीशतकामध्ये भेदज्ञानाची भावनाविस्तृतपणे आहे आणि 'आत्म्याला समाधी सुख मिळावे' असा उपदेश दिला आहे.

अकलंकदेव - ह्यांचा काळ ई. ६२० ते ६८० मानला जातो. ते जैन न्यायाचे प्रतिष्ठाता होते. ह्यांचे अष्टशती, प्रमाणसंग्रह, न्यायनिश्चय, लघीयस्त्रय, सिद्धीविनश्चय आणि तत्त्वार्थ राजवार्तिक नामक ग्रंथ अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. जैन प्रमाणशास्त्राचे प्राचीन मर्यादिच्या अनुकूल प्रतिपादन करण्याचे श्रेय श्री अकलंकदेव यांना आहे.

योगेंदुदेव - ह्यांचा 'परमात्मप्रकाश' नामक ग्रंथ प्रसिद्ध आहे. याचे दोन अधिकार आहेत.

३५३ दोहे अपभ्रंश भाषेत रचलेले आहेत. यांचा काळ सहावा शतक मानला जातो. ह्यामध्ये शुद्धात्मभावनेचा भावपूर्ण उल्लेख झाला आहे. ह्यांच्या योगसार, दोहापाहुड, अमृतशिती, निजात्माष्टक, श्रावकाचार या ग्रंथांवर लक्ष्मीचंद्र यांची टीका आहे.

स्वामी कार्तिकेय - कार्तिकेयानुप्रेक्षा (कत्तिगेयाणुवेक्खा) याचे रचनाकार 'स्वामी कार्तिकेय' अथवा 'स्वामीकुमार' आहेत. प्राकृत आणि जैन विद्येचे सुप्रसिद्ध विद्वान डॉ. ए. एन. उपाध्ये यांद्वारे संपादित कार्तिकेयानुप्रेक्षा यामध्ये उपाध्ये यांनी त्यांच्या काळाची गवेषणा करण्याचा प्रयत्न केला आहे.

आचार्य शुभचंद्रांनी कार्तिकेयानुप्रेक्षेवर संस्कृत टीकेची रचना केली. शुभचंद्रांचा काळ ई. स. १५५६ मानला जातो.

त्यापूर्वी 'ब्रह्मदेव' यांचा काळ मानला जातो. म्हणजे तेरावी शताब्दी असा काळ मानला आहे. त्यांनी आपल्या पुस्तकामध्ये कार्तिकेयानुप्रेक्षाची गाथा उद्धृत केली आहे. यावरून असे सिद्ध होते की स्वामी कार्तिकेय ब्रह्मदेवांच्या पूर्वी होऊन गेले.

त्यानुसार डॉ. उपाध्ये यांनी असे सूचित केले आहे की स्वामी कार्तिकेय यांचा काळ बारावी शताब्दीच्या अगोदरचा असावा. काहीजणांच्या मते स्वामी कार्तिकेय हे कुंदकुंदाचार्यांच्या नंतरचे असावेत.

कार्तिकेयानुप्रेक्षेमध्ये अनित्यादी बारा अनुप्रेक्षा किंवा भावनेचे विस्तृत वर्णन केले आहे. प्रसंगानुसार जीव, जीवन इत्यादी सात तत्त्वांचे सुद्धा स्वरूप वर्णन झाले आहे. अनुप्रेक्षेबरोबर जैन धर्माच्या मूलभूत तत्त्वांचा आणि चिंतनीय विषयांचा सुद्धा ह्यात समावेश झाला आहे.

अमृतचंद्रसूरी - यांनी पुरुषार्थसिद्ध्युपाय नावाच्या स्वतंत्र ग्रंथाची रचना केली. जो 'चरणकरणानुयोग' याचा सर्वांगिण परिपूर्ण अद्भूत ग्रंथ आहे. यांनी आचार्य कुंदकुंदांच्या समयसाराचे भाष्य पद्यमय, रसमय शब्दात, अर्थपूर्ण भाषेत केले आहे. प्रवचनसार, पंचास्तिकाय, तत्त्वार्थसार, लघुतत्त्वस्फोट इत्यादी सारगर्भित साहित्याची सरलतापूर्ण टीका रचली आहे.

ह्यांच्या पुरुषार्थ सिद्ध्युपाय यामध्ये अहिंसेचे इतके सुंदर विवेचन झालेले आहे

की तसे विवेचन इतर कोणत्याही ग्रंथात प्राप्त होत नाही. पंडित जुगलकिशोर यांनी ह्यांचा काळ दहावी शताब्दी मानला आहे.

पुरुषार्थसिद्ध्युपायाच्या सातव्या सकलचारित्र्य अधिकारामध्ये बारा भावनांचा नामोल्लेख झाला आहे. ज्याची पूज्य क्षुल्लक धर्मानंद यांनी विस्तृत व्याख्या केली आहे.

जिनभद्रगणि - श्वेतांबर संप्रदायामध्ये जिनभद्रगणि क्षमाश्रमण नावाचे एक आचार्य झाले. यांनी 'विशेषावश्यक' नामक एका उच्चकोटीच्या ग्रंथाची रचना केली. यांचा काळ प्रथम सहस्राब्दीचा अंतिम भाग मानला जातो. ह्यामध्ये तत्त्वांचे व्यवस्थित आणि युक्तियुक्त विवेचन आहे. तीर्थंकरगोत्रबंधाच्या कारणाचा सुद्धा ह्यात उल्लेख झाला आहे. ह्यांनी 'ध्यानशतकाची' रचना केली. त्यात एके ठिकाणी असा उल्लेख आहे की, 'जेव्हा ध्यान उपरत होते तेव्हा मुनीने सतत अनित्यादी भावनेमध्ये विचरण करावे. त्यातच ज्ञान, दर्शन, चारित्र्य आणि वैराग्य भावनांचे सुद्धा वर्णन आहे.

हरिभद्रसूरी - हे एक प्रख्यात विद्वान आचार्य होऊन गेले. असे म्हटले जाते की यांनी १४०० प्रकरण ग्रंथांची रचना केली. यांचा काळ ७०० ते ७५० मानला जातो. हे आध्यात्मिक योगी होते. यांनी जैन धर्माची जी प्रभावना केली ती वास्तविक इतिहासामध्ये गौरवास्पद आहे.

'जैन योग' अथवा 'अध्यात्मयोग' यावर यांनी 'योगदृष्टी समुच्चय' आणि 'योगबिंदु' नावाचे दोन ग्रंथ संस्कृतमध्ये आणि 'योगशतक' आणि 'योगविंशिका' नावाची दोन पुस्तके प्राकृतमध्ये लिहिली.

टीकाकारांमध्ये ह्यांचे विशिष्ट महत्त्वाचे स्थान आहे. यांच्या 'समराइच्च कहा' यामध्ये सदाचारी नायक आणि दुराचारी प्रतिनायक यांच्या जीवनसंघर्षाची कथा लिहिलेली आहे. नायक शुभ परिणतीला शुद्ध परिणतिच्या रूपात परिवर्तित करून शाश्वत सुख प्राप्त करतो आणि प्रतिनायक हा अनंत संसाराचा पात्र बनतो. अशाप्रकारे शुभाशुभ भावाचे ह्यामध्ये वर्णन प्राप्त होते.

जिनसेनाचार्य - यांचा काळ ई. स. ८०० मानला जातो. हे मोठे कवी होते. महापुराणामध्ये ह्यांनी त्रेसष्ट शलाका पुरुषांच्या चरित्राचे लेखनकार्य सुरू केले. परंतु तेव्हाच त्यांचा स्वर्गवास झाला म्हणून त्या ग्रंथाला त्यांचे शिष्य गुणभद्राचार्यांनी पूर्ण केले. यामध्ये पाच महाव्रताच्या पंचवीस भावनांचे आणि अनित्यादी बारा भावनांचा उल्लेख झाला आहे.

आचार्य नेमिचंद्र सिद्धांत चक्रवर्ती - यांचा काळ सन १११८ ते ११५३

तत्त्वज्ञ मानला जातो. दिगंबर परंपरेचे सर्वमान्य षट्खंडागमाच्या आधारावर यांनी गोमटसाराची रचना केली आहे. कर्नाटकाचे शासक राजमल्लदेव आणि त्यांचे मंत्री 'श्री चामुण्डराय' द्वारा हे विशेषरूपाने सन्मानित होते.

चामुण्डरायांचे नाव दक्षिण भारतामध्ये अत्यंत प्रसिद्ध होते. त्यांनी श्रवणबेगोलामध्ये ५६ फूट उंच, विशाल प्रतिमा निर्माण केली. आचार्य नेमिचंद्र यांचे गुरू होते. श्री नेमिचंद्र यांनी प्राकृत 'बृहदद्रव्य' या संग्रहाची रचना केली. त्यात द्रव्याचे आणि सात तत्त्वांचे अथवा नऊ पदार्थांचे विशद विवेचन आहे. त्यावर 'ब्रह्मदेव' यांची संस्कृत वृत्ती आहे.

द्रव्यसंग्रहाच्या संवर तत्त्वामध्ये 'व्रतसमिती' आणि 'गुप्ती' याबरोबर आचार्य नेमिचंद्र यांन धर्मानुप्रेक्षेची चर्चा केली आहे. टीकाकारांनी ह्या शब्दाचे विवेचन करताना बारा भावनेचे वर्णन केले आहे.

पुट्टचा स्वामी - हे बृहद्द्रव्य संग्रहाचे दुसरे टीकाकार आहेत. हे तमिलदेशाचे निवासी मोठे विद्वान होते. ह्यांच्या टीकेचे नाव 'भावनासार' आहे. ती 'श्लोकबद्ध' आहे. आचार्य देशभूषण यांनी ह्याचे हिंदीमध्ये भाषांतर केले आहे. ह्यांच्यामध्ये बारा भावनांचे सुंदर शब्दावलीमध्ये वर्णन केले आहे.

आचार्य देवसेन - यांनी भावसार, आराधनासार, दर्शनसार आणि तत्त्वसार इत्यादी आध्यात्मिक विषयावर अनेक ग्रंथांची रचना केली आहे. त्यात 'तत्त्वसार' अत्यंत प्रसिद्ध आहे. परंतु दर्शनसाराच्या शेवटी यांनी ह्या ग्रंथाची रचना वि. सं. ९९० माघ शुक्ल दशमी असे लिहिले आहे. ह्यावरून हे स्पष्ट होते की यांचा काळ दहाव्या शताब्दीचा उत्तरार्ध असावा. तत्त्वसारामध्ये त्यांनी शुद्धोपयोगमूलक भावनेचे किंवा अनुचिंतनाचे वर्णन केले आहे.

आचार्य हेमचंद्र - हे विक्रम संवत्सराच्या बाराव्या शताब्दीचे एक प्रख्यात आचार्य होऊन गेले. जैनागमाचे हे प्रकांड पंडित होते. तसेच व्याकरण, साहित्य, छंद, अलंकार, काव्य, न्याय, दर्शन, योग इत्यादी सगळ्या विषयांवरही यांचा विशिष्ट अधिकार होता. आणि उपरोक्त सर्व विषयांवर त्यांनी महत्त्वपूर्ण ग्रंथाची रचना केली. त्यांच्या विशाल, ज्ञानामुळे त्यांना 'कलिकाल सर्वज्ञ' या नावाने संबोधिले जात होते.

गुजरातच्या 'काठियावाड'मध्ये प्रारंभीच्या शताब्दीतसुद्धा जैनधर्माचा प्रचार होता. मध्ययुगात शिवोपासक सिद्धराज जयसिंह हे महान जैनाचार्य हेमचंद्र यांना विशिष्ट

विद्वानांच्या रूपात श्रद्धापूर्वक मानत होते. अहिंसावादी, धर्मरक्षक राजा कुमारपाल सुद्धा हेमचंद्राच्या उपदेशाने प्रभावित होऊन जैन धर्माचा अनुयायी झाला आणि त्यांने गुजरातला एक आदर्श जैन राज्य बनविण्याचा प्रयत्न केला. हेमचंद्रांच्या शरीराची कांती 'हेम-सुवर्णा'प्रमाणे होती म्हणून ते हेमचंद्र नावाने प्रसिद्ध झाले. यांनी 'योगशास्त्र' नावाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यामधील पातंजलयोगसूत्रात निर्दिष्ट अष्टांगायोगाच्या क्रमाने गृहस्थ जीवन आणि साधुजीवनाच्या आचार साधनेचे जैनागमाच्या अनुसार वर्णन केले आहे.

ह्याच्या प्रथम प्रकाशामध्ये पाच महाव्रताच्या पंचवीस भावनांचे आणि चतुर्थ प्रकाशामध्ये अनित्यादी बारा भावनांचे तसेच मैत्री इत्यादी चार भावनांचे वर्णन केले आहे.

आचार्य सोमदेव - हे एक फार मोठे महाकवी होते. यांनी नीतिवाक्यामृत यशस्तिलक चंपू, इत्यादी ग्रंथाची रचना संस्कृतमध्ये केली. यशस्तिलक चंपूमध्ये बारा भावनांचे वर्णन अत्यंत सुंदर काव्यात्मक शैलीमध्ये केले आहे. ह्या चंपू काव्याची रचना चैत्रशुक्ला १३ वि. सं. १९१८ मध्ये गंगाधारा नगरी येथे पूर्ण झाली. ह्याच्यावर श्रुतसागरसूरींची टीका आहे.

जिनचंद्र - यांनी अभयदेव यांच्या अभ्यर्थनेने 'संवेग रंगशाला' ग्रंथाची रचना वि. सं. ११२५ मध्ये केली. ह्यामध्ये प्रसंगानुसार बारा भावनांचे वर्णन केले आहे. ते संवेग भावनेच्या अंतर्गत आहे.

आचार्य शुभचंद्र - भर्तृहरी, भोज, मुंज आणि शुभचंद्र हे समकालीन होते. १०२७ ते १०५० या दरम्यान त्यांचा काळ मानला जातो. हे दिगंबर परंपरेचे सन्मानित आचार्य होते. त्यांचा ज्ञानार्णव म्हणजे ज्ञानसागर आहे.

आचार्य शुभचंद्र हे एक मोठे योगी होते. ज्ञानार्णवामध्ये जैनयोगाचे विशद विवेचन आहे. त्या अंतर्गत त्यांनी भावनेला अत्यंत महत्त्व दिले आहे. त्यांनी योगविषयक वर्णन करण्यापूर्वी दुसऱ्या सर्गामध्ये भावनेचे विवेचन केले आहे. ह्यावरून भावनेला त्याकाळी केवढे महत्त्व होते ते समजते.

पंडित आशाधर - ह्यांच्या द्वारे रचलेल्या 'धर्मामृताची' कन्नड लिपीमध्ये लिहिलेली प्रत वि. सं. १४१८ मध्ये प्राप्त झाली. काही विद्वानांच्या मतानुसार यांचा काळ वि. सं. १२३० ते १३०० पर्यंतचा असावा असे मानले जाते. पंडित आशाधर हे त्यांच्या काळातील बहुश्रुत विद्वान होते. न्याय, व्याकरण, साहित्य, कोष, वैधक, धर्मशास्त्र,

अध्यात्म, पुराण इत्यादी विविध विषयांवर त्यांनी ग्रंथांची रचना केली. हे सिद्धांत आणि अध्यात्म दोन्हींमध्ये निष्णात होते.

यांनी प्रमेयरत्नाकर, भरतेश्वराभ्युदय काव्य आणि पंजिका सहित धर्मामृत अशा तीन ग्रंथांची रचना केली. धर्मामृताचे 'अनगार' आणि 'सागर' असे दोन भाग पडतात. वावर त्यांनी स्वतःच टीका आणि पंजिका रचल्या आहेत. तसेच दुसऱ्या ग्रंथावर सुद्धा टीका लिहिलेल्या आहेत.

अनगार धर्मामृताच्या सहाव्या अध्ययनामध्ये बारा भावना आणि सातव्या अध्ययनामध्ये अशुभ आणि शुभ भावनेचा उल्लेख झाला आहे.

अमितगती आचार्य - हे मोठे प्रकांड विद्वान होते. विक्रम संवत्सराच्या अकराव्या शतकात मालवचा 'राजा मुंज' याच्या काळात हे होऊन गेले. यांचे धर्मपरीक्षा, सुभाषितरत्न, योगसार, पंचसंग्रह आणि श्रावकाचार हे ग्रंथ मुद्रित झालेले आहेत. धर्मपरीक्षा ग्रंथ यांनी वि. सं. १०७० मध्ये समाप्त केला होता. ह्यांचे तत्त्वभावना आणि बृहद्सामायिक पाठ, वैराग्य आणि आत्मज्ञानाचे मनोहर नंदनवन आहे. ह्यामध्ये 'आत्मभावना' आणि मैत्री' इत्यादी चार भावनांचे सुंदर वर्णन केले आहे. ते अत्यंत प्रसिद्ध आहे.

महाकवी रइधू - इसवीसनाच्या १४व्या, १५ व्या शताब्दीमध्ये महाकवी रइधू द्वारे प्रणीत अपभ्रंश रचनेच्या प्राचीन अप्रकाशित हस्तलिखिताच्या आधाराने डॉ. राजाराम यांनी संपादन आणि भाषांतर केले.

त्यांच्या 'पासणाहचरिउ' मध्ये कमठ द्वारा जळत्या काष्ठामध्ये युगल सर्प पाहून पार्श्वकुमारांनी दयार्द चित्ताने त्यांच्या कानात मंत्र दिला तो पवित्र मंत्र ऐकून ते सर्प देव झाले आणि तापस सुद्धा मरून देव झाला.

सर्पाला प्राणरहित पाहून पार्श्वकुमार विचार करू लागले की, ''संसारामध्ये जीवांना वाचविणारा कोणीच नाही.

इंद्र, धरणेंद्र इ. सर्वजणच आयुष्य क्षय झाल्यानंतर मृत्यूलाच प्राप्त होतात.'' अशाप्रकारे बारा भावनांचे ह्यामध्ये वर्णन केलेले आहे. त्यांचे धनकुमार चरित्र, जसहरचरित्र वृत्तसार, सम्यक्त्वभावना इत्यादी अनेक ग्रंथ आहेत. ह्यांचा काळ वि. सं. १४८१ ते १५३६ च्या दरम्यान मानला जातो.

उपाध्याय श्री विनयविजय - यांनी 'शांतसुधारस' नामक ग्रंथाची रचना गंधपुर नगरामध्ये वि. सं. १७२३ मध्ये केली. ह्यावेळी जंबुसर जवळ असलेले गांधार हे ठिकाणच

नांपुर' असण्याची शक्यता आहे. त्यावेळी अशाप्रकारच्या काव्यरचनेचे अत्यंत महत्त्व होते. आनंदघनजी यांसारखे योगी सुद्धा जवळजवळ याच काळात झाले.

शांतसुधारसाची रचना सोळा भावनांवर झाली आहे. हे एक अदभूत गेय काव्य आहे. ह्यामध्ये मैत्री इत्यादी चार भावनांचे सुद्धा वर्णन आहे. सोळा भावनेला आत्मशांतीचे अमृत समजून ह्या ग्रंथाचे नाव 'शांतसुधारस' ठेवले आहे.

वैराग्याच्या गोष्टींना सुंदर, मनोहर शब्दांमध्ये संकलित करणे अत्यंत कठीण काम आहे. परंतु उपाध्याय विनयविजयजी यांनी त्यांना विभिन्न रागरागिनीमध्ये प्रस्तुत केले आहे.

आनंदघनजी - १७ व्या, १८ व्या शताब्दीच्या अध्यात्मयोगी संतांमध्ये आनंदघनजी यांचे नाव अत्यंत प्रसिद्ध आहे. ह्यांचा जन्म मारवाडच्या अंतर्गत मेडतामध्ये झाला. लहानपणीच जैन साधूच्या रूपात हे दीक्षित झाले असे मानले जाते. यांनी खरतर गच्छाचे आचार्य जिनराजसूरींद्वारे दिशा ग्रहण केली. यांचे दीक्षा नाव 'लाभानंद' होते. हे स्वतंत्र प्रकृतीचे आध्यात्मिक साधक होते म्हणून यांचे मन सांप्रदायिक सीमेच्या अंतर्गत रमले नाही. यांनी एकांत वनभूमीमध्ये सतत योगसाधना केली. सांसारिक एषणा आणि यशस्विता इत्यादी पासून ते सर्वथा दूर राहिले.

आनंदघनजी यांनी चोवीस तिर्थंकरांच्या स्तुतीच्या अंतर्गत जे पवित्र, निर्मळ अध्यात्मिक भाव प्रकट केले ते वास्तविक साधकासाठी अत्यंत प्रेरणादायी आहेत. ह्यांच्या वाणीमध्ये आध्यात्मिक अमृत रसाचे मिश्रण झाले आहे. 'चोविसी'मध्येही भावनेवर अनेक ठिकाणी उद्‌गार प्रकट केलेले आहेत.

श्रीमद् रायचंद (राजचंद्रजी) - महात्मा गांधी ज्यांच्या व्यक्तित्वाने आणि कृतीने प्रभावित होते, असे 'श्रीमद् राजचंद्र' शतावधानी होते. हे गुजरातच्या ववाणिया गावाचे निवासी होते. ह्यांचे पिता 'रवजीभाई' आणि माता 'देवाबेन' होते. ह्यांचा जन्म कार्तिक शुक्ल त्रयोदशी वि. सं. १८२४ ई. सन १८९७ मध्ये झाला. हे जन्मजात कवी व ज्ञानी होते. त्यांना जातिस्मरण ज्ञान झाले होते असे म्हणतात. यांनी 'हिरे-मोती'चा व्यापार केला. तसेच दिगंबर जैन ग्रंथाचे अध्ययन करून ते प्रकाशित केले. ते राजचंद्र जैन ग्रंथमाला यांद्वारे आजही प्रकाशित होत आहे.

हे महान तपस्वी, त्यागी, अध्यात्मज्ञानी होते. चार महिने हे उद्योगधंदे सोडून जंगलामध्ये एकांतस्थानी आत्मध्यानामध्ये तल्लीन होत होते. हे मोठे कवी होते. त्यांच्या

भावनाबोध' या ग्रंथाचे श्लोक अत्यंत हृदयस्पर्शी आहेत. हे गुजराती भाषेत लिहिलेले आहेत. आयुष्याच्या चौतिसाव्या वर्षी समाधी मरण म्हणजे 'संलेखना व्रता' सहित यांचा मृत्यू झाला.

यांनी 'भावनाबोध' पुस्तकामध्ये दहा भावनांचे दहा चित्र (पाठ) प्रस्तुत केले आहेत. यांनी सहाव्या भावनेचे नाव 'निवृत्तिबोध' दिले आहे ही भावना संसार भावनेसारखीच आहे. दहा चित्र समाप्त झाल्यानंतर बोधिदुर्लभतेचे वर्णन आहे, परंतु धर्मभावन ह्यामध्ये नाही. भावनाबोधाचे अनेक लेखकांनी विवेचन केले आहे. पंडित गुणभद्रजी यांनी ह्याचे गुजरातीमध्ये विवेचन केले आहे. श्रीमद् राजचंद्राद्वारे प्रणीत 'भावनासंग्रह' नावाच्या पुस्तकामध्ये सोळा भावनांचे विस्तारपूर्वक विवेचन केलेले आहे.

श्री जयसोम मुनी - यांनी 'बारह भावनानी सज्झाय' नावाची पद्यबद्ध रचना केली. ही गुजराती भाषेमध्ये आहे. राजस्थानी आणि गुजरातीमध्ये धार्मिक गितीकांना 'ढाळा' म्हणतात. त्यांनी विभिन्न रागामध्ये बारा ढाळामध्ये बारा भावनांची रचना केली आहे. बाराव्या ढाळीच्या शेवटी यांचे प्रगुरू श्री विजयदेवसुरि आणि गुरू श्री विजयसिंगसूरीचा नामोल्लेख केला आहे. तेरावी ढाळ, जी उपसंहारात्मक रूपाने घेतली आहे. त्याच्या शेवटच्या कडव्यामध्ये ह्याची रचना 'जेसलमेर' मध्ये वि. सं. १७०६ आषाढ शुक्ल त्रयोदशीला झाली असा उल्लेख आहे. आचार्य विजयभुवनसूरी यांनी गुजरातीमध्ये याचे विवेचन केले आहे.

पंडित भूधरदासजी - हे महान कवी व पंडित होते. यांचे लेखन सरस, मनोरम आणि अध्यात्मपूर्ण आहे. यांनी वि. सं. १७८१ मध्ये 'जैनशतक काव्य' १०७ श्लोकामध्ये लिहिले आहे.

यांनी १८०१ मध्ये 'पुरुषार्थ सिद्धयुपाय' या ग्रंथावर वचनिका लिहिली आहे. याशिवाय आणखीन काही लहान लहान रचनाही केल्या आहेत.

यांच्या बारा भावनांवरील दोन पद्यमय रचना अत्यंत प्रभावशाली आहेत. त्यातील 'राजा राणा छत्रपती' हे दोहे तर जैन धर्मावलंबी लहान लहान मुलांना कंठस्थ आहेत.

क्षुल्लक मनोहरलाल वर्णी - हे खंडेलवाल जातीचे सांगानेरचे निवासी होते. अत्यंत धार्मिक आणि उदारवृत्तीचे असे हे उदार कवी होते. यांनी हिंदीमध्ये ग्रंथरचना केली आहे. वि. सं. १७०५ मध्ये 'धामपुर' येथे लिहिलेल्या रचनेचे नाव 'धर्मपरीक्षा' आहे. ह्याची 'ज्ञानचिंतामणी' वि. सं. १७२८ मध्ये 'बुरहणपुर' येथे लिहिली गेली आहे.

जखडी गुरुचरित्र, गुणठाणा गीत हे ग्रंथही यांनी लिहिले आहेत.

बारा भावनांवर यांनी बेचाळीस श्लोकांची रचना केली आहे.

पंडित दीपचंदजी - हे आमेर जयपुरचे निवासी, कासलीवाल गोत्रीय, खंडेलवाल होते. ह्यांच्या ज्ञानदर्पण, अनुभव प्रकाश, परमात्मपुराण इत्यादी अनेक रचना आहेत. ह्यांचा साहित्य काळ १७७७ पासून मानला जातो.

बारा भावनांवर निश्चय नयाच्या दृष्टीने एका भावनेवर एका दोह्याची अत्यंत प्रेरक शब्दात रचना केली आहे.

कविवर बुधजनजी - यांचे दुसरे नाव 'बधीचंद' होते. ह्यांचा काळ सं. १८३३ आहे. हे जयपूरचे निवासी 'खंडेलवाल' जातीचे होते. यांच्या सं. १८२४ पासून १८९५ पर्यंतच्या सतरा रचना उपलब्ध आहेत. ह्यांचा 'बुधजनसतसई' नावाचा 'संग्रह ग्रंथ' आहे. यांच्या २६५ भजनांचे पदसंग्रह उपलब्ध आहेत.

बारा भावनांवर यांचे बारा दोहे आहेत.

पंडित दौलतरामजी - यांचा जन्म जयपूरच्या जवळ असलेल्या 'वसवा' गावामध्ये झाला. हे खंडेलवाल जातीचे व कासलिवाल गोत्राचे होते. यांच्या घरासमोर जैन मंदिर असल्याने जैन तत्त्वावर ते नेहमी चर्चा करत होते. पुढे ते 'आग्रा' येथे गेले तेथे बनारसीदास नावाचे मोठे विद्वान होते. त्यांचे अनेक अनुयायी होते. पं. भूधरदास, पं. ऋषभदास इत्यादी. त्यातील ऋषभदास यांच्या उपदेशाने यांची जैनधर्माप्रती आस्था वाढली. त्यानंतर यांनी अनेक रचना केल्या आणि परमात्मप्रकाश इत्यादी अनेक ग्रंथावर हिंदी वचनिका सुद्धा लिहिल्या आहेत.

१८२७ मध्ये ''पुरुषार्थसिद्धयुपाया'वर भाषा टीका लिहिली. ह्याशिवाय त्यांचे १२५ फुटकर पद्य उपलब्ध आहेत. हे 'दौलत संग्रह' या नावाने प्रसिद्ध आहे. यांच्या छ ढाळा नावाच्या पाचव्या ढाळेमध्ये बारा भावना आहेत. याचे कांजीस्वामींनी विवेचन केले आहे. हे 'वीतराग विज्ञान' या नावाने अनेक भागात प्रसिद्ध आहे.

पंडित जयचंद्र छाबडा - हे सुद्धा जयपुर निवासी खंडेलवाल जातींचे होते. सदासुखलाल आणि मुन्नालाल यांचे गुरू होते. हे कवी वृंदावनांचे समकालीन होते. वि. सं. १८६१ मध्ये यांनी सर्वार्थसिद्धी राजवार्तिक आणि श्लोकवार्तिकाच्या आधारावर वचनिका लिहिली. वि. सं. १८६६ मध्ये कार्तिकेयानुप्रेक्षेची वचनिका लिहिली. अमृतचंद्राचार्याच्या

आत्मख्याती टीकेवर असलेली 'आत्मख्याती समयसार वचनिका' आणि कलश याचे भाषांतर आहे. ती वि. सं. १८६४ मध्ये लिहिली.

अनेक ग्रंथांच्या वचनिका सुद्धा लिहिल्या तसेच भाषांतरही केले. यांनी बारा भावनांवर बारा श्लोक लिहिले, जे मुमुक्षुला मोहवून टाकतात.

पंडित भागचंद्र - यांनी 'उपदेश सिद्धांतमाला' याचे वि. सं. १९१२ मध्ये आणि 'नेमिनाथ पुराणांचे' १९०७ मध्ये भाषांतर केले. अशा अन्य अनेक ग्रंथांचे सुद्धा भाषांतर केले. यांच्या अनेक कविता प्रसिद्ध आहेत.

बारा भावनांवर केवळ चार गाथांमध्ये यांनी रचना केली. ही रचना जणूकाही गागरमध्ये सागर भरण्याचेच कार्य आहे.

आचार्य आत्मारामजी - हे श्रमण संघाचे पहिले पट्टधर होते. त्यांनी भावनायोग ग्रंथामध्ये बारा भावना आणि परिशिष्ट रूपात मैत्री इत्यादी चार भावनांचा समावेश केला आहे.

पंडित रत्नचंद्रजी - श्वेतांबर स्थानकवासी परंपरेचे विद्वान, शतावधानी, भारतभूषण श्री रत्नचंद्रजी महाराजांची संस्कृत अध्ययनातील विद्वत्ता त्याकाळच्या आधुनिक विद्वानांमध्ये अत्यंत उच्च कोटिची होती. कच्छच्या 'भोरा' गावामध्ये दीक्षा घेऊन यांनी जैन आगमांचे अध्ययन केले. ह्यांचे अनेक भाषांवर प्रभुत्व होते. यांची लेखन शक्ती आणि विचार शक्ती इतकी प्रबळ होती की त्यांनी आगम अध्ययनाच्या सुविधेसाठी ''जैनागम शब्दकोश'' आणि विद्वानांच्या अध्ययन वृद्धीसाठी ''अर्धमागधी कोश'' लिहिले. ''कर्तव्य कौमुदी'' आणि ''भावना शतक'' यांची उत्कृष्ट रचना आहे.

भावनाशतकामध्ये बारा भावनांचे विस्तृत विवेचन आहे. प्रत्येक भावनेला समजण्यासाठी एकेका अष्टकामध्ये आठ-आठ श्लोकांची रचना केली आणि उपसंहाराच्या रूपात थोड्या श्लोकांची रचना केली. अशाप्रकारे शंभर श्लोक पूर्ण केले. ह्या श्लोकांची रचना संस्कृतमध्ये आहे. ह्या श्लोकांची भाषा आणि त्यातील भावना ही हृदयात स्फूर्ती निर्माण करते. याची अनेक संस्करणे निघालेली आहेत. हे ह्या ग्रंथाच्या लोकप्रियतेचेच द्योतक आहे. यांचे हिंदी पद्यानुवाद श्री मूलचंदजी वत्सल यांनी केले आहे. तसेच ह्याचे गुजराती भाषांतर सुद्धा झाले आहे. ह्याचे महत्त्व जाणून विदेशी लोकांच्या भावनेमुळे 'डॉ. अमृतचंद्र गोपानी' यांनी ह्या भावना शतकाचे इंग्रजीमध्ये भाषांतर केले आहे. याचे संपादन 'डॉ. धर्मशीलाजी महासतीजी' यांनी केले आहे.

भैरुदान जेठमल सेठिया - यांनी चव्वेचाळीस दोह्यांमध्ये बारा भावनांची रचना केली आहे. यांचे 'आत्महितबोध भावना की दोहावली' या नावाने पुस्तक प्रकाशित झाले आहे. त्यात बारा भावनांबरोबर मैत्री इत्यादी चार भावनांचेसुद्धा विवेचन केले आहे.

पन्यास भवितिविजयगणी - यांचा जन्म १९३० मध्ये झाला. यांचे 'वैराग्यभावना' नावाचे पुस्तक वि. सं. १९७२ मध्ये प्रकाशित झाले. ह्यामध्ये ठिकठिकाणी अनित्यादी भावनेचे वर्णन आहे.

बारा भावनांवर यांनी एक 'गहुली' सुद्धा रचना केली आहे. ही गुजरातमधील अत्यंत सुंदर रचना आहे.

हे श्वेतांबर मूर्तिपूजक परंपरेचे महान उपाध्याय होते. भवसागरातील जीवांच्या हितासाठी यांनी वैराग्यभावनेची रचना केली.

मुनी श्री गणेशमलजी - हे श्वेतांबर तेरापंथी संप्रदायाचे विद्वान संत होते. यांचा जन्म गंगाशहरामध्ये सं. १९६६ मध्ये झाला. यांनी दोहा छंदामध्ये अनेक रचना केल्या. हा अपभ्रंशाचा आवडता छंद आहे.

यांनी सोळा भावनांवर 'भावनाबोध' नामक पद्यमय रचना केली आहे. ही रचना पण दोहा छंदामध्येच आहे.

नगीनदास गिरधरलाल सेठ - 'गुजरात' जैन धर्माचे हजारो वर्षांपासून मुख्य केंद्र आहे. सम्राट अशोकाचा नातू (पौत्र) 'महाराजा संप्रती' यांना पश्चिम भारतामध्ये जैन धर्माचा प्रचार, प्रसार करण्याचे श्रेय आहे. ज्याप्रमाणे सम्राट अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रचारासाठी देश विदेशामध्ये प्रचारक पाठवले. त्याचप्रमाणे यांनी सुद्धा जैन धर्माच्या प्रसारासाठी सुयोग्य लोकांना पाठविले. गुजरातमध्ये अनेक संतांच्या प्रेरणेने आणि प्रयत्नांनी जैन धर्माचा प्रसार झाला. त्यांच्याबरोबर मोठमोठ्या विद्वान आणि गृहस्थ लेखकांनी सुद्धा विभिन्न धार्मिक विषयावर आपले लेखनकार्य केले. एकोणिसाव्या शतकाच्या गुजराती लेखकांमध्ये 'नगिनदास सेठ' यांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. यांचा आगम आणि सिद्धांत याचा गाढा अभ्यास होता.

यांनी भावनेवर एक पुस्तक लिहिले आहे. त्यामध्ये प्रत्येक भावनेच्या सुरुवातीला त्या त्या भावनेसंबंधी आगमातील गाथा देऊन विवेचन केले आहे. गाथा आधाररूप असल्या तरी त्याचे विवेचन त्यांच्या स्वतःच्या चिंतनावर आधारीत आहे. भावनेचे सखोल ज्ञान प्राप्त करण्यासाठी हे पुस्तक अत्यंत उपयोगी आहे.

आचार्य आनंदऋषिजी - श्रमणसंघाचे द्वितीय पट्टधर आचार्य सम्राट पूज्य श्री आनंदऋषिजी महाराज' जैन दर्शन आणि आगमाचे गंभीर अध्येता होते.

यांना भावनायोगामध्ये विशेष रूची होती. भावनेच्या विविध पक्षावर त्यांचे नेहमी चिंतन, मनन चालत होते. त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्यांचे प्रेरक प्रवचन 'आनंद प्रवचन' या नावाने अनेक भागांमध्ये विभाजित आहे.

त्यांच्या 'भावनायोग' नामक पुस्तकामध्ये प्रथम अशुभ भावनेचे वर्णन केलेले आहे. कारण अशुभ भावनेला समजल्याशिवाय त्याचा त्याग होऊ शकणार नाही. अशुभ भावना जीवनासाठी विष आहे. म्हणून प्रथम त्याचे ज्ञान प्राप्त करून नंतर शुभ भावनारूपी अमृत मार्गामध्ये प्रवेश केला पाहिजे. या हेतूनेच त्यांनी प्रथम अशुभ भावनेचे विवेचन केले असावे. ह्यामध्ये 'भावना' शब्दाची परिभाषा, स्वरूप, भेद, प्रभेद इत्यादींचे विस्तृत वर्णन आहे. हे मुमुक्षुंसाठी पठनीय आहे. ह्या पुस्तकाचे मराठी भाषांतर सुद्धा झाले आहे.

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्राचे हे महान संत होऊन गेले. यांचा जन्म सन १९०० मध्ये झाला आणि स्वर्गवास सन १९९२ मध्ये झाला.

श्री विजयमुनी शास्त्री - यांनी 'भावनायोगनी साधना' या नावाचे पुस्तक गुजराती भाषेत लिहिले आहे. यांचे विचार तर्कबद्ध आणि क्रांतिकारी होते. यांनी नवयुवकांना अध्यात्म मार्गाकडे आकर्षित करण्यासाठी सन १९७० मध्ये मुंबईत शिबिराचे आयोजन केले. त्यात त्यांनी जे भावनायोगावर उद्‌बोधन केले ते पुस्तक रूपात प्रकाशित झाले आहे.

हे जैन जगाचे महान विद्वान, चिंतक, कवी आणि लेखक होते. श्रीविजयमुनि उपाध्याय श्री अमरमुनी यांचे अंतेवासी होते. उपाध्यायांच्या सान्निध्यामध्ये त्यांनी जैन आणि जैनेतर शास्त्राचे अध्ययन केले आणि अनेक ग्रंथांचे संपादनही केले.

श्री गणेशमुनी शास्त्री - सुप्रसिद्ध कवी, लेखक आणि विचारवंत 'श्री गणेशमुनी शास्त्री' हे राजस्थान केसरी अध्यात्मयोगी उपाध्याय 'पुष्करमुनी' महाराजांचे शिष्य होते.

यांनी 'सरळ भावना बोध' नावाच्या पुस्तकाची रचना केली. त्यात प्रत्येक भावनेवर गितीबद्ध काव्याची जी रचना केलेली आहे ती पाठकांसाठी प्रेरणादायी आहे.

श्री राजेंद्रमुनी शास्त्री - उपाध्याय 'श्री पुष्करमुनी' यांचे प्रशिष्य आणि श्रमणसंघाचे तृतीय पट्टधर आचार्य प्रवर देवेंद्रमुनी महाराजांचे सुशिष्य 'श्री राजेंद्रमुनी शास्त्री'

यांनी सुद्धा 'भावना भव नाशिनी' नावाच्या पुस्तकामध्ये भावना विषयक मार्मिक विवेचन केले आहे. पुस्तकाचे नावच सूक्तीरूप आहे. हे घागरीतील सागराप्रमाणे सारपूर्ण आहे.

डॉ. हुकमचंद भारिल्ल - दिगंबर जैन समाजाचे डॉ. हुकमचंद भारिल्ल यांनी 'बारह भावना : एक अनुशीलन' नावाचे पुस्तक लिहिले. त्यात बारा भावनांचे सरळ आणि बोधगम्य शैलीमध्ये वर्णन केले आहे. प्रत्येक भावनेच्या विवेचनापूर्वी प्रारंभी स्वरचित पद्य दिले आहे.

त्यांचे टोडरमल स्मृतीभवन जयपुरच्या संचालनामध्ये मुख्य स्थान आहे. हे देश विदेशात विभिन्न ठिकाणी प्रवचन करतात आणि जैन धर्माचा प्रचार करतात.

पंडित शोभाचंद्र भारिल्ल - हे राजस्थानच्या 'ब्यावर' मध्ये जैन दिगंबर परंपरेचे होते. परंतु यांनी श्वेतांबर, दिगंबर या दोन्ही संप्रदायाच्या शास्त्राचे गहन अध्ययन केले. यांनी संप्रदाय भेद न ठेवता विभिन्न संप्रदायाच्या साधुसाध्वी यांना शिकविले. युवाचार्य श्री मिश्रीमलजी महाराज यांच्या निर्देशनामध्ये प्रकाशित झालेल्या अनेक आगमांचे भाषांतर आणि संपादन यांनी केले.

भावनायोगाचा विषयामध्ये यांनी ''भावना'' नावाची अत्यंत लघुकाय पद्यबद्ध रचना केली आहे. परंतु 'भाव' आणि 'भाषा' यांच्या दृष्टीने ती अत्यंत प्रभावशाली आहे.

आचार्य तुलसी - हे श्वेतांबर तेरापंथी संप्रदायाचे नववे आचार्य होते. यांनी आपल्या 'मनोनुशासनम्' पुस्तकामध्ये बारा भावनांचे सुंदर वर्णन केले आहे. तसेच मैत्री इत्यादी चार भावना, जिनकल्पी पाच भावनांचा उल्लेख केला आहे.

मानसिक संतुलन ठेवण्यासाठी आणि शांती प्राप्त करण्यासाठी यांनी 'मनोनुशासनम्' या पुस्तकाचे लेखन केले. मनाला केंद्रित करण्यासाठी आणि मानसिक विकास करण्यासाठी भावनेची काय उपयोगिता आहे, ह्यावर सुंदर विवेचन केले आहे.

यांच्या दुसऱ्या अनेक रचना आहेत. त्यामध्ये चरित्र, कथा आणि दर्शनसाहित्य यांचा समावेश होतो.

आचार्य महाप्रज्ञ - हे तेरापंथी संप्रदायाचे दहावे अधिनायक आहेत. जैन दर्शनचे उच्चकोटीचे विद्वान आहेत. जैन योगक्षेत्रामध्ये हे प्रेक्षाध्यानाच्या रूपात एका नवीन पद्धतीचे प्रणेता आहेत. 'श्री सत्यनारायण गोयंका' यांच्याकडून प्रसारित बौद्ध परंपरेच्या 'विपश्यना' नामक ध्यानपद्धतीशी अत्यंत मिळतीजुळती आहे. ''सम्पिक्खेय अप्पग

मप्पाणं'' अर्थात ''आत्म्याद्वारे आत्म्याचे संप्रेक्षण करा हे या पद्धतीचे बोधवाक्य आहे. त्यांनी प्रेक्षाध्यानामध्ये हठयोगाच्या चक्रांनासुद्धा घेतले आहे. आणि जैन दृष्टीने त्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

यांनी भावनेवर 'अमूर्तचिंतन' नावाचे स्वतंत्र पुस्तक लिहिले आहे. याचे गुजराती भाषांतर प्रो. याज्ञिक आणि प्रो. पटेल यांनी केले. यांच्या अन्य पुस्तकामध्येही ठिकठिकाणी भावनेचे वर्णन प्राप्त होते. 'अमूर्तचिंतनाची' हिंदी आवृत्ती सन १९८८ मध्ये प्रकाशित झाली आहे.

आचार्य नानालालजी - श्वेतांबर स्थानकवासी साधुमार्गी जैन संघाचे आचार्य श्री नानालालजी महाराज यांनी 'समीक्षाध्यान पद्धती' च्या रूपात भावनेचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या 'जिण धम्मो' पुस्तकामध्ये बोधिदुर्लभतेच्या कारणांचे विशद विवेचन आहे. त्यातच सम्यक्त्वाला दृढ बनवण्यासाठी सहा भावनांचे शास्त्रानुरूप वर्णन केले आहे.

शांतीमुनी - हे आचार्य नानालालजी महाराजांचे शिष्य आहेत. यांनी बारा भावना-विषयक ''समीक्षण ध्यानः दर्शन आणि साधना'' नामक पुस्तकामध्ये भावनेच्या आधारावर आत्मसमीक्षण आणि ध्यानाचा मार्ग दाखवला आहे. हाच आगमामध्ये वर्णिलेल्या ध्यान विषयाचा निष्कर्ष आहे. ह्यामध्ये बारा भावनांचे समीक्षण बारा प्रकरणामध्ये केले आहे. याचे प्रकाशन सन १९९० मध्ये बिकानेर मध्ये झाले.

विजय जयघोषसूरीश्वरजी - श्वेतांबर मंदिरमार्गी तपागच्छाचे आचार्य 'श्री विजय भुवनभानुसूरीश्वरजी महाराज' हे एक प्रख्यात आचार्य होते. त्यांचे पट्टालंकार सिद्धांत दिवाकर पूज्य आचार्य श्री विजयजयघोषसूरीश्वरजी महाराजांच्या वि. सं. २०४२ च्या कुर्ला-मुंबई चातुर्मासात सारगर्भित प्रवचन झाले. याचे ''भावना नु उद्यान'' नामक पुस्तकामध्ये विवेचन झालेले आहे. ह्यामध्ये सोळा भावनांवर सरळ, सुगम भाषाशैलीमध्ये भावनेच्या अंतर्गत असलेल्या सूक्ष्म चिंतनावर प्रकाश टाकला आहे.

श्री अरुणविजयजी - श्वेतांबर मंदिरामार्गी तपागच्छाचे विद्वान आणि धर्म प्रभावक मुनी 'श्री अरुणविजयजी' यांनी बडोदरामध्ये आयोजित एका साधना शिबिरामध्ये विशेषरूपाने लोकांना उद्‌बोधन दिले. हे 'भावना भव नाशिनी' या पुस्तकरूपाने सन १९८३ मध्ये बडोदरामध्ये प्रकाशित झालेले आहे. ह्यामध्ये सर्वसामान्य ज्ञानी लोकांना क्रियात्मकरूपाने भावनेचा अभ्यास करण्यास विशेषत्वाने सांगितले आहे आणि चित्राद्वारे, प्रयोगाद्वारे भावनेला समजविण्याचा सुंदर प्रयत्न केला आहे.

रसिकलाल शेठ - गुजराती जैन समाजाच्या गृहस्थ लेखकांमध्ये 'रसिकलाल शेठ' हे नाव अत्यंत प्रसिद्ध आहे. व्यावसायिक जीवनामध्ये व्यस्त असूनही धार्मिक अध्ययन चिंतन मननामध्ये ते भाग घेतात. धर्मासंबंधी अनेक लोकोपयोगी विषयावर यांनी अनेक पुस्तके लिहिलेली आहेत.

यांनी 'भावना भव नशिनी' या पुस्तकाचे लेखन केले त्यात अनित्यादी बारा आणि मैत्री इत्यादी चार भावनांचे उदाहरणासहित विश्लेषण केले आहे.

प्रवर्तक उमेशमुनी - श्री उमेशमुनी महाराज स्थानकवासी जैन श्रमण संघाचे उच्चकोटीचे संत आहेत. ते मालव प्रदेशाचे प्रवर्तक आहेत. संस्कृत, प्राकृत इ. उच्च भाषा आणि जैन दर्शनाचे मर्मज्ञ मनिषी आहे, त्यागी वैरागी आणि क्रियानिष्ट साधक आहेत. जैन धर्माच्या प्रसारासाठी भारतातील निरनिराळ्या ठिकाणी पादविहार करतात. हे अनेक पुस्तकाचे लेखक, प्रबुद्ध चिंतक, ओजस्वी वक्ता आणि कवी आहेत.

त्यांनी आपल्या बारा भावनेच्या रचनेमध्ये गहन चिंतन, मनन आणि अनुभूतीपूर्ण विचार व्यक्त केले आहेत.

डॉ. धर्मशीलाजी - श्वेतांबर स्थानकवासी जैन दर्शनाचे विद्वान डॉ. धर्मशीलाजी महासतीजी यांनी श्रमण संघात सर्व प्रथम ''जैन दर्शनातील नवतत्त्वे'' या विषयावर मराठीत विस्तृत ग्रंथ लिहिले आहे. त्या ग्रंथावर इ. स. १९७७ साली पुणे विद्यापीठाद्वारा पीएच. डी. पदवी प्राप्त झाली. ह्या ग्रंथाची सुरवात जीव तत्त्वापासून होते आणि शेवट मोक्षतत्त्वाने होतो. जीव क्रमाने मोक्षापर्यंत कसे पहोचतो याचे सुंदर विश्लेषण मुमुक्षू ह्याचात प्राप्त करू शकतो ह्या नवतत्त्वात सहावा संवरतत्त्व आहे. त्याच्या अंतर्गत बारा भावनांचा समावेश होतो.

पं. रत्नचद्रजी द्वारा लिखित ''भावना शतक''च्या इंग्लिश भाषांतराचे संपादन पण डॉ. धर्मशीलाजी म. नी केले आहे.

डॉ. शीवमुनिजी म. - हे श्वेतांबर स्थानकवासी श्रमण संघाचे चतुर्थ पट्टधर आहेत. यांनी ध्यान साधनेवर सुंदर ग्रंथाची रचना केली आणि ठिकठिकाणी ध्यान शिबिर करून साधकाला शुद्ध आत्मस्वरूपाच्या दिशेने वाटचाल करण्याचा मार्ग दाखवतात. त्यांच्या प्रवचनात आणि पुस्तकात भावनेविषयी विशिष्ट वर्णन प्राप्त होते.

अकल्याणकारी अशुभभावनेचे विवेचन

संसारात कोणत्याही व्यक्तीच्या जीवनात शुभ आणि अशुभ अशा दोन प्रकारच्या विचारधारा दिसून येतात. ज्यांच्यामध्ये पापी प्रवृत्तीचा उदय होतो, ज्यांचे अंतःकरण मोहांधकाराने व्याप्त असते. त्यांचे चिंतन, भाव, कर्म, अशुभकोटींचे असतात. एखाद्या वेळेस चांगल्या वातावरणात शुभात्मक प्रवृत्ती सुद्धा निर्माण होते. परंतु अधिकांशतः अशा व्यक्तीच्या जीवनामध्ये अशुभचे प्राधान्य असते.

साधनापथावर समुद्यत साधकाने सर्वप्रथम अशुभाचा परित्याग करणे आवश्यक आहे. त्यामुळे पापाश्रवाचा अवरोध होतो आणि जीवात्मा शुभात्मक गतीमध्ये प्रवृत्त राहू शकतो.

शुभात्मक प्रवृत्तीमध्ये राहणे वास्तविक साधनेचे परमोत्कृष्ट रूप नाही. परमोत्कर्षाला प्राप्त करण्यासाठी साहाय्य अवश्यक होते. साधनेच्या क्रमिक उत्कर्षासाठी शुभचे स्थान शुद्धत्व ग्रहण करतो. परंतु प्रारंभी साधकाला अशुभाचे परिवर्जन आणि शुभाचे परिग्रहण करणे आवश्यक आहे.

जर आपण सूक्ष्मदृष्टीने पाहिले तर बारा भावनांचा मुख्य अभिप्राय अशुभ त्याग आणि शुभावस्थेला ओलांडून सिद्ध अथवा शुद्धावस्था प्राप्त करणे हा आहे. ह्या मतितार्थाला घेऊनच संवर व निर्जरा भावनेचे वर्णन केलेले आहे.

भावनायोगाच्या आराधनेमध्ये साधकाने अशुभविचार किंवा अशुभ चिंतनापासून दूर राहणे आवश्यक आहे. अशुभ भावनेचा त्याग केल्याशिवाय अनित्य, अशरण भावनेत अविचलता येत नाही, हे लक्षात घेऊनच प्रथम अशुभभावनेचे विवेचन केले आहे. कारण संसारात हेय, ज्ञेय आणि उपादेय असे तीन प्रकारचे पदार्थ असतात. ज्याने आत्म्याचे अकल्याण, अहित होते ते हेय होय. म्हणून हे त्याग करण्यास योग्य आहे. ज्याने आत्म्याचे कल्याण सिद्ध होते ते उपादेय हेय आणि उपादेय हे सर्व पदार्थ ज्ञेय अर्थात जाणण्यायोग्य आहे. कोणत्याही विषयाकडे अथवा पदार्थाकडे जर आपण तटस्थतेने अथवा उपेक्षेने पाहिले तर त्यात काही दोष लागत नाही आसक्ती ठेवल्याने दोष लागतो.

विद्वानांचे असे अभिमत आहे की पाप इत्यादी हेय वस्तूला सुद्धा जाणणे आवश्यक आहे. त्याच्या त्यागाचे भाव आल्यावर अकरणीय, दूषित कार्यापासून आपण आपल्याला अलिप्त ठेवू शकतो. जेव्हा मनुष्य पापी प्रवृत्तीहून वेगळा राहतो तेव्हा त्याच्या वृत्तीमध्ये शुभत्वाचा संचार होतो. ह्याच वैचारिक पक्षाला लक्षात ठेवून प्रथम अशुभ

भावनेचे विशेषरूपाने विवेचन केले आहे. म्हणजे द्वादश भावनेच्या मार्गावर पोहचण्यात सुलभता राहील. शुभभावनेच्या मार्गी जाण्यासाठी अडथळा होणार नाही.

अशुभ भावनेचा आस्रव भावनेतच समावेश होऊ शकतो. पण उत्तराध्ययन, बृहत्कल्पभाष्य, अष्टप्राभृत, भगवती आराधना, मुलाचार इत्यादी ग्रंथामध्ये अशुभ भावनेशी संबंधित अशा प्रवृत्तीचे विशेषत्वाने निरूपण करणे आवश्यक वाटले असेल म्हणून लेखकांनी कान्दर्प इत्यादी अशुभ भावनेचे वर्णन केले आहे. त्या जीवात्म्याला कशाप्रकारे दुर्गतीला नेतात त्याचे इथे थोडक्यात विवेचन केले जाईल.

अष्ट प्राभृतामध्ये आचार्य कुंदकुंदांनी मुमुक्षुजीवाला जागृत करण्यासाठी चतुर्गती भ्रमणाचे कारण अशुद्ध भाव आहे असे सांगून चतुर्गतीच्या दुःखाचे विस्तृत वर्णन केले आहे. त्यात देवलोकाच्या दुःखाचे वर्णन करताना लिहिले आहे की, हे जीवा ! तू कान्दर्पी इत्यादी पाच अशुभ भावनेमुळे नीच देव होऊन स्वर्गात उत्पन्न झाला.[१]

'स्वर्ग' अथवा 'देवलोक' शब्द म्हटले की असे वाटते की तेथे सुख असेल परंतु स्वर्गातही अन्य ऋद्धिसंपन्न देवांच्या महात्म्याला पाहून आत्यंतिक मानसिक दुःख होते.

देवदुर्गती होण्याचे कारण "स्त्री कथा, भोजन कथा, देशकथा, राजकथा इत्यादी विकथेमध्ये आसक्त होऊन त्यातच एकाग्र झाल्याने आणि जातिकुळ इत्यादी आठ प्रकारच्या मदात उन्मत्त होऊन ज्याचे प्रयोजन अशुभ भावना प्रकट करणे आहे अशा भावनेमुळे अनेकवेळा कुदेव व्हावे लागते.[२]

जोपर्यंत भाव विशुद्धी होत नाही तोपर्यंत सिद्धीही प्राप्त होत नाही. बाहुबली श्री ऋषभदेवांचे पुत्र दैहिक परिग्रह सोडून निर्ग्रंथ मुनी झाले. तरी मानकषायाने कलुषित परिणामाने सिद्धी प्राप्त झाली नाही आणि जेव्हा मान कषाय नष्ट झाला तेव्हा लगेचच केवलज्ञान उत्पन्न झाले.

दुसरे उदाहरण द्वैपायनऋषींचे आहे. नववे बलदेव बलभद्र यांनी बाविसावे तीर्थंकर श्री नेमिनाथ प्रभूंना विचारले की द्वारका नगरी समुद्रात आहे हिचे आस्तित्व किती काळ असेल ?

तेव्हा भगवान म्हणाले, "रोहिणीचा भाऊ द्वैपायन, तुझा मामा बारा वर्षानंतर मदिरेच्या निमित्ताने क्रोधित होऊन ह्या नगरीला जाळून टाकेल."

हे ऐकून द्वैपायन दीक्षा घेऊन पूर्व देशात निघून गेले. बारा वर्षे पूर्ण करण्यासाठी

तप सुरू केले. बलभद्र नारायणाने द्वारकेमध्ये मद्य निषेधाची घोषणा केली. मंदिरेचे भांडे आणि त्याची सर्व सामग्री मदिरावाल्यांनी बाहेर फेकून दिली. ती मदिरा व मद्याची सामग्री पाण्यात पसरून गेली.

बारा वर्षे पूर्ण झाल्यावर द्वैपायन द्वारकेच्या बाहेर येऊन योग साधना करू लागले. भगवान नेमिनाथांच्या वचनावर श्रद्धा ठेवली नाही. इकडे शंभवकुमारादी क्रिडा करत असताना तहान लागली म्हणून पाण्याच्या शोधात नगरीच्या बाहेर आले आणि कुंडात पाणी समजून पिऊन टाकले. त्या मदिरेमुळे कुमार उन्मत्त झाले तेथे द्वैपायन मुनी उभे आहेत हे पाहून दारूच्या नशेत, हे द्वारकेला भस्म करणार आहेत अशाप्रकारे बोलून दगडांनी मारू लागले तेव्हा द्वैपायन जमिनीवर पडले. त्यांना भयंकर क्रोध आला. त्यामुळे द्वारका जळून भस्मीभूत झाली. अशुभ भावनेमुळे द्वैपायन मुनींना अनंत अशा संसारात परिभ्रमण करावे लागले.[३]

अशुभ भावनेचे अशुभ परिणाम जाणणे अत्यंत आवश्यक आहे. जरी बाह्य लिंग शुद्ध असले तरी भाव विशुद्धी शिवाय त्याचा काहीच फायदा नाही. बाह्यभाव चांगले आहेत परंतु अंतरंगात पैशुन्य-दुसऱ्यांचे दोष दाखविण्याची सवय, हास्य-दुसऱ्यांची चेष्टा करणे, मत्सर आपल्या बरोबरीचे जे आहेत त्यांची ईर्ष्या करून दुसऱ्याला कमी दाखविण्याची बुद्धी ठेवणे, माय-कुटिल परिणाम हे भाव खूपच दिसून येतात. विशुद्ध भावनेशिवाय बाह्यवेष धारण करणे योग्य नाही.[४]

जो शुद्धस्वरूपाच्या भावनेने रहित आहे तो जैनशासनामध्ये समाधी अर्थात धर्मशुक्लध्यान आणि बोधी म्हणजे सम्यग्ज्ञान, दर्शन चारित्रस्वरूप मोक्षमार्ग प्राप्त करू शकत नाही. ज्यांची भावना शुद्ध आहे तो स्वर्ग-मोक्षाचा पात्र आहे आणि ज्याची भावना मलिन आहे तो तिर्यंच गतीत निवास करतो.[५]

अशाप्रकारे आत्म्याचा क्रमिक विकास भावविशुद्धीवर अवलंबून आहे. म्हणूनच आचार्य कुंदकुंद यांनी भावनेचे तीन प्रकार सांगितले आहेत १) शुभ २) अशुभ ३) शुद्ध.

भावना जेव्हा अशुभ धारेमध्ये वाहू लागते तेव्हा ती मानवी जीवनाला पतनाकडे, दुर्गतीकडे घेऊन जाते. तपस्वी आणि योगीराजाला देखील नरकगतीचा अथवा दुर्गतीचा अतिथी बनविते. म्हणून शास्त्रामध्ये अशुभावनेचे स्वरूप दर्शविले आहे.

सर्वप्रथम अशुभ भावनेला समजून त्याचा परित्याग केला पाहिजे. बाह्य हिंसा

इत्यादी क्रिया न करता सुद्धा अशुद्ध भावनेने तंदुलमत्स्यासारखा जीवही सातव्या नरकात गेला तर अन्य मोठ्या जीवांची काय कथा ?[६]

प्रत्येक जीवाच्या अंतःकरणात शुभ, अशुभ किंवा शुद्ध ह्या तीन भावनांपैकी कोणती ना कोणती तरी भावना सतत चालूच असते. त्यात शोक, चिंता, भय, व्याकुळता यासारखे दुःखद विचारांचे चक्र पुन्हा पुन्हा चिंतन करणे म्हणजे अशुभ भावना आहे.

प्रिय वस्तू प्राप्त करण्याची तालावेली, अप्रिय वस्तूंच्या संयोगाने द्वेष होणे व त्यातून सुटण्यासाठी व्याकूळ होणे.

रोगिष्ट अवस्थेत माझे काय होईल अशाप्रकारे भय व चिंताकरणे ह्या सर्वच अशुभ भावना आहेत.

क्रूर, हिंसक भावना निर्माण होणे आणि आनंदित होणे ह्या सुद्धा अशुभ भावना आहेत.

अभिधानराजेंद्र कोशामध्ये 'भावना' शब्दाच्या परिभाषेनंतर भावनेचे दोन भेद सांगितले आहेत १) प्रशस्त २) अप्रशस्त.

सर्वप्रथम अप्रशस्त भावनेचे नऊ भेद सांगितले आहेत.

पाणिवह - मुसावाए अदत्त मेहुण परिग्गहे चेव ।
कोहे माणे माया लोहे य हवंती अपसत्था ॥[७]

१) हिंसानुबंधी भावना, २) मृषानुबंधी भावना, ३) स्तेयानुबंधी भावना, ४) मैथुन संबंधी भावना, ५) परिग्रह संबंधी भावना, ६) क्रोधानुबंधी भावना, ७) मानानुबंधी भावना, ८) मायानुबंधी भावना, ९) लोभानुबंधी भावना.

वास्तविक हे नऊ भेद अव्रत आणि कषाय यांच्याशी संबंधित आहेत. त्यांचा समावेश आस्रव भावनेमध्ये होतो. परंतु तरीदेखील यांचा विषय तर त्यांच्या नावावरूनच स्पष्ट होतो. तो असा की, जेव्हा हिंसादी भावना उत्पन्न होतात तेव्हा मन आर्त आणि रौद्र ध्यानात एकाग्र होते. मनामध्ये तसेच भाव जागृत होतात. त्या विषयीचे मनात विचार तरंगित होतात. त्याचे थोडक्यात विवेचन आपण ह्या प्रकरणात पाहू.

अशुभ भावनेची ओळख मनुष्याच्या वृत्ती आणि प्रवृत्ती यांद्वारे केली जाते. ज्यांची प्रवृत्ती उपरोक्त नऊ अशुभ भावनानुरूप असते, ज्यांच्यामध्ये मानसिक, वाचिक व कायिक उच्छृंखलता, क्षुद्रता, दुःसाहस, स्वच्छंदचारीता, इंद्रियांची उच्छृंखलता, क्रूरता

असते त्यांच्यामध्ये अशुभ भावना काम करत आहे हे सहज समजू शकते.

प्रत्येक व्यक्तीला स्वतःसाठी शुभ प्रिय आहे. अशुभ अप्रिय आहे. परंतु फार थोडी प्रजा संसारात पुण्यशाली अशी आहे की, ज्यांना नेहमी सुखाचा आणि शुभाचा अनुभव होतो. अशुभाचे अनुकरण लवकर होते. परंतु शुभ भावनेसाठी मात्र पुरुषार्थ करावा लागतो.

जगातल्या पदार्थामध्ये अल्प सुख, बुद्धी अथवा त्या पदार्थाप्रती सुखदुःखाची भावना आणि त्यातून उत्पन्न होणारे कषाय, राग इ. भाव अशुद्ध आहेत.

ज्या जीवाला ज्या ज्या पदार्थांची रुची असते. त्या त्या पदार्थांचेच तो चिंतन करतो. जसे व्यापारी माल आणि ग्राहकाचे, गृहिणी व्यवहार आणि गृहकार्याचे, कुंभार मातीचे अथवा घड्याचे अशा रागादी भावांची उत्पत्ती होणे अथवा तसेच संकल्प विकल्प करणे ह्या सर्व अशुभ भावना आहेत.

हिंसानुबंधी भावना

अशुभभावनेच्या प्रथम नऊ भेदात पहिली भावना हिंसानुबंधी भावना आहे. प्राकृतमध्ये "पाणिवह" अर्थात प्राण्यांचा वध करण्याची भावना हिंसानुबंधी भावना आहे.

भावना म्हणजे चिंतन. ज्याचे चिंतन सतत हिंसक असतात त्याला रौद्र ध्यान म्हणतात. रौद्रध्यानात जीव चोरी, असत्य, परिग्रहसंग्रह आणि सहा प्रकारच्या जीवांची हिंसा होईल अशा कार्यात उद्यमशील राहतो."[८]

सहा प्रकारच्या जीवांची हिंसा म्हणजे १) पृथ्वी, २) पाणी, ३) अग्नी, ४) वायू, ५) वनस्पती, ६) त्रस जीव.

म्हणजे दोन इंद्रियांपासून पंचेन्द्रिय जीवाची हिंसा करणे, त्यांचे छेदन-भेदन करणे, त्यांना बांधणे, त्याचा वध करणे, त्यांची ताडना करणे, त्यांना जाळणे इत्यादी कार्यात प्रयत्न करणे, उद्यम करणे, रौद्रध्यान आहे.

रौद्रध्यान व हिंसानुबंधी भावनेचा अर्थ जवळजवळ सारखाच होतो. रौद्रध्यानात सर्व अशुभ भावनांचा समावेश होतो तेव्हा हिंसानुबंधी भावना तर रौद्रध्यानाचा केवळ एक भेदमात्र आहे.[९]

तसे पाहिले तर असत्य, चोरी, अब्रह्मचर्य, परिग्रह हे सर्व पाप हिंसकच आहेत.

श्री अमृतचंद्राचार्यांनी पुरुषार्थसिध्युपायामध्ये हिंसेचे विस्तृत विवेचन केले आहे.

असत्य वचनात कषायचा सद्भाव आहे. चोरीसुद्धा कषाय असल्यानेच केली जाते. एखाद्या तिळाने भरलेल्या नळीत तापलेल्या लोखंडाची सळी टाकल्याने ज्याप्रमाणे तीळ जळून जातात त्याचप्रमाणे मैथुन क्रियेने जीवांची हिंसा होते. मिथ्यात्व, राग, द्वेष इत्यादि अंतरंग परिग्रह तर हिंसेचे पर्यायवाची आहेतच. म्हणून त्यांच्यात हिंसा स्वयंसिद्ध आहे आणि बाह्य परिग्रहाच्या प्रती मूर्छाभाव आहे तो निश्चितपणे हिंसक आहे.[१०]

ह्यावरून असे स्पष्ट होते की असत्यादी उपरोक्त सर्व पाप हिंसेचे रूप आहे. जोपर्यंत मनुष्य हिंसेच्या स्वरूपाला समजत नाही तोपर्यंत त्याची हेयता कशी समजणार? म्हणून प्रथम हिंसेच्या स्वरूपावर विचार करू. जीव तर अजर, अमर, नित्य आहे. त्याचा वध संभव नाही. मग हिंसा कोणाची होते हे जाणणे आवश्यक आहे.

हिंसेचे स्वरूप

कषाययुक्त योग अर्थात मन, वचन, कायारूपी त्रियोगाने द्रव्य आणि भावरूप दोन प्रकारच्या प्राणांचा घात करणे हिंसा आहे.[११] प्रमत्तयोगात म्हटले आहे -

प्राणव्यपरोपणं हिंसा ।[१२]

प्रमादामुळे होणारा प्राणवध हिंसा आहे.

प्रमादामुळे म्हणजे रागद्वेषामुळे अथवा असावधनतेमुळे होणारा प्राण वध- प्राणवध म्हणजे काय ? हा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. हिंसेचे एक प्रसिद्ध नाव 'प्राणवध' आहे. ज्याला प्राणातिपात सुद्धा म्हणतात. प्राणवध म्हणजे शरीरात असलेल्या दहा प्राणांचे विघटन करणे. ते दहा प्राण आहेत - ''पञ्चेन्द्रियाणित्रिविधं बलञ्च, उच्छवास-निश्श्वासमथान्यदायुः प्राणा दशेते भगवद्भिरुक्ता स्तेषां वियोगी करणं - तु हिंसा ॥''

श्रोत्रेन्द्रिय, चक्षुरेन्द्रिय, घ्राणेन्द्रिय, रसनेन्द्रिय, स्पर्शनेन्द्रिय इ. पाच इन्द्रिये काया, वाचा, मन इ. तीन बळ, श्वास आणि आयुष्यरूपी दहा प्राणांचा जीवापासून वियोग करणे हिंसा आहे. म्हणून हिंसेला प्राणवध सांगितले आहे.

दुसऱ्यांना कष्ट देणे सुद्धा हिंसाच आहे -

''तप्पज्जाय विणासो, दुक्खुप्पातो य संकिलेसोय ।
एस वहा जिण भणिओ वज्जेयत्वो पयत्तेणं''

शरीर पर्यायाचा नाश आणि दुःख व संक्लेश उत्पन्न करणे ह्यालासुद्धा तीर्थंकरांनी 'वध' असे सांगितले आहे. याचा प्रयत्नपूर्वक त्याग केला पाहिजे.

हिंसा करणे, मारणे, प्राणांचा अतिपात करणे म्हणजे त्याग करणे किंवा वियोग करणे, प्राणांचा वध करणे, देहांतर संक्रमण करणे आणि प्राणांचे व्यपरोपण करणे ह्या सर्व शब्दांचा एकच अर्थ होतो.[१३]

येथे 'प्रमत्त योगाने हिंसा होते' हे वाक्य अत्यंत महत्त्वाचे आहे. अप्रमत्त दशेत हिंसेचा दोष लागत नाही. जो साधू इर्यासमितिपूर्वक पाय उचलल्यावर चालण्याच्या ठिकाणी जर एखादा क्षुद्र प्राणी त्याच्या पायाखाली दबून मेला तरी त्या हिंसेने त्याला बंध होत नाही, पाप लागत नाही आणि जीव मरो वा जगो तरी प्रमादयुक्त यत्नाचाराने रहित पुरुषाला निश्चितः हिंसा होते व यत्नाचाराने युक्त प्रवृत्ती करणाऱ्याला हिंसा झाली तरी बंध होत नाही.[१४]

हिंसेचे चार भेद आहेत - १) स्व-भाव प्राण हिंसा, २) स्व-द्रव्यप्राण हिंसा, ३) पर भाव प्राण हिंसा, ४) परद्रव्य प्राण हिंसा.

जेव्हा एखाद्या जीवामध्ये काया, वचन, मन यांच्या योगाने क्रोधादी कषाय उत्पन्न होतात तेव्हा त्या जीवाचा सर्वप्रथम शुद्धोपयोगरूपी शुद्धात्म स्वरूपाचा घात होतो. ह्याला स्व-भाव प्राण हिंसा म्हणतात. यानंतर जर कषायाचे तीव्र स्वरूप झाले व जीव आपल्या हातापायाने स्वतःच्याच अवयवांना कष्ट देऊ लागला किंवा आत्महत्या करून घेतली तर ही स्व-द्रव्य प्राण हिंसा आहे.

कषाय योगाने एखाद्या अन्य जीवाला कुवचन सांगितले किंवा असे काही कार्य केले की ज्यामुळे दुसऱ्याचे अंतरंग पीडित होऊन कषायरूपी परिणाम झाला तर ही पर-भाव प्राण हिंसा आहे. तसेच जर कषायवश दुसऱ्याच्या शरीराला पीडा दिली किंवा त्यांच्या प्राणांचा नाश केला किंवा स्वतःच स्वतःचा आत्मघात करून घेतला तर ही पर द्रव्य प्राण हिंसा आहे.

वास्तविक राग इत्यादी भाव प्रकट होणेच हिंसा आहे. द्वेष, मोह, काम, क्रोध, मान, माया, लोभ, हास्य, शोक, जुगुप्सा (घृणा), प्रमाद इत्यादी रागाचे अनेक भेद आहेत.[१५]

हिंसा तीन कारणांनी होते. १) आरम्भजा, २) विरोधना, ३) संकल्पजा

आरम्भजा हिंसा - कृषी, रक्षण, व्यापार, शिल्प आणि आजीविकेसाठी जी हिंसा केली जाते ती आरम्भजा हिंसा आहे. गृहस्थ आपल्या स्वतःच्या आणि परिवाराच्या भरण-पोषणासाठी आजीविका मिळवितो ती सर्वथा अहिंसक नसते. जेथे कर्म तेथे हिंसा

[illegible] आणि कर्मच आरंभ आहे. तरी गृहस्थाने असे व्यापार करू नये की ज्यामुळे [illegible] खूप जास्त होते. कमी पाप घडेल अशाच व्यापाराने जीवन चालवावे.

विरोधजा हिंसा - आक्रमण करणाऱ्यांवर प्रती आक्रमणाद्वारे बलपूर्वक प्रतिरोध [illegible] विरोधजा हिंसा आहे.

गृहस्थ आपल्या रक्षणासाठी प्रतिआक्रमण करतो परंतु सर्वजण आपल्या मर्यादित [illegible] राहायला शिकले तर आक्रमण, प्रतिआक्रमण करण्याची काहीच गरज राहणार नाही. [illegible]ची प्रवृत्ती सुद्धा युद्धाला जन्म देते. शांती भंग करते.

संकल्पजा हिंसा - ज्या हिंसेचे मूळ कारण राग, द्वेष आणि प्रमाद आहे. [illegible]विवेकचा काहीच प्रश्न नसतो. ती संकल्पना हिंसा आहे. संकल्पजा हिंसेचा त्याग [illegible] व्यक्ती करू शकते. मनुष्य राग, द्वेष आणि आळस यामुळे व्यर्थ हिंसा करतो [illegible] अनावश्यक हिंसेपासून नेहमी दूर राहिले पाहिजे.

दुःख कोणालाच प्रिय नाही. एकेन्द्रियापासून पंचेन्द्रिय जीवापर्यंत कोणत्याही [illegible]ला अथवा संचित पदार्थाला स्वतः अथवा दुसऱ्यांद्वारे प्राणरहित करताना पाहून, तुकडे [illegible] करताना पाहून, लोह शृंखला अथवा बेडीने बांधताना पाहून, कान, नाक, शेपूट, [illegible], हात, पाय, चामडे, नख इ. अंगोपांगांचे छेदनभेदन करताना, कत्तलखान्यात वध [illegible]ताना पाहून, करुणापूर्ण आक्रंदन ऐकून, तडफडताना पाहून आनंद मानणे. "फार चांगले [illegible] याला मारायलाच पाहिजे होते, बंधन घालायलाच पाहिजे, ह्याला फासावर चढविले [illegible], वाचला असता तर गजब केले असते. मेला तर पृथ्वीचा भार कमी झाला इ. बोलणे, विचार करणे, हिंसानुबंधी भावना आहे.

ज्या वस्तूंच्या निर्मितीने, खाण्याने, उपभोगामुळे हिंसा होण्याची शक्यता आहे असे वचन बोलणे, विचारणेही हिंसानुबंधी भावना आहे.

मनुष्याला साधारणपणे सवय असते की हे महल, मंदिर, बंगला, दुकान, कोट [illegible], माती अथवा दगडाची खेळणी, मूर्ती, भांडे, शिल्प इत्यादी किती सुंदर आहे ! [illegible]कार पूर्ण शिल्पशास्त्री असेल. किती मनमोहक वस्तू बनविली आहे ! विहिर, नळ, [illegible]ताव किती सुंदर बनला आहे ! हे पाणी किती मधुर आहे !

किती सुंदर फवारे उडत आहेत ! चुली, भट्टी, इंजन, कारखाना किती [illegible] आहेत ! चित्र, विचित्र विविध रंगांचे फटाकडे किती सुंदर आहेत ! वाजंत्रीचा [illegible]आवाज किती मधुर आहे! ही सर्व भावना हिंसानुबंधी भावना अथवा विचार आहे.

हे वृक्ष कापून ह्यापासून घर, खांब, पाट इ. बनविण्यायोग्य आहे. कंदमुळाच्या औषधी किती पौष्टिक आणि स्वादिष्ट आहे. हे किडे, ढेकूण, मच्छर इ. जीवांना मारले गेले पाहिजे. जलचर मासे, भूचर, गाय इत्यादी वनचर डुक्कर इत्यादी, खेचर पक्षी इत्यादी, शिजवून खाण्यायोग्य आहे ही सर्व हिंसक भावना आहे.[१६]

शत्रूसेनेचा नाश केला पाहिजे. चित्रविचित्र पक्षांना पिंजऱ्यात ठेवले आहे ते किती चांगले केले आहे ! ती तर म्यूझिमची शोभा आहे.

उंदरामुळे रोगांची उत्पत्ती होते म्हणून ते मारण्यायोग्य आहेत. साप, विंचू इत्यादी विषमय जीवांना अवश्य मारलेच पाहिजे. अशा प्रकारचे सर्व विचार आणि असेच अन्य विचार हिंसक आहेत.

अश्वमेध यज्ञात अग्नीमध्ये घोडा होमायला पाहिजे. तर नरमेध यज्ञात मनुष्य हा धर्म आहे, त्याने स्वर्ग मिळतो ह्या सर्व भावना हिंसेला जन्म देणाऱ्या आहेत.

कित्येक हिंसक शास्त्राचे अभ्यासक असे म्हणतात की अमुक जनावरांचे अंगोपांग, मांस, रक्ताचे अमुक पद्धतीने सेवन केले तर अमुक रोगांची शांती होते. कित्येक मनुष्य मनोरंजनासाठी कुत्रे इत्यादी शिकारी प्राण्यांद्वारे निरपराधी पशुपक्ष्यांना पकडवून आनंदाचा अनुभव करतात. कुत्रा, माकड इत्यादी पशूंकडून नृत्य, खेळ, तमाशा करवून आनंदाचा अनुभव करतात.

प्राण्यांमध्ये भांडणे लावून ते बघण्यात आनंद मानतात अशाप्रकारे हिंसक भावनेने अनेक लोकांना आनंद मिळतो.

कित्येक लोकांना जीवांचा संहार करण्यासाठी हिंसक भावनेने बंदुक, धनुष्यबाण, तलवार, कटार, चाकू, सूरी इत्यादींचा संग्रह करण्यात आनंद प्राप्त होतो. ती शस्त्रे पाहून जीवांना मारण्याची भावना ठेवतात. ह्या हिंसक भावना आहेत.

कोणाच्या अकल्याणाची भावना करणे, दुसऱ्याच्या अनिष्टाचे चिंतन करणे, स्वतःपेक्षा जास्त रूपवान, गुणवान, पुण्यवान, प्रतापी आणि सुखी लोकांना पाहून ईर्ष्या करणे, त्यांना दुःखी करण्याचा विचार करणे ही हिंसानुबंधी भावना आहे.

अशाप्रकारे कोणत्याही प्राण्याला दुःख देण्याचा विचार करणे अथवा प्राणीवधापासून उत्पन्न वस्तूची अनुमोदना करणे ही सुद्धा हिंसानुबंधी अशुभ भावना आहे.[१७]

हिंसेचे मूळ कारण मनुष्य आजिविकेसाठी हिंसा करतो. शरीराला सुंदर करण्यासाठी, सजविण्यासाठी व पुष्ट करण्यासाठी हिंसा करतो. कस्तुरी मिळविण्यासाठी कस्तुरीमृगाला मारून टाकतो. सुंदर चामड्यासाठी प्राण्यांना मारतो, अनेक पशूंचा वध करतो. दातासाठी हत्ती मारतो ही सर्व कार्ये हिंसक दिसतात. परंतु त्यामागे मनुष्याचा राग आसक्ती आहे. प्रत्येक हिंसेचे मूळ कारण राग आहे. चोर, डाकू, आतंकवादी हे द्वेषामुळे हिंसा करीत नाहीत. सैनिकांचे सुद्धा कोणाबरोबरही शत्रुत्व नसते. आपल्याला असे वाटते की मनुष्य द्वेषामुळे हिंसा करतो. परंतु त्यामागची भूमिका पाहिली तर द्वेषामुळे नाही. परंतु रागभावनेने हिंसा होते.

मनुष्य भेळमिसळ करतो. त्यामुळे हजारो लोकांचे स्वास्थ बिघडते, लोक पक्षघाता (पॅरलिसेस)चे शिकार होतात. त्यांच्याशी भेळमिसेठ करणाऱ्याचा काहीच संबंध नसतो, द्वेष नसतो. भेळमिसळचे कारण राग आहे- मी धनाढ्य होईल, मग ती सुखाने राहू शकेन.

हिंसेचे कारण विरोध, भय, दुसऱ्यांच्या अधिकाराला नष्ट करणे, दुसऱ्यांना हीन मानने, अभिमान, स्वतःला हीन समजणे इ. आहे. नाश, मृत्यू, अपयश, रोग इत्यादी भयांमुळे सुद्धा मनुष्य हिंसक बनतो.

संसारी जीवन निर्वाह करताना देहधारीसमोर अनेकहिंसेचे प्रसंग येतात अशा परिस्थितीत अहिंसक वृत्तीने वागणे कठीण जरी असले तरी असंभव तर नाहीच.

श्रमण भगवान महावीरांनी हिंसेचे स्थूल आणि सूक्ष्म असे दोन प्रकार सांगितले आहेत.

सूक्ष्म हिंसेत पृथ्वी, पाणी, अग्नी, हवा, वनस्पती ह्या पाचांचा समावेश होतो. दैनिक व्यवहारात ह्याचा संपूर्णपणे त्याग अपेक्षित नाही तरी विवेकी मानवाने हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की ही सूक्ष्म हिंसा आहे. स्थूल हिंसेत मुंगी, मुंगळे इ. पासून पशू, पक्षी व मनुष्यापर्यंत सर्व चालत्या फिरत्या प्राण्यांचा समावेश होतो. चालत्या फिरत्या कोणत्याही जीवाची मुद्दाम हिंसा करू नये.

हिंसा करणारा नेहमी चिंतींत राहतो कारण हिंसा प्रतिहिंसेला जन्म देते. प्राण्यांचे प्राण घेणेच हिंसा आहे असे नाही. मंत्राद्वारे दुसऱ्यांना नुकसान पोहचवणे, जादूटोणा करणे, कटुवाणीचा प्रहार करणे इत्यादी सर्व हिंसेचे प्रकार आहेत. जर कोणी कटुवाणी अथवा आक्षेप इत्यादींनी उत्तेजित होऊन आत्महत्या करून घेतली तर आत्मघातीबरोबर अक्षेप देणारा सुद्धा पातकी ठरतो म्हणून हिंसेची भावना दुर्गतिदायक आहे. मग ती हिंसा धर्म,

अर्थ, काम यासाठी असो अथवा जन्म, जरा मृत्यूपासून सुटका होण्यासाठी अर्थात मोक्षप्राप्तीसाठी असो ती अहितकारकच आहे. हिंसेने मोक्ष प्राप्त होणे हे कधीही शक्य नाही. हिंसा करणारा विभिन्न योनीमध्ये विविध वेदना आणि कष्टाचा अनुभव करून अनादी, अनंत चतुर्गतिरूप संसारात परिभ्रमण करतो[१८] म्हणूनच-

"हिंसा दुर्गते द्वारं, हिंसैव दुरितार्णव ।
हिंसैव गहणं नमः, धर्मो न हिंसया ॥"[१९]

हिंसा दुर्गतीचे द्वार आहे. हिंसा पापाचा समुद्र आहे. हिंसा घोर अंधकार आहे. हिंसा करताना धर्म होत नाही.

साधारण मनुष्य कोठेही स्वतंत्रतेपूर्वक फिरू शकतो. त्याला कोणत्याही प्रकारचे भय नसते. ज्यांच्या मनात अहिंसेची भावना असते ते एकटे सुद्धा जगात फिरू शकतात. गांधीजी हिंदु-मुस्लिम दंगलीच्या वेळी सुद्धा पाकिस्तानी क्षेत्रात फिरत होते कारण त्यांच्या मनात अहिंसेची पवित्र भावना होती.[२०]

हिंसेमुळे नरक तिर्यंच इत्यानी गतीमध्ये जीवाचे कसे हाल होतात ह्याचे विस्तृत वर्णन प्रश्नव्याकरण सूत्रात केले आहे.[२१] विस्तारभयामुळे इथे त्याचे वर्णन केलेले नाही.

हिंसेचा परिणाम स्वतःच्या स्वभावावर अत्यंत वाईट होतो. दुष्ट हिंसायाम्-हिंसेमुळे चांगल्यात चांगला साधकही दुष्ट होतो.

मनुष्य प्रज्ञाशील प्राणी आहे. पशुपक्षी ज्या स्थितीत पूर्वी राहत होते तसेच वर्तमानामध्ये सुद्धा राहतात. सुधारक शक्ती पशूमध्ये नाही. ही शक्ती मानवामध्ये आहे. परंतु जसजशी मनुष्याची प्रज्ञा-बुद्धी वाढते. तसतशी परिणामी अहिंसा जर वाढली नाही तर ती प्रज्ञा तारक राहणार नाही तर मारक बनते; उद्धारक नाही पण घातक सिद्ध होते. विज्ञान आज खूप मोठ्या प्रगतीच्या दिशेने पुढे जात आहे परंतु त्याबरोबर अहिंसा वाढलीच नाही त्यामुळे आज उद्धारकाच्या ऐवजी संहारक शक्तीचा जास्त जोर आहे. जर विज्ञानाबरोबर अहिंसा अथवा दयेचे संवर्धन झाले असते तर आज संहारकतेच्या ठिकाणी संरक्षणाची भावना वाढली असती.

हिंसेचा अर्थ मात्र प्राण्यांचा वध करणे इतकाच नसून कोणत्याही कार्याने जर दुसऱ्यांना दुःख होत असेल तर ती हिंसाच आहे. कोणालाही दुःख देणे हिंसा आहे आणि कष्ट न देणे अहिंसा आहे.

आज जगातील लोक पशु-पक्ष्यांची हत्या होऊ नये म्हणून अत्यंत प्रयत्नशील आहेत. परंतु तो मनुष्यांचे रक्षण करू शकत नाही. किड्यामकोड्याची दया करतात. परंतु मनुष्याची कदर करीत नाहीत. त्याची ती अहिंसा रूढी मात्र आहे.[२२]

सूत्रकृतांग सूत्रामध्ये सुद्धा हिंसेचे वर्णन करताना असे सांगितले आहे की धर्माच्या तत्त्वाला समजणाऱ्या पुरुषाने पापापासून स्वतःला निवृत्त केले पाहिजे. हिंसेने उत्पन्न कर्म वैर उत्पन्न करतात, महाभयदायक आणि दुःखदायक आहेत म्हणून हिंसा कधीही करू नये.[२३]

आज मांसाहार जे करीत नाहीत त्यांना कोणी लाख रुपये दिले तरी मांस खाणार नाहीत. परंतु खोटे बोलून दोन पैसे जरी मिळत असतील तर पटकन असत्य बोलले जाते. ही भावहिंसाच आहे.

जीवनात भावहिंसा सुद्धा कर्मबंधाचे कारण ठरते. आपण मुंगीचे रक्षण करतो आणि केलेच पाहिजे. परंतु मनुष्याची रक्षा होऊ शकत नाही. मनुष्याचे रक्षण करणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे.

अहिंसेचे पाच अतिचार आहेत. त्यात प्रथम आहे कोणत्याही प्राण्याला बांधणे दोष आहे- त्या अगोदर मनुष्याने विचार करायला पाहिजे की आपल्या नोकरांना आपण बांधत तर नाही ना ! एखादा मनुष्य गरीबीमुळे नोकरी करतो परंतु त्याच्या गरीबीचा आपण दुरुपयोग केला तर ती सुद्धा हिंसा आहे. नोकरांजवळून सहा तासाऐवजी दहा तास काम करवून घेतले तर हे सुद्धा एकाप्रकारचे बंधन आहे. म्हणून केवळ पशूला बांधणेच हिंसा नसून मनुष्याला बंधनात ठेवणे ही सुद्धा हिंसाच आहे.

दुसरा अतिचार वध म्हणजे मारणे. पशूप्रमाणे मनुष्याला मारणे सुद्धा अतिचार आहे.

तिसरा अतिचार छविच्छेद म्हणजे कोणाच्याही चामडी, शेपूट अथवा अंगोपांगांचे छेदन करणे. आज स्वस्वाथ्यासाठी पैसे देऊन किडनी इत्यादी अवयव घेतले जातात, कित्येक गरीब आपले शरीर विकून जगतात तर कित्येक डॉक्टर ऑपरेशन करताना मनुष्याच्या मृत्यूची भीती न बाळगता त्यांचे चांगले अवयव काढून घेतात. हे कित्येक वेळा पेपरात वाचावयास मिळते. पैशासाठी मनुष्य हिंसक कृत्ये करतात. ह्यापासून दूर राहिले पाहिजे.

चौथा अतिचार, अतिभार गाडीत अधिक भार भरून पशूद्वारे वाहन चालवणे त्यामुळे हा हिंसेचा दोष लागतो. पशूप्रमाणे नोकराची स्थितीसुद्धा खूपच खराब आहे. ट्रांस्पोर्टचा घोडा जर आजारी झाला तर त्याची चिकित्सा केली जाते. सायकल किंवा मोटार जर बिघडली तर ती दुरुस्त केली जाते. परंतु नोकर जर आजारी पडला तर त्याची चिकित्सा करणे तर दूरच राहिले. परंतु तो जितके दिवस कामावर येत नाही तितक्या दिवसाचा त्याचा पगार कापला जातो. मनुष्याची किंमत घोडा आणि बैलापेक्षा सुद्धा कमी आहे. असे वागल्याने अतिभार दोष लागतो.

भत्तपाणविच्छेद-कोणाच्याही खाण्यापिण्यात अंतराय निर्माण करणे किंवा खाता खाता उठविणे, हिसकावून घेणे, खाऊन देणे इत्यादी भत्तपाण विच्छेद नामक पाचवा अतिचार आहे. दुष्काळाच्या वेळी स्वतःजवळ आवश्यकतेपेक्षा जास्त वस्तूचा संचय करणे सुद्धा हिंसेचा दोष आहे.

अशाप्रकारे कोणतीही हिंसात्मक प्रवृत्ती करण्यापूर्वी मनुष्याच्या मनात प्रथम तसे विचार येतात. पुन्हा पुन्हा हिंसकविचार हिंसानुबंधी भावनेचे रूप बनते व त्या हिंसक भावना जेव्हा क्रियात्मक रूप धारण करतात तेव्हा कर्मबंधने तर होतातच परंतु केवळ भावना हिंसक ठेवल्या, क्रियेत त्याचे रूपांतर होऊ दिले नाही तरीही हिंसक भावनेमुळे कर्मबंध होतो.

दुसऱ्यांना कष्ट देणे हे जसे हिंसक आहे तसेच आपली शक्ती असताना सुद्धा दुसऱ्याचे कष्ट दूर न करणे ही सुद्धा हिंसाच आहे.[२४]

मनुष्याचे प्रत्येक कार्य हिंसेशिवाय होत नाही. खाणे, पिणे, उठणे, बसणे, चालणे इत्यादी सर्व कामे करताना हिंसा तर होतेच. मग अहिंसेचे पालन कसे करू शकेल ? हा प्रश्न उपस्थित होतो. इंग्रजीमध्ये असे म्हटले जाते की Living is Killing जगण्यासाठी संहार करावा लागतो. आणि संस्कृतमध्ये म्हणतात, ''जीवो जीवस्य जीवनम्'' जीव, जीवाचे जीवन आहे आणि हे सत्यसुद्धा आहे की अन्नाच्या जीवांना खाऊनच मनुष्य जगतो. परंतु आपण असेच समजून बसलो तर अहिंसेचे पालन कसे करू शकणार ? म्हणून विवेचकपूर्वक विचार केला पाहिजे की Killing the least is living the best अर्थात कमीत कमी हिंसा करून जास्तीत जास्त जीवनाला अहिंसक करायचे आहे. अल्पारम्भापासून जर आपण वाचू शकत नसू तर महारंभापासून (घोर हिंसेपासून) तरी वाचू शकतो.

जीवनोपयोगी ज्या काही वस्तू मनुष्य खरेदी करीत असतो. त्यापूर्वी ती हिंसक आहे की अहिंसक ह्याची पूर्णचिकित्सा केली पाहिजे. हिंसा का होते आणि अहिंसक जीवन बनविण्यासाठी काय केले पाहिजे ह्याचे सतत चिंतन केले पाहिजे तरच हिंसेच्या तापातून मुक्ती मिळू शकते. अहिंसेचा मुख्य पाठ विवेक आहे. विवेकरहित काम हिंसकरूप धारण करते.

वस्तू लहान असो किंवा मोठे, मूल्यवान असो किंवा मूल्यरहित, सजीव असो किंवा निर्जीव त्याचा दुरुपयोगी करणे दुसऱ्याला उपयुक्त होणार नाही. असे करणे, दुसऱ्यांना उपयोगात येणाऱ्या, वस्तूला नष्ट करणे हिंसा आहे, घोर पाप आहे.

व्यक्तीमध्ये कोणत्याही लहानात लहान प्राण्याला उत्पन्न करण्याची, त्याच्या जीवनाचे नवनिर्माण करण्याची क्षमता नाही तर मग कोणाच्याही जीवनाशी खेळण्याचा आणि बनलेल्या घराला उद्ध्वस्त करण्याचा त्याला काय अधिकार आहे ? कोणाच्याही जीवनाचा अंत करणे, त्याच्या जीवनविकासामध्ये अडसर घालणे, हा जघन्य अपराध आहे. हे नैतिक पतन आहे तसेच महाहिंसा आहे.

हिंसेचे उत्पत्ती स्थान - घृणा

धारणेत अथवा भावनेत परिवर्तन करणे हे हिंसेचे पहिले सूत्र आहे. हिंसेचे मूळ कारण घृणा आहे. जोपर्यंत घृणा येत नाही तोपर्यंत मनुष्य हिंसा करू शकत नाही. आज जितका आतंकवाद बोकाळला आहे तो सर्व घृणेच्या आधारावरच चालला आहे. अतिरेक्यांना समोरील पक्षाबद्दल घृणेचे प्रशिक्षण दिले जाते. ते इतकी घृणा त्यांच्या मनात निर्माण करतात की त्यांना इतरांना मारण्यामध्ये काहीच संकोच निर्माण होत नाही.

घृणेच्या जागी प्रेम निर्माण करण्याची अत्यंत गरज आहे. चोर, डाकू आपल्या घरातील लोकांना लुटत नाहीत. भेसळ करणारे व्यापारी घरच्या लोकांसाठी तेच सामान वापरत नाहीत. स्वतः शुद्ध पदार्थांचा उपभोग घेतात व दुसऱ्यांना खराब पदार्थ देतात. परंतु जेथे प्रेम असेल तेथे क्रूर व्यवहार होऊ शकणार नाही.

प्रेम उत्पन्न करणे, प्रेमाचा विकास करणे, मैत्रीचा विकास करणे हे अहिंसेचे दुसरे सूत्र आहे - कबीरांनी असे सांगितले आहे की -

"पोथी पढ पढ जगमुआ, पंडित भया न कोय
ढाई आखर प्रेम का पढे सो पंडित होय."

आज सर्वात मोठी समस्या हीच आहे की शिक्षणाबरोबर संवेदनशीलता, प्रेम, दया, अपना करुणेच्या विकासाचे संस्कार जुळलेले नाहीत.

आपल्या शरीरात मस्तिष्काची रचना फार गुंतागुंतीची आहे. ती समजल्याशिवाय संवेदनशीलतेचा विकास होऊ शकणार नाही. घृणेचे केंद्रसुद्धा आपल्या मस्तिष्कात आहे आणि प्रेमाचे सुद्धा आता ज्याला बळ मिळेल ते पुष्ट होईल, ज्याला बळ मिळणार नाही ते दुर्बल होईल.

स्मृतीवर संशोधन करणारे वैज्ञानिक सांगतात की स्मृतीचे रसायन अत्यंत अद्भुत आहे. एका रसायनाला हजार वेळा बळ दिले तर ती पुष्ट होते, बळ दिले नाही तर दुर्बल पडते आणि विस्मृतीची मात्रा वाढत जाते.

ज्याप्रमाणे दोन मुले असतील तर त्यातील एकालाच प्रेम दिले तर तो धष्ट, पुष्ठ होतो आणि ज्याला प्रेम दिले नाही तो सुकून जातो. येथे प्रश्न पोषण मिळण्याचा आहे. आम्ही त्या केंद्राला पल्लवित केले तर नक्कीच घृणा कमी होऊन प्रेम भावनेचा विकास होईल.

प्रेम मैत्री आणि संवेदनशीलता वाढविण्याचे उपाय प्रेक्षाध्यानाचा एक प्रयोग आहे. यात ज्योतिकेंद्राचे जर ध्यान केले आणि पुन्हा पुन्हा निरीक्षण करून अनुभव घेतला तर प्रेम, मैत्री आणि करुणेची भावना वाढेल.

आज आम्ही पाणी घालत आहोत ते घृणेच्या रोपट्याला आणि मजेत राहण्याची, शांत राहण्याची इच्छा करत आहेत. रामराज्याची कल्पना करतो आणि प्रत्यक्षात मात्र रावणराज्याचे कार्य चालू असल्यावर कशी बरे त्यांची संगती होणार ? अशा विसंगतीत जगताना आम्ही जीवनाचा विकास साधू शकणार नाही. खरोखर आमची इच्छा जर सामाजिक उन्नतीची असेल तर प्रयत्न व कार्य तसेच केले पाहिजे.

अहिंसेची चर्चा हजारो वर्षांपासून होत आहे. त्याची आवश्यकता आजही आहे, तरीही त्याचा विकास होत नाही. याचे मुख्य कारण आहे आमचे दुर्बलत्व. आज हिंसेमागे जेवढी मानवीय शक्ती खर्च होत आहे त्याच्या एक टक्कासुद्धा शक्ती अहिंसेसाठी खर्च होत नाही. आमची इच्छा अहिंसेची आहे आणि संपूर्ण शक्तीचे नियोजन हिंसेसाठी होत आहे. किती विरोधाभास आहे हा ! मनुष्य शांतीने राहण्याची इच्छा करतो आणि सर्व क्रिया अशांती निर्माण करणाऱ्या करीत असतात. ह्याचे कारण म्हणजे लहानपणापासूनच आपल्यावर वेगळ्या प्रकारचे संस्कार होत आहेत.

अहिंसेचे तिसरे तत्त्व आहे - कष्ट सहिष्णुता-

आज कष्ट सहिष्णुतेची चर्चा प्रतिकूल वाटते. आज तर सुविधावादी धोरेचा बोलबोला आहे. निवडणुकीतही नेते आश्वासन देतात की आम्हाला निवडून द्या. आम्ही तुम्हाला जास्तीत जास्त सुविधा प्राप्त करून देऊ. या सुविधावादी दृष्टिकोनामुळे जास्तीत जास्त हिंसा वाढत चालली आहे. सुविधावाद आणि हिंसा यांचा फार घनिष्ठ संबंध आहे. जसजशी कष्ट करण्याची क्षमता कमी होईल तसतशी हिंसेची साहाय्यता घ्यावी लागेल. शारीरिक, मानसिक असहिष्णुतेने हिंसेची वृद्धी केली आहे. एखाद्याला कोणतीही घटना सहन झाली नाही की लगेचच तो आत्महत्या करण्याच्या स्थितीत पोहचतो. एक व्यक्ती दुसऱ्याने उत्पन्न केलेल्या अप्रिय स्थितीला सहन करू शकत नाही.[२५]

अशा परिस्थितीत आम्ही अहिंसेची कल्पना करू शकत नाही. अहिंसा एक शक्ती आहे, एक पराक्रम आहे. एक वीर्य आहे. भ्रमवश असे मानले आहे की अहिंसा दुर्बलांसाठी आहे. दुर्बलतेचा व अहिंसेचा काहीच संबंध नाही. अहिंसेला दुर्बलता स्पर्श करू शकत नाही व दुर्बलतेला अहिंसा स्पर्श करू शकत नाही. दोघांमध्ये जणू अस्पृश्य भाव आहे. अहिंसा आंतरीक अर्जेचा विकास आहे.

पराक्रमी व्यक्तीच अहिंसेचा विचार करू शकते. जर आम्ही कष्ट सहिष्णुतेला सोडून अहिंसेची कल्पना केली तर मात्र भ्रांती आहे. ह्या दोघांना कधीही वेगळे केले जाणे शक्य नाही.

आज ऋतूच्या प्रभावाला सुद्धा सहन करण्याची शक्ती नसल्याने घरोघरी हिटर व कुलर आलेले आहे.

एक माणूस मरणानंतर यमराजांजवळ गेला. यमाने त्याला विचारले, "तू कोठे राहू इच्छितो? स्वर्गात की नरकात ?" तो म्हणाला, "मला स्वर्ग व नरक यांच्याशी काहीच घेणे देणे नाही, जेथे दोन पैशाचा फायदा होईल तिथेच पाठवा." असे आजचे मानवी मन झाले आहे. चांगले, वाईट ह्याची चिंता कोणीही करीत नाही. त्याला फक्त सुविधा हव्यात. त्या सुविधांसाठी कोणत्याही प्रकारचा प्रयत्न केला जातो. तो प्रयत्नच समस्येचा निर्माता, समस्येचे कारण आहे.

सुखशांती पाहिजे असेल तर अहिंसेची आस्था मनात बाळगली पाहिजे. तसेच अहिंसेवर आस्था असेल तरच सुविधावादी आणि पदार्थवादी दृष्टिकोन बदलावे लागतील. कष्ट सहिष्णुतेनेच जगावे लागेल.

अहिंसेचे चौथे तत्त्व आहे - स्वनियंत्रण

आपले आपल्यावर, आपल्या आवेशावर नियंत्रण करू शकल्याशिवाय अहिंसेची कल्पना सुद्धा करू शकणार नाही. आपले अनियंत्रित आवेशच आपल्या वृत्तीला हिंसक बनवितात. स्वनियंत्रणाचा फायदा म्हणजे आपण आपल्याबद्दल अहिंसक बनणे हे आहे.[२६]

दुसऱ्याबद्दल अहिंसक बनण्यापूर्वी स्वतःच स्वतःच्या बद्दल अहिंसक बनणे आवश्यक आहे. आपल्याला फार लांब लांब गोष्टीत न गुंतता सीमित सुधार करायचा आहे. जी व्यक्ती स्वतःसाठी अहिंसक असते ती दुसऱ्यासाठी अभयदाता असते. आणि ती व्यक्ती कोणासही धोका देत नाही किंवा धोका निर्माण करीत नाही.

जी व्यक्ती स्वतः अहिंसक आहे ती दुसऱ्यांसाठी सुद्धा अहिंसक बनते. प्रथम स्वतःच्या हृदयातील अग्नी विझवायचा आहे. तो विझला तरच शांती होईल आणि मग शांतीसाठी वेगळा प्रयत्न करावा लागणार नाही. म्हणून स्वनियंत्रण फार महत्त्वपूर्ण आहे.

आज मनुष्य जीविकेसाठी जितका चिंतित आहे तितका जीवनासाठी जर चिंतित असता तर आज ती मानवाची परिस्थिती झाली आहे तशी झाली नसती. आज विश्व विनाशाच्या पथावर उभे आहे. शांती आणि सुखाच्या शोधात तो हे विसरून जातो की ज्याप्रमाणे अग्नी अग्नीला वाढवतो त्याचप्रमाणे हिंसा हिंसेला वाढविते. फलतः आपल्या हातात काहीच येत नाही.

हिंसा, मांसाहार, बॉम्ब यांनी संसार आज जितका व्याकुळ, व्यग्र झालेला दिसतो तितका पूर्वी कधीच नव्हता. भगवान महावीरांच्या अहिंसेची आज जितकी आवश्यकता असेल तितकी कदाचित त्यांच्या काळातही नसेल. कारण भगवान महावीर यांच्या वेळी मनुष्य पशुबळी देत होते. परंतु आज मनुष्य मनुष्याचीच हत्या करत आहे. आज मनुष्याला मनुष्यांपासूनच भय वाटत आहे. थोड्या पैशांसाठी तो आपले जीवन, मान सुद्धा अग्नीत समर्पित करण्यास तयार आहे.

अहिंसा एका व्यक्तीचा किंवा धर्माचा सिद्धांत नाही तर हा सर्व धर्माचा पाया आहे. आचारामध्ये जी समता आहे तीच अहिंसा आहे. हिंसा सर्व पापाची जननी आहे म्हणूनच अठरा पापस्थानांमध्ये हिंसेचे स्थान सर्वात पहिले आहे. हिंसा हे एक असे विशाल पापस्थान आहे की त्याच्या मानसिक, वाचिक व कायिक भेदातही अन्य पापांचा समावेश आहे.

अहिंसा, शांती आणि समृद्धीचा आधार आहे व मनुष्याचे चारित्र्य अहिंसेच्या

त्यावर उभे आहे. म्हणून मनुष्याचे हे कर्तव्य आहे की हिंसात्मक अशुभ भावनेचा त्याग करून अहिंसात्मक भावनेचे चिंतन करावे.

मृषानुबंधी भावना

मनुष्याच्या शरीरात जोपर्यंत ऊर्जा आहे तोपर्यंत त्याला 'जिवंत मनुष्य' असे म्हटले जाते. परंतु थंड शरीर पडल्यावर 'मृत मनुष्य' असे समजले जाते. याचप्रमाणे आपल्या शरीरात जोपर्यंत शक्ती आहे तोपर्यंत जिवंत म्हटले जाते. अशक्त, दुर्बळ मनुष्य तर मृताप्रमाणे भासतात.

"शक्ती जीवन आहे. दुर्बलता मृत्यू आहे."

शक्ती जीवन आहे. परंतु विचार केला पाहिजे की कोणती शक्ती जीवन आहे? एखादा मनुष्य खाऊन, पिऊन, व्यायाम करून स्वस्थ, सशक्त होतो. परंतु आजारी पडला तर अशक्त होतो. याचाच अर्थ असा की शारीरिक शक्ती अस्थायी आहे. ह्याला जीवन म्हणता येणार नाही. कोणी पैशाला शक्ती मानतात, परंतु ती लक्ष्मी चंचल आहे. मग कोणती शक्ती मिळविली पाहिजे. कोणत्या शक्तीने जीवन उन्नत होऊ शकेल ? मनुष्याची बुद्धी वृद्धावस्थेमध्ये कमी होते, सत्ता अस्थिर आहे. सत्तेलाही वार्धक्याचे भय आहे. मग कोणते बळ स्थायी आहे ? कोणते बळ जीवनाला प्रशस्त करू शकेल ?

शक्तीचे दोन भेद आहेत - आसुरी आणि दैवी शरीरबळ, बुद्धिबळ, रूपबळ, विद्याबळ इत्यादी बळांचा उपयोग असत् प्रवृत्तीमध्ये होतो तेव्हा त्या शक्तीला आसूरी शक्ती म्हणतात. रावणामध्ये अत्यंत बळ होते परंतु त्याचा त्याने दुरुपयोग केला म्हणून त्याच्या शक्तीची गणना आसूरीमध्ये होते.

एक सत्यबळच स्थायी स्थिर आहे. याने जीवन उन्नत होते. परंतु आज स्वार्थामुळे मनुष्य असत्याचा आधार घेतो.

असत्याचा आधार त्याच व्यक्ती घेतात ज्यांच्या जीवनात गुणांना काहीच स्थान नसते. जे क्षुद्र, हीन प्रवृत्तीचे आहेत तेच असत्याचा आधार घेतात. असत्य वचन बोलताना मनात कलुषित भावना निर्माण होते. असत्यता स्व-पर भय उत्पन्न करते. असत्य भावना ही दुःखदायक अपयशकारी, वैर उत्पन्न करणारी आहे. असत्यतेमुळे क्लेश होतो. धूर्तता, अविश्वास, अशुभ फळ व दुर्गती यांमध्ये जन्ममरण करविणारी असत्यताच आहे. इहलोकात निंदा व तिरस्काराचे पात्र बनविणारी असत्यता आहे.

असत्याची मुख्य चार कारणे आहेत - क्रोध, लोभ, भय व हास्य. क्रोधामुळे मनुष्य विवेकहीन होतो. लोभाने अंध झालेला असत्यालाच आपल्या साध्याच्या सिद्धीचे साधन मानतो. भयामुळे दुष्कर्माच्या दंडापासून वाचण्यासाठी असत्याचा आसरा घेतो. व हास्यमस्करीमध्ये असत्याचा प्रयोग साधारण समजला जातो.[२७] खोटी साक्ष देणे असत्य आहे. सत्याच्या विरोधी असे असत्य आहे.

सत् शब्द प्रशंसावाचक आहे. जे सत् नाही ते असत् आहे. 'असत्' याचा अर्थ अप्रशस्त आहे. तात्पर्य हे आहे की जो पदार्थ नाही त्याचे कथन करणे त्याला अनृत असत्य म्हणतात. ऋत् चा अर्थ 'सत्य' आहे आणि जे सत्य-ऋत नाही ते अनृत आहे.[२८]

आपला विषय 'भावना' आहे. मनात जे असत्यमूलक विचार चालतात, जे चिंतन चालते ते असत्य चिंतन मनुष्याकरता व त्यामुळे आत्म्याचे पतन कशाप्रकारे होते त्याची हेयता समजण्यासाठी ह्या भावनेच्या स्वरूपाला जाणून घेणे आवश्यक आहे.

जोपर्यंत जीवाच्या मागे कर्माचे आवरण आहे तोपर्यंत त्याच्या वाणी, विचार व वर्तनामध्ये अप्रशस्तता, अशुभता असते. त्याला दूर करण्याचा पुरुषार्थ जीव स्वतःच करू शकतो. परंतु जगात जगणारा प्राणी भौतिक सुखाच्या लालसेमुळे मनात जे काही संकल्पविकल्प धारण करतो ते असत्य विचार स्वार्थमूलक असतात.

असत्यानुबंधी भावनेत जीव विचार करतो की मी असत्य आणि चातुर्याच्या बळावर लोकांना फसवून खूप धनसंग्रह करून घेईन, मनःकल्पित अनेक शास्त्रांची रचना करून स्वतःचे मत चालविन. ते शास्त्र सत्य आहे की असत्य, दयामय आहे की क्रूर याची पर्वा करणार नाही. लोकांना गोड गोड बोलून फसवून, मोहित करून त्यांच्याजवळून सुंदर कन्या, रत्न, धन-धान्य, घर इत्यादी घेऊन टाकीन. तसेच माझे जीवन सुखी कसे होईल एवढाच विचार करीन इत्यादी विवधि प्रकारे असत्य विचाराचा मनात उद्‌भव होणे असत्यानुबंधी भावना आहे. असत्यानुबंधी भावना रौद्रध्यानचा दुसरा भेद आहे.

असत्यभावनेमुळे जगामध्ये वेगवेगळे दोष पसरू शकतात म्हणून असत्याला सर्वजण वाईट समजतात.

असत्यता कोठे नाही हा प्रश्न आहे. न्यायालयात तर असत्य फार प्रचलित आहे. कित्येकांचा तर हा धंदाच आहे. अशा व्यक्तींना थोडेसे पैसे देऊन त्यांच्याकडून काहीही बोलून/वदवून घेता येते. अशा लोकांना भविष्याच्या दुष्परिणामांचे ध्यान राहत नाही.

चोरी करणारे, जुगारी, व्यभिचारी, स्त्रियांचे अपहरण करणारे, असत्य बोलल्याशिवाय राहूच शकत नाही.

मिथ्या मताला मानणारे आणि त्यागींचा वेष धारण करणारे सुद्धा असत्यभाषी आहेत. कर्जदाराला सुद्धा असत्य बोलावे लागते. सावकार पैसे मागत असताना जर कर्जदाराकडे पैसे नसतील तेव्हा ते खोटी आश्वासने देतात की एक आठवड्यानंतर किंवा एक महिन्यानंतर देईन. अशाप्रकारे असत्यापासून वाचायचे असेल तर ऋण घ्यायचे नाही आणि घ्यावेच लागले तर आवश्यकतेनुसार फारच थोडे घ्यावे म्हणजे ते कर्ज सहजपणे फेडू शकू. असत्याच्या पापापासून वाचण्यासाठी अत्यंत सावध राहणे आवश्यक आहे.

भगवती आराधनेमध्ये असत्याचे वर्णन करताना श्री शिवाचार्य असे लिहितात की- मर्मच्छेदक कठोर वचन, उद्वेगकारी कटुवचन, वैरोत्पादक, कलहकारी, भयोत्पादक आणि अवज्ञाकारी वचने अप्रिय वचन आहेत. तसेच हास्य, भय, लोभ, क्रोध, द्वेष इ. कारणांनी बोलले जाणारे वचन असत्य आहे. याचा साधकाने प्रयत्नपूर्वक त्याग केला पाहिजे.[२९]

जे वचन स्वतःला व दुसऱ्याला संताप उत्पन्न करणारे आहे ते वचन जसेच्या तसे म्हणजे सत्य जरी असले तरी असत्यच आहे.[३०]

इथे लेखकाच्या सांगण्याचा हा आशय आहे की जे वचन बोलले जाते ते संताप उत्पन्न करणारे असेल तर असत्यच असते. जसे कोढीला कोढी आंधळ्याला आंधळा सांगणे.

ह्या सर्व असत्य व वचनामागे कषाययोग असल्याने असत्य वचनाने सुद्धा हिंसा होते.

आज लोक सत्यनारायणाची पूजा करतात. परंतु त्याचा अर्थ त्यांना समजत नाही. जोपर्यंत सत्याचे आचरण केले जात नाही तोपर्यंत सत्यनारायणाला प्रसन्न केले जाऊ शकत नाही. 'सच्चं खु भगवं' सत्यच भगवान आहे.

उत्तराध्ययन सूत्रात असत्याचा परिणाम काय होतो हे लिहिले आहे, ''मोसस्स पच्छाय पुरत्थओय पओग्गकाले य दुही दुरन्ते[३१]

असत्य बोलण्यापूर्वी व पश्चात तसेच बोलतानाही मनुष्य दुःखी होतो व त्याचा

इत दुःखरूप होतो. म्हणून मुसावायं वि वज्जिज्जा[३२] असत्य बोलण्याचा त्याग केला पाहिजे.

असत्य बोलल्यामुळे जीव श्रद्धेचा/विश्वासाला पात्र रहात नाही. इहलोकात हिंव्हाछेदनादी अनेक अशुभ दुःखमय फळे मिळतात व ज्यांच्याविषयी असत्य बोलले जाते त्याला सुद्धा खूप दुःख प्राप्त होते व तो दुःखित होऊन कायमची शत्रुत्वाची गाठ बांधतो. याचा अर्थ असा की असत्य वचनामुळे जितके दुःख त्याला प्राप्त झाले होते त्यापेक्षा अधिक दुःख असत्य बोलणाऱ्याला प्राप्त होते. ह्या असत्याच्या फलस्वरूपी परलोकात अशुभगतीमध्ये भ्रमण करावे लागते. तसेच तेथे दुःख भोगावी लागतात. आणि ह्या लोकात व परलोकात निंदेचे पात्र बनावे लागते. म्हणून असत्यवचनापासून दूर राहणेच श्रेयस्कर आहे.

असत्य बोलणाऱ्याचा आत्मविकास होणे 'आकाश-कुसुमवत' आहे.

स्थूल आणि सूक्ष्म भेदाने असत्य दोन प्रकारचे आहे. साधक जर असत्याचा पूर्णपणे त्याग करू शकत नसेल तर त्याला त्याची मर्यादा तरी कमीत कमी केली पाहिजे. तसेच दुसऱ्याला दुःख होईल अशा असत्याचा त्याग केला पाहिजे. जगात लाखो करोडोंच्या घेण्यादेण्याचे व्यवहार मात्र सत्याच्या आधारावरच होतात. जर विश्वास तोडला तर विश्वासघातकी ठरेल, असत्याने विश्वासघात होतो.

असत्याचे पाच प्रकार आहेत -

१) **कन्यालिक** - अलिक हा सुद्धा असत्याचा एकार्थवाचक शब्द आहे. कन्येसाठी असत्य बोलणे. कन्येचा विवाह करण्यासाठी तिचे दोष न सांगता केवळ गुण सांगणे. वयाने लहान असेल तर मोठी असल्याचे सांगणे किंवा मोठी असेल तर लहान सांगणे हीच गोष्ट मुलाच्याबाबतीत लागू होते. नोकरीसाठी सुद्धा खोटे बोलणे असा खोटेपणा केल्यावर कन्या सासरी सुखी जीवन प्राप्त करू शकत नाही आणि संसार दुःखमय होतो.

२) **गवालिक** - गाय, म्हैस इ. पशूंसाठी असत्य बोलले जाते. गाय, म्हैस दूध देत नसल्यास देते असे सांगणे पशुपक्षी रोगी, निरुपयोगी असले तरी चांगले असल्याचे सांगणे. दुसऱ्याच्या गळ्यात असत्य बोलून प्राण्यांना घालणे. हे पशूंसंबंधी असत्य बोलणे आहे.

३) **भौमालिक** - भूमीसाठी असत्य बोलणे. दुसऱ्याच्या भूमीला स्वतःची सांगणे. टॅक्स/कर वाचविण्यासाठी स्वभूमीला दुसऱ्याची सांगणे.

४) **न्यासापहार** - न्यासाचे अपहरण करणे, म्हणजे दुसऱ्याचे विश्वासाने आपल्याकडे ठेवलेली वस्तू हडपण्याचा प्रयत्न करणे.

५) **खोटी साक्षी** - न्यायालयात, पंचायतीत स्वार्थवश खोटी साक्ष देणे. सत्याला असत्य व असत्याला सत्य शाबित करणे.[३३]

मंदिरावरच्या ध्वजाप्रमाणे व गाडीच्या चाकाप्रमाणे सतत आपले वचन बदलणारे लोक दुःखमय जीवन प्राप्त करतात. कारण मनुष्याच्या वाणीवरूनच त्याची किंमत होते.

ना नर गज न ना पिये, ना नर लिजे तोल ।
संत कहे नर, नार का, बोल बोल में मोल ॥

सत्याचा महिमा वाणीतच आहे.

असत्याने जीवनव्यवहार अशुद्ध बनतो. असत्य आचरण करणाऱ्याचे पूजापाठही लांछनरूप/कलंकरूप बनतात.[३४]

'नानृतात् पातकं परम्'[३५] खोटे बोलण्यासारखे दुसरे कोणतेही पाप नाही. मौन ठेवणे चांगले परंतु असत्य बोलणे चांगले नाही. कारण त्यामुळे दुसऱ्या पापाची निर्जरा होते. परंतु असत्याचे फळ भोगावेच लागते. बहिरेपणा आणि तोंडाचे अन्य रोग असत्य बोलण्यानेच होतात.

ज्यांना असत्य बोलण्याची सवय असते त्यांना कोणतेही अयोग्य कर्म करण्याची लाज वाटत नाही.

जन्मापासूनच मनुष्याच्या तोंडात जीभरूपी तलवार असते. अज्ञानी त्याचा उपयोग दुर्वचन बोलून स्वनाश करण्यासाठी करतो, तर ज्ञानी त्याचा उपयोग परोपकार, प्रभुस्मरण करून कर्मबंध तोडण्यासाठी करतो.

जो सत्य बोलतो त्याची यश, कीर्ती वाढते. सज्जनलोकात त्याची प्रशंसा होते. उभयलोकी तो सुखी होतो. म्हणून संयममय, विवेकयुक्त अशी भाषा बोलली पाहिजे.

स्तेयानुबंधी भावना

स्तेय म्हणजे चोरी करणे. दुसऱ्याच्या अधिकाराची वस्तू त्याची इच्छा भावना आणि आज्ञेशिवाय आपल्या अधिकारात करणे हे चौर्य कर्म आहे.

स्तेय अथवा चौर्य कर्म वस्तू किंवा पदार्थांच्या ओढाताणीतच सीमित नाही तर कोणाच्याही अधिकाराला जबरदस्तीने घेणे, कोणाच्याही विचारांना अथवा साहित्य किंवा

कविता इत्यादींना स्वनावाने प्रचारीत किंवा प्रसारीत करणे सुद्धा चोरी आहे. तसेच एखाद्या व्यक्तीला त्याचे अधिकार न देणे ही सुद्धा चोरी आहे.

कोणत्याही जाती, धर्म, पंथ, देशाचा मनुष्य असो त्याच्या मानवीय अधिकारांचे अपहरण करणे, धर्मस्थानात येऊ न देणे, देवदर्शन अथवा संताच्या चरणस्पर्शापासून वंचित ठेवणे, त्याच्या बरोबर अमानवी व्यवहार करणे ही सुद्धा चोरीच आहे. तसेच हा केवळ राजनैतिक अपराधच आहे असे नाही तर नैतिक व आध्यात्मिक पतनसुद्धा आहे.

चोरीची अनेक कारणे आहेत. त्यातील एक कारण म्हणजे वस्तूचा अभाव असणे हे आहे. जीवननिर्वाहाचे साधन सुलभ नसेल तर काही प्रामाणिक व्यक्ती सुद्धा विवश होऊन चोरी करण्याचा प्रयत्न करतात. म्हणून समाजात अभावाची स्थिती असताना सुद्धा त्याला समाप्त करण्याचा प्रयत्न न करणे आणि आपल्या शक्तीचा समविभाग न करणे ही सुद्धा चोरी आहे. शेजारचे कुटुंब उपाशी आहे ही गोष्ट माहीत असताना सुद्धा स्वतः ऐश आरामात राहणे व चटपटीत पदार्थ मिष्टान्न खाणे, समाजाची, राष्ट्राची आणि मानवजातीची चोरी आहे.

चोरी करण्याविषयी सतत चिंतन करणे, चोरी करून आनंद मानणे, दुसऱ्यांकडून चोरी करवून घेणे, चोरीत लाभ झाला तर खुश होणे, चोरीच्या कामात कलाकौशल्य दाखविणाऱ्यांची प्रशंसा करणे इत्यादी विचार स्तेयानुबंधी भावना आहे. ही भावना अत्यंत निंदनीय आहे.

प्रमादी परिश्रम न करताच धन मिळवू इच्छितो आणि त्यात तृप्ती मानतो. पापोदयामुळे त्याला चोरीशिवाय दुसरा कोणताच उपाय दिसत नाही म्हणून तो चौर्य कर्मात संलग्न राहतो. असे हे पापी विचार करतात की, वादळाने घेरलेल्या आकाशाचे वातावरण, अंधारी रात्र असेल तेव्हा काळे वस्त्र धारण करून गुप्तपणे जाऊन घर फोडून धन घेऊन येईन. माझा सामना करण्याची शक्ती कोणाचीही नाही. मी शस्त्रकलेत प्रवीण आहे, मी एकाच झटक्यात अनेक तुकडे करून असा पळून जाईन की मला कोणीही पकडू शकणार नाही. मी अनेक विद्या जाणतो. मी सर्वांना निद्राधीन करू शकेन. मोठमोठ्या साखळ्या, कुलूप झटक्यात तोडून टाकीन. अंधारात प्रकाशाप्रमाणे सर्व काही पाहू शकतो. सेनेला स्तंभित करू शकतो. इत्यादी अनेक कलेत माझी बरोबरी कोणीही करू शकणार नाही. आता मी थोड्याच काळात धनवानांचा संहार करून ऋद्धी-सिद्धी यांचा स्वामी होईन, इत्यादी विविध विचारांना अंतःकरणात स्थान देणे ही स्तेयानुबंधी भावना आहे.

कित्येक असे नामधारी सावकार आहेत, जे बाह्यतः धर्मात्मा दिसतात. परंतु ग्राहकरूपी शिकार मिळताच गोड गोड बोलून फसवितात. फसविण्याचे कार्य इतक्या चतुराईने केलेले असते की त्यातील लबाडी कोणाच्याही लक्षात येत नाही.

बोलात, मोलात, तोलात, मापात, छापात फसवून जमेल तितके लुटण्याचा प्रयत्न करतात. ग्राहकाला विश्वासात घेण्यासाठी आईची, गाईची, मुलांची शपथा खातात. चांगला माल दाखवून खराब माल देतात. भेळमिसळ करतात. अशाप्रकारे अनेक चोरीची कामे करून सावकार म्हणवतात आणि आपल्या लबाडीला बुद्धिमत्ता समजून खूप आनंदीत होतात. ह्या सर्व स्तेयानुबंधी भावना आहेत.[३६]

दुसऱ्याचे द्रव्य हडपण्यामध्ये ज्यांची बुद्धी आसक्त झालेली आहे असे चोर सर्वांसाठी उद्वेग, उपद्रव करणारे ठरतात. सर्वांनाच त्याची भीती वाटते. त्यांच्यापासून सावधान राहतात. चोराला राजा इ. कडून क्लेश होत असतो. मार खावा लागतो, कधी फाशीची शिक्षा सुद्धा भोगावी लागते, कधी बेड्यांच्या बंधनाने बांधले जाते, कान, नाक इ. अंगांचे छेदन केले जाते, कधी त्याचे घर, जमीन, संपत्ती इ. जप्त केले जातात आणि ह्या दुष्कृत्याने संचित पापकर्माचा उदय झाला तर परलोकात विविध दुर्गतीत भ्रमण करावे लागते आणि ह्या लोकात व परलोकात निंदेचे पात्र व्हावे लागते. म्हणून चोरी न करणेच कल्याणकारी आहे.[३७]

चोरी न करता मिळविलेला एक पैसा सुद्धा रुपयाच्या बरोबरीला असतो. तसेच जर हजारो, लाखो, करोडो रुपये जर गरीब लोकांच्या अश्रूंनी, शापाने म्हणजे त्यांचा शाप घेऊन मिळविलेले असतील तर ते विनाश करतील, सत्यानाश करतील. कोणाच्याही अधिकाराची वस्तू घेणे चोरी आहे.

एक व्यक्ती जर एखाद्या पदाचा अधिकारी आहे व तो त्या पदासाठी योग्यही आहे. परंतु ते पद त्याला न देता जर दुसऱ्या व्यक्तीला दिले, ती व्यक्ती त्या पदासाठी योग्य नसतानाही त्याला ते पद दिले गेले तर शासकवर्गाच्या ह्या कामाला सुद्धा चोरीच म्हणावी लागेल. ही अधिकाराची चोरीच आहे.

केवळ देणे म्हणजे दान नाही. देण्याच्या मागे विवेक आणि सदबुद्धीसुद्धा असणे आवश्यक आहे. 'दान देणे' यास चोरी म्हणणे जरा अयोग्यच वाटते. परंतु अधिकाराचे अपहरण करणे, अधिकाराची वस्तू न देणे ह्याला आध्यात्मिक भाषेत चोरी म्हणतात.[३८]

आपल्या कर्तव्याचे पालन न करणे ही सुद्धा चोरीच आहे. एकीकडे जर हजारो

देव अन्न कबुतरांना-पक्ष्यांना टाकले जात आहे आणि असे समजले जात आहे की आम्ही धार्मिक आहोत व दुसरीकडे त्याचवेळी हजारो, लाखो माणसे उपाशी आहेत. अशा वेळी हे मानवीय अधिकारांचे अपहरण आहे असेच म्हणावे लागेल. जो अन्नावरच जगतो त्याला ते अन्न न देता गवतादी खाणाऱ्याला ते अन्न देणे अयोग्य आहे. जेव्हा देशात अन्नाची दुर्भिक्षता होती व ते अन्न जर मनुष्यांना देऊन उरले तर ते पक्षांना, प्राण्यांना दिले जात होते. ही प्रथा योग्य होती.

'दान देणे' अयोग्य आहे असे नाही. परंतु ते क्रमवार देण्याची परंपरा आहे. हा क्रम विसरल्यावर अनर्थ घडतो. बिहार आसाम, बंगालचे लोक अन्नाअभावी आपल्या मुली, सुनांना विकतात हे ऐकल्यावर सृष्टीमध्ये किती पाप वाढू लागले आहे याची कल्पना येते. अशा परिस्थितीत मनुष्याचे हे कर्तव्य आहे की प्रथम मनुष्यांबद्दल दया, प्रेम यांचा स्रोत वाहू द्यावा.

त्यानंतर अन्य चराचर प्राण्यांसाठी त्याचा उपयोग करावा. हा खरा स्वाभाविक क्रम आहे. ह्या क्रमाचा व्यतिक्रम करणे म्हणजे भगवत् आज्ञेची चोरी करण्यासारखे आहे. अशा प्रकारची चोरी माणसाने करू नये. आपला विवेक जागृत ठेवूनच दान करावे व आपल्या कर्तव्याचे पालन करावे. [३९]

जी व्यक्ती ज्या पदावर आहे, तेथील काम प्रामाणिकपणे करीत नसेल तर ती ही चोरी आहे. उदा राजसिंहासनावर अधिष्ठित राजा आपल्या प्रजेचा आपल्या मुलाप्रमाणे सांभाळ करीत नसेल, प्रजेच्या कल्याणासाठी झटत नसेल तर तो राजा आपल्या कर्तव्यापासून च्यूत झाला असेच म्हणावे लागेल. ही सुद्धा चोरीच आहे.

आज जगात कोणी कामचोर, कुणी कर्तव्य चोर, कुणी शक्तीचोर आहे तर कुणी ज्ञान आणि दर्शनाची चोरी करीत आहेत.

तात्पर्य हे की ज्या वस्तू आपल्याला मिळाल्या आहेत, जी तत्त्वे आपल्याला प्राप्त झालेली आहेत, त्या महत्त्वपूर्ण वस्तूंचा आपण योग्य प्रकारे उपयोग केला नाही तर ती चोरी आहे.

आपल्याला विचार करण्यासाठी मन मिळाले आहे पण मनात शुभ विचार न करता, सतत वाईट विचारात मनाला गुंतवले, अशुभ विचारांचा मनात संग्रह केला तर ही मानसिक चोरी आहे.

पाच इंद्रियांचा योग्य उपयोग न करता दुरुपयोग करणे पण चोरी आहे.

वरील विश्लेषणाचा सारांश हाच आहे की, शरीर, इन्द्रिये, धनवैभव, विचार करण्यासाठी मिळालेले मन ही आपली संपत्ती आहे. ह्यांचा योग्य प्रकारे उपयोग केला नाही तर ती चोरी आहे. मिळालेल्या अमूल्य संपत्तीचा योग्य प्रकारे विनियोग करणे हे आपले आद्यकर्तव्य आहे.

ह्या संपत्तीचा उपयोग आपले जीवन उन्नत, मंगलमय आणि पवित्र करण्यासाठी केला पाहिजे.

आपल्या जवळ ज्ञानाचा खजिना आहे. आपण ते ज्ञान शास्त्र, आचार्य संत, लेखक यांच्या कडून ते मिळवले. पण ते ज्ञान आपण स्वतः निर्माण केलेले नाही. कुणाकडून तरी ते घेतले आहे. ज्यांच्याकडून आपण ते घेतले त्यांचे आपल्यावर फार उपकार आहेत. त्या उपकाराच्या ऋणातून मुक्त होण्याचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे आपल्याकडे जे ज्ञान मिळाले आहे ते योग्य लोकांना द्यावे. ज्ञान मिळवण्यासाठी कोणी जिज्ञासू आला तर त्याला ते द्यावे. त्यात आपले सौभाग्य मानावे. तसे जर करू शकलो नाही तर ही ज्ञानाची चोरी होईल व ज्ञानावरणीय कर्माचे बंध होतील.

आपल्या जीवनात माणसाने खूप धन मिळविले तसेच एखाद्याने खूप ज्ञान मिळविले पण त्याचा उपयोग इतरांसाठी केला नाही तर पुढच्या जन्मात त्या वस्तूंचा अभाव होतो. धन खूप असले ते जर गरजवंतांना दिले नाही, दान केले नाही तर पुढच्या जन्मी दारिद्रच पदरी पडते. तसेच ज्ञान असून जिज्ञासू व्यक्तीस ते दिले नाही तर पुढच्या जन्मी मंदबुद्धी जन्म मिळतो. ज्याप्रमाणे आपल्याला दोन हात आहेत. त्यापैकी एक हात महिनाभर अजिबात हलवाच नाहीतर तो उचलण्याचा प्रयत्न केला तर तो उचलताच येणार नाही. त्याचा उपयोग करता येत नाही. तसेच आपल्याकडे जी शक्ती आहे, तिचा उपयोग केला नाही तर योग्य वेळी ती सक्रिय होणार नाही. ती नष्ट होऊन जाईल. पुढच्या जन्मी सुद्धा परत मिळणार नाही. हे सत्य सतत लक्षात ठेवून आपले कर्तव्य करीत राहिले पाहिजे.

जो आपल्या जीवनात अस्तेय येऊ देत नाही. त्याच्या जीवनात अहिंसा आणि सत्य तत्व येतातच. अस्तेय असेल तर हिंसा आणि असत्याची भावना आपोआप शिथिल होत जाते.

स्तेयाचे पाच अतिचार आहेत.[४०]

१) **स्तेन प्रयोग** - चोराला चोरी करण्याचा उपाय सांगणे. चोरी करण्याची प्रेरणा देणे, किंवा दुसऱ्याकडून प्रेरित करणे किंवा चोरीच्या कामात संमती देणे.

२) **स्तेन अदाहृतादान** - चोराला चोरी करण्यात संमती दिली नाही किंवा चोरी करण्याचा उपाय ही सांगितला नाही पण चोरलेल्या वस्तू विकत घेणे.

३) **विरुद्ध राज्यातिक्रम** - विविध राज्य वस्तूंची आयात निर्यात करतात त्यावर काही बंधने घातलेली असतात अथवा कर भरावा लागतो. अशा नियमांचे उल्लंघन करून वस्तू आयात निर्यात करणे.

४) **हीनाधिक मानोन्मान** - वस्तू देताना किंवा घेताना मापात खोटेपणा करणे. घेताना जास्त व देताना कमी वजन करणे काटा मारणे इ.

५) **प्रतिरूपक व्यवहार** - असली वस्तूच्या ऐवजी नकली वस्तू देणे, ती असली आहे असे भासविणे. हे अदत्तादान विरतीचे अतिचार (दोष) आहेत. अतिचार पाचच असतात. असे नाही तर हे पाच तर उदाहरण सांगितले आहेत. यासंदर्भात अन्य अनेक प्रकाराने चोरी ह्याच्यात ग्रहण केली जाते.

स्तेयच्या ऐवजी अस्तेयव्रत जो ग्रहण करतील, ते कधीच चोरी करणार नाही. नाच घेणारही नाही आणि देणारही नाही.

ज्याच्या जीवनात विवेक आहे त्याचेच जीवन पवित्र व उज्ज्वल असू शकते.

चोरीच्या स्वरूपाला समजून घेऊन त्याचा त्याग केला पाहिजे. अचौर्यभाव अतिशय महत्त्वपूर्ण आहे. व्यक्तीच्या, देशाच्या, राष्ट्राच्या, समाजाच्या उत्कर्षासाठी या व्रताचा स्वीकार करायला पाहिजे.

स्तेयानुबंधी भावनेचे सतत चिंतन मनन केले तर अस्तेय व्रत स्वीकारणे सोपे होते. कारण कोणत्या कारणामुळे मनुष्य चोर ठरू शकतो हे जाणून घेतले तर त्याला दुष्कृत्य करण्याची इच्छाच होणार नाही.

शास्त्रामध्ये चोरीला अदत्तादान म्हणतात. अदत्तादान म्हणजे कुणाचीही वस्तू न विचारता घेणे किंवा कोणी वस्तू दिली नाही आपण ती घेणे हे पर पदार्थाचे अपहरण आहे. हृदय जाळणारी आहे. पापमय, कलुषित मलीन आहे.

दुसऱ्याचे धन घेण्याची भावना ठेवणे रौद्रध्यान स्वरूप मूर्छा आहे. ह्याचे मूळ लोभात आहे. चोरी करणारा सतत विषम देश, काळ आणि स्थानाच्या शोधात असतो. निरंतर तृष्णेने वेडापिसा झालेला असतो. त्या जीवाची बुद्धी अधोगतीला नेणारी असते.[४१]

चोरीमुळे अपकिर्ती होते. हे अनार्य कर्म आहे. चोरीमुळे मित्रामित्रात वितुष्ट येते.

मित्र शत्रू बनतात. प्रेम नष्ट होते. चोरीमुळे महाभयंकर नरसंहारही होऊ शकतो. भांडणे होतात. संयमाचा नाश होतो. अशा मनुष्यावरील विश्वास नष्ट होतो. कलंकित होतो.

स्तेय कर्म व स्तेयभावना यामुळे माणसाचे वर्तमान जीवन दुःखमय बनते व भावी जीवन दुःखमय बनते. जन्ममरण रूपी संसाराची वृद्धी होते.

निसर्गदत्त वस्तू हवा, पाणी, माती इ. ज्या सर्वांसाठी आहेत. त्याचा वापर करण्यास विरोध नाही किंवा तो चोरी म्हणता येणार नाही. ज्या वस्तूचा कोणी स्वामी नाही. अथवा एखाद्याने एखादी वस्तू सर्वांसाठी उपयोगी व्हावी म्हणून ठेवली असेल तर ती ग्रहण करण्यात व्यवहाराच्या दृष्टीने चोरी नाही. गृहस्थ अशा वस्तूंचा उपयोग करू शकतो पण साधू अशा वस्तूंचाही स्वीकार करीत नाहीत. त्यांना शकेन्द्राची आज्ञा घ्यावी लागते.

चोरीच्या पापापासून आपल्याला दूर रहायचे असेल. आपले जीवन सुखी, शांततेने जगायचे असेल तर जे काही आपल्याला मिळाले आहे. त्यात संतोष मानून आनंदाने रहावे. "संतोषी नर सदा सुखी" ह्या उक्तीप्रमाणे आपण आपले जीवन जगावे. दुसऱ्यांच्या वस्तूकडे अघाशीपणाने न पाहता किंवा ती मिळविण्यासाठी 'चोरी' सारखे हीन तुच्छ विचार मनात सुद्धा येता कामा नये.

मैथुन संबंधी भावना

मिथुनभाव अथवा मिथुन कर्माला मैथुन म्हणतात. याचेच नाव 'अब्रह्म.'

युगल म्हणजे मिथुन - स्त्री-पुरुष यांना युगल म्हणतात. दोघांच्या संभोगभाव यास मैथुन म्हणतात. ४२

अब्रह्मचर्य अथवा मैथुन ही अशी भावना आहे की ती मानवासकट सर्व प्राण्यांमध्ये दिसते. ही भावना म्हणजे दलदल आहे. यात प्राणी गुंतला की तो त्यात घसरतच जातो. मैथुन ही बेडी आहे जी संसारात प्राण्याला गुंतवून ठेवते.

हा मायाजाल आहे. स्त्रीवेद, पुरुषवेद, नपुंसकवेद असे याचे तीन चिह्न आहेत.

मैथुन ब्रह्मचर्याचा घात करणारा आहे.

तप, संयमासाठी विघ्नरूप आहे. सम्यक्चारित्राचा विनाश करणारा आहे. म्हणून साधकाला ते त्याज्य आहे.

यामुळे जीव जरा, मरण, रोग, शोक यास प्राप्त होतो. याचे मूळ कारण

दर्शनमोहनीय आणि चारित्रमोहनीय आहे. हे दूर करण्यासाठी तीव्र मनोबल, दृढसंकल्प, तपश्चर्या इ. साधना करायला पाहिजे. साधकाने या मार्गाचा अवलंब घेतला पाहिजे.

मैथुन भावना निर्माण होताच त्याचे दुष्परिणाम किती भयंकर आहेत याचे चिंतन करावे. अब्रह्म हे अशुभ आचरण आहे. हे मानसिक संकल्पामुळे उत्पन्न होणारे पाप आहे. त्यामुळे आत्मिक गुणांचा घात होतो. संयम इ. सद्गुण नष्ट होतात. शील घातक असल्यामुळे सदाचाराचा विरोधी आहे.

मानवाच्या मनात जेव्हा तीव्र मैथुन भाव येतात तेव्हा त्याची सद्बुद्धी नाश पावते. सदसद्विवेक, कर्तव्य, अकर्तव्य याचे भान रहात नाही. आपले हित अहिताचा भविष्यात होणाऱ्या दुष्परिणामाचा विसर पडतो. सम्यग् विचार करू शकत नाही. म्हणूनच अशा प्रवृत्तीस विषयांध प्रवृत्ती म्हटले जाते. अशावेळी तो आपल्या यश, कुल, शील इ. चा थोडा सुद्धा विचार करीत नाही.[४३]

पूर्वीच्या काळी आपापसात जे भयंकर युद्ध झाले, अतोनात मनुष्यहानी झाली, त्याचे मूळ कारण मैथुनच होते.

वास्तविक मैथुन संबंधी भावना अत्यंत हीन आहे. यामुळे आत्मा मलीन होतो. आजचे जीवन तर रसातळास जातेच पण भविष्य सुद्धा अत्यंत दुःखमय होते.

अब्रह्मरूप अधर्माने सुख अत्यंत कमी पण भयंकर दुःख देणारा आहे. याचे फळ भयंकर आहे आणि पापयुक्त आहे.[४४]

ब्रह्मचर्य जीवनाचे पोषक तत्त्व आहे. अब्रह्मचर्याने मानसिक व शारीरिक दोन्ही शक्तींचा ऱ्हास होतो.

अब्रह्म म्हणजेच सद्गुणांचा ऱ्हास आणि दोषांचे पोषण होय.[४५] ही प्रवृत्ती दोषांचे पोषण करणारी आहे.

म्हणून मैथुनाचे दुष्परिणाम किती आहेत हे जाणावे व मनावर संयम ठेवावा. मैथुन भावनेसंबंधी चिंतन केल्याने मनुष्य त्या विषयात आसक्त होतो. जसा खिडकीतून चोर आत घुसतो तसे मनाच्या दाराने विषय विकार आत येतात. म्हणून विषयासंबंधी विचारात मन गुंतू न देता नामस्मरणात जोडावे.

पुष्कळवेळा मनुष्य विषपान केल्याने जगू शकतो पण खाल्लेल्या विषाचा विचार केल्याने मरू शकतो. तसेच मैथुन सेवन न करता ही त्या विचाराने भावनेने आत्म्याचे पतन होते.

कामभोगासारखा दुसरा शत्रू नाही. दुसरी व्याधी नाही. संसारभ्रमणाचे मूळ कारण विषयासक्ती आहे. जो या चिंतनात गुंततो मोक्षद्वारापर्यंत जाऊच शकत नाही. मोक्षमार्गातील सर्वात मोठा अडसर विषयासक्ती आहे.

सर्पाचा फणा जसा भयानक वाटतो त्याचप्रमाणे विषयभोग भयंकर असतात. विषयांध माणसाला वाटते, अमुक वयापर्यंत भोग भोगून घ्यावे तृप्त होऊन जावे. परंतु वासना कधीच वृद्ध होत नाही. माणूस वृद्ध झाला तरी वासना कधीच तृप्त होत नाहीत. अग्नीत इंधन टाकले की ती भडकते तशाचप्रमाणे विषयविकारांच्या अग्नीत तृष्णारूपी इंधन टाकत राहिलो तर अग्नी कधीच शांत होणार नाही. हीच स्थिती भोग भोगणाऱ्यांची आहे.

भोग किंपाक फळासारखे आहे. किंपाक फळ दिसायला अतिशय सुंदर, आकर्षक असते पण ते फळ खाल्ले की माणूस तत्काळ मृत्यू पावतो. ह्याचप्रमाणे कामवासनाचे फळ अतिशय दुःखदायक आहे. म्हणून त्यात आसक्ती ठेवू नये.[४६]

ब्रह्मचर्य व्रताचे पाच अतिचार आहेत.

१) **इत्वरपरिगृहीतागमन** - नेहमी पुरुषांच्या सहवासात राहण्याचा जिचा स्वभाव असतो तिला इत्वरी म्हणतात. परिगृहिता म्हणजे जिचा एक पती आहे. इत्वर परिगृहीतागमन म्हणजे काही वेळा पुरता पर-स्त्रीचा स्वीकार करणे, भोग उपभोग घेणे.

२) **अपरिगृहीतागमन** - जी स्त्री वेश्या किंवा व्यभिचारिणी आहे, जिचा एक पुरुष स्वामी नाही ती अपरिगृहीत स्त्री. एका पुरुषाच्या अधिकारात, आज्ञेत नाही अशा स्त्रीचा उपभोग करणे म्हणजे अपरिगृहीता गमन आहे.

३) **अनङ्गक्रिडा** - निसर्गाच्या विरुद्ध जाऊन अस्वाभाविकपणे काम सेवन करणे म्हणजे अनङ्गक्रीडा.

४) **परविवाह करणे** - इतरांच्या विवाह घडवून आणण्याच्या कामात मध्यस्थी करणे.

५) **कामभोगतीव्र अभिलाषा** - विषय वासनेची तीव्र अभिलाषा करणे. [४७]

वरील सर्व दोष मैथुन भावनेने लागतात. यापासून दूर राहणे, साधकाचे कर्तव्य आहे.

या संसारात दहा प्रकारचे अब्रह्म महादुःखाचे कारण आहेत.

१) अतिभोजन करणे

२) तेल इ. ने शरीराचे मर्दन करणे

३) सुगंधित पुष्प, अत्तर इ. चा उपयोग करणे

४) कामविकार निर्माण करणारे संगीत, नृत्य इ. पाहणे.

५) शय्या-क्रीडागृह, चित्रशाला इ. शोध करणे

६) नयनबाणाने घायळ करणाऱ्या स्त्रियांच्या सहवासात राहणे

७) शरीराला वस्त्र, अलंकाराने विभूषित करून आकर्षण निर्माण होईल असा वेश धारण करणे

८) पूर्वी भोगलेल्या सुखाचे स्मरण करणे

९) शब्द, रूप इ. इन्द्रिय विषयात आसक्ती ठेवणे

१०) इन्द्रियांना पुष्ट करणारे चविष्ट पदार्थाचे म्हणजे तामसी पदार्थाचे सेवन करणे.[४८]

यापैकी कोणत्याही एकाचे जरी सेवन केले तरी ब्रह्मचर्याचे पतन होते. म्हणून साधकाने या गोष्टीपासून सतत दूर राहण्याचाच प्रयत्न करायला पाहिजे. जेणे करून मनसुद्धा विषयासक्त होणार नाही.

अब्रह्मचारीचे चित्त सतत विषयकामनेत गुंग असते. मोहाचा पडदा त्याच्या डोळ्यावर असतो. कार्याकार्याचा त्याच्या जवळ विवेक नसतो. ज्याप्रमाणे हत्तीला पकडण्यासाठी जंगलात हत्तीला हत्तीण दाखवतात व त्याला मोहात बळी पडलेल्या हत्तीला पकडले जाते. त्याचप्रमाणे माणूस विषयवासना रूप स्त्रीच्या फंदात पडला की त्याचा सर्वनाश तर होतोच पण परलोकात अशुभगती प्राप्त होते. म्हणून ब्रह्मचर्याचे पालन करावे अब्रह्मचर्याचा त्याग करावा.[४९]

आपल्या पत्नीशिवाय बाकी सर्व स्त्रियांना माता-बहिण मानावे. परस्त्रीचा मोह कधीच करू नये.[५०] कारण मैथुन सेवनामध्ये प्रत्यक्ष हिंसा आहे. ज्याप्रमाणे तिळाने भरलेल्या नळीमध्ये खूप गरम लोखंडाची सळई घातली तर ते तिळ जळून जातात त्याचप्रमाणे मैथून क्रियेत स्त्रीच्या योनीत असलेले जीव लगेच मरतात.[५१] ज्याप्रमाणे राक्षस माणसाचे रक्त शोषून घेतो व जीवन नष्ट करून टाकतो त्याचप्रमाणे वासना मानवातील ज्ञान इ. गुणांचा व संयमी जीवनाचा, धर्मरूपी धनाचा सर्वनाश करते.

माणसाच्या शरीराला जाळते, मदोन्मत हत्ती व क्रोधी साप एकाच देहाला नष्ट करतो पण अब्रह्मचर्याची भावना ज्ञान, शील, विनय, लज्जा, वैभव, विज्ञान व शरीर सर्व इहलौकिक व पारलौकिक गुणांना जाळून भस्म करते.[५२]

अब्रह्मचर्याचा दुसरा अर्थ आहे. स्व-स्वभावाला सोडून, पर-स्वभावात, पर-पदार्थात रमण करणे. आसक्त होणे. स्व-स्वभाव म्हणजे ब्रह्म. पर-स्वभाव अब्रह्म आहे. अब्रह्मात जीवन जगणे म्हणजेच संसार आहे.[५३]

परिग्रह संबंधी भावना

पाणी वहात नसेल तर ते घाणेरडे व अशुद्ध होते. तशा पाण्याला दुर्गंधी येते. खूप दिवस घर बंद ठेवले तर ते उघडताच कुबट वास येतो. त्याचप्रमाणे जर आपल्या जीवनात सद्चारित्र नसेल तर जीवन अशुद्ध होते. घाणेरड्या पाण्याप्रमाणे त्यात दुर्गुणांची दुर्गंधी येऊ लागते.

जो माणूस धन संग्रह करून ठेवतो, त्याच्या जीवनात हिंसा, असत्य, चोरी, लोभ इत्यादी अनेक दुर्गुणांची दुर्गंधी येऊ लागते. धनसंपत्तीवर आसक्ती न ठेवता त्याचे योग्य वितरण केले पाहिजे व दान केले पाहिजे. दान करून धनाचा प्रवाह वाहता ठेवला तर कोणतेही दुर्गुण आपल्यात निर्माण होत नाहीत.

आज मानवी दृष्टिकोण पार बदलला आहे. धन-संपत्तीच्या लोभामुळे अनेक दुष्कृत्य होऊ लागली आहेत. मानव धनाला खात नाही तर धन मानवाला खात आहे. धनाच्या लोभामुळे माणसातील माणुसकी नष्ट होत आहे. जोपर्यंत जीवनात संग्रहवृत्ती आहे, तोपर्यंत अन्याय हिंसा चालूच राहणार. अशा माणसाच्या जीवनात धर्म, कर्माला महत्त्वच नाही.

श्रमण भगवान महावीरांनी म्हणूनच सांगितले आहे की दोन कारणांमुळे मनुष्य वीतराग धर्माचे श्रवण करू शकत नाही. ''आरम्भचेव परिग्गहे चेव'' आरम्भ आणि परिग्रह. हे दोन्ही साधनेच्या मार्गावरील सर्वात मोठी अडचण आहे.

परिग्रहाची व्युत्पत्ती करताना शास्त्रकार म्हणतात - ''परिग्रहणं परिग्रह'' अर्थात जे ग्रहण केले जाते तो परिग्रह आहे. ग्रहण तेच केले जाते ज्यावर ममत्वभाव आहे. हा ममत्वभावामुळेच जन्म-मरणाची वृद्धी होते. ममत्वभाव आत्म्याला उन्नत होऊ देत नाही. मोक्षमार्गावरील सर्वात मोठा हा अडथळा आहे.

ममत्वभाव जडासंबंधी असो किंवा चेतनासंबंधी असो. तीन लोकासंबंधी असो किंवा परमाणुसंबंधी असो,

ज्यामुळे क्रोध, मान, माया, लोभ उत्पन्न होतात ते सर्व परिग्रहच आहेत. धर्माचरणासाठी शरीर असणे आवश्यक आहे, पण फक्त शरीरावर अतिममत्व भाव असेल तर शरीरसुद्धा परिग्रह आहे.

आत्म्याच्या उन्नत अवस्थेपर्यंत पोहोचण्यास परिग्रह हे बन्धन आहे. त्यामुळे पुन्हा-पुन्हा चतुर्गती संसारात भटकावे लागते. उर्ध्वगती मिळू शकत नाही.

परिग्रह दोन प्रकारचे १) ब्राह्य आणि अभ्यंतर[५४]

अभ्यंतर परिग्रहात मिथ्यात्व, अविरती, प्रमाद, कषाय इत्यादी येतात. यांची उत्पत्ती मनात होते. ज्या परिग्रहाचा मन किंवा हृदयाशी संबंध आहे आणि ते विचाररूप आहेत ते अभ्यंतर परिग्रह होत.

बाह्य परिग्रहाचे दोन भेद आहेत - जड आणि चेतन. ज्यांच्यात प्राण नाही ते जड पदार्थ, जे निर्जीव आहेत. उदा. वस्त्र, पात्र, सोने, चांदी घर इत्यादी. चैतन्य म्हणजे मनुष्य, पशुपक्षी, पृथ्वी, वृक्ष इत्यादी सर्व सजीव पदार्थ. मनुष्य बाह्य व अभ्यंतर परिग्रहाने युक्त आहे.

हा संसार जड आणि चैतन्याच्या संयोगाने बनलेला आहे. ह्या पदार्थांना प्राप्त करण्यासाठी मनुष्य सतत प्रयत्न करीत असतो. आणि मग त्या वस्तूंच्या संरक्षणाच्या चिंतेत सतत बुडालेला असतो. ही जी भावना ती आहे परिग्रहानुबंधी भावना.

बाह्य परिग्रह नऊ प्रकारचे आहेत. धन, धान्य, क्षेत्र, वास्तुद्विपद, चौपद, हिरण्य, सुवर्ण, कुवियधातू इत्यादी. ह्याचे अतिक्रम व अतिचार आहेत. मनुष्य ह्या बाह्य पदार्थामध्ये सर्वात अधिक ममत्व असते ते कंचन कामिनीमध्ये. कंचन म्हणजे सोने. जड पदार्थात सोन्याचा समावेश होतो आणि कामिनी म्हणजे स्त्री. यात सर्व चैतन्य पदार्थांचा समावेश होतो.

बाह्य परिग्रहाचे व्यवहारात अधिक प्राधान्य आहे. परंतु बाह्य परिग्रहाचा आधार आभ्यंतर परिग्रह आहे.

आभ्यंतर परिग्रहावरील ममत्व जेव्हा कमी होईल, निदान कमीत कमी मिथ्यात्व रूपी परिग्रह जरी दूर झाला तरच माणसाला समज येईल की वस्तू, विचार व कार्य हे

सुद्धा परिग्रह आहे. तदनंतर चारित्र मोहनीय कर्माचा जितक्या प्रमाणात क्षय, उपशम अथवा क्षयोपक्षम होईल तितक्या प्रमाणात परिग्रहाचा त्याग होऊ शकेल.[५५]

या शिवाय परिग्रहापासून सुटका मिळणे फारच कठिण आहे. संपूर्ण पृथ्वीवरील अखण्ड साम्राज्याचे सुख भोगले तरी मानवाची तृष्णा शांत होत नाही. ''जहा लाहो तहा लोहो''[५६]

जितक्या प्रमाणात लाभ होत जातो तितक्या प्रमाणात लोभ वाढत जातो. म्हणून परिग्रह वाढवून संतोष मिळेल अशी भावना ठेवतात ते आगीत तूप टाकून आग विझविण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे. अग्नीत तूप टाकून ती विझत नाही हे जितके सत्य आहे त्याचप्रमाणे परिग्रह वाढवून संतोष मिळणे शक्य नाही. परिग्रहाचा त्याग करण्यासाठी लोभाचा प्रथम त्याग करणे जरूरी आहे.

मनुष्य आयुष्यभर जे वेगवेगळे काम करतो त्याने परिग्रहाची वृद्धी होते. प्राचीन काळी पुरुषांसाठी बहात्तर कला व स्त्रियांसाठी चौसष्ट कला शिकवल्या जात त्यासुद्धा काय आहेत ? परिग्रहाची भावनाच त्यामागे आहे.[५७]

आधुनिक काळात तर इतक्या प्रकारच्या कलांचा आविष्कार झाला आहे की त्यांची यादी करणे ही कठीण आहे. या सर्वांच्या मागे परिग्रहाची भावना आहे.

परिग्रह म्हणजे संग्रह करणे एवढाच याचा अर्थ नाही. परिग्रहाची व्याख्या फार विशाल व सखोल आहे. आपण ज्या संप्रदायाला मानतो ह्या संप्रदायाबद्दल ममत्व असणे हा सुद्धा परिग्रह आहे. त्या संप्रदायाबद्दल मोह असणे हा खरा परिग्रह. आपल्या संप्रदायाबद्दल ममता व अन्य संप्रदायाबद्दल द्वेष असणे हा एक भयंकर परिग्रह आहे. आमचाच संप्रदाय श्रेष्ठ, आमचेच साधू खरे साधू, तेच उत्कृष्ट आणि क्रिया करण्यात उत्कृष्ट आहेत, अशी आपल्याच फक्त धर्माबद्दल आसक्ती असणे हाही परिग्रहच आहे. त्याचप्रमाणे राष्ट्र, प्रांत भाषा इ. बद्दल अंधविश्वास किंवा कट्टरता, आसक्ती, मूर्च्छाभाव असणे हे परिग्रहाचेच रूप आहे.

म्हणूनच दशवैकालिक सूत्रात लिहिले आहे की ''मुच्छा परिग्गहोवुतो''[५८]

मूर्च्छाभाव वास्तविक परिग्रह आहे. तत्वार्थ सूत्रात सुद्धा ''मुर्छा परिग्रहः'' हे सूत्र आहे.[५९]

निश्चयदृष्टीने विचार केला तर प्रत्येक वस्तू परिग्रह आहे आणि मूर्च्छा भाव नसेल तर वस्तू उपलब्ध असूनही अपरिग्रह आहे.[६०]

"ग्रह"चा शाब्दिक अर्थ 'पकडणे' होतो. आकाशात दोन प्रकारचे ग्रह आहेत. एक सौम्य आणि एक क्रूर. हे ग्रह मनुष्यसृष्टीपासून दूर आहेत. तरीही त्यातील काही ग्रह मनाला आनंदित करतात. दुसरे ग्रह आतंकित करतात. मग आपण या दूर असणाऱ्या ग्रहांची शांती करण्यासाठी अनेक उपाय योजतो. परंतु हृदयरूपी गगनमंडपात असलेल्या परिग्रह रूपी मोठ्या ग्रहाची शांती करण्यासाठी काहीच उपाय योजीत नाही. परिग्रह जीवाला चारी बाजूने घेरतो. फक्त शरीरानेच नव्हे तर मनाने आणि इंद्रियांनी सुद्धा बद्ध होतो. "परिसमन्तात गृह्यते इति परिग्रह."

सरकारी शिपाई तर अपराध्याच्या शरीराला बांधतो पण परिग्रह तर आत्म्याला जखडून टाकतो. गगन मंडळात असलेले ग्रह साधारण आहेत पण परिग्रह तर महाग्रह आहे. भौतिकवादी आस्था ही परिग्रहाची जननी आहे.

परिग्रहाचे दुसरे नाव 'दौलत' आहे. ज्याचा अर्थ दोन लत म्हणजे दोन वाईट सवयी. ह्या दोन वाईट सवयीमध्ये पहिली सवय म्हणजे परिग्रह. म्हणजे ज्याच्याजवळ दौलत आहे तो कोणाचाही हितोपदेश ऐकत नाही. गुणी, खरा सल्ला देणारे आणि वंदनीय व्यक्तींबद्दल आदरभाव नसतो. म्हणजेच परिग्रहामुळे ज्ञानचक्षुवर आवरण आलेले असते.[६१]

संसारात पित्याला आपल्या पुत्राचा उत्कर्ष पाहण्याची इच्छा असते. आणि अध्यात्म क्षेत्रात गुरूला शिष्याचा उत्कर्ष पाहण्याची इच्छा असते. परंतु ह्या परिग्रहाच्या आसक्तीमुळे अमृताचे विष होते.

राजाश्रेणिक व पुत्र कोणिक यांचा इतिहास असाच आहे. राजा श्रेणिक वृद्ध झाले होते तरी सारा राज्यकारभार स्वतःच पहात होते. ह्यांचा पुत्र कोणिक मनात विचार करतो माझे किती दुर्दैव आहे की वडील वृद्ध झाले तरी राजगादी काही सोडीत नाहीत. आणि त्यांना मृत्यू ही येत नाही. हे जीवंत आहेत तोपर्यंत मला काही राजगादी मिळणार नाही. मी राजा होऊ शकणार नाही. कोणिक ही राजपुत्र होता. खूप सुखात लोळत होता, पण राजा होण्याचा जो परिग्रह (आसक्ती) तो त्याला काही स्वस्थ बसू देत नव्हता. शेवटी युक्ती-प्रयुक्तीने आपल्याच पित्याला तुरुंगात डांबले व स्वतःला सम्राट घोषित केले. इतके करूनही त्याचे समाधान झाले नाही. त्याच्या भावाजवळ एक हत्ती आणि हार होता तो ही त्याला हवा होता. तो घेण्यासाठी मिळविण्यासाठी त्याने आपले आजोबा (आईचे वडील) ज्यांच्याजवळ भाऊ रहात होता त्यांच्यावरही आक्रमण केले. रक्ताचे पाट वाहिले. या सर्व अनर्थाचे कारण एकच परिग्रह, मूर्च्छा, ईच्छा.[६२]

मनुष्य स्वतःची प्रतिष्ठा म्हणजे परिग्रहाची वृद्धी मानतो. हिंसकाने हिंसा केली तर लज्जित होतो. खोटे बोलणाऱ्याला कोणी खोटारडा म्हटले तर अपमान वाटतो. चोराने चोरी केली तर तो मी चोर आहे अशी काही दवंडी पिटत नाही. व्यभिचारी लपून-छपून व्यभिचार करतो.

ह्या सर्व पापांचे आचरण करणारे पापाची प्रशंसा करीत नाहीत. परंतु परिग्रही असणारा पापी स्वतःला पापी समजतच नाही. आणि हे असे आसक्तीयुक्त पाप करूनही लज्जित होत नाही. उलट स्वतःला मोठा भाग्यवान समजतो. आपला गौरव मानतो. जो जितका मोठा परिग्रहधारी पापी तो तितकाच मोठा, पुण्यशाली समजला जातो. वास्तविक पुण्याच्या पुण्यशाली प्रकारामध्ये धन-संपत्तीचे कुठे नावनिशाण सुद्धा नाही. मग धनवानांना पुण्यशाली कशाच्या आधारावर म्हणतात हा एक प्रश्नच आहे.

मनुष्य जन्म मिळणे पुण्य आहे, पण पैसा मिळणे पुण्य आहे हे काही सत्य नव्हे. पैशामुळे तर अनेक पापे होतात. पैसा तर परिग्रह आहे म्हणजे पापच. परंतु आश्चर्य आहे की धनाच्या गुलामांनी त्याला पुण्य सांगून त्यावर आवरण पुण्याचे घातले आहे. ही मानवजातीच्या पतनाची पराकाष्ठा आहे. जोपर्यंत भगवान महावीरांच्या अपरिग्रह सिद्धांताला स्वीकारले जाणार नाही तो पर्यंत कल्याण नाही. आणि अशान्ती ही दूर होणार नाही.[६३]

कारण ''अर्थमनर्थ भावय नित्यम्'' अर्थ हाच खरोखर अनर्थ आहे.

सगळे दोष परिग्रहामुळेच उत्पन्न होतात. ''हे माझे'' असा संकल्प असला म्हणजे संरक्षणाची भावना होते. आणि यामुळेच हिंसा होते. असत्य बोलले जाते, चोरी केली जाते. मैथुन प्रवृत्ती जागृत होते. नरक इत्यादीचे दुःख ह्या परिग्रह भावनेमुळेच भोगावे लागतात.[६४]

ज्याप्रमाणे धाणेरड्या पाण्याच्या डबक्यात दगड टाकाला तर तळाशी असणारा चिखल उसळून वर येतो त्याचप्रमाणे परिग्रह जीवातील कषायाला प्रकट करतो.[६५]

परिग्रहाच्या स्वरूपाचे चिंतन करणारी व्यक्ती त्याचे दुष्परिणाम जाणते. अशा आत्मार्थी साधकाने पर पदार्थापासून दूर रहावे त्याचा त्याग करावा आणि आत्मस्वरूपाच्या भावनेत लीन होऊन जावे. ज्याला आत्मस्वरूप प्राप्त करण्याची इच्छा नाही. आत्म्याच्या उत्कर्षाची चिंता नाही तो पर द्रव्याचा त्याग करू शकत नाही.

बाह्य पदार्थ माझे नाहीत. मी कधीच त्यांचा होणार नाही. असे चिंतन करावे व बाह्य वस्तूंच्या आकर्षणापासून स्वतःला दूर ठेवून मोक्षाची अभिलाषा ठेवावी.

वस्तूबद्दलची परिग्रह भावना सोडणे लोकांना सोपे वाटते पण फक्त वस्तूची इच्छाच असते असे नाही तर मनुष्याच्या जीवनात परिग्रह वाढविणाऱ्या तीन एषणा-इच्छा आहेत. १) वित्तेषणा २) पुत्रैषणा ३) लोकेषणा.

कदाचित वित्तेषणा म्हणजे धन इत्यादीवरील मूर्च्छा सुटू शकते.

पुत्रैषणा-पुत्र, पत्नी, परिवारावरील ममत्व पण सुटू शकते.

पण लोकेषणा प्रसिद्धी, प्रशंसा, कीर्ती, मान-सन्मान यावरील आसक्ती सुटणे अत्यंत कठीण आहे. मोठे-मोठे साधक याच्या बळी पडतात.

सर्वात कठीण आणि महान परिग्रह आहे, राग-द्वेष. कषायभाव विषयवासनेने ग्रासलेले विचार आणि मनाची अतृप्त तृष्णा, लालसा, आकांक्षा, कामना या अशुद्ध भावनेने युक्त व्यक्ती परिग्रही आहे मग त्याच्याजवळ बाह्य पदार्थ असो वा नसो कमी असो किंवा जास्त असो किंवा अजिबात नसो. ममत्वभाव आहे म्हणजेच परिग्रह.

संसारात माणसावर जी संकटे येतात त्याचे कारण परिग्रह आहे. परिग्रह असले तरी दुःख, नसेल तरी दुःख.

परिग्रह उपार्जन करणे दुःख आहे. परिग्रह येणे दुःखकारक व जाणे हे ही दुःखकारक, म्हणून दुःखदायी अशा परिग्रहाचा धिक्कार केला पाहिजे.[६६]

परिग्रही निर्दयी असतो. ज्याच्या हृदयात दया, करुणा आहे तो परिग्रहासाठी दुसऱ्याला कधीच त्रास देणार नाही. तो स्वतः जवळही परिग्रह संग्रह करणार नाही. परिग्रहामुळे द्रोह, वैर निर्माण होतात. जिथे वैर-शत्रुत्व तेथे प्रेम नसरणारच.

आपल्याला असे वाटते की प्राप्त वस्तूंचा संग्रह करणे व त्यावर ममत्व असणे म्हणजे परिग्रह. पण ज्या वस्तू आपल्याजवळ नाहीत व मिळण्याची शक्यता ही नाही अशा वस्तू प्राप्त व्हाव्यात अशी तीव्र इच्छा, उत्सुकता असणे हा ही परिग्रहच आहे.

श्रमण भगवान महावीरांच्या दहा श्रावकांपैकी प्रथम श्रावक आनंद त्यांच्याजवळ जेवढी संपत्ती होती ती ठेवून त्यापेक्षा अधिक न मिळविण्याचा त्यांनी निश्चय केला. अप्राप्त वस्तूंचा त्याग केला. आपल्याला प्रश्न पडतो की अप्राप्त वस्तूंचा त्याग केला तर त्यात काय विशेष केले. ज्या वस्तू मिळाल्याच नाहीत तर ज्यांच्यासमोर त्याग करण्याची प्रतिज्ञा घेतली. ती पण कोणी साधारण व्यक्ती नव्हती. साक्षात् प्रभुमहावीरांच्या समक्ष त्याग केला होता. यात शंका करण्याचे कारणच नाही. शास्त्रातही उल्लेख आहे की ''इच्छापरिमाणं

६७ आनंद श्रावक आपल्या इच्छेचा परिमाण करीत आहे.

सर्व प्रथम माणसाच्या मनात वस्तू प्राप्त करण्याची इच्छा जागृत होते. संकल्प उठतात. नंतर ती प्राप्त करण्यासाठी अथक प्रयत्न सुरू होतात. याचा अर्थ जर इच्छाच नसेल तर, धावपळ करण्याची आवश्यकताच नाही. आणि संग्रह करण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही. म्हणजे इच्छाच सर्वात मोठा परिग्रह आहे.

मूर्छाछन्नधियां सर्वं, जगदेव परिग्रहः ।
मूर्छया रहितानां तु, जगदेवा परिग्रहः ।

अर्थात् - ज्यांची मनोभावना आसक्तीने ग्रासलेली आहे, अशांच्या दृष्टीने तर संपूर्ण संसारच परिग्रहमय आहे. परंतु जो मूर्च्छा, आसक्ती ममत्वपासून दूर आहे. या तिन्ही ज्याच्या मनात नाही त्याच्यासाठी संपूर्ण संसार त्याच्याजवळ असला तरी त्याला परिग्रह शिवतसुद्धा नाही. तो परिग्रही नाही.

म्हणून परिग्रहानुबंधी भावनेत परिग्रह संग्रहित करण्याची जेव्हा इच्छा निर्माण होते, तेव्हा असे चिंतन करावे की या इच्छा कधीच तृप्त होत नाही. म्हणून इच्छांचा त्याग करण्याचे चिंतन करावे. अपरिग्रही, अनासक्त भावनेचे चिंतन करावे.

आपल्या जवळ जे काही आहे, त्यावरील आसक्ती कमी केली तर परिग्रह ही कमी होईल. परिग्रह असतानासुद्धा अपरिग्रही राहण्याची किमया जमली तर ती मोठी कला अवगत झाल्यासारखे होईल. या कलेला हस्तगत करण्यासाठी परिग्रहामुळे जे दुष्परिणाम होतात त्याचे चिंतन करावे.

निष्परिग्रही, ममत्वरहित जीवन जगण्याचा प्रयत्न करावा. जो या कलेमध्ये निपुण होईल तो संसारात कोणत्याही अनुकूल किंवा प्रतिकूल परिस्थितीत हर्ष-शोक करणार नाही. त्याच्याजवळ लाखो-करोडोंची संपत्ती आली काय किंवा गेली काय, परिवार वाढला काय किंवा नष्ट झाला काय, कितीही उलथापालथ झाली तरी तो प्रत्येक वेळी मनाचा समतोल ढळू देणार नाही. सुखात अतिआनंदी आणि दुःखात अतिदुःखी होणार नाही. ही समत्वाची साधना केल्यानेच प्राप्त होते.

अनासक्त भावना जोपासली तर तृष्णा रोग लागू पडणार नाही. त्याच्या अंतहृदयापर्यंत न दुःख शिरकाव करू शकेल न सुख.

चार कषायानुबंधी अशुभ भावना

अभिधान राजेन्द्र कोशमध्ये नऊ अशुभ भावनांचे वर्णन आहे. हिंसा, असत्य इत्यादी पाच भावनांचे विवेचन केल्यावर आता चार कषाय भावनांचे विवेचन करू या.

१) क्रोधानुबंधी भावना २) मानानुबंधी भावना ३) मायानुबंधी भावना ४) लोभानुबंधी भावना.

या चार अशुभ भावनांचे वर्णन करण्यापूर्वी यांना कषाय का म्हटले आहे, यावर विचार करू या.

कषाय -

आत्मामध्ये जे कलुषित परिणाम आहेत त्याला कषाय म्हणतात. 'कष' म्हणजे संसार (जन्ममरण) 'आय' म्हणजे लाभ. ज्यामुळे संसारातील परिभ्रमण होते ते कषाय होत.[६८] संसाराचा महाल कषायावर टिकलेला आहे. क्रोध, मान, माया, लोभ हे चार संसाररूपी महालाचे स्तंभ आहेत. जोपर्यंत हे खांब मजबूत असतील तोपर्यंत संसारमहल मजबूत राहील. तोपर्यंत जन्म, मरण, नरक, तिर्यंच निगोद इत्यादींचे दुःख जीवाला भोगावे लागतात.

श्रमण म. महावीरांनी सांगितले आहे -

चत्तारि एए कसिणा कसाया सिंचति मूलाइं पुणब्भवस्स[६९]

कषायामुळे आत्म्याचे जितके नुकसान होते तितके अन्य कोणत्याच शत्रूमुळे होत नाही. कषाय असणारा मनुष्य राक्षससारखा वागतो. क्षमाशील मनुष्य देवतुल्य आहे. कषाय विष आहे. कषायाचे शमन करणे अमृतासारखे आहे. ज्याचा आत्मा कषाय युक्त आहे. त्या आत्म्यात ज्ञान, दर्शन, चारित्र्याचा समावेश होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे काळ्या कपड्यावर दुसरा रंग चढत नाही. त्याचप्रमाणे कषायाने कलुषित आत्म्यावर धर्मरंग चढत नाही.

ह्या चार कषायांमुळे अशुभ भावनेची उत्पत्ती होते. आणि हे चार कषाय मोहामुळे उत्पन्न होतात. राग आणि द्वेष ही मोहाची दोन रूपे आहेत. राग भावनेमुळे माया आणि लोभ कषाय उत्पन्न होतात आणि द्वेषामुळे क्रोध आणि मानाची उत्पत्ती होते.

स्थानांग सूत्रात वर्णन आहे- ''दोस वत्तिया मुच्छा दुविहा कोहे चेव माणे चेव, पेज्ज वत्तिया मुच्छा दुविहामाए चेव लोहे चेव''[७०]

जो राग-द्वेष सोडतो तोच वीतरागी होऊ शकतो.

कषायामुळे फक्त आत्माच नव्हे तर मन आणि शरीर सुद्धा विकृत बनतात. सहा रसांमधील 'कषायला' एक रस आहे. ती तोंडात घालताच तोंड वेडेवाकडे होते. त्याचप्रमाणे कषायी माणूस कोणालाच आवडत नाही. प्रिय वाटत नाही. कषायामुळे सद्गुणांचा नाश होतो.

"क्रोधप्रीतिचा नाश करतो." मान विनयाचा नाश करतो, माया-कपट मित्रताचा नाश करते, आणि लोभ सर्वच गुणांचा नाश करतो.[७१]

कषाय आत्म्याचे आंतरिक शत्रू आहेत. मनुष्याच्या अंतःकरणात प्रवेश करून ते त्याचाच विनाश करतात. ज्या झाडावर बसतात त्याचीच फांदी कापून टाकतात. आत्म्याचे पतन करणारे हे कषाय आहेत, म्हणून कषाय जिंकायला पाहिजे.

विस्ताराने कषायाचे २५ प्रकार (भेद) आहेत.

१) अनन्तानुबंधी क्रोध - दगडाला पडलेली चीर पुन्हा कधीही साधली जात नाही. तसा क्रोध मरेपर्यंत जात नाही.

२) अनन्तानुबंधी मान - दगडाच्या खांबासारखा जो कधी झुकत नाही.

३) अनंतानुबंधी माया - बांबूच्या मुळाप्रमाणे ज्याच्या गाठीत गाठ असते.

४) अनंतानुबंधी लोभ - असा किरमिजी रंग जो जळून जातो पण रंग तसाच राहतो.

ही अनन्तानुबंधी कषाय-चौकडी उत्पन्न झाल्यानंतर जीवनाच्या अंतपर्यंत जात नाही. ह्या कषायाने युक्त माणूस मृत्युप्राप्त करून नरकात जातो. ह्या कषायात असणारे मिथ्यात्वाच असतात.

५) अप्रत्याख्यानावरण क्रोध - जमिनीवर पडलेली चीर जी पाऊस पडल्यावर परत जुळून जाते.

६) अप्रत्याख्यानावरण मान - हाडांच्या खांबासारखे थोडा प्रयत्न केला तर वाकू शकतो.

७) अप्रत्याख्यानावरण माया - मेंढीच्या शिंगाप्रमाणे वाकडी तिकडी विकृतीने युक्त.

८) अप्रत्याख्यानावरण लोभ - गाडीच्या चाकाला लावलेल्या वंगणासारखे साबण, क्षार इ. प्रयोगाने घालवू शकतो.

ह्या अप्रत्याख्यानी कषायाने युक्त श्रावक व्रतांना ग्रहण करू शकत नाही. आणि मृत्यूनंतर तिर्यंच गतीमध्ये जातो. याचा परिणाम एक वर्षापर्यंत राहतो. ह्याच्या उदयाने सकामनिर्जरा होत नाही.

९) प्रत्याख्यानावरण क्रोध - माती किंवा वाळूत रेघ काढण्यासारखे जी हवेमुळे वा अन्य कशाने लेगच पुसली जाते.

१०) प्रत्याख्यानावरण मान - काठ, स्तंभासारखे.

११) प्रत्याख्यानावरण माया - रस्त्याने चालताना बैलाच्या मूत्राचे वाकडे तिकडे व्रण उठतात तसे.

१२) प्रत्याख्यानावरण लोभ - चिखल मातीच्या रंगासारखी स्थिती असणारा.

या कषायांची स्थिती ज्यास्तीत जास्त चार महिनेपर्यंत असते. असे साधू व्रत ग्रहण करू शकत नाही. मृत्यूनंतर मनुष्य गतीत जातात.

१३) संज्वलन क्रोध - पाण्यात काढलेल्या रेघेप्रमाणे.

१४) संज्वलन मान - वेल किंवा तृण समूहाप्रमाणे.

१५) संज्वलन माया - बांबूच्या सालीप्रमाणे.

१६) संज्वलन लोभ - पतंगाच्या रंगाप्रमाणे अथवा हळदीच्या रंगाप्रमाणे

या कषायांचा परिणाम जास्तीत जास्त पंधरा दिवसापर्यंत राहातो. आणि तो यथाख्यात चारित्र व केवलज्ञान. केवलदर्शन प्राप्त करू शकत नाही.

१७) हास्य - हसणे, चेष्टा, मस्करी करण्याचा स्वभाव.

१८) रति - अकार्यात आसक्ती.

१९) अरति - धर्मकार्यात अरुची.

२०) भय - कोणतेही काम करण्यात भीती वाटत राहणे.

२१) शोक - प्रतिकूल संयोगात चिंता करणे, दुःखी होणे.

२२) दुगंछा - घृणा, तिरस्कार, दुर्गंध इ. ने बेचैन होणे.

२३) स्त्रीवेद - पुरुषाबरोबर मैथुनभावना.

२४) पुरुषवेद - स्त्रीशी मैथुनभावना.

२५) नपुंसकवेद - स्त्री व पुरुष दोघांशी मैथुनभावना.

वरील २५ भेद कषायांचे आहेत. व्यवहारात आपण फक्त चार कषाय क्रोध, मान, माया, लोक यांनाच कषाय मानतो. परंतु ज्ञानी जनांनी चार कषायांची तरतमता लक्षात घेऊन त्यांचे अजून सोळा भेद केले. शिवाय हास्य, रती, अरती यांचा पण कषायांत समावेश केला आहे.

याप्रमाणे कषायांचे चार, सोळा, पंचवीस भेद केले आहेत. ते आपणाला सरळपणे समजावे म्हणून केले आहेत. विशेष खोलवर विचार केला तर जगात जितक्या म्हणून पापमय प्रवृत्ती आहेत त्या सर्वांचा समावेश कषायातच होतो. म्हणून कषायाचे अनेक भेद होऊ शकतात.

मुख्यतः चार-क्रोध, मान, माया, लोभ यात त्या सर्वांचा समावेश होऊ शकतो. चार कषाय पापप्रवृत्ती वाढविणारे आहेत. म्हणून जो साधक आत्महित करू इच्छितो त्याने या चार कषायांचा त्यागच करायला पाहिजे.७२

आगमामध्ये सर्वत्र या चार कषायांचा उल्लेख असतोच. अनन्तानुबंधी इत्यादीचे एका-एका कषायाचे चार भेद आहेत. ते विषय-विकाराच्या आसक्तीच्या दृष्टीने केले आहेत. आसक्ती व्यक्त होते ती या चार कारणानेच.

कषायामध्ये अनन्त शक्ती आहे. असे सुद्धा घडते की अत्यंत तीव्र कषाय केल्याने आत्म्याचे प्रदेश शरीराबाहेर जाऊन आपल्या शत्रूचा घात पण करू शकतात. याला कषाय समुद्घात'' म्हणतात.

कषायामुळे आपल्या स्वतःच्या आत्मस्वरूपाचासुद्धा घात होतो. म्हणून कषाय करणे म्हणजे हिंसा करणे.

ज्यावेळी मनात कलुषित भाव निर्माण होतात आणि ते व्यक्त केले जातात, तेव्हा तर भयंकर अनर्थ ओढवतो. यापासून वाचण्यासाठी क्रोध इ. चार कषायांचे थोडक्यात वर्णन केले आहे. जर कषाय काय आहेत व त्यामुळे आपले किती नुकसान होते हे कळालेच नाही तर त्याग कसा होणार !

म्हणून मुमुक्षू जीवाने कषाय भाव नीटपणे समजावून घ्यायला पाहिजे. ज्याप्रमाणे कल्हई नसलेल्या पितळेच्या भांड्यातील दूध (उत्तम असले तरी) त्या भांड्यातील दूध बेचव होते. त्याचप्रमाणे कषायरूपी दुर्गुणाने आत्म्याचे संयम इत्यादी गुण नष्ट होतात.

क्रोधानुबंधी भावना

चार कषायांपैकी क्रोधाचे स्थान प्रथम क्रमांकाचे आहे. क्रोध चार कारणाने उत्पन्न होतो १) क्षेत्र निमित्ताने २) वस्तूच्या निमित्ताने ३) शरीर निमित्त ४) उपाधी निमित्त[७३]

क्रोधामुळे संताप होतो. सर्व इंद्रिया उत्तेजित होतात, उद्वेग होतो. शत्रुत्व वाढते, सुगतीचा नाश होतो. हे सर्व केवळ क्रोधामुळे आपापसातील स्नेह नष्ट करणारा क्रोधच आहे.

क्रोधाच्या आवेगात धर्म-कर्म सर्व नाश पावतात. धर्मविमुख बनतो व दुर्गतीचा अतिथी बनतो.

चारित्र्यमोहनीय कर्माच्या उदयामुळे क्रोध उत्पन्न होतो. क्रोध आला की विवेकबुद्धी, सदसद्विवेकबुद्धी नष्ट होते. क्रोधात माणूस वेडेचाळे करतो. तो काय बोलतो हे त्याचे त्यालाच कळत नाही.

क्रोधी मनुष्य क्रोधाच्या आवेशात वाटेल ते बरळतो. अकार्य अवाच्य याचे त्याला भान रहात नाही. क्रोधाच्या उन्मादात तो काय करील याचा नेम नाही.[७४]

क्रोधो वच्चति धूमो - क्रोध मनाचा धूर आहे.

क्रोधरूपी अग्नी जीवन रसाला जाळून टाकते.

वाळलेल्या गवताला लाकडाला लागलेल्या अग्नीप्रमाणे त्याचा क्रोध वाढत जातो. त्याच्या यशाला ओहोटी लागते. कृष्णपक्षात चंद्र जसा कलेकलेने कमी होतो त्याप्रमाणे[७५]

क्रोधी मनुष्य व राक्षस या दोघांच्या वृत्ती सारख्याच नरकातील लोकांसारखे त्याचे वागणे होते.[७६]

रौद्ररूप त्याचे होते. म्हणून शास्त्रकार म्हणतात. ''अप्पाणं पि न कोवए''[७७]

आपल्या स्वतःवर सुद्धा कधी क्रोध करू नये. स्वतःवर क्रोध करणे म्हणजे आत्मघात करण्यासारखे आहे.

क्रोधाची चिह्ने चेहऱ्यावर दिसतात. म्हणून क्रोधाचे स्थान कपाळ आहे. क्रोध शरीराला जाळणारा आहे. प्रसन्न मनाने जेवण घेतले तर ते अमृतासारखे पण क्रोधामध्ये जेवण विषाचे काम करते. आपले मानसिक संतुलन याच्यामुळे बिघडते. अन्नपाचन होत नाही. अनेक पोटाचे आजार क्रोधामुळे उद्भवतात.

क्रोधामुळे शारीरिक सौंदर्याचा, सौम्यतेचा नाश होतो. क्रोधामध्ये चेहरा विकृत होतो. डोळे लाल-लाल होतात. क्रोधाचा अत्यंत भयानक परिणाम म्हणजे वैरभावनेने भांडणे सुरू होतात. कुलाचा नाश करणारे हे शस्त्र आहे. मातीचा कुंभ एकदा फुटला की फुटलाच. तो परत जोडता येत नाही. त्याचप्रमाणे एकदा वैर निर्माण झाले की ते शांत होत नाही.[७८]

"क्रोधः संसार बंधनम्" क्रोध संसारात बांधून ठेवणारा आहे. म्हणजे क्रोधी माणूस संसारातून, भवभ्रमणातून मुक्त होऊच शकत नाही. त्याला मोक्षाची प्राप्ती होत नाही.

"क्रोधः शम सुखार्गला ।" क्रोध, शांती आणि सुख प्राप्तीमध्ये अडथळा निर्माण करतो कर्मबंधन होते.

"क्रोधः पुनः क्षयते क्षणेनापि पूर्व कोट्यार्जित तपः"

क्रोध हा पूर्व संचित केलेल्या करोडोपूर्व तपाच्या लाभाचा क्षणात नाश करणारा आहे.

आपण म्हणतो, जो आपल्यावर अपकार करतो त्याच्यावर क्रोध येणारच. असे आहे तर आपल्या आत्म्याचा अपकार करणारा हा क्रोध आहे. त्या क्रोधावरच आपल्याला क्रोध करायला हवा.[७९]

ज्याच्या मनात क्रोधरूपी दुर्गुण प्रवेश करतो, त्याच्यात मैत्री, प्रमोद करुणा, कृपा कीर्ती, धैर्य, विद्या, व्रत, उपवास आणि आत्मचिंतन हे जे आत्मिक गुण आहेत त्यांचा नाश होतो.

साप मणीयुक्त असला तरी त्याला कोणी पाळीत नाही. वाघ, सिंह शक्तीशाली असले तरी लोक त्याच्यापासून दूरच राहतात. त्याचप्रमाणे क्रोधी व्यक्ती कितीही गुणवान असली तरी त्याच्याशी कोणी मैत्री करीत नाही. साप, विंचू यांची कोणी सेवा करीत नाही, त्याप्रमाणे क्रोधी माणसाची कोणी संगत ठेवीत नाही. आदर, सत्कार तर त्याला मिळतच नाही.

क्रोधी माणसाने कितीही जप, तप, व्रत-उपवास इ. केले तरी त्या सर्व क्रिया निष्फळ आहेत.

क्रोधी स्वतःचे हित तर करीत नाहीच. इतरांचे ही नाही. त्याला पुण्य काय पाप काय हे ही समजत नाही. ज्याप्रमाणे अग्नी लाकडाला, गवताला जाळूप भस्म करते, ज्याप्रमाणे माकड फळाफुलांनी बहरलेल्या बागेला नष्ट करतो, लोभी राजा आपल्या राज्याला

नष्ट करतो. त्याचप्रमाणे क्रोधी माणूस आपली कीर्ती, मान, आत्मसन्मान, ज्ञान, धन, पूर्वार्जित पुण्यराशी नष्ट करतो.[८०] असे हे क्रोधाचे दुष्परिणाम आहेत. म्हणून ज्ञानी म्हणतात.

"स क्षन्तिक्षुरिकाधरेण हृदयः क्रोधो विजयस्त्वया"[८१]

हृदयात क्षमा धारण करून क्रोधरूपी शत्रूवर विजय मिळवा.

क्रोधी व्यक्तीवर क्रोध न करणारा दुर्जय संग्रामाला पण जिंकू शकतो.[८२]

क्रोधी मनुष्य तप करतो. परंतु आपल्या तपाचा दुरुपयोग करतो. तपोबलाने देहाला भस्म करून टाकतो. ह्यामुळे त्याला मोक्ष कसा प्राप्त व्हावा ? क्रोध माणसाला संसाररूपी कारागृहातून मुक्त होऊ देत नाही. ज्याप्रमाणे धुळीने माखलेल्या आरशात आपला चेहरा दिसत नाही. तसेच क्रोधाच्या भरात घेतलेले निर्णय सुफल देत नाहीत.[८३]

क्रोध जितका तीव्र तितकाच त्याचा परिणाम ही तीव्र असतो. क्रोधाचा परिणाम ही भयंकर असतो.

क्रोधाच्या तरतम भावनेच्या आधारावर स्थानांग सूत्रामध्ये क्रोधाचे चार प्रकार सांगितले आहेत. १) अनन्तानुबंधी क्रोध २) अप्रत्याख्यानावरण क्रोध ३) प्रत्याख्यानावरण क्रोध ४) संज्वलन क्रोध.

१) अनन्तानुबंधी क्रोध - ज्यांना क्रोध आल्यानंतर तो दीर्घकाळापर्यंत टिकून राहतो. त्यास अनन्तानुबंधी क्रोध म्हणतात. हा क्रोध दगडाला पडलेल्या चीरेसारखा असतो. दगडाला पडलेली भेग जशी मिटवता येत नाही, त्याचप्रमाणे अशा व्यक्तीचा क्रोध इतका भयंकर असतो की त्याला तो मरेपर्यंत सोडत नाही. अशा व्यक्तीला सम्यग्दर्शनाची प्राप्ती होऊ शकत नाही. अशा व्यक्ती धार्मिकपण नसतात. कषाय तीव्र असतील तर चेतनाची भावधारा शुभाकडे प्रवाहित होत नाही. अशा क्रोधाला मुनी शुभकरणजींनी चिरतम क्रोधवाले प्राणी अशी संज्ञा दिली आहे.

अप्रत्याख्यानी क्रोध - म्हणजे चिरंतर क्रोधी जो क्रोध मातीवर काढलेल्या रेघेप्रमाणे असतो. मातीत पडलेली रेघ काही वेळाने भरून जाते त्याप्रमाणे या कषायाचा वेग जीवनपर्यंत रहात नाही.

प्रत्याख्यानावरण क्रोध - असा क्रोध वाळूवर काढलेल्या रेघेप्रमाणे असतो. वाळूवरील रेघ फार काळ टिकत नाही. त्याचप्रमाणे असा क्रोध फार काळ टिकून रहात नाही.

सत्पुरुष खरेतर क्रोधित होतच नाहीत. समजा क्रोध आलाच तर तो दुसऱ्या क्षणी निघून जातो. कदाचित टिकलाच तर त्याचे फल विपरीत होत नाही. पण यामुळे ते वीतरागी बनू शकत नाहीत. वीतरागी बनण्यासाठी संपूर्ण कषायाचा त्याग पाहिजे.

संज्वलन क्रोध - याला क्षिप्र क्रोध पण म्हणतात. असा क्रोध पाण्यात काढलेल्या रेघेप्रमाणे असतो. पाण्यातील रेघ त्याच क्षणी मिटते तसेच अशा प्रकारचे साधक क्रोधाच्या चारी अवस्था पार करून आत्मसाध्य साधून घेतात. परंतु थोडासा क्रोधाचा अंकुर राहिल्यामुळे पुन्हा तो अंकुर जाळण्यासाठी जन्म घ्यावा लागतो. निर्वाणासाठी कषायाची संपूर्ण क्षिणता आवश्यक आहे.[८४]

क्रोधामुळे भावना अशुभ होतात. लेश्या अशुभ होतात.

जेव्हा मनुष्य क्रोधाविष्ट होतो तेव्हा त्याचा रंग नीळा म्हणजे काळपट असा होतो. त्याची कांती नष्ट होते. क्रोधग्नित तो जळू लागतो. थंड असली तरी त्याच्या घश्याला कोरड पडते. आणि पिशाच संचारल्याप्रमाणे कंपित होतो. भुवया चढतात, कपाळावर सल पडतात. डोळे लालबुंद होतात. हे असे त्याचे रूप होते. आणि तो भयानक दिसू लागतो.

क्रोधी मनुष्य क्रोधाच्या अग्नीत प्रथम स्वतःच जळतो. ज्यावर क्रोध केला आहे तो जळो अथवा न जळो पण तो स्वतः मात्र त्यात जळतोच.

क्रोधी स्वतः संतप्त होतो. नंतर दुसऱ्याला दुःखी करतो. खरं म्हणजे दुसऱ्यांना दुःखी करणे हे त्याच्या हातात नाही. ज्याच्यावर केला जातो कदाचित ती व्यक्ती शुभकर्माच्या उदयात असेल तर त्याचे कोणीही काही ही बिघडवू शकत नाही.

अग्नी आपल्या आधारभूत लाकडांना प्रथम जाळतो नंतर स्वतः नष्ट होतो.

क्रोधी मनुष्य कुणावरही उपकार करू शकत नाही. क्रोधी शत्रूवर मात्र उपकार करतो कारण त्याचा क्रोध पाहून शत्रू आनंदित होतो.

मनुष्य ज्याच्यावर क्रोध करतो. त्या व्यक्तीच्या गुणांचा त्याला पूर्णपणे विसर पडतो. त्याच्या गुणांची निंदा करतो. अशोभनीय वचन बोलतो. क्रोधामध्ये त्याचे वागणे नरकातील नारकीयासारखे होते.

वर्षभर मेहनत केल्यानंतर शेतात पिकलेले धान्य एखाद्या लहानश्या ठिणगीने नष्ट होऊ शकते त्याचप्रमाणे क्रोधरूपी अग्नीत मुनींचे अमूल्य पुण्य नाश पावते.

अत्यंत सुंदर असणाऱ्या व्यक्तीचे क्रोधामुळे रूप नष्ट होते. क्रोधामुळे तो पुढील कित्येक जन्मांमध्ये कुरूप राहतो.

क्रोधामुळे प्रिय व्यक्ती अप्रिय होतात. त्याचे यश तर नष्ट होतेच पण तो हिंसा करतो, खोटे बोलतो, चोरी करतो. म्हणून पुढील जन्मात त्याची हत्या होते. त्याच्यावर कलंक लावले जातात. त्याचे धन चोरीला जाते. क्रोधाचा असा भयंकर परिणाम होतो की पुढील कित्येक भवात त्याला दुःख भोगावे लागते.[८५]

अशा विनाशकारी क्रोधापासून दूर राहण्यासाठी क्षमारूपी ढाल सतत बाळगावी लागते. हेच ह्या क्रोधाचे खरे शस्त्र आहे.

अपराध न करता पण कुणी अपराधी ठरवून शिव्या देऊ लागला तर त्याला पुन्हा शिव्या न देता क्षमा धारण केली पाहिजे. कुणी आपल्याला ठग, कपटी, चांडाळ अशा अपशब्दाने संबोधले, त्यावेळी असा विचार करावा की, हा माझ्या पूर्व जन्मीचे स्मरण करून देत आहे. पूर्वी मी असे अनंत भव केलेले आहेत, तरी मला समज आली नाही, आता तरी मला समजले पाहिजे.

मानानुबंधी भावना

चार कषायांपैकी दुसरे स्थान आहे मान. अभिमानी व्यक्ती आपल्या कणभर गुणाला मेरुपर्वतासमान मोठे मानतो आणि इतरांच्या महान गुणांना कणभर मानतो. तो गुणवानांची कदर करीतच नाही. तुच्छ मानतो. यामुळे गुणवानांचे गुण काही कमी होत नाही किंवा त्यांचे काहीच नुकसान होत नाही. नुकसान होते ते अभिमानी व्यक्तीचे. जगात एकापेक्षा एक बलवान, बुद्धिमान, ऐश्वर्यवान लोक आहेत. त्यांच्याकडे नजर केली तर आपण किती हीन आहोत हे कळेल व अभिमान टिकणारच नाही.

अभिमानी स्वतःला फार मोठा समजतो पण इतर त्याच्या संपर्कात येणारे त्याला हीन तुच्छ समजतात. त्याच्या अहंकारामुळे पण अहंकारी माणसाला 'अहंकार' हे कळू देत नाही.

अभिमान असला की इतर अनेक गुण असले तरी ते झाकून जातात. अभिमानी व्यक्तीची कुणी ही प्रतिष्ठा ठेवत नाही. म्हणून मान-अभिमान अहंकार विवेकी माणसाने करूच नये.[८६]

विवेकी माणसाच्या दृष्टीने अभिमान हा महाविनाशकारी आहे. संपूर्ण साधना

एक अवगुणाने नाश पावते. अभिमान वाळगून माणूस कधीही आत्मोन्नती करू शकत नाही. आत्मोन्नतीसाठी मनाच्या सर्व विकारी भावना नष्ट करणे आवश्यक आहे. जोपर्यंत मान नष्ट होत नाही तोपर्यंत विनय येणारच नाही. आणि एक विनयगुण नसेल तर अन्य कोणतेही सद्गुण जवळपास फटकणारसुद्धा नाही.

गणधर गौतमस्वामींनी श्री भगवान महावीर स्वामींना प्रश्न केला होता की "हे भगवान ! मानावर विजय मिळवला तर जीवाला काय लाभ होतो ?"

भ. महावीरांनी ह्या प्रश्नाचे समाधान करताना सांगितले, "मान-विजय मिळविल्याने मृदुता गुण प्राप्त होतो. नवीन कर्माचे बंधन होत नाही. आणि पूर्वोपार्जित कर्मांची निर्जरा होते."

मानाचे निवासस्थान आपल्या मानेत आहे. तो मनुष्याला अक्कड बनवतो. 'ही व्यक्ती अभिमानी आहे' हे त्याच्या बोलण्याच्या पद्धतीवरून कळते.

अभिमानाने अपकीर्ती होते. मृत्यूची पीडा क्षणिक असते पण मान भंग झाल्याने होणारी पीडा सतत त्रास देत राहते.[८७]

आत्म्याच्या प्रत्येक प्रदेशातून अभिमान झळकतो. अभिमानाला अष्टफणा नागाची उपमा दिली जाते.

ठाणांग सूत्रात मद आठ प्रकारचे सांगितले आहेत.

१) जातिमद २) कुलमद ३) बलमद ४) रुपमद ५) तपमद ६) सूत्रमद ७) लाममद ८) ऐश्वर्यमद.

जातीच्या मदामुळे संपूर्ण विश्वात विनाश ओढवला आहे. ह्याच्यामुळे भयानक हिंसा होते. जातीभेदामुळेच असंख्य हिंदू-मुसलमान एक दुसऱ्याचे वैरी बनले आहेत.

तप इत्यादी गुणांची विशेषता साक्षात दिसते पण जाती आणि कुळाची विशेषता बाह्य रूपाने दिसत नाही.

ऐश्वर्याचा मद तर कोणालाच सुटत नाही. ऐश्वर्य काही टिकणारे असतेच असे नाही. पण त्या मदात त्याला विसर पडतो व इतरांना तो तुच्छ लेखतो. आजचे करोडपती उद्या भिकारपती होतात हे आपण 'ह्याचि डोळा त्याचि देही' पाहतो. पण ऐश्वर्याचा मद अभिमान माणसाला आंधळा करतो.

अनेक विद्वानांना आपल्या ज्ञानाचा गर्व असतो. पण 'केवळज्ञाना' समोर आपले

[illegible] अग्रभागा इतकेसुद्धा नाही. हे त्या ज्ञानाचा गर्व करणाऱ्याच्या लक्षात ही [illegible] हे सूत्रज्ञान 'केवळज्ञान' समोर नगण्य आहे.

बाहुबलींनी दीक्षा घेतली. घोर तपश्चर्या केली. पण मनात थोडा अहंकार घर करून [illegible] तेवढ्या थोड्याशा अहंकारामुळे ब्राह्मी व सुंदरी या बहिणींनी त्यांना प्रतिबोध दिला, [illegible] गळून गेला. अभिमान ज्या क्षणी दूर झाला त्याच क्षणी केवलज्ञान प्राप्त झाले. [illegible] तोपर्यंत अहंकार आहे तोपर्यंत केवळज्ञान दूर राहते. अहंकार केल्याने नीच जातीत [illegible] मिळतो.

रूप-सौंदर्याचा ही अभिमान व्यर्थ आहे. हे शरीर अनेक रोगांनी भरलेले आहे. [illegible] पुण्योदय आहे तोपर्यत हे झाकलेले आहेत. केव्हा, कोणत्या क्षणी रोग उत्पन्न [illegible] सांगता येत नाही. त्या अस्थिर शरीराच्या सुंदरतेवर काय गर्व करायचा ?

अगदी अचानक खूप फायदा, आनंदाची बातमी मिळाली तर लगेच हुरळून जाऊ [illegible] विचार करावा की लब्धिवंत मुनिराजापेक्षा मला मिळालेला फायदा, लाभ किती [illegible] आहे. लब्धीचा अभिमान केला तर भविष्यात लब्धी मिळत नाही. ज्या-ज्या [illegible] आपण गर्व करू त्या त्या वस्तूंचा पुढे भविष्यात विरह होतो.

मानाचे अनंतानुबंधी इ. चार प्रकार ठाणांग सूत्रात सांगितले आहे.

१) **अनंतातुबंधी मान** - याला कठोरतम मान पण म्हणतात. हा मान दगडाच्या [illegible] सारखा असतो. दगडाच्या खांबाचे दोन तुकडे होऊ शकतात, पण त्याला वाकवता [illegible] नाही. तसेच ज्याला इतका भयंकर अभिमान असेल तर तो मोडेल पण वाकणार [illegible] अशा अभिमानी व्यक्तीला नम्रता शिवतही नाही. असा अभिमान जन्मभर राहितो [illegible] तो मरून नरकात जातो.

२) **अप्रत्याख्यानी मान** - ह्याला कठोर तर मान म्हणतात. हा अस्थिस्तंभा [illegible] असतो. हाडाचा खांब तुटून जातो पण वाकत नाही. त्याचप्रमाणे अशा प्रकारची अभिमानी व्यक्तीत अहंकाराची ग्रंथी प्रबळ असते. अशी व्यक्ती मरून तिर्यंच गतीत [illegible] जाते.

३) **प्रत्याख्यानावरण मान** - ह्याला कठोर मान म्हणतात. हा मान [illegible] स्तंभासारखा असतो. कोवळी काठी थोडी वाकू शकते. अशा व्यक्तीत अहंकार तर [illegible] असतो पण थोडा सौम्य प्रकारचा. आपल्या अहंकारावर नियंत्रण ठेवू शकतो. आत्मस्थ [illegible] होऊ शकतो. असा जीव मरून मनुष्य गती प्राप्त करू शकतो.

४) **संज्वलन मान** - ह्याला मृदू मान म्हणतात. हा मान वेलीसारखा असतो. झाडावर चढलेली वेल अतिशय लवचिक असते. असे अत्यंत अल्प अहंकार असलेले साधक सतत जागृत असतात. त्यांना लवकर संसारापासून मुक्ती मिळते. असा जीव सहज देवगतीते जातो.[८८]

अभिमानामुळे सामाजिक, कौटुंबिक राष्ट्रीय अनेक समस्या निर्माण होतात. अहंकारामुळे माणूस आपली चूक कधीच स्वीकार करीत नाही. तो ताठच राहतो. अहंकारामुळे माणूस तुटतात 'मोडेन पण वाकणार नाही' अशी अहंकारी व्यक्तीची भूमिका असते.

क्रोधाप्रमाणे मान कषाय पण जन्म-मरण रूपी संसाराची वृद्ध करणारा आहे. मान कषायाच्या अधीन व्यक्ती आदरणीय व्यक्तींचा आदर करीत नाही. त्याच्यात नम्रता नसते.[८९]

मान दोषाचे वर्णन करताना शिवार्याचार्य लिहितात की- कुल, रूप, आज्ञा, शरीरबळ, शास्त्रज्ञान, लाभ, ऐश्वर्य, तप या पेक्षा स्वतःला उच्च समजणारा नीच गोत्राचे बंध करतो.

आपल्यापेक्षा कुलाने हीन असलेल्यांना पाहून कित्येक अभिमान करतात. व पापार्जन करतात. किंवा आपल्यापेक्षा कुळाने श्रेष्ठ असलेल्यांना पाहून दुःखी होतात. ह्यानेही पापार्जनच होते.

क्रोधामुळे जे दोष निर्माण होतात तसेच मानामुळे ही निर्माण होतात. निरभिमानी मनुष्य स्वजन आणि परिजनांचा प्रिय होतो. जगात त्याला ज्ञान, यश आणि धनाची प्राप्ती होते. इतर कार्य सुद्धा साध्य होतात.

मार्दव, सरलता धारण केल्याने मनुष्याचे काहीच नुकसान होत नाही. म्हणून अभिमान करणे व्यर्थ आहे. विनय धारण केल्याने उभय लोकात कल्याण होते.

सगर चक्रवर्तीला साठ हजार पुत्र होते. ते अत्यंत बलवान होते. परंतु केवळ अभिमान केल्याने ते सर्व नष्ट झाले.[९०]

अहंकार केल्याने माणसांचे विवेकरूपी नेत्र बंद राहतात. मानानुबंधी अशुभ भावनेने भावित झालेली व्यक्ती विचार करते की ह्या संसाराचा मीच राजा आहे.

ज्ञानसंपन्न आहे. कुलवान आहे, ऐश्वर्यसंपन्न आहे. बलवान आहे. तपस्वी व

श्रेष्ठ आहे. आणि मीच अतिशय पुण्यवान आहे. माझ्यासारखा सर्वगुण संपन्न कोणीच नाही. अशा विचारामुळे दुसऱ्या धर्मात्म्यांचा तो तिरस्कार करतो. म्हणून ही भावना पापमय अशुभ भावना आहे. अशा भावनेमुळे मनुष्य संसारात परिभ्रमणच करीत राहतो.

मान कषायामुळे मनुष्य जे काही सत्कृत्य करतो, दान, जप, तप सर्व नष्ट होते.

अभिमानी मनुष्य संसारात संताप, पाखंड व मिथ्यात्व समुहाला वाढवतो व मोक्ष मार्गाला दुरावतो. साधार्मिकांची निंदा करतो. अभिमानी आपले हित साधू शकत नाही.९१

पुढील श्लोकात कवी कुंथुसागरजी फारच व्यंग्यात्मक भाषेत लिहितात की अभिमान केल्याने पूर्वी कधीही झाला नाही असा लाभ मिळतो की त्याचे दारिद्र्य कधीच संपत नाही. आपले आत्मिक धन आणि आत्मिक स्वराज्य गमावतो. दुर्भाग्याला आमंत्रण देतो. अभिमानाचे हेच फायदे आहेत.

परंतु अभिमान केल्याने काही फायदा होतो असे आतापर्यंत कधीही घडले नाही. घडणार नाही. अभिमानाने कुळाचा, वंशाचा नाशच झाला आहे. म्हणून सुखेच्छू मानवाने कधीही अभिमान करू नये.

अभिमानामुळे शुद्धभावना नष्ट होते. मोक्ष मार्गाचा अवरोध होता. आत्मजन्य आनंदाचे मूळ कारण जो धर्म त्यालाही मुकतो. निंदनीय कर्म ग्रहण करतो. अभिमानी पुरुष अभिमानामुळे तुच्छ बनतो. आत्मज्ञानाने शून्य होतो. विचारहीन होतो. आणि निश्चितपणे पुण्यहीन होतो.

अभिमानी माणसापासून स्वजनही दूर राहतात. आणि अभिमानी स्वतःच दुःख ओढवून घेतो. आचारापासून परावृत्त होतो. त्याच्या सुख शांतीचा नाश होतो. महामुश्किलीने प्राप्त केलेल्या अमूल्य पुण्यरूपी धनाचा नाश करतो.

अभिमानी पुरुष जे गुण आपल्या स्वतःमध्ये नाहीत ते व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. इतरांमध्ये असलेले गुण झाकण्याचा प्रयत्न करतो. गरीब, दरिद्री, हीन-दीन लोकांना पाहून स्वतः सुखी असण्याचा अभिमान करतो.

अभिमानी पुरुष आपल्या अभिमानाच्या आवेशात चिन्तामणी, कल्पवृक्ष आणि कामधेनू सारखे इच्छित सुख देणारे आणि स्वर्ग व मोक्षाचे मूळ कारण अशा जैनधर्माच्या

क्षणाचा क्षणात सोडून देतो. आणि भयंकर क्लेशमय महापाप करू लागतो. या पापामुळे तो निगोदमध्येसुद्धा जाऊ शकतो. म्हणून मुमुक्षू जीवाने असा आत्मघातकी अभिमान कधीच करू नये.[९२]

अभिमानाच्या विरुद्ध विनय, नम्रता, जैनशासनाचे मूळच आहे- 'विनय मूल धम्मो' विनय मोक्ष देणारा आहे. विनयी सर्वांचा प्रिय असतो. विनयामुळे ज्ञान, ज्ञानाने समकित, समकितने चारित्र आणि चारित्राने मोक्ष प्राप्त होतो.

प्रत्येक सद्गुणाच्या मुळाशी विनय असतोच. म्हणून कोणत्याही प्रकारचा अभिमान मनात निर्माण झाला की लगेच आपल्यापेक्षा अधिक गुणीसंपन्न व्यक्तींकडे पहावे म्हणजे आपल्यातील गुण किती नगण्य आहेत हे लक्षात येईल व अभिमान आपोआप गळून जाईल.

मायानुबंधी भावना

क्रोध व मान या नंतर माया. माया हे शल्य आहे, या शल्यामुळे सुख लाभत नाही.

मायावी, कपटी माणसाला कोणीही जवळ करीत नाही. त्याच्यावर कुणाचाच विश्वास रहात नाही. त्याला अपमानित जीवन जगावे लागते. मायावी व्यक्तीचे नातलग कोणीच नसतात. अशा माणसाचा लहान अपराधसुद्धा मोठा मानला जातो. मायावी माणूस सत्य बोलला तरी त्याच्यावर विश्वासच बसत नाही. कपटी वर्तनाने मैत्रीचा नाश होतो. ज्याप्रमाणे विषयुक्त दूध प्राशन केले तर नाश निश्चितच होतो, त्याचप्रमाणे मायेमुळे मित्र विनाश व श्रामण्य हानी होते.

जिथे मायेचा निवास तेथे क्रोध, मान आणि लोभ हे शत्रू असतातच. [९३]

क्रोध आला तर तो दिसतो, मान ही दिसतो, पण माया प्रत्यक्ष दिसत नाही. मायेचे स्थान पोट आहे. माया प्रकृतीला वक्र करते. शास्त्रामध्ये याचा पुष्कळ उल्लेख होता. 'माया मोसो', 'मायामिथ्या' इ. जिथे माया आहे तेथे मिथ्यात्व.

मायावी पुरुष मरून स्त्री होतो. स्त्रीने माया (कपट) केली तर मरून नपुंसक होते. नपुंसकाने माया केली तर मरून तिर्यंच गती मिळते. आणि मायावी तिर्यंच तर मरून एकेन्द्रियामध्ये जाऊ शकतो. अशाप्रकारे माया केल्याने नीच गती मिळते. मायाने युक्त तप, संयम याचे फळ पण उच्चप्रकारचे मिळत नाही.

ठाणांग सूत्रात चार प्रकारची माया सांगितली आहे.

१) **अनंतानुबंधी माया** - ह्या मायेला वक्रतम माया म्हणतात. ही बांबूंच्या मुळासारखी वक्र असते.

२) **अप्रत्याख्यानी माया** - ही चक्रतर माया. ही शेळीच्या शिंगासारखी वक्र असते.

३) **प्रत्याख्यानावरण माया** - ही चालणाऱ्या बैलाच्या मूत्रधारेसारखी वाकडी तिकडी.

४) **संज्वलन माया** - सरळ थोड्या कालावधीत सोललेल्या बांबूच्या सालीसारखी किंचित वक्र असते.[९४]

मन, वचन, काया या तीन योगांच्या सहाय्याने केलेली माया कुटील माया म्हणतात.

माया म्हणजे कपट, वक्रता, कपटी माणूस विश्वासास पात्र नसतो. कोणालाही प्रिय वाटत नाही. तो आपल्या कुटुम्बातील लोकांचाही विश्वास गमावून बसतो. त्याच्यापासून सर्व दूर राहतात.

माया केल्यानेच आज माणसाचा माणसावर विश्वास राहिलेला नाही. राजनैतिक तर या मायेने बरबटलेली आहेच पण धार्मिक म्हणविणारे लोकही मायेच्या पंज्यातून सुटलेले नाहीत. एकमेकांना धोका देण्याची वृत्ती होते ती या मायाचारमुळेच.

कपटीपणा असल्यामुळे निर्मळ आनंद, निर्भयता राहिलीच नाही.

भ. महावीर स्वभाव आणि विभाव यांच्या परिणामाला जाणत होते. स्वभाव दशेत चित्त शांत रहाते. भावधारा शांत असते. शरीर, मन, स्वस्थ असते. विकृतीचे मुख्य कारण विभाव. विभावाचे काय परिणाम होतात हे माहित असूनही माणूस त्यापासून दूर होत नाही. हजारो वर्षा पूर्वी महावीरांनी या मायेचा काय परिणाम होते हे विशद केले आहे.

भ. महावीर मनोवैज्ञानिक होते. माया व पर्यायाने असत्य याच्या अधीन असलेली व्यक्ती सदसद्विवेकबुद्धी गुमावते कपटीपणामुळे भावधारेचे संतुलन ढासळते. आभामंडल रूपांतरित होतो. नाडीतंत्र बिघडते, टेन्शन हे मायेमुळेच येते.[९५]

कपटपूर्ण व्यवहार करायच्या अगोदर त्याचे चक्र मनात सुरू होते. कारस्थानाची

मनात करावी लागते. योजनाबद्ध कार्यक्रम आखावा लागतो. कपटाची चिंता सुरू होते. पतनाची प्रथम पायरी चिन्ता. चिंता हा रोग आहे. कपट म्हटले की असत्य व अनैतिक काम करण्यात भीती आलीच. हे त्रिकुट माणसाच्यातील माणुसकीचा घात करून टाकतो. त्याला सारखी भीती वाटत असते. माझे कारस्थान उघडकीला आलेतर !

ही चिंता त्याला सतत बोचत असते. म्हणजे मन अशांत राहते. सतत भयग्रस्त मन राहते. भय मनाला खात राहते. कपटीपणा केल्यानंतरही मनात बोच राहते. अंतरचेतना धिक्कारत असते.

कपटी मनुष्याला शांती नसते. स्वस्थ झोपही येत नाही. त्याचे संतुलन बिघडते. कपटीपणाचा परिणाम भोगावाच लागतो. चेहऱ्यावर त्याचे कुटील भाव स्पष्ट दिसतात. खोटे कधी ना कधी उघडकीस येतच.

कपट ही रौद्रध्यानाची अवस्था आहे. कपट करणारा स्वतः धोका खातोच पण कुटुम्ब समाज, राष्ट्र, देशाचेही अहित करतो.

माया संसारवृद्धी करणारी आहे. इहलोकात अप्रिती उत्पन्न करणारी आहे. अनेक पापाला जन्म देणारी आहे.[९६]

माया तीक्ष्ण धारदार तलवार आहे. जी मित्रत्वाचा क्षणात नाश करते.[९७]

कपटी मनुष्य क्षणमात्र सुखी आहे असे भासते पण खरे सुख त्याला मिळतच नाही. माया टोकदार काटा आहे, जो अंतकाळापर्यंत आत्म्याला टोचत राहतो. माया विकासमार्गावरील अवरोध निर्माण करणारी आहे.

तीव्र मान मनुष्याला मिथ्यादृष्टीयुक्त बनवतो. कपटी मनुष्य आपले कार्य जरी खूप सावधपणे करीत असला तरी त्याचे भयंकर परिणाम त्याला केव्हाना केव्हा भोगावेच लागतात. कपटी माणूस मोठा लाघवी असतो. वाणीत माधुर्य असते. पण अंतःकरणात पापीवृत्ती असते.

'कपट' वरून दिसत नाही, पण त्याला ओळखता येते, वरून तो सज्जन भासतो. पण माया करणारा तिर्यंच योनीत जातो. कारण तिर्यंच तिरका चालतो. सरळ दांड्यावर ध्वज फडकू शकतो. त्याचप्रमाणे सरळ आत्म्यातच सम्यक्त्व राहू शकते. वक्र हृदयाला माया म्हणतात. अशा हृदयात धर्माचे बीज रुजू शकत नाही. शुद्ध आत्म्यात धर्म स्थिर राहू शकते.[९८]

मीठाच्या भांड्यात दूध नासते. साधकाला जर आपल्या हृदयात अध्यात्म्याची पवित्र ज्योत प्रज्वलित करायची असेल तर कपटाचाराची वक्रता सोडावी लागेल. आत्म्यात सरळता आली तर तो शुद्ध होईल. मग साधक जी काही क्रिया करेल त्याचा परिणाम शुभ येईल.

आज बाह्यरूपावरून साधक दिसला वेश बदलला म्हणजे कोणी साधू बनू शकत नाही. खरी साधुता मनातले कषाय विकार रहित करण्यात आहे.[९९]

गृहस्थाश्रमात सुद्धा या मायेच्या जाळ्यात अडकणारे आहेतच. कथनी आणि करणीत साम्य नाही. पाप झाकण्यासाठी धार्मिक क्रिया करतात, त्यांना भक्ताची उपमा मिळू शकते पण ईश्वर नाही. सगळेच असे असतात असे नाही. 'बहुरत्ना वसुन्धरा' पण आहेत. कित्येक खरोखर खऱ्या अंतःकरणाने कठोर व्रत करतात, तपस्येत मग्न असतात. आत्म्यात सरळता असते. सर्व भौतिक सुख मिळून सुद्धा 'जलकमलवत्' निर्लिप्त असतात. तो साधक मुक्तीचा अधिकारी असतो.

बाह्य क्रियेपेक्षा आंतरिक शुद्ध क्रियेचे मूल्य अंसख्य पटीने जास्त आहे. शारीरिक सौंदर्य नसले तरी अंतःकरण सुन्दर असेल तर तो महान साधक होय. सोन्याचे पात्र मदिरेने भरले असेल तर त्याचा काय उपयोग ! पण जर मातीच्या पात्रात अमृत असेल तर ते उपयोगी आहे. कारण तो अमरत्व प्रदान करतो.

कपटी व्यक्ती आध्यात्मिक दृष्टीने तर ठगली जातेच पण भौतिक सुखापासून दुरावते. मायेची चाल वक्रगतीने चालणाऱ्या नागिणीसारखी असते. मायावी कुणाच्याही भाग्याला हरण करू शकत नाही. आणि आपले दुर्भाग्य मिटवू शकत नाही. मायाचरणाने कर्मबंध करतो.[१००]

एखादी व्यक्ती नग्नावस्थेत राहून अनेक प्रकारचे व्रतवैकल्य करते. शरीर क्षीण करतो पण हृदयात जर दंभ (माया) असेल तर अनन्तकाळापर्यंत जन्ममरणाच्या चक्रातून बाहेर येत नाही. त्या चक्रात भरकटत राहतो.

मायावी मन, वचन कायेने वक्र असतो. धर्मसाधनेतही कपटीपणा करतो. त्याची विचारशक्ती वक्र, बुद्धी वक्र आणि आचार ही वक्र असते. ज्याप्रमाणे शिकारी कपट करून सावज पडकतो, मांजर उंदराला पकडण्यासाठी ध्यान लावून बसते, बगळा मासे पकडण्यासाठी ध्यानस्थ बसतो, गिधाड मांस खाण्यासाठी ध्यानमग्न होतो, त्याचप्रमाणे मायावी-पापी मनुष्य आपले कार्य सिद्ध करण्यासाठी, लोकांना फसवण्यासाठी तोंडाने गोड-

गोड बोलतो पण हृदयात दुष्ट भावना ठेवतो.

सिंह, वाघ, विंचू इ. विषारी किंवा हिंस्र पशूंचा सहवास बरा पण मुमुक्षू जीवाने मायावी दुष्ट मनुष्याचा समागम टाळावा कारण तो घातक आहे.

मायावी मनुष्य अधम मानला जातो. त्याचे व्रत, उपवास, जप, तप स्वाध्याय, मौन, दान, पूजा, ध्यान, तीर्थयात्रा, क्रिया, विद्या, बुद्धी, मानवजन्मरूपी धन धारावाहिक बोलण्याची शक्ती आणि आपला आत्मा सर्व काही व्यर्थ आहे.

हा जीव माया करून तीव्र पाप उत्पन्न करतो. त्या पापामुळे अत्यंत भयानक अशा नरक निगोदात जाऊन पडतो आणि भयंकर पारतंत्र्यात पडून क्षेत्रसंबंधी महादुःख सहन करतो. वध बंधनाच्या असह्य दुःखाला भोगतो. नरकयातना भोगतो.

तिर्यंच गतीत गेला तर अत्यंत तीव्र दुःख सहन करतो. तिथे शारीरिक भयंकर त्रास सहन करावा लागतो.

मायाचारी माणसाला मनुष्य गतीमध्ये जन्म मिळाला तरी त्याला वध, बंधन इ.चे दुःख सहन करावे लागते. पुत्र कुपुत्र निपजतो, पत्नी कुटुंबातील लोक इ. दुःख देतात.

अनिष्ट संयोगाने दुःखी होतो. अपमान होतो. धन इ. न मिळाल्याने दुःखी होतो. धनाचा नाश होतो. दरिद्री अवस्था होते असे अनेक परिणाम होतात व फक्त दुःखच वाट्याला येते.

मायावी माणूस जर देवलोकात गेलाच तर तेथेही इन्द्र इ. देवांची ऋद्धी-सिद्धी पाहून, त्यांचे रूप-सौंदर्य पाहून सतत मनात कुढत राहतो, संतप्त राहतो, दुःखी राहतो.

मायावी माणूस अत्यंत दुर्भागी होतो. मूर्ख होतो. मनोवांछित फळ देणाऱ्या धर्मापासून विमुख राहतो. धर्माचा त्याग करतो. सुखशांती त्याला मिळतच नाही. स्वतःची आत्मशुद्धी होणे शक्यच नाही, इतरांची शांतही नष्ट करण्याला कारणीभूत ठरतो.

कषायरूपी अग्नी सतत भडकलेलीच असते. कलह, वैर यांची वृद्धी करतो. अधर्म व असत्य मार्ग अनुसरतो. दया, क्षमा, शांती इ. आत्मिक गुणांचा त्याग करतो. अशाप्रकारे अनेक दृष्टीने जीवन असह्य वेदनेने भरलेले राहते.

मायावीची प्रत्येक कृती ही अशुभ मायानुबंधीची भावना काम करते. त्याचा

कोणताही आचार हा विचारपूर्वक नसतो. मायेचे हे असे भयंकर दुष्परिणाम आहेत म्हणून मायाचार कधीच करू नये.[१०१]

माया केल्याने स्त्रीवेद प्राप्त होतो.[१०२]

"मायी विउव्वइ नो अमायी विउव्वइ" (भगवती सूत्र १३/९)

ज्याच्या अंतःकरणात माया आहे तोच अनेकविध रूपाने ती व्यक्त करतो. ज्याचा आत्मा सरळ आहे तो मायाचाराचे प्रदर्शन कधीच करीत नाही.[१०३]

"सच्चाण सहस्साण वि, माया एक्कवि णासेदि"

आचार्य शिवार्य लिहितात - "एक माया हजारो सत्यतेचा नाश करून टाकते.[१०४]

म्हणून ज्यांना आपले आत्मकल्याण साधण्याची इच्छा आहे, त्यांनी माया, कपटाऐवजी सरळता, निष्कपटतापूर्ण वर्तन करायला पाहिजे. त्याच्या हृदयातच धर्म टिकतो. म्हणून नेहमी आंतरबाह्य समानता ठेवली पाहिजे. आपली आंतरिक व बाह्य प्रवृत्ती शुद्ध ठेवतो अशा व्यक्तीने थोडी क्रिया केली तरी ती शुद्ध असल्यामुळे लवकर मोक्षापर्यंत पोहोचतो.

लोभानुबंधी भावना

पदार्थाची तीव्र इच्छा व पदार्थाबद्दल तीव्र ममता आणि तृष्णारूप आत्मपरिणाम म्हणजे लोभ. चार कषायांपैकी सर्वात प्रबळ आणि सूक्ष्म कषाय म्हणजे लोभ. लोभ सर्व अन्य चांगल्या गुणांचा नाश करतो. स्थूल लोभापेक्षा सूक्ष्म लोभाचा त्याग फार अवघड आहे. मोठमोठे योगी, साधक व्यक्तीसुद्धा आपल्या यश, प्रतिष्ठेच्या लोभाला सोडू शकत नाहीत. मंदीर, मठ, आश्रम, पंथ इत्यादीचा मोह असतो. प्रतिष्ठा मिळवण्याची भूक असते. लोभामुळे पदार्थाबद्दलची आसक्ती सुटू शकत नाही. असे अनेक सूक्ष्म लोभ आहेत ज्याने माणूस जखडलेला आहे. हे सत्य आहे की माणूस एकटा आला की एकटाच जाणार आहे, तरी आसक्ती सुटत नाही. वस्तूंचे आकर्षण, विदेशी बँकेत पैसा जमा करणे, हा लोभाचाच प्रकार आहे. लाच घेणे, एन केन प्रकारेण धन प्राप्त करण्याची आसक्ती माणसाला लोभामुळेच प्राप्त होते. संतोषात सुख आहे हे भलभल्यांच्या लक्षातच येत नाही. इन्द्रियासक्ती ही लोभाची परिसीमा आहे. लोभ सर्व पापांचा बाप आहे. क्रोधमान, मायाप्रमाणे ठाणांग सूत्रात लोभसुद्धा चार प्रकारचा सांगितला आहे.[१०५]

१) **अनंतानुबंधी लोभ** - म्हणजे अती गाढतम लोभ रेशमाच्या गाठीसारखा सुटता सुटत नाही. लोभी माणसाची तृष्णा कधीच पूर्ण होत नाही.

२) **अप्रत्याख्यानी लोभ** - गाढतर लोभ चिखलाच्या रंगासारखा लवकर जात नाही.

३) **प्रत्याख्यांनी लोभ** - गाढ लोभ खंजनच्या रंगासारखा अल्पकाळ राहणार असतो.

४) **संज्वलन लोभ** - अगदी क्षणिक लोभ.

लोभामुळे माणूस अवगुणांचा संचय करतो. लोभी माणूस आप्तेष्टांची उपेक्षा करतो. आणि स्वतःच्या शरीरालाही खूप कष्ट देतो.

वस्तू कर्मबंधनाचे कारण नाही. वस्तूबद्दलची जी आसक्ती ती कर्मबंधनाचे कारण आहे. तृणमात्राचा जरी लोभ केला तरी पापबंध होतो. मन जर निर्लोभी असेल तर अनेक प्रकारच्या सुखसाधन व संपत्ती जरी मिळाली तरी कर्मबंध होत नाहीत.

लोभ हा असा हव्यास आहे की तीन लोकांची संपत्ती जरी मिळाली तरी लोभ आवरत नाही. संपुष्टता प्राप्त होत नाही. समाधानी व संतोषी वृत्ती असेल तरच पाप-बंधापासून मुक्त राहता येते.

एक लोभ आला की त्याच्या पाठोपाठ हिंसा, असत्य चोरी इ. अवगुणांचा तांडामागे येतो.

शत्रू, अग्नी, हिंस्र पशू, विषधारी सर्प हे जेवढे नुकसान करीत नाही, त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक हे चार कषायरूप शत्रू आपला सर्वनाश करतात. लोभ हा असा कषाय आहे जो मोक्ष प्राप्तीमध्ये मोठे विघ्न उपस्थित करतो.[१०६]

ममाई लुप्पइ बाले[१०७] लोभ ममत्वामुळे उत्पन्न होतो. त्यामुळे अज्ञानी जीव संसारात भटकतात. लोभी माणसाला आपण सहज ओळखू शकतो. लोभी फक्त संग्रहच करीत राहतो. लालच अशी भावना आहे त्यामुळे विवेक रहात नाही. काय करावे, काय करू नये, कसे वागावे याच भान त्याला रहात नाही. धन कमवितांना लोकांनी अपमान केला तरी त्याला त्याचे काही वाटत नाही. द्रोपदीच्या वस्त्राप्रमाणे लोभाचा अंत होत नाही.

जोपर्यंत माणूस तृष्णने ग्रस्त आहे तोपर्यंत तो भौतिक सुखसाधनसंपन्न असूनही दरिद्री आहे.

लोभी व्यक्ती धनाला कल्याणाचे साधन मानतो. तो विसरतो हे अर्थच अनर्थाचे कारण आहे. हा लोभ माणसात केव्हा प्रवेश करतो हे समजतच नाही. माणूस वृद्ध झाला तरी लोभ सुटत नाही. लोभी उदार कधीच नसतो. तो स्वतःही उपभोग घेत नाही व दुसऱ्यालाही पण सुख देऊ शकत नाही. लोभी माणसाचा एकच सिद्धान्त ''चमडी जाय पर दमडी न जाय ।''[१०८] लोभी अनीतीलाच नीती मानतो.

विश्वातील सर्व संपत्ती आणि वैभव प्राप्त झाले तरी लोभीच्या चित्तात समाधान नसते, शांती नसते. माणसाचे जीवन संपते पण तृष्णा कधीच संपत नाही. बंध आणि मोक्ष यासाठी दोन गोष्ट महत्त्वपूर्ण आहेत- 'मम' आणि 'निर्मम' मम म्हणजे लोभ व निर्मम म्हणजे संतोषी वृत्ती. 'निर्मम' म्हणजे ''हे माझे नाही'' अशा भावनेमुळे मनुष्य बंधनातून मुक्त होतो.

सिंह जहा व कुणिमेणं णिब्भयमेगवरं पासेणं[१०९]

सिंहसारखा निर्भय प्राणी, एकटा राहणारा पण मांसाच्या लोभाने शिकाऱ्याचे गुलाम बनतो. त्याचप्रमाणे मनुष्य लोभाने कर्माच्या बंधनात अडकतो.

जहा लाहो तहा लोहो, लाहा लोहो पवड्ढई ।

दो मास कयं कज्जं, कोडिए न निट्ठियं ॥[११०]

जस-जसा लाभ होत जातो, तस-तसा लोभ वाढत जातो. अशा प्रकारे लाभ होत गेला की लोभ वाढतच जातो. दोन मासे सोन्याने संतुष्ट होणारा कपिल करोडो सुवर्ण मुद्रांनी पण संतुष्ट होऊ शकला नाही. ऋषिभाषित उल्लेख आहे- बाहेर जळणाऱ्या अग्नीला थोड्याशा पाण्याने शान्त केले जाऊ शकते. पण अंतरात जी मोह, तृष्णारूपी अग्नी जळते तिला संपूर्ण समुद्राभर पाण्याने शान्त केले जाऊ शकत नाही.[१११] मनुष्य शरीराने वृद्ध झाला तरी वासना, तृष्णा, लोभ कधीच वृद्ध होत नहीत.

ज्ञान सारमध्ये लिहिले आहे.

भूशय्या भैक्ष्यमशनं जीर्णवासो वनं गृहम् ।

तथापि निःस्पृहस्याहो ! चक्रिणोप्यधिकं सुखं ॥[११२]

भूमीवर शयन करतात. भिक्षा मागतात. जीर्ण झालेले कपडे परिधान करतात. वनात राहतात असे मनुष्य चक्रवर्तीपेक्षा ही अधिक सुखी आहे.

लोभाचे वर्णन करताना ऐतरेय अरण्यकमध्ये लिहिले आहे - लोभी मनुष्य

याचकाला काहीच देत नाही. अशाने त्याची अपकीर्ती होते. असा कंजुष माणूस जिवंत असून मृतसमान आहे.११३

लोभ व्यसन मंदिरम् लोभ मुलानि पापानि,

लोभाद्धर्मो विनश्यति, सर्वगुण विनाशनम् लोभात् ॥

अर्थात् - लोभ अनिष्ट प्रवृत्तीचे मूळ आहे, पापाचे मूळ आहे. धार्मिक प्रवृत्तीचा नाश लोभामुळेच होतो. लोभाने सर्व सद्गुणांचा नाश होतो.

सर्वप्राणीमात्रात लोभ असल्यामुळे त्यास सर्वव्यापक म्हणतात. त्रैलौक्यात जितकी पापकर्मे होतात ती लोभामुळेच उत्पन्न होतात. लोभभावना सर्वप्रकारच्या विपत्तीचे मूळ कारण आहे.

लोभरूपी अग्नी कधी शीतल होत नाही. तो आत्म्याला सतत जाळतच असतो. लोभामुळे दान देण्याची भावना होत नाही. दान न दिल्याने जन्मोजन्मी दरिद्रता पदरात पडते. लोभी माणसाला हे अज्ञान असल्यामुळे आपत्तीचे खरे कारण ते समजू शकत नाही.

मोहांध माणूस त्यागकडे वळतच नाही. मोहाचे उत्पत्तीस्थान तृष्णा व तृष्णेचे उत्पत्ती स्थान मोह आहे. ज्याप्रमाणे कोंबडीपासून अंडे व अंड्यापासून कोंबडी उत्पन्न होते, त्याचप्रमाणे तृष्णा व मोह यांचा घनिष्ट संबंध आहे.११४

तृष्णा, मोहाचे स्थूल रूप आहे. दुःखाचे मूळ कारण तृष्णा आहे.

लोभाचे वर्णन करताना कुन्थुसागर मुनी लिहितात, कदाचित तेलाने दिवा तृप्त होईल, लाकडाच्या समूहाने अग्नीपण तृप्त होईल, हजारो, लाखो नद्यांनी समुद्र तृप्त होऊ शकेल, पापाने पापी तृप्त होऊ शकेल, एखाद्या वेळेस धनाने कृपण पण तृप्त होऊ शकेल. म्हणजे असाध्य ते साध्य होऊ शकेल. पूर्व दिशा, पश्चिम होऊ शकेल. अग्नी शीतल होऊ शकेल. चंद्र उष्ण होऊ शकेल. मेरुपर्वत चलायमान होऊ शकेल, मुनी क्रोधी बनू शकेल, चंचल अशी लक्ष्मी स्थिर होईल, दिवस रात्र होईल. परंतु लोभ करणारा पापी माणूस साम्राज्याचा अधिपती झालातरी कधीच तृप्त होणार नाही.

ज्याप्रमाणे वाऱ्यामुळे अग्नी अधिक प्रज्वलित होतो सर्वनाश करतो, त्याप्रमाणे लोभरूपी अग्नी आपल्या आत्मिक धनाला, आत्मशुद्धीरूप स्वराज्याला, जाळून भस्म करून टाकतो. संसाराच्या दुःखापासून वाचविणारी आत्मविद्या, आत्मिकसुख देणारे इच्छानिरोधरूपतप जाळून टाकते. क्षमा, शांती समता, धैर्य, सहनशीलता, विवेकबुद्धी,

उदारभावना या सर्वांना लोभ नष्ट करतो. आणि आत्म्याचे वास्तविक जे स्थान मोक्ष आहे त्यापासून आपणाला दूर फेकून देतो.

लोभी धनाच्या लोभापायी आपला स्वदेश सोडतो, श्रेष्ठ दानधर्म त्यागतो, आपल्या श्रेष्ठ स्वजनांना सोडून हिंस्र पशूंच्या निवासस्थानात परिभ्रमण करतो. मगरमच्छाने भरलेल्या समुद्रात भ्रमण करतो. धर्मरहित म्लेंच्छादिच्या देशात भ्रमण करतो. यामागचे एकच कारण अतिलोभ.

लोभाच्या वशीभूत होऊन कुलहीनांची सेवा करतो. लोभामुळे अधमाधम कार्य करण्यास प्रवृत्त होतो. दुष्टजनांची स्तुती करतो. पाखंडी, मूर्ख, कुसाधुंना वश करतो. स्वभावाने विचित्र बनतो. आपल्या कुलाची, जातीची लाज सोडून फक्त धन मिळविण्याच्या प्रयत्नात मग्न राहतो. धनाच्या लोभाने कोणतेही दुष्कृत्य करण्यास तो सदैव तत्पर राहतो.

लोभी आपल्या पापामुळे स्वतःही कोणताही सुखोपभोग घेत नाही व इतरांनाही घेऊ देत नाही. लोभी आपल्या घरी मेवा-मिष्टान्न खाणार नाही पण इतरांच्याकडे मात्र त्यावर चांगला ताव मारतो. पशू तरी बरा अशी त्याची वृत्ती बनते.

लोभी मनुष्य तीव्र लोभामुळे चांगल्या वस्तूंमध्ये कचरा मिसळून विकतो. खरेदी करताना जास्त घेतो, विकताना मात्र कमी वजन करतो.

संसारात परिभ्रमण होते ते या लोभामुळे. तरी ही त्याचा त्याग करावा, सरळ वृत्ती ठेवावी याचे त्याला भान रहात नाही. त्यामुळे चौऱ्यांशी लक्ष योनीत सतत जन्ममरणाच्या फेऱ्या करीतच राहतो.११५

लोभापासून परावृत्त व्हायचे असेल तर असा विचार करावा की, जेवढे आपल्या प्रारब्धात असेल तेवढे आपल्याला मिळणारच. त्यापेक्षा जास्त मिळणारच नाही. मग जास्त मिळविण्याचा खटाटोपात कर्मबंध कशाला करावे. आणि जिथे संपत्ती जास्त तिथे दुःखे ही जास्तच. म्हणूनच म्हटले आहे - जेथे ''संपत्ती तेथे विपत्ती''

लोभाच्या विरुद्ध संतोष. ज्या व्यक्तीमध्ये संतोषी वृत्ती आहे तो देवापेक्षाही अधिक सुखी आहे. असा विचार करून जे मिळाले आहे त्यावरसुद्धा ममत्व न ठेवता निर्लोभी, निर्ममत्वी भावनेने रहावे तर सर्व इच्छित वस्तूसुद्धा आपोआप मिळत राहतात- 'संतोषः परमं पथ्यम्' तृष्णारूपी रोगापासून सुटका करण्यासाठी संतोष सर्व श्रेष्ठ पथ्य आहे.

अशाप्रकारे चारही कषाय त्याज्य आहेत. कषायापासून नेहमी दूर रहावे. कषाय चेतन नाही ते तर अजीव आहेत. कर्माची एक अवस्था आहे. कषाय वाईट नाहीत तर कषाय चेतनात प्रवेश करून आपणच आपल्या आत्म्याला विकृत करतो. कषायाची आसक्ती आपला सर्वनाश करते. आसक्ती वाईट आहे, घातक आहे. आत्म्याचे परिणाम विकृत झाले की कषाय आपल्यावर हावी होतात मग सर्वनाश ठरलेलाच आहे. या कषायाच्या आधीन झाल्यामुळे सम्यक्त्वाची प्राप्ती होत नाही. आणि जोपर्यंत सम्यक्त्व प्राप्त होत नाही तोपर्यंत संसार परिभ्रमण चालूच राहणार.

दुसरी अप्रत्याख्यानी कषाय चौकडीचे आवरण दूर झाले तरच मुमुक्षू आत्मा संसार परित्त (सीमित) करू शकतो. ह्याला सम्यक् दर्शन प्राप्त होऊ शकते. परंतु तो व्रत नियम पाळू शकत नाही.

तिसरा प्रकार प्रत्याख्यानावरण कषाय. यात साधक सर्वविरती अथवा देशविरती व्रत घेऊ शकतो.

चौथा प्रकार संज्वलन कषाय ह्या स्थितीमध्ये जीवाला उच्चतम चारित्र प्राप्त होऊ शकते. तरीपण जोपर्यंत सर्व कषाय नष्ट झाल्याशिवाय मोक्ष प्राप्त होऊ शकत नाही.

म्हणून मोक्षार्थी जीवाने कषाय निर्मूलन करण्याचाच प्रयत्न करावा. अक्रोधी, अमानी, अमायी, अलोभी होण्याचा सतत अभ्यास करावा. जोपर्यंत कषाय सुटत नाही तोपर्यंत जीव पर-भाव म्हणजे विभावदशेत आपले जीवन व्यर्थ घालवतो. विभावाकडून स्वभावाकडे येण्यासाठी आत्म्यावरील कर्माचे आवरण दूर करण्यासाठी अकषायी भावात रमण करणे अत्यावश्यक आहे.

मानवाला स्वातंत्र्याच्या सुखाचा अनुभव तेव्हा होतो जेव्हा सर्व कषाय शांत होतात. भ. महावीरांनी स्वानुभावाने सांगितले की, कषायाने ग्रस्त व्यक्ती मुक्तपणे जगू शकत नाही. आम्ही बाह्य स्वतंत्रता मिळवली पण कषायापासून मुक्त होण्याचा तिळमात्रही प्रयास केला नाही. त्यामुळे आज संपूर्ण जन जीवन हिंसा, घृणा, लोभ, अहंकाराने ग्रासलेले आहे. सगळीकडे हिंसेचे तांडव-नृत्य चालले आहे. भ्रष्टाचार बोकाळला आहे. बाह्य स्वातंत्र्य मिळणे सोपे आहे पण खरे आत्मिक स्वातंत्र्यासाठी आपल्या भावनेवर आपले शासन पाहिजे. महापुरुष जे होऊन गेले ते आंतरिक स्वातंत्र्याने संपन्न होते. 'स्व' वर 'स्व'चे अनुशासन होते.

क्रोधामुळे प्रेम व बंधुत्व नष्ट होते. मान केल्याने विनम्रता नष्ट होते. जिथे माया,

द्वेष असते तिथे मित्रता टिकत नाही. परंतु लोभ तर सर्वनाश करणारा सर्वभक्षी आहे. त्याचा विजय मिळवला तर परमशांती प्राप्त होते.[११६]

कषाय सन्निपात रोगासारखा आहे. या रोगात द्राक्ष, ऊस, दूध, साखर यांचे पथ्य पाळले नाही तर रोग बळावतो, त्याचप्रमाणे कषाय संसाराची वृद्धि करतात. जीव कैदी आहे व कषाय त्याचे पहारेकरी आहेत.[११७] जे कषायाच्या ताब्यात आहेत त्यांची संसारातून कधी सुटकाच होत नाही.

उत्तराध्ययन सूत्रात केशीस्वामी आणि गौतमस्वामी यांचा संवाद आहे. केशीस्वामी, गौतमस्वामींना प्रश्न विचारतात की, ह्या जगात अशी कोणता अग्नी आहे जो शरीरधारी जीवाला जाळतो आणि तो अग्नी कशाने विझतो. तेव्हा गौतमी उत्तर देतात-

कसाया अग्गिणो वुत्ता, सुय-सील-तवो जलं[११८]

कषाय हा अग्नी, कषाय-क्रोध, माया, लोभ ही अग्नी आहेत आणि ह्या अग्नीला शमविण्यासाठी श्रुतशास्त्राचे, सात्त्विक साहित्याचे अध्ययन पठण, पाठन, चिंतन-मनन आणि बारा प्रकारचे तप व शील ह्या जलाचा उपयोग करावा लागतो. क्रोधामुळे आत्मा पतीत होतो. मानामुळे अधमगती मिळते, माया केल्याने सद्गतीचा मार्ग बंद होतो व लोभामुळे इहलोकात आणि परलोकात दोन्ही ठिकाणी भय, कष्ट, ताप, दुःखच दुःख वाट्याला येतात.[११९]

कषायावर विजय मिळविण्यासाठी दशवैकालिकमध्ये श्रमण भ. महावीरांनी सांगितले आहे-

उवसमेण हणे कोहे, माणं मद्दवयाजिणे ।
मायं च उऽज्जवभावेण, लोभं संतोसओ जिणे ॥[१२०]

क्रोधाचे हनन 'उपशम' म्हणजे शांतीने करा. मानाला मृदतेने जिंका. माया सरळतेने जिंका, ऋजुतेने जिंका आणि लोभवर संतोषने विजय मिळवा.

क्रोधाला वश करण्यासाठी उपशम म्हणजे क्षमा, सहिष्णुता अथवा शान्तता धारण करावी.

मान वश करण्यासाठी नम्रता, विनय, मृदुता, मायावश करण्यासाठी ऋजुताचे आचरण करावे. आणि लोभ वश करण्यासाठी आत्मतृप्ति निस्पृहता इत्यादिचे आचरण करावे. गौतमकुलकमध्ये सांगितले आहे की -

कोहाभिभूया न सुहं लहंति, माणंसिणो सोयपरा हवंति ।
मायाविणो हुंति परस्स पेसा, लुद्धा महिच्छा नरयं उविंति[१२१]

क्रोधाने आक्रान्त जीव सुखी होऊ शकत नाहीत. मानी लोक शोकग्रस्त होतात. मायी लोक दुसऱ्याचे चाकर बनतात. आणि अनावश्यक मोठमोठ्या इच्छा करणारे लोभी नरकात जातात.

श्री श्रमण भ. महावीरांनी उत्तराध्ययन सूत्रात सांगितले आहे.

कोह विजएणं खंतिं जणयई - क्रोधावर विजय मिळवल्याने क्षमाभाव जागृत होतो.

माण विजएणं अद्दवं जणयई - अभिमानावर विजय मिळवल्याने मृदुता जागृत होते.

माया विजएणं मज्जवं जणयई - मायावर विजय मिळवल्याने ऋजुता सरलता प्राप्त होते.

लोभ विजएणं मद्दवं जणयई - लोभावर विजय मिळवल्याने संतोष प्राप्त होतो.[१२२]

वेगवेगळ्या शास्त्रात वेगवेगळ्या शब्दांनी कषाय भावनेचे वर्णन केले आहे. परंतु सर्वांचा भावार्थ सारखाच आहे.

जिथे कषायाचा वास आहे तेथे संसार आहे. जिथे कषाय नाही तेथे मुक्ती निश्चित आहे. ज्याप्रमाणे रात्री दिव्याचा प्रकाश आवश्यक आहे. वादळाशिवाय पाऊस नाही, बिजाशिवाय झाड नाही. मातापित्यांशिवाय संतान होत नाही, सूर्याशिवाय दिवस नाही, मरणशिवाय जन्म नाही, त्याचप्रमाणे कषाय सोडल्याशिवाय मोक्ष प्राप्त होत नाही. म्हणून कषायांचा त्याग करण्याचे सतत चिंतन, मनन करावे आपले हृदय पवित्र भावनेने भरावे. तरच आत्मिक आनंदाची प्राप्ती होईल.

कंदर्पादी संक्लिष्ट भावना

मनुष्याचे जीवन शुभ व अशुभ तत्त्वांनी बनलेले आहे. असे म्हणतात की, माणसामध्ये प्रकाशाचा अंश थोडा आणि अंधकाराचा अंश अधिक असतो. मनुष्य म्हणजे तेज व तम यांचा पुतळा आहे. म्हणून मनुष्याने पुरुषार्थ करून अंधःकार दूर करायला पाहिजे. मनुष्य जन्म याचसाठी मिळाला आहे की अशुभाकडून शुभाकडे जाण्यासाठी मलीन

अशुभतेपासून मुक्त होऊन शुभ व शुद्ध तत्त्वांची प्राप्ती करण्यासाठी प्रयत्न करावा. शुभ तत्त्वांचा जीवनात उत्तरोत्तर विकास करण्यासाठी वेगवेगळ्या साधनापद्धती प्रत्येक धर्मात सांगितलेल्या आहेत.

आजच्या युगाची जी स्थिती आपण पहात आहोत त्यात बाह्य आडंबर, कर्मकांड, उत्सव या व अशा अनेक गोष्टी बाह्य जगात गुंतवून ठेवणाऱ्या आहेत. शुभसाधना मार्गातील हे अडसर आहेत. ह्या संसारातील आकर्षण असल्यामुळे माणूस चिखलात फसल्याप्रमाणे त्यात अडकून पडतो. अशा या भौतिक जगाचा मोह खेचणारा असला तरी याही परिस्थितीत असेही जीवात्मा आहेत जे आत्मकल्याण साधना करून मनुष्य जन्माचे सार्थकही करीत आहेत.

मनुष्य मूळात सात्त्विक प्रवृत्तीचा आहे पण कर्मावरणामुळे त्याची प्रवृत्ती झाकली गेली आहे. आपले मूळ गुण सुरक्षित ठेवण्यासाठी अशुभ भावनेपासून मुक्त व्हायला पाहिजे.

माणसाच्या स्वभावाची एक विशेषता अशी आहे की सोपे, सरळ सहजसाध्य गोष्टी तो पटकन स्वीकारतो. अवगुणांचा स्वीकार पटकन होतो, त्याप्रमाणे गुण अंगिकार करण्यास मात्र प्रयत्न करावे लागतात. अवगुणांचे अनुकरण करण्यासाठी प्रयत्नच करावा लागत नाही. यापासून दूर राहण्यासाठी प्रथम शुभ म्हणजे चांगले काय व अशुभ म्हणजे वाईट काय याची समज असायला पाहिजे. जोपर्यंत हे समजणार नाही तोपर्यंत पुण्य-पाप काय व कशात आहे हेही समजणार नाही. अशुभ भावनेतच जीवनातील सगळा वेळ व्यर्थ जाईल.

जेव्हा जेव्हा मनुष्य अशुभ भाव चिंतनात असतो तेव्हा त्याची स्थिती अधोगतीकडे जाणारी असते. इतकेच काय अगदी कोणी महान तपस्वी, योगी असला व त्याची मानसिकता अशुभ चिंतनाची असेल तर तो नरकात जाऊ शकतो. म्हणून महान आचार्यांनी, जे आगमोत्तर काळात होऊन गेले, त्यांनी अशुभभावनेचे स्वरूप समजावून सांगितले व त्याचा त्याग करावा हे ही सांगितले आहे. हिंसा इत्यादी पाच आणि क्रोधमान इत्यादी चार अशा नऊ अशुभ भावनेचे विवेचन पाहिल्यानंतर कांदर्पि इत्यादि अशुभ भावनेचे वर्णन बृहत्कल्प भाष्यात प्राप्त होते ते पाहू:

बृहत्कल्प भाष्याच्या संस्कृत वृत्तीचा प्रारंभ आचार्य श्री मलयगिरी सूरींनी केला होता आणि संपूर्ती आचार्य श्री क्षेमाकिर्ती यांनी केली होती. त्या बृहत्कल्पसूत्रात भावनाविषयक चर्चा प्राप्त होते तेथे सांगितले आहे की भावना दोन प्रकारच्या आहेत

१) संक्लिष्ट आणि २) असंक्लिष्ट[१२३]

साधकाने संक्लिष्ट भावनेचा परित्याग करून असंक्लिष्ट भावनेचा अभ्यास केला पाहिजे. जो पापात्मक, आत्मक्लेशप्रद भावनेने युक्त असतो त्याला 'संक्लिष्ट' म्हणतात. ह्याचे तात्पर्य 'अशुभ किंवा अप्रशस्त भावना' आहे. या भावनेमध्ये संक्लेशपूर्ण, अशुभतापयुक्त चिंतन सतत चालत राहते. त्यामुळे ही संक्लिष्ट भावना आत्म्याच्या पतनाला कारणीभूत आहे. असंक्लिष्ट भावना आत्म्याच्या शुभात्मक प्रवृत्तीने युक्त असते. शुभपरिणाम तीन प्रकारचे मानले आहे- अशुभोपयोग, शुभोपयोग आणि शुद्धोपयोग.

अशुभोपयोग पापबंधाचे कारण आहे.

शुभोपयोग पुण्यात्मक बंधाचे कारण आहे.

शुद्धापयोग पापकर्मापासून विवर्जित आत्मोत्कर्षाचा भाव आहे.

असंक्लिष्ट भावना आत्म्याला शुद्धोपयोगाकडे जाण्यास प्रेरित करते. साधनामार्गावर पुढे जाणारा आत्मा शुभापासून शुद्धाकडे गतिशील होतो. हेच त्याचे परम लक्ष्य आहे.

बृहत्कल्पभाष्यामध्ये संक्लिष्ट - अप्रशस्त भावनेचे १) कांदर्पी २) देवकिल्विषी ३) अभियोगी ४) आसुरी ५) संमोही असे पाच प्रकार आणि त्या प्रत्येकभावनेचे पाच-पाच उपभेद केले आहेत.[१२४]

उत्तराध्ययन सूत्राच्या 'जीवाजीव विभक्ती' नामक अध्ययनामध्ये ह्या पाच भावनांचा उल्लेख झाला आहे. ह्याचे पूर्वीच तिसऱ्या प्रकरणात विवेचन केलेले आहे. उत्तराध्ययन सूत्र आणि बृहत्कल्प भाष्यामध्ये दोन्ही ठिकाणी पहिल्या भावनेचे नाव 'कांदर्पी' आहे. दोन्हींचे तात्पर्य जवळजवळ एकसारखेच आहे. येथे पाच संक्लिष्ट भावनेच्या भेद प्रभेदाचे विवेचन केले आहे.

कांदर्पी भावना

ज्यांच्यामध्ये अत्याधिक कामवासना असते त्या कामप्रधान देवांना 'कंदर्प' म्हटले जाते. त्यांचे मन सदैव कामवासनेच्या चिंतनात गढलेले असते. अशाप्रकारच्या भावनेला 'कांदर्पी भावना' म्हणतात.

कांदर्पी भावनेचे प्रकार

१) कंदर्प २) कौत्कुच्य ३) द्रवशीलता ४) हासकारिता ५) परविस्मायकता ही पाच रूपे आहेत.[१२५]

भाष्यकाराने त्या प्रत्येकाचे वर्णन केलेले आहे.

१) **कंदर्प** - यासंबंधी ते असे सांगतात की, विपरीत मुख करून उच्च स्वराने अट्टहास करणे, कामसंबंधी कथा करणे, कामुकतेचा उपदेश देणे आणि कामुक विषयाची प्रशंसा करणे हे सर्व कंदर्पामध्ये समाविष्ट आहे.[१२६]

२) **कौत्कुच्य** - भांडाप्रमाणे चेष्टा करणाऱ्याला कुंत्कुच म्हणतात. तसेच त्याच्या कार्याला 'कौत्कुच्य' म्हणतात. तशी चेष्टा शरीर आणि वाणीद्वारे केली जाते. स्वतः न हसता गंभीर राहून नाक, भुवया नेत्र, मुख, दात, ओठ, हात, पाय, कान इत्यादी शरीराच्या अवयवांद्वारे अशी चेष्टा दाखविणे की दर्शक त्या पाहून हसून हसून बेजार होतात.

अशाप्रकारे शरीरकुचेष्टेला 'काया कौत्कुच्य' म्हणतात. 'वाक् कौत्कुच्या'मध्ये वाणीद्वारे अशा प्रकारे बोलले जाते की जे ऐकून दुसरे हसतील, आश्चर्य करतील. मोर, मांजर, कोकीळ, कुत्रा इत्यादी पशुपक्षांचे आवाज काढणे, मुखाने वाद्यांचा आवाज काढणे, मुखाने वाद्यांचा आवाज काढणे हे सर्व 'कौत्कुच्य' भावनेच्या अंतर्गत येते.[१२७]

३) **द्रवशीलता** - 'द्रव' याचा अर्थ 'द्रुतता' आहे. जो शरदऋतूमध्ये दर्पित बैलाप्रमाणे द्रुतगतीने चालतो. तो द्रुतकारी आहे. येथे बैलाची उपमा देण्याचे कारण हे आहे की शरदऋतूमध्ये बैलाला खाण्यासाठी खूप चारा मिळतो. आणि माशा, मच्छर इत्यादींचा उपद्रव राहत नाही म्हणून बैल मदोन्मत्त होऊन उच्छृंखलपणे फिरतो.

द्रवशील पुरुषसुद्धा तशाच प्रकारे निरंकुश होऊन द्रुतगतीने चालतो. नीट पाहिल्याशिवाय सर्व क्रिया वेड्याप्रमाणे करीत राहतो. अशा बाधक स्थितीची भावना ठेवल्याने साधकात्मा स्थिरतेच्या दिशेमध्ये अग्रेसर होतो. [१२८]

४) **हासकारिता** - बहुरूपीप्रमाणे नानाप्रकारचे वेश आणि रूप घेऊन, विविध प्रकारची वचने बोलून दुसऱ्यांच्या बोलण्याची नक्कल करून हसविणे, याचा हास्यकारितेमध्ये समावेश होतो. असे केल्याने मनाचे स्थैर्य नष्ट होते. त्याचे स्थान तुच्छता घेते. अशाप्रकारे हास्यकारितेच्या दुष्परिणामाचे चिंतन, अनुभावन केल्याने या वृत्तीपासून दूर राहण्याची प्रेरणा मिळते.

५) **परविस्मायकता** - इंद्रजाल, जादूचे खेळ आणि असेच अन्य कौतुक तमाशे करून कोडे, वक्रोक्ती इत्यादी सांगून ग्राम्य लोकामध्ये प्रचलित आलाप-संलापाने दुसऱ्यांना विस्मित करणे, चित्तभ्रम निर्माण करणे म्हणजे परविस्मायकता किंवा परविस्मापन आहे.[१२९]

या तत्त्वानुसार साधकाला प्रश्न पडतो की हसणे, चेष्टा करणे हे देखील अशुभ आहे काय?

"उत्तम ज्ञानी पुरुष डोळ्यांनी हसतात, अर्थात फक्त डोळ्याने स्मित करतात. मध्यम पुरुष हसताना ओठ हलवतात पण दोन मिनिटात हसने थांबवतात. अधम आणि निकृष्ट प्रकृतीची माणसे खूप मोठ्याने हसतात. त्यांचे हा-हा-ही-हीचा आवाज पुष्कळ वेळ चालू राहतो. कधी कधी भ्रम होतो की हे वेडे-बिडे तर झाले नाही ना ? काही अधम लोक दात वाजवत खळाळून हसतात.[१३०] अशा प्रकारचे हास्य असभ्यतेचे प्रतीक आहे. वास्तविक विवेकी माणसाने हसणे हसविणे यात विवेक ठेवावा. यात अविवेक असेल तर अशुभतेचे प्रतीक आहे.

भगवती आराधना मूळ नाव मूलाराधना यात कन्दर्प इ. भावनेचे विवेचन आहे. आ. शिवार्य यांना ह्या भावनांना संक्लेश उत्पन्न करणाऱ्या आहेत असे म्हटले आहे.

कांदर्पी भावनेचे निरूपण करताना एका श्लोकातच पाचही भावनांचा नामोल्लेख केला आहे. विजयोदय टीकेमध्ये ह्या भावनेचे वर्णन करताना लिहिले आहे की, रागाच्या भरात हास्यमिश्रित असभ्य वचन बोलणे कंदर्प वचन आहे. अती रागाने हसून दुसऱ्यांना उद्देश्यून शरीराचे असभ्य अभिनय करून असभ्य वचन उच्चारणे कौत्कुच्य होय. कंदर्प आणि कौत्कुच्य वचनाचा जो पुन्हा पुन्हा प्रयोग करतो त्याला चलशील अथवा द्रवशील समजावे. नेहमी हास्य उत्पन्न होईल अशी कथा सांगणारा, मंत्र, इन्द्रजाल इ. कौतुक दाखवून लोकांना आश्चर्यचकित करणारा, रागजनित हास्य, वचनयोग, कायायोग द्वारा लोकांना विस्मित करणारा त्याला कंदर्प भावना म्हणतात.

मूलाचारमध्ये वट्टकेराचार्य यांनी कांदर्प इ. अशुभ भावनेचे वर्णन करताना लिहिले आहे की ह्या भावनेत असणारा हलक्या कोटीच्या देव गतीत उत्पन्न होतो. मृत्युसमयी जर असे तुच्छ विचार, भावना आल्यातर संयमाची विराधना झाल्यामुळे कान्दर्प, अभियोगी इत्यादी देवगती मिळते. कंदर्प भावनेचे वर्णन करताना ग्रंथकार म्हणतात-

जो साधक असत्य बोलतो, असत्याचाच प्रचार करतो तो कन्दर्प जातीच्या देवगतीत जातो.[१३२]

श्रावकाच्या बारा व्रतांमध्ये अनर्थदंड हे आठवे व्रत आहे. त्याचा पहिला अतिचार कंदर्प आहे. चारित्रमोहात्मक रागाच्या उदयाने हास्यमुक्त अशिष्टवचनाच्या प्रयोगाला इथे कन्दर्प म्हटले आहे.[१३३] अष्टप्राभृतमध्ये पण कंदर्पादी अशुभ भावनेचा उल्लेख आहे. त्यात

हो उत्पन्न होईल असे वचन, व्यर्थ चेष्टा, असभ्यवचन, हसता-हसता बोलून दुसऱ्यांना विस्मित करणे इत्यादिला कांदर्पी भावना आहे, असे म्हटले आहे.

या सर्व विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो की -

अती हसणे, अश्लील गोष्टी बोलणे, व्यंग्यात्मक वचन बोलणे, द्रौपदीच्या एका व्यंग्यात्मक वाक्याने महाभारत घडले, म्हणून असे वचन अशुभ भावनेने दूषित आहेत.

कामशास्त्राच्या गोष्टी सांगून संसार वाढविणे, द्रवशीलता म्हणजे दुःशीलता आणि दुसरा अर्थ भरभर बोलणे, चालणे, प्रत्येक काम अतिचपलतेने करणे म्हणजे द्रवशीलता.

भजन, भोजन आणि भाषण हे तीन कार्य सावकाश करावीत. वाचाळतारहित, उद्वेगरहित, शांतपणे, धीरगंभीर आवाजात बोलावे अतिघाई करण्याने मनाची अस्थिरता, चंचलता प्रदर्शित होते.

अशा प्रकारच्या कन्दर्प भावनेचे आचरण करणारा श्रमण जर आलोचना न करता मृत्यू पावला तर स्वर्गात गेला तरी कन्दर्पी देव बनतो. कंदर्पी देव म्हणजे हलक्या प्रतीचा. हलक्या प्रतीचा. हलक्या प्रतीच्या देवांना तेथेही विदुषकाचेच काम करावे लागते. अव्रती लोक मृत्यूनंतर तिर्यंच गतीमध्ये उत्पन्न होतात.

देव किल्विषी भावना

बृहत्कल्प भाष्यामध्ये दुसरी भावना 'देवकिल्विषी' आहे. परंतु उत्तराध्ययन सूत्रात तिसऱ्या भावनेचे नाव 'किल्विषी' आहे. दोन्ही भावनांचे तात्पर्य जवळजवळ सारखेच आहे. किल्विषी हास्यपरिहास्ययुक्त देवांच्या भावनात्मक वृत्तीच्या अनुरूप तुच्छ वृत्ती किंवा तुच्छ भाव हे ह्या भावनेचे स्वरूप आहे, लक्षण आहे. बृहत्कल्पवृत्तीमध्ये ह्याचे विश्लेषण करताना स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे की जे देव पापी वृत्तीचे आहेत, चांडाळाप्रमाणे ज्यांची हीनवृत्ती आहे त्यांना किल्विषी म्हणतात. त्यांची कार्ये अधम असतात. अशा अधम आणि निरर्थक कार्याबरोबर जोडलेल्या भावनेला 'देवकिल्विषी' म्हटले जाते.

किल्विषी भावनेचे प्रकार - १) 'श्रुता'चा अवर्णवाद; २) सर्वज्ञ आणि केवलींचा अवर्णवाद, ३) धर्माचार्यांचा अवर्णवाद; ४) साधूंचा अवर्णवाद; ५) मायावाद; हे पाच पक्ष आहेत.[१३४]

१) 'श्रुत'चा अवर्णवाद - प्रवचनाच्या अवहेलनेची पर्वा न करता असे बोलणे

की 'षड्जीवनीकाय' यामध्येही षड्कायांचे वर्णन आहे, शस्त्रपरिज्ञेमध्येही त्याचेच प्रतिपादन केलेले आहे. दुसऱ्या अध्ययनामध्येसुद्धा त्याचे पुन्हा पुन्हा वर्णन केलेले आहे. त्याचप्रमाणे लोकाचे सुद्धा पुन्हा पुन्हा वर्णन आले आहे. प्रमाद-अप्रमादाचेही प्रतिपादन केलेले आहे. हे आचारांगामध्ये आले आहे तेच उत्तराध्यनामध्येही आले आहे हा पुनरुक्तीचा दोष आहे. साधूचे लक्ष्य एकमात्र 'मोक्ष प्राप्त करणे' त्यानुसार प्रयत्न करणे हेच असावे. तेव्हा त्यांनी योनीप्रभृतासारखे ज्योतिषविषयक शास्त्रवाचण्याची त्यांना काय आवश्यकता आहे ? असे सांगणे सूत्राचा अवर्णवाद आहे. त्यांना समजत नाही की सूत्रामध्ये कायादिंचे जे वारंवार निरूपण केलेले आहे त्याचा अर्थ असा आहे की अत्यंत सूक्ष्मतेने प्रयत्नपूर्वक त्यांचे रक्षण केले पाहिजे. हेच धर्माचे रहस्य आहे, तत्वाबद्दल अत्यंत आदर दाखविणारे वचन आहे. हा पुनरुक्तीचा दोष नाही. तसेच ज्योतिषशास्त्रांदिंचे ज्ञान, मुमुक्षूच्या प्रव्रज्या इत्यादी शुभकार्यामध्ये उपयोग करण्याच्या दृष्टीने आहेत म्हणून परंपरेने ते मोक्षपर आहे.[१३५]

२) **सर्वज्ञ अथवा केवलीचा अवर्णवाद** - अशी शंका घेणे की केवलीला ज्ञानोपयोग, दर्शनोपयोग क्रमाने होतो का ? जर क्रमाने होतो असे म्हटले तर ते ज्या काळाला जाणतात त्या काळाला पाहत नाहीत आणि ज्या काळाला पाहतात त्या काळाला जाणत नाहीत अशाप्रकारे एकांतरीत ज्ञान दर्शनाचा उत्पात झाला तर केवलज्ञान, केवलदर्शनाचा आवरक होईल. अशाप्रकारे शंकेला पुढे वाढवून सांगतात की जर दुसरा पक्ष असा मानला की केवलज्ञान आणि केवलदर्शन हे एकाचवेळी होतात तर असे म्हणणे योग्य होणार नाही कारण असे झाले तर साकार आणि अनाकार उपयोग दोन्ही एक होतील. केवलज्ञान, केवलदर्शनाचे स्वरूप जसे शास्त्रामध्ये दाखविले आहे तसे केवलज्ञानीमध्ये दिसत नाही. असे केवलीच्या अवर्णवादामध्ये म्हटले आहे. केवलीचा अवर्णवाद सांगणे हे आत्मपतनाचे कारण आहे. ह्यापासून वाचण्यासाठी अशा अशुभ भावना साधकाने मनात आणू नये.[१३६]

३) **धर्माचार्यांचा अवर्णवाद** - हे आचार्य विशुद्ध अथवा उच्च कुळातील नाहीत, हे व्यवहार कुशल नाहीत, त्यांना उचित-अनुचित यांचे ज्ञान नसते, हे आपल्या गुरूंची सेवा करीत नाहीत, अनुचित कार्य करतात, ईष्यापूर्वक गुरूंचे दोष पाहतात व ते लोकांना सांगतात, गुरूंच्या प्रतिकूल आचरण करतात. असे करणे हे पापाचरणमूलक आहे. यापासून वाचणे आवश्यक आहे.[१३७] ह्या सर्व गोष्टींचा 'धर्माचार्याच्या' अवर्णवादामध्ये समावेश होतो.

४) साधुंचा अवर्णवाद - हे साधू असहिष्णू वृत्तीचे असतात, हे पराभव किंवा अपमान सहन करू शकत नाहीत, असा अपमान होऊ लागला तर ते त्या स्थानाला सोडून देतात, हे स्वभावतःच निष्ठुर असतात, हे क्षणामध्ये हृष्ट किंवा तुष्ट होतात, यांचे चित्त अस्थिर असते. अत्यंत खुशामती करून, स्तुती करून हे गृहस्थांना खुश करतात आणि वस्त्र, कांबळे आणि भांडी यांचा पुष्कळ संचय करतात, हे अत्यंत लोभी असतात. अन्यप्रकारच्या असत्य कथनाचा साधूंचा अवर्णवाद यामध्ये समावेश होतो. हा पतनाचा मार्ग आहे. ह्या अधोगतीच्या मार्गापासून साधकाने नेहमी सावध राहिले पाहिजे.[१३८]

५) मायावादी - जो बगळ्याप्रमाणे आपल्या दूषित परिणामांना लपवितो आणि दुसऱ्यांच्या ज्ञान, दर्शनादी गुणांना ईर्ष्या किंवा द्वेषामुळे नष्ट करण्याचा किंवा लपविण्याचा प्रयत्न करतो, जो चोराप्रमाणे शंका घेतो, अप्रत्यक्षरीत्या चोरी करण्याची वृत्ती असते. मायावादी आत्म्याच्या निर्मळ स्वरूपाला कलुषित करतो.[१३९]

बृहत्कल्पात मायावादी हा पाचवा भेद आहे. उत्तराध्ययन सूत्रात मायावादी न म्हणता धर्मसंघाचा अवर्णवाद म्हटले आहे. तेथे ही मायावी शब्द आहे पण तेथे ह्या पाच प्रकारच्या अवर्णवाद करणाऱ्याला मायावी विश्लेषण लावले आहे. मायावाद असा वेगळा भेद केलेला नाही.

वरील विवेचनावरून स्पष्ट होते की किल्विषी भावनेचा मुख्य संबंध निंदा आणि कपट यांच्याशी आहे.

जो माणूस आपल्या आराध्य पुरुषांची निंदा करतो. लोकामध्ये त्यांचा अवर्णवाद करतो. कपटपूर्वक छिद्रान्वेषण करतो त्यांच्या उद्‌बोधनाचा अपमान करतो, तिरस्कार करतो, त्यास किल्विषिक भावनेचा म्हटले आहे.

किल्विषक भावनेची काही अन्य कारणे शास्त्रात आहेत -

तवतेणे, वयतेणे, रूवतेणे य जे णरे ।
आचार भावतेणे य कुव्वइ देवकिव्विसं ॥[१४०]

तपाची चोरी व्रत, रुप, आचार इ. ची चोरी करणारा किल्विषी देव रूपात उत्पन्न होतो.

तपाची चोरी म्हणजे स्वतः तप न करता दुसऱ्या तपस्वीच्या नावाखाली स्वतःची पूजा प्रतिष्ठा वाह-वाह करवून घेणे. कोणी साधूला विचारले की "महाराज आपणामध्ये

तप तपस्वी साधू आहेत ते आपणच का ?'' अशावेळी मौन राहणे किंवा साधू तर तपस्वीच असतात असे भ्रमपूर्ण उत्तर देणे हा तपस्वी नसताना तपस्वीची प्रतिष्ठा मिळविण्याचा प्रयत्न करणे ही सर्व मायाचार आहेत. म्हणून उत्तराध्ययनाप्रमाणे मूलाराधनेमध्ये पण मायावी हे विशेषण रूप आहे.

मूलाराधनेमध्ये देव हा शब्द न वापरता मात्र ''किल्विष भावना'' संबोधित करून वर्णन केले आहे. त्यात अशाप्रकारे वर्णन आहे.

श्रुतज्ञानात कपट करणारा अर्थात ज्याला ज्ञान प्रिय नाही पण दिखाऊ विनय करणारा ज्ञानविषयक मायावी आहे. केवलीबद्दल आदर दाखवतो. परंतु मनापासून त्यांच्याबद्दल आदरभाव, पूज्यभाव नाही. यास केवलविषयक मायावी म्हणतात. चारित्र म्हणजे धर्म, त्या चारित्रधर्माची अतिशय भक्ती करत आहे. त्याचे मनःपूर्वक आचरण करीत आहे असे लोकांना भासवतो. पण अंतरंगात जो चारित्राला तृणमात्र मानीत नाही. असा धर्म मायावी.

आचार्य उपाध्याय आणि साधू यांना फसविणारा त्यांच्यात दोष नसेल तरी दोषारोपण करणारा आचार्यादि प्रतीमायावी आणि श्रुतज्ञानात दोष नसताना दोष दाखविणारा, अवर्णवाद करणारा अवर्णवादी आहे, अशा अशुभ विचाराने किल्विषजातीच्या देवात उत्पन्न होतो. हे देव खरे पण इन्द्राच्या सभेत त्यांना प्रवेश नसतो. त्यांना पहारेकऱ्याप्रमाणे बाहेरच थांबावे लागते.१४१

मूलाराधना म्हणजेच भगवती आराधना

अशा प्रकारे जीव माया, निंदा करून स्वतःची दुर्गती करतो. मूलाचारामध्ये किल्विषी भावनेचे वर्णन करताना टीकेमध्ये लिहिले आहे की संसारसमुद्र पार करणारे तीर्थंकर त्याच्या जो प्रतिकूल आहे आणि ऋषी, यती, मुनी-अणगार-श्रावक, श्राविका हा जो चतुर्विध संघ आहे ह्या सर्वांबद्दल विनय न करता जो दुसऱ्यांना ठगण्यात कुशल आहे, त्याला ह्या किल्विष कार्यामुळे पडह वाद्य वाजविणाऱ्या किल्विषक जातीच्या देवात उत्पन्न व्हावे लागते.१४२

स्वर्गामध्ये किल्विषिक देवांची एक जाती आहे. जी देवलोकाच्या खालील भागामध्ये आहे. या पृथ्वीतलावर हरिजनाचे जे स्थान आहे, साफ-सफाई करण्याऱ्यांचे जे स्थान आहे तसेच स्थान देवलोकात या किल्विषिक देवांचे आहे.

अभियोगी भावना

बृहत्कल्पभाष्यामध्ये 'अभियोगी भावना' तिसरी आहे. उत्तराध्ययन सूत्रामध्ये दुसऱ्या भावनेचे नाव 'अभियोगी भावना' आहे. संस्कृत वृत्तीमध्ये ह्याची व्याख्या करताना लिहिले आहे की जे उच्च देवांच्या सेवेमध्ये, परिचर्येच्या कार्यामध्ये नियुक्त असतात, किंकरांप्रमाणे सेवक असतात त्या देवांना 'अभियोग्य' म्हणतात आणि त्यांच्या भावनेला अभियोगी भावना' म्हणतात. याचा अर्थ असा की ते देव हीन भावनेने युक्त असतात. अभियोगी भावनेचे विवेचन आशयरूप उत्तराध्ययन आणि बृहत्कल्प या दोन्हींमध्ये सारखेच आहे.

अभियोगी भावनेचे प्रकार - १) कौतुक जीविता; २) भूतीकर्मजीविता; ३) प्रश्नजीविता; ४) प्रश्नाप्रश्न जीविता; ५) निमित्ता जीविता हे अभियोगी भावनेचे पाच प्रकार आहेत.[१४३] ह्या पाच प्रकारांचे विवेचन असे आहे-

१) कौतुक जीविता - मुलांचे रक्षण करण्यासाठी, सौभाग्य संपादन आणि संवर्धनासाठी स्त्रियांना विशेषरूपाने स्नानादी करविणे, भोग, शांती इत्यादी निमित्ताने अग्नीमध्ये हवन करणे, डोक्यावर मंत्रित हात फिरविणे, रोग निवारण करण्यासाठी अग्नीमध्ये हवन इत्यादी करून धूप देणे, अयोग्य वेष धारण करणे, वृक्ष इत्यादींचे आलिंगन करविणे, (अवस्तोमन-अनिष्ट रोगादींच्या शांतीसाठी थुतकारा टाकणे) बंध-गंडे दोरा इत्यादी बांधणे ह्या सर्व कर्मांना 'कौतुककर्म' म्हटले आहे. धर्ममार्गापासून विचलित करणारी ही कर्मे आहेत. ह्याच्या स्वरूपाचे चिंतन किंवा आचरण करणारी व्यक्ती 'अभियागी भावनेची' असते. साधू किंवा ब्रह्मचाऱ्याने केव्हाही ह्याचे आचरण करू नये. या दुर्भावनेपासून नेहमी सावध राहिले पाहिजे.[१४४]

२) भूतिकर्म जीविता - विद्या अथवा मंत्राद्वारे अंभिमंत्रित भस्म किंवा माती दोरा किंवा तंतूबरोबर शरीराला बांधणे ह्याला भूतिकर्म म्हणतात. ह्याचे प्रयोजन घर, शरीर, द्रव्य इत्यादींचे उपद्रवापासून रक्षण करणे, कोणालाही आपल्या वशीभूत करणे, ज्वर इत्यादींचे स्तंभन करणे ही सर्व आत्मपराङ्मुखतेची कार्ये आहेत. असे केल्याने साधकाचे मन व्रतपालन आणि त्यागवैराग्यापासून दूर होते. ह्या कुत्सित प्रभावांच्या दुष्परिणामांचे चिंतन करून त्यापासून दूर राहिले पाहिजे.[१४५]

३) प्रश्नाजीविता - देवतादींना विचारणे, प्रश्न करणे ह्याला प्रश्नाजीविता म्हणतात. अंगठ्यामध्ये, उच्छीष्टावर वस्त्रामध्ये, आरश्यामध्ये, तलवारीमध्ये, पाण्यामध्ये

भिंतीवर किंवा बाहूंमध्ये देवता इत्यादींच्या येण्याची कल्पना करून प्रश्न विचारणे हे प्रश्नाजीवितेच्या अंतर्गत येते. हे कपटयुक्त कार्य असल्याने धर्माच्या प्रतिकूल आहे, सोडण्यासारखे, परिहेय आहे असे समजून त्यापासून वेगळे राहणे, अलिप्त राहणे अपेक्षित आहे.[१४६]

४) **प्रश्नाप्रश्न जीविता** - ह्यात एखाद्याला प्रश्न विचारल्यावर तो स्वप्नात आपल्या अधिष्ठात्री देवीला त्या प्रश्नाचे उत्तर विचारतो आणि ती येऊन उत्तर देऊन जाते. दोन वेळा प्रश्न विचारला जात असल्याने याला प्रश्नाप्रश्न म्हणतात. स्वप्नात सांगितलेले उत्तर प्रश्न विचारणाऱ्याला सांगणे. डोमजातीची स्त्री आपल्या कुलदेवतेला अथवा यक्षाला प्रश्न विचारते, यक्षाद्वारे स्त्रीच्या कानामध्ये उत्तर सांगितले जाते. स्त्रीद्वारे प्रश्न विचारणाऱ्याला त्याचे शुभाशुभ फल सांगणे हे प्रश्नाप्रश्न जीवितामध्ये समाविष्ट आहे. हे निंद्य आणि नीच कर्म आहे. ह्याच्या चिंतनापासून दूर राहिले पाहिजे.[१४७]

५) **निमित्त जीविता** - निमित्त-भूत, वर्तमान, भविष्य असे तीन प्रकारचे आहे. ह्या तिन्ही काळात होणारा लाभ-तोटा, अनिष्ट-इष्ट इत्यादी जाणण्यासाठी चुडामणी वगैरे शास्त्रे आहेत. ती समजल्याशिवाय लाभ-तोटा यांचे ज्ञान होत नाही. त्यांच्या आधार दुसऱ्यांना नफा-तोटा दाखविणे, त्याच्याद्वारे जीवन चालवणे हे निमित्त जीवितेच्या अंतर्गत समाविष्ट आहे.

ऋद्धी, समृद्धी, संपत्ती, सुख, मोठेपणा इत्यादींच्या निमित्ताने कौतुकादी करणे ही अभियोगी भावना आहे. निःस्पृह भावनेने, आसक्ती न ठेवता, प्रवचन, प्रभावनेच्या लक्ष्याने कौतुकादी करणे ह्याचा या अशुभ भावनेमध्ये समावेश होत नाही. कारण तसे केल्याने चतुर्विध धर्मतीर्थाची प्रभावना होते तसे करणे आराधनेच्या अंतर्गत येते.[१४८]

शिवार्य आचार्यांनी 'अभियोगी'च्या ऐवजी 'अभियोग्य' शब्द घेतला आहे.

कुमारी कन्या वगैरेच्या अंगात भूतांचा संचार करणे, अकाली जलवृष्टी करणे इत्यादी आश्चर्यकारक प्रयोग करणे, अमावास्येच्या दिवशी चंद्र, दाखविणे, स्त्री अथवा पुरुषाला वश करणे, भूतिकर्म मंत्र प्रयोग करणे अथवा भूतांची क्रीडा दाखविणे, ह्या क्रिया करून आपले महत्त्व प्रदर्शित करण्यासाठी, मिष्टभोजनासाठी, किंवा इन्द्रियजन्य सुखासाठी केल्या तर त्याची ही 'अभियोग्य' भावना म्हटली जाईल. ह्या भावनेने जीवाची उत्पत्ती वाहनजातींच्या देवात होते. कोणी मुनी आपले अथवा इतरांचे आयुष्याचे भविष्य सांगण्यासाठी मंत्रउपयोग करील. धर्मप्रभावना करण्यासाठी असमय वृष्टी इ. करून दाखवेल

अथवा मंत्राच्या सहाय्याने मुनींची सेवा करेल या अशा चांगल्या उद्देशाने काही चमत्कार केले तर दर्शन, ज्ञान चरित्राच्या परिणामामध्ये फरक पडत नाही. त्याला दोष मानला जात नाही.[१४९]

निमित्त इत्यादीच्या सहाय्याने आजीविका चालवणाऱ्याला पापश्रमण म्हटले आहे.

"निमित्तेण य ववहरइ पापसमणेत्ति वुच्चइ ॥

अभियोगीभावना ठेवल्याने अर्थात वरील विद्येच्या प्रयोगाने हिंसा होते. असत्यात वृद्धी होते. जगात दंभ, पापाचार आणि अंधविश्वास पसरतो.

जे साधू लक्षणशास्त्र, स्वप्नशास्त्र, भविष्यशास्त्राचे प्रयोग करतात या शास्त्रात आसक्त होतात. अशांना कर्मफळ भोगावे लागते.

आसुरी भावना

उत्तराध्ययन आणि बृहत्कल्पभाष्य या दोन्हींमध्ये चौथी भावना सारखीच आहे. संस्कृत वृत्तीमध्ये नावाचे विश्लेषण करताना लिहिले आहे की, भवनपती श्रेणीचे देव असूर असतात. त्यांची भावना 'आसूरी' म्हटली जाते. अर्थात त्यांचे चिंतन हे क्रोध, मोह इत्यादींनी युक्त असते. कार्यसुद्धा त्याच कोटीचे असते. दोन्ही ठिकाणी ही भावना जवळ जवळ समान अर्थाने घेतली आहे.

आसुरी भावनेचे प्रकार - १) अनुबद्ध विग्रह २) संसक्तपणा ३) निमित्तदेशी ४) निष्कृत आणि ५) निरनुकंप.[१५१]

ह्या पाच भावनेच्या स्वरूपाचे विवेचन याप्रमाणे आहे.

१) अनुबद्ध विग्रह - ज्याला नेहमी कलह करण्याची सवय आहे, कलह करून जो पश्चाताप करीत नाही, जसे अरे ! मी हे काय केले ? इत्यादी क्षमायाचना करणाऱ्यालाही जो क्षमा करीत नाही, तीव्र कषायाच्या उदयाने जो स्व-पक्ष पर-पक्ष दोन्हींमध्येही प्रसन्नतेचा अनुभव करीत नाही. (येथे स्व-पक्ष म्हणजे साधु-साध्वी वर्ग आहे आणि पर-पक्ष म्हणजे 'गृहस्थ वर्ग' आहे) ह्या दोन्ही पक्षांना पाहून जो संतुष्ट होत नाही. हे सर्व अनुबद्ध विग्रहाच्या अंतर्गत येते. हे जाणून ह्याच्या त्यागाची भावना मनात जागृत केली पाहिजे.[१५२] वारंवार कलहकरणाऱ्याला पापश्रमण म्हणतात. कलहामुळे सम्पत्ति शांति आणि सभ्यता नष्ट होते.

२) संसक्तपणा - जो आहार, उपधी, पूजा, आदर सत्कार यामध्येच आसक्त

ऋद्धी, रसास्वाद प्रियता आणि गौरव प्रशस्ती इत्यादींच्या भावनेने उपहत होतो. त्यासाठी अनशन इत्यादी तप करतो त्याला 'संसक्त तपा' म्हणतात. वास्तविक आसक्तीपूर्वक केलेले कोणतेही तप व्यर्थ आहे. आसक्ती पापाचे मूळ आहे, असे आसक्तीपूर्वक तप करणे हे आसूरी भावनेचे लक्षण आहे.

३) **निमित्तदेशिता** - जसे पूर्वी अभियोगी भावनेमध्ये असे सांगितलेले आहे की, भूत, भविष्य, वर्तमान तिन्ही काळांशी संबंधित निमित्त तीन प्रकारचे आहे. लाभ-नुकसान, सुख-दुःख, जीवन-मृत्यू यांच्या रूपात ते सहा प्रकारचे आहे. येथे हा प्रश्न उपस्थित होतो की अभियोगिक भावनेमध्ये ह्याचा उल्लेख केला आहे. तरी येथे हेच वर्णन पुन्हा का केले ? त्याचे समाधान केले आहे की अभिमानाच्या आवेशात किंवा अहंकाराच्या तीव्रतेमुळे एखादी व्यक्ती आसुरी भावना ठेवते म्हणून असुरी भावनेत अंहकाराची मुख्यता आहे. परंतु जेथे अंहकाराची भावना नसते, तेथे अभियोगी भावना होते.[१५४]

४) **निष्कृपता** - कोणत्याही अन्य कार्यात आसक्त असणारा, निष्कृप-करुणारहित दयारहित भावनेने स्थावर एकेंद्रिय वनस्पती इत्यादींवर चालतो, बसतो, झोपतो. असे करताना त्याला थोडासुद्धा पश्चाताप होत नाही, कोणाच्या 'सत्' उपदेशाने प्रेरित होऊनही प्रायश्चित अथवा 'मिच्छामि दुक्कडं मिथ्या में दुष्कृतं' आपल्या असत् कार्याची निंदा करीत नाही. तो 'निष्कृप' आहे आणि अशी भावना निष्कृपता आहे.[१५५] दया, अहिंसा इत्यादी विचार तोच करू शकतो ज्याच्या हृदयामध्ये कृपा आणि करुणा असेल. निष्कृप व्यक्ती संवेदनाशून्य असते.

५) **निरनुकंपता** - जो दुसऱ्यांना भयभीत झालेला पाहून क्रूरतेमुळे स्वतः किंचितही कंपित होत नाही. असे ज्याचे हृदय कठोर असते तो 'निरनुकंप' आहे. अनुकंपेच्या पूर्वी लागलेल्या 'अनु' उपसर्गाचा अर्थ 'मागे होणे.' अर्थात दुःखित प्राण्याला कंपित झालेले पाहून स्वतः त्याच्यामागे कंपित होणे म्हणजे अनुकंपा होय. आणि ज्याच्या हृदयात अनुकंपा नाही तो निरनुकंप आहे.

येथे हे समजले पाहिजे की 'कृपा' आणि 'अनुकंपा' यामध्ये सूक्ष्म अंतर आहे. कोणत्याही प्राण्याला दुःखी न करता प्रवृत्तीशील राहणे 'कृपा' आहे आणि दुःखितांना पाहून त्यांच्याबरोबर स्वतःही दुःखी होणे, स्वतः त्यांच्या दुःखात सहभागी होणे ही अनुकंपा आहे. दयेमध्ये जागृकतेचा भाव आहे तर अनुकंपेमध्ये परिरक्षणाचा आशय आहे.

क्लेश करणे ज्याचा स्वभाव आहे आणि तप इ. शुभ क्रियासुद्धा कलहाने करतो त्याचा कोप पुढील जन्मात पण राहातो तो असुर गतीत जातो. तप करतो पण परिग्रहाचा मोह करतो, निर्दयपणे प्राण्यांना दुःख देतो याचा त्याला पश्चाताप ही होत नाही. असा मनुष्य असुरगतीमध्ये जातो.[१५६]

असुर म्हणजे राक्षस, दैत्य. लाक्षणिक भाषेत क्रोधाला सुद्धा असुर म्हटले गेले आहे.

आसुरतं न गच्छेज्जा[१५७] कोणावरही क्रोध करू नका. कारण क्रोध आल्यावर मनुष्य राक्षसाप्रमाणे क्रूर आणि अविवेकी होतो.

'मूलाचार'मध्ये वट्टकेराचार्य लिहितात - दुष्ट, क्रोधी, मानी, मायाचारी, तप व चारित्रपालन करण्यात, क्लेशयुक्त परिणाम असलेले, वैर-शत्रुत्व निर्माण करण्यातच ज्याने आपले जीवन घालवले त्या व्यक्तीचे या भावनेतच जर मृत्यू झाला तर त्याचा असुर जातीच्या अंबरीष भवनवासी देव योनीत जन्म होतो.

ज्याच्या हृदयात कृपा, अनुकंपा नाही. त्याला सम्यक्त्व रत्न कधीच प्राप्त होऊ शकत नाही. सम्यक्त्वाची जी पाच लक्षणे आहेत त्यातील एक लक्षण अनुकम्पा आहे. अनुकंपा रहित माणूस असूर आहे. अनुकंपा असलेला माणूस देवतुल्य आहे. असुर म्हणजे आसुरी भावना असणारा.

संमोही भावना

संशयामुळे बुद्धी दूषित होणे म्हणजे 'संमोह' होय. संमोहाने चित्त विमूढ होते. त्यामुळे ज्ञान, चारित्र्य इत्यादींमध्ये चित्त लागत नाही. तो व्यक्ती दर्शनांतर, मतांतर आणि वाचनांतर यामध्येच विश्वास करू लागते. अन्ततीर्थकांची अनेक प्रकारची समृद्धी पाहून तो मोहित होतो. अशी स्थिती मानवाला सत्य धर्मापासून विचलित करते. ती व्यक्ती स्वधर्मामध्ये स्थिर होऊ शकत नाही. म्हणून त्याचे चिंतन करणे हे त्यापासून वाचण्याचे साधन आहे.

संमोही भावनेचे प्रकार - १) उन्मार्ग देशना; २) मार्गदूषणा; ३) मार्गविप्रतीपत्ती; ४) स्वमोह (स्वयं मोहमूढ होणे); ५) पर-मोह दुसऱ्यांना मोहमूढ करणे.[१५८]

१) उन्मार्ग देशना - ज्ञान, दर्शन, चारित्र्य इत्यादी जे पारमार्थिक मार्ग सांगितले आहेत, त्यांच्या विपरीत उपदेश देणे म्हणजे 'उन्मार्ग देशना' आहे. ही आपल्या स्वतःच्या

आणि दुसऱ्यांच्या बोधीबीजाचा उपहास करते म्हणून अयोग्य आहे. ह्याच्या परीत्यागाचे मन मनामध्ये दृढ होणे हे अपेक्षित आहे.

२) **मार्गदूषणा** - ज्ञान इत्यादी तीन प्रकारच्या पारमार्थिक मार्गाला आपल्या दुर्बुद्धिद्वारे कल्पित तर्क-वितर्काने दूषित करणे, त्यांच्या स्थानी विपरीत सिद्धांताची स्थापना करणे, पारमार्थिक मार्गावर चालणाऱ्या साधूवर दोषारोपण करणे हे सर्व मार्गदूषणेच्या अंतर्गत आले आहे. असे करणारे अबोध आणि तत्त्वज्ञानशून्य तथाकथित पंडित, ज्ञानी, आपल्या पांडित्याचा अभिमान करणारे दुर्विग्ध-गर्पोद्धत, अहंकारी पुरुष, पारमार्थिक मार्गाचा घात करण्याचा दुष्प्रयत्न करतात. ते ह्या 'मार्गदूषणा' नामक भावनेने दुष्प्रेरित राहतात ही भावना मनामध्ये विकृती आणते ती संयम मार्गामध्ये सर्वथा बाधक असते.[१६०]

३) **मार्गविप्रतिपत्ती** - उपरोक्त ज्ञानादी पारमार्थिक मार्गाला न जाणता निर्दोषी व्यक्तीवर सुद्धा दोषारोपण करून आपल्या मिथ्या विकल्पाने आंशिक रूपाने विकृत करणे, शास्त्राचा आशय न समजता जमालीप्रमाणे मार्गाला दूषित दाखवून विपरीत मार्गाचा स्वीकार करणे ही मार्गविप्रतिपत्ती आहे.[१६१]

विप्रतीपत्तीचा अर्थ 'शंका' असा होतो. जमालीला अशाप्रकारे शंका निर्माण झाली होती. त्याने भगवान महावीरांद्वारे उपदिष्ट ''क्रियमाणं कृतं'' यांच्या सिद्धांताला चुकीचे ठरवून ''कृतमेव कृतं'' ह्या सिद्धातांचाच स्वीकार केला. आणि वेगळा संप्रदाय चालवू लागला. जैन शास्त्रामध्ये ह्याला 'निह्नव' म्हणले आहे. निह्नवत्वामध्ये मार्ग विप्रतिपत्तीमुळेच व्यक्ती पतीत होतो.

४) **'स्व' मोह** - स्वतः मोहमूढ होणे, जेव्हा बुद्धी भावोपहत होते अर्थात शंका इत्यादींच्या परिणामस्वरूपी उपहत अथवा दूषित होते, ती व्यक्ती मोहमूढ होते. ज्ञानादींमध्ये व्यामोह होतो, अयुक्तीयुक्त शंका करू लागतो. तो असे सांगतो की जर परमाणू इत्यादी सर्व रूपी द्रव्याशी संबंधित विषय अवधिज्ञानाद्वारे ग्रहण होतात, त्याने अवधिज्ञानाची असंख्य रूपे होतात तर मग मनःपर्यवज्ञानाची काय आवश्यकता आहे ? हा ज्ञानमूलक 'स्व-मोह' आहे. अर्थात आपल्या व्यामूढतेमुळे व्यक्तीमध्ये अशाप्रकारे विपरीत मनःस्थिती उत्पन्न होते.[१६२]

ज्ञानाप्रमाणे चारित्र्यामध्येही व्यामोहामुळे अयुक्तीयुक्त कथन करू लागतो. ज्याप्रमाणे सामायिक चारित्र्य सर्व सावद्यनिवृत्तीयुक्त आहे. म्हणजे त्यामध्ये सर्व पापयुक्त कर्माचा परित्याग होतो तर मग छेदोपस्थापनीय चारित्र्य सुद्धा तसेच वीरतीरूप आहे.

त्याची काय आवश्यकता ? ह्या दोहोंमध्ये काय फरक आहे ? ज्ञानाप्रमाणे दर्शनाच्या वाचना इत्यादी संबंधीसुद्धा अशाच प्रकारे शंका करतो. त्याचबरोबर तो परतीर्थी अन्य मतानुयायींच्या समृद्धीला अथवा वैभवाला पाहून मोहग्रस्त होतो. हे सर्व 'स्वमोहा'च्या अंतर्गत समाविष्ट आहे. ही आत्ममोहावस्था त्याज्य आहे असे सतत चिंतन केले पाहिजे.

५) परमोह - उपरोक्त वर्णित स्वमोहाचा संबंध आपल्या आत्म्याबरोबर आहे. तसे करणारा मोहमूढ होऊन स्वतःला पतनाच्या मार्गावर नेतो. परंतु परमोह भावनेची गोष्ट वेगळी आहे.

जी व्यक्ती 'पर' अर्थात अन्य प्राण्याला मोहमूढ करते त्याच्या चित्तामध्ये 'विभ्रम' अथवा 'भ्रांती' उत्पन्न करते, मग ते सदभावनेने किंवा सत्याने असो किंवा कैतव अर्थात मिथ्या परिकल्पना किंवा कपटाने दुसऱ्याच्या मनात विभ्रम उत्पन्न करते, ती 'पर मोह' भावना आहे. त्याने बोधी अथवा सम्यकत्वाचा नाश होतो. अबोधी किंवा मिथ्यात्व उत्पन्न होते. अशी दूषित भावना मनात येवू नये असे पुन्हा पुन्हा चिंतन करणे म्हणजे 'परमोह भावना' आहे.

ह्याचे थोडक्यात वर्णन करताना शिवार्याचार्य लिहितात की जो मिथ्यादर्शन आणि अविरतीचा उपदेश करतो. हिंसाइत्यादी कार्य केल्याने पाप लागत नाही आणि दुर्गती पण होत नाही. अशाप्रकारे पापकार्यात पण भयरहित करून त्यात प्रवृत्त होण्यासाठी प्रेरित करतो, तो सम्मोहभावनेने भावित होतो. हा एक उन्मार्ग उपदेशक आहे. उन्मार्ग उपदेशक इथेच थांबत नाही. पुढे अजून पापमय उपदेश देतो की शास्त्रात जो आहार दानाचा उपदेश आहे ते दान. जसे पापाचे कारण नाही तसेच यज्ञामध्ये प्राण्याची हिंसा करणे पण पाप नाही, यज्ञासाठी पशू ब्रह्मदेवाने उत्पन्न केले आहे. त्यामुळे यज्ञ करणारा, करविणारा आणि पशू हे सर्व मंत्राच्या माहात्म्याने स्वर्गात जातात. अशा विपरीत उपदेशाने सम्मोही देवात उत्पन्न होतो. संवर, निर्जरा आणि संपूर्ण कर्माचा नाश करण्यासाठी.

सम्यज्ञान, दर्शन, चारित्रच आत्म्याला शरण रूप आहे. ह्यालाच आचार्यांनी मोक्ष मार्ग सांगितले आहे. अथवा सत्य मार्गाला जो दूषित करतो तो मार्गदूषक आहे. रत्नत्रयाच्या विरुद्ध आचरण करणारा, पदार्थाच्या योग्य स्वरूपाला न जाणणारा मोहित होऊन ज्या देवामध्ये कामविकार आणि रागभावाची तीव्रता आहे, अशा कृत्सित देवात उत्पन्न होतो.१६३

सम्मोह भावनेचे वर्णन उत्तराध्ययन सूत्रात प्राप्त होत नाही. 'सम्मोहचा' अर्थ आहे-मोह किंवा मूढता. बृहत्कल्पइत्यादीमध्ये आसुरी भावनेनंतर सम्मोह भावना सांगण्यात आली आहे तसाच क्रम गीतेमध्ये देखील आढळतो. तेथे देखील म्हटले आहे.

'क्रोधात् भवति सम्मोहः सम्मोहात् स्मृतिविभ्रमः' (गीता २/६३) क्रोधामुळे अत्यंत मूढता निर्माण होते आणि मोह-मूढतेमुळे स्मृतिविभ्रम होतो. क्रोधामुळे आसुरी भाव येतात. मोहाचे सघन आवरण बुद्धीवर पडते. बुद्धीमध्ये विभ्रम विक्षिप्तता आणि चंचलता निर्माण होते.

''स्मृतिभ्रंशाद् बुद्धि नाशो बुद्धि नाशात् प्रणश्यति ।''

सम्मोह मनुष्याच्या विनाशाची अन्तिम स्थिती आहे. जोपर्यंत प्राणी मोहाने घेरलेला राहतो, तो अज्ञानाच्या दलदलीतून मुक्त होऊ शकत नाही.

'मंदा मोहेण पाउडा'[१६४] मूर्ख जीव मोहाने आवृत्त राहतात. मोह जेव्हा अधिक खोल होतो तेव्हा त्याला सम्मोह म्हणतात. सम्मोहाने व्याप्त भावनेला 'सम्मोही भावना' म्हटले गेले आहे.

शेवटी भाष्यकाराने ह्या सर्व भावनेच्या कुत्सित फळाचे वर्णन करताना लिहले आहे की, ह्या भावनेने प्रभावित होणारा, चिंतन करणारा, अभ्यास करणारा संयत पुरुषही कांदर्प इत्यादी देवगतीला प्राप्त करतो. आणि तेथून च्यूत होऊन संसारसागरामध्ये भटकत राहतो.

उपरोक्त सर्व भावना अप्रशस्त आहेत. इथे अप्रशस्त आणि प्रशस्त भावनेचे जे वर्णन आले आहे. त्यासंबंधी हे जाणण्यायोग्य आहे की जेव्हा साधक प्रशस्ततेकडे उन्मुख होतो तेव्हा अप्रशस्तता स्वतःच सुटून जाते. सत्यभाषण केल्याने असत्य राहत नाही. हिंसक जीवन नसेल तर अहिंसक भावना स्वतःहूनच प्रकट होते. अपरिग्रह स्वीकारताच परिग्रह राहत नाही. इथे ही गोष्ट सूक्ष्मतेने समजण्यासारखी आहे की विवेचनाच्या दोन पद्धती आहेत- एक विधिमुखता आणि दुसरी निषेधमुखता. विधिमुखतेचे तात्पर्य 'शुभ' अथवा 'सत्'चे विधान करणे आहे. जसे सत्याचा स्वीकार करा, करुणा ठेवा, संतोष धारण करा इत्यादी.

'शुभा'च्या विधेयात्मकतेच्या उपदेशाने अशुभाचे सुटणे पूर्वी सांगिल्याप्रमाणे स्वयं साध्य आहे. परंतु शुभ स्वीकारण्याच्या दिशेत साधकाच्या मनात उत्साह निर्माण

करण्यासाठी अशुभ अथवा असत्‌च्या परित्यागाचे कथन केले जाते. ते 'शुभ अथवा सत्‌च्या ग्रहणामध्ये विधिमुखतेला सुदृढ बनविते. म्हणूनच प्रथम अप्रशस्त भावनेचे वर्णन केले आहे आणि नंतर प्रशस्त भावनेचे. जरी प्रशस्तता प्राप्त झाल्यावर अप्रशस्तता नष्ट होते तरीही व्यवहारामध्ये ह्याच्या वर्णनाची आवश्यकता आहे.

आराधक भवी जीव आगमज्ञानाच्या प्रभावाने अशुभस्वरूपाला सोडून शुभ अवस्थेला प्राप्त होतो आणि क्रमाने कर्म मळरहित होऊन शुद्ध होतो. जसे सूर्य उदित होण्यापूर्वी प्रथम प्रभातकाळरूपी संध्याला प्राप्त होतो, नंतर तो संपूर्ण अंधकाररहित होतो, त्याचप्रमाणे आराधक पण प्रथम अंधकारासारख्या अशुभ मधून निघून शुभ भावाला प्राप्त होतो व नंतर कर्म मळ रूपी अंधकाराने रहित होतो, शुद्ध होतो.

आत्मानुशासनमध्ये ग्रंथकाराने जीवत्म्याच्या क्रमिक विकासाचे जे वर्णन केले आहे ते अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अशुभ मधून शुभ व शुभ मधून शुद्ध बनण्याची भाव यात्रा हाच आपला मुख्य विषय आहे.

अशुभ उपयोगाने जीवाला नरकगती आणि तिर्यंच गती मिळते. शुभोपयोगाने देवगती व मनुष्य गती मिळते, आणि शुद्धोपयोगाने मोक्षाची प्राप्ती होते.[१६६]

अशुभ भावनेत आपण पाहिले की मनुष्यामध्ये थोडीसुद्धा विचाराची मलिनता आली तर दुर्गती होते म्हणून विचार शुभ अथवा शुद्ध ठेवणे आवश्यक आहे. 'कंटकात् कंटकमुद्धरेत्' काट्याने काटा काढण्याची नीती साधना क्षेत्रात पण लागू होते. चित्ताला अशुभ भावनेने मुक्त करणे हे साधकाचे लक्ष्य असते. परंतु शुद्ध आत्मस्वरूपाची प्राप्ती प्रथम प्रयत्नातच होणे कठिण आहे. कारण अनादिकाळापासून जे कुसंस्कार पडले आहेत, त्याचे निर्मूलन एकदम होऊक शकत नाही. त्याला मंद करण्यासाठी नव्या भावनांची सृष्टी करावी लागते. त्या नव्या भावना यथार्थ असतात त्याचा अशुभ भावनेवर प्रभाव पडतो आणि त्याचे निर्मूलन होऊ लागते.

भावनेने मन भावित करण्यासाठी ज्ञान व अभ्यास आवश्यक आहे. अशुभ भावनेचे ज्ञान झाल्यावर त्याच्या संस्कारांना कमी करण्यासाठी सतत अभ्यास करावा लागतो, जसे लहान मुले माती खाऊ नये म्हणून त्याच्या हातात चॉकलेट देतात, त्याचप्रमाणे बाल साधकाने अशुभ भावनेत आत्म्याचे पतन करू नये म्हणून पूर्वाचार्यांनी, संतांनी लेखकांनी ''शुभ भावने''चे चॉकलेट आपल्याला दिले आहे. ह्या शुभ भावनेचे चॉकलेट मात्र तोपर्यंतच आहे, जोपर्यंत आपल्याला शुद्धात्मभावनेच्या मिष्ठांनाचे ज्ञान नाही.

जशी माणसे चॉकलेट खात नाही ते उच्चतर, उच्चतम, प्रकारच्या मिष्टान्नाची इच्छा ठेवतात. त्याचप्रमाणे शुभभावनेच्या अभ्यासानंतर आपली आत्मयात्रा शुद्धात्मभावनेच्या दिशेने पुढे नेण्यासाठी पुढच्या प्रकरणात आपण शुभ भावनेचे चिंतन करू, अभ्यास करू.

संदर्भ

१. अष्टपाहुड भावपाहुड गा. १३ पृ. १५८
२. अष्टपाहुड भावपाहुड गा. १६ पृ. १६०
३. अष्टपाहुड भावपाहुड गा. ५० पृ. १८५
४. अष्टपाहुड भावपाहुड गा. ७० पृ. १९८
५. अष्टपाहुड भावपाहुड गा. ७२, ७४ पृ. २००, २०१
६. अष्टपाहुड भावपाहुड गा. ८८ पृ. २१०
७. अभिधान राजेंद्र भाग ५ भावना शब्द गा. ३२८ पृ. १५०६
८. मुलाचार ले. वट्टकेराचार्य गा. ३९६ पृ. ३१२ पूर्वार्ध
९. ध्यानकल्पतरु ले. अमोलक ऋषिजीम पृ. ११
१०. पुरुषार्थ सिद्धयुपाय ले. अमृतचंद्राचार्य गा. ९९, १०४, १०२, ११९
११. पुरुषार्थ सिद्धयुपाय ४ सम्यक् चारित्र अधिकार गा. ४-७-४३ पृ. ६१
१२. तत्त्वार्थसूत्र ७/८ पृ. १७२
१३. सभाष्य तत्त्वार्थाधिगमसूत्रम ७/८ पृ. ३३०
१४. सर्वार्थसिद्धौ ७/१३ पूज्यपादाचार्य वृत्ती ६८७ पृ. २६४
१५. पुरुषार्थ सिद्धयुपाय ४-७-४३ पृ. ६१-६२
१६. सम्बोधि - ले. यु. महाप्रज्ञजी अध्याय ७ श्लो. १५, १६, १७ पृ. १४०, १४१
१७. ध्यान कल्पतरु ले. अमोलकऋषिजी म. पृ. १२ ते १४
१८. जैनधर्म का मौलिक इतिहास भा. ३ आ. हस्तिमलजी म. पृ. ३०, ३१
१९. अमोलकसुक्ति रत्नाकर पं. कल्याणऋषिजी म. पृ. २७७, २७८
२०. आध्यात्म आलोक आ. हस्तिमलजी म. पृ. ५१
२१. प्रश्नव्याकरण सूत्र १/१/२३ ते ४३ पृ. २८ ते पृ. ४९
२२. उज्ज्वलवाणी भाग १ पृ. ५४-५५
२३. सूत्रकृतांग सूत्र ३/१०/२१ श्री शिलांकाचार्य टीकासहित पृ. ३०
२४. उज्ज्वलवाणी भाग १ ले. उज्ज्वलकुमारीजी म. पृ. ५४ ते ५७
२५. जीवन विज्ञान स्वस्थ समाजरचना का संकल्प यु. महाप्रज्ञ पृ. ११० ते ११५
२६. जीवनविज्ञान स्वस्थ समाजरचना का संकल्प यु. महाप्रज्ञ पृ. ११५ ते ११८

२७. प्रश्नव्याकरण सूत्र १/२/४४, पृ. ५०, ५३
२८. सर्वार्थसिद्धौ ७/१४/६८९ पृ. २६५
२९. भगवती आराधना श्लो. ८३२-८३३
३०. श्लोक वार्तिक ७/१४
३१. उत्तराध्ययन सूत्र ३२/३१ पृ. ५८१
३२. सूत्रकृतांग सूत्र ३/४/१९ पृ. २४१
३३. अ. आवश्यक सूत्र ४ अ. बाराव्रताचे अतिचार सू. २ पृ. ९९
ब. तत्त्वार्थ सूत्र ७/२१ पृ. १८५
३४. आध्यात्मिक आलोक. आ. हस्तिमलजी म. पृ. ५५ ते ५८
३५. अमोलसूक्ति रत्नाकर पं. पू. कल्याणऋषिजी म. पृ. २८०
३६. ध्यान कल्पतरु ले. अमोलकऋषिजी म. पृ. १७-१८
३७. सभाष्यतत्त्वार्थाधिगमसूत्र ७/४ पृ. ३२३
३८. अस्तेय दर्शन ले. मुनि श्री अमरचंद्रजी म. पृ. ७७
३९. अस्तेय दर्शन ले. मुनिश्री अमरचंद्रजी म. पृ. ८७
४०. अ) आवश्यकसूत्र अध्ययन ४ बाराव्रतांचे अतिचार सू. ३ पृ. १००
ब) तत्त्वार्थ सूत्र ७/२२ पृ. १८५
४१. प्रश्नव्याकरण सूत्र १/६० पृ. ८३
४२. सभाष्य तत्त्वार्थधिगमसूत्र ७/११ पृ. ३३२
४३. प्रश्नव्याकरण सूत्र १/४/८०-८१ पृ. ११२, ११३, ११४
४४. प्रश्नव्याकरण सूत्र १/४/९२ पृ. १४०
४५. तत्त्वार्थसूत्र ७/१२ चे विवेचन पृ. २५७ ले. सुखलाल संघवी
४६. अमोलक सुक्ती रत्नाकर पं. पू. कल्याणऋषीजी म. पृ. २८३ ते २९१
४७. आवश्यक सूत्र ४/४ पृ. १०० बी-तत्वार्थसूत्र ७/२३ पृ. २६८
४८. मु. आ. ९९६-९९८
४९. सर्वार्थसिद्धी ७/९/६७९ पृ. २६१
५०. पुरुषार्थ सिध्युपाय ४/७५/११० पृ. १२०
५१. पु. सि. ४/७२/१०८ पृ. ११९
५२. उत्तराध्ययन सूत्र ८/१८-१९ चे विवेचन पृ. १३२
५३. मालव केसरी की सौभाग्यमलजी महाराज जीवन एवं विचार पृ. १९७
५४. जैनेंद्र सिद्धान्त कोश भाग ३ पृ. २३

५५. परिग्रह परिमाण व्रत ले. जवाहिरलालजी म. पृ. १,७
५६. उत्तराध्ययन सूत्र अ. ८/१७ पृ. १३१
५७. प्रश्नव्याकरण सूत्र १/५/९६ पृ. १४८-१५१
५८. दशवैकालिक ६/२० पृ. २४१ ब्यावर मधुकरमुनीजी
५९. तत्वार्थसूत्र ७/१२ १७८
६०. विशेषावश्यक भाष्य २५७३
६१. अध्यात्म आलोक ले. हस्तिमलजी म. पृ. १५ ते १७
६२. अपरिग्रह दर्शन ले. अमरमुनीजी म. पृ. ८ ते १६
६३. अपरिग्रह दर्शन पृ. ७१, ७२
६४. सर्वाथ सिद्धी ७/१७/६९५ पृ. ३६८
६५. भगवती आराधना मू. १९१२-१९१३
६६. परिग्रह परिमाणव्रत ले. जवाहिरलालजी म. पृ. ४५
६७. उपासक दशांग सूत्र १/१७ पृ. २६
६८. कर्मग्रंथ भा. १ श्रीमद् देवेन्द्रसूरि विरचित भा. १७ पृ. ५९
६९. दशवैकालिक सूत्र अ. ८ श्लोक ३९ पृ. ३१३
७०. स्थानांग सूत्र ठाणा २, उ, ४ सू. ४३३ पृ. ९१
७१. कोहो पीई पणासेई। माणो विणयनासणो।
माया मित्ताणि नासेह। लोभो सव्व विणासणो ॥ दशवै. सू. अध्य. ८. गा. ३७, पृ. ३१२
७२. कोहं माणं च मायंच, लोभं च पाव वडढणं।
वमेचत्तारि दोसे ऊ, इच्छतो हियमप्पणो ॥ दशवैकालिक ८/३६ पृ. ३१२
७३. स्थानांग सूत्र ४/१/८० पृ. २२८ ब्यावर
७४. सूक्तित्रिवेणी वैदिकधारा पृ. २३६
७५. सूक्ति त्रिवेणी बौद्धधारा पृ. ११०
७६. भगवती आराधना १३६१, १३६६
७७. उत्तराध्ययन सूत्र १/४० पृ. २२ ब्यावर
७८. आम्रमंजरी - ले. उमराव करवजी म. ''अर्चना'' पृ. ८९-९०
७९. अमोलक सूक्ति रत्नाकर, पं. पू. कल्याणऋषिजी म. पृ. ३२५ ते ३२९
८०. ज्ञानामृत सार ३/९३ ते ९९
८१. अमोलक सूक्ति रत्नाकर ले. पं. पू. कल्याणऋषिजी म. पृ. ३२८
८२. सूक्ति त्रिवेणी, बौद्ध धारा पृ. १२६ (विशुद्धिभाग ९/१५)

८३. पुष्कर मुनि कलश ले. श्री. पुष्करमुनि म. पृ. ३६
८४. संबोधिके पथपर ले. मुनिशुभकरणजी पृ. १०६ ते १०७
८५. मूलाराधना आव्वास १३६० ते १३७३ पृ. १३१६ ते १३२१
८६. निर्ग्रंथ प्रवचन संग्राहक - चोथमलजी म. पृ. ४७०-४७१
८७. आम्रमंजरी ले. उमरावकवरजी ''अर्चना'' पृ. ९३-९४
८८. क) स्थानांग सूत्र अ. ४ उ. १ सू. ८५ पृ. २२९
ख) आणि संबोधिकेपथपर ले. मुनि शुभकरण पृ. १०८
८९. निर्ग्रंथ प्रवचन - पू. चोथमलजी म. अध्या. १३ पृ. ४७०
९०. मूलाराधना आश्वास ६ गा. १३७५ ते १३८१ पृ. १३२२ ते १३२५
९१. ज्ञानामृत सार ३/१११ ते ११५ पृ. २८-२९
९२. ज्ञानामृत सार ३/११६ ते १३० पृ. ३० ते ३२
९३. मूलाराधना आश्वास ६ ता. १३८२ ते १३८७ पृ. १३२६ ते १३२९
९४. स्थानांगसूत्र अ. ४ उ. १ सू. ८६ पृ. २३०
९५. संबोधि के. पथपर पृ. १०१
९६. निर्ग्रंथ प्रवचन संग्र. चोथमलजी म. पृ. ४७१
९७. दशवैकालिक सूत्र - ८/३७ पृ. ३१२
९८. उत्तराध्ययन सूत्र - ३/१२ पृ. ६७
९९. आम्रमजरी ले. उमरावकुंवरजी अर्चना पृ. १०० ते १०२
१००. पुष्कर सूक्ती कलश - ले. श्री. पुष्करमुनीजी म. पृ. ११४
१०१. ज्ञानामृतसार कुन्थुसागरजी गा. १३२ ते १५२ पृ. ३२ ते ३७
१०२. अमोल सूक्ति रत्नाकर पृ. ३३६
१०३. सूक्ती त्रिवेणी पृ. ७०
१०४. भगवती आराधना सू. १३८४
१०५. ठाणागं सूत्र ४/१/८७ पृ. २३०
१०६. मूलाराधना ६/१३८९ ते १३९४ पृ. १३२९ ते १३३३
१०७. सूत्रकृतांगसूत्र सं. मिश्रीमलजी म. १/१/१/४ पृ. ७
१०८. पुष्कर सूक्ति कलश - ले. श्री. पुष्करमुनिजी म. पृ. १२० ते १२१
१०९. सूत्रकृतांग सूत्र सं. श्री. मिश्रीमलजी म. उ. १ अ. ४,३,१ भा. ८ पृ. २५०
११०. उत्तराध्ययन सूत्र सं. श्री. मिश्रीमलजी म. अ. ८ गा. १७ पृ. १३१
१११. जैनधर्मकी हजार शिक्षाएँ ले. मधुकरमुनिजी म. पृ. ७२
११२. जैनधर्म की हजार शिक्षाएँ ले. मधुकरमुनिजी म. पृ. ७३

११३. ऐतरेय अरण्यक २/३/६
११४. अमोलसूक्ति रत्नाकर पू. कल्याणऋषिजी म. पृ. २९२ ते २९७
११५. ज्ञानामृत सार ले. कुन्युसागर मुनि - भा. १५४ ते १७० पृ. ३८ ते ४२
११६. संबोधि के पथपर ले. मुनिशुभकरण पृ. १७१
११७. पुष्कर सूक्ति उपा. श्री. पुष्करमुनि म. पृ. ३३
११८. उत्तराध्ययन सूत्र श्री. मिश्रीमलजीम अ. २३ गा. ५३ पृ. ३९८
११९. उत्तराध्ययन सूत्र ९/५४ अहेवयइ कोहेणं, माणेणं अहमा गई। माया गइ
पडिग्घाओ लोभाओ दुहओ भयं ॥
१२०. दशवैकालिक सूत्र - संपा श्री. मिश्रीमलजी म. अध्य ८ भा. ३८ पृ. ३१३
१२१. श्री. कुलक संग्रह - ले. पूर्वाचार्य विरचित गौतम कुलक पृ. ७१
१२२. उत्तराध्ययन सूत्र २९/६८ ते ७१ पृ. ५१९
१२३. बृहत् क. भा. गा. १२९१ पृ. ३९८
१२४. बृहत् क. भा. गा. १२९१ पृ. ३९९
१२५. बृहत् क. भा. गा. १२९५ पृ. ३९९
१२६. बृहत् क. भा. गा. १२९६ पृ. ३९९
१२७. बृहत् क. भा. गा. १२९७-९८ पृ. ४००
१२८. बृहत् क. भा. गा. १२९९ पृ. ४००
१२९. बृहत्कल्पभाष्य गा. १३००-१३०१ पृ. ४००
१३०. भावना योग एक विश्लेषण आ. आनंदऋषीजी म. पृ. ४८
चक्षुर्भ्यां हसति प्राज्ञः ओष्ठाभ्यां खलु मध्यमः।
अधमश्चाहहासेन दन्ताभ्यामधमाधम ॥
१३१. मूलाराधना आ. शिवार्य गा. १८० पृ. ३९७
१३२. मूलाचार आ. वट्टेकर पूर्वार्ध पृ. ६८
१३३. तत्वार्थवार्तिक
१३४. बृहत्कल्प भाष्य गा. १३०२ पृ. ४०१
१३५. बृहत्कल्प भाष्य गा. १३०२ पृ. ४०१
१३६. बृहत्कल्प भाष्य गा. १३०४ पृ. ४०१
१३७. बृहत्कल्प भाष्य गा. १३०२५ पृ. ४०१
१३८. बृहत्कल्प भाष्य गा. १३०२ ६ पृ. ४०१
१३९. बृहत्कल्प भाष्य गा. १३०७ पृ. ४०२

१४०. दशवैकालिक सूत्र ५/२/४६ पृ. २२३ मधुकरमुनी ब्यावर
१४१. मूलाराधना (भ. आ.) आश्वास उ. गा. १८१ पृ. ३९८
१४२. मूलाचार गा. ६६ पृ. ७०
१४३. बृहत्कल्प भाष्य गा. १३०८ पृ. ४०३
१४४. बृहत्कल्प भाष्य गा. १३०९ पृ. ४०३
१४५. बृहत्कल्प भाष्य गा. १३१० पृ. ४०३
१४६. बृहत्कल्प भाष्य गा. १३११ पृ. ४०३
१४७. बृहत्कल्प भाष्य गा. १३१२ पृ. ४०३
१४८. बृहत्कल्प भाष्य गा. १३१३ पृ. ४०४
१४९. मूलाराधना आश्वास ३, गा. १८२ पृ. ३९९
१५०. उत्तराध्ययन सूत्र १७/१८ पृ. २७२ ब्यावर
१५१. बृहत्कल्प भाष्य गा. १३१५ पृ. ४०४
१५२. बृहत्कल्प भाष्य गा. १३१६ पृ. ४०४
१५३. बृहत्कल्प भाष्य गा. १३१७ पृ. ४०४
१५४. बृहत्कल्प भाष्य गा. १३१८ पृ. ४०५
१५५. बृहत्कल्प भाष्य गा. १३१९ पृ. ४०५
१५६. मूलाराधना आश्वास ३ गा. १८३ पृ. ४०१
१५७. दशवैकालिक सू. ८/२५
१५८. बृहत्कल्पभाष्य १३२१ पृ. ४०५
१५९. बृहत्कल्पभाष्य १३२३ पृ. ४०५
१६०. बृहत्कल्पभाष्य १३२३ पृ. ४०६
१६१. बृहत्कल्पभाष्य १३२४ पृ. ४०६
१६२. बृहत्कल्पभाष्य १३२३५ पृ. ४०६
१६३. मूलाराधना अश्वास ३ गा. १८४ पृ. ४०२
१६४. सूत्रकृतांग ३/१/११
१६५. अशुभाच्छुभमायातः शुद्धः स्यादयमागमात्
खेरप्राप्त संध्यास्य तमसो न समुद्गमः
आत्मानुशासन गा. १२२ पृ. ८२
१६६. प्राभृत संग्रह १० अनुप्रेक्षा अधिकार गा. ४२ पृ. १४४

❊ ❊ ❊

प्रकरण पाचवे

आगमोत्तर काळात व आधुनिक जैन साहित्यात भावना अथवा अनुप्रेक्षा

प्रकरण पाचवे

आगमोत्तर काळात व आधुनिक जैन साहित्यात भावना अथवा अनुप्रेक्षा

आगमोत्तरकालीन आणि आधुनिक जैन साहित्यात भावनेचे निरूपण

आगम ग्रंथाच्या अपेक्षेने आगमोत्तर ग्रंथामध्ये शुभ भावनेचे विस्तृत विवेचन प्राप्त होते. ह्यामागे नक्कीच काही कारण असावे. कारण भावना तर प्रत्येक जीवाच्या हृदयात अनादी काळापासून आहे. मग त्या भावनेविषयी विशिष्ट आगम ग्रंथ का नाही? असा प्रश्न उपस्थित होतो. ह्याचे समाधान असे आहे की अनंत काळापासून संस्कृतीचा कधी ऱ्हास होत असतो तर कधी विकास. हा ऱ्हास व विकासाचा क्रम सतत चालूच असतो. ह्या अवसर्पिणी काळामध्ये तीन आऱ्यापर्यंत सुखाचे साम्राज्य होते. आजच्या काळाप्रमाणे कुटुंब आणि समाज विघटित नव्हते, स्त्री-पुरुषांमध्ये सहजर्याची भावना होती, स्वतःची गरज स्वतःच्या व्यक्तिगत साधनसामग्रीतून आणि शक्तीद्वारे पूर्ण करीत होते. लोकांच्या मनात कोणत्याही प्रकारे आसक्ती नव्हती. आसक्ती नसल्याने अथवा वस्तूवर अधिकाराची अथवा संग्रहाची भावना सुद्धा नव्हती. आसक्तीच अधिकाराची किंवा संग्रहाची भावना वाढविते. ही भावना स्वार्थ आणि द्वेषाला जन्म देते. अशी भावना पूर्वी नसल्याने आणि जीवनोपयोगी पदार्थांची विपुलता आणि सुलभता असल्याने संग्रहाच्या भावनेला आश्रयच मिळत नव्हता, जीवन संतोषमय असल्याने अनित्यादी भावनांचा अधिक उपदेश करण्याची आवश्यकता नव्हती. पण जरी संग्रहित रूपाने भावनेचे वर्णन मिळत नसले तरी सर्वज्ञ, सर्वदर्शी तीर्थंकर भगवान त्रिकालज्ञानी होते. यापुढे येणाऱ्या काळाला लक्षात घेऊन आगमग्रंथामध्ये ठिकठिकाणी भावनेचे तुटक-तुटक रूपात वर्णन केलेले आहे. याचे वर्णन तृतीय प्रकरणात झाले आहे.

आज काळ बदलला आहे. मानवाच्या मनात पदार्थाच्या नियमित उपयोगिते-शिवाय अनियमित उपयोगाची भावना वाढू लागली आहे. त्याचबरोबर संग्रह आणि संरक्षणाची भावनाही निर्माण होऊ लागली आहे. परिणामतः पदार्थाचा अभाव भासू लागला आहे. स्वार्थ संग्रह आणि संरक्षणाच्या भावनेने द्वेषाला पोषण मिळाले, त्यामुळे पारस्परिक प्रेमभाव, जो अतिशय भोग दिल्याने प्राप्त होतो त्याचा घात केला. यापासून संघर्षाचा

जन्म झाला. संतोषवृत्ती, स्वार्थ आणि संग्रह यामध्ये बदलल्यामुळे संघर्ष वाढत गेला. दया, उदारता, सहृदयता यांसारखे गुण मानवाच्या हृदयात राहिले नाहीत.

संग्रह, स्वार्थ आणि संघर्षाच्या भावनेमुळे एकीकडे दोन व्यक्तींमध्ये भांडणे सुरू झाली, तर दुसरीकडे राज्यविस्ताराच्या लोभात दोन राष्ट्रांमध्ये युद्धाची स्थिती उत्पन्न झाली. पराजित राज्यांवर स्वतःचे शासन अबाधित ठेवण्यासाठी विजयी राज्याने दंडविधान प्रणाली सुरू केली. आधी तर हुंकार प्रणालीसुद्धा अपराध्याला जास्त अपमानास्पद वाटत होती अर्थात 'काय, तुम्ही असे केले ?'' अशा प्रकारच्या वचनांमुळे अपराधी व्यक्ती समाजाला आपले तोंडसुद्धा दाखवत नसे किंवा मान वर करून कधी चालत नसे. हळूहळू ह्या दंड विधानाचा प्रभाव कमी झाला आणि ''माकार'' नावाची दंडविधान प्रणाली सुरू झाली. 'माकार'चा अर्थ 'असे करू नका.' काळाच्या प्रभावाने 'माकार'ने सुद्धा काम चालले नाही तेव्हा ''धिक्कार'' शब्दाने दंडव्यवस्था चालवली अर्थात ''धिक्कार आहे तुझा'' अशाप्रकारे कालक्रमाने मानवी मन दिवसेंदिवस मोहांधतेमुळे अधिकाधिक धीट, कठोर होऊ लागले.

आज आपण समजू शकतो की आता दंडविधान कोठपर्यंत पोहचले आहे. आज फाशीच्या शिक्षेची सुद्धा लोकांना भीती राहिलेली नाही. 'मरणे' आणि 'मारणे' ह्यामुळे आज लोकांच्या मनात कोणत्याही प्रकारची चलबिचल होत नाही. अशा परिस्थितीत लोकांच्या मनाचे परिवर्तन करण्याची अत्यंत आवश्यकता वाटू लागली आहे. परंतु हे परिवर्तन दंडविधानाने सुद्धा होणार नाही. परंतु भाव परिवर्तनाने होऊ शकेल असा विचार करूनच आगमोत्तर कालीन साहित्यात आचार्यांनी भावनेचे आपल्या रचनेत विशद विवेचन केले असावे.

आजची परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की मानव भौतिकतेकडे अधिक आकर्षित झाला आहे. त्याचे आकर्षण आणि आसक्ती पापाचे, दुःखाचे आणि संघर्षाचे कारण झाल्याने भौतिक पदार्थांची अनित्यता, अशरणता, अशुचिता समजून त्यांचे आकर्षण कमी करण्यासाठी आणि आस्रवाची हेयता आणि संवर व निर्जरेची उपादेयता इत्यादींचे दिग्दर्शन करण्यासाठी आगमाच्या अनुसंधानानेच सुव्यवस्थित आणि विशद रूपात आगमोत्तरकालीन विद्वानांनी, आचार्यांनी ह्या विषयावर रचना केल्या त्यात दिगंबर आणि श्वेतांबर दोन्ही परंपरेचे लेखक आहेत.

आगमामध्ये भावनेविषयी जे वर्णन झाले आहे ते अत्यंत संक्षेपात आणि सांकेतिक आहे. असे प्रतीत होते की भावनेचा क्रमशः विकास होत गेला. कारण साधनेच्या

दृष्टीने ह्याचे फार महत्त्व आहे. म्हणूनच उत्तरवर्ती काळात बारा भावनांचे विस्तृत विवेचन प्राप्त होते.

ह्याच्या पूर्व प्रकरणात आपण अशुभ भावनेचे प्रकार त्याचे फळ आणि त्याच्या हेयतेचे विवेचन पाहिले. ह्या प्रकरणात शुभ भावनेचे महत्त्व आणि अनित्यादी बारा भावनांचे आगमोत्तर काळात जे साहित्य लिहिले गेले आहे त्याचे सार स्वरूपात दिग्दर्शन करू.

प्रस्तुत ग्रंथाचा विषय 'भावना योग' आहे म्हणून प्रथम भावनेबरोबर जो योग शब्द आहे त्याचा अर्थ समजून भावनेचे विवेचन करू.

भावनेबरोबर योग शब्दाची उपयोगिता

विश्वचा प्रत्येक आत्मा अनन्त आणि अपरिमित शक्तीचा पुंज आहे. त्याच्यात अनन्तज्ञान, अनन्त दर्शन, अनन्त सुख-शान्ती व अनन्त शक्तीचे अस्तित्व विद्यमान आहे. तो स्वतः आपला विकासक आहे आणि स्वतःच विनाशक (Destroyer) आहे. इतक्या विराट शक्तीचा अधिपती असताना पण तो इतस्ततः भटकत आहे त्याचे कारण- जीवनात योग - स्थिरतेचा अभाव आहे. आणि जीवनात एकाग्रता, स्थिरता व तन्मयता नसल्याने त्याला स्वतःवर, स्वतःच्या शक्तीवर पूर्ण भरोसा नाही. त्यामुळे अनन्त शक्तीचा प्रकाश आवृत झाला आहे, झाकला गेला आहे. म्हणून अनन्त शक्तीला अनावृत्त करण्यासाठी, आवरण दूर करण्यासाठी, आत्मज्योतीला प्रज्वलित करण्यासाठी, आणि आपल्या ध्येयाप्रत पोहोचण्यासाठी मन, वचन आणि कायाची एकरूपता, एकाग्रता, तन्मयता व स्थिरता असणे आवश्यक आहे आत्मचिन्तनामध्ये एकाग्रता स्थिरता आणण्याचे नाव 'भावना योग' आहे. भावनेचे तर विस्तृत विवेचन ह्या ग्रंथात केले जाईल पण योग शब्दाची जोडणी भावनेबरोबर असल्याने प्रथम योग शब्दावर विचार करू.

'योग'चा अर्थ 'योग' शब्द युज् धातू आणि धृञ् प्रत्ययाने झाला आहे. संस्कृत व्याकरणात 'युज्' धातू दोन आहेत. एकाचा अर्थ जोडने, संयोजित करणे आहे व दुसऱ्याचा अर्थ समाधी मनस्थिरता आहे.[१] इथे आपण जोडणे अर्थ घेऊ. भावना आत्म्याला परमात्म्याशी जोडणारा सर्वोत्तम योग आहे. 'भावना योग' म्हणजे आत्म्याचे आत्म्यामध्ये मिलन आहे. आत्म्याचे आत्म्यामध्ये रमण आहे.

जैन आगमात योगचा अर्थ मन वचन कायाची प्रवृत्ती आहे.[२] योग शुभ व अशुभ दोन्ही प्रकारचे आहेत. त्याचा निरोध करणे हाच साधनेचा मुख्य उद्देश्य आहे.

जैन धर्म निवृत्तीप्रधान आहे. ह्यांचे चरम तीर्थंकर भगवान महावीरांनी साडेबारा

अर्णपर्यंत मौन व्रत ठेवले, घोर तप केले ध्यान व आत्मचिंतन द्वारा योग साधनेत जीवन व्यतीत केले.

'योग' सर्व विपत्तिरूपी वेलींना कापण्यासाठी तीक्ष्ण धारेच्या परशू अर्थात कुऱ्हाडीसारखा आहे. तसेच मूळ मंत्र, तंत्राशिवाय मोक्षलक्ष्मीला वशीकरण करण्याचे अमोघ उपाय आहे.[३] अर्थात योगच्या माहात्म्याने विपत्ती नष्ट होते.

योग हे परमार्थाने आत्म्यात असलेल्या कर्मसंयोगाच्या योग्यतेचा नाश करतो. आत्म्याच्या दोन प्रकारे वृत्त्या आहेत. १) स्थूल चेष्टा (आवागमन रूप) २) सूक्ष्मचेष्टा (श्वासोश्वास रूप) ह्या कर्मसंयोग जन्य आहे. म्हणून कर्मसंयोगाची योग्यता संसार वृक्षाचे मूळ आहे. वृत्ती तर पुष्प, पत्र यांच्यासारखी आहे. मुळाचा नाश झाला की त्याचा नाश आपोआप होतो.

अशुभयोगातून निवृत्त होऊन शुभ योगात प्रवृत्ती करणे. आणि अशुभ व शुभयोगाचा संपूर्णपणे निरोध करून शुद्धात्मभावात रमण करणे योग आहे. शेवटी अयोगी अवस्था प्राप्त होते त्याच्या फळ स्वरूपी सिद्धत्व प्राप्त होते.

'योग' शब्द उल्लासपूर्वक श्रवण करणाऱ्याच्या मिथ्यात्वमोहनिय पाप कर्माचा क्षय होतो. 'योग' मुळे मोक्ष प्राप्तिचे सर्व साधन प्राप्त होतात.

योगसाधनेसाठी सर्वप्रथम श्रद्धा, विश्वास असणे महत्त्वाचे आहे, नंतर आत्मशुद्धीची तळमळ, इच्छा, सिद्धत्व प्राप्तीची भावना आणि त्याचबरोबर आत्मसमर्पण अनिवार्य आहे. जीवनात सर्व कलेत श्रेष्ठ कला असेल तर योगकला आहे.

भावनायोगाने अनादिकाळाच्या मलीन वृत्तीची निवृत्ती होते आणि ज्ञान, ध्यान इत्यादी गुणांच्या अभ्यासात अनुकूलता येते, चित्ताची विशुद्धी वाढते.

शुभभावनेने सम्यग्दर्शन ज्ञान आणि चारित्र गुणाची प्राप्ती व विकास होतो म्हणून भावनेबरोबर योग शब्द जोडला आहे. आचार्य हरिभद्रसूरींनी योगविंशिकामध्ये धर्माच्या प्रत्येक क्रियेला योग म्हटले आहे. धर्म मोक्षाचा हेतूभूत आहे, धर्म मोक्षाचे साधन आहे म्हणून धर्माचा जितका परिविशुद्ध व्यापार आहे त्या सर्वांना योग म्हटले आहे.

ह्या ग्रंथाचा मूळ विषय 'भावना योग' आहे. कोणती ही साधना सुरू करताना प्राचीन जीवनाचे विघटन आणि नव्या जीवनाचे सुघटन होते ह्या जीवन निर्माणाच्या प्रक्रियेत भावनेची फार मोठी उपयोगिता आहे.

पूर्व प्रकरणात अशुभ भावनेवर विचार केला त्याचे विघटन करून ह्या प्रकरणात शुभ भावनेवर विचार करायचा आहे. प्रथम भावेच्या महत्त्वाचे विवेचन करून अनित्यादी बारा वैराग्यभावनांचे ह्या प्रकरणात वर्णन केले जाईल.

भावनेचे महत्त्व

आचार्य समन्तभद्र विरचित 'रत्नकरंड श्रावकाचार' यामध्ये 'संस्थान विचय धर्मध्यानात बारा भावनांचे चिंतन करण्याचा उल्लेख आहे. कारण तीर्थंकरसुद्धा ह्या भावनेचे चिंतन करून संसार भोगापासून विरक्त झाले आहेत म्हणून भावनेला ''वैराग्याची माता'' संबोधिले आहे. संसारी जीवांची ह्या भावनेच्या चिंतनामुळे दुःखापासून मुक्ती होते. दुःखरूपी अग्नीने संप्रप्त झालेल्या जीवांना शीतल, मंद, सुगंधित वायूने व्याप्त अशा उपवनामध्ये जाउन निवास करण्यासारखे सुख ह्या भावनेच्या चिंतनाने प्राप्त होते. ह्या भावना तत्त्वबोध करविण्यात आणि अशुभ ध्यानाचा नाश करण्यात सक्षम आहेत. ह्याच्या चिंतनासारखे दुसरे कल्याणरूप काही नाही. ह्या भावना द्वादशांग वाणीचे सार आहेत. म्हणून संस्थानविचय धर्मध्यानामध्ये ह्यांचे अत्यंत तन्मयतेने चिंतन करणे आवश्यक आहे.

ज्याप्रमाणे रसकुंपिकेच्या रसाने भावित केलेले लोखंड सुवर्ण होते, त्याचप्रमाणे बारा भावनांनी प्रभावित झालेला मलिन आत्मा शुद्ध होतो आणि आपल्या शुद्ध, निरंजन, निराकार, अनंतज्ञानमय परमात्मस्वरूपाला प्राप्त करतो. दान, शील इत्यादी धर्म जर भावरहित केले तर ते मीठरहित भोजनाप्रमाणे होईल. परंतु दान इत्यादी धर्मात भावरूपी रसायन मिळविल्याने निश्चितरूपात कर्माचा क्षय होतो. इतकेच नव्हे तर कर्माचे मूळ कारण असणाऱ्या रागद्वेषादींचे बीजही नष्ट होतात.[४]

'आत्मानं भावयतीति भावना' आत्मा ज्या भावनेने प्रभावित होतो त्यांना भावना असे म्हणतात. त्या वैराग्य आणि आत्महितैषी विषयाने दृढ होतात. ह्याने उपशम आणि नीती यांचा उच्च बोध प्राप्त होतो आणि आत्मबोध प्रकट होतो. ह्या भावना परमशांती देण्यास सक्षम आहेत.

श्रीविजयपद्मसूरीजी यांनी भावनेचे महत्त्व अत्यंत सुंदर काव्यात उद्धृत केले आहे-

''निज आत्मकंचन शुद्ध करवा अग्नि जेवी भावना,
भव सागरे बूडनारने पण तारणारी भावना,
सर्व सिद्धिसाधन शुभ समाधि, प्रगट करती भावना,
चिंतामनि जेम वांछित फळ आपनारी भावना ।''[५]

ज्याप्रमाणे अग्नी सोन्याला शुद्ध करतो अर्थात त्याच्या मळाला जाळून नष्ट करतो त्याचप्रमाणे ह्या भावना आत्मारूपी सोन्याला स्वच्छ करतात, आत्म्याच्या कर्मरूपी मळाला स्वच्छ करतात, आत्म्याच्या कर्मरूपी मळाला जाळून टाकतात आणि भवसागरामध्ये बुडणाऱ्या जीवाला तारणारी भावना आहे.

श्री मुनी सुंदरसुरी यांनी भावनेच्या महत्त्वाचे आणि उपयोगितेचे अत्यंत हृदयस्पर्शी शब्दात विवेचन केले आहे. ज्याप्रमाणे लहान मुले चपळ आणि चंचल असतात त्याप्रमाणे चित्तसुद्धा अत्यंत चंचल असेत. ते चित्ताला संबोधून सांगतात की, हे चित्त बालका ! ह्या भावना तुला शांतता प्रदान करणाऱ्या अमूल्य औषधीरूप आहे. यांना तू कधीही आपल्यापासून दूर करू नकोस. नेहमी यांना बरोबर ठेव. असे केल्याने विघ्न तुम्हाला छळू शकणार नाही.[६]

केवळ बत्तीस अक्षरांच्या अनुष्टुप श्लोकामध्ये मुनिवर्यांनी अत्यंत सुंदर अंतःस्फूर्तीप्रद भाव व्यक्त केले आहेत. चंचल व्यक्ती भावनेमध्ये स्थिर होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे चंचलतेमुळे शुभ अथवा शुद्ध भावात टिकून राहू शकत नाही. म्हणून प्रतिक्षण सावधान राहण्याचा उपदेश दिला आहे जसे लबाड लोक चांगल्या लोकांना फसविण्याची संधी शोधत असतात त्याचप्रमाणे दूषित भावना चित्तामध्ये विकृती उत्पन्न करण्यासाठी तत्पर असतात. या दूषित भावना चित्तामध्ये अस्थिरता निर्माण करू नयेत म्हणून भावनेमध्ये विशेषतः शुभ आणि शुद्ध भावनेमध्ये स्थिर राहावे. रोगाने आक्रमण करू नये म्हणून जो आधीपासून पौष्टिक औषधांचे आणि रसायनांचे सेवन करतो तो कधीही व्याधीने व्यथित होत नाही.

ह्या श्लोकाचा एक वेगळा भावार्थ सुद्धा होतो. दूषित ध्यान अर्थात दूश्चिंतनाला ह्या श्लोकामध्ये भूत, प्रेत इत्यादी दुष्ट आत्म्याची उपमा दिली आहे. भूत-प्रेत जेव्हा मनुष्याच्या मागे लागतात तेव्हा ते त्याला दुःख देतात, त्रास देतात, व्यथित करतात परंतु जो मंत्रयुक्त यंत्र अथवा ताईतरूपी औषधी धारण करतो, भूतपिशाच निवारण ताईत बांधून घेतो त्याला प्रेतादींची बाधा होत नाही. ह्या भावना दोष अथवा विकारयुक्त चिंतनरूपी प्रेतांना, पिशाचांना अथवा दानवांना अडविण्यात, चित्तामध्ये वाईट विचार न येऊ देण्यासाठी ताईताप्रमाणे काम करतात.

ह्या कलियुगात शरीरात जरी बळ नसले, उग्र, तप, ध्यान, परिसह इत्यादी जे सत्त्वाने साध्य करावे लागतात ते साधण्याची शक्ती जरी नसली तरी भावनाही मनाने

साधू शकतो. मुमुक्षू त्याला का धारण करीत नाही.[७]

शुभ भावनेचा प्रभाव प्रसन्नचंद्र राजर्षीच्या दृष्टांतानेही समजू शकतो. आर्त, रौद्र ध्यानामध्ये तल्लिन झालेले पूज्य श्री प्रसन्नचंद्रराजर्षी यांना नरकात जाऊ न देणाऱ्या आणि शुक्लध्यानापर्यंत पोहचवून मोक्षप्राप्ती करविणारी भावनाच आहे. सर्व सिद्धी प्राप्त करविण्यात भावना समर्थ आहे. अर्थात भावना सर्व प्रकारची ऋद्धी, सिद्धी प्रदान करणारी आहे. आणि उत्तम समाधी म्हणजे चित्ताची स्थिरता सुद्धा भावना प्रकट करते. ह्या भावना चिंतामणी रत्नासारख्या आहेत, कारण चिंतामणी रत्न मनात चिंतिलेला पदार्थ देतात तशाच प्रकारे भावनाही मनोवांछित अथवा इष्टाला देणाऱ्या आहेत. येथे प्रसन्नचंद्र राजर्षींचा वृत्तांत दिला जात आहे.

पोतनपुर नगरीमध्ये 'प्रसन्नचंद्र राजा' राज्य करत होते. एकदा श्रमण भगवान महावीर स्वामी त्या नगरीत 'मनोरम' नावाच्या उद्यानामध्ये आले. प्रसन्नचंद्र राजर्षी चतुरंगी सेनेबरोबर मोठ्या थाटाने प्रभूंचे दर्शन करण्यासाठी गेले. प्रभूंचा उपदेश ऐकून संसारापासून विरक्त झाले. लहान वयाच्या कुमाराला राजगादीवर बसवून स्वतः दीक्षित झाले. अत्यंत उग्र तपश्चर्येबरोबरच सूत्रार्थाचा अभ्यास करून प्रसन्नचंद्र राजर्षी शास्त्रात पारंगत झाले. विहार करता करता एकदा ते प्रभू महावीरांबरोबर राजगृहामध्ये आले. त्यावेळी ते राजर्षी राजगृह नगरीच्या बाहेर एकांतजागी एका पायावर उभे राहून दोन्ही हात वर करून सूर्याची आतापना घेत होते. राजर्षी ज्यावेळी निर्मळ ध्यानात मग्न होते त्याचवेळी सहपरिवार राजा श्रेणिक प्रभूंच्या दर्शनासाठी त्याच मार्गाने चतुरंगी सेनेसहित जात होते. त्या सेनेमध्ये एक सुमुख नावाचा सैनिक शिपाई प्रसन्नचंद्र राजर्षीला ध्यानस्थ अवस्थेत पाहून म्हणाला, 'अहो, हे ध्यानी मुनी धन्य आहेत, त्यांच्यासाठी स्वर्ग, मोक्ष अथवा महाऋद्धी काही दूर नाही. अशाप्रकारे बोलणाऱ्या शिपायाला कर्माने आणि नावाने दुष्ट असणारा दुर्मुख नावाचा शिपाई म्हणाला की, 'हे ध्यानी आणि तपस्वी कसे ? हे तर अतिशय अविचारी अधर्मी आहेत कारण ह्यांनी आपल्या लहान वयाच्या मुलाला राजगादीवर बसवून दिक्षा घेतली. लहान मुलाची सुद्धा ज्याला दया नाही त्याला तपस्वी कसे म्हणता येईल ? लहान मुलाला राजगादी दिल्यानंतर राणी कोठे तरी निघून गेली आहे. मंत्री शत्रू राजाला जाऊन मिळाले आहेत. शत्रूने नगरीला घेरले आहे. नगरातील प्रजासुद्धा दुःखी झाली आहे. म्हणून राजाने दीक्षा घेऊन खूप अनर्थ केला आहे. आणि आता ध्यानात मग्न आहे, पाखंडी आहे, ढोंगी आहे. अशाप्रकारे उद्धटपणे बोलत होता. दुर्मुखचे शब्द प्रसन्नचंद्र राजर्षीच्या कानात पडले

ते शुभ ध्यानापासून विचलित झाले, वाईट विचाराच्या चिंतनाने आपल्या मूळ स्थितीला विसरले आणि बालपुत्रावर मोहासक्त होऊन विचार करू लागले - माझ्या लहानशा मुलाचे राज्य शत्रू लुटण्यास तयार झाले आहेत, मंत्री सुद्धा विश्वासघातकी झाले आहेत, मी त्या शत्रूंना सहन करू शकत नाही. अशाप्रकारचे विकल्प मनात येऊ लागले. ''मी एक साधु आहे, ध्यानावस्थेत आहे, मस्तकावरील केसाचे लुंचन केलेले आहे अशा प्रकारची मुनी अवस्था ते जणू काही विसरूनच गेले. अशा वाईट विचारामध्ये शत्रूंशी मनाने युद्ध करू लागले. जणू शत्रूसेनेबरोबर शस्त्रास्त्रांनी युद्ध करीत आहेत. शेवटी सर्व शस्त्रे समाप्त झाली. जवळ एकही शस्त्र नसल्याने मुकुटाने शत्रूला मारण्यासाठी डोक्याला हात लावला तर स्वतःचे लुंचन केलेले मस्तक पाहून पश्चाताप करत करत शुक्लध्यानी झाले.

राजर्षी जेव्हा दुर्ध्यानामध्ये होते तेव्हा श्रेणिक राजा त्याच रस्त्याने प्रभू महावीरांच्या दर्शनासाठी जात होते. तेव्हा रस्त्यात प्रसन्नचंद्र राजर्षिंना, ''हे मुनी, महाध्यानी आणि मौनी आहेत इत्यादी शुभ भावनेने वंदन करून प्रभूंजवळ गेले. राजर्षिविषयी श्रेणिक राजाने भगवान महावीरांना विचारले हे प्रभू ! रस्त्यामध्ये जेव्हा मी प्रसन्नचंद्रमुनींचे ध्यानावस्थेत असताना दर्शन केले त्यावेळी जर त्यांचे आयुष्य पूर्ण झाले असते तर ते कोणत्या गतीला गेले असते ? प्रभू म्हणाले - सातव्या नरकात. हे ऐकून श्रेणिक साश्चर्याने विचार करू लागले की ध्यानी मुनी नरकात जात नाहीत. कदाचित मी काही बरोबर ऐकले नसेल. म्हणून त्यांनी प्रभूंना पुन्हा विचारले की जर ह्यावेळी आयुष्य पूर्ण झाले तर कोठे जातील ? भगवान म्हणाले, ''सर्वार्थसिद्ध विमानात'' हे ऐकून आश्चर्यचकित झालेल्या त्यांनी विचारले, ''हे प्रभू ! क्षणभरापूर्वी आपण सातव्या नरकात जाण्याविषयी सांगत होता आणि आता लगेचच सर्वार्थसिद्धामध्ये जाण्याचे सांगत आहात हे कसे संभवू शकते?'' यावर प्रभू म्हणाले, त्यावेळचे आणि आताचे राजर्षींचे ध्यान वेगवेगळे आहे कारण दुर्मुख सेनानीच्या शब्दश्रवणाने मुनी क्रोधित झाले होते. ज्यावेळी आपण वंदन केले त्यावेळी मुनींची भावना सातव्या नरकात जाण्यायोग्य होती आणि आता आपण इथे पोहचेपर्यंत सर्व शस्त्र समाप्त झाल्यावर शत्रूला मुकुटाने मारण्याच्या विचाराने डोक्याला हात लावताच डोक्याचे लुंचन पाहून 'मी कोण आहे' हे ध्यानात आले आणि दुर्ध्यानापासून स्वतःला दूर करून पुन्हा आत्मनिंदेत मग्न होऊन चिंतन करू लागले, ''अरे ! मी जे युद्धाचे विचार केले ते एकदम चुकीचे आहेत कारण मी तर साधू आहे. मी तर राज्याचा त्याग केला आहे आणि कर्मक्षय करण्यासाठी आतापना घेण्यासाठी उभा आहे. अशा शुभ

भावनेमध्ये तल्लीन होते. तेव्हा हे श्रेणिक आपण दुसऱ्यावेळी विचारले. त्यावेळी त्यांचे भाव सर्वार्थसिद्ध विमानात जाण्यायोग्य होते. अशी चर्चा चालली होती तेवढ्यात देवदुंदुभी इत्यादींचा ध्वनी ऐकू आला. श्रेणिक राजाने प्रभूंना विचारले, 'हे काय आहे ?' तेव्हा प्रभू म्हणाले, "प्रसन्नचंद्र मुनींना केवलज्ञान झाले. त्यांच्या महिमेचे गुणगान देवता करत आहेत त्यामुळे देवदुंदुभी इत्यादींचा ध्वनी होत आहे.

अपूर्व बोध देणारा हा दृष्टांत आहे. दुर्मुखचे वचन ऐकून मुनी दुर्ध्यानात गेले. डोक्याचे लुंचनरूपी द्रव्य चारित्र्याला पाहून सावधान झाले. आत्मनिंदा करू लागले. शुभ ध्यानात पुढे गेले, सर्वार्थसिद्ध विमानात जाण्यायोग्य झाले. त्यापुढे गेले तर केवलज्ञान झाले. ह्यामध्ये शुभ भावनेचे प्राधान्य आहे. म्हणूनच भावना ही संसार सागरामध्ये बुडणाऱ्याला तारणारी आहे.[८]

आत्मस्वरूप समजल्यावर जो आनंद प्राप्त होतो त्या आनंदाला ह्या भावना प्रकट करतात. ह्या शुद्ध भावना सत्याचे ज्ञान करून देतात. एका श्लोकामध्ये अत्यंत सुंदरपणे लिहिले आहे -

"दारिद्र्य नाशनं दानं, शीलं दुर्गति नाशनम् ।
अज्ञाननशिनी प्रज्ञा, भावना भवनाशिनी ।।"[९]

दान केल्याने दरिद्रतेचा नाश होतो, शीलाचे पालन केल्याने दुर्गतीचा नाश होतो, प्रज्ञाने अज्ञानतेचा नाश होतो आणि भावनेने भव अर्थात संसाराच्या परिभ्रमणाचा नाश होतो. जसे सर्व रसामध्ये मुख्य रस मीठ आहे तसे धर्माचे अंग दानादी आहेत. ते भावनेशिवाय फलदायक होत नाहीत. जैन साधू, साध्वी जेव्हा श्रावकांना, साधकांना मंगल पाठ ऐकवितात तेव्हा शेवटी साधक जो दोहा म्हणतात त्यात भावनेचे महत्त्व प्रकट होते-

"भावे भावना भावीऐ, भावे दीजे दान,
भावे धर्म आराधिये, भावे केवल ज्ञान ।"

भावसहित भावनेने भावित झाले पाहिजे, भावनेसह दान दिले पाहिजे, धर्माराधना भावनेसहित केली पाहिजे आणि केवलज्ञान सुद्धा भावनेने होते. जसे उपरोक्त प्रसन्नचंद्र राजर्षी यांच्या दृष्टांतात पाहिले.

जैन दर्शनामध्ये नवीन कर्माला अवरोध करण्यासाठी संवर साधना दाखवली आहे. आणि जे कर्म पूर्वी होऊन गेले आहे त्यांना नष्ट करण्यासाठी निर्जरा करणे अर्थात बारा प्रकारचे तप करण्यास सांगितले आहे. ह्या संवर आणि निर्जरेमध्ये बारा भावनांचा अनुप्रेक्षेचा

समावेश होतो आणि बारा भावनांमध्ये संवर भावना आणि निर्जरा भावनेचा सुद्धा समावेश होतो. म्हणून तेथेच त्याचे विशेषतेने विश्लेषण केले जाईल. येथे एवढेच सांगायचे आहे की जैन धर्माचा मूळ सिद्धांत ह्या भावनेअंतर्गत आहे.

वस्तुस्वरूपाचे ज्ञान होणे म्हणजे भावना होय. आत्मसाधनेमध्ये भावनेचे सर्वाधिक महत्त्व आहे. भावना अध्यात्म साधनेचा प्राण आहे. ह्या भव बंधनाचा नाश करणाऱ्या आहेत. 'भव भ्रमण' आणि 'कर्मबंधनाचे कारण राग आणि द्वेष आहे परंतु जेव्हा व्यक्तिंच्या अंतरमनामध्ये भावनेचा प्रवाह प्रवाहित होतो तेव्हा चिंतनाची ज्योत प्रज्वलित होते. तात्त्विक आणि आध्यात्मिक चिंतन, मनन जेव्हा खोलवर होते जेव्हा रागद्वेषाचा प्रवाह थांबतो आणि कर्मागमनाचा प्रवाह अर्थात आस्रवाचा प्रवाह थांबल्याने आणि भावसहित साधना केल्याने पूर्व कर्माचाही क्षय होतो. परंतु साधनेबरोबर भावना असेल तरच ती साधना कर्मक्षयाचे कारण होऊ शकेल. दान, शील, तप यांबरोबर जर भावना नसेल तर ती साधना केवळ पुण्यबंधाचे कारण होईल आणि भावपूर्वक अथवा ज्ञानपूर्वक केलेल्या साधनेने कर्माची निर्जरा होईल.

बलभद्रमुनींना पारणा देण्याच्या भावनेने युक्त मृगाने (हरणाने) काहीच दान दिले नाही तरी भावनेच्या श्रेष्ठतेमुळे त्याला दानासारख्याच फळाची प्राप्ती झाली.

दान करण्यासाठी धनाची, शील आणि तप करण्यासाठी संघयनाची (शारीरिक बळाची) आवश्यकता आहे परंतु भावनेमध्ये कोणत्याही अन्य वस्तूची अपेक्षा नसते.

'आचार्य श्री आनंदऋषी' महाराजांनी अनित्यादी बारा भावनांला वैराग्यभावना ही संज्ञा दिली आहे. यांना 'वैराग्याची माता' म्हटले आहे. वस्तुतः या भावना वैराग्यप्रधान आहेत. यांच्या चिंतनात गूढ वैराग्य भरले आहे. पदोपदी निर्वेद रस झळकत आहे म्हणून यांना 'वैराग्यभावना' संबोधिणे अधिक उचित वाटले असेल.[१०]

बारा वैराग्य भावना

अनित्य भावना

बारा भावनांच्या स्वरूपाचे सूक्ष्मतेने निरीक्षण केले तर असे प्रतीत होईल की मनुष्याच्या मनावर सर्वाधिक प्रभाव सांसारिक पदार्थांचा आहे. त्यांना पाहून तो अनुकूलतेचे आणि सुखाचे दर्शन करतो तो मोहांधतेमुळे हे विसरतो की हे पदार्थ शाश्वत नाहीत. त्यांचे वास्तव्य एका नियमित काळाच्या मर्यादित बद्ध आहे. मानवी मनातून यांचा प्रभाव नष्ट करण्यासाठी सर्वप्रथम त्यांच्या मनात हा विचार दृढ करण्याची आवश्यकता आहे की

तो ज्याला नित्य, शाश्वत अथवा ध्रुव मानत आहे ते सर्वकाही अनित्य आहे. म्हणून 'अध्रुव' अथवा अनित्य भावनेला सर्वप्रथम स्थान दिलेले आहे. कारण सर्व दुःखाचे मूळ कारण मोहच आहे. मोहाचा क्षय होताच दुःख, चिंता, अधिव्याधी नष्ट होतात.

ह्या विश्वामध्ये जे कोणतेही दृश्यमान पदार्थ आहेत ते सर्व अनित्य, अध्रुव आहेत. उत्तम घर, वाहन, शयनासन, आई-वडील, स्वजन, सेवक, निरनिराळ्या प्रकारचे भौतिक वैभव, साजसामग्री, यौवन, बल, तेज, सौभाग्य, लावण्य हे सर्व काही इंद्रधनुष्याप्रमाणे अशाश्वत आहे. जसे इंद्रधनुष्य आकाशामध्ये थोडावेळ भासमान होते आणि नंतर ते विलुप्त होते हिच स्थिती या सुंदर सुखद दिसणाऱ्या पदार्थांची आहे.[११]

इष्ट जनांचा संयोग ऋद्धी, वैषयिक सुख, धन, आरोग्य, शरीर, जीवन इत्यादी सर्व अनित्य आहे.[१२]

कोणत्याही प्रिय व्यक्तीचा अथवा वस्तूचा संयोग झाला तर त्याने स्नेहाचा बंध होतो, त्यातच तो रममाण होतो. जीवात्मा विचार करतो की आमचा हा संबंध अखंड राहील. परंतु कच्च्या दोऱ्याप्रमाणे जेव्हा सर्व संबंध तुटतात तेव्हा प्राणी दुःखी होतो म्हणून ''संयोगाः वियोगान्ता'' अर्थात सर्व संयोग शेवटी वियोगात बदलणारे आहेत ह्या सत्याला पुन्हा पुन्हा दृढ केले पाहिजे. असे चिंतन केल्याने राग उत्पन्न होणार नाही.

आचार्य वट्टकेर लिहितात की, 'स्थान, आसन, सूर-असूर आणि मानवाची विभूती, संपत्ती, सौख्य, कुटुंबातील लोकांचा सहवास आणि त्यांचे प्रेम, ममता हे सर्व काही अनित्य आहे.'

इथे जो 'स्थान' शब्द वापरला आहे ते गाव, शहर, जनपद, देश, पर्वत नदी इत्यादींचा सूचक आहे. अथवा 'स्थान' याचा अर्थ देवेंद्र, चक्रवर्ती, सम्राट, बलदेव वासुदेव इत्यादी होतो किंवा इक्ष्वाकू वंश इत्यादी उच्चकुळाच्या अर्थाने घेतला आहे.

'आसन' शब्दाचा अभिप्राय राज्यादी सत्तामूलक वैभवाचे अंगभूत सिंहासन इत्यादी आहे. 'आसन' याचा दुसरा अर्थ 'अशन' सुद्धा घेतला आहे. वृत्तिकार सिद्धांत चक्रवर्ती वसुनंदींचे सांगणे आहे की पुढील गाथेमध्ये पुन्हा 'आसण' शब्द आला आहे. त्यातील एकाचा अर्थ 'ज्यामध्ये सुखाने प्रवेश करू शकतो' किंवा 'सुखाने बसू शकतो ते आसन' होय तर दुसरे आसण, अशन म्हणजे नाना प्रकारचे भोजन इत्यादी अर्थ घेतला आहे.

हत्ती, घोडा, रथ, पायदळ, धन, सुवर्ण इत्यादींची वृद्धी, ऋद्धी आहे. शुभ, अनुकूल, उत्तमपदार्थ यांद्वारे इंद्रियांना जो आनंद मिळतो ते सौख्य आहे. आई-वडील, कुटुंबातील लोक, नातेवाईक इत्यादींबरोबर एकत्रित राहणे म्हणजे 'संवास' आहे. त्यांच्या विषयी मनात जो स्नेह अथवा प्रेम उत्पन्न होते ती प्रीती आहे. मानवाला ह्याविषयी मोठे आकर्षण असते. यांना प्राप्त करणे म्हणजे सौभाग्याचा विषय मानला जातो. तसेच समजले जाते की मला जे काही प्राप्त झाले आहे ते चिरकाल राहील. ही मनुष्याची सर्वात मोठी भ्रांती आहे. कारण संसारातील सर्व सुखे विद्युल्लतेप्रमाणे चंचल आहेत. जशी आकाशामध्ये वीज चमकते आणि क्षणात नष्ट होते तीच गोष्ट भौतिक सुखांच्या बाबतीत घडते. ज्याप्रमाणे वीज दृश्य-अदृश्य होते, पाहता पाहता नष्ट होते त्याचप्रमाणे सुखसुद्धा दृश्य-अदृश्य होत असते ती सर्व स्थाने, गाव, नगर इत्यादी ज्या ठिकाणी मानव राहतो, आसक्त होतो ते सर्व काही नश्वर आहे. यांना अविनाशी अथवा ध्रुव मानून राहणारे जेव्हा त्यांच्या पासून हे सुख दूर होते तेव्हा त्यांना खूप संताप होतो, संक्लेश होतो.

येथे टीकाकार आचार्य श्री अपराजितसूरी यांनी 'स्थान' शब्दाची व्याख्या करताना सांगितले आहे की शुभ अथवा अशुभ परिणामाने बद्धगती नाम, कर्म, यांच्या फलस्वरूपी मिळणारी मनुष्य, देव, तिर्यंच आणि नरक योनीरूपी पर्याय अथवा स्थान त्या नौकेप्रमाणे आहे, ज्यामध्ये यात्री आरूढ होतो आणि आपल्या गन्तव्य स्थानी पोहचल्यानंतर त्या नावेला सोडून देतो. हीच गोष्ट पिता-पुत्र, स्वामी-सेवक, भाऊ-बहीण इत्यादी संबंधाबरोबर जोडलेली आहे. ती मेघपटलाप्रमाणे अनित्य आहे. आचार्य शिवार्यांनी जनमानसामध्ये लौकिक सुखाच्या विनाशशिलतेला सिद्ध करण्यासाठी अनेक उदाहरणे देऊन विस्ताराने वर्णन केले आहे. अत्यंत सुंदर लिहिले आहे -

ज्याप्रमाणे पक्षी दिवसा किलबिलाट करतात, उडतात, एकत्रित येतात परंतु सूर्यास्त झाल्यानंतर ते असा कोणताही संकल्प अथवा विचार करीत नाही की आपण अमुक वृक्षावर पुन्हा भेटू. संयोगाने ते एकमेकांना भेटतात आणि विलग होतात. सांसारिक प्राण्यांचा साथ सुद्धा असाच आहे. काळरूपी हवेच्या झोक्याने प्रेरित होऊन ते कुलरूपी वृक्षावर काही काळासाठी भेटतात परंतु त्यांचा तो मिलाप शाश्वत नसतो. त्यांचा पुन्हा वियोग होतो. सकाळी उगवलेला सूर्य संध्याकाळी अस्त होतो याप्रमाणे ऐश्वर्य, प्रभुत्व, आरोग्य इत्यादी विलुप्त होतात.[१४]

मिथ्यादृष्टी, जीव, ऐश्वर्य इत्यादींना आपल्या हिताचे मानतात परंतु ज्यांना

स्वरूपाचे ज्ञान आहे तो परक्याला स्वतःचे कसे मानू शकेल ? संसारामध्ये स्वजनांच्या संबंधामुळे अनेक प्रकारची पापकर्मे करावी लागतात. परंतु ते संबंध नित्य नाहीत. ते नेहमी टिकून राहत नाही. ह्याशिवाय मनुष्य उपजीविकेच्या साधनाला आपले समजून त्यासाठी हिंसा, असत्य, कपट, चोरी इत्यादी करण्यात प्रवृत्त होतो. अनेक जीवांना धोका देवून, फसवून स्वतःच्या पोटाचा आणि पेटीचा खड्डा भरतो. आपल्या शक्ती आणि सत्तेच्या बळावर निर्बळांना धमकावून त्यांच्याजवळून बळजबरीने पैसे लुटतो अशा पापयुक्त परिग्रहाचा संग्रह सुद्धा कोठे नित्य आहे.

मनुष्य ज्यांच्यावर अतिशय प्रेम करतो ते लोकसुद्धा स्वार्थी आहेत. डोळ्यांच्या लालीमेप्रमाणे त्यांची प्रीत सुद्धा नष्ट होते. चंद्र, सूर्य, ग्रह, नक्षत्र इत्यादी अस्त झाले तरी पुन्हा त्यांचा उदय होतो. वसंत, ग्रीष्म इत्यादी ऋतू जातात व येतात परंतु एकदा नष्ट झालेले यौवन, आयुष्य इत्यादी कधीच पुन्हा येत नाही.

ज्या शरीराच्या आधारावर आपले जीवन आहे त्या शरीराला जर्जरीत करणारी 'जरा' क्षणोक्षणी जवळ येत आहे. ती तारुण्यरूपी वृक्षाला दग्ध करण्यासाठी दावाग्नीसारखी 'स्त्री'च्या प्रीतीरूपी हरिणीला वाघाप्रमाणे, ज्ञानरूपी नेत्रांना नष्ट करण्यासाठी धुळवृष्टीसारखी तपरूपी कमळवनाला नष्ट करण्यासाठी बर्फासारखी आहे. सौंदर्यरूपी धन चोरण्यामध्ये, शक्ती नष्ट करण्यामध्ये, आलस वाढवण्यात, स्मरणशक्ती नष्ट करण्यात, पायाची शक्ती हरण करण्यात, 'जरा' बलशाली आहे. म्हणूनच जोपर्यंत डोळ्यात तेज, पायात जोर आणि आत्म्यात विचार करण्याची शक्ती आहे तोपर्यंतच जे नित्य आहे त्याला प्राप्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.[१५]

मोहवश अज्ञप्राणी शरीर इत्यादींमध्ये नित्यतेचा अनुभव करतो परंतु वस्तुतः आत्म्याच्या ज्ञानोपयोग आणि दर्शनोपयोगाशिवाय ह्या संसारामध्ये कोणतेच पदार्थ ध्रुव नाहीत अशाप्रकारे सतत चिंतन केले पाहिजे.[१६]

आत्म्यामध्ये रागादी परिणामामुळे कर्म आणि नोकर्माच्या रूपाने ज्या पौदगलिक द्रव्याला ग्रहण केले आहे अर्थात रागादीमुळे जे कर्म पुदगल आकृष्ट केले आहे ते 'पुदगल द्रव्य' आणि 'परमाणू' इत्यादी सर्व पुदगल द्रव्यदृष्टीने नित्य असले तरी पर्याय दृष्टीने त्यामध्ये क्षणोक्षणी पर्यायांचे परिवर्तन होत राहते. जी अवस्था पहिल्याक्षणी असते ती दुसऱ्याक्षणी बदलून जाते. त्याचे स्थान दुसरी अवस्था घेते. ज्याप्रमाणे पुष्पमालेसारख्या सुगंधी पदार्थांचा प्रयोग करून फेकून दिली तरी त्या पदार्थांच्या वियोगामुळे मनामध्ये

चिंतायं होत नाही त्याचप्रमाणे आत्मेतर पदार्थांमध्ये अनित्यतेचे चिंतन केल्याने त्याच्या वियोगाने काही दुःख होत नाही.[१७]

जे काही उत्पन्न होते त्याचा निश्चितपणे नाश होतो, परिणामी काहीच नित्य नाही.[१८] कोणतीही वस्तू द्रव्यत्व आणि गुणत्वाच्या अपेक्षेने नित्य म्हणून शकतो आणि पर्यायाच्या दृष्टीने अनित्य असते. अत्यंतिक आणि एकांतिक दृष्टीने कोणतीही वस्तू अनित्य किंवा नित्य नाही. जैन सिद्धांतानुसार प्रत्येक द्रव्य, गुण आणि पर्याय युक्त आहे.[१९] त्यांचा एक समुदाय आहे. गुण आणि पर्यायाच्या समुदायाशिवाय द्रव्य नावाची कोणतीही वेगळी वस्तू नाही. इथे एक लक्षात घेण्यासारखे आहे की गुण आणि पर्याय काही वेगवेगळ्या वस्तू नाहीत. त्यांची स्वतंत्र सत्ता नसते. वस्तू एक अखंड समवाय आहे. त्याचे तुकडे करता येत नाही. त्यात जे भेद दिसून येतात ते बुद्धीभेदामुळे निर्माण झालेले आहेत.

येथे सांसारिक पदार्थांची अनिश्चितता दाखविण्यासाठी वस्तूच्या उत्पाद, व्ययाची चर्चा केलेली आहे. ती आपल्या प्रस्तुत विषयाशी संबंधित आहे.

जन्माबरोबरच यौवन, वार्धक्य आणि मृत्यूशी संयुक्त आहे. धन, वैभव इत्यादी सर्व पदार्थ नश्वर आहेत, अध्रुव आहेत. ज्या शरीराला सुशोभित, अलंकृत, परिपुष्ट करण्याचा मनुष्य नेहमी प्रयत्न करतो तेच शरीर त्याला एक दिवस सोडून निघून जाते. म्हणून 'भवि जिज्ञासू'ने सांसारिक विषयांमधील ममत्वाचा त्याग केला पाहिजे. कारण हे विषय विनाश करणारे आहेत. आपल्या मनातून भोग-वासना दूर करावी. जोपर्यंत भोगलिप्सा मनातून जाणार नाही तोपर्यंत मोहजालाचा नाश होणार नाही. अशाप्रकारे विषयाच्या वास्तविक स्वरूपाला समजून, त्याला सर्वथा अनित्य मानून त्यापासून स्वतःला दूर ठेवावे.[२०]

स्त्री इत्यादी चैतन्यद्रव्य, सुवर्ण इत्यादी, अचैतन्य द्रव्य आणि चैतन्य-अचैतन्य इत्यादी मिश्र पदार्थ हे सर्व काही नश्वर आहे अशाप्रकारे चिंतन केले पाहिजे. जो पुरुष अशा भावना ठेवतो तो त्या पदार्थाचा अभाव झाला तरीही त्यात कोणत्याही प्रकारे ममत्व अथवा आसक्ती ठेवत नाही. जसे उच्छिष्ट भोजनाची कोणीच इच्छा करीत नाही तसेच त्या पदार्थाच्या ममत्वाचा अभाव झाल्याने अविनाशी स्वतःच्या आत्म्यालाच भेद, अभेदरूप रत्नत्रयाच्या भावनेने युक्त करतो आणि ज्याप्रमाणे अविनाशी आत्म्याची भावना करतो त्याप्रमाणे अक्षय, अनंत सुखस्वरूप स्वभावाचा धारक असणाऱ्या मुक्त आत्म्याला प्राप्त होतो.[२१]

शरीरधारी प्राण्यांसाठी हे शरीरच एक असा आधार आहे जे समस्त पुरुषार्थ अर्थात धर्म, अर्थ, काम आणि मोक्षमूलक लक्ष्य सिद्ध करण्यासाठी आधाररूप आहे. संसारामध्ये शरीर हा पहिला पदार्थ आहे ज्याद्वारे प्राणी सर्व काही साधू शकतो. म्हणून जीवाला शरीराविषयी आसक्ती निर्माण होते. उपयुक्त, प्रिय व मूल्यवान वस्तूची आसक्ती असणे हा मानवी स्वभावच आहे. ती आसक्तीच त्याला असे मानण्यासाठी प्रेरित करते की तो कधीही नष्ट होणार नाही आणि म्हणूनच तो मृत्यूच्या नावाने भयभीत होतो. ते मृत्यूचे नाव सुद्धा ऐकण्याची इच्छा करीत नाही.[२२]

जगातील सर्व पदार्थ शरीराशीच संबंधित आहेत. ते शरीरासाठी तुष्टीपुष्टीप्रद आहेत. त्यामुळे मनुष्याचे मन त्याच्यातच संलग्न राहते. त्यापासून मुक्त होण्यासाठी त्याच्या अनित्यावर चिंतन करणे अपेक्षित आहे. साधकाने चित्त स्थिर करून निर्ममत्व होण्यासाठी क्षणोक्षणी संसाराच्या अनित्यत्वावर अथवा नश्वरवृत्तांवर चिंतन केले पाहिजे. त्या तृष्णारूपी काळ्या नागाला अभिमंत्रित करण्यासाठी अममत्व भावावर विचार केला पाहिजे.[२३]

इथे हेमचंद्राचार्यांचा ''तृष्णा कृष्णा हि मंत्राय'' हा शब्द अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. इथे 'तृष्णेचा' नाश करण्यास न सांगता तृष्णेला मंत्रित करण्याचा उल्लेख केला आहे कारण तृष्णेच्या नाशाबद्दल सांगितले असते तर त्यामुळे हिंसेचा भाव घोषित होतो. जैनाचार्य हे शब्द प्रयोगात किती सावधान आणि जागृत असतात हे ह्यावरून स्पष्ट होते. त्याचबरोबर तृष्णेच्या नाशाच्या ठिकाणी तृष्णेला अभिमंत्रित करण्याचा उल्लेख एका विशेष अभिप्रायाचे सूचक आहे.

जोपर्यंत देह आहे तोपर्यंत इच्छेचा कधीच नाश होऊ शकणार नाही. तिला वळण दिले जाऊ शकते. ज्या इच्छा विषयोन्मुख आहेत त्यांना सत्त्वोन्मुख करता येईल. मानसशास्त्रांचे असे मानणे आहे की मनुष्याच्या मनोवृत्ती कधीही नष्ट केल्या जाऊ शकत नाहीत. त्यांच्या जागी इतर पूरक गोष्टींचाही स्वीकार करता येत नाही, परिष्कार केला जाऊ शकतो. वास्तविक ज्या इच्छा, भोग, वासना आणि आसक्ती एकत्रित जोडलेल्या आहेत त्या त्याग, वैराग्य, सेवा आणि साधनेच्या रूपात परिवर्तित होतात आणि जीवनाला अभ्युदयाच्या दिशेने घेऊन जातात. आचार्यांनी इथे 'अभिमंत्रित' शब्दाचा प्रयोग केला आहे. त्याचा भावार्थ असा आहे की मनोनिग्रहाद्वारे तृष्णेला जिंकणे. 'मंत्रित' हा एक प्रतिकात्मक शब्द आहे तो सर्पावर लागू होतो परंतु तृष्णेवर लागू होत नाही. मनोनिग्रहामध्ये

उदता आली तर ज्याप्रमाणे सर्प मंत्राद्वारे वशिभूत होतो त्याचप्रमाणे तृष्णेवर साधक ताबा ठेवू शकतो.

ज्यांनी तृष्णेवर विजय मिळवला तो समजतो की संसारामध्ये 'इष्ट'चा वियोग आणि 'अनिष्ट'चा संयोग पूर्वकृत कर्मामुळे होतो. म्हणून दुःखी होऊन काय फायदा ? त्या पापकर्माच्या नाशाचाच प्रयत्न केला पाहिजे. त्यामुळे पुढे इष्ट वियोग आणि अनिष्ट संयोग होऊ शकणार नाही. मनोहर वस्तू नष्ट झाल्यावर जर शोक केल्याने काही फायदा होत असेल, किर्ती मिळत असेल, सुख मिळत असेल अथवा धर्म होत असेल तेव्हा तर शोक करणे, दुःख मानणे योग्य होईल. परंतु जेव्हा किर्ती, सुख इत्यादींची प्राप्ती होत नसेल तर कोणता बुद्धिमान मनुष्य व्यर्थच त्या शोकरूपी महाराक्षसाच्या अधिन होईल ? अर्थात कोणीच नाही.[२४]

जर लावण्य, यौवन, सुंदरता इत्यादी गुण वास्तविक रूपाने मनोहर असते तर संतांनी यांना त्यागण्याचा प्रयत्न का केला असता ? तिर्थंकर, चक्रवर्ती राजा, महाराजा हे जाणत होते की संपत्ती जेव्हा प्राप्त होते तेव्हा प्राणी उच्च स्थानाला प्राप्त करतो. परंतु एक वेळ अशी येते की तुफानाप्रमाणे चंचल संपत्ती क्षणात निघून जाते आणि तो उच्च पदस्थ प्राणी अधःपतित होतो. तेव्हा जरी तो शूर, विनम्र, उच्चकुलोत्पन्न, सज्जन महान विद्वान आणि धार्मिक असला तरी लक्ष्मी निघून जाते. ती तशीच जात नाही तर जाता जाता चिंतारूपी ज्वर उत्पन्न करून जाते त्यामुळे जीवन कलूषित होते, दुःखी होते.[२७]

सांगण्याचे तात्पर्य हे आहे की ज्ञानी, लक्ष्मीच्या स्वभावाला समजून शोक करत नाही. जे अज्ञानी ह्या जागतिक पदार्थाच्या नश्वरतेला समजत नाही त्यांना समजविण्यासाठी आचार्य शुभचंद्र मानवाला संबोधून म्हणतात, 'अरे ! मूर्ख मानवा ! प्रतिक्षण नश्वर, इंद्रियजनित सुखामध्ये आसक्त असल्याने हे तिन्ही लोक नाशाला प्राप्त होत आहेत. काय हे सर्व तू पाहत नाहीस ? ह्या संसाररूपी समुद्रामध्ये भटकणाऱ्या मनुष्याचे जितके संबंध आहेत ते आपत्तींनी परिपूर्ण आहेत. कारण ते शेवटी एकदम नीरस आहे, त्यात सुख मानणे हा प्राण्याचा भ्रम आहे.'[२६]

'शीर्यते इति शरीरं' जे शीर्ण होते, नष्ट होते ते शरीर आहे. या व्युत्पत्तीच्या आधारे आचार्य शुभचंद्रांनी एक श्लोक लिहिला आहे -

शरीरं शीर्यते नाशा, गलत्यायुर्न पापधीः ।
मोहः स्फुरति नात्मार्थः पश्य वृत्तं शरीरिणाम् ॥

ह्या संसारी लोकांची दशा तर पाहा - शरीर दिवसेंदिवस क्षीण होत आहे परंतु आशा (इच्छा, तृष्णा) क्षीण होत नाही. आयुष्य कमी होत आहे पण पापबुद्धी गळत नाही. मोह नित्य स्फुरीत होत आहे परंतु आत्मकल्याणाची प्राण्यांमध्ये थोडी सुद्धा भावना जागृत होत नाही. ज्या परिग्रहाच्या मोहामध्ये मनुष्य सर्वकाही विसरतो त्याच्या नश्वरतेला आणि दुःखरूपतेला व्यक्त करताना सांगितले आहे -

हा परिग्रह अती निर्दयी आहे, करुणारहित आहे, मनुष्याच्या हृदयामध्ये अत्यंत दाह, संताप उत्पन्न करून निघून जातो. मग तो कसा प्रिती करण्यायोग्य आहे ?[२७]

ज्यांच्या घरात प्रभातकाळी आनंदोत्साहाने सुंदर मंगल गान होत होते, त्याच घरात मध्यान्ह काळी दुःखाचे रूदन ऐकले जाते. सकाळी ज्याचा राज्याभिषेक पाहतो त्याच दिवशी त्या राजाच्या चितेचा धुर पाहिला जातो.[२८]

अशाप्रकारे आयुष्य ओंजळीत भरलेल्या पाण्याप्रमाणे आहे. शरीर समुद्र किनाऱ्यासारखे आहे. इंद्रियांची अर्थग्रहणशक्ती शत्रूच्या प्रेमासारखी आहे. यौवन तत्काल उगवलेल्या फुलासारखे आहे. असा विचार करणारे संत पुरुष कशानेच मोहित होत नाही.[२९]

पंडित आशाधर यांनी अनगार धर्मामृताच्या या गाथेमध्ये अनित्यतेचे जे विवेचन केले आहे ते अत्यंत सुंदर मर्मस्पर्शी आहे. आयुष्याची क्षणिकता दाखविण्यासाठी ओंजळीतल्या पाण्याची उपमा दिली आहे. ज्याप्रमाणे ओंजळीमध्ये भरलेले पाणी काही काळातच झिरपून खाली पडते त्याचप्रमाणे मनुष्याचे आयुष्य पूर्ण होता वेळ लागत नाही. मनुष्य दीर्घकाळापर्यंत जिवंत राहण्याचा मोह बाळगतो. त्याच्या परिणामस्वरूपी तो उन्मत्त होऊन आपल्या इच्छापूर्तीसाठी अर्थसंग्रह करण्यात मग्न राहतो. परंतु एकाएकी त्याच्या जीवनामध्ये असा प्रसंग घडतो की त्याची सर्व कामे अपूर्ण राहतात आणि मृत्यू त्याला आपला ग्रास करतो.

शरीराला 'समुद्र किनाऱ्याची' उपमा दिली आहे. समुद्रकिनारा समुद्राच्या वाढत्या लाटांनी छिन्न-भिन्न होत असतो. त्याला तुटण्यास वेळ लागत नाही. हे शरीरही तसेच आहे. इंद्रियांची अर्थग्रहण शक्ती शत्रूच्या प्रेमाप्रमाणे आहे. एखाद्या शत्रूने आपल्या जवळ येऊन प्रेम दाखवले तर त्याची काहीच सार्थकता नाही. ते सर्वथा निरर्थक होईल. त्याचप्रकारे इंद्रियांची आपापल्या विषयांना ग्रहण करण्याची जी शक्ती आहे ती शत्रूच्या प्रेमाप्रमाणे नितांत मिथ्या आहे, खोटी आहे. ती केव्हा नष्ट होईल ते कोणीच सांगू शकत नाही.

यौवनाला तत्काल उमललेल्या फुलाची उपमा दिली आहे. उद्यानात उमललेले

फुल अत्यंत सुशोभित असते परंतु थोड्याच वेळानंतर ते कोमजले जाते. सुंदर, मनोज्ञ दिसणारे यौवनसुद्धा असेच आहे. त्यालाही नष्ट होण्यास वेळ लागत नाही. उत्तरोत्तर व्यतीत होणारे आयुष्य आणि आकस्मात येणाऱ्या व्याधी यौवनरूपी फुलाला चिरडून टाकतात. जे संतपुरुष ह्याचे वास्तविक रूपाने चिंतन करतात ते ह्याच्यात मोहासक्त होत नाही. ज्यांच्या स्थिरतेचा काही भरवसा नाही ते कधी साथ सोडतील हे माहीत नाही याविषयी मोह बाळगणे योग्य आहे का ?

ह्या जगाच्या नश्वरतेचे, शरीर, आयुष्य आणि यौवन यांच्या क्षणिकतेचे चिंतन करून श्री पार्श्वकुमारांनी संसाराचा त्याग केला.

वर्तमानचे तेविसावे तीर्थंकर 'श्री पार्श्वनाथ' जेव्हा लहान होते तेव्हा जळत्या काष्ठात सर्प युगलांना तडफडून मरताना पाहिले. तेव्हा ते विचार करू लागले - संसारामध्ये जीवाला मृत्यूपासून वाचविणारा कोणीच नाही. इंद्र, धरणेंद्र चंद्र, सूर्य, व्यतरेंद्र, विद्याधर बलदेव, नारायण, प्रतिनारायण इत्यादी सर्वजण आयुष्याचा क्षय झाल्यावर मृत्युमुखी पडतात. पार्श्वकुमार वैराग्य रंगात अवगाहन करू लागले आणि पुढे विचार करू लागले की, पुदगलाचा हा स्वभावच आहे की तो कमी जास्त होत राहतो. आयुष्य ओंजळीतील जलाप्रमाणे ओसरून जाते. धन आणि सुख इंद्रधनुष्याप्रमाणे अस्थिर आहे. जुगाऱ्याच्या धनाप्रमाणे ते क्षणात दुसऱ्याचे होते. संध्याकालीन वादळाच्या रंगाप्रमाणे राग आणि रुची सुद्धा क्षणिक आहे. 'स्त्री भोग' तारागणाप्रमाणे तरल आहे आणि भाग्य जलधारेप्रमाणे चपळ आहे. नवयौवन नदीच्या पुराप्रमाणे क्षीण होणारे आहे. सौंदर्य आणि वर्ण दिवसेंदिवस क्षीण होणारे आहे. इंद्रियसुख विजेच्या चमकण्याप्रमाणे चंचल आहे. मृत्यूनंतर शरीरही आपले राहत नाही. राज्यभोगसुद्धा भारोपहत जीर्णपत्राप्रमाणे कोणासाठीही शाश्वत होत नाही. अशाप्रकारे संपूर्ण जगाला अनित्य मानून आपल्या मनामध्ये नित्य, निरंजन आणि शुद्ध जीवात्म्याची भावना करत करत पार्श्वजिन पुन्हा पुन्हा आपल्या मनात अनित्यादी भावनांचे चिंतन करू लागले.[३०]

जे काही महापुरुष होऊन गेले ते संसाराचे, सांसारिक पदार्थांचे, जीवनाच्या अनित्यतेचे, अशरणतेचे चिंतन करून विरक्त झाले. त्याच भावनेने भव्य जीवांचा उद्धार करण्यासाठी अनेक संतांनी, आचार्यांनी, कवी आणि लेखकांनी आपल्या आपल्या शैलीत लोकांना समजाविण्याचा प्रयत्न केला आहे. पदार्थाच्या अनित्यतेचे वर्णन तर सर्वांनी केले आहे. परंतु सर्वांचे भाव, भाषाशैली, आणि दृष्टांत वेगवेगळे आहेत.

उपाध्याय विनयविजय यांनी अनित्यतेचे वर्णन करताना लिहिले आहे. 'हे मूर्ख जीवा ! तू आपले कुटुंबादी सांसारिक वैभवाचा विचार करून व्यर्थच मोहित होत आहे. कुश-डाभाच्या पानावर पडलेल्या पाण्याच्या बिंदूप्रमाणे सर्वकाही क्षणिक आहे. हे वैषयिक सुख चमकणाऱ्या विजेप्रमाणे क्षणात लुप्त होणारे आहे. हे यौवन कुत्र्याच्या शेपटीप्रमाणे कुटील आहे. हे वृद्धावस्थेत परिणत होते. जो दुर्जय आहे त्याला कोणीही थांबवू शकत नाही. ते सत्त्वहीन, क्षीण आहे. तरीही मन किती निर्लज्ज आहे, ते कुत्सित कर्मविकारांना सोडत नाही. अनुत्तर विमानाने सर्वश्रेष्ठ सुखही नष्ट होते तर सांसारिक पदार्थांच्या सुखाच्या स्थिरतेची गोष्ट काय ? ज्यांच्या बरोबर क्रिडा केली, गोष्टी केल्या त्या सर्वांना भस्मिभूत होताना पाहूनही तुम्ही निश्चित होऊन निःशंकपणे विचरण करता अशा प्रमादाचा धिक्कार आहे. समुद्राच्या लाटेप्रमाणे सर्व सजीव, निर्जीव पदार्थ निर्माण होतात आणि विलिन होतात. स्वजन आणि धनाचा संयोग इंद्रजालाप्रमाणे, जादूगाराच्या खेळाप्रमाणे आहे. हे मूर्ख जीव त्याच्यातच अनुरक्त होतात. स्थावर तथा जंगम जगाला नेहमी भक्षण करणारा हा काळही तृप्त होत नाही. ह्या काळाच्या विळख्यात सापडलेले आपण कोणीही सुटू शकणार नाही. म्हणून नित्य, चिदानंदमय आत्मस्वरूपाला जाणून प्रशमरसरूपी अभिनव अमृतपानाद्वारे आध्यात्मिक आत्मसुखाचा अनुभव घेतला पाहिजे.[३१]

श्री मुनी सुंदरसूरी यांनी ह्या बाह्य पदार्थाचे ममत्त्व सोडण्यासाठी अत्यंत प्रेरक शब्दात म्हटले आहे - हे जीवा ! ज्या स्त्रियांची वाणी तुला स्नेहासक्त आणि मधुर वाटते त्यावरील प्रितीमुळे तू मोहीत होतो. परंतु भव सागरामध्ये पडणाऱ्या प्राण्यांसाठी त्या स्त्रिया गळ्यात बांधलेल्या दगडाप्रमाणे आहेत.[३२]

'तू मुलाला, मुलीला पाहून हर्षोन्मत्त होऊ नकोस. कारण मोहराज नावाच्या तुझ्या शत्रूने तुला नरकरूपी कैदेत टाकण्याच्या इच्छेने ह्या पुत्र-पुत्रीरूपी लोखंडाच्या साखळीने तुला जखडून टाकले आहे.[३३]

म्हणून हे भव्यात्मा अनित्य पदार्थाचा मोह सोडून जिनेश्वर भगवंतांनी दाखविलेल्या धर्माप्रती प्रेम, आस्था आणि आदराचा रंग धारण कर.

अनित्यतेची अनेक ऐतिहासिक उदाहरणे सर्वांना माहीतच आहेत. ज्याप्रमाणे एका काळच्या सन्माननीय 'मुंज' राजाला दुश्मन राजांच्या ताब्यात जावे लागले आणि घरोघरी भीक मागून खाण्याची वेळ आली, राज्य, संपत्ती इत्यादी कोठे स्थिर राहिले ? सनत्कुमार चक्रवर्तीच्या ज्या शरीराची इंद्र प्रशंसा करत असे त्यांचे अनुपम सौंदर्यसुद्धा

क्षणात भयंकर सोळा महारोगांच्या आगमनाने नष्ट झाले आणि देवांकडून जेव्हा हे माहीत झाले तेव्हा चक्रवर्ती शरीराच्या सौंदर्याप्रमाणे सहा खंडांची राज्यसंपत्ती संपूर्ण अनित्य समजून चिंतन मनन करत करत प्रतिबुद्ध झाले आणि संसार सोडून अनगार बनले.

श्री रामचंद्रजींचे पूर्वज 'राजा किर्तीधर' यांनी सूर्याच्या प्रखर तापाला राहूच्या ग्रहणाने आवृत्त पाहिले आणि संसारच्या सर्व रंगाला सुद्धा अल्पकालीन समजून संसाराचा परित्याग केला.[३४]

अनित्याचे साम्राज्य कसे विश्वव्यापी आणि बलवान आहे हे समजून अशा क्षणिक प्रसंगात काय रममाण व्हायचे ? श्रीमद् राजचंद्र ह्या विषयाला स्पष्ट करण्यासाठी सांगतात-

"विद्युत लक्ष्मी प्रभुता पतंग, आयुष्य ते तो जलना तरंग
पुरंदरी चाप अनंग रंग, शुराचिअे त्या क्षणनो प्रसंग ।"[३५]

ज्ञानी पुरुषांनी लक्ष्मी इत्यादी वैभवाला विजेच्या लखलखाटाप्रमाणे, अधिकाराला फुलपाखराच्या रंगाप्रमाणे, आयुष्याला पाण्याच्या तरंगाप्रमाणे आणि कामविकाराला इंद्रधनुष्याप्रमाणे सांगितले आहे. म्हणून ह्या सर्वामध्ये रममाण होण्यासारखे, आकृष्ट होण्यासारखे काहीच नाही. जे क्षणिक आहे त्याच्या मोहात अडकण्यासारखे काही नाही.

लक्ष्मी अनित्य आहे. ती कुलीनाजवळ किंवा धीराजवळ राहत नाही तसेच पंडित, मूर्ख, सुरूप, कुरूप, पराक्रमी, निर्बळ, धर्मी, अधर्मी, कंजूस, उदार अशा कोणाहीजवळ स्थिर रहात नाही. ती स्वभावानेच चंचल आहे. ज्यांनी पूर्व जन्मात काही पुण्य केले असेल त्यांच्याच जवळ राहते. जर तिचा उपयोग भोगामध्ये, कुमार्गामध्ये अथवा मद्यपान इत्यादींमध्ये केला तर ती दुर्गतीला पोहचविते. लक्ष्मी बुद्धी नष्ट करते. तिच्या वियोगात जगातील जीव जणुकाही अचेतनामय होतात. ती अनेक जीवांना छळते, अधोगतीला नेते. जर तिचे दान केले नाही अथवा तिचा उपभोगही घेतला नाही आणि ती तशीच नष्ट झाली तर आर्तध्यान करत करत जीव तिर्यंच गतीमध्ये जातो. जर पूर्व पुण्याने आपल्याजवळ लक्ष्मी असेल तर तिला क्षणभंगुर समजून दुःखी जीवांचे दुःख दूर करण्यासाठी, धर्माची वृद्धी करण्यासाठी, विद्येच्या विकासासाठी, वीतरागाद्वारे प्ररूपित सिद्धांताच्या प्रचारामध्ये विनियोग करून सफल करा. आपल्या आत्मोन्नतीचे हे एक प्रमुख साधन आहे.

ह्या संसारामध्ये अधिकारी लोक आपल्या सत्तेच्या अभिमानामध्ये न्याय व अन्याय यांचा विचार केल्याशिवाय अनेक प्रकारचे जुलूम करतात. परंतु हे अधिकार

दुतनगारखाच्या रंगाप्रमाणे चार दिवसाचे आहेत, अधिकार गेल्यानंतर राजा रंक होतो, श्रीमंत गरीब होतो. अधिकार कोणाच्या थांबविण्याने थांबत नाही.

मृत्यूसुद्धा अचानक येऊन उभा राहतो. मनुष्यजन्म पुन्हा प्राप्त करणे कठीण आहे. नदीमध्ये पाण्याच्या लाटा येऊन जातात, परंतु त्या गेलेल्या लाटा पुन्हा कधीच येत नाही. त्याचप्रमाणे रूप, बल, इंद्रिय शक्ती, आयुष्य हे नष्ट झाल्यावर पुन्हा प्राप्त होत नाही. इंद्रजालाप्रमाणे लोकांना भ्रमित करणारे स्वजन, स्त्री, पुत्रादींचे प्रेम आहे, त्यासाठी अनीतीचे पापकर्म सोडून द्या आणि संयम नियम धारण करा. ह्या अनित्य भावनेला क्षणभर देखील विसरण्यासारखे नाही.

पूज्य श्री तिलोकऋषी महाराजांनी अत्यंत प्रेरक शब्दात म्हटले आहे -

''अरे प्राणी जग माया सब काची, थे किम करी मानी छे साची रे प्राणी...
दुश्मन मरकर स्वजन होवे, स्वजन दुश्मन थावे,
रागद्वेष करमा को बंधन क्यो निज माल गमावे... रे प्राणी''[३६]

अर्थात हे प्राणी ! ह्या जगाची माया कच्ची आहे. त्याला खरी का मानत आहेस. आज ज्याला शत्रू समजतो तो उद्या मित्र, स्वजन होऊन जाईन आणि जो मित्र आहे तो शत्रू होईल. तर मग आपले व परके असा भेद करून का स्वतःच्या आत्मिक संपत्तीला नष्ट करीत आहेत. इथे 'माया' या शब्दाचा अर्थ 'धन' आहे. हे धन क्षणिक आहे. त्याची नश्वरता दाखवताना म्हटले आहे -हे भद्र प्राणी, संसाराला मोहित करणारी लक्ष्मी वाऱ्याने कंपित होणाऱ्या दीपशिखेप्रमाणे अस्थिर आहे. तिला नष्ट होण्यास वेळ लागत नाही. हे सर्वकाही तुम्ही पाहत असतानाही 'ही लक्ष्मी माझी आहे' असे जे मानता तो तुमचा मूर्खपणा नाही का ? लक्ष्मी पुण्याने प्राप्त होते. पुण्य तर मर्यादित आहे, सीमित आहे. जेव्हा पुण्याची मर्यादा पूर्ण होते, पुण्य समाप्त होते तेव्हा ते पुण्याने प्राप्त झालेले सर्व पदार्थ नष्ट होतात. आयुष्य पूर्ण झाल्यावर परलोकामध्ये जावे लागेल तेव्हा मिळालेल्या लक्ष्मीचा अवश्य वियोग होईल. एक तर लक्ष्मीला सोडून तुम्हाला जावे लागेल नाही तर लक्ष्मी तुम्हाला सोडून जाईल. दुसऱ्या भवामध्ये नाही पण ह्याच भवात दोघांपैकी कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारे लक्ष्मीचा वियोग होईलच. आई-वडील, पत्नी, कुटुंब, जन्मभूमी ह्या सर्वांना सोडून विशाल सागराला उल्लंघून क्रूर राज्याधिकारींच्या कठोर वचनाला सहन करून अतिशय कष्टाने धनाचा संचय केला. त्याच्या रक्षणासाठी अनेक उपाय केले तरी सुद्धा ते धन दीर्घकाळापर्यंत टिकत नाही. दुःखाचा विषय तर हा आहे की धन प्राप्त

करण्यात आणि त्यांचे रक्षण करण्यात सुमद्राएवढे विपुल दुःख भोगावी लागतात. आणि त्यापासून मिळणारे सुख तर पाण्याच्या थेंबाएवढेही नसते. कारण कितीही संरक्षण केले तरी शेवटी लक्ष्मी वियोगाचे दुःख देऊन निघून जाते.[३७]

लक्ष्मीची किती सेवा केली जाते हे सर्वजण प्रत्यक्ष पाहतात. थंडी असो वा गर्मी, त्याची चिंता केल्याशिवाय लक्ष्मीसाठी मानव गावोगावी भटकतो. तिला पेटी अथवा तिजोरीमध्ये सांभाळून ठेवतो. स्वतः कोठेही पडून राहील परंतु लक्ष्मीला वाचविण्यासाठी स्वतः झोप घेत नाही. आवश्यकता पडली तर स्वतःचे प्राणही गमावतो. तरीसुद्धा ही लक्ष्मी कोणाची होत नाही. किती निर्दयी आहे ती ! उपकाराचा बदला लक्ष्मी अपकाराने चुकवते. हे सर्व काही समजत असूनही लोक लक्ष्मीचा सदुपयोग करून लाभ घेत नाहीत. हातात येताच जर तिचा सदुपयोग करून घेतला तर मागून पश्चाताप करण्याची वेळ येत नाही. परंतु हा दोष लक्ष्मीचा नाही मनुष्याचाच आहे. विचारशील मनुष्य लक्ष्मीचे दोष, तिची चंचलता इत्यादींचे चिंतन करून अनित्यतेच्या खोलवर उतरून लोभ, तृष्णा, गर्व, उद्धटपणा सोडणे हेच लक्ष्मीच्या अनित्यतेला समजण्याचे सार आहे.

लक्ष्मीप्रमाणेच यौवन, रम्यभवन, विपुल बळ, मनोहरिणी कांता, उच्चजाती, पर्वतासारखे विशाल हत्ती इत्यादी सर्व काही अनित्य आहे.

मानवाच्या शरीरात एका रोमा इतकीसुद्धा अशी जागा नाही की ज्यामध्ये रोगाची सत्ता नसेल. जेव्हा कर्माचा उदय होतो तेव्हा रोमारोमात रोग उत्पन्न होतात. आयुष्य हे फुटलेल्या घड्यातून टपकणाऱ्या पाण्याप्रमाणे क्षीण होत जात आहे. अशा अशुची युक्त क्षणभंगुर शरीराचा मोह का करावा ?[३८]

ह्या जगामध्ये ज्यांना विशाल राज्याचे सुख होत, जवळ अपरिमित संपत्ती होती, अतुल बळ होते, जे पृथ्वीवर इंद्राप्रमाणे शासन करणारे होते. ते सुद्धा राहिले नाहीत तर साधारण लोकांची काय कथा ? संयोगाचा शेवट वियोगामध्ये होतो तरी संपर्कामुळे मनुष्य संयोगाला शाश्वत मानून बसला आहे. त्याने सतत चिंतन केले पाहिजे की, -

"सागर परिमित काल का आ जाता है अंत ।
सकल ऋद्धि तज चल बसे, सुरपति दुःख अत्यंत ॥
रहा भरोसे काल के किया न कुछ सत्काम ।
मन की मन में ही रही, पहुँच गया यमधाम ॥"[३९]

अर्थात सागरोपम, जे काळाचे सर्वाधिक मोठे प्रमाण आहे ते सुद्धा पूर्ण होऊन जाते.

तर मनुष्य सत्कार्य नंतर करेल असा विश्वास ठेवू शकत नाही. कारण हिंदीमध्ये असे सांगतात की, ''कल कल करते, काल आकर खडा हो जायेगा'' केव्हा काळ येऊन प्राण्याला आपला ग्रास करेल हे सांगता येत नाही. त्याचा काही विश्वास नाही.

''आये गये यहाँ कितने ही, गिनती इसकी कौन करे,
लिखनेवाला स्वयं दुसरा हस्ताक्षर फिर कौन करे,
खेल अनादि काल का है यह टूट नहीं सकता है क्रम,
मैं हूँ अमर, अमर मेरा धन, यही मूर्खपन झूठा भ्रम ।[४०]

राज्य, वैभव, पुत्र, पत्नी, स्वजन, धनधान्यादींचा संयोग झाला तरी हे माझे आहे या भ्रमाला तोडण्यासाठी एक अत्यंत सुंदर उदाहरण आहे-

एकदा राजा भोज यांनी राज्यवैभवाविषयी अहंकार मनात धरून एका पदाच्या तीन चरणांची रचना केली परंतु चतुर्थ चरणाची रचना ते करू शकत नव्हते. राजमहालामध्ये चोरी करण्यासाठी एका विद्वान चोराने प्रवेश केला. राजा भोज आपल्या रचलेल्या श्लोकाच्या तीन चरणांचे पुन्हा पुन्हा पठन करताना म्हणत होते -

''चेतोहरा युवतयः स्वजनोऽनुकूलः
सद्बांधवाः प्रणयगर्भगिरश्च भृत्याः।
गर्जन्ति दन्तिनिवहास्तरलास्तुरंगाः''

अर्थात - माझ्या मनोहर स्त्रिया आहेत. अनुकूल स्वजन आहेत, सद्बंधू आहेत, स्नेहासिक्त वाणी बोलणारे सेवक आहेत, गर्जना करणारे हत्ती आहेत आणि चंचल घोडे आहेत हे ऐकून चोराने श्लोकाच्या अंतिम चरणाची रचना करताना म्हटले,

'संमीलने नयनयोर्नहि किंचिदस्ति ॥'

अर्थात डोळे बंद झाल्यावर हे सर्व काही नसणार. तुमचे वैभव डोळे बंद झाल्यावर नष्ट होईल असे सांगून त्या विद्वान चोराने राजाला वैभवाच्या अनित्यतेचे ज्ञान देण्याची हिंमत केली. मी चोरी करण्यासाठी आलो आहे पकडला गेलो तर माझे काय हाल होतील ह्याचे विचार देखील त्याने केला नाही. विद्वानाच्या उपकार करण्याचा स्वभाव असतो तो उपकार करण्याची क्षण व्यर्थ घालवत नाही आणि म्हणूनच चौथा चरण त्याने पूर्ण करून

जोराने त्याचे उच्चारण केले.

चौथा चरण ऐकून राजाने आवाजाच्या दिशेने येऊन विचारले, 'तू कोण आहे विद्वान म्हणाला : 'चोर आहे.' राजा हे ऐकून आश्चर्यान्वीत झाला. पण माझ्या बुद्धीत असे कुसंस्कार पडले की मला चोरी केल्याशिवाय शांती मिळत नाही. आज मी इथे चोरी करण्यासाठीच आलो पण अजून मी काहीच घेतले नाही, त्या पूर्वीच आपले शब्द ऐकून आपणास योग्य मार्गी आणण्यासाठी आपल्या पदाची पूर्ती केली. आता तुम्हाला जी शिक्षा करायची असेल ती करा.

राजा भोजचे डोळे उघडले. त्यांनी त्या चोराच्या विद्वतेचा सन्मान करून त्याला मुक्त केले आणि बक्षीससुद्धा दिले.[४१]

सांगण्याचे तात्पर्य हे आहे की जीवनामध्ये कोणत्याही प्रकारचा अहंकार अशोभनीय आहे. अहंकार करणारा राजा असो किंवा रंक. परंतु जीवन तर क्षणभंगुर आहे.

म्हणून श्री जयमलजी महाराज लिहितात की -

तन, धन, यौवन अथिर छे मुरख मत कर मान
उपमा दिजे एहवी जेहवो संझानो वान रे ।
पाको पीपल नो पान रे जेहवो कुंजर नो कान रे
डाभ अनि बिंदु समान रे, पाणी लहर प्रमाण रे
एहवो आउखा तू जान रे तु तो चेत चेत रे प्राणिया ।[४२]

संध्येचा रंग, पिकलेले पिंपळाचे पान, हत्तीचे कान, कुशाग्रावर असलेला जलबिंदू आणि पाण्याची लाट अस्थिर आहे. त्याचप्रमाणे आयुष्यही अस्थिर आहे. म्हणून हे मानवा, तू जागृत हो. अभिमान करू नकोस. कारण अभिमान कोणाचाही टिकत नाही.

दहला देता था वीरों का जिन का एक इशारा,
जिनकी उंगलीपर नचता था यह भूमंडल सारा,
थे कल तक जो शूरवीर रणधीर अभय सेनानी
पडे तडपते आज न पाते, हैं चुल्लुभर पानी ।[४३]

सर्व पर पदार्थ आणि जीवनही अनित्य आहे. जेव्हा अनित्यतेचे चिंतन समोर

राहते, पुन्हा पुन्हा चेतनेमध्ये त्याची स्फुरणा होत असेल तर अहंकार येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

व्यावहारिक जीवनामध्येही अनित्यतेच्या अनुचिंतनाचे महत्त्व आहे. ज्या व्यक्तीच्या चित्तामध्ये हे संस्कार पुष्ट होतात की सर्व पदार्थ अनित्य आहेत. मग त्या व्यक्तीच्या मनात विवाद वाढवणाऱ्या गोष्टी समाप्त होतात. तो घटनेला समजून घेतो परंतु त्यापासून अलिप्त राहतो. त्याचा उपभोग घेत नाही. अनित्य भावनेचे चिंतन करणाऱ्या व्यक्तींमध्ये आणि न करणाऱ्या व्यक्तींमध्ये हेच अंतर आहे. चिंतनशील व्यक्ती घटनेला जाणते. परंतु उपभोग घेत नाही तर ध्यान, चिंतन, अनुभावन न करणारी व्यक्ती घटनेला जाणत नसल्याने भोग घेत राहते. घटनेला जाणणारे व्यवहाराला अमृतमय मधुर करतात आणि घटनेला भोगणारे स्वतः दुःखी होतात आणि संपूर्ण वातावरणात दुःखाचे परमाणू पसवून देतात संपूर्ण वातावरण दुःखी होऊन जाते.[४४]

प्रेक्षाध्यान प्रक्रियेमध्ये शरीर दर्शनाच्या अभ्यासात घडणाऱ्या अवस्था स्पष्ट होऊ लागतात. पुन्हा पुन्हा ''इमं शरीरं अनिच्चं'' याचा ध्वनी आणि भावना जितक्या शक्तिशाली होतील तितकेच याचे तरंग प्रबळ होतील. तरंग जर प्रबळ झाले तर त्या पूर्वगत संस्काराच्या तरंगांना समाप्त करतील. जर ही गोष्ट बरोबर ध्यानात आली तर ''इमं शरीरं अनिच्चं'' असे म्हणताना कोणालाही कंटाळा येण्याचे काहीच कारण नाही. बोलल्यामुळे प्रकंपने निर्माण होतात परंतु यांचा इतका उपयोग होत नाही म्हणून मनाला एकाग्र करून अनित्य भावनेशी जोडले पाहिजे. तन्मय व्हायला पाहिजे. केवल वाणीने अनित्यतेचे वर्णन करून चालणार नाही. त्याबरोबर भावनेचे प्रकंपन जोडले तर ते अधिक शक्तिशाली होतील. ते प्रकंपन पूर्वीची मोहासक्ती आणि पदार्थामधील नित्यतेची बुद्धी यांच्या प्रकंपनाला नष्ट करते.[४५]

अनित्य अनुप्रेक्षा हा एक 'श्रुतज्ञान' किंवा 'आत्मज्ञाना'चा प्रयोग आहे. जेव्हा श्रुतज्ञानाचा लगाम हातात असतो तेव्हा मनरूपी घोडा आपल्याला दुःख देऊ शकत नाही. जेव्हा श्रुतज्ञानाचा लगाम हातातून सुटतो तेव्हा, मनुष्य डोळे असतानासुद्धा आंधळा होतो. म्हणून मनरूपी घोड्याला सरळ रस्त्यावर चालविण्यासाठी आपल्या हातात मजबूत लगाम असावा लागतो. हा लगाम आहे अनुप्रेक्षेचा, भावनेचा, स्वतःविषयी जाणणे, स्वतःच्या विषयाचे चिंतन करणे, 'स्व' विषयी चिंतन करणे आणि खोलवर उतरून स्वतःचा अनुभव घेणे ही अनुप्रेक्षा आहे.

अनित्य भावनेच्या चिंतनाचे प्रयोजन भ्रमाला खंडीत करणे आहे. मनुष्य जितका भ्रांत राहतो तितकाच अधिक दुःखी होतो. हे सत्य जाणून अनित्य भावनेच्या अभ्यासाद्वारे भ्रमाला तोडले पाहिजे. मनुष्याची ही सवयच असते की तो प्रथम खोट्या मान्यतेची इमारत उभी करतो आणि ती तुटल्यावर दुःखी होतो. भ्रमाच्या समर्थनासाठी व्यक्ती तर्क करीत राहते. यामुळेच वादविवाद होतात. अनेक भ्रम पसरतात आणि व्यक्ती सत्यापर्यंत पोहचू शकत नाही. म्हणून मान्यतेच्या मायाजालाला आवरून सत्याचे दर्शन करण्यासाठी भावनेचे सतत चिंतन करणे आवश्यक आहे. त्यामुळे ममत्वाची भावना नष्ट होईल. मनुष्य वस्तू अथवा व्यक्तीचा वियोग झाल्याने दुःखी होत नाही. तर त्याने ज्यांना आपले मानले होते त्यांच्या वियोगामुळे त्याचा त्यांच्याबद्दलचा माझेपणाचा भ्रांत भाव, भ्रम तुटल्याने अधिक दुःखी होतो. या अनित्यतेला समजून जे नित्य आहे त्याची आराधना करणे हेच भावनेचे सार आहे.

संयोग क्षण भंगुर सभी पर आतमा ध्रुव धाम है,
पर्याय लय धर्मा परन्तु द्रव्य शाश्वत धाम है ।
इस सत्य को पहचाननाही भावना का सार है,
ध्रुव धाम की आरधना, आराधना का सार है ॥[४६]

अनित्य भावनेची प्रेरणा - अनित्य भावना साधकाला ही शिकवण देत नाही की तुम्ही कुटुंब, समाज राष्ट्र इत्यादींपासून वेगळे राहा, सर्वकाही सोडून एकांत गुफेमध्ये निघून जा किंवा जबाबदारीला घाबरून पलायन करणे म्हणजे साधना नव्हे. आपली जबाबदारी सांभाळणे हे तर व्यक्तीचे मुख्य कर्तव्य आहे. अनित्य भावना साधकाला अशी प्रेरणा देते की वर्तमानामध्ये जे पदार्थ ज्या रूपामध्ये प्राप्त आहेत ते नेहमी त्याच रूपात राहणार नाहीत. ते प्रतिक्षण बदलत राहतात. ते आज आहेत तर उद्या नाहीत म्हणून त्यामध्ये ममत्वभाव अथवा आसक्ती ठेवू नये.

अनित्य भावना साधकाच्या मनामध्ये आणि जीवनामध्ये आध्यात्मिक चेतना जागृत करते. इष्ट वियोग आणि अनिष्ट संयोगामध्ये मनात दुःख, वेदना आणि आर्तध्यान होऊ नये, प्रतिक्षण समभाव राहावा म्हणून ही भावना सतत साधकाच्या मनात स्थिर राहायला पाहिजे.

संसारामध्ये पूर्व योनीला सोडून मानव योनीमध्ये जन्म ग्रहण करणाऱ्या व्यक्तीला सर्वप्रथम अनित्यताच आपल्या मांडीवर घेते. आणि त्यानंतर माता आणि पृथ्वी कारण

संयोगाबरोबरच वियोगाची धारा प्रवाहमान होते.[४७]

चक्रवर्ती सम्राट भरत जेव्हा राज्यसिंहासनावर येऊन बसत होते तेव्हा सर्वप्रथम असेच चिंतन करायचे -

''असारं संसारे भवति सर्व यन्तयनगम्''

ह्या असार संसारामध्ये चक्षुगोचर सर्व वस्तू साररहित आहेत. भरत अनित्य भावनेचे चिंतन यासाठी करत होते की वैभवाचा मोह मनात जागृत होऊन आत्मविस्मृती होऊ नये. सुवर्ण सिंहासनावर बसूनही स्वतःला त्यापासून भिन्न समजत होते. म्हणून भगवान ऋषभदेवांनी सहा खंडाचे अधिपती असतानाही त्यांना अल्प परिग्रही म्हटले होते. कारण परिग्रह पदार्थाच्या संख्येमध्ये आणि पदार्थामध्ये नसून त्यात असलेल्या ममत्वात, तृष्णेत आहे. म्हणूनच चक्रवर्ती भरत रोज अनित्य भावनेचे चिंतन करीत होते. ज्यामुळे पदार्थाची आसक्ती कमी करण्याचे भाव दृढ होत होते. अशी चिंतनधारा जेव्हा प्रबळ झाली तेव्हा शिशमहालामध्ये शरीराला अलंकृत करता करता, शृंगार करता करता त्यांना केवलज्ञान, केवलदर्शन प्राप्त झाले. अनित्य भावनेच्या चिंतनामध्ये तेजस्विता येताच आणि आंतरदृष्टी जागृत होताच चक्रवर्ती भरत क्षणात अध्यात्मयोगी झाले. भवबंधनाचा नाश करून अक्षय, अमर आणि अविनाशी पद प्राप्त केले.

अनित्य भावना साधकाला आपली दृष्टी बाहेरून दूर करून अंतर्मुख करण्याची प्रेरणा देते. जेव्हा साधक आंतरद्रष्टा होतो तेव्हा बाह्य पदार्थाच्या अनित्यतेला यथार्थ रूपाने समजून घेतो. जेव्हा मोहाचा पूर्णपणे नाश होतो तेव्हा तो आपल्या शुद्ध स्वरूपात स्थिर होतो. आपल्या स्वभावात परिणमण करणे हेच अनित्य भावनेच्या चिंतनाचे फळ आहे. या चिंतनात जितकी स्थिरता आणि एकाग्रता येईल तितकाच आत्म्याचा विकास होईल. आगमामध्ये अनित्यतेला सर्वांगीण मानून धर्मामध्ये उद्यम करणाऱ्या साधकाची अनेक उदाहरणे आहेत. त्यात निग्गति (निग्गई) राजाचा दृष्टांत प्रसिद्ध आहे. हे चार प्रत्येकबुद्धांपैकी एक होते.[४८]

दृष्टांत - घोडे, हत्ती, रथावर बसलेल्या अनेक सामंत राजाच्या समूहाने घेरलेले अती ऋद्धीने सुशोभित असणारे गंधार देशाचे स्वामी नग्गति राजा, वसंतऋतूच्या आगमनामुळे शोभायमान उद्यानाला पाहण्यासाठी त्या सर्वांना बरोबर घेऊन नगरातून निघाले. तेथे जाताना अर्ध्या रस्त्यामध्ये एका अत्यंत विकसित आम्रवृक्षाला राजाने पाहिले. मोठ्या पानांनी सुशोभित पुष्पांच्या रसबिंदूने पिवळ्या झालेल्या मंजिरीच्या समुहाने रमणीय, ज्यावर

भुंगे गुंजारवाच्या निमित्ताने जणू काही गीत गात आहेत, हवेच्या प्रेरणेने शाखारूपी भुजांद्वारे नृत्य करीत आहेत अशा रमणीय गुणांनी युक्त वृक्षाची राजाने कौतुकवश एक मंजिरी तोडली. त्यामुळे आपल्या स्वामींच्या मार्गाचे अनुकरण करणाऱ्या सेवकांपैकी कोणी मंजिरी, कोणी कोमल पाने कोणी गुच्छ, तर कोणी फांद्यांचे अग्रभाग, तर कोणी कच्ची फळे तोडून क्षणात त्या वृक्षाला खांबासारखा करून टाकला. नंतर पुढे जाऊन मनोहर, विकसित, थंड प्रदेशाच्या उद्यानात पोहचले. तेथे थोडावेळ थांबून पुन्हा त्याच मार्गाने निघाले. राजाला तेथे तो वृक्ष न दिसल्याने त्यांनी लोकांना विचारले की तो आम्रवृक्ष कोठे आहे? तेव्हा लोकांनी स्तंभरूप झालेल्या त्या आम्रवृक्षाला दाखविले. तेव्हा आश्चर्यचकित झालेल्या राजाने विचारले 'हा असा कसा झाला ?' लोकांनी पूर्वी घडलेली सर्व गोष्ट सांगितली हे ऐकून परम संवेगाला प्राप्त झालेला राजा सुद्धा अत्यंत सूक्ष्म बुद्धीने विचार करू लागला की, 'अहो! संसाराच्या दुष्ट चेष्टेचा धिक्कार असो. कारण येथे एकही अशी वस्तू नाही की जिचा सर्वप्रकारे नाश होत नाही.

या आम्रवृक्षाप्रमाणेच बुद्धिमानांना अनित्यतेने व्याप्त स्वशरीर इत्यादी सर्व वस्तूंमध्येही आसक्ती का उत्पन्न होते ? अशाप्रकारे विविध वस्तूंच्या अनित्यतेचे चिंतन करून महासत्त्वशाली राजा राज्य, अंतःपुर आणि नगर सोडून प्रत्येकबुद्ध चरित्र युक्त साधू झाले. या दृष्टांतावरून प्रत्येक साधकाने सर्व पदार्थांच्या अनित्यतेचे चिंतन मनन केले पाहिजे.[४९]

ह्या भावनेच्या चिंतनाने जीव आपल्या आत्म्याच्या शाश्वत, अखंड आणि चिदानंदस्वरूपाचा साक्षात्कार करून सुखाचा अनुभव घेतो. यथार्थतेला समजून दुःखातून सुख प्राप्त करण्याची कला ह्या भावनेच्या चिंतनाने प्राप्त होते. अनासक्तीचा विकास होतो. ममत्वाचे विलिनीकरण होते आणि मूढतेचे अपनयन होते.

अशरण भावना

अनित्यभावनेद्वारा संसाराच्या स्वरूपाचे यथार्थ चित्रण केलेले आहे. अनित्यतेचा बोध झाल्यावर आता आपण याच्यावर विचार करू की जी वस्तू अनित्य आहे ती शरणदायी होऊ शकेल का ? ज्याचा पायाच अस्थिर आहे त्यावर इमारत उभी राहू शकत नाही.

संपूर्ण संसार दुःखाच्या ज्वालांमध्ये जळत आहे, कोठेही सुख नाही. झोपडीत राहणारे कष्टाने व्याकूळ आहेत तर सुवर्ण महालात राहणारे आपल्या वेगळ्याच दुःखाने

प्रकंपित आहेत. मानवहृदय सतत दुःखाने जळत आहे. मनुष्य असहाय आहे, निरुपायी आहे, कोणाची शरण घ्यावी ?

भारतीय साधनापद्धतीमध्ये भक्ती मार्गाचा सर्वाधिक प्रभाव आहे. भक्तीचे मूळ 'अशरण भावना' आहे. भक्त परमात्म्याला एकमेव शरण मानून संसारातून विरक्ती स्वीकारून पूर्ण समर्पणामध्ये विश्वास ठेवतो. समर्पण भावनेची एक प्रसिद्ध गाथा आहे -

अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम ।
तस्मात् कारुण्य भावेन, रक्ष रक्ष जिनेश्वर ॥

जेव्हा जीवनामध्ये दुःखाची वादळे येतात, आपत्तीच्या बीजा कडकडू लागतात आणि कष्टाची मेघगर्जना होते तेव्हा व्यक्ती स्वतःला वाचविण्यासाठी इकडे तिकडे पळते, आश्रय शोधते. ती एखाद्या अशी व्यक्ती अथवा वास्तूची शरण घेण्याची इच्छा करतो की ज्यामुळे ती सुरक्षित राहावी. या जीवनाला सुरक्षित ठेवण्यासाठी बहुमूल्य साधनांचा संग्रह करते आणि समजते की आता माझे जीवन सुरक्षित राहील. सुखपूर्वक व्यतीत होईल.

परंतु आगमग्रंथात आणि आगमोत्तरकालीन कुंदकुंदाचार्यापासून आजपर्यंतच्या आचार्यांनी आणि विद्वानांनी अशरण भावनेच्या माध्यमातून या जगात अशरण काय आहे आणि कोणाची शरण ग्रहण केली पाहिजे याचे विस्तृत विवेचन केले आहे.

तात्त्विकदृष्ट्या पाहता कोणालाही स्वतःच्या आत्म्याशिवाय दुसऱ्या कोणाचीही शरण नसते. जन्म, जरा, मृत्यू, रोग, भय यांपासून आत्म्याचे रक्षण करणारा त्याचा आत्माच आहे. बंध, उदय आणि सत्तारहित शुद्ध आत्माच शरणरूप आहे.[५०]

दुसऱ्याची शरण घेण्याची आपल्याला काहीही आवश्यकता नाही. पुरुषार्थाने सर्व काही प्राप्त होऊ शकते. जगाची शरण घेणारा कधी जिंकत नाही आणि आत्म्याची शरण घेणारा कधी हारत नाही. जो दुसऱ्याची शरण घेतो तो रिकाम्या हातांनी परत येतो. त्याला काहीच प्राप्त होत नाही. जो स्वतःला शरण जातो त्याला काहीच प्राप्त करण्याचे बाकी राहत नाही.

तिसऱ्या प्रकरणामध्ये आवश्यक सूत्राच्या अंतर्गत अरिहंत सिद्धांची शरण घ्यावी या विषयावर चर्चा केली. स्वाभाविकच असा प्रश्न पडतो की अरिहंत, सिद्ध, साधू आणि धर्माच्या शरणी जाणे म्हणजे दुसऱ्याच्या शरणी जाणे नव्हे का ? याचे समाधान असे आहे की, या सर्वांना शरण जाणे म्हणजे स्वतःलाच शरण जाणे असा अर्थ आहे. आचार्य

कुंदकुंदांनीसुद्धा असे सांगितले आहे की, 'अर्हन्त, सिद्ध, आचार्य, उपाध्याय आणि साधू हे पाच परमेष्ठी आपल्या शुद्ध आत्म्यातच निवास करतात म्हणून शुद्धात्माच एकमेव माझ्यासाठी शरण आहे.[५१]

निश्चयाने जीवमात्रांसाठी आत्माच शरण आहे. तो निजस्वभावाचा अनुभव घेतो. त्याच्यासाठी अन्य कोणाची शरण नाही. वास्तविक अर्हंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय, साधू ह्या पाचही आपल्या आत्म्याच्या अवस्था आहेत. या सर्व अवस्था 'स्व' स्वभावाची शरण ग्रहण केल्याने उत्पन्न होतात. आगमामध्ये शुद्धात्मा, पंचपरमेष्ठी धर्म आणि रत्नत्रयाची शरण ग्रहण करण्याचे सांगितले आहे. वस्तुतः हे सर्व शुद्ध स्वभावात स्थित आहेत. जो आपल्या शुद्ध स्वभावाचा एकदा आश्रय घेतो त्याला अन्य कोणाला शरण जाण्याची इच्छा होत नाही.

सम्यगदर्शन, सम्यगज्ञान, सम्यकचरित्र आणि सम्यक्तप ह्या चारही गोष्टी आत्म्यातच स्थित असतात. आत्माच यांची साधना, आराधना करून सर्व दुःखापासून मुक्त होतो, सिद्धी प्राप्त करतो. म्हणून वस्तुतः आत्माच शरणरूप आहे.[५२]

वट्टकेराचार्य लिहितात की, घोडे, हत्ती, रथ, मनुष्य, बल, वाहन, मंत्र औषधी, विद्या, माया, नीती आणि बंधुवर्ग हे मृत्यूच्या भयापासून रक्षण करू शकत नाही.[५३]

जीवितुमिच्छा-जगण्याची इच्छा प्रत्येकामध्ये व्याप्त असते. मनुष्य विचार करतो की हत्ती, घोडे इत्यादी वैभव, सेवक, स्वजन इत्यादी मनुष्य, बल, वाहन, मंत्र हे माझे रक्षक आहेत. रुग्ण झाल्यावर औषधी, मंत्र, तंत्रादी विद्या मला वाचवू शकतील. बंधुवर्ग, कुटुंबातील लोक माझे रक्षण करतील. परंतु सत्य हे आहे की मृत्यूच्या भयापासून कोणीही वाचवू शकत नाही.

जन्म, जरा आणि मृत्यू ह्या जगात प्राण्याचे सर्वात मोठे शत्रू आहेत. त्यांचे निवारण करण्यात कोणीही समर्थ नाही.[५४] केलेल्या कर्माची फळे भोगावीच लागतात त्याला कोणीच अडवू शकत नाही. कोणते कर्म केव्हा आणि कशारूपात उदयास येईल ते सर्वज्ञाशिवाय कोणीही काहीच सांगू शकत नाही.

ज्ञानावरणीय कर्म अशाप्रकारे अज्ञानतेला आणतात. त्याचे निवारण करण्यासाठी कोणीही शरणरूप नाही. त्याचे निवारण करण्याचा काही उपाय नाही. असातावेदनीय कर्माच्या उदयामुळे अमृतसुद्धा विष होते, तृणसुद्धा शस्त्र होते आणि बंधुबांधवही शत्रू होतात. पाप अर्थात लाभान्तराय कर्माच्या उदयाने मनुष्याच्या हातात आलेले पदार्थही

नष्ट होतात आणि पुण्यवानाला प्रयत्न केल्याशिवाय सहजरूपाने पदार्थ प्राप्त होतात. पुण्योदयाने कोणामध्ये गुण नसले तरी यश प्राप्त होते आणि पापाच्या उदयाने गुणवानाला सुद्धा अपयश मिळते. ज्याचा प्रतिकार करता येत नाही, असे कर्म उदयास आल्यावर जन्म, जरा, मृत्यू, रोग, चिंता, भय, वेदना इत्यादी दुःखे भोगावीच लागतात. अशा अवस्थेत जीवाचे रक्षण करणारे कोणीच असे नाही की त्याच्या शरणी जाऊन तो रक्षण मिळवू शकेल. आपल्या कर्माच्या उदयाने अर्थात कर्मफल भोगावे लागू नये म्हणून त्यापासून वाचण्यासाठी पाताळात जरी प्रवेश केला तरी कर्मापासून सुटका होत नाही. पर्वताच्या गुंफेत, जंगलात, पर्वतावर, भूमीवर, समुद्रात इतकेच काय लोकाच्या टोकापर्यंत गेला तरी उदयास आलेल्या कर्मातून जीवाची सुटका नाही. दोन, चार अथवा अनेक पाय असलेले प्राणी जमिनीवरच चालतात अथवा राहतात. जलचर मत्स्यादी पाण्यातच राहतात, पक्षी आकाशातच जातात परंतु कर्म सर्वत्र पोहचते. जगात असा कोणताच प्रदेश नाही की जेथे कर्म पोहचत नाही. जेव्हा कर्मोदय होतो तेव्हा हत्ती, घोडे, रथ, योद्धा, साम, दाम, दंड, भेद इत्यादी कोणतेच उपाय शरणरूप होत नाही. कर्मोदय झाल्यावर विद्याधर, बलदेव, वासुदेव, चक्रवर्ती अथवा देवेंद्रासारखे महाबली, महापराक्रमी देखील कोणाला शरणरूप होत नाही. ते सुद्धा रक्षण करू शकत नाही. चालणारा प्राणी भूमी ओलांडून जाऊ शकतो, पोहणारा प्राणी समुद्र पार करू शकतो. परंतु उदयगत कर्माच्या फळाचे उल्लंघन कोणताच महाबली करू शकत नाही. ते सर्वांनाच भोगावे लागते. ज्याप्रमाणे एखाद्या सिंहाने हरणाला पकडले तर दुसरे हरीण त्याचे रक्षण करू शकत नाही त्याचप्रमाणे कर्म उदयास आल्यावर कोणीच शरणरूप होत नाही.[५५]

आचार्य शिवार्यांनी अशरणतेचे वेगळ्याच प्रकारे प्रतिपादन केले आहे. त्यांच्या सांगण्याचे तात्पर्य हेच आहे की जी सुखदुःखे आहेत ती शुभाशुभ कर्माच्या फलस्वरूपी जीवात्म्याला प्राप्त होतात आणि 'कडाण कम्माण न मोक्ख अत्थि' केलेल्या कर्माला भोगल्याशिवाय कदापी सुटका होत नाही. त्याला कोणीच शरण अथवा त्राण देऊ शकत नाही. जन्ममरणाचे मुख्य कारण 'कर्म' आहे. यामध्ये कर्माच्या परिणामांची चर्चा विशेषरूपाने केली आहे.

आचार्य समन्तभद्र[५६] यांनी लिहिले आहे की ज्याप्रमाणे उदयास आलेल्या सूर्याला प्रतिबंध करण्यास कोणीच समर्थ नाही त्याचप्रमाणे उदयास आलेल्या कर्माला प्रतिबंध करण्यास कोणीच समर्थ नाही. कोणालाही शरण गेलो तरी कोणीच रक्षण करण्यास

सक्षम नाही असे समजून साम्यभावाची शरण ग्रहण केल्याने अशुभ कर्माची निर्जरा होईल आणि पुढे नव्या कर्माचा बंध होणार नाही. रोग, वियोग, दारिद्र्य, मरण इत्यादींचे भय सोडून धैर्य धारण केले पाहिजे.

वीतराग भाव, संतोषभाव आणि साम्यभाव हेच सर्वदुःखाचा नाश करतील. आपण शरण जाण्यायोग्य उत्तमक्षमा इ. आपल्याच आत्म्यात राहणारे भाव आहेत. क्रोधादी परभाव इहलोकातील जीवनाचा घात करतात. कषाय मंद झाल्यावर इहलोकांच्या हजारो विघ्नांपासून जीवाला मुक्ती मिळते. अशा साम्यभावाला शरण जाणेच योग्य आहे.

जगात रोग निवारण करण्यासाठी औषधोपचार केले जातात आणि त्यामुळे अनेक वेळा रोग नष्टही होतात. परंतु कर्माचा उदय बलवान असेल तर औषधी सुद्धा गुणकारी न ठरता विपरीत फळ देण्यासाठी कारणीभूत होतात.

सांगण्याचा मतितार्थ हा आहे की असतावेदनीय कर्माचा उदय जेव्हा प्रबळ होतो तेव्हा औषध वगैरे उपचारसुद्धा विपरीत परिणाम करतात. जेव्हा असता वेदनीय कर्माचा उदय मंद होतो किंवा उपशम होतो तेव्हा कोणताही उपाय लागू होतो. कारण कमी शक्ती असणाऱ्याचा प्रतिकार एखादी दुर्बळ व्यक्तीसुद्धा करू शकते. ती बलवानाचा प्रतिकार करू शकत नाही. वर्तमान काळात शुभ कर्म उदयास आणण्यायोग्य बाह्य सामग्री अत्यंत कमी आहे आणि अशुभ कर्माला उदयास आणण्यासाठी लागणारी सामग्री विपुल आहे म्हणून अल्प सामग्री, अल्पज्ञान, अल्पपुरुषार्थाने असाता कर्माच्या उदयाला कसे जिंकावे ?

एखाद्या मोठ्या नदीचा प्रवाह जोरात, वाकड्या तिकड्या मार्गाने वाहू लागला आणि त्यात कोणी उत्तम पोहणारा असला तरी त्या प्रवाहाच्या उलट्या दिशेत पोहू शकणार नाही. परंतु जर तो प्रवाह मंद असेल तर पोहण्याची कला जाणणारा मनुष्य त्याच्यातून पार होऊ शकतो असे पाहता साधकाने सतत असा विचार केला पाहिजे की प्रबळ कर्माचा उदय झाल्यावर मला कोणीच वाचविणारा नाही. या जगात पृथ्वी आणि समुद्र हे दोन पदार्थ सर्वात मोठे आहेत. त्यात पृथ्वीला प्रदक्षिणा करणारे आणि समुद्र तरून पार करणारे खूप आहेत. परंतु कर्माच्या उदयाने तरणारे कोणी दिसत नाही. संसारामध्ये उत्तमक्षमा, मार्दव इत्यादी दहा धर्मामुळे अनेक दुःखे, अपमान नष्ट होतात. मंद कषायाने सुख, आत्मरक्षण, निर्मळ किर्ती, उच्चस्थान इत्यादी अनेक प्रकारची सुखसामग्री प्राप्त होते. त्याचे प्रत्यक्ष फळ आहे असे समजून त्याचीच शरण घेतली पाहिजे. व्यवहारामध्ये प्रत्येक जीवाने

चार पदार्थांना शरण जायला पाहिजे. अरिहंत देव, सिद्ध, परमात्मा, निष्परिग्रही साधू आणि केवली प्ररूपित दयामय धर्म यांना शरण गेल्याशिवाय आत्मा निर्मळ होणार नाही.[५७]

मनुष्याला व्यवहार पूर्ण करण्यासाठी लौकिक शरण ग्रहण करावी लागते परंतु ते केवळ सामान्य आवश्यकतेचीच पूर्ती करू शकतात. शाश्वत सिद्धी मिळविण्यासाठी तर त्यांचीच शरण घेतली पाहिजे, ज्यांनी स्वतः ती सिद्धी प्राप्त केली आहे.

आचार्य अकलंकदेव यांनी दोन प्रकारच्या शरणांचे वर्णन केले आहे. लौकिक आणि लोकोत्तर. ती प्रत्येकी जीव, अजीव आणि मिश्र यांच्या भेदाने तीन तीन प्रकारची आहे.

राजा अथवा देवता इत्यादी लौकिक जीव शरण आहे. कोट किल्ले इत्यादी लौकिक अजीव शरण आहे आणि गाव, नगर इत्यादी लौकिक मिश्र शरण आहे.

पंचपरमेष्टी लोकोत्तर जीव शरण आहे, त्यांचे प्रतिबिंब इत्यादी लोकोत्तर अजीव शरण आहे आणि धर्मोपकरणसहित साधू लोकोत्तर मिश्र शरण आहे.[५८] परंतु जन्म, जरा, रोग, मृत्यू, प्रिय वियोग, अप्रिय संयोग इत्यादी दुःखामध्ये परिभ्रमण करणाऱ्या जीवाला कोणीच शरण नाही. ज्याला तो आपले मानतो असे शरीर सुद्धा परिपुष्ट असेल तरच तो भोजन करू शकतो. अपरिपुष्ट दुःखी आणि रोगी शरीर भोजनही करू शकत नाही. त्याचप्रमाणे प्रयत्नाने संचित केलेले धन, वैभव भवांतरात बरोबर येत नाही. ज्यांनी सुखाला आणि दुःखाला समान रूपात वाटून घेतले आहे असे मित्र सुद्धा मृत्यूच्या वेळी रक्षण करू शकत नाही. केवली प्ररूपित धर्मच ह्या दुःखरूपी महासागराला पार करण्यासाठी उपायरूप आहे. तोच मित्र आणि तोच नेहमी बरोबर राहणारा आहे. अन्य कोणीच शरणरूप नाही. अशाप्रकारे भावना म्हणजे अशरण अनुप्रेक्षा आहे. मी नेहमी अशरण आहे असा विचार करून जीव अतिशय उद्विग्न होतो आणि त्याला संसाराला कारणभूत पदार्थामध्ये ममत्व राहत नाही. आणि तो सर्वज्ञ प्रणीत मार्गातच प्रयत्नशील राहतो.[५९]

मनुष्य ज्याला अत्यंत सुखी आणि उच्च स्थानीय मानतो ते कोणीच स्वतःला या विक्राल काळापासून वाचवू शकत नाही.

या संसारामध्ये देवांचा राजा 'इंद्र' त्याचाही विनाश होतो आणि जेथे हरिहर ब्रह्मा इत्यादी देवसुद्धा काळाचे ग्रास होतात.[६०] ज्यांची फार मोठी शक्ती मानली जाते त्यांच्यासमोर मनुष्याची तर गणनाच काय ?

जर मरणाऱ्या मनुष्याला देव, मंत्र, तंत्र, क्षेत्रपाल इत्यादी वाचवू शकले असते तर मनुष्य अमर झाला असता. या संसारात मंत्र, तंत्र, तोटके इत्यादी करणाऱ्यांना आपण पाहतोच.[६१] परंतु ही सर्व साधने वास्तविक पाहता निरर्थक सिद्ध होतात. प्राण्याला वाचविण्यासाठी हे शरणरूप नाहीत. परंतु मिथ्यात्वाच्या अंधकाराने व्याप्त जीव हे समजू शकत नाही. आता पाचवा दुःखम आरा चालू आहे. या विषमकाळात प्रत्येक जीव कोणत्या ना कोणत्या दुःखाने, कष्टाने, त्रासाने विघ्नबाधेने गुरफटलेला आहे. ह्यातून सुटण्यासाठी पाण्याच्या शोधात भटकणाऱ्या मृगतृष्णेप्रमाणे व्यक्ती भटकत राहते. कधी मिथ्यादृष्टी देवीदेवांच्या शरणी जाते आणि नवसाच्या भ्रमात भ्रांत होऊन त्यांच्याभोवती फिरत राहते. कधी पीर-फकीर यांच्या कब्रेवर, तर कधी मुल्लाच्या हातकंड्यात, कधी लोभी, लालची, दंभी भविष्य वक्त्यांच्या तावडीत फसते, तर कधी हकीम, वैद्य, डॉक्टरांच्या चक्रामध्ये हरलेल्या जुगाऱ्याप्रमाणे असा फसते की त्यातून सुटूही शकत नाही उलट समस्या अधिकच वाढत जाते.

अर्धज्ञानी, लोभी, स्वार्थी व्यक्ती ज्यांचे दर्शन व ज्ञान मिथ्या आहे अशा अनंतानुबंधी कषाययुक्त मिथ्यादृष्टी देवी-देवता काही कारणास्तव रुष्ट झाले तर आपल्या भक्ताचा सर्वनाश करण्यासाठी तयार होतात. असे झाल्याने धर्मश्रद्धा भ्रष्ट होते. यामुळे व्यक्ती भ्रमित होते. या सर्व गोष्टी लक्षात ठेवून आपली सद्गती इच्छिणाऱ्या महानुभावांनी सर्व मिथ्यादृष्टी मानव अथवा देवीदेवता यांची कधीच शरण घेऊ नये. परंतु ह्यांपासून नेहमी वाचण्यासाठी सतत जागृत राहिले पाहिजे.

सम्यगदृष्टी ज्यांना आहे त्यांच्यावरच श्रद्धा ठेवली पाहिजे. अशा व्यक्ती विवेकी असतात, खरा मार्ग दाखवितात, ते सर्वांच्या कल्याणाची भावना ठेवतात म्हणून अशा लोकांची शरण ग्रहण केल्याने आपले भले होते.[६२]

जो अन्य वस्तूला शरण न मानता, भोगेच्छारूपी निदान बंध इत्यादीपासून अलिप्त स्वात्मज्ञानामुळे उत्पन्न होणाऱ्या सुखरूपी अमृताचा धारक असणाऱ्या स्वतःच्या शुद्धात्म्याचा अवलंब करून त्याचीच भावना करतो. जसे आत्म्याला शरणरूप मानून भावित होतो तसेच सर्वकाळात शरणभूत आणि शरण आलेल्यांसाठी वज्राच्या पिंजऱ्याप्रमाणे स्वशुद्धात्म्याला प्राप्त होतो.[६३]

वज्र जसे शक्तिशाली असते तसेच शुद्धात्म्याला शरण गेल्यानंतर त्याचे कोणीच काही अनिष्ट करू शकत नाही. बाह्यपदार्थ कितीही प्रभावी, शक्तियुक्त आणि अमूल्य

असले तरी मृत्युमुखातून वाचविण्यासाठी कोणीच समर्थ नाही. दुसऱ्यांचा मृत्यू झाल्यानंतर मूर्ख मनुष्य स्वकर्माने मृत्यूकडे जाणाऱ्या स्वजनांना, कुटुंबातील लोकांना यमाद्वारे नेताना पाहून शोक करतात. परंतु ते हा विचार करीत नाही की एक दिवस आपल्याला सुद्धा अशाप्रकारे नेले जाईल.[६४]

हेमचंद्राचार्य इथे एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट सांगतात की जेव्हा दुसऱ्यांना मरताना पाहिले जाते तेव्हा ही गोष्ट स्पष्ट आहे की त्यांचे मृत्यूपासून रक्षण करणारा कोणीच नाही. तेव्हा त्याच्या मनातही आले पाहिजे की त्याच्याबरोबरही असेच घडेल. परंतु ही गोष्ट त्याच्या लक्षात येतच नाही. हीच तर दुर्बलता आहे. या दुर्बलतेकडे मनुष्याचे ध्यान आकर्षित करून आपल्या खऱ्या स्वरूपाला पाहण्याची प्रेरणा दिली आहे. पुढे आचार्य लिहितात की एखाद्या भयानक वनात मृगशावकावर सिंहाने आक्रमण केले तर त्याला कोण वाचवू शकतो ? त्याचप्रमाणे दुःखरूपी दावाग्नीच्या जळत्या ज्वालेत दग्ध होणाऱ्या संसारात पडलेल्या मनुष्याला कोणीच त्राण देऊ शकत नाही.[६५]

दुःख दावानाल, जळत्या ज्वाला अशा शब्दांचा प्रयोग करून आचार्यांनी मनुष्यांच्या समोर संसाराचे असे भयंकर चित्र अंकीत केले आहे की ज्यामुळे मानव वास्तविकतेला समजू शकेल आणि अनुभवू शकेल की तो स्वतःला जितका सुरक्षित आणि सशरण मानतो ती त्याची भ्रांती आहे.

हे जीवांनो ! तुमच्याजवळ जेव्हा धनाचा विपुल संग्रह असतो तेव्हा सर्व लोक मनात विचार करतात की हे आपल्याला सहयोग करतील. परंतु तुमच्यासमोर जेव्हा ते येऊन उभे राहतात तेव्हा कोणी काहीच देत नाही. जेव्हा मृत्यूची वेळ येते तेव्हा समुद्रात जहाजातून च्यूत झालेल्या प्राण्याला कोणी शरणरूप नाही त्याचप्रमाणे मृत्यूपासून वाचविण्यासाठी त्याला कोणी शरणरूप होत नाही.[६६]

सर्व जीवसमुहाचे रक्षण करण्यात वत्सल, महान आणि करुणारसाने परिपूर्ण जिन वचन आहे. एका श्री जिन वचनाशिवाय अन्य मंगलाने, मंत्रपूर्वक स्नान केल्याने मंत्रित चूर्णाने मंत्राद्वारे आणि वैद्यांच्या विविध औषधींनीसुद्धा रक्षण होत नाही. अशाप्रकारे संसारात कोणतीच वस्तू शरणरूप नाही.[६७] म्हणूनच दुःसह नेत्रवेदनेने व्याकूळ शरीर असणाऱ्या, पूर्वी दिव्य यौवनाला प्राप्त करणारे, बुद्धिमान, कौशाम्बीच्या धनिक पुत्राने सर्व स्नेही संबंधाचा त्याग करून संयमाचा स्वीकार केला. याचे वर्णन उत्तराध्ययन सूत्राच्या विसाव्या अध्ययनामध्ये केलेले आहे. गुणसुंदर जे पुढे मुनी झाले, ते अनाथीमुनींचे पिता कौशाम्बी

नगरीत संपत्तीने कुबेरापेक्षाही अधिक धनवान होते. महान ऋद्धी सिद्धी होती, विशाल परिवाराने युक्त जगामध्ये प्रसिद्ध होते. तरी त्यावेळी यौवनाच्या प्रारंभीच अनाथीमुनीला कठोर नेत्रवेदना झाली आणि शरीराची आग होऊ लागली अर्थात शरीरामध्ये जणू तीक्ष्ण बाण भ्रमण करीत आहेत. किंवा वज्रमाराप्रमाणे अत्यंत भयंकर नेत्रवेदनेमुळे ते परवश झाले. अनेक मंत्र, तंत्र, विद्या आणि चिकित्साशास्त्राच्या तज्ञ लोकांनी चिकित्सा केली परंतु त्यांना आराम मिळाला नाही. त्यांच्या वडिलांनी सर्वस्व लुटवणे स्वीकार केले. आई, भाऊ, बहीण, स्त्री, मित्र इत्यादी सर्व स्वजनसमूह भोजन, पाणी, विलेपण, आभूषण इत्यादी प्रवृत्ती सोडून दुःखी मनाने अश्रू ढाळत कर्तव्यशून्य होऊन त्याच्याजवळ बसून राहिले. परंतु थोडीदेखील चक्षुवेदना कमी होऊ शकली नाही.

तेव्हा गुणसुंदर विचार करू लागला, ''अहो ! मला कोणीच शरणरूप नाही.'' पुन्हा पुन्हा असे चिंतन करून त्यांनी प्रतिज्ञा केली की जर मी वेदनेतून मुक्त झालो तर सर्व स्वजनांना सोडून साधूधर्म स्वीकारीन. अशी प्रतिज्ञा केल्यानंतर त्यांना रात्री शांत झोप लागली, वेदना शांत झाली आणि ते स्वस्थ झाले. त्यानंतर सूर्योदय होताच त्यांनी स्वजनांची आज्ञा घेऊन सर्वज्ञ कथित संयमाची सम्यक चारित्र्याची शरण स्वीकारली. ही गोष्ट अनाथीमुनी श्रेणिक महाराजांना सांगताना समजावतात की, 'हे नर श्रेष्ठा ! अशा दुःखसमुहाने गुरफटलेल्या जीवाला श्री जिनेश्वर प्रभूंच्या धर्माशिवाय अन्य कोणी रक्षण किंवा शरण नाही. म्हणून मी भर यौवनावस्थेत संयम घेतले.'

अनाथीमुनी आणि श्रेणिकमहाराजांचा वार्तालाप तिसऱ्या प्रकरणात घेतलेला आहे. या दृष्टांताने हे स्पष्ट होते की भयंकर व्याधीमध्ये जिनेश्वरांच्या चरणांची शरणच आधारभूत होते. धन, वैभव, आई, वडील, पत्नी, भाऊ, बहीण, नातेवाईक हे कोणीच शरण होऊ शकत नाही.

हे संसाररूपी वन रक्षकविहिन आहे. त्यात उदयकाळरूपी पराक्रमाने संयुक्त अशा कर्मरूपी व्याघ्राने ग्रहण केलेला हा मनुष्यरूपी पशू, ''ही माझी प्रिया आहे, हा पुत्र माझा आहे, हे द्रव्य माझे आहे आणि हे घर सुद्धा माझे आहे'' अशाप्रकारे 'माझे-माझे' करत मृत्यूला प्राप्त होतो.[६८]

ज्याप्रमाणे वनामध्ये सुगंध प्राप्त होताच चित्ता किंवा अस्वलाद्वारे पकडल्या गेलेल्या बकरी इत्यादी पशूंचे रक्षण करणारा तेथे कोणीच नाही. तो मैं, मैं शब्द करून मरण पावतो त्याचप्रमाणे ह्या संसारामध्ये कर्माधीन प्राण्यांची सुद्धा मृत्यूपासून रक्षा करणारे

कोणीच नाही. तरी मोहवश मनुष्य मृत्यूकडे ध्यान न देता स्त्री, पुत्रादी बाह्यपदार्थ, जे कधीच आपले होऊ शकत नाही त्यांच्यात ममत्त्वबुद्धी ठेवून 'मैं, मैं' अर्थात 'हे माझे, हे माझे' करत करत व्यर्थ संक्लेशाला प्राप्त होतो. मृत्यू आल्यानंतर त्याचे काहीच राहत नाही.

जे कार्य करता करता मनुष्याचे शरीर गळून जाते, सत्त्वहीन होते आणि इच्छित पदार्थ प्राप्त करण्यासाठी तो असे मानतो की ते आपल्या हातातच आहे. अशा मनुष्याच्या तृष्णेला प्राणाप्रमाणेच बलपूर्वक नष्ट करण्यासाठी तत्पर असणाऱ्या दैवाला तिन्ही लोकात कोणाच्याही कडून अवरुद्ध करता येत नाही, त्याचप्रमाणे प्राणांचे हरण करणाऱ्या मृत्युलाही कोणीच अडवू शकत नाही.[६९]

मनुष्याची आशा आकाशाप्रमाणे अनंत असते त्याला पूर्ण करण्यासाठी तो अनेक देवी-देवतांची आराधना करतो परंतु पूर्वकृत कर्माचा उदय त्याच्या आशेवर पाणी फिरवून टाकतात. दैव आणि मृत्यू दोघांना अडविणे असंभव आहे. तेव्हा रक्षणासाठी दुसऱ्यांच्या समोर लाचार बनून हातापाया पडणे अथवा आपल्याला अशरण मानून शोक करणे व्यर्थ आहे. अशावेळी धैर्यच ठेवले पाहिजे.

चक्रवर्ती इंद्र आणि योगेंद्रसुद्धा मृत्यूला टाळण्यास समर्थ नाहीत याविषयी पंडित आशाधर म्हणतात की, 'संपूर्ण पृथ्वीचे स्वामी चक्रवर्ती राजासमोरही यमराज काही आपल्या विक्राल स्वरूपाला व्यक्त करीत नाही का ? आणि काय सुदीर्घ काळापासून चालत आलेल्या प्रिय पत्नीच्या मरणाने इंद्र दुःखी होत नाही का ? अरे, इतकेच काय सांगावे ज्यांच्या तपाचा प्रभाव जगात प्रसिद्ध आहे ते तपस्वी योगी सुद्धा काळरूपी सर्प अथवा वाघाच्या दाढेला नष्ट करण्यात समर्थ नाहीत. म्हणूनच ह्या बाह्य वस्तूचा मुमुक्षू मोह करीत नाही कारण त्या बाह्य वस्तू माझे काहीच बिघडवत नाही किंवा काही सुधारणा करीत नाही.

जे सहा खंडाचे अधिपती आहेत असे चक्रवर्ती समोर असतानासुद्धा त्यांच्या पुत्रांचा मृत्यू होत नाही का ? त्यांच्या अधिपत्याचे सुद्धा यमराजासमोर काहीच चालत नाही.

इंद्राचे आयुष्य सागरोपम प्रमाण असते आणि त्यांच्या राणींचे- इंद्रायणीचे आयुष्य 'पल्योपम प्रमाण' असते. ज्याप्रमाणे समुद्रामध्ये तरंग उठतात आणि नष्ट होतात त्याचप्रमाणे इंद्राच्या सागरोपम प्रमाण आयुष्यासमोर इंद्रायणीचे पल्योपम प्रमाणाचे आयुष्य

उत्पन्न होऊन नष्ट होते. हे इंद्र समजत असूनही त्यांच्या मरणाने दुःखी होतात. परंतु काळाचा प्रतिकार इंद्र आणि चक्रवर्तीसुद्धा करू शकत नाही. असे वाटते तपस्वी तरी काळाचा प्रतिकार करू शकत असतील. परंतु ते सुद्धा प्रतिकार करू शकत नाही. जे तत्त्वज्ञ महर्षी आहेत ते विचार करतात की बाह्य वस्तू शरीराचा जर मृत्यू होत असला तरी आत्मा तर शरीरापासून वेगळा आहे, नित्य आहे, आनंदमय आहे त्याला काहीच होत नाही.

इष्टोपदेशाच्या एकोणतिसाव्या श्लोकामध्ये अत्यंत सुंदर सांगितले आहे - ''माझा मृत्यू होत नाही तर त्याने भय का ? मला व्याधी होत नाही तर मग कष्ट का ? मी बालक नाही, वृद्ध नाही, तरुण नाही ही सर्व परिवर्तने तर पुद्गलाच्या शरीराची आहेत.''

असे चिंतन केल्याने 'मी नित्यशरणरहित आहे' असे समजून जीव सांसारीक भावामध्ये ममत्व ठेवत नाही आणि सर्वज्ञ प्ररूपित धर्मावर अनुराग ठेवतो, त्यांची शरण ग्रहण करतो.

पंडित आशाधर यांनी चक्रवर्ती इंद्र आणि योगेंद्र यांसारख्या उदाहरणांद्वारे मुमुक्षूला प्रेरणा दिली आहे की हा काळ केव्हा कोणाला ग्रास करून टाकेल ह्याचा भरवसा नाही.

हा काळ तिन्ही जगाला जिंकणारा अद्वितीय सुभट आहे कारण ह्याच्या केवळ इच्छेनेच क्षणात देवांचे इंद्र स्वर्गातून च्यूत होतात.[७०] त्यापुढे आचार्य शुभचंद्र यांनी अत्यंत सुंदर लिहिले आहे की, 'दुसऱ्यांचा मृत्यू झाल्यावर मूर्ख लोक शोक करतात परंतु स्वतः देखील यमराजाच्या दाढेत येऊन पोहचला आहे असा विचार करीत नाही आणि जेव्हापासून जीव गर्भावस्थेत येतो तेव्हापासून सतत आयुष्य कर्म जीवाला आपल्या भवनापासून यममंदिराजवळ नेत जातो हे सर्व माहित असतानाही विश्वास होत नसेल तर हे प्राणीमात्रांनो, यमराजाच्या आज्ञेचे उल्लंघन ज्यांनी केले आहे अशा एखाद्या बलवान पुरुषाला जर तुम्ही पाहिले असेल किंवा ऐकले असेल तर तू त्यांची सेवा कर म्हणजे त्यांची शरण घेऊन निश्चित होऊन राहा. आणि जर असा कोणी बलवान पुरुष बघितला नसशील किंवा ऐकला नसशील तर मग खेद करणे व्यर्थ आहे.

दुसऱ्यांची आपत्ती बघून हे समजत नाही की ही वेळ माझ्यावरही येईल. असंख्य प्राण्यांनी भरलेले जंगल जेव्हा जळते तेव्हा झाडावर बसलेला मनुष्य म्हणतो की, बघा ! हे सर्व प्राणी जळत आहेत परंतु हा विचार करीत नाही की जेव्हा हा वृक्ष जळेल तेव्हा मी सुद्धा असाच जळून जाईल. हा काळ समदर्शी आहे. बालक, वृद्ध, धनी, दरिद्र वीर

आणि मित्रा सर्वांना तो समानरूपात ग्रासतो.[७१]

ह्या काळाच्या पंज्यातून सुटण्यासाठी पाताळामध्ये, ब्रह्मलोकात, इंद्रभवनामध्ये समुद्रात, वनात, दिशेत, पर्वतांच्या शिखरावर, अग्नीत, पाण्यात हिमालयामध्ये वज्रनिर्मित स्थानामध्ये तलवारधारी, पहारेकरी जरी गढ आणि कोटमध्ये लपून राहिला तरी तो वाचू शकत नाही. असा हा काळ दुर्दांत आणि दुर्निवार आहे.[७२] मानवाला आपल्या सत्य स्थितीचा बोध करविण्यासाठी आचार्यांनी एकदम स्पष्ट शब्दात जे सांगितले आहे. त्याचे एक एक अक्षर प्रेरणेने परिपूर्ण आहे.

उपाध्याय विनयविजयजी लिहितात की जेव्हा मनुष्य यमराजाच्या वशीभूत होतो, मरू लागतो तेव्हा त्याचा प्रताप नष्ट होतो. उदित तेज नष्ट होते. धैर्य आणि पुरुषार्थाचा विलय होतो, परिपुष्ट शरीर शिथिल होते आणि त्याचे स्वजन त्याच्या संपत्तीला हडपण्यासाठी प्रयत्नशील होतात. मृत्यूच्या समोर मनुष्य एकदम नगण्य बनतो ही मनुष्याची घोर अशरणता आहे.[७३]

जसे कोळी लोक वेगवेगळ्या प्रकारच्या माशांना पाहता पाहता पकडतात तसेच यमराज त्या राजा-महाराजांना, ज्यांच्याजवळ चतुरंगी सेनेचे अनुपम बळ आहे त्यांनाही पकडून नेतो. तर मग तुम्ही जरी दीर्घकाळापर्यंत प्राणायम करून श्वासनिरोध केला किंवा समुद्राच्या पलीकडे जाऊन बसला किंवा पर्वताच्या शिखरावर चढला तर एक दिवस हा देहरूपी पिंजरा जराजीर्ण होईल. सुंदर काळ्या केसांनी सुशोभित मस्तकाला पांढरे करणारी 'जरा-वृद्धावस्थेला थांबविण्यात कोणीच समर्थ नाही. राहूचा त्रास चंद्र एकटाच सहन करतो. आपला त्रास आपल्यालाच सहन करावा लागेल. कोणीही तो वाटून घेऊ शकणार नाही. हे आत्मन ! हे समजून दान, शील, तप, भावरूप धर्माची शरण स्वीकार. समतेने शत्रूचे ममत्व सोडून शिवसुखाचे निधानस्वरूप शांतसुधारसाचा आस्वाद घ्या. तो शाश्वत शांती देईल.[७४]

श्री जयसोममुनी यांनी अत्यंत स्पष्ट उदाहरण देऊन जीवाच्या अशरणतेचे दिग्दर्शन केले आहे.

सुभुम चक्रवर्ती चर्मरत्नाने निर्मित जहाजाबरोबर समुद्रात बुडून गेले. त्या जहाजाला उचलणारे सोळा हजार रक्षक देव पळून गेले. परंतु कोणीच त्यांना वाचवू शकले नाही. अतिलोभामुळे त्यांची इज्जत गेली आणि प्राणसुद्धा गेले. इतक्या विशाल परिवारामधून कोणीच शरणरूप झाले नाही.

द्वैपायनऋषी जे तापसदेव झाले त्यांनी द्वारकानगरीला जाळून टाकली. परंतु बलशाली श्रीकृष्णवासुदेव आणि बलरामासारखे मोठे मोठे सम्राट राजे असताना सुद्धा ते काहीच करू शकले नाहीत. परंतु ज्यांनी भगवान नेमिनाथ स्वामींची शरण घेतली ते शाश्वत धामी पोहचले.[७५]

स्वतः कृष्णमहाराजांचे चक्ररत्न आणि हलधरांसारखा भाऊसुद्धा सहायता करू शकला नाही. एक बाण लागताच कृष्णाच्या देहाचा विनाश झाला.[७६]

सांगण्याचे तात्पर्य हे आहे की कोणी कोणाच्या दुःखाला वाटून घेऊ शकत नाही. ''अन्नरस दुक्खं अन्नो न परियाइयति''[७७]

जेव्हा मनुष्यावर दुःख येऊन कोसळते तेव्हा तो लहानसे तोंड करून चहूकडे दीनपणे आश्रय शोधतो. परंतु कोठेच काही स्थान दिसत नाही.[७८]

ह्या जीवाने अनंतकाळापासून संसारात परिभ्रमण करता करता वेगवेगळ्या गतीमध्ये अनंत जीवांची शरण घेतली. सैनिक झाला तर राजाची शरण घेतली, नोकर झाला तर मालकाचे हुकूम स्वीकारावे लागले. नारक झाला तर परमाधामीदेवा समोर लाचारी दाखवली, पुत्र झाला तर पित्याची आज्ञा स्वीकारावी लागली, पत्नी झाला तर पतीची आज्ञा स्वीकारली. परंतु दुःखाची गोष्ट तर ही आहे की अनंत जीवांमधून एका जीवाची सुद्धा शरणागती आपल्याला सुरक्षित ठेवू शकली नाही, कारण ते जीव स्वतःच असुरक्षित होते, त्यांचे स्वतःचेच आस्तित्व धोक्यात होते. त्यांची संपत्ती लुटली जाण्याची शंका होती. मृत्यूच्या भयाने सर्वजण आपले जीवन व्यतीत करीत होते. असे असुरक्षित आत्मे दुसऱ्यांना सुरक्षित कसे करतील ? वाळूचे घर तुफानात दुसऱ्यांना आश्रयरूप कसे बनू शकतील ? ह्या जीवाने स्वतः आपल्या सुरक्षिततेसाठी अनेक जन्मात अनेक सुविधा केल्या. मुंगीच्या जन्मात सुरक्षेसाठी वारूळ बनविले. परंतु गाडीचे चाक त्याच्यावर फिरले आणि जीव असुरक्षित झाला. पशूच्या जन्मात गुफा बनवली. परंतु भुकंपाच्या एका धक्काने गुफा तुटून गेली, जीव असहाय झाला. मनुष्याच्या जन्मात सुरक्षितेसाठी संपत्तीचा संग्रह केला. सर्व सुविधांनी युक्त बंगला, गाडी, नोकर-चाकर ठेवले आणि स्वतःला सुरक्षित समजू लागला. परंतु मृत्यूमुखातून स्वतःला वाचवू शकला नाही.

देव भवामध्ये आकर्षक विमानात वेडा झाला. परंतु तेथील आयुष्य पूर्ण होताच तेथून काढून टाकले. प्रत्येक जन्म असहायदशेत पूर्ण केले. प्रत्येक जन्म अनाथ म्हणूनच घालवले तरी जीवात्मा बाह्य वस्तूतच आपली सुरक्षितता मानतो ही त्याची किती मोठी भ्रांती आहे.

छिद्रमय हो नाव डगमग चल रही मझधार में ।
दुर्भाग्य से जो पड गई दुर्दैव के अधिकार में ॥
तब शरण होगा कौन जब नाविक डुबा दे धार में ।
संयोग सब अशरण, शरण कोई नहीं संसार में ॥७९

छिद्रयुक्त जहाज समुद्राच्या मध्यभागी चालत आहे, दुर्भाग्याने दुर्दैवाच्या अधिकारात पडली आहे. जेव्हा नाविक स्वतःच त्या जहाजेला बुडविण्यास तयार झाला आहे तर दुसरे कोण त्याला वाचवू शकणार ? हे स्पष्ट समजण्यासारखेच आहे की सर्व संयोग अशरण आहे. ह्या संसारात कोणी शरणरूप नाही. जर बाह्य संयोग शरणरूप झाले असते तर ज्यांच्याजवळ धनाचे खजिन भरलेले होते असे जीव अनादी काळचे धनी सर्व ह्या भूतलावरच राहिले असते. परंतु असे कधीही झाले नाही आणि होणार नाही. राजपाट सर्वकाही सोडून जीव एकटाच निघून जातो. त्याला कोणी आपले आयुष्य देऊ शकत नाही. दहाही दिशांना आपली दृष्टी पसरवून कणाकणामध्ये पाहिले तरी कोणी रक्षक होऊ शकेल अथवा ज्यांच्या शरणी मृत्यूचे निवारण होऊ शकेल असा कोणीच दृष्टीगोचर होत नाही.८०

ज्यांनी चार घाती कर्माचा संहार केला आहे, मोहांध जीवाला ज्यांनी धर्म प्रदीप दिला आहे, जे सर्वज्ञ आहेत, विश्वाचे उपकारक आहेत, ह्या जगाचे तारक आहेत, ह्या जगात केवळ तेच शरणरूप आहेत. कालजयी सिद्ध भगवान, साधू आणि जैन धर्म ह्यांची शरण अनुपम मंगलकारी आहे. ह्या भवसागरामध्ये ह्यांच्या शिवाय दुसरे कोणीच शरणरूप नाही.

अशरण भावनेमध्ये जगातील सर्व पदार्थांच्या अशरणतेचे वर्णन केलेले आहे. जे भौतिक पदार्थ स्वतः असुरक्षित आहेत ते दुसऱ्यांचे रक्षण करू शकत नाहीत. मनुष्याला हे सर्व समजते. परंतु व्यवहारामध्ये आपण असे पाहतो की मुलांमध्ये भांडण होतात आणि एखाद्या मुलाला दुसऱ्या मुलाने मारले तर तो मुलगा रडत रडत आपल्या आईवडीलांच्या शरणी जातो. ते आपल्या मुलाला शांत करून दुसऱ्या मारणाऱ्या मुलाला शिक्षा करतात. एखादा रोगी रोगाने ग्रस्त, दुःखी होतो तेव्हा तो परोपकारी वैद्य, हकीम किंवा डॉक्टर यांच्या शरणी जातो. तो वैद्य औषध देऊन रोग्याचा रोग दूर करतो. रोग्याला शांतता मिळते. चोर लुटऱ्यांच्या त्रासाने दुःखी प्रजा राजाला शरण जाते. राजा त्यांचे दुःख ध्यानपूर्वक ऐकून दूर करण्याचा प्रयत्न करतो. कोणी राजा युद्धात पराजित झाला तर

आपल्याकडून मोठ्या राजाला शरण जातो. तो समर्थ राजा शरण आलेल्या राजाला सहायक होऊन संकटातून त्याला वाचवितो. पैशाच्या अभावामुळे गरीब व्यक्ती कोण्या दात्याच्या शरणी जाते. तो दाता त्याला आश्रय देऊन त्याचे कष्ट दूर करतो. अशाप्रकारे जगामध्ये लहान लहान दुःखातून वाचविणारे आणि आश्रय देणारे मिळतात.

प्रश्न असा पडतो की जेव्हा आश्रयाने जीवन चालते, एक दुसऱ्याच्या आधाराशिवाय जीवन चालणे कठीण आहे तर आपल्याला अशरण कसे मानावे ? ह्याचे समाधान असे आहे की हे सर्व शरण क्षणिक आहेत. ते क्षणभरच आश्रय देऊ शकतात आणि त्याने समाज, कुटुंब यांचा संबंध टिकून राहतो. ह्यांना अशरण मानून त्यांचा संबंध तोडण्याची गोष्ट इथे सांगितली नाही. इथे तर सर्व लेखकांचे आणि आत्मार्थी लोकांचे, ज्यांनी स्वतः अनुभव घेतला आहे अशा लोकांचे असे कथन आहे की जर शाश्वत शरण पाहिजे असेल तर शाश्वत वस्तूच्या शरण जावे. आणि ती शाश्वत वस्तू म्हणजे आपला आत्मा आहे. आपल्या आत्म्याला शरण जावे. अन्य कोणालाही शरण जाण्याची आवश्यकता नाही. जेव्हा संसारातील कोणतेही पदार्थ सहायक ठरत नाहीत, मृत्यू आपला जबडा उघडून समोर उभा ठाकतो त्यावेळेस उपरोक्त माता, पिता, डॉक्टर इत्यादी कोणीही शरणरूप होत नाहीत. म्हणून जे सत्य आहे, शाश्वत आहे त्यांचीच शरण घेणे, त्यांचेच चिंतन करणे म्हणजे अशरण भावना आहे.

संसार इतका विचित्र आहे की आज जे शरण देण्यास समर्थ आहेत ते सुद्धा स्वार्थवश तोंड फिरवताना दिसतात. सुखात सर्वजण साथ देतात, दुःखात मात्र कोणी कोणाचा सहायक होत नाही. अशावेळी मनुष्य दुःखी होतो. तो आत्महत्येचा सुद्धा विचार करतो. परंतु ज्यांनी अशरण भावनेचे नेहमी चिंतन केलेले असेल तो कधीही दुःखी होत नाही. कारण तो समजतो की हे सर्व संयोग क्षणिक आहेत आणि जे क्षणिक आहे ते शरणरूप कसे होऊ शकतील ? म्हणून शाश्वत आत्म्याचे चिंतन अनुभावन करणे अत्यंत आवश्यक आहे.

जो साधक साधनेला शरण जातो त्याला त्राण अथवा शरण प्राप्त होते. साधनेच्या शरणी जाणे काही सरळ आणि सोपे नाही. त्यात संपूर्ण समर्पण भाव असला पाहिजे. जसे एखादा रोगी डॉक्टरांना समर्पित होत नाही, डॉक्टरांच्या आज्ञेचे पालन करीत नाही आणि स्वच्छंदपणे खात असेल तर त्याने डॉक्टरांची शरण घेतली आहे असे म्हणता येईल का ? तो आजारातून मुक्त होऊ शकेल का ? आजारातून मुक्त होण्यासाठी सुद्धा

डॉक्टरांच्या संपूर्ण आज्ञेचे पालन करणे आवश्यक होते. तर भवरोग मिटविण्यासाठी सुदेव, सुगुरू आणि सुधर्माच्या आज्ञेचे पालन केल्याशिवाय, आपले जीवन त्यात समर्पित केल्याशिवाय भवभ्रमणापासून मुक्ती प्राप्त होणे अशक्य आहे. जो अरिहंत, सिद्ध, साधू आणि धर्माला शरण जातो तो स्वच्छंद होऊ शकत नाही. त्याने सतत ध्यानधारणा केली पाहिजे. मी ह्या चारांची शरण घेतली आहे. ह्या चारांशिवाय दुसरा कोणीही मला शाश्वत सुख देण्यास समर्थ नाही. कोणतेही संकट आले तर मनात एकच विश्वास ठेवला पाहिजे की ह्या सर्व संकटांना दूर करण्याची शक्ती ह्या चारांमध्येच आहे. असा समर्पण भाव असेल तरच भवपार होऊ शकेल. समर्पणाशिवाय नदी देखील पार करू शकत नाही. तर भवसागराची गोष्ट तर खूप लांबच राहिली. याचे एक सुंदर उदाहरण दिलेले आहे -

एक माणूस पोहायला शिकण्यासाठी पाण्यात उतरला. तो बुडू लागला. त्याला कोण्या एका दुसऱ्या व्यक्तीने बाहेर काढले आणि सांगितले उद्या परत ये. हळूहळू पोहावयास शिकशील. तो म्हणाला, ''आता मी तेव्हाच येईन जेव्हा मला पोहता येईल. जोपर्यंत पोहता येत नाही तोपर्यंत मी तलावाजवळ सुद्धा येणार नाही.'' आश्चर्यच आहे. पोहणे शिकायचे आहे आणि तलावाजवळ यायचे नाही. तर तो मनुष्य पोहण्यास कसे बरे शिकणार ?

बहुतांश लोक असेच म्हणतात की जोपर्यंत ध्यान करता येत नाही तोपर्यंत ध्यानच करणार नाही. अरे ! पाण्यात डुबकी मारल्याशिवाय जसे पोहणे अथवा तरणे शिकू शकत नाही त्याचप्रमाणे आत्म्यामध्ये डुबकी घेतल्याशिवाय आध्यात्मिक ज्ञान प्राप्त होऊ शकणार नाही. ''केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे.''

अशरण भावना ही चिंतन मननाची धारा आहे. यात डुबकी घेतल्याने, अवगाहन केल्याने व्यक्ती पराधिनतेपासून मुक्त होऊ शकते. जेव्हा व्यक्ती आपल्या स्वरूपाला समजू आणि बघू लागतो तेव्हा तिच्या लक्षात येते की विश्वामध्ये स्थित असलेले अनंत-ज्ञान, आणि, दर्शन, सुख आणि शक्ती या भाव, प्राण यांनी युक्त आहेत. सर्व स्वतःमध्ये स्वतंत्र आहे. आपल्या शक्तीचा विकास अथवा पतन ते स्वतःच करतात. कोणी तीर्थंकर अथवा सर्व शक्तिसंपन्न ईश्वरही कोणाच्या जीवनाचे परिवर्तन करू शकत नाही. म्हणून सर्वांनी स्वतःच स्वतःच्या शक्तीला जाणून, स्वतःच 'परभावापासून दूर होऊन किंवा पराधीनतेच्या भावनेतून मुक्त होऊन स्वतःमध्ये स्थिर झाले पाहिजे, स्वतःला शरण आले पाहिजे. तेव्हाच तो स्वतःचा संरक्षक होतो, स्वतःचे रक्षण करू शकतो आणि आपल्या शुद्ध स्वरूपाला प्राप्त करू शकतो.

अशरण भावना व्यक्तीच्या मनात अशी चेतना जागृत करते की सर्व दुःखाचे मूळ कारण परतंत्रता आहे, पराश्रय आहे. जोपर्यंत मन, वचन आणि शरीराचा संयोग आहे तोपर्यंत आपण 'पर'पासून सर्वथा मुक्त होऊ शकत नाही. पराश्रयाने मुक्त होण्याचा अर्थ इतकाच आहे की आपण 'पर' वस्तूलाच सर्वस्व मानून त्यावरच निर्भर राहू नये आणि त्याच्यावर ममत्व किंवा आसक्ती ठेवू नये. असे समजू नये की 'पर' पदार्थानेच माझे रक्षण होऊ शकेल. जो 'पर' पदार्थ किंवा परिजनांना आश्रयरूप मानून स्वतःला दुसऱ्यांच्या हाती सोपवून टाकतो तो आसक्त होऊन 'स्व'ला विसरून जातो. हीच अज्ञानता आहे आणि हेच दुःखाचे आणि जन्ममृत्यूचे मुख्य कारण आहे.

आज जगातील प्रत्येक व्यक्तीला नाथ बनण्याची इच्छा आहे. नेता बनण्याची तीव्र उत्कंठा होत आहे, आज मानव दुसऱ्यावर शासन करू इच्छितो. तो स्वतःचा नाही परंतु दुसऱ्याचा नाथ किंवा स्वामी बनण्याचे स्वप्न पाहतो. परंतु हे कसे शक्य होईल ? जो 'पर' प्रवाहामध्ये प्रवाहमान आहे, जो स्वरूपाने भिन्न पुद्गलांचा, भौतिक सुखांचा गुलाम आहे तो दुसऱ्याचा स्वामी, नाथ, नेता कसा होऊ शकेल ? हे कधीच संभवू शकत नाही की स्वतः विषय, वासना, विकार आणि तृष्णेने त्याचप्रमाणे त्याने उत्पन्न होणाऱ्या जन्मृत्यूच्या दुःखातून आणि भयापासून वाचविण्यास असमर्थ व्यक्ती दुसऱ्याला त्या दुःखातून वाचवू शकेल. स्वतः मृत्यूच्या भयाने भयभीत अन्य कोणालाही निर्भय बनवू शकत नाही.

जे साधक मृत्यूच्या भयातून मुक्त झाले आहेत, ज्यांनी विकारावर आणि आकांक्षेवर विजय मिळवला आहे, जे मन, इंद्रिय आणि क्षणिक सुखाचे गुलाम नाहीत, परंतु स्वामी झाले आहेत, ते निर्द्वन्द्व, निर्विकारी आणि निर्भय साधक दुसऱ्यांना निर्भय करण्यात सहायक होऊ शकतात.

म्हणून आगमामध्ये श्रमण भगवान महावीरांपासून आगमोत्तर काळात आणि आजपर्यंतचे विचारक संत म्हणतात की तुम्ही स्वतः स्वतःचे स्वामी बना, नेता बना, नाथ व्हा. परंतु 'पर'चे नाही. जो परक्याचा नाथ होण्याची इच्छा ठेवतो किंवा स्वतःला दुसऱ्याचा नाथ होण्यासाठी योग्य समजतो तो स्वतःच अनाथ आहे. हे आपण अनाथी मुनींच्या दृष्टांतामध्ये पाहिले.

दुःखी ते लोक होतात जे दुसऱ्यांचे दास आहेत, सेवक आहेत परतंत्र आहेत. दुःखातून मुक्त व्हायचे असेल तर स्वतंत्र होऊन चिंतन करा की संसारामध्ये कोणताच

असा 'पर' पदार्थ नाही की जो मला शरणरूप होऊ शकेल, माझे रक्षण करू शकेल. जेव्हा ही अशरण भावना जीवनामध्ये साकार रूप घेईल तेव्हा व्यक्तींच्या मनात पदार्थांची आसक्ती राहणार नाही. शरीराचा मोह राहणार नाही, कोणाबद्दलही ममत्व राहणार नाही आणि जेव्हा मोह, ममत्वाची आवरणे दूर होतील तेव्हा दुःख आणि क्लेशसुद्धा राहणार नाहीत. जीवनामध्ये निर्लेपता आणि जागृततेचा विकास होईल. परमार्थाच्या अनुचिंतनात मन एकाग्र होईल. सत्यनिष्ठ धर्माचा जीवनात उपयोग होईल, आणि आपल्या आत्मशक्तीचा विकास होईल. हे ह्या भावनेच्या चिंतनाचे फळ आहे.

ह्या भावनेच्या चिंतनाने लक्षात येते की सामाजिक जीवनात जो शरणरूप होतो तो तात्कालिक सत्य स्वरूप आहे. त्रैयकालिक सत्य तर हे आहे की स्वतःच्या पुरुषार्थावर मनुष्याला विश्वास होणे. स्वतः स्वतःच्या शरणाची शोध करणे. असे केल्याने मनुष्याचे कर्तृत्व दृढ होते. दुसऱ्यांनी विश्वासघात केला तर तो धैर्याने विचलित होत नाही.

संसार भावना

प्रथम दोन भावनेमध्ये आपण पाहिले की ज्या भौतिक, पौद्गलिक वस्तू आहेत त्या सर्व नाशवंत आहेत, क्षणिक आहेत. त्या कोणीच जीवाला शरणरूप होऊ शकत नाही. जे अजर, अमर, अविनाशी आणि शाश्वत आहे असे तत्त्वच शरणरूप होऊ शकते. संसार भावनेचे वर्णन करताना हे स्पष्ट केले आहे की, जी व्यक्ती जागतिक पदार्थांची अनित्यता, अशरणता जाणत नाही, जी व्यक्ती त्यात लिप्त राहते, जी भौतिक वासना, एषणा आणि भोग यामध्ये भ्रांत आहे ती व्यक्ती असा विचार करते की ह्या सर्व गोष्टींपासून जेवढा आनंद लुटता येईल तेवढा लुटून घ्यावा. या संदर्भाची चार्वाक दर्शनातील एक उक्ती प्रसिद्ध आहे -

'ऋणं कृत्वा घृतं पिबेत् यावत् जीवेत् सुखं जीवेत् ।
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ॥

अर्थात जोपर्यंत जगायचे तोपर्यंत सुखाने जगावे. ऋण-कर्ज काढून तूप प्राशन करावे, शरीर जाळून टाकल्यानंतर कोण पुन्हा येणार आहे ? अशाप्रकारे अज्ञान आणि मोहामुळे बाह्यवस्तूंमध्ये प्रिय वस्तूंबद्दल 'राग' आणि अप्रिय वस्तूंबद्दल द्वेष उत्पन्न होतो अशा मनोवृत्तीला संसार म्हणतात.

'संसार' शब्द 'सम्' उपसर्ग आणि 'सृ' धातूने निष्पन्न झाला आहे. अर्थात जो सतत संसरणशील आहे, बदलत राहतो तो संसार आहे. हा संसार अनादी काळापासून

आहे आणि अनंतकाळापर्यंत राहील. कधी असे झालेले नाही की संसाराचे आस्तित्व राहिले नाही आणि भविष्यकाळातही तसे कधी होणार नाही. हा संसार भूतकाळात होता, वर्तमानामध्ये आहे आणि भविष्यात सुद्धा राहील. तरी इतके स्पष्ट आहे की हा नेहमी एकसारख्या स्वरूपात राहत नाही. क्षणोक्षणी बदलत राहतो.

''जो जीव वीतराग प्ररूपित मार्गामध्ये श्रद्धा ठेवीत नाही तो जन्म, जरा, मृत्यू, रोग इ. भयांपासून परिपूर्ण पंचविध संसारामध्ये अर्थात पुद्गल परावर्तन, क्षेत्रपरावर्तन, काळ परावर्तन, भवपरावर्तन आणि भावपरावर्तनरूपी संसारामध्ये दीर्घकाळापर्यंत परिभ्रमण करत राहतो.''

एक जीव जेव्हा संसाराच्या समग्र पुद्गलांना कोणत्या ना कोणत्या रूपात भोगून घेतो त्याला 'पुद्गल परावर्तन' म्हणतात.

एक जीव जेव्हा समस्त क्षेत्राला संस्पर्श करून घेतो ते **'क्षेत्र परावर्तन'** होय. सर्व काळात वर्तन करतो अर्थात जन्ममरण करून घेतो ते **कालपरावर्तन** आहे. सर्व भवांमध्ये अर्थात चतुर्गतीमध्ये भ्रमण करून घेतो ते **भवपरावर्तन** आहे. सर्व भावांमध्ये मिथ्यात्वाला वश होऊन अनुवर्तीत होतो हे **भावपरावर्तन** किंवा **'भाव संसार'** आहे.

जो पुत्र, पत्नी इत्यादींसाठी पापबुद्धीने धन कमवतो आणि दया, दान करीत नाही तो जीव संसारामध्ये भ्रमण करत राहतो. प्रत्येक 'पर' पदार्थामध्ये ममत्व भाव ठेवतो. मिथ्यात्वाच्या उदयामुळे वीतराग प्रभूंद्वारे प्ररूपित धर्माची निंदा करतो आणि मांस व मदिरेचे सेवन करतो, पर धन, पर स्त्री यांचे अपहरण करतो असा मोहांध जीव नेहमी पाप करत राहतो व तो या संसारात परिभ्रमण करीत राहतो.[८१]

इथे आचार्य कुंदकुंद यांनी सप्त व्यसनांपैकी काही व्यसनांचा नामोल्लेख केला आहे. त्यांना संसार परिभ्रमणाचे कारण सांगितले आहे.

सम्यगदृष्टी जीवाला इहलौकिक किंवा पारलौकिकीचे भय नसते. जो आत्मज्ञानी आहे त्याला स्वतःची ओळख होते, त्याला भय वाटत नाही, भय अज्ञानी मनुष्याला वाटते. ज्यांना भय वाटत असते त्याला अनंत संसार आहे.

याविषयी आचार्य उमास्वाती लिहितात की हा जीव संसारात परिभ्रमण करत करत नरक, तिर्यंच, मनुष्य आणि देव ह्या चार गतींमध्ये गाडीच्या चाकाप्रमाणे परिभ्रमण करत आहे. म्हणजे सर्व संसारी जीव ह्याचे स्वजन अथवा परिजन आहेत असे म्हणता येईल. स्वजन-परिजन यांची विशिष्ट व्यवस्थाही नसते. कोणी एकच जीव माता, बहीण,

पती अथवा पुत्री होतो तर कोणी बहीण होऊन माता, स्त्री, पुत्री होते. कोणी स्त्री होऊन बहीण, पुत्री किंवा माता होते. स्वामी सेवक होतो आणि सेवक स्वामी होतो अर्थात चतुर्गतीमध्ये भ्रमण करणाऱ्या जीवाला कोणाबरोबरही एक निश्चित संबंध सांगता येत नाही. जो मित्र आहे त्याला जन्मांतरात शत्रू होताना पाहिले जाते. अशाप्रकारे अनादी काळापासून हे सर्व संसारी प्राणी मुख्यत्वे चौऱ्यांशी लक्ष योनीमध्ये भ्रमण करीत आहेत. राग-द्वेष त्याचप्रमाणे मोहाने अभिभूत राहिल्याने विषयासक्ती सोडू शकत नाहीत आणि परस्पर एकदुसऱ्याचे भक्षण, ताडन, वध, बंधन इत्यादींमध्ये प्रवृत्त होत राहतात. आणि तज्जनित अत्यंत दारुण दुःख भोगत राहतात. म्हणून साधकाने संसाराच्या स्वरूपाचे पुन्हा पुन्हा चिंतन केले पाहिजे की, हा संसार द्वंद्वात्मक आहे. अर्थात इष्ट आणि अनिष्ट, सुख आणि दुःखरूपी युगलधर्माचा आश्रय आणि स्वभावतः कष्टप्रद आहे. अशाप्रकारे चिंतन करणाऱ्या साधकाला संसारापासून भीती उत्पन्न होते. निर्वेद भाव अर्थात वैराग्यभाव प्राप्त होतो. आणि वैराग्य प्राप्त झाल्यावर संसाराचा प्रवाह कमी होतो. संसाराच्या स्वरूपाचा पुन्हा पुन्हा विचार करणे म्हणजे 'संसारानुप्रेक्षा' आहे आणि संसारापासून विरक्त होणे त्याचे वास्तविक फळ आहे.[८२]

'संसार' याचा अर्थच 'संसरण', 'परिभ्रमण' असा आहे. जो परिभ्रमण करतो तो फुटबॉलप्रमाणे भूमीवर पडताच दुसरीकडे फेकला जातो. त्याला इष्ट आणि अनिष्ट वस्तूचा संयोग होतोच. परंतु मोह आणि अज्ञान यामुळे जीव इष्ट वस्तूच्या प्राप्तीमध्ये सुख आणि अनिष्ट व्यक्ती किंवा वस्तूच्या प्राप्तीमध्ये दुःखाचा अनुभव करतो. तत्त्वतः कोणतीच वस्तू सुख अथवा दुःख याचे कारण होऊ शकत नाही. ज्ञानी पुरुष सर्व वस्तूंच्या संयोगाला दुःखाचे कारण मानून नेहमी त्यापासून दूर निर्वेदभावामध्ये स्थिर राहतात.

जगात दोन गंतव्य आहेत. एक 'संसारा'चा मार्ग आणि दुसरा 'मोक्षा'चा मार्ग. आचार्य वट्टकेरांचे कथन आहे की जो जीव मिथ्यात्वाने अर्थात आत्मविपरीत श्रद्धेने युक्त आहे तो वीतराग प्रभूंद्वारा निरूपति मोक्षसाधनेच्या मार्गाला पाहू शकत नाही. त्याची दृष्टी संसाराकडेच राहते. ती भयंकर कुटिल जंगलाप्रमाणे दुर्गम आहे. यात प्राणी स्वतःला विसरून भ्रमण करीतच राहतो. द्रव्य, क्षेत्र, काळ आणि भाव यांच्या दृष्टीने संसार चार प्रकारचा आहे. त्याला सहा अनुयोगांद्वारे समजून घेतले पाहिजे असे ग्रंथकारांचे मत आहे.

प्रथम अनुयोग – संसार काय आहे ? आपण पाहिले आहे की संसरण करणे म्हणजे 'संसार' आहे. हा चार गतींमध्ये भ्रमणशील आहे.

दुसरा अनुयोग - कोणत्या भावाने संसार होतो ? औदयिक, औपशयिक क्षायोपशमिक, परिणामिक इत्यादी भावाने संसार होतो.

तिसर अनुयोग - संसार कोणाला होता ? जे जीव ज्ञानावरण, दर्शनावरण वेदनीय, मोहनीय, आयुष्य, नाम, गोत्र आणि अंतराय ह्या आठ प्रकारच्या कर्माने युक्त आहेत, अशा संसारी जीवांना संसार होतो.

चौथा अनुयोग - संसार कोठे आहे ? मिथ्यात्व, अव्रत (असंयम), कषाय आणि योग जेथे आहे तेथे संसार आहे.

पाचवा अनुयोग - संसार किती काळ आहे ? अभवी जीवासाठी संसार अनादी अनंत आहे अर्थात अनादी काळापासून आहे. ह्याचा कधीच अंत नाही आणि भवी जीवासाठी अनादी, सांत आहे. अर्थात अनादि काळापासून आहे. परंतु ह्याचा अंत कधी तरी होईल.

सहावा अनुयोग - ह्या संसाराचे किती प्रकार आहेत ? सामान्य संसरणाच्या अपेक्षेने एक प्रकारचा आहे. आणि दोन पासून सहा पर्यंत अथवा अनेक प्रकारचा सुद्धा आहे.

ह्या अनुयोगाद्वारे सर्व पदार्थांना जाणले पाहिजे. ज्यामध्ये विविध प्रकारची दुःखे भरलेली आहेत. अशा अनेक प्रकारच्या संसाराची वास्तविकता समजून हा निःसार आहे असे चिंतन केले पाहिजे.[८३]

साधकाला असार संसारातून जागृत करण्यासाठी मूलाचारामध्ये अत्यंत विस्तारपूर्वक संसारानुप्रेक्षेचे विवेचन केले आहे. जन्म, जरा, मृत्यू, इष्ट वियोग, अनिष्ट संयोग यांनी भरलेल्या संसाराच्या स्वरूपाचे चिंतन केले पाहिजे. त्यामुळे आत्मा पथ भ्रष्ट होऊ नये ही सतत जागृती राहते.

तत्त्वार्थसूत्रामध्ये जीवाचे भेद सांगताना लिहिले आहे -

'संसारिणो मुक्तश्च' जीव 'संसारी' आणि 'मुक्त' अशा दोन प्रकारचा आहे.[८४] कर्मयुक्त जीवांना 'संसारी' आणि कर्मरहित जीवांना 'मुक्त' म्हणतात. कर्मयुक्त जीवाचे जधन्य दोन, मध्यम चौदा, उत्कृष्ट पाचशेत्रेसष्ठ भेद होतात. याचे वेगवेगळ्या दृष्टीने विभाजन केलेले आहे.

आचारांग सूत्रामध्ये चतुर्गतीरूपी संसाराच्या स्वरूपांचे वर्णन केलेले आहे. ह्यात

उत्पत्तीस्थानाच्या दृष्टीने जीवाचे आठ भेद केले आहेत. अंडज, पोतज, जरायुज, रसज, संस्वेदज, समुर्च्छिम, उद्भिज आणि औपपातिक. ह्या सर्व त्रस प्राण्यांच्या समन्वित क्षेत्राला 'संसार' म्हणतात.[८५]

मंद अर्थात विवेक बुद्धीची अल्पता आणि अज्ञान ही दोन संसार परिभ्रमणाची मुख्य कारणे आहेत.

१) **अंडज** - अंड्याद्वारे उत्पन्न होणारे मोर, कबूतर, हंस इ.

२) **पोतज** - पोत म्हणजे चर्ममय पिशवी. पोतद्वारा उत्पन्न होणारे पोतज. उदा. हत्ती, वल्गुली इ.

३) **जरायुज** - जरायु म्हणजे गर्भवेष्टन किंवा ती जाळी जी जन्माच्यावेळी शिशूला आवृत्त केलेली असते. जरायुबरोबर उत्पन्न होणारे जीव म्हणजे गाय, म्हैस इ.

४) **रसज** - दही, ताक इ. विकृत झाल्यावर ज्या कृमी उत्पन्न होतात त्यांना रसज म्हणतात.

५) **संस्वेदज** - घामापासून उत्पन्न होणारे ऊवा, लिखा इ.

६) **समुर्च्छिम** - बाह्य वातावरणाच्या संयोगाने उत्पन्न होणारे जीव. उदाहरणतः माशी, डास, भूंगा, भोवरे इ.

७) **उद्भिज** - जमीन फोडून निघणारे जीव. पतंग, तीड इ.

८) **औपपातिक** - 'उपपात' याचा शाब्दिक अर्थ 'सहज घडणारी घटना' असा आहे. आगमाच्या दृष्टीने पुष्पशय्येत आणि नारक कुंभीमध्ये उत्पन्न होतात. त्यांना एका मुहूर्तामध्ये (४८ मिनिटात) पूर्ण यौवनत्व प्राप्त होते. म्हणून यांना 'औपपातिक' म्हणतात.

ह्या आठ प्रकारच्या जीवाचे प्रथम तीन गर्भज, चार ते सात पर्यंत 'समुर्च्छिम' आणि आठवा 'औपपातिक' अशा तीन भेदामध्येसुद्धा समावेश होतो.[८६]

'त्रस' आणि 'स्थावर' या दोन भेदांमध्येच जीवाचा समावेश होतो. ह्या आठ योनी जीवाच्या जन्म-मरण, गमनागमन यांचे केंद्र आहे म्हणून ह्याला संसार म्हणतात.

संसाराला 'महासागराची' उपमा दिली आहे. समुद्रामध्ये पाणी असते तर संसाररूपी समुद्रात दुःखरूपी पाणी असते. जशी पाण्याची सीमा नाही त्याचप्रमाणे संसाराच्या दुःखाची सुद्धा सीमा नाही. समुद्रामध्ये पाताळ असतात. त्यात प्रवेश केल्यावर बाहेर निघणे सुद्धा अत्यंत कठीण आहे. समुद्रामध्ये भोवरे असतात तर संसारात द्रव्य,

क्षेत्र, काळ, भाव परिवर्तन असे चार भोवरे आहेत. समुद्रामध्ये द्विप असते तेथे काही काळ थांबू शकतो, संसारामध्ये चतुर्गतीच द्विपाचे कार्य करतात. अशा प्रकारे समुद्रसुद्धा अनंत आहे आणि संसार सुद्धा अनंत आहे.

संसाररूपी समुद्रामध्ये हिंसा, असत्य, चोरी, अब्रह्म आणि परिग्रहरूपी मगर इत्यादी क्रूर जंतू राहतात. स्थावर आणि जंगमरूपी मत्स्य अनेक आहेत. 'जाती' अर्थात नवे शरीर धारण करणे. 'जरा' म्हणजे वर्तमान शरीराचे तेज, बळ इत्यादींमध्ये क्षीणता येणे. 'मरण' अर्थात शरीर सोडणे. हे जाती, जरा आणि मरण ह्या संसारसागराची भरती आहे आणि शेकडो जातीरूपी तरंग आहेत. ज्याप्रमाणे एकेंद्रिय जाती ह्याचे पृथ्वीकाय इत्यादी पाच भेद यानंतर पृथ्वीकायाचे भेद अशाप्रकारे पंचेंद्रियांपर्यंत भेद-प्रभेदाच्या रूपात शेकडो जाती होतात. कर्मरूपी द्रव्याच्या भाराने भरलेले जीवरूपी जहाज शुभाशुभ वायूंनी युक्त अतीभयंकर संसार महासागरात प्रवेश करून दीर्घकाळापर्यंत परिभ्रमण करते.

द्रव्य, क्षेत्र, काळ, भव आणि भाव ह्या पाच प्रकारच्या संसाराचे संक्षिप्त वर्णन पूर्वी केले आहे. भगवती आराधनाकारांनी केलेले विस्तृत विवेचन इथे प्रस्तुत केले जात आहे-

द्रव्य परिवर्तन - घटीयंत्र ज्याप्रमाणे पाणी ग्रहण करते, त्याला काढून पुन्हा नवे पाणी ग्रहण करते त्याचप्रमाणे जीव शरीर ग्रहण करतो आणि त्याचा त्याग करतो. अशाप्रकारे भ्रमण करीत राहतो. 'द्रव्य' शब्दाने येथे विविध शरीराला घेतले आहे. आत्म्याच्या शरीराचे परिवर्तन 'द्रव्य संसार' आहे. सामान्य साधकाला समजविण्यासाठी द्रव्य संसाराचे स्वरूप दाखविले आहे. परंतु भगवती आराधनेचे टिकाकार लिहितात की द्रव्य परिवर्तन वास्तविक खालीलप्रमाणे घ्यावयास हवे.

द्रव्य परिवर्तनाचे दोन भेद आहेत. 'नो' कर्म परिवर्तन आणि कर्म परिवर्तन. नो कर्म परिवर्तन औदारीक तेजस आणि आणि कार्मण अथवा वैक्रिय तेजस आणि कार्मण त्याचप्रमाणे सहा पर्याप्तांचे योग्य पुद्गल एका जीवाने एकाच वेळी ग्रहण केले. त्यात जसे स्पर्श, गंध, वर्ण असतात. दुसऱ्या क्षणात त्याला भोगून सोडून दिले अथवा निर्जरीत केले. पुन्हा नंतर अनंतवेळा गृहित-अगृहित आणि मिश्र पुद्गल ग्रहण करता करता तेच पुद्गल त्याच जीवाला त्याचप्रकारे जेव्हा नोकर्म रूपाला प्राप्त होतात त्या सर्वांना नोकर्म परिवर्तन म्हणतात.

कर्म द्रव्य परिवर्तन - एका वेळेत एका जीवाने आठ कर्म रूपात जे पुद्गल

ग्रहण केले आणि एका आवली काळानंतर दुसऱ्या काळामध्ये त्याला भोगून सोडून दिले अथवा निर्जरीत केले. त्यानंतर अनंत वेळा गृहीत-अगृहीत आणि मिश्र पुद्गलांना ग्रहण करता करता जेव्हा तेच पुद्गल त्याच जीवाला त्याचप्रमाणे कर्मरूपाने येतात त्या सर्वांना कर्म द्रव्यपरिवर्तन म्हणतात.

पुद्गल परावर्तन - ज्याप्रमाणे रंगभूमीमध्ये प्रविष्ट झालेला नट अनेक रूप धारण करतो त्याचप्रमाणे द्रव्य संसारामध्ये भ्रमण करताना जीव निरंतर अनेक आकार रूप, स्वभाव इत्यादी ग्रहण करतो आणि सोडतो. हा द्रव्य संसार आहे. ह्याला आचार्य कुंदकुंद 'पुद्गल परावर्तन' म्हणतात.

क्षेत्र परिवर्तन - जगात असा कोणताही प्रदेश नाही जेथे ह्या जीवाने भूतकाळात अनंतवेळा जन्म-मृत्यूचा अनुभव घेतला नसेल. अनेक अवगाहनांबरोबर ह्या जीवाने क्षेत्र संसारात परिभ्रमण केले आहे.

काल परिवर्तन - हा जीव भूतकाळात उत्सर्पिणी आणि अवसर्पिणी काळात अनंत वेळा उत्पन्न झाला आणि अनंत वेळा मृत्यू पावला. हे काल परिवर्तन आहे.

भव परिवर्तन - ह्या जीवाने मिथ्यात्वामुळे नरकाच्या आयुष्यापासून उर्ध्वगती, नऊ ग्रेवेयक विमानापर्यंतच्या आयुष्यामध्ये क्रमाने अनेक वेळा भ्रमण केले आहे. हा भव परिवर्तन संसार आहे. 'भव' शब्दामध्ये 'योनी'चा समावेश होत नाही. जीवाच्या पर्यायाला 'भव' म्हणतात. असे भव परिवर्तन ह्या जीवाने अनंत वेळा केले आहे.

भाव परिवर्तन - लोकाकाशाच्या प्रदेशांना असंख्यातने गुणल्यावर जितकी राशी होते तितकीच ह्या जीवाची अध्यवसाय स्थाने होतात. ह्या असंख्यात लोकप्रमाण अध्यवसाय अर्थात भावामध्ये जीवाच्या परिवर्तनाला 'भाव संसार' म्हणतात. जसे सरडा नेहमी विविध प्रकारचे रंग बदलतो तसेच हा जीव अध्यवसाय बदलता बदलता परिणमन करतो.[८७]

इथे 'अध्यवसाय' शब्द 'भाव' अर्थाने घेतला आहे. अशाप्रकारे द्रव्य, क्षेत्र, काळ, भाव आणि भव रूप संसारामध्ये अज्ञानी जीव पापरूपी मळकट पाण्याने भरलेल्या आणि अत्यंत दुःखरूपी भवऱ्यांनी युक्त अशा संसाररूपी नदीमध्ये चिरकालपर्यंत भ्रमण करतो. हे संसाररूपी चक्र विषय, कषायरूपी आऱ्यांनी जखडलेले आहे. कुयोनीरूपी परिधी त्यावर चढलेली आहे. त्यात सुख, दुःखरूपी मजबूत खिळे लावलेले आहेत. अज्ञानरूपी तुंबावर स्थिर आहे. कषायरूपी फलकावर बांधलेले आहे. अनेक हजारो जन्मरूपी विशाल मार्गावर

मोहरूपी वेगाने संसार चक्रावर आरूढ होऊन पराधिनतेमुळे जीव भ्रमण करत आहे.८८

भारवाहक मनुष्य एखाद्या देशात किंवा काळात आपला भार उतरवून विश्रांती घेऊ शकतो. परंतु शरीराचा भार वाहणाऱ्या जीवाला मात्र एका क्षणासाठी देखील विश्रांती मिळत नाही. औदारीक आणि वैक्रिय शरीर सुटले तरी कार्मण आणि तेजस शरीर नेहमी बरोबरच राहतात.

रत्नकरंड श्रावकाचार यामध्ये चतुर्गतीरूपी संसाराच्या दुःखाचे विस्तृत वर्णन करताना एकेंद्रियापासून पंचेंद्रियापर्यंतच्या सर्व जीवांच्या आणि पंचेंद्रियामध्ये नरक, तिर्यंच, मनुष्य आणि देव यांच्या दुःखाचे इतके रोमांचक वर्णन केलेले आहे की ज्याची भयंकरता पाहून मनुष्य संसारापासून विरक्त होऊन जातो.

संसाराचे दुःख इतके विचित्र आहे की भरत-चक्रवर्तीसारख्या लोकांचा सुद्धा लहान भावाने अपमान केला. वास्तविक पाहता मोठा भाऊ वडिलांसमान मानला पाहिजे. परंतु चक्रवर्तीचे उच्च स्थान लहान भाऊ बाहुबली सहन करू शकला नाही आणि भरत चक्रवर्तीच्या आमंत्रणाला लाथ मारून इर्षेने युद्ध केले. विचार केला पाहिजे की जेथे चक्रवर्तीसारख्या पुण्यवान पुरुषाचीसुद्धा अशी स्थिती होते तर तेथे सामान्य व्यक्तींचे काय ? कोणाला पत्नी नसल्याचे दुःख आहे तर कित्येकांना दुष्ट, कर्कशी, व्यभिचारी, कलह करणारी, रोगी, सतत संताप देणारी पत्नी असल्याने दुःख आहे, कित्येक लोकांची स्त्री आज्ञाकारी, सद्गुणी असते परंतु लहान वयातच तिचा मृत्यू झाल्याने ते दुःखी असतात, कोणी निर्धनतेमुळे दुःखी आहेत तर कोणी पुत्र नसल्याने दुःखी आहे. कित्येक पुत्र असूनही दुर्व्यसनी निघाला म्हणून दुःखी आहेत, तर कोणी अत्यंत कीर्तीशाली, यशस्वी मुलाच्या मृत्यूने दुःखी आहेत. कोणाचे भाऊ दुष्टवचन बोलून दुःख देतात. तर कोणाला असाध्य रोगाचे दुःख आहे. कित्येकजण मुलीच्या लग्नासाठी पैसे नाहीत म्हणून दुःखी आहेत तर कित्येकजण मुलगी मोठी झाली परंतु तिच्यासाठी योग्य असा मुलगा व घर न मिळाल्याने दुःखी आहेत. कित्येक आपली संतती आंधळी, पांगळी, मूक, बधिर, वेडी, कुरूप असल्याने दुःखी आहेत. तसे पाहिले तर संपूर्ण संसार दुःखाने भरलेला आहे, दुःखाचे लाखो प्रकार होऊ शकतात. ह्याचे रोज चिंतन केल्याने संसाराचा उद्वेग येऊन जो विरक्त होईल तो संसार परिभ्रमणाला दूर करण्यात समर्थ होईल.८९

संसाराच्या दुःखाचे चिंतन केल्याने दुःखापासून मुक्ती मिळते हे अनादी काळापासून पाहत आलो आहोत. कारण दुःखाच्या स्वरूपाला जो जाणेल तोच त्याला

दूर करण्याचा उद्यम करेल. हे प्रसिद्धच आहे की गौतम बुद्ध संसाराच्या दुःखाला आणि दुःखाच्या कारणांना जाणून संन्यासी झाले. परंतु पुष्कळ लोक मोह, मदिरेने दुःखालासुद्धा सुखरूप मानून राग, द्वेष करता करता संसार चक्रामध्ये परिभ्रमण करत राहतात.

कर्माच्या विपाकाने अभिभूत आत्म्याला भवांतराची प्राप्ती होणे म्हणजे 'संसार' होय.[९०]

आचार्य अकलंकदेव लिहितात की द्रव्यादींच्या निमित्ताने आत्म्याला पर्यायान्तराची जी प्राप्ती होते त्याला संसार म्हणतात. आत्म्याच्या चार अवस्था होतात.

१) संसार - अनेक योनी असलेल्या चार गतींमध्ये परिभ्रमण करणे म्हणजे संसार आहे.

२) असंसार - जन्म न घेणे, शिवपद प्राप्ती अथवा परम सुख प्रतिष्ठा म्हणजे असंसार आहे.

३) नो संसार - चतुर्गती परिभ्रमणही नाही आणि मोक्षप्राप्तीसुद्धा नाही अशी सयोगी केवलीची जीवनमुक्त अवस्था म्हणजे 'ईषत्संसार' किंवा 'नो संसार' आहे.

४) अ नो संसार - उपरोक्त तिन्ही अवस्थेपेक्षा विलक्षण अवस्था अयोगी केवलीची आहे. अयोगी केवलीला चतुर्गती भ्रमण किंवा असंसाराची प्राप्ती नाही. आणि केवलीप्रमाणे शरीरस्पंदनही नाही. जोपर्यंत शरीर स्पंदन नसतानासुद्धा आत्मप्रदेशाचे चलन होत राहते तोपर्यंत संसार आहे.[९१]

हा आत्मा कर्माद्वारे केलेल्या रागादी अथवा शरीरादी भावात असंयुक्त असतानाही अज्ञानी जीवाला संयुक्तासारखा प्रतिभासित होतो आणि हा प्रतिभासच संसार आहे.

आचार्य अमृतचंद्राचे असे सांगणे आहे की रागादी भावामुळे पुद्गल कर्म आहे. हा आत्मा तर स्वशुद्ध भावाच्या अपेक्षेने कर्मजनित विविध प्रकारच्या भावाने वेगळा असला तरी मात्र चैतन्यमय पदार्थ आहे. राग इ. भाव आत्म्याचा स्वभाव नाही. आत्मा तर निर्मळ चैतन्य गुणामध्येच स्थित आहे. अज्ञानी पुरुषांना वास्तविक आत्मा राग इत्यादी रूपातच प्रतिभासित होतो. ज्याप्रमाणे एखाद्या पुरुषाला भूताने झपाटले तर तो भूताच्या प्रभावाने विविध प्रकारच्या विपरीत क्रिया करतो. त्या क्रियेचा कर्ता तर तो मनुष्यच आहे परंतु त्या क्रिया त्याचा निजस्वभाव नाहीत म्हणून त्यांना 'भूतकृत' असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे हा जीव कर्माच्या निमित्ताने अनेक प्रकारच्या रागादी भावात परिणमन करतो. त्या रागादी भावांचा कर्ता वास्तविक जीवच आहे परंतु ते त्या जीवाचे निजभाव

नाहीत म्हणून त्यांना 'कर्मकृत' म्हणतात. अज्ञानी जीव आत्म्याला कर्मजनित भावाने युक्त मानतात ही मान्यताच संसाराचे बीज आहे अर्थात कर्मजनित भावाला स्वतःचे मानणे अनंत संसाराचे कारण आहे.[९२]

श्री जिनभद्रगणि क्षमाश्रमण यांनी राग, द्वेष आणि मोहाला संसाराचे कारण सांगितले आहे आणि आर्तध्यानामध्ये ह्या तीनही गोष्टी आहेत म्हणून आर्तध्यानाला संसारवृक्षाचे 'बीज' म्हटलेले आहे.[९३]

स्वामी कार्तिकेय यांनी मिथ्यात्व आणि कषायाने युक्त अशा जीवांचे जे अनेक शरीरामध्ये संसरण अथवा भ्रमण होते त्याला 'संसार' म्हटले आहे.

अशा संसारामध्ये चार गती आहेत आणि अनेक प्रकारची दुःखे आहेत. प्रथम नारकीय जीवाच्या दुःखाचे वर्णन करताना लिहिले आहे की हा जीव पापाच्या उदयाने नरकामध्ये उत्पन्न होतो, तेथे जीवाला पाच प्रकारचे दुःख अर्थात असुरकुमार देवांद्वारे उत्पन्न केलेले, शरीराने उत्पन्न झालेले, क्षेत्रीय आणि परस्पर केलेले अशी दुःखे भोगावी लागतात.[९४]

असुरकुमार देव तिसऱ्या नरकापर्यंत जाऊन नारकीयांना परस्पर भांडण करायला लावतात हे त्यांच्यासाठी केवळ कुतुहल असले तरी त्यामुळे नारकीय जीव अत्यंत दुःखी होतात.

पापाच्या उदयामुळे नारकांचे शरीर अनेक रोगाने युक्त, घृणास्पद आणि दुःखमय असते.

चित्तसुद्धा महाक्रूर आणि दुःखी असते.

नरकाचे क्षेत्र महाशीत, उष्ण, दुर्गंधी आणि उपद्रवसहित असते. परस्पर वैराच्या संस्काराने छेदन, भेदन, मारण ताडण इत्यादी करतात. तेथील दुःख इतके भयंकर आहे की त्याचे वर्णन कोणत्याही उपमेद्वारा केले जात नाही.

नरकाचे दुःख वाणीद्वारे अवर्णनीय आहे. असे दुःख कित्येक सागरोपमकाळापर्यंत सहन करावी लागतात. आयुष्य पूर्ण झाल्याशिवाय तेथून सुटकादेखील होऊ शकत नाही.

नरकातून निघून अनेक प्रकारच्या तिर्यंच गतीमध्ये हा जीव उत्पन्न होतो. तेथे गर्भात राहण्याचे दुःख आणि छेदन इत्यादी दुःखे भोगतात. परस्पर खाण्याचे, मनुष्यांद्वारे मारले जाण्याची दुःखे सहन करावी लागतात. जिच्या गर्भात उत्पन्न होतो अशी मातासुद्धा

भक्षण करते तर दुसरे कोण रक्षण करणार ? अशाप्रकारे भुख, तहान इत्यादींचे तीव्र दुःख हा जीव तिर्यंच गतीमध्ये भोगतो.

तिर्यंच गतीमधून निघून मनुष्य गती प्राप्त होते. तेथेसुद्धा गर्भात उत्पन्न होण्याचे दुःख पराधीनतेचे दुःख भोगतो. असतावेदनीय, नीचगोत्र, अशुभ नाम, आयुष्य इत्यादी दुष्कर्मांच्या वश होऊन भयंकर दुःखे सहन करावी लागतात. तरीसुद्धा पाप करतच राहतात. पुण्यप्राप्तीचे कारण दान, व्रत, तप इत्यादी करत नाही ही मनुष्याची किती अज्ञानता आहे !

मनुष्याचेसुद्धा अनेक प्रकार आहेत. त्यात कर्मभूमी, अकर्मभूमी, अंतरद्वीप, समुच्छीम या भेदांनी मनुष्यांचे तीनशे तीन भेद आहेत. त्यात मात्र कर्मभूमीचा मनुष्यच धर्म करू शकतो. परंतु जन्म घेणेसुद्धा किती दुःखदायी आहे, याचे वर्णन करताना आचार्य हेमचंद्रजींनी भवभावनेमध्ये लिहिले आहे की जीव जवळ जवळ दोनशे सत्त्याहत्तर अहोरात्र गर्भामध्ये राहतो. एका गर्भामध्ये उत्कृष्ट नऊ लाख जीव उत्पन्न होतात. गर्भातले कित्येक जीव परस्पर युद्ध करून नरकात जातात आणि कित्येक जीव धर्माच्या लेश्याद्वारे देवलोकामध्ये जातात. ह्या नऊ लाखांमधून एक दोन जन्म घेतात. इतर सर्व गर्भातच नष्ट होतात. मातेच्या सुखाने सुखी आणि दुःखाने दुःखी होतात. मातेच्या चेष्टेनुसार उलटे सुलटे होतात. अशाप्रकारे अशुचिमय पिशवीमध्ये गुफेसारख्या घोर अंधकारमय गर्भात अत्यंत दुःखी होतात.[९५]

लहानपणी पराधीनतेचे दुःख, यौवनामध्ये धनसंग्रह आणि त्याच्या रक्षणाची अनेक प्रकारची मानसिक चिंता, राजा, चोर, भागीदार यांचे भय, असते. तसेच जसजसे धन वाढत जाते तसतशा इच्छा देखील वाढतात.

सर्व सुखे मिळाली, सुंदर शरीर, मधुर कंठ, बल, धन, विशाल परिवार, ज्यांना दुःख म्हणजे काय, हे माहीत नाही अशा युवकांच्या युवाअवस्थेच्या सुरुवातीलाच त्यांच्या अशुभ कर्माच्या उदयाने क्षणात कुष्ठरोग, क्षय इत्यादी भयंकर रोग त्रस्त करतात. ह्या असंख्य दुःखांमध्ये सुखद गोष्ट ही आहे की जो मनुष्य, संसार असार आणि जिनशासन व ज्ञानदर्शन चारित्र्यरूपी धर्माला सार समजतो तो मोक्षापर्यंत मनुष्यगती मधूनच जाऊ शकतो. म्हणून आता संसाराच्या दुःखाचा नाश करणाऱ्या जिनधर्मामध्ये उद्यम केला पाहिजे.

जो सम्यगदृष्टी जीव ह्या दुःखाला समजून श्रावकाच्या व्रताने युक्त, उपशम भावनेसहित आपल्या दोषांची निंदा अर्थात दोषांना आठवून पश्चाताप करतो, गर्हा अर्थात

आपल्या दोषांना गुरूंच्या समोर जाऊन प्रकट करतो तो जीव पुण्यप्रकृतीचा बंध करतो. पुण्यवान पुरुषालासुद्धा दुःखे भोगावी लागतात. पूर्णपणे कोणीच सुखी नाही म्हणून मनुष्यगती दुःखदायी आहे.

मोठ्या कष्टाने हा जीव कधी देवगतीलासुद्धा जातो. परंतु तेथील मोठ्या ऋद्धीसंपन्न देवांचे ऐश्वर्य पाहून मानसिक दुःख होते. महर्धिक देवांनासुद्धा इष्ट वियोगाचे दुःख होते. शारीरिक रोगापेक्षा मानसिक दुःख हे अधिक होते.

अशाप्रकारे आपण पाहतो की, चतुर्गतीमध्ये कोठेच सुख नाही. संसार असार आहे. घोर दुःखाचा सागर आहे. त्यात कोठेच सुख नाही. अशाप्रकारे संसाराच्या स्वरूपाला समजून सर्वथा मोह सोडून आत्मस्वरूपाचे ध्यान केल्याने संसार परिभ्रमण नष्ट होईल.[९६]

जो ह्या संसाराचे स्वरूप जाणत नाही तो चतुर्गतीरूपी संसारामध्ये परिभ्रमण करतो. ज्या संसारामध्ये सौभाग्य आणि रूपाचे गर्व करणारा युवक मरून स्वतःच्या शरीरातच किड्याच्या रूपात उत्पन्न होतो आणि मातासुद्धा पशू इत्यादीमध्ये जन्म घेऊन आपल्या पूर्व पुत्राचे मांस भक्षण करते. ह्यापेक्षा अधिक दुसरे दुःख कोणते असणार ? स्वामी जेथे सेवक आणि सेवक स्वामी होतो, स्वतःचा पुत्र पिता आणि पिता पुत्र होतो, जेथे पित्यालासुद्धा वैरभावनेने मारले जाते अशा संसाराच्या स्वरूपाचे दर्शन घडवणारे एक उदाहरण आहे.

कौशांबी नगरीच्या समारंभात तत्पर असणारे एक अत्यंत प्रसिद्ध 'तापस' नावाचे अधर्मी शेठ, घराबद्दल तीव्र आसक्ती असल्याने मेल्यानंतर आपल्याच घरामध्ये डुक्काराच्या रूपात जन्माला आले. तेथे त्यांना पूर्वजन्माचे स्मरण झाले. एकदा त्यांच्या पुत्राने त्याच्या (पित्याच्या) वार्षिक मृत्यूतिथीचा दिवस उजवण्यासाठी ब्राह्मण, संन्यासी, नातेवाईक इत्यादींना निमंत्रण दिले. त्या निमित्ताने स्वयंपाक करणाऱ्या स्त्रीने मांस शिजविले. परंतु त्या शिजलेल्या मांसाचा मांजर इत्यादी प्राण्यांनी नाश केला म्हणून घराच्या मालकाच्या भीतीने त्या स्त्रीने दुसरे मांस त्वरित न मिळाल्याने त्याच डुकराला मारून मांस तयार केले. तेव्हा मरून तो पुन्हा त्याच घरात सर्प झाला आणि स्वयंपाक करणाऱ्या स्त्रीला पाहून त्याला मृत्यूच्या भयाने आर्तध्यान करता करता पूर्वजन्माचे स्मरण झाले. स्वयंपाक करणाऱ्या स्त्रीने त्याला पाहून आरडाओरड केली, लोक एकत्रित झाले आणि त्या सर्पाला मारून टाकले. तो सर्प मरून पुन्हा आपल्याच पुत्राच्या पुत्ररूपात जन्माला आला. तेव्हा पूर्व जन्माचे स्मरण करून अशाप्रकारे विचार करू लागला की मी आपल्याच पुत्राला 'पिता'

आणि पुत्रवधूला 'माता' कसे बरे म्हणू ? असा विचार करून तो मौनपूर्वक राहू लागला. जेव्हा त्या कुमाराने यौवनावस्था प्राप्त केली त्यावेळी विशिष्ट ज्ञानी 'धर्मस्थ' नावाचे आचार्य त्या नगरीतील उद्यानामध्ये आले. त्यांनी आपल्या दिव्य ज्ञानाने पाहिले की नगरीत कोण प्रतिबोध प्राप्त करू शकेल ? दिव्य ज्ञानाने त्यांनी मौनव्रतीलाच योग्य समजले. म्हणून दोन साधूंना त्याच्या पूर्वजन्माच्या संबंधाचा एक श्लोक शिकवून प्रतिबोध देण्यासाठी त्यांच्याजवळ पाठविले. त्यांनी तिथे जाऊन अशाप्रकारे श्लोक उच्चारण केला

''तापस किमिणा मोणवएण पडिवज्ज जाणिऊं धम्मं ।
मरिऊण सूयरोरग, जाओ पुत्रस्स पुत्रोत्ति ।।''

अर्थात हे तापस ! ह्या मौन व्रताने काय फायदा ? तू मरून डुक्कर, सर्प आणि पुत्राचा पुत्र झाला आहेस. हे जाणून धर्माचा स्वीकार कर. आपल्या पूर्वजन्माचा वृत्तांत ऐकून प्रतिबोध प्राप्त करून त्याने त्याचवेळी आचार्यांजवळून सर्वज्ञ प्ररूपित अनगार धर्म स्वीकारला.[९७]

या उदाहरणापासून मुमुक्षूने असा बोध प्राप्त केला पाहिजे की जो जीव ह्या जगाला अनित्य मानून वीतराग प्ररूपित धर्माचा शरण स्वीकारत नाही तो ह्या संसार चक्रात लाखो कठोर दुःखांना प्राप्त करतो. जगातील प्रसिद्ध सात चक्रांमध्ये संसारचक्र अत्यंत भीषण आहे. (१) जे रुपयांवर अंकित होते ते ''अशोकचक्र'' आहे. (२) श्रीकृष्ण महाराजांच्या हातात असणारे 'सुदर्शन चक्र' आहे. (३) चक्रवर्तींच्या आयुध शाळेमध्ये उत्पन्न होते ते 'चक्ररत्न' आहे. (४) धर्मचिह्नाच्या रूपात तीर्थंकरांच्या जवळ आकाशात चालते ते 'धर्म-चक्र' आहे. (५) दहा कोटानुकोटी सागरोपम प्रमाण उत्सर्पिणीचे सहा आरे आणि तितक्याच काळाचे अवसर्पिणीचे सहा ओर मिळून बीस कोटानुकोटी सागरोपम प्रमाणाचे एक काळचक्र आहे. (६) चार गतींमध्ये सतत भ्रमण करविणारे 'संसार चक्र' आहे. (७) संसारचक्राचा अंत करणारे सर्वश्रेष्ठ चक्र ज्यामध्ये दोन देव, तीन गुरू आणि चार धर्माचा नवपदमय मंडळ असणारे सातवे 'सिद्ध-चक्र' आहे.

संसारचक्रामध्ये जीवात्मा विविध योनीमध्ये जन्म-मरण करता करता उच्च-नीच कुळात जातो.

स्वतःला अत्यंत सुखी मानणारा देव आयुष्य पूर्ण झाल्यावर स्वर्गातून आक्रंद करत करत नीच गतीला प्राप्त करतो आणि कुत्रा स्वर्गात जाऊन देव होतो आणि क्षत्रिय

ब्राह्मण अर्थात कर्मकांडाचा अधिकारी, स्पृश्य-अस्पृश्यता मानणारा ब्राह्मण मरून कृमी किंवा चांडाळ होतो.[९८]

उपाध्याय विनयविजय यांनी संसारभावनेच्या गितिकेमध्ये साधकाला संबोधून सांगितले आहे, हे जीवा ! थोडा विचार कर - हा संसार किती भयंकर आहे, ह्यामध्ये जन्म-मरण इत्यादींचे भीषण भय आहे, मोहरूपी शत्रूने तुमचा गळा पकडून ठेवला आहे, तुमच्या पावलोपावली संकटे आहेत, स्वजनांबरोबर असलेले तुमचे संबंध स्पष्टच आहेत. तुम्हाला नवीन नवीन अनुभव, तिरस्कार पराभव प्राप्त होत असतो. तरीही त्याचा तुम्ही विचार करीत नाही. हा संसार किती विचित्र आहे. भव परिवर्तनाबरोबरच शत्रू मित्र होतो आणि स्नेही द्वेषी होतो. हा संसार भयंकर चिंतेच्या आणि रोगांच्या अग्नीत जळत आहे. तुम्ही त्यातच अनुराग ठेवता. त्याच्या दारुणतेवर चिंतन करा आणि आपल्या मनामध्ये जिनवचनाचे चिंतन करा त्याने संसाराच्या सर्व भयाचा नाश होईल.[९९]

ह्या संसाराच्या विचित्रतेला जे चांगल्याप्रकारे समजून घेतात आणि त्यापासून विरक्त होतात ते वर्द्धनकुमारादी भरतचक्रवर्तीच्या नऊशे तेवीस पुत्रांप्रमाणे मोक्षाचे अधिकारी होतात.

अनादी काळचे मिथ्यादृष्टी असे नऊशेतेवीस नित्य निगोदचे निवासी निगोदामध्ये कर्माची निर्जरा झाल्याने ते 'इंद्रगोप' नावाचे कीडे झाले आणि त्या किड्यांच्या ढीगावर भरतचक्रवर्तींच्या हत्तीने पाय ठेवल्याने ते मरून गेले व मेल्यानंतर भरतमहाराजांच्या वर्द्धनकुमारादी पुत्राच्या रूपात जन्मले. परंतु ते कोणाबरोबरही बोलत नव्हते म्हणून भरतमहाराजांनी समवसरणात भगवान ऋषभदेवांना विचारले तर त्यांनी पूर्वीचा सर्व वृत्तांत ऐकवला. तो ऐकून नऊशेतेवीस वर्द्धनकुमारादी पुत्रांनी संयम व तप ग्रहण केले आणि अत्यंत अल्प काळात ते मोक्षास पोहचले.

ज्ञानी पुरुषांनी ह्या संसाराचे चांगल्याप्रमाणे निरीक्षण करून सत्यच सांगितले आहे की, ''संसार दुःखमय आहे.'' परंतु केवढे आश्चर्य आहे की, असंख्य दुःखाचे काटे टोचले, अंगाचे छेदन झाले, तरीसुद्धा संसारी मनुष्याला दुःखप्रेरित वैराग्यसुद्धा लवकर प्राप्त होत नाही. जणू कंटकपूर्ण संसारात राहून त्याने कंटकमय दुःसह दुःखालासुद्धा कायमचे पचवून टाकले आहे असे वाटते.

''संसारम्मि असारे नत्थि सुखं वाहिवेयणा पउरे ।
जाणंतो इह जीवो न कुनई जिण देसिअं धम्मं ॥[१००]

व्याधी आणि वेदनेने प्रचुर ह्या असार संसारामध्ये सुख नाही हे माहीत असतानासुद्धा हा जीव जिनेश्वर भगवंतांनी जो धर्म सांगितला आहे त्याचे आचरण करीत नाही. ह्यापेक्षा मोठे आश्चर्य ते काय असणार ?

इतक्या भयंकर दुःखाला पचविण्याची शक्ती संसारी जीवाला कोठून प्राप्त होते हा एक प्रश्न आहे आणि त्याचे उत्तर म्हणजे सुखप्राप्तीची तीव्र आसक्ती. याच्या नशेत मनुष्य दुःख पचवून जातो. मानवावर जेव्हा काल्पनिक सुखाचा नशा चढते तेव्हा तो त्यासाठी सर्व दुःख गिळण्यास तयार होतो हे निर्विवाद सत्य आहे.

एका जंगली हत्तीने एका मनुष्याचा पाठलाग केला. मनुष्याच्या जीवाला धोका निर्माण झाला आणि तो वेगाने पळू लागला. पळताना त्याला एक वृक्ष दिसला, तेव्हा त्याने त्या वृक्षावर जोरात उडी मारली आणि वृक्षाची एक फांदी घट्ट पकडली. त्या वृक्षाची फांदी विहिरीवर लटकत होती. इकडे शिकार हातातून निसटली असे मानून हत्ती क्रोधित झाला आणि त्या वृक्षाला आपल्या सोंडेत पकडून जोरजोरात हलवू लागला. त्या मनुष्याचे दुर्दैव असे की त्या विहिरीतून चार साप बाहेर आले आणि त्याच्यावर झडप घालण्याचा प्रयत्न करू लागले. दुसरीकडे वृक्ष हलल्याने त्या वृक्षावरील मधमाश्यांचे पोळेसुद्धा हलले आणि सर्व मधमाश्या एकाचवेळी त्या मनुष्यावर तुटून पडल्या आणि त्याला डंख मारू लागल्या. आधीच संकटांनी त्रस्त झालेल्या त्याच्यापुढे हे आणखी एक संकट उभे राहिले. या सर्व गोष्टींचा विचार करत जेव्हा त्याने वर पाहिले तेव्हा त्याला एक काळा व एक पांढरा असे दोन जंगली उंदीर, तो ज्या फांदीवर बसला होता त्याच फांदीला कापत असताना दिसले. सर्वजण जणू काही त्याच्या जीवनाचा ग्रास घेण्यासाठी उद्युक्त झाले होते. शरीराला डंख मारणाऱ्या मधमाशा डोक्यात वेदनेच्या ज्वाला उत्पन्न करीत होत्या.

अशावेळी एक घटना घडते. तो उंदराकडे वर पाहत असताना त्या मनुष्यांच्या ओठांवर पोळ्यामधून मधाचा एक थेंब टपकतो. बस ! काम झाले. तो सर्व दुःखांना सहन करू लागला. मधाच्या स्वादामध्ये तो स्वतःलाच विसरून जातो. त्याचवेळी एक दैवी विमान त्याची त्या दयनीय परिस्थितीतून सुटका करण्यासाठी येते. परंतु मधलोलुप मनुष्य त्यातून जाण्यास तयार होत नाही. त्याला मधाचे थेंब चाखणेच अधिक श्रेयस्कर वाटते. तो मधाचा आस्वाद घेण्यात इतका मग्न होतो की त्याला भोवतालच्या संकटाचे सुद्धा ध्यान राहत नाही. सुखाच्या तीव्र अनुरागात मनुष्य दुःख विसरतो. ह्यापेक्षा अधिक दुःखदायक ते काय ?

अशीच स्थिती संसारी मनुष्याची आहे. संसाराला आगमामध्ये ठिकठिकाणी "कांतार" म्हणजे घोर जंगल संबोधिले आहे. त्यात मनुष्य भटकत राहतो. भयंकर दुःखरूपी हत्ती त्याच्यामागे लागला आहे. त्याच्यापासून वाचण्यासाठी वृक्षाच्या फांदीरूपी धनसंपत्तीला पकडतो. खाली चार कषाय-क्रोध, मान, माया, लोभरूपी सर्प त्याला गिळण्याचा प्रयत्न करीत आहेत. विषयवासनारूपी मधमाशा त्याला डंख मारत आहेत, दिवसरूपी पांढरा उंदीर आणि रात्ररूपी काळा उंदीर ह्या जीवनरूपी फांदीला कापत आहे. परंतु भोगरूपी क्षणिक सुखापुढे त्याला काहीच सुचत नाही.

"सौख्य बूंदभर मिला कभी तो वह कबतक ठहरेगा ?
अगले ही क्षण भोले प्राणी ! दुःख सागर लहरेगा ।
राईभर सुख के निमित्त क्यों दुःख सुमेरू भूलाया,
संतोके उपदेश को भी तूने हाय ! लजाया ॥[१०१]

मधबिंदुलोलुप मानवाची काय स्थिती होईल, हे प्रत्यक्ष आहे. तीच स्थिती संसारात सुख मानणाऱ्याची होईल. परंतु दुःखरूपी अग्नीतसुद्धा हा जीवात्मा जागृत होत नाही. मोहमदिरेच्या नशेने त्याला मूर्च्छित केले आहे. त्यामुळे त्याला संसारात भटकावे लागते.

हे सुख क्षणिक आहे हे कळत असूनही मनुष्य अनेक पापकर्माचे आचरण करत असतो. ही पापकर्मे पचविणे अत्यंत कठीण आहे. संसार दुःखमय आहे. पापमय आहे, तापमय आहे, संतापमय आहे असे चिंतन केल्यानेच जीवात्म्याला पापकर्मातून मुक्त होण्याची भावना होईल.

मोहांध, बुद्धी भ्रष्ट लोकांना संसरणाचे, पापाचे भय वाटत नाही. मात्र त्यांना दुःख नको आहे आणि दुःखापासून ते वाचूही शकत नाहीत. कारण जे पाप करतात त्यांना दुःख तर भोगावेच लागते, ते संसाराच्या दुर्गतीमध्ये संसरण करत राहतात.

संसारामध्ये अनेक प्रकारच्या चिंतेच्या अग्निज्वाला मनुष्याला जाळत असतात. काही चिंतेचे तर निराकरण होऊन जाते. परंतु त्याची पुन्हा आठवण करून लोक दुःखी होतात. काही चिंता 'दुसऱ्यांनी मला असे सांगितले तसे सांगितले' अशा इकडून तिकडून ऐकलेल्या गोष्टीच्या असतात. त्यातील अधिक तर खऱ्या सुद्धा नसतात. परंतु मनुष्याला व्यर्थच चिंता करण्याची सवय पडलेली असते. काही चिंता आरोग्यविषयक असतात. आरोग्य दहा टक्के बिघडले तर चिंतेने मनुष्य दुप्पट करतो. मनुष्य सर्वात जास्त चिंता

भविष्याची करतात. त्या एकदम निरर्थक असतात. पुष्कळशा चिंतेचे समाधान होऊ शकते. परंतु चित्ताला स्थिर केले तर सर्व काही होऊ शकेल. चिंता चितेसारख्या असतात.

''बिंदुमात्र प्रभेदेन चिता चिंता समिकृता''

चिता आणि चिंता यांच्यामध्ये एका बिंदूचे केवळ अंतर आहे. चिता तर मृत व्यक्तीला जाळते परंतु चिंता जीवंत प्राण्याला जाळून टाकते. लोकांची रात्रीची झोप उडून जाते, झोपेच्या गोळ्या घ्याव्या लागतात. जेव्हा मनुष्याच्या इच्छा वाढतात तेव्हा चिंता वाढते आणि चिंता करत करत एक दिवस चितेत जाण्याची वेळ येते तेव्हा सर्वकाही शून्य झालेले असते.

अशाप्रकारे संसाराच्या निःसारतेचे, क्षणिकतेचे पुन्हा पुन्हा चिंतन केल्याने संसारावद्दल विरक्ती येते. तेव्हा सर्वज्ञकथित धर्म जीवाला शांतता प्राप्त करून देतो. संसाराच्या दुःखातून वाचण्याचा मार्ग प्राप्त होतो. म्हणून करण्यायोग्य जर काही असेल तर केवळ चिंतन आहे. चिंतन केल्याने कर्माचे मंथन होते आणि आत्मशुद्धीचे नवनीत प्राप्त होते.

अज्ञानतेच्या भवामध्ये अशाप्रकारचे ज्ञान नव्हते परंतु आता तर मनुष्य जन्म मिळाला आहे. खरे ज्ञान मिळाले आहे. तर हे जीवा ! सावधान हो आणि ह्या संसाराच्या विविध गतींचे, विविध वेष धारण करून नवेनवे नृत्य करून जर थकले असाल, उद्विग्न झाले असाल तर इंद्रियांच्या विषयांनी उत्पन्न होणाऱ्या विकारांना दूर करा. कारण इंद्रियांच्या इष्ट अनिष्ट विकारांनी विकृत भाव होतात. आणि अशुभ कर्माचा बंध होतो. परिणामी चतुर्गतीरूप संसारात परिभ्रमण करता करता दुःख भोगावे लागते.१०२

''अनंत सौख्य नाम दुःख त्या रही न मित्रता.''

अर्थात ज्यामध्ये एकांतिक आणि आत्यंतिक सुखाचे तरंग उठतात अशा शील, ज्ञान इत्यादींच्या नाममात्र दुःखाने उद्विग्न होऊन त्यांना मित्ररूपात मानत नाही. त्यात भावना ठेवत नाही आणि

''अनंत दुःख नाम सौख्यप्रेम त्या विचित्रता''

अनंत दुःखमय अशा ह्या संसारामध्ये नाममात्र सुख आहे. त्यात तुला परिपूर्ण प्रेम आहे ही किती विचित्र गोष्ट आहे !

''उघाड ज्ञाननेत्र ने निहाल रे ! निहाल तु''

अरे चेतन आत्म्या ! तू आपल्या ज्ञानरूपी नेत्रांना उघडून बघ.

''निवृत्ति शिघ्रमेव धारी ते प्रवृत्ति बाळ तुं''

आणि शीघ्र निवृत्ती म्हणजे महावैराग्याला धारण कर. आणि मिथ्या कामभोगाच्या प्रवृत्तीला लवकर जाळून टाक.[१०३]

मिथ्या कामभोगाने कोणते बंध होतात ? संसारी जीव कोठे परिभ्रमण करतात संसारातून मुक्ती कशी मिळू शकते ? ह्यावर विचार केल्याने हा निष्कर्ष निघतो की हे सर्व विश्व, संसारी आत्मा आणि मुक्त आत्मा या रूपाने दोन भागात विभाजित झालेला आहे. जे जीव विविध योनींमध्ये परिभ्रमण करतात ते संसारी आत्मे आहेत. ते चार गती, चोवीस दंडक, चौऱ्यांशी लाख जीवयोनींमध्ये अज्ञानामुळे संसरण करतात.

ह्या संसरणामध्ये कोणत्याही प्रकारे आनंद नाही तरी सुद्धा जीव त्याच्यातच रममाण होतो. त्याला ते अत्यंत प्रिय वाटते कारण तो मोक्ष सुखाच्या गौरवाला जाणत नाही. भटकण्यातच तो आनंद मानतो. ज्या योनीमध्ये, जन्मामध्ये अथवा जीवनामध्ये ज्या अनुकूल सुविधा आणि भौतिक सुख प्राप्त होते त्यातच तो रमून जातो. तो असा विचार करत नाही की कालांतराने हे सर्व काही सुटणार आहे. संसार भावनेमध्ये अशाप्रकारच्या विविधतेचे आचार्यांनी दिग्दर्शन करविले आहे.

आगमाच्या तृतीय अंग-स्थानांग सूत्रामध्येसुद्धा चार प्रकारच्या संसाराचा उल्लेख येतो.

द्रव्य संसार - जीव आणि पुद्गलांचे परिभ्रमण

क्षेत्र संसार - जीव आणि पुद्गलांच्या परिभ्रमणाचे क्षेत्र

काल संसार - उत्सर्पिणी इ. काळात होणारे जीव आणि पुद्गलाचे परिभ्रमण

भाव संसार - औदयिक इ. भावांमध्ये जीवाचे आणि वर्ण, गंध, रस, स्पर्श इत्यादींमध्ये पुद्गलाचे परिवर्तन.[१०४]

आणखीन चार प्रकारचा संसार सांगितला आहे -

१) नैरयिक

२) तिर्यग्योनिक

३) मनुष्यसंसार

४) देवसंसार

ह्या चतुर्गतीरूप संसारात परिभ्रमण करण्याची चार कारणे आहेत.

जसे १) महा आरंभ २) महा परिग्रह ३) पंचेंद्रिय जीवाची हत्या आणि ४) कुणप आहार अर्थात मांस भक्षण ह्या चार कारणांमुळे जीव नरक गतीमध्ये जाण्यायोग्य कर्माचे उपार्जन करतो.

१) मायाचार २) निकृतिमत्ता अर्थात दुसऱ्यांना फसविणे ३) असत्य वचन आणि ४) कूटतौल कुट माप (कमी तोलमाप केल्याने). यामुळे तिर्यंच गतीमध्ये जाण्यायोग्य कर्माचे उपार्जन होते.

१) प्रकृतीची भद्रता २) प्रकृतीची विनितता ३) सानुक्रोशता अर्थात दयाळूता आणि सहृदयता ४) अमत्सरित्वता अर्थात मत्सर भाव न ठेवल्याने, ईर्ष्या न केल्याने जीव मनुष्यगतीमध्ये जाण्यायोग्य कर्माचे उपार्जन करतो.

१) सराग संयम २) संयमासंयम ३) बालतप ४) अकाम निर्जरा यांनी जीव देवगतीमध्ये जाण्यायोग्य कर्माचे उपार्जन करतो.[१०६]

ह्या चतुर्गतींमध्ये भ्रमण करविणारी सोळा कारणे आहेत. ह्या सोळा चतुर्गतीभ्रमणांच्या कारणांमध्ये काही कारणे चांगली वाटतात. कारण प्रकृतीची भद्रता, विनितता तर असायलाच पाहिजे. ही गोष्ट खरी आहे परंतु जर राग असेल, आसक्ती असेल, अहंकार उत्पन्न होत असेल तर चांगली कार्येही संसार परिभ्रमणाची, कर्मबंधाची कारणे होतात. नरक, तिर्यंचगती यांच्या अपेक्षेने ही कार्ये योग्य होतील. परंतु मोक्षाच्या अपेक्षेने त्याज्य आहेत. जीवाला ह्या सोळा कारणांना सोडून मोक्षाला पोहचविणाऱ्या चार कार्यांची साधना केली पाहिजे.

१) ज्ञान - जीवादी नऊ तत्त्वांचे यथार्थ ज्ञान घेणे.

२) दर्शन - क्षयिक सम्यक्त्व अर्थात यथार्थ श्रद्धाशील होणे.

३) चारित्र्यशील - यथाख्यात चारित्रसंपन्न, शुद्ध संयमी होणे.

४) तपस्वी - सम्यकज्ञानपूर्वक यथार्थ रीतीने तप करणे.[१०७]

ह्या चार कर्माचे आचरण करणारे मोक्षास जातात. तेथून पुन्हा संसारात परिभ्रमण, संसरण करावे लागत नाही.

उपरोक्त चतुर्गती भ्रमणाच्या सोळा कारणांना जाणल्यानंतर कोणता असा जीव असेल जो अशाप्रकारच्या संसारचक्रामध्ये परिभ्रमण करण्यासाठी स्वतःच स्वतःला लाचार बनवेल.

मुमुक्षू जीव असा विचार करतो की -

'यो संसार असार महान, सार आप में आपा जान ।
सुख तै दुःख, दुःख ते सुख होय. समता चारो गति नहीं कोय ॥[१०८]

हा संसार असार आहे म्हणजे त्यात काहीच सार नाही. सार केवळ आपल्या स्वतःमध्येच आहे, आत्म्यात आहे. मनुष्य ज्यामध्ये सुख मानतो ते भौतिक पदार्थ, बाह्यभाव दुःखरूपी आहेत. व्रत, नियम, तप इत्यादींना दुःखरूप मानले जाते. परंतु ते सुख देणारे आहेत. ह्या चतुर्गती संसारामध्ये एकांतिक अथवा आत्यंतिक सुख कोठेच नाही.

संसारामध्ये सुखाची इच्छा करणे हे पाण्याचे मंथन करण्यासारखे आहे.

मंथन करे दिन रात जल, घृत हाथ में आवे नहीं ।
रज-रेत पेले रात दिन पर, तेल जो पावे नहीं ॥
सद्भाग्य बिन ज्यो संपदा मिलती नहीं व्यापार में ।
निज आत्मा के भान बिन त्यों सुख नहीं संसार में ॥[१०९]

पाण्याच्या मंथनाने तूप प्राप्त होत नाही. त्याचप्रमाणे सुखाचे साधन जोडण्यात, महाल सजविण्यात संपूर्ण जीवन व्यतीत होते आणि हाती काही लागत नाही, कारण इष्ट वस्तूला जोडणे हे बेडकाला तोलण्यासारखे असाध्य आहे.

तसेच जोपर्यंत एक संयोग जुळतो तोपर्यंत दुसरा विस्कळीत होतो. जेव्हा दात असतात तेव्हा चणे मिळत नाही आणि जेव्हा चणे मिळतात तेव्हा दात पडलेले असतात. ज्यांना दगड पचविण्याची शक्ती आहे त्यांना तूप, दुध मिळत नाही. ज्यांच्याकडे सर्वकाही- तूप, साखर, तेल, मीठ उपलब्ध आहे त्यांना हे सर्व खाण्याचे बंधन असते. ते केवळ मुगाच्या पाण्यावर स्वतःची गाडी चालवितात. ही वास्तविकता पाहिल्यानंतर संयोगात सुख शोधणे म्हणजे वेळ आणि शक्तीचा अपव्यय करण्यासारखे आहे हे स्पष्ट होते.

परद्रव्यन ते प्रीति जो है संसार अबोध ।
ताको फल गति चार में भ्रमण कहयो श्रुत शोध ॥[११०]

परद्रव्याच्या आसक्तीमुळे चतुर्गतीमध्ये भ्रमण करावे लागते. परद्रव्याचा राग वीतराग होण्यात बाधक आहे म्हणून ज्ञानचक्षू खोलून सांसारिक सर्व पदार्थांमधील राग

दूर केला पाहिजे. आत्म्याशिवाय कोणत्याही वस्तूवर ममत्व ठेवणे, म्हणजेच संसार होय, परिभ्रमण होय असे चिंतन केल्याने राग, आसक्ती नष्ट होईल.

''विगतो रागो यस्मात् विरागः तस्य भावः वैराग्य ।''

अर्थात ज्याच्यातून राग निघून गेला तो विराग आणि त्याचा भाव 'वैराग्य' आहे. वैराग्यभावामध्ये जो रममाण होतो तो 'स्व' वस्तूला ओळखण्याचा आणि पर वस्तूच्या संबंधाला हळूहळू कमी करण्याचा प्रयत्न करतो. ती 'स्व' वस्तू कोणती आहे आणि परवस्तू कोणती आहे हे त्याला समजणेसुद्धा अत्यंत आवश्यक आहे.

संसार भावनेमध्ये 'पर'चे वास्तविक स्वरूप, त्याचा जीवाबरोबरचा संबंध किती कसा? कोठपर्यंत आणि तो कोणत्या कारणास्तव उत्पन्न होतो, ह्याचा विचार केला. संसार भावनेच्या आधारे चिंतन केल्यावर वैराग्यभावना दृढ होते. ह्या जगाची वास्तविकता काय आहे ह्याचा विचार केल्याने हे स्पष्ट होते की ह्या जगात सर्व प्राणी सारखे नाहीत. प्रत्येकाची बुद्धिमत्ता, वैभव आणि क्षमता वेगवेगळी आहे. ज्याच्याजवळ 'पर' पदार्थाची विपुलता आहे तो अहंकाराने फुलतो आणि ज्याच्याजवळ काही नाही त्याच्यामध्ये हीनभावना उत्पन्न होते. ह्या दुविधामय संसारी जीवाच्या आजाराची चिकित्सा ही 'संसारभावना' आहे. पाच प्रकारच्या संसार परिवर्तनाला जाणणाऱ्याला हे कळून चुकते की एका जन्मात जर मनुष्य अनेक स्थितींचा अनुभव घेत असेल तर अनेक जन्मात त्याला कितीतरी अनुभव येत असतील ? जी, व्यक्ती ह्या संसार भावनेच्या संसरणशीलतेला जाणते तिला गर्व होत नाही किंवा हीन भावनासुद्धा राहत नाही. जर संसाराच्या ह्या भीषणतेला समजून सुद्धा ज्याला भय वाटत नसेल तर त्याला मोठे साहसी म्हटले पाहिजे. समोर शत्रूला पाहून सुद्धा त्याची उपेक्षा करणाऱ्याला काय म्हणावे ? चतुर्गतींचे दुःख ऐकले, अनुभव घेतला. परंतु आजही ज्ञानदृष्टीसमोर ते प्रस्तुत आहे तरीही त्याला नष्ट करण्याचा जर मनुष्याने प्रयत्न केला नाही तर मनुष्याचे शहाणपण व्यर्थ आहे.

जो सहृदयतेने ह्या संसार भावनेचे चिंतन करतो त्याच्या जीवनात एक दिव्य प्रकाश निर्माण होतो. जीवनाला सन्मार्ग दाखविणाऱ्या आणि कर्तव्यबोध करविणाऱ्या ह्या संसार भावनेला हृदयंगम केल्याने साधकासमोर संसाराचे शुद्ध स्वरूप स्वयमेव प्रकट होते. त्यामुळे संसारी जीवाची स्थिती कशी होते त्याचा साक्षात्कार होतो. चतुर्गतीच्या दुःखाचे वर्णन एकदा तरी मनामध्ये कंपन उत्पन्न करते. ह्या अनुपम भावनेला जो हृदयात स्थान देईल आणि सर्वज्ञाच्या वचनावर श्रद्धा ठेवेल त्याला संसारातील बिकट आणि विषम भाव

सतावू शकणार नाही. त्याला आत्मबळ प्राप्त होईल आणि त्याच्या हृदयात शुद्ध आत्म्याची अपूर्व ज्योत प्रकाशित होईल.

ज्याप्रमाणे जळत्या घरातून सारभूत वस्तू काढून घेतली तर जसे भविष्यात सुख मिळते तसेच जळत्या संसारातून आपल्या आत्मस्वरूपाला जाणून, आत्मज्ञान प्राप्त करून, उपाधीपासून जर दूर राहिलो तर विपत्तीपासून आपण वाचू शकतो. संसाराबद्दल उदासीनता आली तरीही ममत्त्वापासून मुक्ती मिळते.

''सुख की सहेली है अकेली उदासीनता
अध्यात्म की जननी है यही उदासीनता''

संसारातील विचित्रता पाहून हृदय वैराग्यमय होते. ह्या वैराग्याच्या शीतल पाण्याने वृत्ती उपशांत होतात. जगाच्या मोहाची आणि क्लेशपूर्ण परिणामांची धारा मंद पडते. जगातील कोणत्याही वस्तूसाठी मनामध्ये आवड उरत नाही. उदासीनता येते. गुजरातीमध्ये म्हटले आहे,

''उदासीनतानो ज्या वास, सकल दुःखनो छे त्या नाश''

अर्थात जेथे उदासीनता असते तेथे सर्व दुःखांचा नाश होतो. संसारामध्ये सुख-दुःख, संयोग-वियोग, लाभ-तोटा, जय-पराजय, संपत्ती-विपत्ती इ. प्रसंगामुळे व्याकुळता, हर्ष, शोक निर्माण होतात आणि त्यामुळे अस्थिरता प्राप्त होते. अस्थिरता कमी होऊन स्थिरता प्राप्त होईल अशा पुरुषार्थामध्ये उदासीनतेच्या क्रमाचे सेवन आहे. ह्या क्रमामध्ये सफलतेपूर्वक पुढे जाण्यासाठी सत्पुरुषांच्या चरित्राचे सुद्धा स्मरण, चिंतन करणे हितकारी आहे.

प्रत्येक जीवाच्या जीवनामध्ये साता-असाता वेदनीय कर्माचा उदय होत राहतो. तीव्र सातावेदनीयच्या उदयाने सांसारीक सुखाचे साधन सुलभतेने प्राप्त होते. अशावेळी समभाव प्राप्त होणे कठीण असते, तर गर्व, मद, प्रतिष्टेचा मोह, तृष्णा, अवगणना, तिरस्कार इ. दोषांचे आगमनाची संभावना होते. त्या दोषांपासून परावृत्त होण्यासाठी सत्पुरुषांच्या चरित्राचा आश्रय घेणे अत्यंत आवश्यक आहे. तसे करीत असताना जर अहंकारादी दोष निर्माण झाले तर तीर्थंकरांच्या बाह्य ऋद्धी-सिद्धी, वैभवादींचे स्मरण करून विचार करता की सर्वप्रकारची उत्तम शक्ती असतानाही ते अलिप्त राहत होते, गर्वापासून दूर होते. अशाप्रकारच्या चिंतनाने आत्मार्थी जीव बोध घेऊन उदासीन भावनेमुळे समभावात राहू शकतात. अशाप्रकारे साता वेदनीयाच्या उदयाने आत्मस्थिरता आणि आत्मशांती प्राप्त

करण्यासाठी सत्पुरुषांचे चरित्र आधारभूत आहेत.

जेव्हा असाता वेदनीयाच्या तीव्र उदयाने शारीरिक, मानसिक वेदना, वियोग, स्वजनांचे मरण इत्यादी प्रसंग उद्‌भवतात तेव्हा अत्यंत दुःखामुळे चित्ताची स्थिरता राहणे अथवा दुःख सहन करणे अत्यंत कठीण होते. अशावेळी धैर्य, समता, क्षमा आणि सहिष्णुता यांचा आश्रय घेऊन चिंतन करावे की तेविसावे, तीर्थंकर श्री पार्श्वनाथ प्रभू, चार ज्ञानाचे धारक, अनेक सिद्धींचे स्वामी, आत्मस्वभावाची पूर्णता प्रकट करण्याचे इच्छुक होते. त्यांनासुद्धा पूर्व जन्माचा वैरी कमठचा जीव देवगतीमध्ये होता तिथे त्याला पूर्व जन्माच्या वैराची आठवण होताच अनेक प्रकारचे मारणांतिक उपसर्ग देऊ लागला.

तरीही प्रभूंना समभावामध्ये स्थिर पाहून शेवटी भयानक वीजेच्या कडकडाटाबरोबर मुसळधार पाण्याचा वर्षाव केला. पाण्याची पातळी वर-वर चढत गेली आणि पार्श्वप्रभूंच्या खांद्यापर्यंत पोहचली तरीसुद्धा प्रभू स्थिर राहिले. त्यांना भीती वाटली नाही की द्वेष किंवा क्रोधही आला नाही. दुसरा कोणताच भाव त्यांच्यामनामध्ये नव्हता. त्यांच्या आत्म्यामध्ये केवळ हेच भाव होते की, सर्वांपासून सर्वप्रकारे मी भिन्न आहे. एकमात्र शुद्ध चैतन्य स्वरूप, परमोत्कृष्ट, अचिंत्य, सुखस्वरूप, शुद्ध अनुभवरूप 'मी' आहे. मी केवळ निर्विकल्प शुद्ध परमशांत चैतन्य आहे. निजस्वरूपात तन्मय होत आहे.

अशा चिंतनात तल्लिन असतानाच धरणेन्द्रदेवाचे आसन डोलायमान झाले. आणि उपयोग लावून पाहिले तर पूर्वभवाचे रक्षणकर्ते सन्मार्ग दर्शक परम उपकारी पार्श्वप्रभूंना उपसर्ग होत आहे. हे पाहून अविलंबगतीने अंशतः उपकाराचा मोबदला चुकविण्याच्या हेतूने, उपसर्ग दूर करण्यासाठी विराटकाय सर्पाच्या वलयाचे आसन करून, सप्तफणांची छत्री बनवून प्रभूंचे रक्षण केले. पाणी जसजसे वर चढत होते तसतसे आसनसुद्धा उंच जात होते. कमठचा जीव थकून गेला. इतक्यात पार्श्वनाथ प्रभूंना केवलज्ञान प्राप्त झाले. आणि सर्वत्र शांती झाली.

अशा घोर मारणांतिक उपसर्गामध्येही प्रभू कसे निर्विकार आत्मदर्शी होते ! त्यावेळी प्रभूंना उपसर्ग करणाऱ्याबद्दल द्वेष वाटत नव्हता किंवा रक्षण करणाऱ्याबद्दल प्रेम वाटत नव्हते ते केवळ समभावात स्थिर होते. समाधीमध्ये तल्लिन होते. आणि शुद्धोपयोगी सुधारस धारेत निमग्न होते.

अशाप्रकारे पार्श्वनाथ भगवानांचे स्मरण अवश्य केले पाहिजे. असे अनेक दृष्टांत आहेत. चोविसावे तीर्थंकर भगवान महावीरांना संगमदेवाने सहा-सहा महिन्यांपर्यंत उपसर्ग

दिला. तो पाहून महावीरांच्या डोळ्यात अनुकंपेचे अश्रू आले. ते विचार करू लागल की संगमने अज्ञानतेमुळे किती कर्मांचे उपार्जन केले ? अशा दृष्टांतामुळे साधकाच्या अंतःकरणात प्रेरणाबळ, इच्छाबळ आणि निश्चयबळ येणे सुलभ होते. कसोटीच्या प्रसंगी समभावाने राहण्याची प्रेरणा मिळते, शक्ती मिळते.[१११]

बहु उपसर्ग कर्ता प्रत्ये पण क्रोध नहीं ।
वंदे चक्री तथापि न थाये मान जो ॥
देह जाय पण माया थाय न रोममा ।
लोभ नहीं छो प्रबल सिद्धि निदान जो ॥[११२]
अपूर्व अवसर एवो क्यारे आवसे,

जेव्हा उपसर्ग देणाऱ्याचा सुद्धा क्रोध येणार नाही, चक्रवर्ती राजांकडून पूजिले गेल्यावर अभिमान वाटणार नाही, अनेक शारीरिक कष्ट सहन करावे लागले तरी मायेचा भाव निर्माण होणार नाही आणि जरी सिद्धीचे निदान प्राप्त झाले तरी लोभ निर्माण होणार नाही तेव्हा साधनेची सिद्धी झाली असे समजले पाहिजे. ज्याला संसाराबद्दल उदासीनता प्राप्त होईल तो अवश्य परमपद प्राप्त करेल.

ही भावना भवचा म्हणजे जन्ममरणाचा नाश करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. म्हणून हेमचंद्राचार्यांसारख्या अनेक आचार्यांनी ह्या भावनेचे विस्तृत विवेचन केले आहे. हिला 'भव भावना'सुद्धा म्हणतात. श्रीमद् राजचंद्र यांनी ह्या भावनेला 'निवृत्तिबोध' असे नाव दिले आहे.

एकत्व भावना

जैन दर्शन कर्मवादी आहे. प्रत्येक जीव आपल्या भविष्याचा निर्माता आहे. वस्तुतः कोणी कोणाचे चांगले करू शकत नाही किंवा वाईट करू शकत नाही. संसारात मनुष्य असे मानतो की अमुक माझा हितचिंतक आहे अथवा अमुक माझा शत्रू आहे. तो हितैषीच्या बरोबर मोहबद्ध राहतो आणि ज्यांना शत्रू मानतो त्यांच्याबद्दल त्याच्या मनात असहिष्णुता, क्रोध इत्यादी दुर्भावना राहते. ह्या संसाराचे चक्र अत्यंत विचित्र आहे. हे संसार भावनेत आपण पाहिले तरी मनुष्याची ही सर्वात मोठी चूक आहे की मी एकटा नाही. माझे अनेक मित्र, सगे-सोयरे आहेत. ते संकटात साथ देणारे आहेत. तो स्वतःला विसरतो. स्वतःला न जाणणे ही सर्वात मोठी चूक आहे. ही चूक जीवाच्या हातून न घडण्यासाठी एकत्व भावना आहे.

हे परम सत्य आहे की जीव सर्वथा एकाकी आहे. परंतु तो हे कसे मानणार ? त्याच्या चहूबाजूंना आई-वडील आणि नातेवाईक यांची छत्र-छाया आहे. मित्र आणि स्वजनांचा स्नेहस्निग्ध परिवार त्याला मिळालेला आहे. प्रियतमेचे अविच्छिन्न प्रेम त्याला प्राप्त झाले आहे. परंतु प्रत्येकाच्या जीवनात एक वेळ अशी येते की जेव्हा ते काहीच करू शकत नाही. जर तो असाध्य रोगाने पीडित झाला तर कोणीही त्याचे दुःख वाटून घेऊ शकत नाही. त्याला यमाच्या विक्राळ तोंडातून कोणी सोडवू शकत नाही आणि क्लेशाने अर्जित केलेल्या ज्या विपुल संपत्तीला तो स्वतःची समजून बसला आहे, ती निघून दुसरे तिचा उपभोग घेतात. म्हणून कोणी कोणाचा साथीदार, सहचर, रक्षक ह्या संसारात होऊ शकेल का ? अर्थात कोणीच नाही.

ठाणांग सूत्राच्या प्रथम स्थानामध्ये जेथे एकात्मक पदावलीचे वर्णन आहे तेथे "एगे आया"[११३] लिहिले आहे ते ह्याच भावनेचे द्योतक आहे.

आत्मा एक आहे असे जैन दर्शन मानत नाही. जैन दर्शनानुसार अनेक आत्मे आहेत. एकेका आत्म्याचे आपापले व्यक्तित्व, एकाकीत्व, स्वरूप, कर्म विद्यमान आहेत.

आत्माच आपल्या सुख-दुःखांचा कर्ता आणि विकर्ता आहे. सुप्रस्थित अर्थात सत्प्रवृत्तीत स्थित आत्माच आपला मित्र आहे आणि दुःप्रस्थित अर्थात दुष्प्रवृत्तीत स्थित आत्माच आपला शत्रू आहे. दुष्प्रस्थित आत्मा सर्व दुःखाचा हेतू असल्याने वैतरणी आहे, कुटशाल्मली वृक्ष आहे आणि सुप्रसिद्ध आत्मा सर्व सुखाचा हेतू असल्याने कामधेनू, नंदवनादीरूप आहे.[११४] एकत्व भावना ह्या सत्याला उद्घाटित उज्जागृत, उद्भाषित करते.

हा प्राणी आत्म्याच्या दृष्टीने एकटा आहे. स्वतंत्र आहे. एकटाच आलेला असून एकटाच जाणारा आहे. परंतु सोने जेव्हा खाणीमध्ये असते तेव्हा ते मातीबरोबर एकरूप झालेले असते परंतु तरी त्यात शुद्ध सुवर्णत्व तर अवश्य असते. अशा मिश्र स्थितीमध्ये कोणी त्याला पाहिले तर त्याला सुवर्णरूपात मानण्यासाठीही तयार होत नाही. आत्म्याची पण हीच अवस्था आहे. ज्याप्रमाणे मातीयुक्त स्थितीमध्येही सुवर्णत्व असते त्याचप्रमाणे आत्मा कर्मयुक्त असतानाही त्यात शुद्ध आत्मभाव अवश्य राहतोच. ही अत्यंत महत्त्वाची आणि लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

आत्मा जेव्हा संसारात भटकतो, नवे-नवे वेष धारण करतो तेव्हा हा अनंत गुणांचा स्वामी असेल हे तर केवळ आत्मज्ञानीच सांगू शकतो. अत्यंत शक्तिशाली आत्मा ह्यावेळी पिंजऱ्यात बंद आहे म्हणून पिंजऱ्यात कोंडलेल्या सिंहाप्रमाणे त्याची शक्ती कुंठीत

झाली आहे, सामर्थ्य क्षीण झाले आहे. तो पराधीन झाला आहे, त्याला पिंजऱ्यातल्या पाखराप्रमाणे आकाशातील स्वतंत्र हवेचा अनुभव नाही. हे सर्व समजविण्यासाठीच एकत्व भावना आहे. ह्या भावनेचे चिंतन केल्याने आपल्या मूळ स्वरूपाचे ज्ञान प्राप्त झाले तर त्याला प्राप्त करण्याचा मार्ग तो स्वतःच शोधू शकतो.

संसार परिभ्रमण करतानाही आपल्या आत्म्याच्या एकाकीपणाचा पुन्हा पुन्हा विचार करणारा, निःसङ्गतेची सिद्धी आणि मोक्ष पुरुषार्थाचे साधन प्राप्त करतो. त्या साधनाला साध्य करण्यासाठी सर्वप्रथम आत्म्याला विभाव देशेतून स्वभाव दशेत आणण्यासाठी स्वरूप बोधाची आवश्यकता आहे. स्वरूपबोध झाल्यानंतर अनादी संबंधालाही तोडले जाऊ शकते. जसे दुधात तूप एकत्रित असते परंतु विरझण किंवा दही मंथन करण्यासाठी, मंथन करण्याचे साधन, मंथन करण्यासाठी लागणारे भांडे, ह्या साधनांचा योग मिळाल्यानंतर तूप ताकरूपी संयोगाला सोडून आपल्या मूळ स्वरूपात विलग होते. त्याचप्रमाणे ज्ञानदर्शनादी चार साधनांच्या योगाने आत्म्याला कर्ममळापासून विलग करून ह्या अनादी संबंधाला तोडले जाऊ शकते आणि आत्म्याला एकत्वभावामध्ये प्रतिष्ठित केले जाऊ शकते.[११५]

साधकाने स्वतःला पर तत्त्वापासून भिन्न समजून आत्मकेंद्रित होण्याचा अभ्यास केला पाहिजे. वस्तुतः ज्या संबंधांना त्याने आपले मानले आहे त्यांच्या मोहातून तो सहजपणे सुटू शकत नाही तरी एकत्वभावनेच्या निरंतन चिंतनाने, अभ्यासाने आत्म्यात अनासक्त भावनेचा प्रकाश पसरेल आणि एक दिवस तोच प्रकाश जीवाला सर्वकाही सोडण्यासाठी तयार करेल. परंतु एकत्व आणि अनेकत्वावर विचार करण्याची आवश्यकता आहे.

आगम ग्रंथातील प्रथम अंगसूत्र आचारांग याचे "एगो अहंमसि ण मे अत्थि कोइ ण वाऽहमवि कस्सवि"[११५] अर्थात मी एक आहे, एकटा आहे कोणी माझा नाही किंवा मी कोणाचा नाही हे सूत्र एकत्व आणि अन्यत्व भावनेचा निर्देश करते.

ज्यांना ध्रुव बनायचे आहे त्यांनी सतत ह्या भावनेचे चिंतन अनुभावन करणे आवश्यक आहे. ह्या चिंतनाने आत्मा पूर्ण स्वतंत्र आणि सिद्ध होऊ शकतो. मुमुक्षुने उपकरण, आहार, शरीर, संघ, आणि सहकारी इत्यादींनी निरपेक्ष राहून एकमात्र आत्मावलंबी होऊन जीवन व्यतीत करावे. समाधी मरणाच्या तयारीसाठी सहायविमोक्ष अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. उत्तराध्ययन सूत्रामध्ये सहायप्रत्याख्यान शब्द विशेषतः एकत्वाच्या अर्थाने घेतला आहे.

सहाय प्रत्याख्यान म्हणजे संयमी जीवनामध्ये दुसऱ्या कोणाचा आश्रय न घेणे. त्याने साधक एकत्व भावाला प्राप्त होतो. एकत्वभावाला प्राप्त साधक एकाग्रतेची भावना करता करता विग्रह युक्त शब्द, वाक्कलह, कलह, कषाय आणि तू-तू-मी-मी इत्यादींपासून सहजपणे मुक्त होतो. संयम आणि संवरामध्ये पुढे जाता जाता समाधीअवस्थेत जातो.[११७]

श्रमण भगवान महावीर स्वामी गौतम गणधरांना सांगतात - हे इंद्रभूती ! संसारी आत्मा, संसाराच्या प्रपंचात फसून दुसऱ्यासाठी आणि स्वतःसाठी जो दुष्ट कर्मे करतो त्या कर्माची फळे जेव्हा भोगावी लागतात तेव्हा त्यांच्यासाठी ती दुष्ट कर्मे केली ते बंधु-बांधव, मित्र, सगेसोयरे पापाचे भागीदार होण्यास येत नाहीत.[११८] ज्या आत्म्याने कर्म केले तो आत्मा एकटाच त्याचे फळ भोगतो. येथे केलेली कर्मे मृत्यूनंतर त्याच्याच बरोबर जातात. आत्म्याचा सोबती त्याचे स्वतःचे कर्मच असते. कर्मामुळेच जीव परवश होता होता स्त्री, पुत्र, हत्ती, घोडे, शेत, घर, रुपये-पैसे, धान्य, चांदी, सोने इत्यादी सर्वांना मृत्यूच्या विळख्यात सोडून स्वतःच्या शुभाशुभ कर्माप्रमाणे स्वर्ग किंवा नरकामध्ये जातो.[११९]

एकत्वभावनेचे विवेचन सर्वाधिक रूपात आगम ग्रंथात प्राप्त होते. कारण हीच भावना अत्यंत महत्त्वाची आहे. जोपर्यंत मनुष्य मी एकटाच कर्माचा कर्ता आणि भोक्ता आहे हे समजणार नाही तोपर्यंत तो संसाराच्या मोह मायेचा त्याग करू शकणार नाही. आणि मोहरूपी कर्मच सर्व कर्मांचा राजा आहे. एक मोहरूपी कर्म नष्ट झाले तर बाकीची सात कर्मे नष्ट करायला वेळ लागणार नाही. ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीचे एक करोड रुपयांचे देणे आहे आणि तो ९९ लाख ९९ हजार ९९९ रुपये देणे देतो. नंतर केवळ एक रुपयाचे देणे राहिले असेल तर तो ते एकदम सहजपणे फेडू शकतो, त्याचप्रमाणे ज्याने मोहनीय कर्माला नष्ट केले आहे त्याला अन्य सात कर्मे नष्ट करणे एकदम सोपे आहे. ही एकत्व भावना मोहनीय कर्माच्या आवरणाला दूर करण्यासाठी वज्रासारखी आहे. आणि ह्या मोहाला दूर करण्यासाठी अनेक ग्रंथात वेगवेगळ्या शैलीने जीवाच्या एकत्वाला समजविण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

आचार्य कुंदकुंद यांनी एकत्व भावनेचे अत्यंत प्रेरक शब्दात वर्णन करताना लिहिले आहे - जेव्हा मनुष्य जन्म घेतो तेव्हा त्याच्याबरोबर कोणी येत नाही. हीच गोष्ट मृत्यूची आहे की कोणीही कोणाबरोबर मरत नाही. सर्वकाही सोडून एकट्यालाच जावे लागते.

कोणी असे समजतात की, मी माझ्यासाठी दुसऱ्यांकडून धर्माराधना करवून घेतो, पुण्यार्जन करवून घेतो, त्याच्या फलस्वरूपी स्वर्गसुख प्राप्त करेन असा विचार करणे हा त्याचा अज्ञानीपणा आहे.

धर्म, पाप, पुण्य सर्व काही मनुष्य एकटाच आणि स्वतःच करतो आणि केलेल्या कर्माचे स्वतःच फळ भोगतो.

पुढे पात्र-अपात्र कोण ? याचे विवेचन करताना ग्रंथकाराने सम्यक्त्वाने युक्त मुनींना 'उत्तम पात्र' सांगितले आहे आणि सम्यक् दृष्टी श्रावकाला 'मध्यम पात्र' सांगितले आहे. अविरत सम्यकदृष्टीला 'जघन्य पात्र' सांगितले आहे. व जो सम्यक्त्वरहित आहे त्याला 'अपात्र' म्हणून सांगितले आहे.

इथे असा संकेत केला आहे की पात्र-अपात्राची चांगल्याप्रकारे परीक्षा केली पाहिजे. त्यांच्या सांगण्याचा आशय हा आहे की मानवाला पात्रता प्राप्त करण्याच्या दिशेने प्रयत्न केला पाहिजे.

मिथ्यादृष्टी कुपात्र आहे. त्याला दान देणे योग्य मानले जात नाही. दान दिल्याने चतुर्विध संघात स्थिरता येते म्हणून दान देण्याची प्रवृत्ती मोक्ष मार्गाची प्रवृत्ती आहे. जर पात्र उत्तम असेल, देणाऱ्याची भक्ती श्रेष्ठ असेल आणि दान सुद्धा उत्तम असेल तर त्याचे फळही उत्तमच असते.

सर्व दानांमध्ये आहारदान प्रथम आणि मुख्य आहे. आहारदानाने सर्वांना सुख प्राप्त होते. आहार दानाने तिन्ही दान संपन्न झाले असे म्हटले जाते कारण आहाराच्या बळावर साधू दिवसभर शास्त्राध्ययन करतात. भूक, तहान यांचे रोग नष्ट करण्यासाठी आहार निमित्त तर आहेच परंतु आहराने प्राणांचे रक्षण होते म्हणून अभय देणारे आहे. अशाप्रकारे आहारदानामध्ये औषध, शास्त्र व अभय ही तिन्ही दाने गर्भित आहेत.

'मी एकटाच आलो आणि एकटाच जाणार आहे. ह्या शरीर, संपत्ती, पत्नी, कुटुंब याबरोबर राहत असतानासुद्धा मी एकटाच आहे' असे ज्यांचे चिंतन असेल तोच दान देऊ शकतो आणि दानामुळे जो धर्म, पुण्य होईल तोच जीवाबरोबर जातो बाकी सर्वकाही इथेच राहते. जीवनाचे परमसाध्य प्राप्त करायचे असेल तर जीव वीतराग प्रभूंद्वारा प्रतिपादित रत्नत्रयात्मक साधनेद्वारे आपल्या विषमकर्माचा क्षय करून टाकतो. वस्तुतः तो खऱ्या सुखाच्या मार्गावर चालणारा एकटाच आपल्या शुद्धात्म्याचा अनुभव करतो. कोणीही अन्य त्याला शुद्ध करू शकत नाही म्हणून संयमी साधकाने हे चिंतन केले पाहिजे की मी

एकटाच आहे, मी सर्वप्रकारे एकटा आहे, मी निर्ममत्वी आहे, माझे कोणीच नाही, मी कोणाचा नाही, मी शुद्ध आहे, सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान हे माझे लक्षण आहे. शुद्धत्व हेच एकमेव माझे उपादेय आहे. शुद्धात्म स्वरूपाला प्राप्त करणे हाच माझ्या जीवनाचा उद्देश आहे.१२०

आचार्य उमास्वाती यांनी संसाराला 'भवर' म्हणून संबोधिले आहे. समुद्रामध्ये पाणी जेथे गोल गोल चक्रासारखे फिरून खाली जाते त्याला 'आवर्त' अर्थात 'भवर' म्हणतात. संसाररूपी समुद्रातही जीव जेथे जन्म घेतो अथवा मरतो त्याला 'भव अथवा आवर्त' म्हणतात. त्या भवरूपी आवर्तामध्ये जन्ममरण करताना जीवाबरोबर कोणीही जात नाही. त्याला कोणीही सहायरूप होत नाही. मेल्यानंतर नरकादी गतींमध्ये आपल्या कर्माचे फळ एकटाच भोगतो. जीवासाठी हितकर संयमाचे पालन करणे अथवा त्याद्वारे प्राप्त होणारा मोक्षच आहे जो कधीही नष्ट होत नाही म्हणजे हा जीव एकटाच कष्ट भोगतो तर त्याला एकट्यालाच आपल्या आत्म्यासाठी हित साधले पाहिजे.१२१

इथे जीव ज्यांना माझे स्वजन, परिजन म्हणतो त्यातले कोणीही असे नाही की जे व्याधी, जरा, मृत्यू इत्यादींच्या दुःखाला दूर करू शकतील. संपूर्णच काय अंश अथवा अंशांशाला दूर करण्यात अथवा वाटून घेण्यातही कोणीच समर्थ होऊ शकत नाही. ज्या कर्माचा बंध मी केला त्याच्या फळाचा अनुभव करणारा सुद्धा मी एकटाच आहे. अशाप्रकारे आपल्या एकाकीपणाचे चिंतन केले पाहिजे.

जो मुमुक्षू सतत अशा प्रकारचे चिंतन करीत राहतो त्याला स्वजनांबद्दल आसक्ती राहत नाही आणि त्यामुळेच तो त्याच्या निमित्ताने पापकर्म करण्यापासून पराङ्मुख होतो अथवा विषयांपासून विरक्त होतो. त्याचप्रमाणे त्याला परजन इत्यादींबद्दल द्वेषसुद्धा वाटत नाही. त्यांना पर समजून त्यांचे अकल्याण करण्यातही प्रवृत्त होत नाही. म्हणून तो कोणावर प्रेम करीत नाही किंवा द्वेषही करीत नाही, फलस्वरूपी एकत्वाचा चिंतक रागद्वेषरहित होऊन निःसंगतेला प्राप्त होतो आणि तो मोक्षासाठीच प्रयत्न करीत राहतो.१२२

तो चिंतन करतो की बंधुबांधव आणि मित्र स्मशानाच्या पुढे बरोबर येत नाही. धर्मच नेहमी बरोबर राहणार आहे, धर्माची साथ कधीही सुटत नाही.१२३

एकत्वाचे द्रव्य, क्षेत्र, काळ आणि भाव हे चार भेद आहेत -

द्रव्य एकत्व - प्रत्येक जीव इत्यादी द्रव्य एकत्व आहे.

क्षेत्र एकत्व - आकाशाच्या एका परमाणूंच्याद्वारा आवृत्त केलेला जितका प्रदेश ते क्षेत्र एकत्व आहे.

काल एकत्व - एक क्षण इतका काळ म्हणजे कालएकत्व आहे.

भाव एकत्व - मोक्षमार्ग निश्चय नयाने भाव एकत्व आहे.[१२४]

सम्यग्दृष्टी जीवाला देह तुरुंगासारखा वाटतो. तुरुंगात साखळदंडाने अथवा दोरीने बांधलेल्या मनुष्याला ज्याप्रमाणे तुरुंगाविषयी ममत्व राहत नाही, त्याचप्रमाणे सम्यग् ज्ञानी मनुष्याला देहाची आसक्ती राहत नाही. त्यांना हे कळून चुकते की, ह्या शरीरामुळे धन, कुटुंब यांविषयी अभिमान उत्पन्न होऊन घोर बंधनात पराधीन होऊन दुःख भोगावी लागतात. आपल्या यथार्थ स्वरूपाला सोडून परद्रव्य परिग्रहाला आपले मानल्याने अनंतकाळापर्यंत संसारात परिभ्रमण करावे लागेल आणि एकट्यालाच अन्य गतींमध्ये जाऊन जन्म घ्यावे लागतील. त्यावेळी कर्माशिवाय दुसरे काहीच बरोबर जात नाही. मात्र पाप, पुण्य, धर्म आणि कर्मच बरोबर येतात.[१२५]

ज्यांना माहीत आहे की समोर विहिर आहे तर त्यात कोणीही मुद्दाम पडणार नाही. त्याचप्रमाणे सम्यग् ज्ञानी संसाराची असारता आणि एकत्वामध्ये सार दिसल्याने तो सार ग्रहण करण्याचाच विचार करतो आणि असारामध्ये कोणीच जात नाही.

बृहद् द्रव्यसंग्रहाच्या वृत्तीमध्ये श्री ब्रह्मदेव यांनी लिहिले आहे की, निश्चय रत्नत्रयरूपी एका लक्षणाचा धारक जो एकत्व आहे त्याची भावना करण्यात मग्न झालेल्या जीवाला निश्चय नयाने सहजानंद सुखादी अनंतगुणांचे आधाररूप केवलज्ञान सहज प्राप्त होते. ते एकच आहे. तसे तर ज्ञानाचे पाच भेद आहेत. परंतु केवलज्ञान झाल्यानंतर अन्य सर्व ज्ञान गौण होते. आर्त रौद्र ध्यान न राहता परम सामायिक रूप एकत्वभावनेमध्ये परिणत झालेले जे आत्मतत्त्व आहे ते अविनाशी आणि परम हितकारी असे आहे. पुत्र, मित्र, कलत्र इत्यादी कोणीच हितकारी नाही. अशा रूपात अवस्थित आत्मा सर्वथा एकाकी आहे आणि सर्व वैभाविक दशा आहेत. एकत्व भावनेचे हे तात्त्विक तात्पर्य आहे.[१२६]

आपल्या आत्म्यामध्ये एकाग्र होऊन शुद्ध निश्चय नयाची भावना करता करता अनन्तज्ञानमय आत्मस्वरूपाची भावना केली पाहिजे. त्याच्याशिवाय बाह्यपदार्थ बंधाचे कारण आहेत. एका आत्म्याशिवाय अन्य कोणीच आपले सहायक नाही.[१२७] म्हणून कठोर उपसर्गाच्या दुःखातसुद्धा मुनी दुसऱ्यांच्या सहकार्याची इच्छा ठेवत नाही. परंतु श्री महावीर प्रभूप्रमाणे स्वतः सर्वकाही सहन करतात.

श्री जिनचंद्रसूरींद्वारे प्रणीत संवेग रंगशाला नामक ग्रंथामध्ये क्षपकमुनींना श्रमण भगवान महावीरांच्या एकत्व निष्ठेचा दृष्टांत देऊन मुनींना एकत्वभावनेचे चिंतन-मनन करण्याचे आणि एकत्वाचे अनुसरण करण्याचा बोध दिला आहे.

भगवान महावीरांनी आपल्या स्वजनांचा स्नेह सोडून दीक्षा घेतली. दीक्षेच्या पहिल्या दिवशीच कुमारगावाच्या बाहेर कायोत्सर्ग ध्यान करीत असताना कोण्यापापी गवळ्याने सांगितले की मी जोपर्यंत घरी जाऊन परत येत नाही तोपर्यंत तुम्ही माझ्या ह्या बैलांचे रक्षण करा, असे सांगून गवळी निघून गेला. प्रभू तर ध्यानात मग्न होते. बैल तिथून निघून गेले. थोड्यावेळाने गवळी परत आला आणि तेथे बैल न दिसल्याने भगवंतांना विचारले माझे बैल कोठे गेले ? प्रत्युत्तर काहीच मिळाले नाही त्यामुळे गवळी दुःखी झाला आणि तो सर्वत्र बैलांना शोधू लागला. बैलसुद्धा चरून खूप वेळाने प्रभूंजवळ आले. गवळीसुद्धा रात्रभर भटकून तेथे आला. बैलांना प्रभूंजवळ पाहून विचार केला की नक्कीच ह्यांनी बैलांचे हरण करण्यासाठी त्यांना लपवून ठेवले होते. अन्यथा मी विचारल्यानंतर उत्तर का दिले नाही ? असा विचार मनात आल्याने त्याला खूप राग आला आणि प्रभूंना मारण्यासाठी धावला. त्याचवेळी सौधर्मेन्द्र अवधिज्ञानाने प्रभूंची अशी अवस्था पाहून त्वरितच स्वर्गातून खाली उतरला आणि गवळ्याचा तीव्र तिरस्कार केला. प्रभूंना तीन प्रदक्षिणा घालून नमस्कार करून भक्तिभावाने म्हणू लागला,

आजपासून बारा वर्षापर्यंत आपणास खूप उपसर्ग येतील' म्हणून तुम्ही मला आज्ञा द्या की मी दुसरी सर्व कामे सोडून तुमच्याजवळच राहिन. मी मनुष्य, तिर्यंच आणि देवांद्वारे आलेल्या उपसर्गाचे निवारण करीन,. तेव्हा प्रभूंनी सांगितले - हे देवेन्द्रा, तू जे सांगतो तसे कधी होत नाही किंवा झाले नाही आणि होणारही नाही. संसारात भ्रमण करणाऱ्या जीवाने स्वतः स्वेच्छेने जे कर्म बांधून घेतले आहे. त्याचा क्षय ते कर्म भोगल्याशिवाय अथवा कठीण तपस्या केल्याशिवाय होत नाही. दुसऱ्याच्या मदतीमुळे त्याची निर्जरा होत नाही. कर्माधीन झालेला जीव एकटाच सुखदुःखाचा अनुभव घेतो. इतर तर केवळ त्याच्या कर्मानुसारच उपकार किंवा अपकार करण्यास निमित्तमात्र होतात. प्रभूंनी असे सांगितल्यावर इंद्र नतमस्तक झाले आणि त्रिभुवन नाथ प्रभूंनीसुद्धा एकट्यांनीच स्वेच्छेपूर्वक कठीण परिसह सहन केले. अशाप्रकारे जर चरम तीर्थंकर श्री महावीर प्रभूंनी एकट्यांनीच दुःख सहन केलीत तर हे क्षपक मुनी ! तू एकत्व भावनेचे चिंतन करणारा का होत नाहीस ? अशाप्रकारे स्वजन इत्यादी विविध बाह्य वस्तूंचा संयोग झाला तरी तत्त्वतः जीव एकटाच आहे. जीवाचे एकत्व आहे असे चिंतन कर. १२८

जेव्हा जीव विभ्रम सोडून आपल्या खऱ्या स्वरूपाला समजून घेतो की मी एकात्मक आहे तेव्हाच त्याचा जन्मसंबंध ह्या संसारातले आवागमन विशीर्ण होते.

शुभचंद्राचार्यांनी मोठ्या रहस्यमय गोष्टींचे उद्‌घाटन केले आहे. वास्तविक जेव्हा प्राण्यांमध्ये ही भावना उत्पन्न होते की, ज्यांना तो आपले समजतो ते सर्व सोडून जाणारे आहेत. तो स्वतःच स्वतःच्या बंध आणि मोक्षाचा स्रष्टा आहे, असे सर्व भाव जाणल्यानंतर जीव बंधावस्थेकडे का जाईल ? तो मुक्तत्वाकडे जाईल म्हणूनच आचार्यांनी भवभ्रमण विशीर्ण होण्याची घोषणा केली आहे.[१२९]

कल्पना करा की एक व्यक्ती आपल्या अशुभ कर्मांच्या परिणामांमुळे नरकात जाते. आपल्या भव प्रत्यय अवधिज्ञानाद्वारे जर त्याला अनुभव आला की, मी जी संपत्ती अत्यंत परिश्रमपूर्वक एकत्रित केली होती, तिचा उपभोग अन्यलोक घेत आहेत तर त्याला केवढा पश्चाताप होत असेल ? परंतु पाप करून धन उपार्जन करणारा नरकात आपल्या केलेल्या कर्माचे फळ एकटाच भोगत असतो.[१३०]

चैतन्यरूप एकत्वाचे ज्ञान दुर्लभ आहे परंतु तेच ज्ञान मोक्ष देणारे आहे. जर ते कशाही प्रकारे प्राप्त झाले तर त्याचे पुन्हा पुन्हा चिंतन केले पाहिजे.[१३१]

मनुष्य इतका मोहात फसला आहे की मी एकटा आहे असे ज्ञान होणे कठीण आहे आणि ज्याला नमी राजर्षीप्रमाणे एकदा ज्ञान होते तो पुन्हा संसाराच्या मोहमायेमध्ये गुरफटत नाही. नमी राजर्षींचे उदाहरण तिसऱ्या प्रकरणात उद्‌धृत केलेले आहे. ते उदाहरण ह्या भावनेच्या पुष्टीसाठी अत्यंत प्रेरणास्पद आहे. ह्या भावनेच्या चिंतनाने त्यांनी आत्मबोध प्राप्त केला.

ज्याप्रमाणे उत्कृष्ट नौका प्राप्त झाल्यावर स्थितप्रज्ञ साहसी पुरुष समुद्राच्या अपरिमित जलाने भयभीत होत नाही त्याचप्रमाणे एकत्वला जाणणारा योगी कठोर कर्मालासुद्धा घाबरत नाही.[१३२]

आज मानवाला धन, पुत्र, मित्र, परिवार यांची आवश्यकता वाटण्याचे कारण हे आहे की, तो विचार करतो की ते मला संकटाच्या वेळी उपयोगी पडतील. परंतु ज्यांनी एकत्व भावनेचे चिंतन केलेले आहे, संसाराबद्दलची विचित्रता, अशरणता आणि अनित्यता जाणली असेल तो कधीच एकटा राहण्यासाठी भीत नाही किंवा कर्म भोगण्याची त्याला भीती वाटत नाही. ''आलिया भोगासी असावे सादर'' समोर आलेल्या कर्माला भोगण्यासाठी तो सदैव तत्पर असतो. तो खिन्नतेचा अनुभव करीत नाही.

संसारात लोक कोणाचा मृत्यू झाल्यावर शोक करतात, धन नष्ट झाले असता दुःखी होतात. परंतु स्त्री, पुत्र, धन आणि भवन इत्यादींच्या मोहपाशात गुंतण्यासारखे काही नाही कारण ते क्षणात दृश्य-अदृश्य होणारे आहेत. पाहता पाहता ते नष्ट होतात.

जीव एकटाच स्वतःला कर्मांनी कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे गुंडाळून घेतो, आवृत्त करीत राहतो. पुन्हा कधी पुण्याच्या उदयाने दान, व्रत, उपवास, सम्यक्त्व, लक्षणरूप प्रशमतंतूंचा आसरा घेऊन कर्मपाशातून सुटतो, ज्यायोगे मोक्षस्थानापर्यंत पोहचता येते. अर्थात आपणच कर्मांनी बद्ध होतो आणि स्वतःच मुक्त होतो. दुसरा कोणीच आपल्याला बांधत नाही किंवा सोडवित नाही.[१३३]

ह्याच गोष्टी वैराग्यशतकाच्या एका प्रसिद्ध गाथेमध्ये अधिक स्पष्ट करून सांगितल्या आहेत. तेथे लिहिले आहे -

अडकम्मपासबद्धो, जीवो संसारचरिए ठाइ ।
अडकम्मपासमुक्को, आया सिवमंदिरे ठाइ ॥

अष्टकर्मरूपी पाशाने बद्ध जीव संसाररूपी तुरुंगात राहतो आणि अष्टकर्मरूपी पाशातून मुक्त झालेला आत्मा शिवमंदिरात राहतो. ह्याचे विवेचन पन्यास रत्नसुंदर विजयजींनी अत्यंत हृदयस्पर्शी शब्दात केले आहे.

लहानसे बंधनसुद्धा जीवाला पराधीन बनवते, तर ज्यांना आठ आठ कर्मांचे बंधन आहे अशा व्यक्तीने त्या कर्मबंधनातून सुटका होण्यासाठी किती प्रयत्न केला पाहिजे?

घरात एका भिंतीच्या मागे असलेल्या सामग्रीचे दर्शन करविणे कठीण होत असेल तर ज्ञानावरण, दर्शनावरण, वेदनीय, मोहनीय, आयुष्य, नाम, गोत्र आणि अंतरायरूपी आठ आठ भिंतींच्यामागे असलेल्या आत्म्याचे दर्शन कसे होऊ शकेल ? परंतु ह्या भिंती दुसऱ्या कोणी निर्माण केलेल्या नाहीत. हे बंधन तर आत्म्याने स्वतःवर थोपवून घेतले आहे आणि म्हणूनच आत्मा जेव्हा बाटेल तेव्हा ह्या बंधनातून मुक्तसुद्धा होऊ शकतो. असे तेव्हाच होईल जेव्हा जीवाला सर्वज्ञप्रणीत वचनावर श्रद्धा होईल. मी अनंतज्ञान, अनंतदर्शन इत्यादी गुणांचा मालक आहे. मी एकच आहे, नित्य आहे, ज्ञानदर्शनियुक्त आहे. बाकी सर्व काही बंधन आहे अशा आत्म-विचारात स्वतःला निमग्न केले तर बंधनातून मुक्त होणे अत्यंत सोपे आहे.

परंतु जीवाने जर आठ कर्मांच्या बंधनाबरोबर समाधान मानले आणि विचार

केला की हे बंधन तर अनादिकाळापासून आहे, या बंधनातून मुक्त होण्याची शक्ती, ते बंधन तोडण्याची शक्ती आपल्यामध्ये कोठे असणार ? अशाप्रकारच्या दुर्बळ वृत्तीच्या माणसासमोर जरी स्वतः तीर्थंकर परमात्मा उपस्थित झाले तरी त्या बंधनातून त्याची सुटका होऊ शकत नाही.

दुसऱ्यांनी बांधलेल्या बंधनातून सुटणे कदाचित कठीण आहे. परंतु स्वतःनेच जी बंधने निर्माण केली आहेत त्यातून सुटका होऊ शकते. मनुष्याने उपाय केले तर क्षणात त्याची सुटका बंधनातून होऊ शकते.

हे एका उदाहरणाद्वारे समजू शकेल -

रणप्रदेशात पंचवीस उंट बरोबर घेऊन एक माणूस एका गावाहून दुसऱ्या गावी जाण्यासाठी निघाला. रात्र होताच रानामध्ये विश्राम करण्यासाठी थांबला. आपल्या सामानांमधून उंटांना बांधण्यासाठी दोऱ्या काढू लागला. परंतु हैराण झाला. कारण उंट तर पंचवीस होते आणि दोऱ्या चोवीसच होत्या. आता काय करावे ? असा प्रश्न त्याच्यासमोर उभा राहिला. त्याने त्याच्याबरोबर आलेल्या त्या क्षेत्राचा आणि कार्याचा अनुभव असणाऱ्या व्यक्तीला म्हटले की, हा रणप्रदेश आहे. आणि त्यातून ही रात्रीची वेळ, भयंकर तुफान, चोरांचे भय. उंट कदाचित पळूनही जातील अथवा चोरीला जातील अशी परिस्थिती आहे. आता काय करावे ? बरोबरच्या साथीदाराने सांगितले, घाबरण्यासारखे काहीच नाही, सर्व उंटांप्रमाणे ह्यालासुद्धा दोरीने बांधण्याचे केवळ नाटक कर, तो कोठेच जाणार नाही. दोरीची काहीही आवश्यकता नाही. बांधण्याच्या नाटकानेसुद्धा तो कोठेच जाणार नाही.

उंटाच्या मालकाला मात्र ही गोष्ट पटली नाही. परंतु सल्ला देणारा मोठा अनुभवी होता म्हणून त्याच्या सल्ल्याप्रमाणे काम करणे त्याने स्वीकारले. आणि तसेच केले. चोवीस उंटांना दोरीने बांधून टाकले आणि पंचविसाव्या उंटाला मात्र दोरीने बांधण्याचे केवळ नाटक केले आणि आश्चर्य तो उंट दोरी आणि खुंटीशिवाय अन्य बांधलेल्या उंटाबरोबर स्वतःसुद्धा बद्ध आहे ह्या भ्रमात रात्रभर उभा राहिला.

सकाळ होताच त्याने चोवीस उंटांचे बंधन सोडले आणि त्यांना घेऊन पुढे चालू लागला. परंतु तो पंचवीसावा उंट मात्र तसाच उभा राहीला. चाबकाने मारून त्याने उंटाला पुढे चालविण्याचा प्रयत्न केला परंतु तो सुद्धा एक पाऊलही पुढे चालला नाही. तेव्हा त्याने अनुभवी मित्राचा सल्ला घेतला.

त्या मित्राने सांगितले की तू त्याची दोरी सोडली का ? परंतु त्याला बांधलेलाच

नाही त्यामुळे सोडण्याची आवश्यकता सुद्धा नाही. तेव्हा मित्र पुन्हा म्हणाला, तो मुक्त आहे असे तू मानतो. परंतु तो तर स्वतःला बंदिस्तच समजत आहे आणि म्हणूनच इतर चोवीस उंटांप्रमाणे रात्रभर तो उभा सुद्धा राहीला. जोपर्यंत अन्य उंटांना तुम्ही जसे सोडले तशी सोडण्याची नक्कल त्याच्या बरोबर करीत नाही तोपर्यंत कितीही चाबूक मारले तरी त्या उंटाला पुढे चालविण्यात तुम्ही यशस्वी होणार नाही आणि खरोखर त्या उंटाला खुंट्यातून सोडविण्याचे केवळ नाटक केले आणि चाबकाने मारल्याशिवायच तो उंट पुढे चालू लागला.[१३४]

मनुष्याची सुद्धा हीच स्थिती आहे. आपण स्वतःच स्वतःला बांधलेले असते आणि तेव्हा जेव्हा वाटेल तेव्हा स्वतःच बंधनातून मुक्त होऊ शकतो. परंतु त्या दिशेने पुरुषार्थ करण्याची आवश्यकता आहे. सर्वकाही आपल्यावरच निर्भर आहे. परमगती प्राप्त करायची असली तरी सुद्धा आपण स्वतंत्र आहोत आणि सातव्या नरकात जायचे असले तरीही आपण स्वतंत्र्य आहोत. आपल्याला कोणी बळजोरीने बांधू शकत नाही आणि हाथ पकडून कोणी मुक्तीकडे सुद्धा नेऊ शकत नाही.

प्रत्येक जीव स्वतःस्वतःचे कर्मफल एकटाच भोगत असतो. म्हणून साधकाने समुहात राहून एकांततेचा अनुभव करण्यास शिकावे लागेल. एकत्व भावनेचे चिंतन करावे लागेल. निसंगपणे अर्थात संगरहित राहावे लागेल. संग केवळ पर वस्तूचाच होतो असे नव्हे तर 'स्व'वस्तूचा संगतर नेहमीच असतो. संयोग, वियोग पर वस्तूचा होतो. आत्म्याचा वीतराग भाव तर आत्म्याजवळ निरंतर आहेच. असे सतत चिंतन-अनुभावन करावे लागेल.

मुले जेव्हा शाळेत जाऊ लागतात तेव्हा त्यांना सर्वप्रथम एक अंक शिकवितात. त्याने सुद्धा एकत्वाची प्रेरणा प्राप्त होऊ शकते. ज्यांच्या मनात एकत्वाची भावना ठसते, त्याची प्रत्येक वस्तूमध्ये अनासक्त भावना निर्माण होते.

एकत्व भावनेचे जेव्हा चिंतन करायचे असेल तेव्हा सर्व प्रथम हे जीवा ! असा विचार कर की, तुझ्या पूर्वभवाचे कोणी पुत्र इत्यादी ह्या भवामध्ये तुझ्याबरोबर आले आहेत का ? जर आले असते तर अंदाजाने सांगितले असते की ह्या जन्मातील सुद्धा कोणी संबंधी मरून तुझ्याबरोबर जातील. म्हणून हे माझे आहे या मिथ्या अभिप्रायाला सोडून दे, आणि हे जीवा ! काय तू जिवंत असताना अनुभव घेतला आहेत की ज्यांना तू स्वतःचे मानतोस ते ऐश्वर्याच्या काळात तुझे जसे आत्मिय होतात तसे विपत्तीच्या काळातही सहायक झाले आहेत का ? परंतु जीवावर उपकार करण्यासाठी पुण्य कर्म

आणि अपकार करण्यासाठी पापकर्मच बरोबर जातात आणि इहलोक अथवा परलोकामध्ये त्याचे फळ जीव एकटाच भोगतो.[१३५]

ह्या गाथेमध्ये पंडित आशाधर यांनी अत्यंत सुंदर सांगितले आहे - जर कोणीबरोबर परलोकात गेले असते तर लोक त्या दृष्टांताच्या आधारे हे सिद्ध करू शकले असते की जीवाबरोबर परलोकामध्येही कोणी स्नेही-संबंधी जातात. परंतु असे कधी झाले नाही किंवा होणारही नाही.

ह्यामध्ये आणखी एक महत्त्वाची गोष्ट स्पष्ट केली आहे की इहलोक व परलोकात खूप अंतर आहे. परंतु वैभवाच्या काळात जीव ज्यांना स्वतःचे, आपले मानतो असे लोक विपत्ती अथवा दुःखाच्या काळात सहायक होत नाहीत. कर्मामुळे जर कोणी करोडपती, रोडपती झाला तर त्याच्या नातेवाईकांना हा माझा भाऊ आहे, हा माझा मामा आहे अथवा अन्यकाही नाते आहे हे सांगण्याची सुद्धा त्यांना लाज वाटते. ज्यांच्यासाठी जीवनभर कष्ट केले असे नातेवाईकसुद्धा दुःखात उपयोगी होत नाहीत म्हणून ग्रंथकार पुढे म्हणतात -

जीव जे पुण्य अथवा पाप कर्म करतो ती परलोकात त्याच्याबरोबर जातात आणि त्याच्या फलस्वरूपी तेथेसुद्धा सुख आणि दुःख भोगतात. अन्य दुसरा कोणीच आत्म्याबरोबर जाणारा नाही.

ह्या शरीरामध्ये जन्मकाळापासूनच ममत्व आणि अहंकाराचे संस्कार दृढ झाले आहेत. जर हे शरीर मेल्यानंतर जीवाबरोबर एक पाऊलही पुढे जात नाही तर आत्मा आणि शरीर यापासून भिन्न दिसणारे स्त्री, सुवर्ण इत्यादी पदार्थांची काय कथा ? अर्थात व्यवहार नयरूप नेत्ररोगाद्वारे आरोपित माझा आत्मासुद्धा भेदरूपी आत्म्याचे दर्शन घडवितो. निश्चय नयाने तर मी एकटाच आहे.[१३६]

ह्यात ग्रंथकारांच्या सांगण्याचा मतितार्थ असा आहे की, जीवाचा अतिघनिष्ट संबंध शरीराबरोबर आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत कोणत्याही परिस्थितीत शरीराच्या बरोबरच संबंध राहतो, म्हणून हे शरीर माझे आहे असा ममत्वभाव तीव्र होतो. आणि मी राजा आहे, मी शेठ आहे, सावकार आहे हा अहंकारसुद्धा निर्माण होतो. हे भाव आत्म्याचे नाहीत. कर्माच्या उदयाने उत्पन्न झालेले ममत्व आणि अहंकार आत्म्यापासून भिन्न आहेत. मेल्यानंतर हे शरीर ज्याला पुष्ट करण्यासाठी, सजविण्यासाठी जीवन पूर्णपणे खर्ची करतो परंतु ते एक पाऊलसुद्धा पुढे जात नाही. तसेच स्त्री पुत्र, पैसा, परिवार इत्यादी प्रत्यक्षभिन्न असणाऱ्या गोष्टींची सुद्धा जीवाबरोबर जाण्याची कल्पना करणे व्यर्थ आहे.

उपाध्याय श्री विनयविजयजी यांनी एकत्व भावनेचे विशिष्ट स्पष्टकरण करताना सांगितले आहे - हा आत्मा एकच आहे, हाच प्रभू आहे, भगवान आहे, ज्ञानदर्शनाच्या तरंगामध्ये मस्त आहे. ह्याशिवाय जे काही आहे ते सर्वकाही केवळ ममत्व आहे. केवळ कल्पनामात्र आहे. हे ममत्व व्याकुळतेला वाढविणारे आहे.[१३७]

ग्रंथकाराचा सांगण्याचा भावार्थ हा आहे की साधकाने सतत चिंतन केले पाहिजे की, मी आत्मा आहे. मी विशुद्ध आत्मद्रव्य आहे, आत्मसत्ता आहे, शुद्ध ज्ञान, दर्शन माझा गुण आहे. कल्पना जग हे वेगळे आहे. आत्म्याची मस्ती अन्य आहे. त्याचाच अनुभव घ्यायचा आहे. साधकाने आत्मध्यानात सदैव लीन राहीले पाहिजे आणि विचार केला पाहिजे की,

''आतम सर्व समान निधान महासुख कंद ।
सिद्ध तणा साधर्मि सत्ताए गुणवृन्द ॥''

विशुद्ध आत्मसत्तेच्या दृष्टीने सर्व आत्मे सारखेच आहेत, समग्र आत्मसृष्टी एकच आहे. जशी स्थिती सिद्ध परमात्म्याची आहे तशीच सर्व आत्म्यांची आहे. ह्या दृष्टीने विशुद्ध आत्मसत्तेच्या दृष्टीने आपण सिद्धचे साधर्मिक आहोत. सिद्धांप्रमाणे अनंत सुखमय, ज्ञानमय, गुणमय आहोत. सर्व आत्म्यांची सत्ता सुद्धा सारखीच आहे.

साधर्मिक म्हणजे असे लोक ज्यांचे गुणधर्म सारखे असतात. सिद्धांमध्ये ज्ञान, सुख, आनंद इत्यादी अनंत गुण आहेत ते आपल्यामध्ये सुद्धा आहेत.

आत्माच भगवान आहे, प्रभू आहे म्हणजे मी आत्मा आहे, भगवान आहे, सिद्ध आहे, बुद्ध आहे, मुक्त आहे, पूर्णानंदी आहे, पूर्ण ज्ञानी आहे, पूर्ण सुखी आहे. शुद्ध नयाने, अशा भावनेने सतत युक्त असते त्यामुळे पापाचा नाश होतो आणि आत्मस्वरूप प्रकट होते.

एकत्व भावनेमध्ये सर्व व्यक्ती आणि वस्तूंना आपले न मानता ''माझा आत्माच आहे'', ''मी आत्मा आहे'' आणि जेव्हा पर भाव सुटतो तेव्हा तर 'स्व' मध्ये आल्यानंतर आत्मा आपल्या स्वजनांना शोधतो. आत्म्याचे स्वजन त्याच्या गुणधर्मांप्रमाणेच होऊ शकतात म्हणून सिद्धांचे जीव स्वजन आहे. अन्य कोणीही बरोबर राहणारे नाही.

उपाध्याय श्री यशोविजयजीच्या 'अमृतवेली' काव्याचे प्रसिद्ध पद आहे -

देह-मन वचन पुद्गल थकी कर्म थी भिन्न तुज रुपरे,

अक्षय अकलंक छे जीवनुं ज्ञान आनंद स्वरूप रे ॥

शरीर, मन, वचनाने मुक्त, कर्माने मुक्त असणारी आत्मसत्ता हेच तुझे स्वरूप आहे असे चिंतन करायचे आहे.

"मी मन स्वरूप नाही, मन पौद्‌गलिक आहे, मी आत्मा आहे.

मी वचन स्वरूप नाही, वचन पौद्‌गलिक आहे, मी चैतन्य आहे.

मी शरीर स्वरूप नाही, शरीर पौद्‌गलिक आहे, मी आत्मा आहे.

मी आत्मा आहे, चैतन्य स्वरूपी आहे, कर्मापासून भिन्न आहे.

मी ज्ञानात्मा आहे, मी दर्शनात्मा आहे, मी स्वगुणभोगी आहे."

अशाप्रकारे आत्म्याच्या एकत्वाचे चिंतन केल्याने मी एकटा आहे. माझे कोणी नाही अशी दीनता येणार नाही. परंतु आत्मविश्वास वाढेल, आत्मश्रद्धा निर्माण होईल. खऱ्या अर्थाने हीच आपली ओळख आहे.

पर वस्तूचा परिचय आत्म्याची ओळख करण्यात अडथळा असून घातक ठरतो. पर द्रव्याचा परिचय झाल्यावर त्याने सुख प्राप्त करण्याची अनादी काळाची वाईट सवय जागृत होते. ती सवय त्याला सोडावी लागेल. परस्त्रीबरोबर ममत्व करण्याचा परिणाम म्हणजे मनुष्याला आपल्या जीवनापासून हात धुवावे लागतात. परंतु पर द्रव्याच्या ममत्वाचा परिणाम तर त्याच्यापेक्षा अधिक भयंकर होतो. हजारो जन्मापर्यंत दुःखे भोगावी लागतात. म्हणून परभावाने आणि पर द्रव्याबरोबर कधीही ममत्व राखायचे नाही.

रामाच्या काळातल्या रावणापासून तर वर्तमानकाळातील रावणापर्यंत पाहा. परद्रव्याबरोबर ममत्व ठेवणाऱ्यांच्या भयंकर पीडेचा इतिहास असंख्य वर्षापासून आहे, त्याला वाचल्याने व शास्त्र वाचल्याने त्यांच्या भयंकरतेचे ज्ञान होईल. त्यायोगे ममत्व सोडण्याची प्रेरणा प्राप्त होईल.

उपाध्यायजी आपल्या मनाला संबोधून म्हणतात अरे, माझ्या मना ! परभवाच्या ह्या आवरणाला तोडून थोडा मुक्त हो. ज्यामुळे आत्मविचाररूपी चंदन वृक्षाची शीतल हवा तुला स्पर्श करू शकेल.

ह्या मनाला परभावाने आवृत्त सांगितले आहे आणि आत्मविचाराला शीतल चंदनाच्या वृक्षाचे उदाहरण दिले आहे. ह्यावरून उपाध्यायजींच्या सांगण्याचा हा अभिप्राय आहे की, ज्याप्रमाणे चंदनाच्या वृक्षावर सर्प लटकलेले असतात, जोपर्यंत ते सर्प दूर होत

नाहीत तोपर्यंत व्यक्ती त्या वृक्षाच्या शीतल, सुगंधित हवेचा आनंद घेऊ शकत नाहीत. त्याचप्रमाणे हा आत्मा परद्रव्याने, परभावाने आवृत्त आहे. म्हणून आत्म्यात असलेल्या गुणांचा स्पर्श करू शकत नाही. ह्या परभावांना तोडून मनाला मुक्त करण्यास सांगितले आहे. ज्यायोगे आत्मविचाररूपी चंदन वृक्षाच्या थंड हवेचा स्पर्श करू शकेल.

उपाध्यायजी पुढे म्हणतात - हे आत्मन : समत्वभावनेबरोबर तू एकत्वभावनेचा अनुभव करूनच नमिराजर्षीप्रमाणे आनंदसंपदेला प्राप्त करू शकशील.[१३९]

एकत्व भावनेचे चिंतन करता करता परमानंद प्राप्त करायचा असेल तर एकत्वाबरोबर समत्वाला जोडावे लागेल. असे केल्याने हा शत्रू, हा मित्र असा भेद राहत नाही. हे कंचन, हे कथिर असा भेद राहत नाही. तो साधक नमिराजर्षीप्रमाणे परमानंदाच्या संपत्तीला प्राप्त करू शकतो. ह्या विषयात इंद्र आणि नमिराजर्षींचा संवाद वस्तूतः हृदयस्पर्शी आहे. जेव्हा ते मिथिला सोडून साधू बनण्यासाठी राज्यवैभव, भोग, सुखाचा त्याग करून जाऊ लागले तेव्हा मिथिलेमध्ये सर्वत्र विलाप, रुदन, शोक, गोंगाटाचे वातावरण पसरले. त्यावेळी देवराज इंद्राने आपल्या अवधिज्ञानाच्या आलोकात नमिराजर्षी याला मिथिला सोडून जाताना पाहिले. इंद्राने ब्राह्मणाचे रूप घेतले आणि नमिराजर्षीजवळ जावून नमस्कार करून विचारले -

किण्णु भो ! अज्ज मिहिलाए कोलाहलग - संकुला ।
सुवन्ति दारुणा सुददा, पासाएसु गिहेसु य ?॥[१४०]

हे राजर्षी ! आज मिथिलेमध्ये, राजवाड्यात, घरात सर्वत्र रूदन, विलाप इत्यादी शब्द का ऐकू येत आहे ?

राजर्षी म्हणाले -

"मिहिलाए चेइए वच्छे सीयच्छाए मणोरमे ।
पत्त पुप्फ-फलोवेए बहुणं बहुगुणे सया ॥
वाएण हीरमाणंमि चेइयंमि मणोरमे ।
दुहिया असरणा अत्ता एए कन्दन्ति भो ! खगा ॥[१४१]

हे ब्राह्मणा ! उद्यानामध्ये असलेला मनोहर वृक्ष प्रचंड तुफानाने तुटून पडतो, तेव्हा त्यावर बसलेले पक्षी दुःखी होतात, आश्रयरहित होतात म्हणून ते क्रंदन, रुदन करतात अर्थात लोक आपला स्वार्थ नष्ट झाल्याने रडतात, माझ्या प्रव्रज्येमुळे रडत नाहीत.

तेव्हा देवेन्द्र म्हणाले - राजर्षी ! तुम्ही मिथिलेकडे पहा, मिथिला अग्नीमध्ये जळत आहे. आपले अंतःपुर - राणीवास सुद्धा जळत आहे. तुम्ही तिकडे का पाहत नाही ?

राजर्षी म्हणाले -

सुहं वसामो जीवामो जेसिमो नत्थि किंचणं ।
मिहिलाए डज्झमाणीए न मे डज्झइ किंचण ॥१४॥[१४२]

हे ब्राह्मणा ! मी सुखाने जगत आहे, सुखाने राहत आहे. माझ्याजवळ स्वतःचे असे काहीच नाही. मिथिला जळत असली तरी तिच्या जळण्याने माझे काहीच जळत नाही.

अशाप्रकारे इंद्र आणि नमीराजर्षींचे बरेच संवाद प्रश्नोत्तररूपात आहेत. ह्यात दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत - समत्व आणि एकत्व. नमीराजर्षी अत्यंत समभावाने इंद्राला उत्तर देत होते. यातून त्यांची आंतरिक आत्म्याचे विशुद्ध स्वरूप प्रकट करण्याची उत्कट भावना किती प्रबळ आहे त्याचे दर्शन होते.

त्यांनी महत्त्वाची गोष्ट अशी सांगितली की, मी तर सुखपूर्वक राहत आहे, जगत आहे, आत्मभावाच्या मस्तीत जगत आहे आणखीन काय पाहिजे ?

शांतसुधारसामध्ये समत्वभावाबरोबर एकत्वभावाची अनुभूती करण्यासाठी नमी राजर्षींचे उदाहरण दिले आहे ते अत्यंत योग्य आहे. नमी राजर्षींच्या चरणात इन्द्र भावपूर्वक वंदन करून स्तुती करतात.

इंद्राने प्रत्यक्ष प्रकट होऊन स्तुती केली तरी नमी राजर्षींना गर्व होत नाही. परंतु ते विशिष्टरूपाने आत्मभावनेमध्ये लीन होतात.

एकदा जर मनुष्याच्या भावनेमध्ये परिवर्तन झाले, समतापूर्वक एकत्वभाव समजून गेले तर परमानंद प्राप्त करण्यासाठी वेळ लागत नाही.

ग्रंथकाराने एकत्व भावनेचे विवेचन करताना गितीकेमध्ये सांगितले आहे, "हे आत्मन ! संसारात कोण कोणाचा आहे" अशी निर्मळ मती ज्याच्या हृदयामध्ये स्फुरीत होते त्याला पापजनित दुःख कोठून होणार ?"

किती स्पष्ट आहे की प्राणी एकटाच उत्पन्न होतो आणि एकटाच विपन्न होतो. एकटाच कर्मबद्ध होतो आणि एकटाच त्यातून मुक्त होतो.

वेगवेगळ्या ममत्वाच्या भाराने दबलेला प्राणी परिग्रहाचे ओझे वाढवितच जातो.

अत्याधिक भार ठेवलेली नौका बुडून जाते त्याचप्रकारे तो संसाररूपी सागरात बुडून जातो. जीवनाची बाजी हरतो. तुम्हाला तर माहीतच आहे की सुवर्णासारखा मूल्यवान धातू जर एखाद्या हलक्या धातूमध्ये मिळाला तर तो आपली निर्मलता घालवून देतो. तो तर एकटाच चांगला वाटतो. त्याचप्रमाणे आत्मा सुद्धा एकटाच शोभतो. परभवात पडलेला आत्मा आपल्याबरोबर अनेकप्रकारच्या संबंधाची जाळी पांघरतो. तोच आत्मा जर कर्ममळापासून मुक्त झाला तर शुद्ध सुवर्णाप्रमाणे चमकतो. अशाप्रकारे विचार केल्याने आत्म्यामध्ये शांत सुधारसाचा आविष्कार होईल त्याचा आस्वाद घेतल्याने सर्व इंद्रियजन्य भोगांपासून दूर अशा शांतसुधारसाचा आनंद प्राप्त होईल.

ह्या गेयाष्टकामध्ये उपाध्याय विनयविजयजींनी सुंदर चिंतन प्रस्तुत केले आहे, आत्म्याला प्रश्न विचारला आहे- ह्या विश्वात तुझे काय आहे ? हा दिव्य विचार ज्याच्या चित्तात निर्माण होतो त्याला पापाचा स्पर्शसुद्धा होऊ शकत नाही कारण तो समजून जातो की मी विशुद्ध आणि अविनाशी आत्मा आहे आणि ज्ञान इत्यादी माझे गुण आहेत. ह्यांशिवाय माझे काहीच नाही. चर्मचक्षूंनी दिसणारा एकसुद्धा पुद्गल अथवा पर्याय माझा नाही आणि जे माझे नाही ते सुधारो अथवा बिघडो त्याच्याशी माझा काहीच संबंध नाही. मी एकटाच आलो आहे आणि एकटाच जाईन. सर्वांच्यामध्ये राहून सर्वांहून वेगळे राहण्याचा आनंद काही वेगळाच असतो. एकत्व आणि समत्वाच्या भावनेने जो आत्मानंद प्राप्त होतो तो अलौकिक असतो. अनेकतेच्या गोंगाटातून मुक्त होऊन खूप दूरवर एकत्वाच्या क्षीरसागरामध्ये डुबकी लावण्याचा प्रयत्न केल्यानेच ज्ञात होईल की आत्म्याची मस्ती काय असते.

आत्म्यामध्ये डुबकी तोच घेऊ शकतो जो ममत्व भावनेपासून दूर राहतो. आसक्तीचे जहाज जड असेल तर मनुष्य संसार सागरामध्ये बुडून जातो. ''मी एकटा आहे'' असा विचार केल्याने ममत्वाचा भार हलका होतो आणि तो तरू लागतो. ज्याला पर द्रव्याची आसक्ती असते तो युवा असो अथवा वृद्ध तो पर वस्तूसाठी धडपडतो, ठोकर खातो, अधोगतीला जातो.

जैन रामायणातील एक घटना आहे - लक्ष्मणाच्या मृत्यूनंतर श्री रामाची स्थिती अशी दयनीय झाली की ते पुन्हा पुन्हा मूर्च्छित होऊन जमिनीवर पडत होते. लक्ष्मणावर श्री रामाचा अतिशय जीव होता. ते हे मानण्यासाठी तयार नव्हते की, लक्ष्मणाचा मृत्यू झाला आहे. लक्ष्मणाच्या मृतदेहाला आपल्या खांद्यावर घेऊन ते सहा महिन्यापर्यंत फिरत

राहिले होते. कधी ते लक्ष्मणाच्या मृतदेहाला स्नान करवीत होते, कधी चंदनाचा लेप करायचे, शय्येवर झोपवून त्याच्यावर पंखा ढाळायचे. अशाप्रकारे राग भावनेने उन्मत्त होऊन विविध चेष्टा करीत होते.

सीताजींचे रक्षण करता करता मेलेला जटायूपक्षी मृत्यूनंतर माहेन्द्र देवलोकात 'देव' झाले होते. ते श्रीरामाचे ममत्व तोडण्यासाठी प्रयत्न करीत होते. त्या देवाला श्रीरामाच्या प्रती दृढ स्नेह होता. त्या स्नेहाने प्रेरित होऊन तो श्रीरामांजवळ येतो आणि रामाची मोहमूढ दशा पाहून त्यांना प्रतिबुद्ध करण्यासाठी विविध उपाय करतो.

श्री रामांचा सेनापती कृतान्तवदनसुद्धा मरून देव झाला होता. तो सुद्धा श्रीरामाला प्रतिबोध देण्यासाठी तिथे अयोध्येमध्ये येतो. दोन्ही देवांनी विविध प्रयोगाद्वारे श्री रामाची मूर्च्छाभावना दूर केली. लक्ष्मणाचा मृत्यू झाला आहे ही वास्तविकता समजली तेव्हा श्री रामाने लक्ष्मणाच्या मृत्यूची घटना मान्य केली. दोन्ही देव श्रीरामाला नमस्कार करून देवलोकात निघून गेले.

श्रीरामाने लक्ष्मणाच्या मृतदेहाचा अग्निसंस्कार केला. श्रीराम आता संसारातून विरक्त झाले. लव, कुशानीसुद्धा दीक्षा घेतलेली होती. लक्ष्मणाचा मृत्यू आणि सर्वांच्या विरहाने श्रीरामांसाठी जग उजाड झाल्यासारखे वाटत होते. संसाराच्या वास्तविकतेचे त्यांना ज्ञान झाले होते. त्यांनी शत्रुघ्नाला राज्य ग्रहण करण्यास सांगितले. परंतु शत्रुघ्नाने सांगितले की, मी सुद्धा तुमच्याबरोबरच दीक्षा घेईन. तेव्हा रामाने 'लव'चा पुत्र अनंगदेव याचा राज्याभिषेक केला आणि स्वतः सुव्रत नावाच्या महामुनींजवळ अणगार झाले. ही बातमी संपूर्ण भारतात पसरली आणि सोळा हजार राजांनी सुद्धा दीक्षा घेतली. एकत्व आणि समत्वाची साधना-आराधना करता करता श्रीरामांनी मुक्ती मिळविली.

ज्यांना सर्व कर्मांपासून मुक्ती प्राप्त करायची आहे त्यांनी एकत्व आणि समत्वाची साधना केलीच पाहिजे. अरे ! ज्यांना इहलौकिक जीवनातही शारीरिक, मानसिक संतापातून क्लेशातून मुक्ती प्राप्त करायची आहे त्याला सुद्धा एकत्व आणि समत्वाची साधना करावी लागते.

मनुष्याला प्रश्न पडतो की आत्म्याचे विशुद्ध रूप कोठे लपलेले आहे ? वरील उदाहरणांवरून हे स्पष्ट होते की जोपर्यंत ममत्व आहे तोपर्यंत विशुद्ध रूप प्रकट होत नाही. ममत्वभाव, परभाव अथवा पुद्गल भावामध्ये विशुद्ध आत्म्याचे स्वरूप हरवले आहे. आणि म्हणूनच ग्रंथकाराने सुवर्णाचे उदाहरण दिले आहे. पितळ अथवा अन्य धांतूमध्ये

सुवर्ण आपले स्वरूप गमावते. तसेच पुद्‌गल भावामध्ये आत्म्याने आपली विशुद्धता गमावून टाकली आहे. आत्मा तर अरूपी आहे परंतु पुद्‌गलाच्या संगाने आत्मा जोपर्यंत कर्मबंधनात असेल तोपर्यंत विविध रूपे धारण करेल.

कर्मामुळे आत्मा देव, नरक, तिर्यंच-जनावरे आणि मनुष्याची रूपे धारण करतो. हे जड पुद्‌गल चैतन्य आत्म्याला वेगवेगळे नाच नाचवते.

म्हणून निरंतर चिंतन करायचे की, मी ह्या सर्व बाह्य रूपांपासून 'पर' आहे. हे सर्व रूप कर्मजन्य आहे.

तसेच पुण्य आणि पापाला सुद्धा सारखे समजावे. पुण्याचा किंवा पापाचा द्वेष करू नये.

पुण्य आणि पाप दोन्ही कर्म पुद्‌गल आहे. त्याने आत्म्याच्या अलिप्ततेचा भाव दृढ करायचा आहे. आध्यात्मिक चिंतनात पुण्याचे किंवा पापाचे महत्त्व नाही. आत्मभाव दोन्हींपासून मुक्त आहे. ह्याचा अभिप्राय हा आहे की जोपर्यंत जीवन आहे तोपर्यंत खान-पान राहणी, करणी इत्यादी कार्यात अशुभ कर्म पुद्‌गलांचा बंध तर होतोच तरी पण जगण्यासाठी सर्व काही करावे लागते. तसेच अन्य जीवांना सुद्धा आपल्या आत्म्याप्रमाणे समजून दया, दान इत्यादी शुभ कार्यरूपी पवित्र धर्मक्रिया तर करायची आहे. परंतु त्याच्यातही ममत्व ठेवायचे नाही. त्यामुळे नवीन कर्मबंध होत नाहीत.

इंद्रिये, शब्द, रस, रूप, गंध, स्पर्श इत्यादी विषयांना जाणतात. आत्म्याचा 'शब्द' इत्यादी विषयांबरोबर काहीच संबंध नाही. आत्म्याचे विषय तर केवळ ज्ञानोपयोगी, दर्शनापयोगी आहे. त्याचा अभ्यास जीवनाच्या अंतापर्यंत करायचा आहे. इंद्रिये नेहमी आपल्या विषयांपासून विन्मुख राहू शकत नाहीत. परंतु त्यांना अशुभापासून शुभ दिशेमध्ये जोडले जाऊ शकते. इंद्रियांबोबर चैतन्य आणि मनाला न जोडणे हे महत्त्वाचे आहे.

ज्याप्रमाणे शहरामध्ये शुद्ध पाण्याची पाईपलाईन आणि घाण पाण्याची पाईपलाईन बरोबरच असते. त्यामुळे जर कधी पाईपलाईन फुटली तर शुद्ध जल आणि मल यांचे मिश्रण होते. ही गडबड जनस्वास्थ्यासाठी धोकादायी ठरते. याचप्रमाणे आपल्या आंतरमनातील जल आणि मळ यांच्या नाल्यांना वेगवेगळे वाहू द्या. इंद्रियांना आपले कर्म करू द्या, चेतनेला ज्ञान, दर्शन यांच्या आत्मविषयात रमू द्या.

जर चेतना इंद्रियांबरोबर जोडली नाही तर इंद्रिये विषयांना ग्रहण करणार नाही. ह्याला 'अनध्यवसाय' असे म्हणतात. उदाहरणार्थ - एका व्यक्तीला हीरा खरेदी करायचा

आहे. तो बाजारात गेला. बाजारात शेकडो दुकाने आहेत. त्यात हजारो प्रकारच्या वस्तू उपलब्ध आहेत. मनुष्य त्या वस्तू पाहत जातो. परंतु तो सराफाच्या दुकानातच थांबतो. हीरा खरेदी करतो. हीरा सोडूनही तो अनेक वस्तू पाहतो. पण त्याचे ते पाहणे पाहण्यासारखे नसते. ज्याच्याबरोबर अध्यवसाय जोडलेला आहे त्याला पाहिले की सर्वकाही पाहिलेले न पाहिल्यासारखे राहिल.[१४४]

त्या वस्तूला पाहण्यासाठी जितकी चेतना आवश्यक आहे तितकीच चेतना त्या वस्तूबरोबर जोडायची आहे. त्याबरोबर ममत्वाच्या चेतनेला जोडायचे नाही.

ह्या स्थितीला प्राप्त करण्यासाठी एकत्व आणि समत्व भावनेचे सतत चिंतन आवश्यक आहे. समत्वाच्या सुखसागरासमोर राजा-चक्रवर्ती आणि देवेन्द्राचे सुख एक बिंदुतुल्य आहे म्हणून समतेच्या सुखाला धारण करायचे.[१४५]

समता प्राप्त करण्यासाठी श्री मुनिसुंदरसूरींनी आपल्या संपूर्ण जीवनाचा अनुभव करून उत्तरावस्थेमध्ये 'आध्यात्मकल्पद्रुम' नावाच्या ग्रंथांची रचना केली. यामध्ये स्त्री, आपत्य अर्थात पुत्र-पुत्री, धन, देह इत्यादींचे ममत्वमोचन आणि विषय-कषायाचा त्याग इत्यादी अधिकारामध्ये विवेचन केले आहे. अर्थात एकत्व भावनेच्या चिंतनात ह्या सर्व विषयांचा समावेश होऊन जातो.

आचार्य अमितगतीच्या 'द्वात्रिंशिका' या प्रसिद्ध श्लोकाच्या भावार्थात एकत्व भावनेचा उद्घोष करताना लिहिले आहे - शरीरावरून चामडे उतरल्यानंतर जसे तिथे रोमकूप अर्थात केस राहत नाही त्याचप्रमाणे ज्या आत्म्याची शरीराबरोबर एकता नाही. त्या शरीराने अनुबंधित पुत्र, पत्नी, माता, पिता आणि मित्र इत्यादींची एकता कशी होऊ शकते.[१४६]

आत्मा नितांत एकटा आणि असंग आहे. कारण त्याने विभाव दशेमुळे जड पदार्थांबरोबर अपनत्व स्थापन केले आहे. परंतु हा त्याचा स्वभाव अथवा मौलिक भाव नाही. स्वभाव शुद्धात्मभाव आहे. 'स्वस्य भावः स्वभावः' अर्थात स्वभाव म्हणजे आत्मा आणि आत्म्याचा भाव होय.

आत्मा परमात्म्यामध्ये केवळ कर्माच्या मलीनतेचा फरक आहे. मळरहित आत्माच परमात्मा आहे. द्वन्द्व दशेमध्ये आत्म्याची दशा परस्पर टक्कर घेते. कषायाविष्ट झालेला म्हणतो, ''मी मोठा आहे, मीच आत्मरूप आहे, माझ्यासमोर सगळे नगण्य आहे.'' प्रत्येक व्यक्तीमध्ये कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या कषायाचा द्वन्द्व आहे. सर्व आधी-व्याधी,

उपाधी सुद्धा ह्या द्वन्द्वामध्येच उत्पन्न होतात. परंतु जन्मापासून जीव त्याच्याबरोबर कोणती उपाधी घेऊन येतो आणि मरताना काय बरोबर घेऊन जाईल ह्यावर चिंतन करण्यासाठी श्री तिलोक ऋषी महाराजांनी आपल्या बारा भावनेच्या 'सज्झाय'मध्ये खूप सुंदर रचना करून लिहिले आहे.

"जन्म लिओ जब कोई न साथी, मरता पण न हि लारे ।
बंधी मुठीये जन्मज लीनो, जावे हाथ पसारी रे प्राणी
जग माया सब काची, थे किमकर मानी छे साची रे प्राणी
धन कुटुंब, रिद्धि संपत पाइ, सो निज पुण्य प्रभावे ।
जिम समे पुण्य को छेडोज आवे, देखत में विरलावे रे प्राणी ॥[१४७]

मुट्ठी बांधून येणारा, हात पसरवून निघून जातो. जोपर्यंत पुण्याचा जोर राहतो तोपर्यंत सर्व सुख, सुविधा, स्वजन साथ देतात. पुण्य समाप्त होताच क्षणात सर्व काही नष्ट होते.

प्रत्येक जीव आपापल्या कर्माच्या फळाला एकटाच भोगतो. अशा परिस्थितीत कोण कोणाचा स्वजन आणि कोण कोणाचा परिजन आहे.[१४८] ह्या गोष्टीचा सतत विचार केला पाहिजे.

घिरे रहो परिवार से, पर भूलो न विवेक ।
रहा कभी मै एक था अन्त एक का एक ।
पापो का फल एकले, भोगा कितनी बार ?
कौन सहायक था हुआ, करले जरा विचार ।[१४९]

संसारामध्ये राहता राहता सुद्धा कमलाप्रमाणे राहीले तरच आत्मसुख प्राप्त होईल.

परंतु मोह आणि मायेमध्ये गुरफटलेली व्यक्ती समजते की दुसरे जरी मरत असले तरी त्याचे मला काय ? मी कोठे मरणार आहे ? कदाचित मृत्यू स्वतःला सुद्धा येणार आहे हे समजत असले तरी स्वतःच्या मेहनतीने प्राप्त केलेली संपत्ती मृत्यूच्या वेळी बरोबर येईल असे मानून लोक पाप कर्मे करीतच असतात.

हे आश्चर्य करण्यासारखे आहे की कधी कोणाचा अचानक मृत्यू होतो. आणि पाहणारा समजतो की माझी सुद्धा अशीच स्थिती होईल तरी सुद्धा तो दुःखरूप ममतेला सोडू शकत नाही.

मोठे मोठे राजेही एकटेच निघून गेले. ज्यांची कीर्ती दाही दिशेत पसरली होती आणि जे नीतीपूर्ण व्यवहार करत होते असे राजा भोज, तसेच शत्रूंच्या सेनेला थरथर कापविणारे, प्रजेच्या दुःखाला दूर करणारे महाप्रतापी राजा विक्रम आणि अन्यायरूपी शत्रूला काळ असणारे, दिल्लीच्या सिंहासनाला सुशोभित करणारे बादशाह अकबर हे सर्व जेव्हा मृत्यूच्या अधीन झाले तेव्हा दल, बल, खजिना आणि अंतःपुर हे सर्वकाही सोडून एकटेच निघून गेले. परंतु बरोबर कोणलाच नेऊ शकले नाही तर मग दुसऱ्यांची काय कथा ?[१५०]

अशाप्रकारे ऐतिहासिक उदाहरणांपासून बोध प्राप्त करून ममतेला दूर करायचे आहे. एकत्व भावनेच्या चिंतनाने मृत्यूच्या वेळी दुःख कमी होते. तसेच स्वतःच्या मृत्यूच्यावेळीसुद्धा दुःख वाटत नाही आणि दुसऱ्यांचा मृत्यू झाल्यानंतर सुद्धा धैर्य, शांती प्राप्त होते.

सुखात आणि दुःखात समभाव ठेवण्यासाठी ह्या भावनेचे चिंतन अत्यंत श्रेयस्कर आहे. दुःखात तर व्यक्ती धीर धरतो. परंतु सुखात आपल्या आवेगाला अडवू शकत नाही. अनुकूल संयोग प्राप्त होताच आनंदीत होतो. दोन व्यक्ती जर एकमेकाला भेटल्या तर त्यांच्या मनात आनंदाच्या तरंग उठतात परंतु जेव्हा एकटेच मरावे लागते तेव्हा दुःखाला सीमा राहत नाही.

गुजराती काव्यात अत्यंत सुंदर सांगितले आहे -

"साथ करे ज्या बे संगाथी, गज-गज फुले मारी छाती,
ज्यारे एकलडा मरवु पडे, हूँ त्यारे तने याद करूं छूं
सुखी थता विसरू तने, ने दुःखी थता याद करूं छूं
मुश्केली ज्यारे पडे, हूं त्यारे तने याद करू छु ॥"

जेव्हा दुःख येते तेव्हाच त्याला परमेश्वराचे नाव आठवते अन्यथा मला एकट्याला जायचे आहे, माझ्याबरोबर काय येईल ? काहीच आठवत नाही. परंतु त्याला स्मृती पटलावर सतत चिंतन करीत राहिले पाहिजे की,

एकत्व ही शिव सत्य है, सौन्दर्य है एकत्व में
स्वाधीनता सुखशांती का आवास है एकत्व में
एकत्व को पहचानना ही भावना का सार है ।
एकत्व की आराधना, आराधना का सार है ।[१५१]

एकत्वच सत्य, सुंदर आणि कल्याणकारी आहे. सुख, शांती आणि स्वाधीनता एकत्वाच्या आश्रयानेच प्रकट होते. कारण त्यांचा निवास एकत्वातच आहे. एकत्वभावनेचे सार तर एकत्वाला ओळखण्यात आहे. आणि एकत्वाची आराधनाच आराधनेचा सार आहे.

अनित्य, अशरण आणि संसार भावनेच्या चिंतनात संयोगाला क्षणभंगुर अशरण, निरर्थक आणि 'स्व' स्वभावाची नित्यता, शरणभूतता आणि सार्थकता अत्यंत स्पष्ट झाल्यावरही ज्ञानी-अज्ञानी सर्वांना आपल्या आपल्या भूमिकेनुसार सुख-दुःख मिळून-जुळून भोगण्याचा विकल्प थोडाफार राहतोच. मूळापासून नष्ट होत नाही.

उपरोक्त विकल्पाला मूळापासून उखडून फेकण्यासाठीच एकत्वभावना आणि अन्यत्वभावनेचे चिंतन केले जाते.

गणेशमुनी शास्त्रींनी समग्रतेने एकत्वभावनेचा हृदयस्पर्शी विस्तार केला आहे. त्यांचे एक एक पद आत्म्याला उर्ध्वगमन करविण्यासाठीच अत्यंत महत्त्वपूर्ण आहे -

अनेकत्व के साथ छेडिये, क्यो न आंतरिक अपना युद्ध ।
मुनि गणेशशास्त्री लिखते है, यह एकत्व भावना शुद्ध ॥

जगाबरोबर जे अनेकत्व स्थापित केले आहे त्यांच्याबरोबर आंतरिक युद्ध करून एकत्वावर विजय प्राप्त करण्याचा संकेत केला आहे.

पुद्गल पर से प्रेम हटाओ, जोडो आत्मा से संबंध ।
फुटेगी एकत्व तत्त्व की, कस्तुरी सम वन में गंध ॥[१५२]

ज्याचे पर वस्तूवरून प्रेम कमी होईल तोच आत्म्याबरोबर संबंध जोडू शकेल आणि ज्याचा संबंध आत्म्याबरोबर जुळेल त्याच्या अंतःकरणातून एकत्व तत्त्वाचा सुगंध कस्तूरीप्रमाणे संपूर्ण जीवनरूपी उपवनाला सौरभान्वितकरून टाकेल. पर पुद्गलाचा सर्वथा संबंध तुटल्यानंतर अवश्य आत्मसौंदर्य प्राप्त होईल.

'एकत्व' केवळ आत्म्याचे सौंदर्य नाही परंतु व्यावहारीक जीवनाचे सुद्धा सौंदर्य आहे. 'पर' बरोबर संबंधांची चर्चा करणे 'असत्' आहे, विसंवाद उत्पन्न करणारी आहे. एकत्वाने वस्तूंच्या अखंडतेचे ज्ञान होते. कणाकणांच्या स्वतंत्र सत्तेचे उद्घाटन करण्यासाठी एकत्वाचे ज्ञान अत्यंत महत्त्वाचे आहे.

एकत्वाच्या ज्ञानाने स्वाधीनतेचा स्वाभिमान जागृत होतो. स्वावलंबनाची भावना

प्रबळ होते आणि वृत्ती सहजतेने स्वभावोन्मुख होते. हे एकत्व भावनेच्या चिंतनाचे सुंदर फळ आहे. एकत्व हा वस्तूचा त्रैकालिक स्वभाव आहे आणि त्याचे चिंतन, मनन, अनुभावन, एकत्वभावना आहे.

एकत्वभावनेच्या चिंतनाने आनंद जागृत झालाच पाहिजे. जर चिंतन करता-करता आत्मिक आनंद मिळाला नाही तर आपल्या चिंतनप्रक्रियेवर सखोलतेने विचार करायला पाहिजे. जर आपल्या चिंतनप्रक्रियाची दिशा बरोबर असेल तर आनंद होईलच.

जेव्हा आपण असा विचार करतो की कोणीच साथ देत नाही तर आपल्यात द्वेष उत्पन्न होतो. परंतु जर असा विचार केला की कोणी साथ देऊच शकत नाही तर सहजतेने उदासीनता उत्पन्न होईल, वीतराग भाव जागृत होईल.

साथसहकाराची कल्पना केवळ कल्पनाच आहे. साथ सत्य नाही किंवा असत्य सुद्धा नाही, शिव किंवा अशिव नाही. सुंदर नाही किंवा विद्रूप नाही कारण जेव्हा ती कल्पनाच नाही तर मग ते आहे तरी काय ? कसे आहे ? इत्यादी प्रश्न निर्माण होऊ शकत नाही.

मानव तर बहुतांशी एकटाच जन्म घेतो व मरतो. महानता एकत्वातच आहे. कुत्रा, मांजर एकाबरोबर चार सहा जन्म घेतात. सर्प जातीत एकाचवेळी लाखो जन्म घेतात, निगोदचे जीव एकावेळी अनंत जन्म घेतात व अनंतचा मृत्यू होतो. अशाप्रकारे खोलवर विचार केला तर जन्म-मरणासाठी सोबत शोधण्याचा अर्थ निगोदला आमंत्रण आहे.

पुष्कळशा लोकांना एकटेपणा खूप सतावतो. सोबत कोणीतरी पाहिजेच परंतु साथ मिळत नाही. संयोग जरूर मिळतो. निगोदामध्ये सुद्धा अनंत जीवांचा संयोग होतो परंतु साथ होत नाही. कारण त्यांच्यात परस्पर सहयोग नाही मात्र एक क्षेत्रावगाहत्व आहे.

संयोग आणि साथ यामध्ये खूप अंतर आहे. संयोगामध्ये सहयोग मिळाल्यावर साथ होतो. दोन व्यक्तींचे एका स्थानावर एकत्रित येणे 'संयोग' होय. त्यांच्यात परस्पर सहयोग होणे 'साथ' आहे.

संयोग क्षणभंगुर आहे, अशरण आहे, असार आहे, परंतु अवश्य आहे. 'साथ' तर नाहीच. एकत्व आत्म्याचा दुबळेपणा अथवा गरज नाही, सहज स्वभाव आहे. एकटेपणा अभिशाप नाही वरदान आहे. जो एकटेपणा मनुष्याला आज चांगला वाटत नाही तो आनंदाचा धाम आहे. ज्यांच्या साथ-सहकारासाठी मनुष्य इतका आकुळ-व्याकूळ राहतो ती केवळ 'मृग-तृष्णा' आहे.

साथ शोधण्याचा प्रयत्न आजपर्यंत कोणाचाही सफल झालेला नाही आणि कधी होणारही नाही. ह्या दिशेत केलेले सर्व श्रम व्यर्थ होणारे आहेत चांगल्या पिकाच्या आशेने दगडावर बी पेरण्यासारख्या व्यर्थ श्रमाने काय फायदा ?

मनुष्य विचार करतो ह्या संसारातील स्वजन माझ्यासाठी किती कष्ट घेतात. माता पालन-पोषण करते, पिता रक्षण करतात, मित्रजन कार्यात सहयोग देतात त्यात सफलता सुद्धा मिळते. त्याला व्यर्थ कसे समजले जाईल ?

कविवर उमेशमुनी महाराजांनी आपल्या हस्तलिखित पदामध्ये ह्याच भावनेला व्यक्त करताना लिहिले आहे -

जन्म लिया तब से सामाजिक घिरा रहा लोगों से,
कार्य सधे जद मिले, सफलता आपस के योगों से,
एक चना फोडे क्या पहाड ?
कि यह विश्वास लगे सुखकार
आप ही आप निहारो ॥१०॥

बाह्य सहयोगाने कार्यात यश मिळते परंतु ते कर्माधीन आहे. पुष्कळशा लोकांना सहयोग देणारे सुद्धा भेटतात परंतु पूर्वकृत अशुभ कर्मामुळे सफलता मिळत नाही. सहयोग देणारे मात्र निमित्तरूप बनतात. बाकी सफलता आणि असफलता आपल्या कर्मानुसार मिळते.

आपण संसारात पाहतो की कित्येक माता मुलांना जन्म देऊन मरून जातात. कित्येकजण आपल्या मात्या-पित्यांची सेवा-शुश्रुषा करीत नाहीत. संयोग आहे. परंतु सहयोग नाही अशी परिस्थिती असली तरीसुद्धा खेद करू नये. कारण हे तर आपणच बांधलेल्या कर्माचे फळ असते. सहयोग यश प्राप्त करवून देतो हा केवळ भ्रम आहे. असे जरी हृदयात दृढ केले तर भ्रमामुळे भ्रमण होणार नाही.

यह संसार महासागर है, हम मानव है तिनके ।
इधर उधर से बहकर आए, कौन यहाँ पर किनके ॥

इथे सर्व एकटेच आहेत, कोणी कोणाचा नाही. परंतु एक दुसऱ्याला स्वार्थाने माझे म्हटले जाते.

'सप्तरत्नम्' च्या एका प्रसिद्ध श्लोकात म्हटले आहे - ज्याची फळे कमी अथवा

समाप्त होतात त्या वृक्षाला पक्षी सोडून जातात. जो तलाव शुष्क होतो त्याला सारस सोडून जातात, ज्या पुरुषाजवळचे पैसे समाप्त होतात त्यांना गणिका सोडून देतात, पदभ्रष्ट राजाला मंत्री सोडून देतात, वाळलेल्या फुलाला भ्रमर सोडून देतात, जे जंगल जळून जाते त्याला पशू सोडून देतात. अशाप्रकारे आपण प्रत्यक्षच पाहतो की सर्व प्राणी कार्यवश अथवा स्वार्थवश परस्परांवर प्रेम करतात. स्वार्थ सिद्धीची जर संभावना नसेल तर आपल्यावर उपकार करणाऱ्याला सुद्धा व्यक्ती सोडून देतो म्हणून जगात कोणी कोणाचे नाही.१५३

ह्या एकत्व भावनेला वाचल्यानंतर व्यक्ती विचार करतो की, ज्या आईने आपल्याला जन्म दिला, पित्याने मोठे केले, शिकविले त्या स्वजनांबरोबर मित्रांबरोबर राहताना सुद्धा 'मी एकटाच आहे' असे विधान कसे करता येईल.

व्यावहारिक भाषेत असे सांगता येत नाही. आपल्याला दोन्ही प्रकारचे जीवन जगले पाहिजे. व्यावहारीक जीवन सुद्धा जगले पाहिजे कारण त्याशिवाय आपण आपली आवश्यकता पूर्ण करू शकणार नाही. आपण स्वतःसाठी जगण्याचे साधन एकत्रित करू शकणार नाही. जर व्यवहारातही ''मी एकटाच आहे'' असे म्हटले तर कोणी जेवण वाढणारा मिळणार नाही, पाणी पाजणारा मिळणार नाही, कोणी सेवा करणारे मिळणार नाहीत किंवा कोणी घेणारा आणि देणारा मिळणार नाही. म्हणून व्यावहारीक व सामाजिक जीवन जगणे अत्यंत जरूरीचे आहे. तसेच जर आपण निश्चय जीवन जगले नाही तर तो व्यवहार आणि समाज आपल्यासाठी डोकेदुःखी निर्माण करून टाकेल. व्यावहारीक जीवन जगतांनाही निश्चय जीवनाच्या पृष्ठभूमीचे चिंतन अत्यंत अपेक्षित आहे.१५४

तसेच व्यवहाराबरोबर आणि पृष्ठभूमीमध्ये निश्चय असेल तर परिवार, मित्र, पुत्र, माझी सुरक्षा करतील असा विचार करणारा स्वतःच अनुभव करेल की असा विचार करणे धोक्याचे आहे. सुविधेसाठी कुटुंब आहे, समाज आहे. परंतु शेवटचे हे सत्य आहे की वस्तुतः 'मी एकटाच आहे.' जो असे चिंतन करतो तो कधीही फसविला जात नाही.

सत्य तीन प्रकारचे आहे १) प्रातिभासिक सत्य; २) व्यावहारीक सत्य ३) पारमार्थिक सत्य.१५५

प्रातिभासिक सत्य - सत्याचा केवळ ज्यात आभास होतो, वास्तविक जे असत्य असते ते प्रातिभासिक सत्य होय. जसे तुम्ही रेल्वेमध्ये बसलेले आहात, रेल्वे तीव्र गतीने चालत आहे आणि तुम्ही खिडकीच्या बाहेर पाहिले तर तुम्हाला झाडे, दिव्यांचे खांब इत्यादी पळताना दिसतील. त्याला सत्य मानावे लागते. कारण गाडीत तुमच्या शेजारी

बसलेल्या मनुष्यालासुद्धा तसेच दिसत असते. परंतु ज्यावेळी गाडी थांबते त्यावेळी तुमच्या लक्षात येते की मी जे काही पाहिले तो केवळ एक आभास होता.

२) व्यावहारीक सत्य - व्यवहार करण्यासाठी एक निश्चित प्रकारचा संकेत केला जातो. विशिष्ट परिस्थिती अथवा व्यवस्था निर्माण केली जाते त्याला व्यावहारीक सत्य म्हणतात अथवा जे भूतकाळात नव्हते, भविष्यात नसेल परंतु वर्तमानकाळात आहे त्याला 'व्यावहारीक सत्य' म्हणतात. जसे आपले शरीर हे व्यावहारीक सत्य आहे. आपल्या जन्मापूर्वी हे शरीर आपल्याबरोबर नव्हते, आपण मेल्यानंतर हे शरीर आपल्याबरोबर राहणार नाही तरी सुद्धा वर्तमानामध्ये हे शरीर आपल्याजवळ आहे हे व्यावहारीक दृष्टीने सत्य आहे. वर्तमानात ह्या नावाने आपला व्यवहार चालतो म्हणून ते व्यावहारीकदृष्टीने उपयुक्त आहे.

अशाचप्रकारे वर्तमानामध्ये आई-वडील, मामा-मामी, भाऊ-बहीण इ. जे संबंध आहेत ते व्यावहारीक सत्य आहे. हे कामापुरते संबंध ह्या वर्तमान जीवनासाठी उपस्थित झालेले आहेत. जरी ह्या संबंधांना जपावे लागले तरी वास्तविकता लक्षात घेऊनच सांभाळले पाहिजे.

३) पारमार्थिक सत्य - जे भूतकाळात होते, वर्तमानकाळात आहे आणि भविष्यकाळात सुद्धा राहील ते पारमार्थिक सत्य आहे. शरीर हे व्यावहारीक सत्य आहे तर ह्या शरीरात असलेला आत्मा हे पारमार्थिक सत्य आहे. हा आत्मा या जन्मापूर्वी सुद्धा होता, ह्या जन्मातसुद्धा आहे आणि पुढच्या जन्मातसुद्धा असेल. आत्म्याचा स्वभाव, रूप, अनंतज्ञान, दर्शन इत्यादी गुणही पारमार्थिक सत्य आहे.

येथे हे समजले पाहिजे की व्यावहारीक सत्याला सांभाळता सांभाळता पारमार्थिक सत्य गौण होता कामा नये. ह्याचे सतत ध्यान ठेवण्यासाठी एकत्व भावनेचे चिंतन केले पाहिजे.

ज्यांना व्यावहारीक संबंधामध्ये आपल्या स्वतंत्र आस्तित्वाची अनुभूती होते तो बाह्य संकटांचा सामना करत असूनही अंतःकरणाने समस्यांपासून मुक्त राहतो. बाह्य वातावरणात, समुहात राहत असतानासुद्धा तो अंतःकरणाने एकटाच राहतो आणि बाह्य जीवनात व्यस्त राहत असूनही अंतःकरणात व्यस्ततेपासून मुक्त राहतो.

संसारात राहूनही संसारापासून मुक्त राहण्याचा बोध ह्या एकत्व भावनेने प्राप्त होतो.

आसक्ती द्वैतामुळे उत्पन्न होते. अद्वैताची भावना पुष्ट झाल्यावर ती विलीन होते. ''तत्र को मोहः? कः शोकः एकत्वमनुपश्यतः'' अर्थात जो एकत्वाला पाहतो तेथे शोक कसला व मोह कसला ?

एकत्वाच्या भावनेचा अभ्यास दृढ झाल्यावर शरीर, उपकरण इत्यादींवर होणारी आसक्ती क्षीण होते.[१५६] संयोग हे व्यावहारीक सत्य आहे. आपण त्याचे अतिक्रमण करू शकत नाही. परंतु ह्या वास्तविकता सुद्धा विसरू शकत नाही की शेवटी आत्मा हा सर्वापेक्षा वेगळा आहे. ह्या भेदज्ञानाच्या अनुभूतीला पुष्ट करून साधक देहात राहत असूनही देहाच्या बंधनातून मुक्त होतो आणि जो देहात राहूनही देहातीत दशेला प्राप्त झाला आहे अशा व्यक्तींना श्रीमद् रामचंद्रजी आपल्या आत्मसिद्धी पदामध्ये त्यांना अगणित वंदन करताना म्हणतात-

देह छता जेणी दशा वरते देहातीत ।
ते ज्ञानी ना चरण मा हो वंदन अगणित ॥

अन्यत्व भावना

एकत्वाचा दुसरा पक्ष अन्यत्व आहे. एकत्वाची जेव्हा व्याख्या केली जाते तेव्हा एकाकीपणाचे ध्यान ठेवले जाते. त्या एकाशिवाय अन्य सर्व गौण होतात. अन्यत्वभावनेत एकत्वाला दृढ करण्यासाठी अन्यत्वाला सामोरे ठेवले जाते.

एकत्व भावना स्वमुखी, आत्मोन्मुखी, विधिपरक आहे. तेव्हा अन्यत्व भावना अन्यमुखी विधिपरक आहे. एकत्व भावनेत एकाचे विवेचन मुख्य आहे अन्यत्वभावनेत 'एका'च्या अतिरिक्त 'अन्य'चे विवेचन मुख्य आहे.

एकत्वभावनेत 'विधिरूप (Positive)' चिंतन केले जाते. तर अन्यत्व भावनेत 'निषेधरूप (Negative)' चिंतन केले जाते. एकत्वभावनेचे रहस्य अंतरंग निरीक्षण, आत्मपरीक्षण आहे. अन्यत्व भावनेला बाह्यचिंतन (Circumspection) म्हटले जाते. हे क्रमशः subjective आणि objective आहे.

स्व-स्व आहे पर-पर आहे. परंतु चूक अशी होते की प्राणी 'पर'ला 'स्व' मानतो. त्याच्या परिणामस्वरूपी स्वमुखता नष्ट होते आणि परोन्मुखता वाढत जाते. परोन्मुखता वैभाविक दशा आहे. आत्म्याचा 'पर' भाव आहे, तिरस्कार आहे, अपमान आहे ह्यातून सुटण्यासाठी 'पर'ला 'पर' समजले पाहिजे.

एकत्व भावनेमध्ये दृष्टी एकमेव आत्म्याबरोबर जोडलेली राहते. असे होणे अत्यंत कठीण आहे. मनाला त्या दिशेने वळविण्यासाठी खूप पुरुषार्थ करावा लागतो. अन्यत्वभावना त्या दिशेत पुढे जाण्यासाठी एक आधाररूप आहे.

एकत्वभावनेमध्ये मनुष्य चिंतन करतो की,

''एगो मे सासओ अप्पा नाण दंसण संजुओ ।''

एक माझा आत्मा शाश्वत आहे. ज्ञान दर्शनयुक्त आहे.

अन्यत्व भावनेत मनुष्य विचार करतो की,

''सेसा में बाहिरा भावा सव्व संजोग लक्खणा ।।''[१५७]

आत्मगुणांच्या अतिरिक्त जे काही बाह्य भाव आहेत, (अर्थात जड पुद्गल पदार्थ आणि दृश्यमान पदार्थ) ते सर्व संयोग लक्षणयुक्त आहेत.

अन्यत्व भावना सम्यग्दर्शनाचा पाया आहे. ह्या भावनेला 'विवेकभावना' सुद्धा म्हणतात अथवा 'भेदविज्ञान' असेही म्हटले जाते. शरीर आणि आत्मा यांच्या भिन्नतेची भावना पुष्ट झाल्यावर मोह ग्रंथी तुटते आणि सहजच मन स्थिर होते.

एकत्व भावनेमध्ये आत्मनिरीक्षण करण्याचे सूचित केले गेले आहे. आणि अन्यत्व भावनेमध्ये बाह्यचे वास्तविक दोन्हींचे लक्ष्य आणि परमध्येय आत्म्याची प्रगती आत्मविकासच आहे. त्याला प्राप्त करण्यासाठी आत आणि बाहेर दोन्हीकडे पाहणे आवश्यक आहे. अन्यत्व भावनेमध्ये आत्म्याला सोडून बाकी सर्व 'अन्य' समजल्यावर बाह्य पदार्थांमध्ये काय सार रूप आहे, काय असार आहे हे समजून आंतरआत्म्यामध्ये प्रवेश करून शुद्धात्म भावाला प्रकट करण्याचा पुरुषार्थ करायचा आहे.

आज मनुष्य बाह्य जगात अनेक प्रकारचे संशोधन करण्यात व्यस्त आहे. आकाशातले तारे मोजण्याची, चंद्र आणि मंगळावर पोहचण्याची वेगवेगळ्या रूपाने जीवनामध्ये काही ना काही प्रयत्न करतच राहतो. त्यात एकत्व आणि अन्यत्व काय आहे ? शाश्वत अशाश्वत काय आहे ह्याचा विचार करण्यासाठी देखील त्याच्याकडे वेळ नाही.

अशा परिस्थितीत कसे खावे, कसे प्यावे, कसे बोलावे कसे चालावे ह्याचे ज्ञान त्याला होत नाही. जीवन इतके अस्ताव्यस्त झाले आहे की जणू तो वेड्यांच्या दवाखान्यात आहे आणि जिकडे तिकडे तोड-फोड करत आहे. अशा स्थितीत सुख-शांती कोठून

मिळणार ? ती प्राप्त करण्यासाठी आंतरबाह्याचे भेदज्ञान होणे फार जरूरीचे आहे.

समयसार कलशामध्ये भेदविज्ञानाचे महत्त्व दाखविण्यासाठी लिहिले आहे - ''पूर्वी जे जे सिद्ध झाले, मोक्षाला गेले ते सर्व आत्मा आणि पुद्गल भिन्न आहे अशा भेद विज्ञानाद्वारे सिद्ध झाले आहेत आणि जे सांसारीक बंधनाने बद्ध आहेत ते सर्व भेदविज्ञानाच्या अभावाने बद्ध आहेत.'' १५८

मनुष्य कितीही ज्ञानी असला, अकरा अंग, बारा उपांग, चौदा पूर्वाचा जरी ज्ञाता असला तरीसुद्धा भेदज्ञान अथवा अन्यत्वभावनेशिवाय मुक्त होऊ शकत नाही आणि ज्याला काहीच ज्ञान नाही पण फक्त आत्मा आणि शरीराच्या भिन्नतेचे ज्ञान झाले तरी तो लवकर मुक्त होतो.

ह्याचे उदाहरण देताना कुंदकुंदाचार्यांनी लिहिले आहे की, 'शिवभूती नामक परमवैरागी जीवाने गुरूंजवळ दिक्षा घेऊन महान तपश्चरण सुरू केले. परंतु गुरूंजवळ शास्त्रज्ञान प्राप्त करण्याइतका अथवा ज्ञान ग्रहण करण्याइतका क्षयोपशम त्यांचा नव्हता. गुरूंनी त्यांना 'मा रुष, मा तुष' इतकेच शब्द शिकविले. हे शब्द तो पुन्हा पुन्हा उच्चारू लागला. उच्चार करता करता ते शब्द सुद्धा शुद्ध राहीले नाहीत. परंतु 'तुष माष' ध्यानात राहीले त्याचेच तो उच्चारण करू लागला.

एकदा एक महिला सुपाने उडीद साफ करीत होती. तिला पाहून मुनींनी विचारले, ''बाई, तू काय करत आहेस ? तेव्हा बाईने सांगितले, 'तुष-माष' वेगळे करीत आहे.'' अर्थात सालपट आणि उडीद वेगळे करते. हे ऐकून मुनींच्या चित्तामध्ये असा अर्थ स्फुरीत झाला की माष म्हणजे उडीद, तुष म्हणजे सालपट. जसे वेगवेगळे आहे तसेच साररूप आत्मा आणि असार असे शरीर दोन्ही वेगवेगळे आहेत अशा भावनेने 'तुष माष भिन्न' असे घोकत असताना त्यांना आत्म्याचा अनुभव झाला. आत्मभावनेत एकाग्र होताच, आत्म्यात लीन होताच घाती कर्माचा नाश करून मुनी केवलज्ञानी झाले.१५९

भेदज्ञानाचा सरळ आणि साधा अर्थ आपल्या आणि परक्याचे भेदज्ञान करणे आहे. आपल्याहून 'पर'ची भिन्नता कळल्यावरच भेदज्ञान होते. जो 'पर' वस्तू आणि 'पर' भावाला सुद्धा 'स्व' स्वरूपी समजतो त्याला भेदविज्ञान होत नाही. ज्ञान आणि राग दोघांचा वेगळेपणा समजणे भेदविज्ञान आहे. भेदज्ञान प्रकट झाल्यावर रागाची अशुद्ध परिणती वेगळी व गुण वेगवेगळे अनुभवले जातात. जसे पाणी आणि चिखल जेव्हा एकत्रित मिसळलेले असतात तेव्हा असा अनुभव केला जातो की चिखल आणि पाणी वेगळे आहे. पाणी

आपल्य शुद्ध स्वरूपात स्थित आहे. त्याचप्रमाणे संसारावस्थेत जीव कर्मबद्ध पर्याय रूपाने एक क्षेत्रात मिळालेला आहे. अशा अवस्थेत जर शुद्ध स्वरूपाचा अनुभव केला गेला तर समस्त कर्म जीवस्वरूपापेक्षा भिन्न आहे असे ज्ञान होईल आणि भेदज्ञानाने शुद्ध आत्म्याची उपलब्धी होईल.

ज्याला भेदज्ञान झाले आहे तो जाणतो की, 'आत्मा कधीच ज्ञान स्वभावाहून वेगळा राहत नाही.' असे जाणल्याने तो कर्मोदयाने तप्त झाला तरी राग, द्वेष, मोह इत्यादींपासून पराभूत होत नाही. तो निरंतर शुद्ध आत्म्याचा अनुभव करतो. परंतु ज्याला भेद ज्ञान झालेले नाही तो आत्मा आत्म्याच्या ज्ञानस्वभावाला जाणत नसल्याने रागालाच आत्मा मानतो आणि त्यामुळे तो रोगी द्वेषी, मोही बनतो. त्यामुळे कधी शुद्धात्म्यांचा अनुभव करीत नाही. म्हणून हे निश्चित आहे की भेदज्ञानानेच आत्म्याची उपलब्धी होते.[१६०]

अन्यत्वभावनेमध्ये आत्मा, अनात्मा काय आहे त्याचे विश्लेषण केलेले आहे. आत्मा वेगळा आहे आणि शरीर वेगळे आहे. जसे तूप आणि तूपाचे पात्र ह्या दोन वेगवेगळ्या वस्तू आहेत तसेच शरीर तूपाचे पात्र आहे आणि आत्मा तूपासारखा आहे. दोन्ही परस्पर सहयोगी आहेत. दोघांचा आधारआधेय संबंध आहे. परंतु तो कर्मामुळे आहे. शरीर आणि आत्म्याचा संबंध वास्तविक नाही परंतु कर्मकृत आहे. कर्मामुळे संबंध घडतात आणि तुटतात.

अन्यत्व भावनेचे चिंतन एकाप्रकारे हंसविवेक आहे, पृथःकरण बुद्धी आहे. जी जड आणि चैतन्याचा वेगवेगळा अनुभव करविते. अशुद्धीपासून शुद्धीकडे घेऊन जाते, वस्तुस्थितीचे यथार्थ ज्ञान ह्या अन्यत्व भावनेने होते.[१६१]

जीव आणि पुद्गल, शरीर आणि आत्मा, स्व आणि पर यातील भेद समजण्यासाठी अन्यत्वभावना एक बळ देते. ज्यांना पाहता साधक अनुभव करतो की माता-पिता, भाऊ, पत्नी, कुटुंबातील लोक कोणीच आपले नाहीत. ते आपापल्या कामापुरते त्यांच्याबरोबर व्यवहार ठेवतात.[१६२]

सारांश हा आहे की ह्या सगळ्या संबंधांच्या मागे आपला आपला स्वार्थ आहे. जेव्हा स्वार्थ संपतो तेव्हा कोणी कोणाचे राहत नाही. इतकी विचित्र परिस्थिती होते की ज्यांना मनुष्य, मित्र, पुत्र, हितचिंतक समजतो ते शत्रू आणि दुष्चिंतक बनतात. संसारामध्ये हे सर्व काही प्रत्यक्ष आहे. स्वार्थवश पिता-पुत्राची हत्या करतो, भावाभावांमध्ये युद्ध

होते, आई मुलाला विकून टाकते, पुत्र पित्याला मारून टाकतो, पत्नी पतीला मारून टाकते. अशी अनेक उदाहरणे आगम ग्रंथात आहेत. तसेच रोजचे वर्तमानपत्र वाचताना अशी अनेक उदाहरणे दिसतात. या अशा वार्ता ऐकून आणि वाचून हृदय प्रकंपित होते.

'राजप्रश्निय' सूत्रात एक प्रसंग आहे - प्रदेशी नावाचा राजा नास्तिक होता. आत्मा-परमात्मा, स्वर्ग-नरक, पुण्य-पाप इत्यादींमध्ये तो विश्वास करीत नव्हता. केशीकुमार श्रमणाच्या उपदेशाने त्याने सद्‌बोध प्राप्त केला. तो सम्यक्त्वि झाला आणि धर्माचरणाच्या दिशेत प्रवृत्त झाला. उत्तरोत्तर त्या दिशेत गतिशील होत राहिला. धन, संपत्ती, सैन्य, निधान, नगर, अंतःपुर इत्यादींबद्दल त्याच्या मनात औदासिन्यता वाढू लागली कारण राजाने जीवनाच्या यथार्थ लक्षाला समजून घेतले होते. त्यांना 'स्व-पर'चे भेदज्ञान झाले होते.

परंतु ज्याच्या भावनेत अशुभचिंतन अथवा पापपूर्ण चिंतन भरलेले असते अशी व्यक्ती आपल्या हीन वृत्तीमुळे दुसऱ्यांच्या पवित्र कार्याने सुद्धा दुःखी होतात. प्रदेशी राजाची राणी सुरीकंता आपल्या पतीची धर्मोन्मुखता पाहून अत्यंत दुःखी झाली. ती विचार करू लागली जेव्हापासून राजा धर्माराधनेमध्ये संलग्न झाला आहे तेव्हापासून तो सांसारिक भोगांपासून, माझ्यापासून विन्मुख झाला आहे. अशा पती पासून मला काय लाभ ? असा विचार करून राणीने राजाची हत्या करण्याचा विचार केला. तिने पुत्र-राजकुमार सूर्यकांतला आपल्या समर्थनात घेण्यासाठी आपले विचार त्याच्यासमोर ठेवले आणि सांगितले, तुला राज्य सांभाळायचे आहे. राज्यसुखाचा उपभोग घ्यावयाचा आहे. राजकुमाराने आपल्या आईच्या वाईट विचारांना अनुमोदन दिले नाही परंतु तो तिथून निघून गेला.

सूरिकांताच्या मनात शंका आली की राजकुमाराने राजाला माझे विचार सांगितले तर काय होईल ? म्हणून तिने शीघ्रातिशीघ्र राजाचे जीवन नष्ट करण्याचा विचार केला. तिने राजाच्या आहारात, वस्त्रात हुंगण्यास योग्य अशा पदार्थात विष मिळविले. नंतर राजा जसे जेवण करण्यासाठी बसला तसे विषमिश्रित जेवणाने राजाच्या शरीराची अत्यंत आग होऊ लागली. राजाला राणीच्या षड्‌यंत्राची कल्पना समजली. हे समजून देखील त्यांनी विशुद्ध धर्माचा स्वीकार केला होता त्यामुळे त्यांच्या मनात थोडी सुद्धा दुर्भावना उत्पन्न झाली नाही. राजा औषधशाळेत निघून गेले आणि विधिपूर्वक संथाराव्रत त्यांनी ग्रहण केले आणि आत्मभावनेमध्ये लीन झाले.

येथे अशुभ भावनेचा आणि शुभ भावनेचा स्पष्ट आभास होतो. किती स्वार्थांधता ? आपल्या भोगमय जीवनात अडथळा समजून राणीच्या मनात जे कलुषित

विचार उत्पन्न झाले ते अत्यंत अधम होते. त्यावेळी जर राजाचा आत्मा धर्ममय नसता तर ते राणीला दंडसुद्धा देऊ शकले असते किंवा वाईट विचारांनी आपली गती दुर्गतीसुद्धा केली असती. परंतु ज्यांनी आत्मा आणि आत्मेतर जे काही व्यक्ती अथवा वस्तू आहे त्याला 'अन्य' मानले, त्यांचा अशा भयंकर परिस्थितीतही समभाव टिकून राहतो. तो असे विचार करतो की भोगात्मक जीवनाचा हा दुष्परिणाम आहे. ज्याला राणीने विषप्रयोगाद्वारे क्रियान्वित केले.

इतके झाल्यानंतरसुद्धा राजाच्या मनात जो शुभ भावनेचा उगम झाला. तो हेच सिद्ध करतो की जी व्यक्ती शुभ भावनेने युक्त असते ती कधीही वाईटाचा बदला घेत नाही. राजाला सर्व काही कळले असूनही ते आत्मस्थ राहिले. ह्याला कर्म संयोग मानून पुढील आयुष्याला आणखीन निर्मळ, शुद्ध बनविण्याचा प्रयत्न केला. हा त्यांच्या शुभ भावनेचा परिणाम होता. भावनेच्या तात्पर्याला त्यांनी आत्मसात केले होते. मी आणि माझे शरीर दोन्ही अन्य आहे, पत्नी, पुत्र, परिवार माझ्याहून अन्य आहेत, वेगळे आहेत असे विचार मनुष्याला पतनापासून वाचवितात. याचा परिणाम म्हणजे आत्मकल्याण होते.

ह्या उदाहरणाने जगातील विचित्रतेचे ज्ञान होते. ज्यांच्यासाठी मनुष्य आपला अमूल्य वेळ, पैसा आणि शरीराचा भोग देतो तीच माणसे स्वतःचा स्वार्थ सिद्ध होत नाही असे म्हटल्यावर कसे कुकर्म करतात, कसे अपकारी होतात हे ह्या प्रदेशीराजाच्या उदाहरणावरून समजण्यासारखे आहे.

राजा प्रदेशी तर जीवन असेपर्यंत अन्नजलाचा त्याग करून, आत्मालोचना करून, प्रतिक्रमण करून समाधीपूर्वक आयुष्य पूर्ण होताच शरीराचा त्याग करून सौधर्मकल्पाच्या सूर्याभविमानाच्या उपपात सभेमध्ये सूर्याभदेवाच्या रूपात उत्पन्न झाले.[१६३]

अन्यत्वभावनेमध्ये हेच चिंतन करायचे आहे की, हे जीवात्मा, जर एक पत्नीसुद्धा पतीबरोबर असे दुष्कर्म करू शकते तर दुसरे कोण माझे होणार ? जे माझे आहे ते माझ्यातच आहे. 'पर' मध्ये अशांती आहे. 'स्व'मध्ये शांती आहे.

एखाद्याचा मृत्यू झाल्यावर त्याच्याबरोबर ज्यांचा संबंध असतो ते अत्यंत शोकाकूल होतात. परंतु स्वतः संसारसागरात बुडत चालले आहेत याविषयी शोक करीत नाहीत. 'पर'ची पंचाईत करण्यात ते 'स्व'ला विसरतात. म्हणून आपल्या आपल्या स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी शरीर स्वजनादी बाह्य पदार्थांना वेगळे समजावे आणि मी ज्ञानदर्शनरूप आत्मा आहे असे चिंतन करावे.[१६४]

आचार्य उमास्वाती यांनी तत्त्वार्थ भाष्यामध्ये अन्यत्वभावनेचे वर्णन करताना लिहिले आहे- शरीर इंद्रियगोचर, मूर्त आहे आणि मी अतिन्द्रिय, अमूर्त आहे. शरीर अनित्य आहे. आयुष्य पूर्ण होताच शरीर नष्ट होते अथवा त्यापूर्वीसुद्धा अनेक प्रकारे जीर्णशीर्ण होत राहते. परंतु मी नित्य आहे. कधीही नष्ट अथवा जीर्णशीर्ण होत नाही. शरीर अज्ञ-ज्ञानशून्य आहे आणि मी ज्ञानदर्शनरूप आहे. शरीर आदी अंतसहित असते कारण ते उत्पन्न होते आणि नष्टही होते. परंतु 'मी' ह्या दोन्ही धर्मांपासूनरहित आहे. मी अनादी अनंत आहे. जो जीव अशाप्रकारे सतत चिंतन करतो त्याला शरीराविषयी ममत्त्वभाव राहत नाही.[१६५] तो विचार करतो की,

''संसारात परिभ्रमण करता करता ह्या जीवाची लाखो शरीरे भूतकाळात गेलीत. त्याहून भिन्न असा माझा आत्मा आहे. जर शरीराहून मी वेगळा आहे तर बाह्य पदार्थापासून भिन्न असलो तर त्यात आश्चर्य काय ?[१६६]

जे आपल्याला आत्महितामध्ये लावतात आणि अहित करू देत नाहीत असे साधुगण ह्या आत्म्याचे मित्र आहेत, बंधू आहेत. ते इंद्रियजन्य आणि अतिंद्रिय सुखाचे कारण आहेत आणि अनेक दुःखाने भरलेल्या संसारातून पार करतात. भगवती आराधनेमध्ये लिहिले आहे की, साधुगणांचा मित्र रूपात व बंधुगणांचा शत्रूरूपाने चिंतन करणे म्हणजेच अन्यत्वभावना होय.[१६७]

येथे 'शत्रू' याचा अर्थ कोणाबरोबर 'शत्रूत्व करणे' असा नाही परंतु जे धर्ममार्गाकडे प्रवृत्त करतात, धर्माचा उपदेश देतात त्यांचा आदर-सत्कार करावा, आणि सर्व इष्ट सुखाला देणाऱ्या धर्मात विघ्न आणणाऱ्या बंधुजनांना, पदार्थांना अर्थात जे आत्म्याहून भिन्न आहेत, अन्य आहेत, जे चार गतीरूप घटीयंत्रांबर चढविणारे आहेत त्यांचा अनादर करावा. त्यांच्याबरोबर संबंध ठेवू नयेत. 'अनादर' याचा अर्थ 'अपमान करणे' असा नसून हे माझे हितचिंतक नाहीत, हे मला बंधनात टाकणारे आहेत, मुक्त करणारे नाहीत असे चिंतन करणे.

ज्याप्रमाणे अनेक देशांहून आलेले प्रवासी रात्री विश्रांतीसाठी धर्मशाळेत एकत्रित होतात अथवा एखाद्या झाडावर अनेकपक्षी विश्राम करण्यासाठी येऊन राहतात आणि सूर्योदय होताच सर्वजण आपल्या आपल्या मार्गाने निघून जातात त्याचप्रमाणे स्त्री, पुत्र, मित्र इत्यादी अनेक गतीने पाप-पुण्य घेऊन कुळरूपी धर्मशाळेत येतात आणि आयुष्य पूर्ण झाल्यावर सर्वजण आपल्या आपल्या पाप-पुण्यानुसार नरक, तिर्यंच, मनुष्य इत्यादी

गतींमध्ये जाऊन जन्म घेतात. म्हणून कोणी कोणाचा मित्र नाही. सर्वजण कर्मानुसार दोन दिवस आपल्यावर उपकार अथवा अपकार करून निघून जातात.

संसारामध्ये सर्वांचे स्वभाव वेगवेगळे आहेत असे दिसून येते. कोणाच्या स्वभावाबरोबर कोणाचाही स्वभाव जुळत नाही. सर्वजण स्वतःची स्वार्थसिद्धि करण्यासाठी दुसऱ्यांवर प्रेम करतात. स्वार्थाशिवाय कोणी कोणावर प्रेम करीत नाही. जसा वाळूच्या कणांचा एकमेकांशी काहीही संबंध नसतो परंतु त्याच्यात पाणी टाकल्यावर त्याला एकत्रित करून मुठीत पकडू शकतो परंतु थोडासा जोर लावून दाबले असता त्याचे कण नि कण विखुरले जातात. संसारी लोक सुद्धा आपल्या विषय कषायाच्या पुष्टीसाठी प्रेम करतात. कोणी कोणी प्रयोजन नसताना सुद्धा एकमेकांवर प्रेम करताना दिसून येतात पण ते लोकलज्जेमुळे अथवा आपल्या अहंकाराच्या पोषणासाठी अथवा पुढे त्यांच्याकडून काही प्रयोजन सिद्ध होईल या उद्देशाने प्रेम करतात.

आत्म्याच्या स्वभाव शरीरापेक्षा एकदम विपरीत आहे. आत्मा चैतन्यमय आहे, शरीर अचैतन्य आहे. जड आहे. तसेच शरीराबरोबर संबंध ठेवणारे आत्म्याहून वेगळे आहे. शरीर अनेक पुद्गल परमाणूंच्या समूहाने निर्माण झाले आहे. ते परमाणू वेगवेगळे झाले असता शरीर नष्ट होते. आत्मा चैतन्यमय अखंड अविनाशी असल्याने ह्या सर्व परवस्तूमध्ये माझे काहीच नाही असा निश्चय करणे अन्यत्व भावना आहे.१६८

जो साधक आत्म्याला पर पदार्थापासून वेगळे पाहतो. त्याला शोक, शंका, शल्य कसे त्रस्त करू शकतील ?१६९

जो आत्मा आणि आत्मेतर समग्र पदार्थाची अन्यत्वता, परत्वता, भिन्नत्वता समजून घेतो तो कधी दुःखी होत नाही कारण सुख 'स्व' भावात आहे. दुःख पर भावात आहे. 'पर'ला 'स्व' मानणे सत्याचा विपर्यास आहे. त्यामुळे दुःख तर होणारच.

''वादे वादे जायते तत्त्वबोधः'' जसे चर्चा, विचारणा केल्याने तत्त्वांचा बोध होतो. तसेच आत्मस्वरूपाचे चिंतन, मनन, निदिध्यासन केल्याने आत्मबोध होतो आणि ''भावे भावे जायते स्वात्मबोधः'' अर्थात भावनेने अनुभावित आप्लावित झाल्याने आत्मस्वरूपाचा बोध होतो. ज्याला स्वरूपबोध झाला आहे. त्याच्या शरीरावर प्रहार झाले तरी आत्मा त्रस्त होत नाही.

भगवान महावीरांना बारा-बारा वर्षापर्यंत उपसर्ग झाले. शारीरिक त्रास झाला तरी आत्मा आणि शरीराच्या भेदाला जाणत होते त्यामुळे त्यांचा आत्मा दुःखी झाला नाही.

जसे कोणी पुरुष तर्काने पाणी आणि दुधामध्ये भेद करतो त्याचप्रमाणे ज्ञानी पुरुषही उत्तमध्यानाद्वारे चैतन्य आणि अचैतन्यरूपी 'स्व-पर' मध्ये भेद करतो.[१७०]

आत्मा स्वभावतः परम आनंदयुक्त, अव्यय-अविनाशी, अनादी-अनंत शक्तियुक्त, प्रकाशयुक्त, लेपरहित आहे. परंतु जेव्हा तो जड शरीरावर आश्रित राहतो, त्यालाच आपले मानू लागतो तेव्हा तो अग्नी ज्याप्रमाणे पाण्यात टाकलेल्या पाऱ्याला गरम करतो तसेच पापही जीवाला संतप्त करते.[१७१]

पारा सरळ अग्नीवर गरम होत नाही. परंतु पाऱ्याला जर गरम करायचे असेल तर गरम पाण्याच्या आधाराने केले जाऊ शकते. तसा आत्मा स्वभावतः कर्ममळरहित आहे. अनादी, अनंत, केवलज्ञान, केवलदर्शनाने अनंतवस्तूस्वरूपाला ग्रहण करणारा, लोकालोकमध्ये प्रकाशित करणारा आहे. परंतु जड शरीराच्या बंधनामुळे त्याचे अनंतगुण आवृत्त होतात. आत्मा पराश्रित होतो. सिंहाचे संपूर्ण जंगलावर वर्चस्व असते. त्यामुळे सर्व प्राणी भयभीत होतात. परंतु त्याला पिंजऱ्यात बंद केले तर त्याची सर्व शक्ती कुंठित होते.

''जो ह्या आत्म्याच्या अनंत शक्तीला ओळखत नाही तो मोहबद्ध होऊन 'पर' पदार्थाला 'माझे माझे' सांगतो. जशी बकरी कसायाच्या घरात अस्थी, वसा अजश्रृंग इत्यादी बिभत्स पदार्थ पाहून 'में में' ओरडता ओरडता मृत्युमुखी पडते. त्याचप्रमाणे हा जीव सुद्धा 'माझे माझे' करता करता मरून जातो. परमार्थतः कोणी कोणाचे राहत नाही.[१७२]

जीवाचे हे शरीर अणुप्रचय निष्पन्न आहे. अर्थात पुद्गल परमाणूच्या समूहाने निर्मित आहे आणि शरीरी अर्थात आत्मा उपयोगमय आहे. हा अत्यक्ष म्हणजे अतीन्द्रिय आहे. इंद्रियगोचर नाही. हा ज्ञानविग्रह-ज्ञानात्मक कलेवरमय आहे. दोघांमध्ये एकदम वेगळेपण आहे. तेव्हा हे शरीर 'स्व' कसे होईल ? हे तर 'अन्य'च आहे. परंतु ज्यांनी संसाररूपी पिशाच आपल्या वशीभूत केले आहे, जो त्याला दुःखी करीत आहे अशा शरीर आणि आत्म्याच्या भिन्नतेला मूढ प्राणी समजू शकत नाही. जन्म आणि मृत्यूच्या वेळी सर्व लोकांमध्ये प्रतीत होते की, या दोन्हींमध्ये संपूर्णपणे वेगळेपणा आहे. जेव्हा जन्म घेतो तेव्हा मागचे शरीर बरोबर येत नाही आणि मरतो तेव्हा सुद्धा हे शरीर बरोबर जात नाही कारण हे दोन्ही एकदम पृथक आहेत. शरीर तर मूर्त आहे- आकार युक्त आहे, चैतन्यरहित, स्वतंत्र पुद्गल परमाणूंनी बनलेले आहे आणि आत्मा अमूर्त आहे. अमूर्ततेचा मूर्ताबरोबर संबंध कसा काय होऊ शकेल ?[१७३]

आचार्य शुभचंद्रांनी अन्यत्वाच्या मूळ तत्त्वाची चर्चा केली आहे. ह्या जगात दोनच मुख्य तत्त्वे आहेत - शरीर आणि आत्मा. शरीराच्या माध्यमानेच सर्व संबंध उत्पन्न होतात. जेव्हा संबंधांबद्दल विचार करतो तेव्हा विचार येतो की, जेव्हा शरीरही वेगळे, अन्य आहे तर स्वजन, बंधुजन, पौद्‌गलिक संपत्ती आपली कशी होऊ शकते. 'स्व'त्व भावाला स्वतःमध्ये निश्चित करण्यासाठी 'पर'त्व भावाला सोडणे अत्यंत आवश्यक आहे.

'पर' विनाशाला आमंत्रण देतो. ह्या गोष्टीला पुष्ट करण्यासाठी उपाध्याय विनयविजयजींनी अन्यत्वभावनेच्या प्रथम श्लोकामध्ये एक लोकोक्ति उद्‌धृत केली आहे- ''परः प्रविष्टः कुरुते विनाशं'' घरात दुसऱ्याच्या प्रवेशाने विनाश होतो. ह्याचा भावार्थ हा आहे की, सज्जनाच्या वेशात जर दुर्जनाने घरात प्रवेश केला अथवा साधूच्या वेशात डाकू आला तर विनाश होतोच. ही बाह्य प्रवेशाची आणि विनाशाची गोष्ट आहे. परंतु शरीरात राहणारा ज्ञानाने समृद्ध आणि शुद्ध आत्म्यामध्ये घुसलेल्या कर्मरूपी परमाणूंनी किती कहर मांडला आहे.[१७४]

आत्मा महान शक्तियुक्त, ज्ञानाने प्रकाशमान आहे. परंतु हे कर्म परमाणू प्रवेश करून चैतन्याला अनेक प्रकारे नाच नाचवते. सांगतात ना 'काजी दुबले क्यो ? सारे गाव की चिंता.' मनुष्याला असे वाटते की मला हे करायचे आहे, ते करायचे आहे, माझ्याशिवाय कसे होईल? मी केले तरच काम होईल, अशाप्रकारच्या अहंकारात आणि ममत्वाच्या परतंत्रतेमध्ये स्वतःच्या हाताने स्वतःची दुर्दशा करत आहे. 'पर'ची चिंता, 'पर'च्या गोष्टी 'पर'साठी व्यूहरचना करतो आणि त्यात काही गडबड-घोटाळा झाला तर दुःखी कष्टी होतो. चक्रव्यूहामध्ये फसून जातो.

साधकाने विचार केला पाहिजे की मला 'स्व'चे चिंतन करायचे आहे. जे गुणरत्न माझ्या आत आहे, माझ्याबरोबर येणार आहे त्यांना प्राप्त करण्याचा प्रयत्न सार्थक आहे. निरर्थकाची चिंता सोडून स्वतःच स्वतःच्या शाश्वत गुणांची ओळख करून घ्यायची आहे.[१७५]

आत्म्याचे गुण रत्नांसारखे आहेत. त्यात एक नव्हे, दोन नव्हे तर अनंत गुण विद्यमान आहेत. पौद्‌गलिक पदार्थरूपी काचेच्या तुकड्याला पाहण्यात, त्याच्या ममत्वात आत्मगुण रत्नांकडे कधी पाहिले नाही कारण काच आणि रत्नाच्या मूल्याला समजण्याचा कधी प्रयत्नच केला नाही.

उपाध्याय विनयविजयजी पुढे सांगतात की, ज्याच्यासाठी तू प्रयत्न करतो, विविध प्रकारच्या भयाने आतंकित होतो. कधी आनंदी होऊन नाचतो तर कधी उदासिनतेने व्याकूळ होतो. मनोवांछित मिळाल्यावर आनंदित होतो. परंतु आपल्या निर्मळ स्वभावाचा घात करून तू ज्या वस्तूंमागे वेडा झाला आहेस ते सर्वकाही 'पर' आहे. तुझे काहीच नाही.[१७६]

येथे उपाध्यायजींच्या सांगण्याचे तात्पर्य हेच आहे की आज मानव अर्थ आणि काम या पुरुषार्थांमागे वेडा झाला आहे. ते प्राप्त झाल्यावर सुद्धा तो कधी हर्षित होतो तर कधी भयभीत होतो. कधी उदास होतो तर कधी प्रसन्न होतो. जर जीवात्म्याने एकत्व आणि अन्यत्व भावना समजून घेतली तर तो द्वंद्वांमुळे व्याकुळ होणार नाही. जीवन शांत, स्वस्थ आणि व्याकुळतारहित होईल.

ज्यांला जड आणि चैतन्याचे भेदज्ञान असते तोच सम्यग् दृष्टी होतो. श्री दशवैकालिक सूत्रात लिहिले आहे -

जो जीवेऽवि न याणइ, अजीवेऽवि न याणइ ।
जीवा जीवे अयाणन्तो, कह सो नाहिउ संमजं ॥[१७७]

ज्याला जीवाचे ज्ञान नाही, अजीवाचे नाही, जीव-अजीव दोन्हींचे ज्ञान नाही त्याला संयमाचे ज्ञान कसे होईल ?

जीव-अजीव, आत्मा-अनात्मा जड-चैतन्य यांना न जाणणे म्हणजे केवळ बहिरात्म दशा आहे. बहिरात्म दशेचा अर्थ फक्त पौद्गलिक वैषयिक जीवन जगणे असा आहे.

'अन्यत्व भावना' केवळ आत्मार्थी जीवासाठीच उपयुक्त अथवा चिंतनीय आहे असे नाही. भौतिक, पौद्गलिक पदार्थांच्या रागी जीवांसाठीसुद्धा तितकीच उपयुक्त आणि विचारणीय आहे. अनेक मानसिक आजाराचे कारण पौद्गलिक राग, विषयराग, भय, शोक, काम, क्रोध इत्यादी आहे. ह्या आजाराचे मूळ राग, द्वेष हे आहे. ह्या मूळांना उखडण्यासाठी विचार केला पाहिजे. चिंतन केले पाहिजे की ज्ञान, दर्शन, चारित्रमय आत्म्याशिवाय सर्व पदार्थ 'पर' आहेत. 'अन्य' आहेत ह्या विचाराला दृढ करून आपल्या आत्महितासाठी आत्मकल्याणासाठी प्रयत्न केला पाहिजे.[१७९]

जीवन व्यवहारात ज्ञान, दर्शन, चारित्र्य यांचे आचरण आवश्यक आहे. आणि त्याचे आचरण तेव्हाच होऊ शकेल जेव्हा जीवनात आकांक्षा कमी होते. जीवनात जे

अनावश्यक आहे त्याची इच्छा कधीच करू नये.

महान तत्त्वज्ञानी सॉक्रेटीस यांना त्यांचे शिष्य एका मोठ्या दुकानात घेऊन गेले. त्या दुकानात कला कारागिरीच्या अनेक सुंदर वस्तू होत्या. सॉक्रेटीस यांनी दुकानात फिरून अनेक वस्तू बघितल्या, प्रशंसा केली प्रसन्न झाले आणि दुकानातून बाहेर आले.

शिष्यांनी विचारले - 'हे सर्व पाहून आपल्या मनात कोणते विचार आले ?' सॉक्रेटीस यांनी सांगितले की, आपल्या देशाचे कलाकौशल्य पाहून आनंद झाला. शिष्यांनी विचारले, ''आपणास कोणतीही वस्तू घेण्याची इच्छा झाली नाही का ?'' सॉक्रेटीस यांनी म्हटले की, मला ज्या वस्तूची आवश्यकता नाही ती घेण्याची इच्छा का होईल ? शिष्य म्हणाला - सुंदर वस्तू घेण्याची इच्छा होणे स्वाभाविकच आहे. सॉक्रेटीस म्हणाले, ''आपल्या देशात वैद्य फार चांगली औषधे तयार करतात परंतु ज्याची आवश्यकता नाही असे औषध आपण कितीही चांगले असले तरी घेणार का ? नाहीच घेणार.''

लहानशा उदाहरणाद्वारे खूप मोठे तत्त्वज्ञान समजाविले. सॉक्रेटिसने तत्त्वज्ञानाला जीवनात उतरवले होते. ग्रंथकार म्हणतात 'यतस्व स्वहितासये' आत्महितासाठी प्रयत्न कर, आत्महित इच्छारहित झाल्याने होते. अनुरागात्मक इच्छा नष्ट झाल्याने होते. ज्ञानी पुरुष पदार्थाचा उपभोग अवश्य घेतात. परंतु त्याबद्दलची आसक्ती ठेवत नाहीत. पदार्थ आसक्तिरहित भोगल्याने जो कर्मबंध होतो तो रुक्ष होतो आणि आसक्तीने पदार्थाचा उपभोग घेतला तर त्याचा स्नेहबंध होतो. त्याचे विपाक अथवा दुःखरूपी फळ भोगावे लागतात.

ज्ञानी निर्लिप्त आहे. आध्याय श्री यशोविजयजी द्वारे लिखित 'ज्ञानसार'चे ''अलिप्तो निश्चयेनात्मा लिप्तश्च व्यवहारातः''[१७९] हे प्रसिद्ध वाक्य आहे. निश्चय दृष्टीने आत्मा अलिप्त असतो. व्यवहारभाषेत त्याला लिप्त म्हणतात. ज्ञानी कर्मामध्ये राहत असला तरी त्याने लिप्त होत नाही.

जसे कमळ चिखलापासून निर्लिप्त राहते, आकाश चिखलाने लिप्त होत नाही तसेच संसाराने, कर्माने ज्ञानी लिप्त होत नाही.

चिखलात सुवर्ण आणि लोखंड दोन्ही पडले आहे. दोघांची प्रकृती वेगवेगळी आहे. चिखलात पडलेल्या सोन्याला गंज लागत नाही. ते एकदम स्वच्छ राहते, परंतु लोखंडाला गंज लागतो. जशी सुवर्ण आणि लोखंडाची प्रकृती वेगळी असते तशी ज्ञानी आणि अज्ञानी मनुष्याची प्रकृती वेगळी असते. ज्ञानी संसारात राहूनही सुवर्णाप्रमाणे निर्लिप्त राहतो.

ज्ञानी आणि अज्ञानी दोघांना भूक लागते. परंतु दोघांचा विचार करण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो. ज्ञानी विचार करतो की भूक एक रोग आहे, त्याच्या उपचारासाठी भोजन करायचे आहे. हा ज्ञानीचा चिकित्सात्मक दृष्टिकोन होईल. अज्ञानी व्यक्तीचा भोजनाकडे रसास्वादाचा दृष्टिकोन असतो. तो विचार करतो की भोजन हे स्वादिष्ट असावे, मधुर असावे.

दिसताना ज्ञानी व अज्ञानी यांची क्रिया सारखीच असते परंतु त्यामागील 'भाव' व दृष्टिकोन वेगळा असतो. ज्याची दृष्टी भूकेचा रोग मिटविणे आहे तो उपचारात्मक दृष्टिकोनाने भोजन करेल.

आत्मा आणि शरीराची भिन्नता जाणणाऱ्याला सॉक्रेटिसप्रमाणे इच्छेपासून मुक्त राहणे आवश्यक आहे. कमळाप्रमाणे चिखलात सुद्धा अलिप्त राहता आले पाहिजे. प्रत्येक वस्तूचा उपभोग उपचारात्मक दृष्टीने केला पाहिजे तोच ज्ञानी आहे, त्यालाच भेदज्ञान होऊ शकते.

आत्म्यापासून जे पदार्थ भिन्न आहेत त्याचे जीवात्म्याला सतत आकर्षण होत असते. त्यांना प्राप्त करण्यासाठी अनेक प्रकारचे विकर्षण जीवनात चालत राहतात. पुण्याचा उदय आकर्षणाचे कारण होते तर पापाचा उदय विकर्षणाचे निमित्त होते. ह्या पुण्य-पापात्मक आकर्षण विकर्षणाने जीवनात संघर्ष होत असतो. आत्म्याची विस्मृती होते. म्हणून आत्म्याहून जे काही अन्य आहे त्याचे आकर्षण तोडलेच पाहिजे. तेव्हाच आत्महिताचा खरा पुरुषार्थ होऊ शकेल.

आपल्या निर्मळ आत्मस्वभावाला सोडून अन्य वस्तूमध्ये वेडे होणे म्हणजे दुर्गतीचे तिकिट काढण्यासारखी विडंबना आहे. दुर्गतीच्या भयंकर दुःखाचा अनेकवेळा ह्या जीवात्म्याने अनुभव घेतला आहे. हे सर्व 'पर' पदार्थाच्या आसक्तीमुळे झाले आहे. आजपर्यंत जितके जन्म-मरणाचे दुःख भोगावे लागले ते सर्व 'पर' वस्तूच्या प्रीतीमुळे भोगावे लागले. तरीही व्यक्ती त्या सर्व गोष्टी विसरून तसेच कार्य करीत राहते. हे मूढतापूर्ण कार्य जीवनाच्या निर्लज्जतेची पराकाष्ठा आहे.

उपाध्याय विनयविजयजी यांनी अत्यंत स्पष्ट शब्दात अन्यत्व भावनेचे वर्णन केले आहे. स्वतःलाच संबोधून ते गीतिकेमध्ये म्हणतात हे विनय ! जरा आपल्या घराला सांभाळ. शरीर, धन, स्वजन, परिवार ह्यांपैकी तुला दुर्गतिकडे जाण्यापासून कोण वाचवणार आहे.

आसक्तीला, आवेशाला जन्म देणाऱ्या ममत्वाला सोडून दे, त्याच्यासाठी 'पर' वस्तू, जी तू स्वतःची मानतोस त्याचा त्याग कर. आणि निराकाक्ष बनून अनुभव सुखाचा आस्वाद घे.

एखादा यांत्रिक रस्त्याने जात असताना त्याला दुसऱ्या यांत्रिकेबरोबर स्नेह नाते जोडण्याची काय आवश्यकता ? सर्व जीव आपापल्या कर्मानुसार कार्यरत होतात म्हणून कोणालाही आपले मानून आसक्तीपूर्ण भाव का ठेवावा ?

ज्यांना तुमच्याबद्दल प्रेम नाही त्यांच्याबरोबर तुम्ही प्रेम वाढविण्याचा प्रयत्न कराल तर अनंत यातना तुम्हाला घेरून टाकतील. हा पौद्गलिक मायाजाळ असाच प्रेमशून्य आहे, त्यात तुम्ही व्यर्थच वेडे होऊन दुःख भोगता. हे तुमचे नाही. ज्याचा शेवटी वियोग निश्चित आहे त्या संयोगाचा त्याग करा. आणि तुम्ही निर्मळ, शुद्ध जिनेश्वरांचे ध्यान करा. आपली तहान शांत करण्यासाठी मृगजळाकडे पळणारी व्यक्ती कधीही तृप्त होऊ शकत नाही. कारण मृगजळामध्ये पाणीच नाही. जी माती चकाकते ती पाण्यासारखी प्रतीत होते म्हणून तेथे तृप्त होण्याची आशा करणे व्यर्थ आहे. म्हणून ग्रंथकार लिहितात - जिनेश्वर प्रभूंचे स्मरण करा, ते निराश्रितांसाठी आश्रयरूप आहेत. ते मोक्ष गती प्राप्त करण्यासाठी सुगम उपायरूप आहे. आत्म्याच्या रोगाचा नाश करणारा शांतीरूपी अमृतरस, जो सदैव दोषरहित आहे त्याचे पान करा. 'अन्य'ला 'अन्य' समजा. त्याला आपले कधी मानू नका.[१८०]

ह्या गितीकेमध्ये साधकाला संकेत केला आहे की, हे साधक तू पर घराला सोडून स्व-घरामध्ये दृष्टी टाक. परंतु दुःखाची गोष्ट ही आहे की बहुधा संसारात हेच पाहिले जाते की जी वस्तू जेथे नाही तेथे ती शोधण्याच्या प्रयत्नात वेळ आणि श्रम दोन्ही खर्च होतात.

कस्तूरी मृगाच्या नाभीमध्येच कस्तूरी असते. मृगाला त्याचा सुगंध येतो परंतु तो हे समजू शकत नाही की सुगंध तर माझ्या नाभीतूनच येत आहे. तो सुगंध शोधण्यासाठी दाही-दिशेत भटकतो परंतु त्याला तो सुगंध मिळत नाही. सुगंध स्वतःकडे असतो आणि शोध बाहेर घेत असतो. सर्व मृगांमध्ये कस्तूरी मृग श्रेष्ठ असतो. त्याचप्रमाणे सर्वजीवसृष्टीत मनुष्य प्राणी श्रेष्ठ असतो. परंतु तो 'पर' घरात, 'पर' परिणतीमध्ये 'धर्म' शोधतो. जो 'पर' घरात राहतो, 'पर' घरात धर्म शोधतो त्याला 'मिथ्यादृष्टी' म्हणतात. जो 'स्व' घराला पाहतो, 'स्व' घरात येतो तो सम्यग्दृष्टी आहे. 'आत्मपरिणती' आपले घर

आहे. 'पर' परिणति 'पर' घर आहे. प्रायः लोक धर्माचे पालन सुद्धा 'धन, स्वजन, शरीर आणि परिवाराच्या सुखाची कामना ठेवून करतात. त्यांचे प्रेम परमात्म्यावर नसते. परमात्म्याला स्वार्थसिद्धिचे साधन मानलेले आहे. शांती कोठून मिळणार ?

जोपर्यंत आत्मा आणि परमात्म्याचे भावात्मक मिलन होत नाही तोपर्यंत शांती, समता, समाधी आणि प्रसन्नतेची आशा फलित होणार नाही. बाह्य धर्मक्रियेच्या अपेक्षेने आंतरीक भाव क्रिया विशेष फलदायक असते.

ज्याप्रमाणे जन्मानंतर मरण आणि मृत्यूनंतर पुनर्जन्म निश्चित आहे, जोपर्यंत सिद्धगती प्राप्त होत नाही तोपर्यंत जन्ममरण निश्चितच आहे, त्याचप्रमाणे स्वजन, शरीर, धन, परिजन ह्यांच्या आकर्षणाने अथवा ममत्वाने दुर्गती निश्चितच आहे. ह्याचे कारण सांगताना आनंदघन यांनी एका काव्यात सांगितले आहे -

हम तो कब हुं न निज घर आये

पर घर फिरत काल बहु बीतो नाम अनेक धरायो ।

अनादी काळापासून 'पर' घरात फिरता फिरता आपले घर कोणते आहे ? कोठे आहे ? ते पाहिलेच नाही. आपल्या घरात कधी आलोच नाही 'पर' घरातच अनेक नाव संज्ञा प्राप्त केल्या. कधी एकेन्द्रिय तर कधी पंचेन्द्रिय, कधी पृथ्वी, पाणी तर कधी किडे मुंगळे यांच्या रूपात फिरलो. अनेक नाव, अनेक जाती, अनेक शरीर प्राप्त झाले कारण 'पर' घरातच फिरत राहिलो. आता काही पुण्याच्या उदयाने मनुष्य जन्म मिळाला आहे. समजत असताना सुद्धा शरीर आणि आत्म्याला एकच सांगितले तर ते मिथ्यात्व आहे. मनुष्य बुद्धिशाली प्राणी मानला जातो. परंतु जोपर्यंत तो बुद्धिला योग्य दिशेने नेत नाही आणि भेदज्ञान प्राप्त करीत नाही तोपर्यंत 'स्व' घरापर्यंत तो पोहचू शकणार नाही. 'स्व-घर' आपला आत्मा आहे. तेथे पोहचल्यानंतर पुन्हा यावे लागत नाही तेथे परमसुख, परमानंद प्राप्त होईल. ते घर शाश्वत, सुंदर आणि सदैव नवे राहील.

ज्याप्रमाणे जीव शरीराहून भिन्न आहे त्याचप्रमाणे तो स्वजनांहून सुद्धा भिन्न आहे. स्वजन-परिजनांचे संबंध बहुधा स्वार्थमूलक असतात. त्यांना आपले मानण्याची चूक करू नये. अनादीकाळापासून जीव हीच चूक करीत आला आहे. आता ह्या जन्मात त्या चुकीची पुनरावृत्ती करायची नाही.

श्री जयसोममुनींनी संसारात जन्म-मरणाच्या संबंधाने आणि त्यातून सुटण्याचे वर्णन करताना लिहिले आहे - हा संसार मोठा समुद्र आहे. त्यात दुःखरूपी पाणी भरलेले

आहे. त्यात पुन्हा पुन्हा जन्म-मरणाच्या तरंग उठत राहतात आणि ते जन्म-मरण आणि दुःख 'पर' वस्तूच्या ममतेमुळे, राग इत्यादी दोषांमुळे आणि दृष्कृत्याच्या आचरणाने प्राप्त होतात. अनंत शक्तींचा मालक आत्म्याला हे 'पर' पदार्थ काय मात करू शकतील ? कधीच नाही. परंतु जसे मातंग हत्ती समुद्रात राहणाऱ्या, दोरीप्रमाणे लांब असणाऱ्या जलचर जंतूंनी घेरले जातात अर्थात हत्तीच्या पायाला हे लांब जलचर जंतू जखडून टाकतात. तेव्हा जंतूच्या बंधनाने बांधला गेलेला बलवान हत्ती सुद्धा समुद्राच्या बाहेर निघू शकत नाही. तशीच स्थिती ममतेच्या बंधनाने बांधल्या गेलेल्या व्यक्तीच्या जीवनाची आहे. तो ममतेच्या बंधनातून सुटण्याची इच्छा करतो परंतु सुटू शकत नाही. परंतु ज्याप्रमाणे हत्तीला जलचर जंतूच्या बंधनातून मुक्त करायचे असेल तर जलकांत मणी त्यांच्याजवळ टाकल्याने पाणी दुभागले जाते आणि हत्तीच्या पायाच्या जवळची जागा जलरहित होते. पाण्याच्या अभावाने ते जलचर जंतू तिथे राहू शकत नाही. म्हणून ते हत्तीच्या पायावरून उतरून पाण्यात निघूत जातात आणि हत्ती बंधनातून मुक्त होतो. त्याचप्रमाणे भगवत् शरण आणि भगवत् प्रेम जीवाला पर वस्तूच्या रागाने आणि ममत्वापासून दूर करते. त्यामुळे जीव पर वस्तूच्या बंधनातून मुक्त होतो.[१८१]

हा संसार तर पक्षांचा मेळा आहे, पक्षी वृक्षावर आपापल्या स्वार्थामुळे येतात आणि जेव्हा पाने गळून जातात तेव्हा त्या वृक्षावरून उडून जातात, आणि हिरव्या वृक्षावर जाऊन बसतात. ज्ञानी अशा स्वार्थी संबंधांचा राग करीत नाहीत कारण ते समजतात की,

''बाजीगर जब ख्याल रचावे लोक होवे बहु मेळा
बाजी भयासु सब भग जावे, जैसाजीव अकेलारे प्राणी''[१८२]

जरी जगातल्या सर्व वस्तू प्राप्त झाल्या, हजारो लोकांबरोबर स्नेहबंध निर्माण झाले तरी आयुष्य पूर्ण होताच सर्व खेळ संपून जातात. बरोबर काहीच जात नाही.

जड पदार्थात जे आसक्त राहतात त्यांच्यावर नेहमीच संकटे कोसळतात. जे विरक्त आहेत तेच सुखी आहेत. तेच शांतीने जीवन जगू शकतात.[१८३] विरक्ती प्राप्त करण्यासाठी सत्संगती अतिआवश्यक आहे. परंतु आज जीवाची अवस्था दारूच्या नशेत उन्मत्त झालेल्या व्यक्तीसारखी झाली आहे. ज्याप्रमाणे मोठा विद्वान नेहमी शुद्ध, पवित्र राहणारा पुरुष दारूच्या नशेत अत्यंत घाणेरड्या उकीरड्यात लोळताना असा आनंदित होतो की जसे मुलायम गादीवर लोळताना आनंद व्हावा. तसेच गटाऱ्यातील हवेला सुंगधित

बागेतील हवेत फिरण्यासारखे समजतो. कोणी त्या घाणीपासून लांब जावयास सांगितले तर तो सांगणाऱ्याला मूर्ख समजून शिव्या देऊ लागतो. परंतु तो दारूडा, जेव्हा दारूच्या नशेतून मुक्त होतो तेव्हा स्वतःची दुर्दशा पाहून लज्जित होतो आणि कोणी काही सांगण्यापूर्वीच तेथून निघून जातो. त्याचप्रमाणे जीवरूपी, पवित्र आणि ज्ञानी पुरुष मोह-मदिरेच्या नशेमुळे भोगरूपी, अपवित्र कर्मरूपी उकीरड्यात लोटांगण घेताना आनंद मानतो. तो विषयभोगांपासून विरक्त आणि सद्बोध देणाऱ्यांना मूर्ख समजून उपदेशाचा अनादर करतो. परंतु जेव्हा मोहाची नशा उतरते तेव्हा तोच जीव संत-समागम इत्यादी प्रसंग प्राप्त होताच जागृत होतो आणि अज्ञानावस्थेत केलेल्या कर्मासाठी पश्चाताप करून तत्काळ विषयांपासून विरक्त होऊन भेद-विज्ञानाद्वारे 'पर' पदार्थाची आसक्ती सोडून देतो आणि आत्मभावनेत मग्न होतो.

आत्मभावनेत रत होण्यासाठी चार वस्तूंची आवश्यकता आहे.

१) ज्ञान-जीव ज्ञानामुळे कर्मापासून अलिप्त होण्याची विधी जाणतो. आणि ज्ञानामुळेच त्याच्यात कर्तव्यपरायण होण्याची शक्ती येते.

२) दर्शन - सम्यग्दर्शन मूळाप्रमाणे आहे कारण श्रद्धाच सद्गुणांना राहण्याचे स्थान आहे.

३) चारित्र - संयमरूपी क्षारच कर्ममळाला फाडून दूर करणारा आहे.

४) तप - तपस्यारूपी अग्नी कर्ममळाला जाळण्यासाठी समर्थ आहे.

ह्या चार पदार्थांचा योग मिळाला आणि औदारीक शरीररूपी द्रव्य, आर्यक्षेत्र, चौथा आरा इत्यादी काळ आणि भव्यत्व रूपी भावांचा संयोग मिळाल्यानंतर यथाविधी साधना केल्याने अनादीकाळाच्या कर्ममळाला नष्ट करून आत्मा आपल्या 'स्व' स्वरूपाला प्राप्त करू शकतो.

जसे लहानपणापासून शेळ्यांमध्ये राहिलेला सिंहाचा छावा स्वतःला शेळीच समजतो परंतु वनामध्ये सिंहाला पाहून शेळ्यांची सोबत सोडून देतो तसेच अनादी कर्मसंबंधामुळे 'स्व' स्वरूपाला विसरून कर्मजनित उपाधीला अर्थात शरीर, संपत्ती इत्यादी परवस्तूंना आपले समजतो. जेव्हा सद्गुरूंच्या उपदेशाने त्याला आत्म्याच्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान होते तेव्हा 'पर' वस्तूरूपी शेळींपासून तो स्वतःला भिन्न समजू लागतो. तो समजून जातो की, ''मी चैतन्यस्वरूपी आहे, मी सर्व प्रकारच्या अधिव्याधी आणि उपाधीने रहित आहे. हे शरीर, स्वजन, संपत्ती इत्यादी विपत्तींचे घर आहे. मी निराकार आहे. हे साकार

आहे. मी शुद्ध आणि शुचिरूप आहे. हे अशुद्ध आणि अशुचिरूप आहे. मी अजर-अमर आहे. हे क्षणभंगुर आहे, मी अनंत, ज्ञान इत्यादी गुणाने समृद्ध, सिद्धस्वरूपी आहे. हे जड आहे. अशाप्रकारे ह्यांचा आणि माझा कोणत्याही प्रकारे संबंध नाही. आता ह्या 'अन्य'चा त्याग करून एकत्व धारणा करणे हेच माझ्यासाठी योग्य आहे. अशाप्रकारे विचार करून संसाराच्या समस्त बंधनाचा त्याग करून वीतराग भावाचा अवलंब केला पाहिजे.

ज्याप्रमाणे वादळ विस्कळीत झाल्यावर सूर्य आपल्या स्वाभाविक प्रकाशाने दैदिप्यमान होतो त्याचप्रमाणे कर्माचे आवरण दूर झाल्यावर आत्म्याचे निजगुण, ज्ञान इत्यादी प्रकाशित होऊ लागतात आणि आत्मा 'स्व' स्वरूपाला प्राप्त होतो.

ज्ञानप्रकाशाच्या आलोकात जीव विचार करतो - मी कोण आहे ? एक आहे की अनेक आहे ? दिसायला तर एकाच शरीराचा धारक आहे परंतु जर एक मानले तर अनेकता कशी शक्य होईल ? आई-वडील म्हणतात की हा माझा पुत्र आहे तर काय मी पुत्र आहे ? बहीण म्हणते की हा माझा भाऊ आहे तर मी काय भाऊ आहे ? कोणी पती, कोणी पिता, कोणी काका, कोणी मामा तर कोणी जावई इत्यादी संबोधून मला बोलावतात तेव्हा मला विचार येतो की वास्तविक मी कोण आहे ? काय आहे ? कोणाचा आहे ? आश्चर्य आहे की आपला शोध करणे आपल्यालाच मुश्किल होत आहे. स्वतःच स्वतःला ओळखण्यात असमर्थ होत आहोत.

परंतु ज्यांना भेदज्ञान होते त्यांना प्रतीति येते की, हा सर्व कर्माचा खेळ आहे. परमार्थदृष्टीने मी पुत्र नाही. पिता नाही किंवा कोणी अन्य नाही. कोणी माझे नाही किंवा मी कोणाचा नाही. जर मी ह्या नावाचा असतो तर नेहमी त्याच रूपात राहिलो असतो. अशाप्रकारे विचार केल्याने सर्व अन्य भाव मिथ्या प्रतीत होतात.

ज्याप्रमाणे नट नाट्यशाळेत 'स्त्री'चे रूप घेतो आणि पुरुषाचे सुद्धा रूप घेतो तसाच अभिनय करतो. परंतु आंतरीक दृष्टीने पाहिले तर तो नट तसा नाही. तो राजा नाही किंवा राणी नाही, संयोग नाही किंवा वियोग नाही. तो ह्या सर्व भावाहून अन्य आहे, वेगळा आहे. केवळ दर्शकांना दाखविण्यासाठी, हसविण्यासाठी, रडविण्यासाठी आणि फसविण्यासाठी अनेक भाव दर्शवतो. परंतु अंतरात तो त्या सर्व भावाहून वेगळा आहे.

त्याचप्रमाणे संसाररूपी नाट्यशाळेत चैतन्यरूपी नटाने कर्माच्या निमित्ताने उच्च-नीच, एकेंद्रियापासून पंचेद्रियांपर्यंत, चांडाळापासून चक्रवर्तीपर्यंतचे रूप धारण करून त्या

त्या पर्यायाच्या अनुरूप कार्य केले. परंतु शेवटी एकही रूप कायमचे राहिले नाही. सर्व आपापल्या ठिकाणी आणि आपापल्या कालावधीत नष्ट झाले. चैतन्य सर्वांपासून वेगळेच राहिले.

हा आहे कर्माचा तमाशा. आता ह्या मनुष्य जन्मात बुद्धी मिळाली आहे तर कर्माच्या नशेला उतरवून जागृत व्हायचे आहे. कर्माच्या विचित्रतेला समजून घेऊन भेदविज्ञानी बनायचे आहे. विभावाला सोडून 'स्व'भावात रममाण व्हायचे आहे. सतत त्याचेच चिंतन करायचे आहे.

हे जीवा ! जगातील सर्व पदार्थ तुझ्याहून भिन्न आहेत. तुझा त्याच्याबरोबर काहीच संबंध नाही. म्हणून 'स्व' स्वरूपाला ओळख. तू शुद्ध आहेस. सत् आहेस, सच्चिदानंदी आहे, सिद्धस्वरूपी आहेस असे चिंतन केल्याने आपले खरे स्वरूप प्राप्त होते.[१८४]

तत्त्वज्ञान स्वरूपज्योतीचा दिव्य प्रकाश प्रकट झाल्याने जीव स्वात्मस्वरूपाला ओळखू लागतो. 'पर' द्रव्याला ग्रहण करीत नाही. ज्याप्रमाणे लोक 'पर' वस्तूला 'ही परवस्तू आहे' असे समजल्यावर त्याचा त्याग करतात तसेच सर्व 'पर' द्रव्याच्या भावनेला 'हे परभाव आहे' असे समजून त्याला सोडून देतात. जोपर्यंत 'पर' वस्तूला चुकून स्वतःची मानली जाते तोपर्यंतच 'ममत्व' राहते आणि जेव्हा यथार्थ ज्ञान होते तेव्हा तो दुसऱ्यांच्या वस्तूंबद्दल ममत्व कसे ठेवेल?

जसे एखादी व्यक्ती धोबीच्या घरातून भ्रमामुळे दुसऱ्यांचे कपडे आणते आणि स्वतःचे समजून शरीरावर धारण करते. परंतु जेव्हा दुसरा त्याला सांगतो की तू सावध हो, हे वस्त्र माझे आहे. वस्त्रांची बदली झाली आहे. माझे मला वस्त्र देऊन टाक. तेव्हा सर्व खुणांचे चांगल्याप्रकारे निरीक्षण करून नक्कीच हे वस्त्र दुसऱ्यांचे आहे असे समजल्यावर तो लगेचच त्या वस्त्रांना सोडून देतो, देऊन टाकतो. तसेच ज्ञाना सुद्धा भ्रमामुळे 'पर' द्रव्याला आपले समजून बसतो. परंतु जेव्हा सत् गुरू त्याला 'पर' भावाचे लौकिक ज्ञान, भेदज्ञान करवून त्याला आत्मभावात एकाग्र होण्याचे सांगतात तेव्हा आत्मज्ञानच तुझा स्वभाव आहे अन्य सर्व 'पर' भाव आहे असे समजून ज्ञानी सर्व 'पर' भावाला तत्काळ सोडून देतात.

आचार्य कुंदकुंद लिहितात की जो आत्मा अशाप्रकारे जीव आणि पुद्गलाच्या आपापल्या चेतनत्व स्वभावाद्वारे 'स्व-पर' भावाला समजत नाही. तोच आत्मा 'हा मी

आहे, हे माझे आहे' अशा प्रकारे मोहामुळे 'पर' द्रव्यात आपलेपणाचा अध्यवसाय करीत असतो. दुसरा नाही. ज्याला 'स्व-पर'चे भेदज्ञान नाही तो 'पर' द्रव्यात अहंकार आणि ममत्व ठेवतो. ह्या 'पर' द्रव्यात प्रवृत्ती असण्याचे कारण भेदज्ञानाचा अभाव आहे आणि 'स्व' द्रव्यात प्रवृत्ती असण्याचे कारण भेदज्ञानच आहे.

मी 'पर'चा नाही, 'पर' माझे नाही, मी एक ज्ञानस्वरूपी आहे. अशाप्रकारे जो ध्यान करतो तो ध्याता अनात्म्याला सोडून आत्म्यालाच आत्मरूपात ग्रहण करतो आणि 'पर' द्रव्याच्या भिन्नत्वाच्या ज्ञानामुळे शुद्धात्मभावाला प्राप्त होतो.[१८५]

परंतु जर कोणाला शरीरादीबद्दल परमाणुमात्रही मूर्च्छा राहत असेल तर ता जरी सर्व आगमाचा ज्ञाता असला तरी त्याला सिद्धी प्राप्त होत नाही.

अर्थात जो शरीर इत्यादी अन्य पदार्थांच्या मोहकलंकरूपी खिळ्याने बांधला गेलेला आहे तो कर्मातून सुटू शकत नाही, सिद्ध होऊ शकत नाही. सर्व बंधनातून सुटण्यासाठी 'स्व-पर'चे भेदज्ञान होणे अत्यंत आवश्यक आहे. भेदज्ञानामुळे 'पर'ची परिहेयता समजून त्याचा त्याग आणि 'स्व'ची सार्थकता समजून त्याची साधना केल्याने जीव बंधनातून मुक्त होऊ शकतो.

जैनदर्शनात सम्यग्दर्शन, सम्यक्ज्ञान आणि सम्यक् चारित्र ह्या त्रिवेणी संगमाला मोक्षमार्ग अथवा बंधन-मुक्तीचे साधन सांगितले आहे. त्याचा अभिप्राय 'स्व' स्वरूपावर विश्वास ठेवणे, 'स्व' स्वरूपाचे ज्ञान घेणे आणि 'स्व' स्वरूपामध्ये स्थिर होणे ज्यामुळे पूर्णतेला प्राप्त होऊ शकतो, मुक्ती प्राप्त करू शकतो असा आहे.

पाश्चात्य विचारक टेनिसने, एका जागी लिहिले आहे -

"Self reverence, self knowledge, self-control these three alone lead life of sovereign power."

अर्थात आत्मविश्वास, आत्मज्ञान आणि आत्मसंयम हे तीन आत्म्याला परमशांती संपन्न करणारे आहे.[१८७]

सम्यग्दर्शन आणि सम्यक् ज्ञान याचे तात्पर्य सर्वप्रथम आत्मचिंतनाद्वारे 'स्व' स्वरूपाचे ज्ञान करून घेऊन त्यावर श्रद्धा आणि विश्वास ठेवणे आहे. जोपर्यंत 'स्व' स्वरूपाचे ज्ञान आणि 'स्व' स्वरूपामध्ये श्रद्धा, विश्वास निर्माण होत नाही तोपर्यंत आत्मस्वरूपात स्थिर होण्याचे प्रयत्न निष्फळ होतात.

आत्मविश्वास निर्माण झाल्यानंतर तो शरीराला 'पर' पदार्थ किंवा नष्ट होणारा 'स्व'हून भिन्न आहे असे मानतो. तेव्हा शरीराच्या चिंतेपासून, क्लेशापासून मुक्त होतो. 'अंतकृदशांग' सूत्रामध्ये देवकीनंदन त्रिखंडाधिपती श्रीकृष्णाच्या लहान भावाचे वर्णन आले आहे. त्यांचे नाव गजसुकुमारमुनी, बाविसावे तीर्थंकर भगवान अरिष्टनेमी यांचा उपदेश ऐकून त्यांच्या जीवनात वैराग्याची ज्योती जागृत झाली आणि सोळा वर्षाच्या वयात त्यांनी भगवान अरिष्टनेमींकडून दीक्षा घेतली. गजसुकुमारमुनींचा आत्मविश्वास इतका प्रबळ होता की ज्या दिवशी दीक्षा घेतली त्याचदिवशी भिक्षूंची बारावी प्रतिमा जी अध्यात्ममार्गाची सर्वोत्कृष्ट साधना आहे ती स्वीकार केली. ह्या साधनेत साधकाला एक रात्र स्मशानात ध्यानस्थ राहण्याची विधी आहे. त्यांच्याबरोबर कोणतेच मुनी राहत नाही आणि जे काही मनुष्य, तिर्यंच, देव संबंधी उपसर्ग येतात ते त्याला शांतीने सहन करावे लागतात.

गजसुकुमारमुनी भगवान अरिष्टनेमी यांची आज्ञा घेऊन निर्द्वंद्व आणि निर्भय होऊन आपली साधना करण्यासाठी स्मशानात गेले. भूमीचे परिमार्जन केले आणि ध्यानामध्ये, आत्मभावनेमध्ये लीन झाले. ते ध्यानामध्ये इतके तन्मय झाले की त्यांना काहीच कळले नाही की कोण येत आहे, काय करीत आहे.

श्रीकृष्णाने गजसुकुमाराच्या विवाहासाठी सोमिल ब्राह्मणाची कन्या सोमाला राज्यकुळाचे योग्य शिक्षण देण्यासाठी आपल्या राजमहालात ठेवली होती. सोमिल लग्नाची तयारी करीत होता. त्याचदिवशी संध्याकाळी हवन इत्यादी कार्यासाठी लाकूड आणण्यासाठी त्याच स्मशानाच्या दिशेने निघाला. तेथे गजसुकुमाराला मुनींच्या वेशामध्ये ध्यानस्थ उभे पाहून त्यांच्या डोळ्यातून अग्निवर्षा होऊ लागली. तो आपल्या मनात विचार करू लागला की, 'हा किती दुष्ट व्यक्ती आहे, जो माझ्या कन्येचा त्याग करून साधु झाला. त्याच्या मनात प्रतिशोधाची भावना निर्माण झाली. आणि त्याने लगेचच ओली माती आणून मुनींच्या डोक्यावर मातीची पाळ बांधली. आणि त्याच चितेमध्ये असलेले जळते अंगारे आणून टाकले आणि तेथून निघून गेला. मुनींचे डोके जळू लागले. त्यांच्या शरीरात तीव्र वेदना होऊ लागल्या. तरी मुनींच्या चिंतनधारेचा स्रोत निरंतर गतिशील होत राहिला. कारण त्यावेळी मुनींची आत्मचेतना देहात नव्हे परंतु आत्म्यामध्ये केंद्रित झाली होती. त्यावेळी अन्यत्व भावनेचे चिंतन करता करता मुनी विचार करू लागले की ह्या संसारामध्ये माझा कोणीही शत्रू नाही आणि कोणी मला जाळतही नाही. वास्तविकतः राग-द्वेष आणि कषायच आत्म्याचे प्रबळ शत्रू आहेत. तेच अहोरात्र शरीराला जाळत

राहतात. त्यांना नष्ट केल्याने सर्व ताप, संताप आणि वेदनेतून मुक्ती मिळू शकते. हे शरीर तर एक दिवस जळणारच आहे. त्याच्या जळण्याने माझे काहीच जळत नाही. मी अन्य आहे आणि माझे शरीर अन्य आहे. त्याच्या जळण्याने माझ्या आत्म्याचा एक प्रदेशसुद्धा जळत नाही. तो तर अज्वलनशील आहे, अक्षय आहे, अमर आहे आणि अविनाशी आहे तरी ह्या विनाशी शरीरासाठी, जे माझ्याहून भिन्न आहे. त्याची मी का चिंता करू ?

हे अंगारे मस्तक जाळू शकतात, शरीराला क्षत-विक्षत करू शकतात आणि जाळून नष्टही करू शकतात. परंतु आत्मा ह्या शरीराहून भिन्न आहे आणि शरीराबरोबर राहूनही आपल्या गुण आणि पर्यायामध्येच परिणमन करतात त्याला हा अग्नी कधी जाळू शकत नाही. मग मी ह्या शरीरासाठी कोणाला दोष का देऊ ? कोणाबरोबर वैर का करू ? अशाप्रकारे भेदविज्ञानाद्वारे शरीराला 'अन्य' समजून जेव्हा मुनी 'स्व' स्वरूपात स्थिर झाले आणि परमशुक्ल ध्यानामध्ये स्थिर झाले तेव्हा घाती आणि अघाती सर्व कर्माचा क्षय करून गुणस्थानातीत अवस्था प्राप्त केली आपल्या शुद्ध स्वरूपाला प्रकट केले.[१८८]

अन्यत्व भावनेच्या चिंतनाने साधक 'स्व-पर'च्या भेदाला स्पष्टपणे समजून घेतो. भेदज्ञान झाल्यावर त्याच्या मनात आणि जीवनात 'स्व'हून भिन्न 'पर' शरीर आणि अन्य पर पदार्थांवर ममत्व भाव राहत नाही. चिंतन देहभावापासून दूर होऊन आत्मभावात केंद्रित होते. त्यामुळे ममता, आसक्ती इत्यादी व्यामोहाची बंधने सहज तुटतात. आणि ममत्वाच्या शृंखलेचे तुटणे म्हणजेच संसार बंधनातून मुक्त होणे आहे. अन्यत्वभावनेचे चिंतन आत्म्याला आवृत्त करणाऱ्या मोहाच्या आवरणाला दूर करणारे चिंतन आहे.

आत्मा आणि शरीर इत्यादींच्या वास्तविक स्थितीला स्पष्ट करण्यासाठी पंडित दौलतरामजी यांनी लहानशा उदाहरणाद्वारे अत्यंत सुंदर सांगितले आहे -

जल - पय ज्यों जीव तन मेला, पै भिन्न भिन्न नहीं भेला ।
तो प्रकट जुदे धन धामाक्यों, हवै इक मिलि सुत रामा ॥[१८९]

पाणी आणि दुधाप्रमाणे आत्मा आणि शरीर एकमेकांत मिसळलेले आहेत तरी सुद्धा दुध आणि पाणी वास्तविक वेगवेगळे आहेत. तसेच जीव आणि शरीर अर्थात आत्मा आणि शरीर भिन्न भिन्नच आहे. एक नाही. जेव्हा एका क्षेत्रात राहणारे आत्मा आणि शरीर सुद्धा आत्म्याहून वेगळे आहेत तर मग धन, भवन, पुत्र, पत्नी इत्यादी आत्म्याबरोबर एकरूप कसे होऊ शकतील? आत्मा सर्वांहून वेगळा आहे.

ज्याप्रमाणे दूध हे दूध आहे आणि पाणी हे पाणी आहे. दुध हे कधीही पाणी होऊ शकत नाही आणि पाणी कधी दूध होत नाही. एकत्र झाले तरी सुद्धा वास्तविक ते एकमेकात मिळत नाहीत परंतु एकमेकांत मिसळल्यासारखे दिसून येतात कारण कोणत्याही 'अन्य'मध्ये मिसळणे हा त्याचा स्वभावच नाही. कोणामध्येही मिसळण्यासाठी स्वतःचे आस्तित्व नष्ट करावे लागते आणि वस्तू स्वतःला कधीही नष्ट करू शकत नाही.

त्याचप्रमाणे जीव हा जीव आहे आणि देह देह. जीव कधीही देह होऊ शकत नाही. जीवामध्ये देह मिसळू शकत नाही. संयोग पाहून केवळ मिसळले असे सांगितले जाते. वास्तविक ते तर एकमेकाहून भिन्न आहेत.

ह्या बाबतीत आचार्य योगेन्दुदेव सुद्धा प्रेरणा देतात की पुद्गल अन्य आहे, जीव अन्य आहे. अन्यचे सर्व व्यवहार सुद्धा अन्य आहेत म्हणून हे आत्मन् : तू पुद्गलाला सोडून आपल्या आत्म्याला ग्रहण कर त्यामुळे तू शीघ्रच संसारातून पार होशील.[१९०]

जो जीव अशुची शरीराहून वेगळा अशा शुद्ध आत्म्याला जाणतो तो शाश्वत सुखामध्ये लीन होतो व तो आत्मा सर्व शास्त्रांना जाणून घेतो.[१९१] अर्थात ज्याने सर्व शास्त्राच्या सारभूत शुद्धात्मतत्वाला समजले आहे, त्यातच लीन झाले आहे. मूळ प्रयोजन सिद्ध झाल्याने जणू काही त्याने सर्व शास्त्रांनाच जाणले आहे.

आत्मोपलब्धी करण्यासाठी, शरीराची भिन्नता जाणल्यानंतर अष्टकर्माच्या उदयाने होणाऱ्या जीवाची मोह-राग-द्वेषरूपी भावकर्माची भिन्नता जाणली पाहिजे. ह्याचे भेदज्ञान झाल्यानंतर ज्ञानानंद स्वभावी त्रिकाळ ध्रुव निज परमात्म तत्त्वाला जाणले पाहिजे. त्या परमात्मतत्त्वाला हृदयात धारण केले पाहिजे त्याचाच विचार केला पाहिजे.

'पर'ने भिन्नतेचे ज्ञानच भेदविज्ञान आहे, आणि 'पर'हून भिन्न चैतन्य देवाला जाणणे, मानणे, अनुभव करणे, आत्मानुभूती आहे, आत्मसाधना आहे, आत्माराधना आहे. संपूर्ण जिनागम आणि जिन अध्यात्म्याचे सार ह्यातच समाहित आहे. अन्यत्व भावनेच्या चिंतनाचा अंतिम परिणाम हाच आहे.

अपने अपने सत्व कूं, सर्व वस्तु विलसाय ।
ऐसे चिंतवे जीव तब, पर ते ममत न थाय ॥[१९२]

प्रत्येक वस्तू स्वतंत्ररूपाने आपापल्या सत्तेत विलास करते. कोणाचा कोणाच्या बरोबर काहीच हस्तक्षेप नाही जेव्हा जीव अशाप्रकारे वस्तूच्या संपूर्ण भिन्नत्वाचा विचार करतो तेव्हा त्याला 'पर' पदार्थामुळे ममत्व उत्पन्न होत नाही.

12-9-04